ई/५४

# मराठ्यांचा इतिहास

भाग ४ था

## शहाजीचें चरित्र.

कै. दत्तात्रय बाळकृष्ण करकरे

किंमत दोन रुपये

ई/५४

# मराठ्यांचा इतिहास.

## भाग ४

## शहाजीचें चरित्र.


लेखक

**कै. दत्तात्रय बाळकृष्ण करकरे**

स्थानांतील ब्रिटिश साम्राज्य, अस्तनींतील निखारा, पेशवाईचा मध्यकाल,
मराठ्यांचा इतिहास भाग १ ते ३ वगैरे पुस्तकांचा कर्ता.

—प्रस्तावना—लेखक—

**श्रीयुत यादव माधव काळे,** वकील

' वऱ्हाडचा इतिहास ' या पुस्तकाचे कर्ते, बुलढाणा.



आवृत्ति पहिली.

सन १९२९.



( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. )


**किंमत दोन रुपये.**

मुद्रकः—**गणेश काशिनाथ गोखले**
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनिवार पेठ, पुणें नं. २.

# आभार-प्रदर्शन.

या भागास मी ज्या ज्या ग्रंथाचे आधार घेतले आहेत, त्या त्या सर्व ग्रंथकारांचा ज्या ज्या अनेक स्नेह्यांनीं व वाचनालयांनीं मला आपल्या अमोल्य ग्रंथ-संग्रहालयाचा उपयोग करण्याची, व आवश्यक तीं पुस्तकें वापरण्यास जवळ ठेवण्याची परवानगी दिली त्यांचा व ज्या इतर अनेक स्नेही व मराठ्यांच्या इतिहासाविषयीं अभिमान असणाऱ्या मंडळींनीं माझ्या अंगीकृत कार्यास उत्तेजन देऊन मला निरनिराळ्या प्रकारें उपयुक्त व उदारपणानें मदत केली, त्या त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

**ग्रंथकार.**

प्रकाशकः—**गो. बा. करकरे**, बी. ए.
जळगांव, पूर्वखानदेश.

# प्रस्तावना.

कै० दत्तोपंत करकरे हे इतिहासाचे एकनिष्ठ सेवक होते. त्यांचे मराठ्यांच्या इतिहासाचे पहिले तीन भाग प्रसिद्ध झाले आहेत. दुर्दैवानें रा. करकरे हे कालवश झाले. त्यांचे इतिहासाचा हा चौथा भाग त्यांचे बंधू गो. वा. करकरे यांनीं प्रसिद्ध केला आहे.

रा करकरे यांनीं आपल्या ग्रंथाचा विस्तार फार मोठा धरला होता व त्या अंदाजानें पहिले तीन भाग मराठ्यांचा वास्तविक इतिहास सुरू होण्यापूर्वीच्या पार्श्वभागांतच खर्ची पडले. हा पार्श्वभाग थोडक्यांत आवरला असता तर करकरे यांच्या मराठ्यांच्या इतिहासाच्या श्रमाचें फल यापूर्वीच आपणांस मिळालें असतें. पण मुख्य भाग सुरू होण्यापूर्वीच दुर्दैवानें करकरे मृत्युमुखीं पडले.

हल्लींच्या चौथ्या भागांत भोसले घराण्याची पूर्वपीठिका व त्यांचा उदेपूरच्या शिसोदे घराण्याशीं संबंध या विषयींची परंपरागत आलेली सर्व माहिती दिली आहे. शहाजी व शिवाजी यांच्या वेळच्या व नंतरच्या सर्व बखरी व अलीकडे प्रसिद्ध झालेले राधामाधव विलास चंपू, शिवभारत वगैरे ग्रंथ यांतील सर्व माहिती परिश्रमपूर्वक या भागाचे आरंभीं दिली आहे. ही माहिती दंतकथात्मक व पौराणिक स्वरूपाची असल्यामुळें त्यांतील प्रत्येक शब्द इतिहासाचे कसोटीस लागणार नाहीं. तरी भोसले व इतर मराठे हे खरे क्षत्रिय असून त्यावेळीं ही समजूत सर्वमान्य होती व त्यांचें चरित्रहि क्षात्रवृत्तीचेंच होतें याबद्दल कोणासहि शंका राहिली नाहीं. उदेपूरच्या घराण्याशीं दाखविलेलें नातें हें मात्र कितपत खरें असेल हें सांगतां येत नाहीं. हिंदुस्थानांत रजपूत हेच निर्विवाद व खरेखुरे क्षत्रिय आहेत अशी समजूत असल्यामुळें ज्याला म्हणून आपलें क्षत्रियत्व सर्वमान्य करावयाचें असेल त्यानें रजपुताशीं संबंध दाखविलाच पाहिजे अशी बरेच दिवसांपासून परंपरा चालत आली आहे व याच कल्पनेंत या बऱ्याच वंशावळींचें बीज आहे असा संशय येतो. वास्तविक रजपुतांशिवाय दुसरे क्षत्रिय अस्तित्वांत नाहींत हें म्हणणें म्हणजे “ कालावाद्यं-

तयोः स्थितिः " असें म्हणण्याइतकेंच आकुंचितपणाचें आहे. दक्षिणेंतील मराठे हे स्वयंसिद्ध क्षत्रियच आहेत व त्यांच्या क्षत्रियत्वाबद्दल त्यांना रजपूताशीं नातें लावण्याचें कांहींच कारण नाहीं.

प्रस्तुत ग्रंथांतील सर्व माहिती आधार व निर्विवाद अशीच दिली आहे. शिवाजीची जन्मातिथी जुनीच प्रमाण धरून नवीन तिथीचा उल्लेख मात्र केला आहे.

राजकारणांत मराठे लोक उदयास येण्यास कोणकोणत्या पुरुषांची कर्तबगारी कारणीभूत झाली हें जाणणें आवश्यक आहे. लुकजी जाधवराव, मालोजी भोसले, मुरार जगदेव, उदाराम माहूरकर, साबाजी अनंत, बाजी घोरपडे वगैरे लोकांच्या उलाढाली, पराक्रम व मुत्सद्दीपणा यांमुळें इतर मराठ्यांना पुढें येण्यास संधि मिळाली व तिचा फायदा शिवाजीस मिळाला. त्यावेळच्या विजापूर व नगर येथील मुसलमान सरदाराइतकेंच हिंदु सरदारहि होते व मुत्सद्दीगिरी तर बऱ्याच अंशीं हिंदूच्या हातीं आली होती. वरील राज्यांतील मुसलमानांचा जोम संपून नवीन दमाच्या मराठ्यांस बरेंच कार्यक्षेत्र मिळालें.

प्रस्तुत ग्रंथांत निरनिराळ्या व्यक्तींच्या घराण्यांची माहिती दिली आहे ती मनोवेधक आहे. तसेंच स्थलांची नक्की माहिती काळजीनें दिली आहे. ग्रंथांतील निरनिराळी माहिती कोठून घेतली हें मात्र पुष्कळ ठिकाणीं लिहिलेलें नाहीं त्यामुळें चिकित्सकबुद्धीनें वाचणारांस मूळ आधाराचा पत्ता लागण्यास अडचण पडेल. टीपेंत असे आधार देणें बरें. कारण दिलेल्या माहितीची जबाबदारी ग्रंथकर्त्यावर किती व आधारभूत ग्रंथांवर किती याची वाटणी बरोबर करितां येते.

प्रस्तुत भागांत मुख्यत्वें शहाजी राजे भोसले यांचें चरित्र आलें आहे. शहाजीच्या चरित्रांतील सर्व उपलब्ध माहिती ग्रंथकर्त्यानें दिली आहे. त्यावेळचे प्रसिद्ध व कर्ते पुरुष व त्यांच्या उलाढाली यांत वर्णिल्या आहेत. शेवटीं शहाजीच्या चरित्र्याचें मार्मिक विवेचन केलें आहे. शिवाजीच्या कर्तृत्वाचें बीज शहाजीच्या कर्तबगारींत कसें आहे हें दाखविण्याचा प्रयत्न

केला आहे व तो बरा साधला आहे. शेवटीं तंजावरच्या राजघराण्याची माहिती परिशिष्टरूपानें दिली आहे.

एकंदरींत हा भाग काळजीनें वाचण्या योग्यतेचा झाला आहे. रा. गो. बा. करकरे यांनीं हा भाग छापून महाराष्ट्र ऐतिहासिक साहित्याची चांगली सेवा केली आहे व तिचें चीज महाराष्ट्रीय वाचकवर्ग करील अशी आशा आहे.

बुलढाणा ( वऱ्हाड )
ता. ३०।४।१९२९

**यादव माधव काळे**

# प्रकाशकाचे दोन शब्द.

वडील बंधूंच्या अकाली निधनानें अपूर्ण राहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचा चवथा भाग प्रसिद्ध करितांना श्रीमती बाईसाहेबांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. बंधूंच्या निधनानंतर लवकरच श्रीमंत सरदारसाहेब यांचेंही अकालीं निधन झाल्यानें उरलेलें लिखाण कसें प्रसिद्ध होईल ही मनास काळजी लागून राहिली होती. अशा वेळीं श्रीमती बाईसाहेबांनीं कै. श्रीमंत सरदारसाहेबाप्रमाणेंच उदार आश्रय दिला याबद्दल त्यांचे उपकार मानावे तितके थोडेच आहेत. त्याचप्रमाणें प्रस्तावनालेखक श्री. काळे यांनीं विनंतीस मान देऊन प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. तसेंच सदर ग्रंथाचे प्रकाशनाबाबत श्रीमंतांचे दिवाण श्री. सदाशिवराव गचके यांनीं केलेल्या मदतीबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें.

पूर्वींच्या तीन भागांप्रमाणेंच हा भागही जनता—जनार्दनास प्रिय होईल अशी आशा आहे.

जळगांव, ता. २२—१०—२९.

गो. वा. करकरे.



श्रीमती आनंदीबाईसाहेब भ्रतार कै० धैर्योदार्य चूडामणी, श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव ऊर्फ गंभीरराव देशमुख, देशपांडे सरकानगो, सावदें, जिल्हा पूर्वखानदेश.

[ फोटो सन १९२२



जन्म ता. ३१-८ १८८३
शुक्रवार श्रावण वद्य १४ शा० १८०५

निधन ता. ७-३-१९२६
रविवार फाल्गुन वद्य ८ शा० १८४८

**कै० धैर्योदार्य चूडामणी, श्रीमंत सरदार गंगाधरराव रघुनाथराव ऊर्फ गंभीरराव देशमुख, देशपांडे, सरकानगो, सावदें, जि० पूर्वखानदेश.**

# मराठ्यांचा इतिहास.

## भाग चौथा

### क्षत्रिय कुलावतंस श्रीमंत

# शहाजी राजे.

## परिच्छेद पहिला

### भोंसले घराण्याची पूर्वपीठिका.

" तुझे मनोरथ सिद्धीस जातील; व तुझे वंशीं "
" श्री सांबाचा अवतार, शककर्ता निर्माण होईल. "

—तुळजापूर येथील देवीचा मालोजीस झालेला दृष्टांत.

**भोंसल्यांचें** घराणें, हें दक्षिणेंतील इतिहासप्रसिद्ध मराठा घराण्यांतील अतिशय प्रसिद्ध व पुरातन असून, हें क्षत्रिय घराणें देवराजजी महाराणा या नांवाच्या एका पराक्रमी रजपूत पुरुषानें दक्षिणेंत स्थापन केलें. यासंबंधीं अशी पूर्वपीठिका आहे कीं, अयोध्या प्रांतांत " शिसोदे " ह्या नांवाचे सूर्यवंशीय राजे राज्य करीत असतां त्यांच्यांतील एका पराक्रमी पुरुषानें नर्मदा नदीच्या दक्षिणतीरीं येऊन त्या ठिकाणीं एक राज्य संपादन केलें; व तेथें तो स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. पुढें शककर्ता शालिवाहन यानें त्याच्या

वंशांतील एका राज्यकर्त्याचा पराभव करून त्यास पदभ्रष्ट केलें; तेव्हां त्याची स्त्री आपला पांचसहा वर्षांचा मुलगा बरोबर घेऊन तेथून मेवाड प्रांतांत गेली; व तेथें आपल्या ह्या अज्ञान मुलासह एका ब्राह्मणाच्या आश्रयास राहिली. ह्या ठिकाणीं असतां हा मुलगा दररोज त्या ब्राह्मणाच्या गाई रानांत चारण्याकरितां घेऊन जात असे. त्याप्रमाणें एक दिवस तो मुलगा रानांत गेला असतां त्यास एके जागीं पुरलेलें पुष्कळ द्रव्य सांपडलें; तें घेऊन तो घरीं परत आला, व तें त्या ब्राह्मणास दाखवून, त्यानें घडलेली सर्व हकीकत त्यास सांगितली. नंतर त्या ब्राह्मणाच्या मदतीनें त्यानें तो पहाडी प्रदेश आपल्या इस्तगत करून घेतला; त्या ठिकाणीं आपलें राज्य स्थापन केलें, व तेथें एक किल्ला बांधून त्यास "चित्रकूट" हें नांव दिलें; हाच किल्ला सांप्रत "चितोड*" ऊर्फ "चितोडगड" ह्या नांवानें प्रसिद्ध असून त्या ठिकाणीं त्याच्या वंशजांनीं पुढें पांचशें वर्षें राज्य केलें, असें म्हणतात.

मध्यंतरीं, इ. स. १२७५ च्या सुमारास, महाराणा लक्ष्मणसिंह ह्या नांवाचा एक पुरुष या चितोड येथील गादीवर बसला; त्यास भीमसिंह या नांवाचा एक चुलता असून तोच राज्याचा सर्व कारभार पहात असे; त्यास पद्मिनी या नांवाची एक अतीशय लावण्यसंपन्न स्त्री होती; तिच्या लोकोत्तर

---

*चितोड ऊर्फ चितोडगड हा इतिहासप्रसिद्ध किल्ला उदेपूरच्या राज्यांत उदेपूरपासून अजमासें सत्तर मैलांवर, राजपुताना–माळवा रेल्वेच्या खांडवा ते अजमीर मार्गावर असून तें एक रेल्वेस्टेशनही आहे; व येथून उदेपूरपर्यंत एक रेल्वेचा फांटा गेलेला आहे. चितोड हा गांव गामेरी नदीच्या कांठीं वसलेला असून गांवापासून किल्ला अगदीं जवळ आहे; व गांव आणि किल्ला यांच्या अजमासें मधोमध स्टेशन आहे; हा किल्ला आगगाडींतून जातां येतांनाही दृष्टीस पडतो; व त्याचें भव्य असें दर्शनीय स्वरूप पाहूनच मन थक्क होऊन जातें.

स्वरूपाची कीर्ति दिल्लीचा बादशाहा अल्लाउद्दीन खिलजी ( कारकीर्द इ. स. १२९६ ते इ. स. १३१६ ) याच्या कानावर गेली; तेव्हां त्यानें तिच्या अभिलाषानें मेवाड प्रांतावर स्वारी केली, आणि त्यानंतर रजपूत व मुसलमान यांच्यामध्यें भयंकर रणकंदन माजून अल्लाउद्दीन यानें अखेरीस चितोडगड आपल्या हस्तगत करून घेतला ( इ. स. १३०४ ). त्यावेळीं आपल्या वंशाचा समूळ नाश नाश होऊं नये म्हणून लक्ष्मणसिंहानें आपला दुसरा व सर्वांत आवडता मुलगा अजयसिंह यांस आपणाजवळ बोलावून घेतलें; व त्यास आज्ञा केली कीं, "आपल्या घराण्याचें निर्मूलन होणें कोणत्याहि प्रकारें इष्ट नाहीं; म्हणून तूं ताबडतोब या ठिकाणाहून निघून कैलवाडा* या नांवाच्या अवघड व बळकट ठिकाणीं जाऊन आपल्या प्राणाचें रक्षण करावेंस;" अल्लाउद्दीनच्या सैन्याबरोबर आपण दोन हात करावे, अशी अजयसिंहाची फार इच्छा होती; त्यामुळें स्वतःच्या प्राणाचें रक्षण करण्याकरितां पळून जाणें त्यास पसंत नव्हतें; तथापि वडिलांनीं फारच आग्रह केल्यामुळें तो अखेरीस नाइलाजानें आपल्या वडील बंधूचा अज्ञान मुलगा हमीरसिंह ऊर्फ हम्मीरसिंह यांस बरोबर घेऊन कैलवाडा येथें गेला, व इकडे रजपुतांचा भयंकर प्राणनाश होऊन चितोडगडावर मुसलमानी अंमल सुरू झाला.

अजयसिंह हा हमीरसिंहास बरोबर घेऊन कैलवाडा येथें गेल्यानंतर त्यानें त्या ठिकाणीं एक बरेंच मोठें सैन्य जमविलें; आणि मुसलमानांच्या ताब्यांत गेलेल्या आपल्या वडिलांच्या राज्यापैकींचा बराच प्रदेश त्यानें पुन्हां

---

* कैलवाडा, हा खेडेगांव उदेपूरच्या राज्यांत पश्चिम सरहद्दीवर, अरवली पर्वताच्या आंतील भागांत कुमलगड या नांवाच्या प्रसिद्ध किल्ल्याच्या पायथ्याशीं वसलेला आहे. हा किल्ला महाराणा कुंभ यानें पंधराव्या शतकांत बांधिला असून तो अतिशय मजबूत, चढण्यास अवघड व समुद्रसपाटीपासून अजमासें ३५६८ फूट उंचीवर आहे.

आपल्या हस्तगत करून घेतला; व राजनगर* या नांवाचा एक किल्ला बांधून तेथें आपली राजगादी स्थापन केली. अजयसिंहाचें आपल्या पुतण्यावर अतिशय प्रेम होतें; त्यामुळें तो वयांत आल्यावर अजयसिंहानें त्यास–हम्मीर सिंहास–गादीवर बसविलें; व आपण सर्व राज्याचा कारभार पाहूं लागला. अशा रीतीनें कांहीं काळ लोटल्यावर अजयसिंह मृत्यु पावला. त्याल सजनसिंह या नांवाचा एक मोठा शूर, कर्तृत्ववान व विचारी मुलगा होता; त्यानें, आपल्या चुलत भावाशीं राज्याकरितां भांडत बसण्यापेक्षां आपण स्वतःच एक स्वतंत्र राजगादी स्थापन करावी, असा विचार करून तो दक्षिणेकडे आला; आणि सोंधवाडा प्रांत काबीज करून तेथें त्यानें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

या ठिकाणीं त्याच्या घराण्याचें चार पिढ्या वास्तव्य झालें; सजनसिंहानंतर दिलीपसिंहजी, सिंहजी ऊर्फ शिवाजी, भोंसाजी+ व देवराजजी हे चार पुरुष अनुक्रमें राज्यकर्ते झाले. या चारीही राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीत मुसलमान लोकांनीं त्यांच्यावर अनेक वेळां स्वाऱ्या केल्या. त्यामुळें त्यांना अतीशय त्रास भोगावा लागला. अखेरीस देवराजजी हा इ० सन १४१५ च्या सुमारास राज्यत्याग करून नर्मदा ओलांडून प्रथम दक्षिणेंत आला; व आपलें नांव बदलून आपणास " भोसावंत भोंसले " असें म्हणवून घेऊं लागला. त्यानें पहिल्यानें कांहीं दिवस कृष्णा व भिमा या नद्यांच्या तीरीं पाळेगिरी करून आपला चरितार्थ चालविला; व नंतर सिंगणापूरची पाटिलकी मिळविली, व तो तेथें कायमचें वास्तव्य करून राहूं लागला. याच वेळेपासून सिंगणापूर हें भोंसल्यांचें मूळ गांव असें मानितात.

---

* राजनगर हा किल्ला व गांव उदेपूरच्या राज्यांत उदेपूरपासून अजमासें चाळीस मैलांवर, उत्तर दिशेस आहे.

+भोंसाजी हा चितोडनजीक भोसावंत म्हणून एक गांव आहे, तेथें येऊन राहिला होता, त्यावरून,—अथवा "भोंसाजी" या नांवाच्या पुरुषावरून त्या वंशास "भोंसले" हें नामाभिधान प्राप्त झालें, असाहा उल्लेख आढळतो.

# भोंसले घराण्याची वंशावळ.

(१) लक्ष्मणसिंह; चितोडचा महाराणा.

(३) आसिंहजी चितोड वंशाचा संस्थापक

(२) सजनसिंह महाराणा ( सोंधवाडा येथें आला )

(५) उदेपूरच्या वंशाचा संस्थापक

(६) कच्छभूजच्या राज्याचा संस्थापक.

(४) दिलीपसिंहजी महाराणा.

(७) ...सिंहजी महाराणा.

(९) भोंसाजी महाराणा;

(८) सोंधवाड वंशाचा संस्थापक.

(१०) नेपाळ वंशाचा संस्थापक.

(११) देवराजजी महाराणा (हा दक्षिणेंत प्रथम आला. व याच्यापासून पुढें "भोंसलें" हें उपनांव मिळालें.

(१२) नागपूर, शंभूमहादेव देऊळगांव, वावी, कोरळ, आणि मंजोर येथील वंशाचा संस्थापक.

(१३) इंद्रसेनजी महाराज

(१४) शुभकृष्णजी महाराज

(१५) रूपासिंहजी महाराज

(१६) भूमींद्रजी महाराज

(१७) धापजी महाराज

(१८) बरहट्जी महाराज

(१९) खेलोजी महाराज

(२०) कर्णसिंहजी महाराज

(२१) संभाजी महाराज

(२२) बाबाजी ऊर्फ खेळोजी राजे भोंसले; जन्म इ. स. १५२३.

या देवराजजींच्या वंशांत अनुक्रमें इंद्रसेन, शुभकृष्णजी, रूपसिंहजी, भूमींद्रजी, धापजी, बरहटजी ऊर्फ बरबटजी, खलकर्ण ऊर्फ खलाजी, कर्णसिंहजी ऊर्फ जयकर्ण, संभाजी, व शिवाजी ऊर्फ खेळोजी ऊर्फ बाबाजी हे पुरुष अनुक्रमें निर्माण झाले. यासंबंधीं अष्ट प्रधानांच्या इतिहासांत, ( भोरकर भिडे कृत ) असें लिहिलें आहे कीं, " भोंसाजीच्या भाऊबंदांपैकीं खलकर्ण व मलकर्ण या दोन बंधूंनीं दक्षिणेंत येऊन निजामशाहींत चाकरी धरिली. त्यांस प्रत्येकीं दीड हजार स्वारांची मनसब मिळाली, व त्याजबद्दल चाकणचौऱ्यांशी, पुरंदर परगणा, व सुपें महाल हें त्यांना तैनातीदाखल मिळाले. मालोजी मृत्यु पावला, त्यावेळीं त्यास बाबाजी या नांवाचा एक मुलगा होता, परंतु तो अज्ञान असल्यामुळें सरंजामाची अव्यवस्था होऊं नये, म्हणून तो सरकारांत जमेस ठेवण्यांत आला होता. त्यामुळें बाबाजीस घेऊन त्याची मातोश्री दौलताबादेहून* वेरूळ§ धुमेश्वर+ येथें येऊन राहिली. बाबाजी मोठा झाल्यावर त्यानें भीमानदीच्या कांठीं कांहीं गांवच्या पाटिलक्या खरेदी घेतल्या.......दक्षिणेंत दिवसेंदिवस यवनांचें प्राबल्य, याजमुळें श्री सिंघणापूर‡ महादेव हाच एक लिंग कुलस्वामी, व श्री तुळजापूर† भवानी हीच चितोड देवी, असें जाणून परमभक्ति करून, तो वंश परम धर्मशील, शूर, प्रतापी, असा

---

* दौलताबाद हें ठिकाण निजामच्या राज्यांत औरंगाबाद जिल्ह्यांत, औरंगाबाद व हैद्राबादच्या वायव्येस अनुक्रमें दहा व अठ्ठावीस मैलांवर आहे.

§ वेरूळ हें निजाम रेल्वेच्या मनमाडवरून जाणाऱ्या फांट्यावरील एक स्टेशन असून तें औरंगाबादेपासून तेरा व दौलताबादेपासून सात मैलांवर आहे.

+घृष्णेश्वर (?)

‡ सिंघणापूर हें ठिकाण सातारा जिल्ह्यांतील माण तालुक्यांत, फलटण संस्थानच्या सरहद्दीलगत आहे.

† तुळजापूर हें गांव, व तालुक्याचें ठिकाण निजामच्या राज्यांत, नळदुर्ग जिल्ह्यांत, सोलापूर जिल्ह्यांतील माढा या तालुक्याच्या—जी. आय. पी. रेल्वेच्या पुणें–रायचूर मार्गावरील—स्टेशनपासून तीस मैलांवर आहे.

होत गेला. एकलिंग कुलस्वामी व चितोडदेवी हीं या वंशाची राजपुतान्यांतील आराध्य दैवतें होतीं. वंशवृद्धि होत गेली, तसतसी त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं वतनें संपादिलीं." वेरूळ, मनरथ, निरगुडी, शिंडगांव, कळस, वावी, मुंगीपैठण, नानजव, जिंती, खानवट, बनशेंद्रें, दुधवाडी वगैरे ठिकाणीं× भोंसल्यांच्या वंशजांनीं वस्ती करून वतनें संपादन केलीं; व त्या त्या ठिकाणीं आज तागायत त्यांचे वंशज अस्तित्वांत आहेत.

भोंसल्यांचें घराणें दक्षिणेंतील मराठे मंडळींत अतीशय प्राचीन व प्रसिद्ध आहे; आणि त्या घराण्याच्या उत्पत्तीविषयीं निरनिराळ्या ठिकाणीं भिन्नभिन्न व पुष्कळ विवेचन केल्याचें आढळून येत आहे; तथापि छत्रपति शिवाजी महाराजांच्या आज्याचा आजा संभाजी याच्या वेळेपर्यंतची निश्चयात्मक अशी माहिती अद्यापि उपलब्ध झालेली नाहीं;—म्हणजे संभाजीच्या काळापासूनची व त्याच्या पासूनच्या पुढील वंशाची विश्वसनीय माहिती उपलब्ध झालेली आहे; व त्या आधारानें भोंसले घराण्याची पुढील हकीकत या ठिकाणीं देण्यांत आली आहे. शिवाय "भोंसल्यांचा वंश उदेपूरच्या राजघराण्यापैकीं नव्हे," असें प्रतिपादन करण्यांत येतें; परंतु त्यास साधार कारणें मात्र कोणीही देत नाहीं. मौर्य, भोज, चालुक्य, यादव इत्यादि अनेक वंश उत्तरेंतून दक्षिणेंत आले. तशींच दक्षिणेंतील हीं अनेक घराणीं कारणपरत्वें उत्तरेंत कायमचीं जाऊन राहिलीं, असेंही आपण पाहतों. फलटणचे निंबाळ-

---

× हिंगणी, बेरडी व देऊळगांव हीं गांवें पुणें जिल्ह्यांत बारामती तालुक्यांत, व खानवट व कळस हीं इंदापूर तालुक्यांत आहेत. जिंती, भीमातीरीं सोलापूर जिल्ह्यांत, निरगुडी व शंभू महादेव दक्षिण महाराष्ट्रांत, वेरूळ व वेरूळच्या उत्तरेस बनशेंद्रें, हीं मोंगलाईत व पैठणजवळील मुंगीपैठण, नानजव व भांबोरी हीं गांवें नगर जिल्ह्यांत आहेत, पैकीं मुंगीपैठण हें गोदातीरीं आहे. शिवाय याच जिल्ह्यांत दुधवाडी, भीमातीरीं भिलवडी, व नाशिक जिल्ह्यांत सिन्नर तालुक्यांत वावी, हीं ठिकाणें आहेत; व या सर्व ठिकाणीं भोंसल्यांचीं निरनिराळीं घराणीं आजतागायत अस्तित्वांत असून, आपल्या वतनाचा उपभोग घेत आहेत.

कर हे धारचे परमार होत* हा प्रघात जर अव्याहत शेंकडो नव्हे, हजारों वर्षें चालू आहे, तर उदेपूरच्या राजघराण्यांतील कुटुंबाची एक शाखा इकडे आली नाहीं, हें कशावरून ? एकट्या चालुक्यांचे किंवा यादवांचे किती तरी वंश ठिकठिकाणीं पसरले ? भोंसले आपली उत्पत्ति उदेपूरच्या राजघराण्याशीं जोडतात; निंबाळकरांनीं व यादवांनीं त्यांच्याशीं शरीरसंबंध केले; "वंशसंकरा-

* याच परमार ऊर्फ पवार घराण्याची एक शाखा पुढें पुन्हां उत्तरेंत गेलेली आहे; भोज राजानंतर परमार घराण्याला उतरतीकळा लागली; या परमार घराण्यांत शककर्ता विक्रम व भोज हे पराक्रमी व कीर्तीमान राज्यकर्ते निपजले; त्यानंतर हें घराणें मोडकळीस आल्यावर विक्रमादित्याच्या वंशापैकीं वडील शाखेंतील एक पुरुष राजपुतान्यांत गेला; आणि मेवाड प्रांतांतील कांहीं प्रदेश हस्तगत करून घेऊन, हल्लीं उदेपूरच्या राज्यांत, उदेपूरपासून अजमासें शंभर मैलांवर नैऋत्य दिशेस असलेल्या बिजोली या नांवाच्या गांवीं आपली राजधानी केली; अद्यापि या घराण्याच्या वंशजाकडे उदेपूरच्या महाराण्याच्या दरबारांत प्रमुख मानकऱ्याचा दर्जा चालू असून त्याच्या ताब्यांत शहात्तर गांवें आहेत.

या बिजोली घराण्यापैकीं शंभूसिंग या नांवाचा एक पराक्रमी पुरुष नर्मदा ओलांडून प्रथम दाक्षिणेंत आला; आणि अहमदनगर जवळील सुखवाडी ऊर्फ सुपें येथें वास्तव्य करून राहिला. या संभूसिंगास दळवी या उपनांवाच्या एका मराठा सरदारानें ठार मारिलें; शंभूसिंगास कृष्णाजी या नांवाचा एक अज्ञान मुलगा होता; तो वयांत आल्यावर, त्यास त्याच्या आईनें शिवाजी महाराजास भेटविलें, व त्यावेळेपासून त्याच्या उत्कर्षास सुरवात झाली. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बुबाजी यानें राजाराम महाराजास, मोंगलाबरोबरील युद्धांत साहाय्य केल्यामुळें, त्यास राजारामानें "सेनासप्तसहस्र" असा बहुमानाचा किताब दिला. कृष्णाजीनंतर काळूजींचा जेष्ठ मुलगा दुसरा कृष्णाजी, हा जहागिरीचा मालक झाला. पुढें धाकटा तुकोजीराव व त्याचा पुतण्या उदाजीराव हे माळव्यावरील स्वारींत पहिल्या बाजीरावाबरोबर होते; त्यांनीं मोंगलाविरुद्ध धार जवळील तिरळा या गांवीं झालेल्या युद्धांत मोठा

संबंधानें आम्ही कडक नियम पाळीत असतां, भोंसल्यांच्या कुळासंबंधानें तीनशें वर्षे जर सारखी सर्वांची व विशेषतः त्या घराण्यांची एकवाक्यता आहे, आणि सर्व बखरकार व कागदपत्र तीच ग्वाही देतात तर हा प्रकार भरपूर पुराव्याशिवाय खोटा मानतां येणार नाहीं." शिवाय इतर कित्येक प्राचीन मराठ्यांच्या घराण्याप्रमाणेंच, भोंसले हेही उत्तरेकडून दक्षिणेंत आलेले मूळचे रजपूत आहेत, याविषयीं आणखी एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे हा आहे कीं, खुद्द शहाजी यानेंच एके ठिकाणीं ( श्री सांप्रदायिक विविध विषय; पृष्ठ २११ पहा.) "आपण रजपूत लोक" असें स्वतःविषयीं म्हटलें आहे; व त्यावरून भोंसले हे मूळचे रजपूत आहेत, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होत आहे. त्याप्रमाणेंच पूर्वी मल्हार भट या नांवाचा एक विद्वान ब्राह्मण या भोंसले घराण्याचा, मालोजीच्या काळापूर्वी, उपाध्या होता; त्यानें आपल्या यजमानाचा उत्कर्ष व्हावा, म्हणून स्वतः उदेपूर × येथें जाऊन पुष्कळ खटपट केली होती; असा उल्लेख आढळतो; त्यावरून मालोजीच्या पूर्वीच्या काळापासूनच उदेपूर येथें आपणांस राज्य, नाहीं तर निदान वतन अथवा जहागीर मिळेल, व आपणांस राजकीय महत्व प्राप्त होईल, असें भोंसले घराण्यास वाटत असून, त्यासंबधीं त्यांची खटपट सुरू होती, हें सिद्ध होतें. आणि भोंसले घराण्याचा उदेपूरच्या राजघराण्याशीं अगदीं निकटचा संबंध असल्याबद्दल खात्री पटते; शिवाय "राधामाधवविलासचंपू" ह्या प्रसिद्ध, महत्वाच्या व मननीय काव्यग्रंथांत जयराम कवी हा शहाजीचें अडनांव ऊर्फ कुलनाम "भोंसले" असें देऊन वंशनाम शिसोदिया देतो; तेव्हां शिवाजीच्या राज्यारोहणकालीं

---

पराक्रम गाजविला; त्यामुळें शाहू महाराजानें खूष होऊन त्यांना देवास व धार हे दोन प्रांत दिले व त्यावेळेपासून हें परमार ऊर्फ पवार घराणें नर्मदा नदीपलीकडे उत्तर हिंदुस्थानांत स्थाईक झाले.

×उदेपूर, मेवाडची राजधानी; खांडवा—अजमीर रेल्वेवर आर. एम्. सेक्शन ) चितोडगड या नांवाचें एक रेल्वेस्टेशन आहे, तेथून या शहरापर्यंत आगगाडीचा फांटा नेलेला आहे.

सार्वभौम राजाला शोभेल अशी वंशावळ व कुळगोत मुद्दाम बनावट तयार केली गेली, हा अक्षेप जयरामाच्या प्रत्यक्ष पुराव्यावरून लंगडा पडतो. शिवाजीच्या वेळींच नव्हे तर शहाजीच्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांतील अनेक कवी व जयराम हा महाराष्ट्र कवी, खुद्द शहाजी महाराजाच्या व पुरोहित, राजगुरु, वगैरे अनेक संभावित पिढीजाद मुत्सद्यांच्या पुढें, भोंसल्यांचा संबंध शिसोद्यांच्या वंशाशीं लावतात, यावरून निर्विवाद मान्य करणें भाग पडतें कीं भोंसले हे शिसोदिया रजपुतांच्या वंशांतील होत, अशी परंपरागत कहाणी शहाजी राजाच्या दरबारीं सर्वसंमत होती. ही कहाणी शहाजीच्या किंवा शिवाजीच्या दरबारींच तेवढी प्रचलीत होती असें नव्हे तर उत्तरेकडील रजपुतांनाही मान्य होती. सभासदी बखरीच्या तेहतिसाव्या पृष्ठावर जयसिंगाच्या तोंडचे शब्द सभासदानें दिले आहेत ते असे, "तुम्ही शिसोदे रजपूत, आम्ही तुम्ही एकाचे एकच आहों" म्हणजे भोंसल्यांचे रजपुतत्व म्हणजे क्षत्रियत्व व शिसोदिया वंशत्व त्या काळीं म्हणजे शहाजीच्या काळीं दक्षिणेंतील व उत्तरेंतील विद्वानांना व रजपुतांना मान्य होतें, असें झालें. हा शहाजीकालीन पुरावा अकृत्रिम असल्यामुळें विश्वसनीय धरणें प्राप्त आहे...तात्पर्य "शहाजीचें उपनांव भोंसले, वंश शिसोदे, वर्ण क्षत्रीय ऊर्फ रजपूत, गोत्र कुशिक, मूळ पुरुष वलीपास," अशी ग्वाही शहाजीसमकालीन प्रत्यक्ष साक्षीदार जो जयराम तो देतो, त्याप्रमाणेंच शहाजीच्या दरबारीं ढुंढरी कवि असून त्यानें ढुंढार भाषेंत कवित्व केलें त्यांतील मतलब असा. "शहाजीच्या फौजेचें कुच झालेलें पाहून कोणीं विचारिलें कीं, फौज कोठें चालली ? तेव्हां भाटानें उत्तर दिलें कीं, राजगड चितोडच्या दिशेनें फौज जाणार; राजा शहाजी हा चितोडच्या राण्याचा भाऊबंद आहे, तरी भिऊं नका. पण भय न समावून अंबेरच्या × राजानें शहाजीला अगोदरच निरोप पाठविला कीं मी घासदाणा देण्यास तयार आहे; "

---

× अंबेर ऊर्फ अंभेर ही जयपूरच्या राज्याची जुनी राजधानी होती; हें शहर हल्लीं मोडकळीस आलेलें असून तें जयपूरच्या ईशान्येस सात मैलांवर आहे.

म्हणजे, याचा अर्थ हा उघड होतो कीं, " उत्तरेकडील रजपूतही दक्षिणेकडील भोंसल्यांना सहानुभूति दाखविण्यास तयार होते, व भोंसल्यांना ते आपले भाईबंद समजत असत;" अर्थात् भोंसल्यांचा वंश उदेपूरच्या राजघराण्यापैकींच आहे, हीच गोष्ट निर्विवाद खरी आहे, व वरील विवेचनावरून ती खरी आहे, असेंच उघड उघड निदर्शनास येत आहे.

संभाजीचा मुलगा शिवाजी ऊर्फ बाबाजी हा इ० सन १५३३ मध्यें जन्मास आला. त्यास मालोजी व विठोजी असे दोन मुलगे होते. यापैकीं मालोजी हा इ० सन १५५० मध्यें, व विठोजी हा इ० सन १५५३ मध्यें जन्मास आला. हे उभयतां बंधू वयांत आल्यावर पहिल्यानें कांहीं काळ देऊळगांव + येथें आपली शेती सांभाळून तिजवर आपला उदरनिर्वाह

---

+ देऊळगांव, हें ठिकाण वऱ्हाडांत बुलढाणा जिल्ह्यांत बुलढाण्यापासून आजमासें साठ मैलांवर, चिखली तालुक्यांत आहे. या गांवाचें पूर्वीचें नांव देवळी हें असून तें पूर्वी अगदीं खेडेगांव होतें; तें, पुढें जाधवरावांच्या घराण्यांतील रासोजी या नांवाच्या दासीपुत्रानें तेथें वस्ती वाढवून भराभराटीस आणिलें; नंतर तें जाधवांचें राहण्याचें ठिकाण झालें, व त्यावेळेपासून त्यास " देऊळगांव राजा " असें म्हणूं लागले. रावजगदेवराव जाधव यानें येथील बालाजीची स्थापना केली असून भावी काळांत हें देवस्थान फारच महत्वास चढलें. या बालाजीची स्थापना जरी जाधवरावांच्या घराण्यांतून झाली, तरी त्या संस्थानाची खरी वाढ निरनिराळ्या दुसऱ्याच पुरुषांनीं केली; त्यांत हरीसा, रामासा, व नवलसा ह्या लाड सावकारांच्या तीन पिढ्यांत ती विशेष झाली. हें घराणें फार श्रीमंत असून त्यांच्याकडे संस्थानचा कारभार असतांना त्यांनीं सर्व राजेरजवाड्यांकडून ह्या संस्थानास इनाम जमीनी व वर्षासनें मिळविलीं.

हें देवस्थान आसपासच्या भागांत विशेष प्रसिद्ध असून दरवर्षी आश्विन महिन्यांत या ठिकाणीं मोठी यात्रा भरते, व मोठ्या थाटाचा उत्सव होतो; व देवाचे दुकानांत व्यापारी व इतर लोकांकडून हजारों रुपयांची कानगी ( देणगी ) येते.

करीत असत; परंतु तेथील शेतकऱ्यांचा व या उभयतां बंधूंचा जमीनीवरून वाद उपस्थित झाल्यामुळें ते देऊळगांव येथून निघून दौलताबादेजवळील वेरूळ या गांवीं येऊन तेथें वास्तव्य करून राहिले; व पुढें इ० सन १५७७ मध्यें त्यांनीं शिंदखेडकर लखूजी ऊर्फ लुकजी जाधवराव याच्या पदरीं बारागीर म्हणून नौकरी पतकरिली, व त्यांना त्या वेळेपासून पंक्तीस भोजन व पांच होन पगार प्रत्येकीं दरमहा मिळूं लागला; व त्यांनीं लवकरच जाधवरावाची मर्जी उत्तम प्रकारें संपादन केली.

मराठासाम्राज्यसंस्थापक छत्रपति शिवाजी याची माता जिजाबाई ही याच लुकजी जाधवरावाची कन्या असल्यानें, या जाधव घराण्याची त्रोटक हकीकत या ठिकाणीं देणें आवश्यक आहे म्हणून, ती दिलेली आहे. लक्ष्मणदेव, लखूजी ऊर्फ लुकजी जाधवराव शिंद्खेडकर, ( इ० सन १५७१ ते इ० सन १६२९) हा देवगिरीकर रामदेवराव यादव ऊर्फ जाधव यांच्या घराण्यांतील असून त्याच्या चार पिढ्या अगोदरपासून म्हणजे ठाकूरजीपासून ( इ. सन १३८० ते इ. सन १४२९ पर्यंत ) शिंदखेड येथील देशमुखीचें वतन या घराण्याकडे चालू होतें. देवगिरीकर रामदेवराव यांस शंकरदेव व भीमदेव असे दोन मुलगे होते; त्यापैकीं शंकरदेवाचा मुलगा गोविंददेव ( इ. सन १३१२ ते इ. सन १३८० ) यानें हसन गंगू यांस बहामनी राज्य स्थापन करण्यांत मदत केली होती; व बागलाण प्रांतांत कांहीं प्रदेश हस्तगत करून घेऊन तो तिकडेसच रहात होता. पुढें त्याचा मुलगा ठाकूरजी यानें शिंदखेड येथें जाऊन तेथील देशमुखी वतन मिळविलें. पुढें त्याचा मुलगा भूखणदेव ऊर्फ भेतोजी यानें खानदेशांतील बराच प्रदेश मिळवून बहामनी दरबारांत आपलें महत्व वाढविलें. त्याचा मुलगा अचलकर्ण ऊर्फ अचलोजी

---

या देवस्थानाच्या व्यवस्थेसंबंधीं राजे, सार्वजनिक लोक, व हरीसाचें घराणें, यांच्यामध्यें वेळोवेळीं कोर्टांत दावे झाले असून हल्लीं या देवस्थानाची व्यवस्था दिवाणी कोर्टामार्फत कमीटी नेमून चालली आहे.

येथें जाधवरावांचा एक किल्ला, व राव जगदेव जाधव याची बायको दुर्गाबाई हिची " मोती समाध " या नांवाची समाधी असून ती जाधवरावांची दोन्हींही स्मारकें आजतागायत कायम आहेत.

याच्या वेळेस बहामनी राज्य नष्ट झालें, व शिंदखेडकडील प्रदेश निजामशाही अमलाखालीं आला. या काळांत प्रसिद्ध कंबरसेन हा निजामशाही राज्याचा दिवाण होता, त्याच्या कारकीर्दींत निजामशाहींत मराठ्यांचा पुष्कळच उत्कर्ष झाला, व त्यानें अनेक मराठा सरदारांना निजामशाही सैन्यांत मनसबी दिल्या. त्यावेळीं अचलकर्ण ( इ. सन १५०० ते इ. सन १५४० ) यांसहि पांच हजार स्वारांची मनसबी दिली. त्याचा मुलगा विठ्ठलदेव हाही असाच निजामशाही राज्यांत मनसबदार असून तालीकोट जवळील विजयानगरकर विरुद्धच्या युद्धांत त्यानें निजामशहातर्फे भाग घेतलेला होता. त्याचाच मुलगा हा लक्ष्मणदेव ऊर्फ लुकजी जाधव हा असून तोहि निजामशाहींत पांच हजारी मनसबदार होता; या लुकजीनें चांदबिबीस अकबराशीं युद्ध करण्यांत उत्तम मदत केली; त्यामुळें चांदबिबीनें त्याची मनसबदारी वाढविली, व तो बारा हजारी मनसबदार बनला; आणि या मनसबीच्या खर्चासाठीं त्यास एक स्वतंत्र जहागीरही तोडून देण्यांत आली. या लुकजी जाधवरावाचें निजामशाही दरबारांत अतिशय वजन असून त्या काळांतील सर्व मराठे सरदारांत तो प्रमुख, शूर, व कर्तबगार म्हणून त्याची ख्याती होती. लुकजी जाधव याचें देशमुखीचें गांव–छत्रपति शिवाजीची माता जिजाबाई हिचें माहेरचें गांव–शिंदखेड हें वऱ्हाडांत बुलढाणा जिल्ह्यांत मेहकर तालुक्यांत, मेहकरपासून अदमासें वीस मैलांवर, निजामच्या राज्याच्या सरहद्दीवर आहे. यांस " शिंदखेड राजा " असेंही म्हणतात.

दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत जे मराठा सरदार स्वपराक्रमानें उदयास आले, त्यांत शिंदखेडचे जाधवराव हे प्रमुख व प्रख्यात आहेत. वऱ्हाडांतील किंबहुना महाराष्ट्रांतील सर्व जुन्या इतिहासप्रसिद्ध घराण्यांत, यांच्या तोडीचें दुसरें घराणें नाहीं. देवगिरीकर यादव ऊर्फ जाधव यांचें राज्य मुसलमानांनीं बुडविल्यानंतर त्यांच्या शाखा निरनिराळ्या दिशेस पसरल्या, त्यांतील एक शाखा दौलताबाद येथें येऊन, किल्ल्याचे नजीक पातशाहास भेटून लासनेर, परगणे पैठण, गंगातीर येथें छावणीस आपले जमीयतसुद्धां येऊन राहिली; व नंतर थोडक्याच काळांत ती शिंदखेड येथें येऊन स्थाईक झाली; हीच शाखा म्हणजे लुकजी जाधवराव यांचें घराणें होय.

त्याकाळीं, शिंदखेड हें दौलताबादच्या जवळील एक परगण्याचें गांव असून, तें मेहकर या "सरकारा" खालीं होतें; तेथील देशमूख व जोशी, या दोन्ही वृत्ति "मुळे" उपनावांच्या ब्राह्मण घराण्याकडे होत्या; व मुळे यांनीं देखमुखीचे कामावर रवीराव ढोणे या नांवाच्या मनुष्यास नेमिलें होतें; हा ढोणे पुढें कांहीं दिवसांनीं अतीशय प्रबळ व शिरजोर होऊन मालकास जुमानीनासा झाला; इतकेंच नाहीं तर शेवटीं त्यानें मालकास ठार मारून त्याचें वतनहि बळकाविलें; त्यावरून मुळ्याची बायको यमुनाबाई ही लासनेर येथें लुकजी व भुतजी या उभयतां जाधवराव बंधूकडे आली; आणि त्यांना याचना केली कीं, "शिंदखेड येथें माझें देशमुखीचें वतन आहे; रवीराव ढोण्या गुमास्ता, हा मुफसद ( बंडखोर ) होऊन राहज्यानी करतो, व माझे भ्रतारासमावेत मुळे ब्राह्मण जीवें मारून वतन सर्व खात आहे; तरी तुम्ही "राजे" आहांत; माझा सूड घेऊन, रवीराव ढोण्या मारून, वतन तुम्ही घ्यावें; माझे पोटीं गर्भ आहे, त्याजला भटपणाची वृत्ति द्यावी, व उपाध्येपण तुम्ही आपलें द्यावें." त्यानंतर, जाधवरावांनीं यमुनाबाईच्या म्हणण्याप्रमाणें तिच्यापासून एक लेख लिहून घेऊन, जालनापुराहून अडगांवास जाऊन तेथून शिंदखेडास जाऊन रात्रीं ढोणे यांचें महालांत आपले लोकांसह शिरून रवीराव ढोणे यांस ठार मारिलें; दुसऱ्या दिवशीं गांवांतील सर्व लोकांस लखूजीनें जमविलें; व त्यांना जाधवांनीं यमुनाबाईचा लेख दाखवून त्यांचीं त्या बाबतींत कबूली विचारिली. शिंदखेड गांवांतील लोकही ढोण्यांच्या अमलास कंटाळलेलेच होते; त्यामुळें त्यांनीं लुकजीस देशमूख म्हणून तात्काळ कबूल केलें; व त्यावेळेपासून हें जाधव घराणें शिंदखेड येथील देखमूख बनलें. नंतर ठरल्याप्रमाणें शिंदखेड येथील जोशीपणाची वृत्ति, व आपलें उपाध्येपण जाधवरावांनीं यमुनाबाईस दिलें; तें "मुळे" घराण्यांत अद्यापि चालू आहे.

या वेळीं लुकजी जाधवरावाबरोबर निळकंठराव भानवसे या नांवाचा एक बारगीर होता; त्यानें, लुकजी व भुताजी जाधवराव या उभयतां बंधूंनीं रवीराव ढोणे याच्यावर एके रात्रीं जो अचानक हल्ला करून त्यास ठार मारिलें त्या प्रसंगीं, मोठाच पराक्रम केला; त्याबद्दल भानवसे यांस लुकजीनें छत्तीस गांवचा देशमुखी रुसूम दिला, व शिंदखेड परगण्यांतील शिवणी,

डावरगांव, निलजगांव, गिरवली, या गांवच्या पाटिलक्या दिल्या, त्या त्याच्या घराण्यांत आजतागायत चालत आहेत.

लुकजी व भुताजी हे दोघे बंधू शिंदखेड येथें प्रथम येत असतां सटवाजी व॰ राघोजी या नांवाच्या एका वारकाचे शेतांत उतरले; व भोजनोत्तर एका झाडाखालीं लुकजी निजला. दुसरे लोक दुसऱ्या झाडाखालीं निजले; तों लुकजीवर एका नागानें फणा धरली, हें त्या शेताचा मालक सटवाजी वारीक यानें पाहिलें; व हा कोणी तरी मोठा मनुष्य होणार, हें ओळखून तो येऊन लुकजीचे पाय दावीत बसला; आणि लुकजी जागा झाल्यावर त्यास लवून मुजरा करून तो म्हणाला, "तुम्हांस तुमच्या कामांत यश येईल; तुमचा मोठा भाग्योदय होईल;" आणि घडलेली हकीगत त्यास सांगून, व मोठ्या धूर्तपणाच्या गोष्टी बोलून त्यानें लुकजी जवळून असें वचन मिळविलें कीं, "माझा भाग्योदय झाल्यास मी तुला विसरणार नाहीं." त्याप्रमाणें भावी काळांत लुकजीचा भाग्योदय झाल्यावर त्यानें त्या वारकास एक मुंडाचें शेत इनाम दिलें; व शिंदखेड येथील देशमुखीचा मान दिला; शिंदखेड व देऊळगांव राजा येथील सटवाजीचे वंशज वारीक अद्यापिहि मशाल धरीत नाहींत; व "देशमुखीचा मान" हें त्याचें कारण, असें सांगतात.

शिंदखेडकडील बंदोबस्त करून जाधवराव दौलताबादेस निजामशहाकडे गेला; व त्याच्या सन्निध राहून त्यानें अनेक पराक्रम गाजविले. त्यामुळें निजामशाहानें खुष होऊन त्यास त्याच्या खासगत खर्चासाठीं शिंदखेड, पडतूर, खेरडे, (हा गांव तीनशें वर्षें जाधवरावाच्या जहागिरींत होता; तेथें मानसिंग जाधवरावाच्या नांवाची "मानसिंग दरवाजा" या नांवाची वेस अद्याप अस्तित्वांत आहे.) व मेहकर वगैरे प्रांत जहागीर दिले, व फौज ठेवण्यास सांगून, वैजापूर गांडापूर, फुलंबरी, कन्नड, दाऊरवाडी, पैठण, मेहकर, परगणा लोणार, रिसवड, बामनी, पिंपळगांव, कुऱ्हे, मंगरूळ वगैरे महाल फौजेच्या खर्चासाठीं तोडून दिले.

अशा रीतीनें जाधवरावाचा निजामशहाशीं सलोखा होत होत त्या उभयतांमध्यें पुढें इतक्या परमावधीचा घरोबा झाला कीं, जाधवरावाच्या कुटुं-

बानें निजामशाहास एका दिवाळींत भाऊबीज केली होती; आणि पादशाहानें विजापूर व दौलताबाद सरकारच्या देशमूख देशपांडेपणाचें फर्मानही लुकजीस करून दिलें होतें.

जाधवरावाकडे एकंदर सत्तावीस महाल व बावन्न चावड्यांचा अधिकार असे; व त्यास दत्ताजी, अचळोजी, बहादूरजी व राघोजी असे चार पुत्र होते* त्यापैकीं बहादूरजी हा, भूताजीस पुत्रसंतान नसल्यामुळें, त्यास दत्तक दिला होता.

---

* या शिंदखेडकर जाधव घराण्याच्या पुढें चार शाखा झाल्या; व त्यांनीं चार गांवीं जवळजवळच वस्ती केली; म्हणजे उपरीनिर्दिष्ट चारी भावांनीं अनुक्रमें अडगांव, मेहुणें, किनगांव व शिंदखेड या गांवीं आपलीं ठाणीं दिलीं; व शिंदखेडची शाखा पुढें देऊळगांव येथें येऊन राहिली. ह्या चारी शाखा आजतागायत त्या त्या गांवीं अस्तित्वांत आहेत; या सर्व गांवांना जाधवरावाच्या नांवावरून "राजा" हें उपपद चालू आहे; व सदरहू गांवच्या पाटिलक्या व देशमुखी ( देऊळगांव राजा येथील शाखेचें खालसा झालेलें वतन खेरीजकरून ) वतनें आजतागायत त्यांच्या वंशजांकडे चालू आहेत. ( काळेकृत वऱ्हाडचा इतिहास पहा; ) शिंदखेड येथें जाधवरावांच्या संबंधाच्या खालील इमारती आहेत, त्याः—

१ निळकंठ महादेवाचें देऊळ, व निळकंठ बारव [ जुनें ].
२ जाधवरावांचे पडके महाल, त्यावर लेख आहेत; विशेषतः रंगपंचमी महाल.
३ कचेरीचा महाल. [ यांत हल्लीं मराठी शाळा आहे. ]
४ रामेश्वराचें देऊळ ।
५ लखूजी जाधवरावांचे कबरीचे घुमट व सतीचें देऊळ.
६ जाधवरावांचा तलाव, बंगला, व त्यांतील घाटाची रचना.
७ जलविहाराचा लहान तलाव.
८ सजनाबाईची विहीर.
९ काळा कोट.

# बाबाजी राजे भोंसले.

## जन्म इ० सन १५३३

- मालोजी राजे भोंसले. पुत्र दोन; शहाजी राजे, व शरीफजी राजे. (वंशावळ पहा.)
- विठोजी राजे भोंसले जन्म इ०सन१५३३;मृत्यु इ० सन १६२२; ("शके १५४५ रुधिरोद्गारी नाम संवत्सरे फसली सन१०३३या सालीं विठोजी राजे भोंसले यास कसबे वावी गंगातीर येथें देव-आज्ञा जाहली.

### पुत्र आठ त्यांची वंशावळ.

- १ संभाजी
- २ खेलोजी याचे वंशज शंभूमहादेव, कळस व निरगुडी येथें आहेत.
- ३ मालोजी
  - विठोजी
  - माणकोजी
    - भवानजी
    - राजेश्वर
    - शहाजी

    यांचे वंशज गोदातीरीं भुंगी पैठण येथें आहेत.
- ४ मंबाजी
  - राजुजी
  - गंगाधर
  - सुलतानजी.

  या तिघांचे वंशज तंजावर येथें आहेत.
- ५ नागोजी
  - सतूजी उर्फ सटवाजी
  - खेलोजी
  - सुभानजी
  - मुखाजी
  - महादजी
  - रावजी उर्फ काकाजी; (वावी
    - लखमोजी
      - एसाजी
      - सुंदरजी
      - त्रिंबकजी
        - विठोजी सातारा राजघराण्यांत दत्तक. यांस राजारामानें दत्तक घेऊन त्याचें नांव शाहू उर्फ आबासाहेब हें ठेविलें. इ० सन १७७७ मध्यें रामराजा मृत्यु पावल्यावर गादीवर आला; मृत्यु; इ० १८०८ मध्यें.
        - परशुराम
        - बळवंत

          शाहू उ

          इ० स
- ६ परसोजी
  - उमाजी (जिंती वंशांत दत्तक; या नातलग नगर जिल्ह्यांत भांबोरी येथें आहेत.

वरील विवेचनावरून लुकजी जाधवराव याची योग्यता, कर्तृत्वशक्ति, मानमरातब व राजकीय महत्त्व केवढें होतें, याची सहज कल्पना होते; व त्यामुळेंच मालोजी व विठूजी भोंसले हे उभयतां बंधू, लुकजीच्या आश्रयास येऊन राहिले, हें उघड होतें.

या उभयतां बंधूंपैकीं मालोजी हा शरीरानें अतिशय धिप्पाड व मजबूत असल्यामुळें त्याच्या स्वारीस चांगला भरभक्कम घोडाही टिकत नसे; म्हणून

---

निळकंठेश्वराचें देऊळ जाधवरावाच्या काळापेक्षां बरेंच जुनें आहे; त्यावरील लेख वाचला जात नाहीं.

शिंदखेड, देऊळगांव व त्या बाजूचा कांहीं प्रदेश अजमासें पन्नास साठ वर्षे शिंद्याच्या ताब्यांत होता; तो आसईच्या युद्धानंतर निजामच्या ताब्यांत आला; देऊळगांव राजा येथील बालाजीस त्या गांवासंबंधीं सनदा दिलेल्या आहेत.

या शाखेंतील अखेरचा प्रसिद्ध पुरुष म्हणजे राजे बाजीराव जाधव हा असून तो औरंगाबाद येथें रहात असे; व निजामच्या दरबारांत त्याचें अतीशय वजन असे; आणि निजामाच्या राज्यांतील, व वऱ्हाडांतील या घराण्याचें सर्व उत्पन्न बाजीरावाच्या वेळेपर्यंत या घराण्यास मिळत असे. इ. सन १८५१ मध्यें त्याच्यावर एक मोठेंच संकट आलें, व त्यांत तो सफाई बुडाला. बाजीरावाच्या हातांखालीं, औरंगाबाद येथें आरब लोकांचें लष्कर असे; या लष्कराची, व इंग्रजी सबसीडियरी ( तैनाती ) सैन्याची लढाई होऊन त्यांत कांहीं इंग्रज अधिकारी मारले गेले; त्यावरून राजे बाजीराव यांचें सर्व वतन ज़प्त करून त्यास दौलताबादच्या किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेवण्यांत आलें; व पार्लमेंटपर्यंत प्रकरण जाऊन त्याचें सर्व वतन खालसा झालें. राजे बाजीराव यांचें म्हणणें कीं, "वरील आरब शिपाई आपल्या कह्यांत नव्हते; व दंग्यांत आपला कांहींही संबंध नव्हता; इतकेंच नव्हे तर त्यांचा पगार तुंबल्यामुळें ते आपणावरच उलटले;" परंतु बाजीरावाच्या ह्या म्हणण्याचा तिळमात्रही उपयोग झाला नाहीं; तो इ. सन १८५९ मध्यें दौलताबाद येथील किल्ल्यांत कैदेंत असतांनाच तेथें मृत्यू पावला. जानेफळ, फत्तेखर्डा, या गांवच्या व इतर पाटीलकीचीं वतनें, व खेर्डा येथील जहागीर ह्या वेळेपर्यंत या जाधव घराण्या-

जाधवरावानें त्यास आपल्या देवडीवर ठेविलें होतें; परंतु ही कामगिरी मालोजीस पसंत पडली नाहीं; त्यामुळें तो फलटणकर वणंगपाळ ऊर्फ जगपाळराव

---

कडे होती, ती खालसा झाली; इतर तीन शाखांचीं वतनें कायम आहेत; तथापि देऊळगांवच्या शाखेची बहुतेक इष्टेट ( मालमिळकत ) सावकाराच्या कर्जांत गेली आहे.

जानेफळ—हें शिंदखेडकर जाधवरावांच्या पाटिलकीचें गांव होतें; तेथें त्यांची एक मोठी गढी अद्याप अस्तित्वांत आहे; राजे बाजीराव याचें वतन जप्त झालें, त्यांत हेंही वतन गेलें; जानेफळ, हें अव्वल इंग्रजींत जिल्ह्याचें ठिकाण होतें; नंतर तें बुलढाणा येथें गेलें.

फत्तेखर्डा—भोगावती नदीच्या काठीं; या गांवाचें मूळ नांव साखरखेर्डा; हें प्रसिद्ध अमृतराय कवींचें जन्मस्थान व मूळचें गांव; या ठिकाणीं ता. २ आक्टोबर इ० सन १७२४ या वर्षी निजाम व दिल्लीचे मोंगल यांच्यामध्यें मोठें युद्ध होऊन त्यांत निजामाची फत्ते झाली, म्हणून यांस फत्तेखर्डा हें नांव मिळालें. या विजयानें निजाम स्वतंत्र झाला. दिल्ली येथील मोंगल सरदार मुबारिजखान हा युद्धांत ठार झाला, त्याची कबर लढाईच्या मैदानांत असून त्यास इनाम जमीन आहे. येथें इ० सन १५८१ मध्यें खुदावंतखान मेहदवी या नांवाच्या एका निजामाच्या सरदारानें बांधलेली एक सुंदर व प्रेक्षणीय मशीद आहे; व याच मशीदीच्या अगदीं सारखी आणि एकाच वर्षाच्या अंतरानें अशी त्यानेंच बांधिलेली दुसरी मशीद मलकापूर तालुक्यांतील रोहीणखेड या गांवीं आहे; आणि पलसिद्ध या नांवाच्या जंगम साधूचा मोठा प्रसिद्ध मठ गांवाबाहेर आहे.

इ० सन १८१८ मध्यें, दुसरा बाजीराव पुण्याहून पळाल्यानंतर शिंदखेड मार्गानें गेला, त्यावेळीं तो तेथें कांहीं दिवस मुक्काम करून राहिला होता; या पळापळींतच तो पैनगंगातीरीं असलेल्या उमरखेड येथें कांहीं दिवस मुक्काम करून तेथून तो केळापूर-पांढरकवडा येथें पळाला, व तेथें कांहीं दिवस मुक्काम करून राहिला; इतक्यांत ता. २ माहे एप्रील इ. सन १८१८ रोजीं मि. स्कॉट, व ॲडॅम्स या उभयतां इंग्रज सेनानायकांनीं तेथेंच बाजीरावास गांठून त्याच्याशीं युद्ध करून त्याचा पराभव केला; त्यामुळें

निंबाळकर यांजकडे गेला, व त्याच्या आश्रयास राहून, आपल्या कर्तृत्वानें व पराक्रमानें त्या ठिकाणीं त्यानें उत्तम लौकिक संपादन केला; तेव्हां जगपाळरावानें आपली बहीण दिपाबाई हिच्याशीं मालोजीचा विवाह करून दिला; त्यानंतर इ. सन १५७७ मध्यें जाधवरावानें मालोजीस मूर्तुजा निजामशाहा यांस भेटविलें, व बादशाहाजवळ त्याची मोठी शिफारस करून त्यास त्यानें निजामशाही सैन्यांत शिलेदारी देवविली;× यावरून मालोजी हा जगपाळराव निंबाळकराकडे गेला होता, तरी त्यानें जाधवरावाचा आश्रय कायम ठेविला होता, हें उघड होतें.

---

नागपूरकर अप्पासाहेब भोंसले, यांस जाऊन मिळण्याचा त्याचा बेत फसून त्यास तसेंच उत्तरेकडेस पळून जाणें भाग पडलें.

× या बाबतींत वर दिलेल्या हकीकतीहून थोडीशी निराळी हकीकत उपलब्ध झाली आहे, ती अशी कीं,

शिखर सिंघणापूर येथें श्रीशंभू महादेवाचें एक जाज्वल्य, साक्षात्कारी, पुरातन व प्रसिद्ध देवस्थान आहे; यादव ऊर्फ जाधव घराण्यांतील राजा सिंघण हा कोल्हापूरच्या राजाशीं लढत असतां त्याचा मुक्काम साताऱ्याच्या आसपास होता; त्यावेळीं त्यानें खटाव तालुक्यांतील मायणी या गांवीं दोन ओढ्यांच्या संगमावर "संगमेश्वर" या नांवाचें एक महादेवाचें देवालय बांधिलें, व भूषणगडचा किल्ला बांधून, श्रीशंभू महादेवाच्या देवालयाजवळ सिंघणापूर हें गांव वसविलें; "सिंघणापूरचा महादेव" हे अनेक मराठा कुळांचें आराध्य दैवत आहे; या ठिकाणीं मालोजी व विठोजी हे उभयतां बंधू आपल्या मातोश्री समवेत राहून श्रीशंभूमहादेवाची सेवा एकनिष्ठेनें करून कालक्रमणा करीत होते; त्यावेळीं त्यांना श्रीचा दृष्टांत झाला; त्यावरून हे उभयतां बंधु फलटण येथें येऊन जगपाळराव निंबाळकर यांस भेटले, व त्याच्या पदरीं बाराशें होनांची तैनात मान्य करून इ० सन १५७७ या वर्षी नौकरीस राहिले; हे उभयतांही बंधू मोठे शूर व साहसी असून, श्रीशंभू महादेवाच्या एका जुन्या बखरीमध्यें त्यांच्या अलौकिक पराक्रमाचें साग्र वर्णन केलेलें आहे; आणि त्यांत अतिशयोक्तीचा कांहीं भाग आहे, असें मानून तो वजा केला तरी मालोजी व विठोजी हे उभयतां बंधू मोठे साहसी, शूर व

मालोजीप्रमाणेंच विठोजी यांसही निजामशाही सैन्यांत शिलेदारी मिळाली होती. विठोजीस, संभाजी, खेलोजी, मालोजी, मंबाजी, नागोजी, परसोजी, त्रिंबकजी, व मकाजी, असे आठ मुलगे होते; त्यापैकीं खेळोजीचे वंशज कळस, निरगुडी, व शंभू महादेव येथें, मालोजीचे मुंगी पैठण येथें, मंबाजी व त्रिंबकजी यांचें तंजावर येथें, नागोजीचें बनशेंद्रें येथें, परसोजीचें नगर

---

पराक्रमी होते, व त्यांनीं वणंगपाळ निंबाळकर यानें केलेल्या कोल्हापूरवरील स्वारीमध्यें अलौकिक मर्दुमकी गाजविली, असेंच सिद्ध होत आहे. या बखरींत असें लिहिलेलें आहे कीं, "निंबाळकर वणंगपाळ कोल्हापूर प्रांतें स्वारीस बारा सहस्र स्वारा समावेत निघता झाला; तो (कोल्हापूर येथील) रंकाळे तळें याच्या समीप डेरे देऊन राहतां झाला; तों तळयाचें उदक उत्तम पाहून निंबाळकर वणंगपाळास इच्छा झाली, जे जळक्रीडा करावी. म्हणोन उदकांत कनाती देऊन वेश्यांसह वर्तमान जलक्रीडा करावयास लागला. संपूर्ण लोक आपआपले अश्व धोवावयास लागले; हेही उभयतां बंधू (मालोजी व विठोजी) आपले अश्व प्रक्षाळून, सेवकाचे हातीं देऊन, उष्णांत उदकाबाहेर उभे राहून, आपण स्नान करितातीं. तों तें समयीं भगवंतें कौतुक अपूर्व दाखविलें. विजापूरच्या यवनानें (आदिलशाहा) बारा सहस्र घोडा रवाना केला. वणंगपाळ हा पुंडाई करून तमाम पातशाही मुलूख खराब करितो; (त्यास) असावध पाहून जीतच धरून आणावा; म्हणून अकस्मात युद्धाकारणें सिद्ध होऊन चाल केली; तों दोहीं हत्तींवरी दोन निशाणें मोकळीं सोडून नगारे वाजवीत आले; तों एकच प्रळय झाला. संपूर्ण सैन्य गजबाजिलें; तितक्यामध्यें या उभय बंधूंनीं "हरहर महादेव" ऐसा शब्द करून उपलाणीच (घोड्याच्या उघड्या पाठीवर, खोगिराशिवायच,) अश्वांवरीं स्वार होऊन, दोघांनीं दोन फिरंगा (फिरंग म्हणजे एक प्रकारची तलवार; "फिरंगस्तु भवेदसिः" राजव्यवहार कोश.) हातीं घेऊन, आणि दोन भाले अडासनीं घालोन, सन्मुख होऊन समरांगणीं मिसळते झाले. तों (आदिलशाही सैन्याचे) दोन्ही हत्ती मदोन्मत्त नीट दोघां बंधूवरही महातांनीं चालविले. तों भोळा चक्रवर्ती शंभू उभयतां बंधूंच्या हृदयकमळीं प्रवेश करून ख्याती करविली. उभयतां बंधूंनीं परस्परें विचार केला कीं, आजि शत वर्षें आपलीं पूर्ण झालीं; आतां

जिल्ह्यांत भांबोरी येथें, व नागोजीच्या वंशापैकीं काकाजी ऊर्फ रावजी यांचे वंशज वावी येथें आजतागायत अस्तित्वांत असून आपआपल्या वतनांचा उपभोग घेत आहेत.

वर लिहिल्याप्रमाणें, विठोजीस आठ पुत्र झाले, परंतु मालोजीस मूल होत नव्हतें; त्यामुळें पुत्रप्राप्तीसाठीं त्यानें व त्याची पत्नी दिपाबाई हिनें

---

माघारें मुख लोकांस काय दाखवावें ! म्हणोन हातांत भाले घेऊन, फिरंगा मांडी खालीं ठेवून, नीट हत्ती सन्मुख होऊन, गंडस्थळें लक्षून मारिते झाले; तों श्रीशंभूच्या प्रतापें करून हत्ती गर्जना करून माघारे फिरते झाले. सर्वेच सैन्यही संपूर्ण मागून येते झालें. परमघोर युद्ध परस्परें होतें झालें. त्या युद्धांत हे उभयतां बंधू हातांत फिरंगा घेऊन, जैसें कांहीं ईश्वराचें सुदर्शन फिरतें, त्या न्यायें करून फिरते झाले. त्या यवनांचा ( आदिलशाही सैन्याचा ) पराभव करून सात शत अश्व सोडवून आणिले; आणि कित्येक योद्धें संहार करून, आपल्या सैन्यासह वर्तमान डंका वाजवीत, यशस्वी होऊन, शिबिरास येऊन, उतरते झाले. मग समस्त शूर सैन्यांत होते त्यांस दोघे अवगमले जे (त्या वेळीं निंबाळकरांच्या सैन्यांतील सर्व शूर योद्धयांना या उभयतां बंधूविषयीं असें वाटलें कीं, ) हे परमयोद्धे, झुंझार, सामर्थ्यवंत, प्रतापी, धन्य यांचीं मातापितरें, ज्यांच्या उदरीं ऐसीं रत्नें निर्माण झालीं. ऐसी स्तुती परस्परें करों लागले; ते कीर्ति चहूंकडे प्रगट झाली. ”

अशा प्रकारें, मालोजी व विठोजी या उभयतां बंधूंनीं या कोल्हापूरच्या स्वारींत अलौकिक पराक्रम गाजविल्यामुळें, त्यांचा व जगपाळरावाचा विशेष स्नेह जुळला; व त्यांचा लौकिक अहमदनगर येथील निजामशाही दरबारच्या कानावर जाऊन, जगपाळरावाच्या खटपटीनें, त्यांचीं जप्त असलेलीं वतनें निजामशाहानें मोकळीं करून त्यांना परत दिलीं; त्यांचा योग्य आदरसत्कार करून त्यांना “ राजे ” हा किताब दिला. ( इ. सन १६०४ ) आणि हे उभयतां बंधू या वेळेपासूनच निजामशाही नौकरींत दाखल झाले.

अशा रीतीनें भाग्योदय झाल्यावर जगपाळराव यानें आपली बहीण दिपाबाई ही मालोजीस दिली, हीच साध्वी दिपाबाई ही राजे शहाजी याची आई व छत्रपति शिवाजी याची आजी होय.

पुष्कळ नवस, दानधर्म, व अनुष्ठानें केलीं; त्यांतच नगर येथील प्रसिद्ध पीर शहाशरीफ यांसही नवस केला; व त्यानंतर दिपाबाई गरोदर होऊन योग्य कालानंतर तिला पुत्र झाला; ( इ० सन १५९४ ) आपणांस पीर शहा शरीफ याच्या अनुग्रहानें हा पुत्रलाभ झाला, असें मानून मालोजीनें त्याचें नांव शहाजी असें ठेविलें; त्यानंतर तीन वर्षांनीं इ० सन १५९७ मध्यें त्यास दुसरा मुलगा झाला, त्याचेंही नांव त्या पिराच्या नांवावरूनच शरीफजी असें ठेविलें;* आणि या पुत्रप्राप्तीमुळें मालोजी व दिपाबाई यांचा संसार सुखाचा होऊन तीं उभयतां आनंदानें कालक्रमणा करूं लागलीं.

मालोजी हा मोठा धाडशी, शूर, व कर्तबगार पुरुष होता. आणि इ० सन १५८८ पर्यंत त्यानें निजामशहाच्या वतीनें अनेक युद्धांत पराक्रम गाज-

---

* ह्या पिरास भोंसल्यांनीं देणग्या दिल्या असून त्यासंबंधीं इतिहास संग्रहांत, ( पुस्तक ७ अंक १० ते १२ मे, जून, जुलई पहा. ) एक सनद दिली आहे; ती सनद व त्यासंबंधीं माहिती खालीं लिहिल्याप्रमाणें:—

अहमदनगरचे पीर शहा शरीफजी
यांस दिलेली एक सनद.

**( यशवंत राजाराम गुप्ते; बी. ए. )**

मालोजी भोंसले यांस मूल होत नव्हतें; ( त्यामुळें ) त्याची स्त्री दिपाबाई हिनें अहमदनगरचा सुप्रसिद्ध पीर शहा शरीफ यांस नवस केला; नंतर तीस इ० सन १५९४ त मुलगा झाला, त्यास शहाजी म्हणूं लागले; ( आणि ) इ० सन १५९७ त दुसरा पुत्र झाला, त्यास शरीफजी या नांवानें संबोधूं लागले. आतां नवसामुळेंच पुत्रसंतती झाली किंवा कसें, हा प्रश्न वेगळा; तथापि त्या पीरास भोंसल्यांनीं देणग्या दिल्या, त्या अद्यापि चालत आहेत, ही गोष्ट ऐतिहासिक व धार्मिक दृष्ट्या महत्वाची आहे. अहमदनगर जिल्ह्यांतील ( शेवगांव तालुक्यांतील ) कोनोसी येथील जहागिरदार सय्यदमिया रहिमानमिया ( दायरेवाले ) यांचें जवळ एक अस्सल सनद आहे, तिच्यावरून श्री. पेशवे सरकारांनींही ( ह्या पिराच्या ) देणग्या चालू ठेविल्या होत्या, असें दिसतें. ती सनद येणेंप्रमाणें:—

वून व नांव मिळवून आपलें पुष्कळच महत्व स्थापन केलें होतें; इ० सन १५८८ मध्यें गोवळकोंडेकर महंमद कुली कुत्बशहाची बहीण मलिकाजहान

ओळ श्री.

१ " स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंग नाम संवत्सर मार्ग-

२ सीर्ष सुध ( शुद्ध ) चतुर्थी, इंदुवासरे* क्षत्रिय कुलावतंस श्री

३ राजा संभू ( शाहू ) छत्रपति स्वामी यांणीं राजश्री सुभेदारानी

श्री
राजा शंभू छत्रपती
हर्ष निदान रघुनाथ सुत
तिमाजी पंडित मुख्य
प्रधान.

\+

श्री
आई आदि पुरुष श्री
राजा शिवछत्रपती स्वामी
कृपानिधी ॥ तस्य परशु-
राम त्रिंबक प्रति-
निधी.

४ व कारकुनांनीं व सुभे लष्कर व सि

५ लेदार यांसि आ

६ ज्ञा केली येसीजे मौजे

कोनोसी ता। खरवडी ( खरवंडी ) पा। ( प्रा। ) सेवगांव

७ सरकार अमदानगर ( अहमदनगर ) बागा व दरगा हजरत शाहा शीरफ ( शरीफ )

८ पीर मुकाम (मुक्काम) अमदानगर यांसीं इनाम आहे तेणें प्रा। (प्रमाणें)

* इंग्रजी तारीख ६ नोव्हेंबर इ० सन १७२७.

\+ हे शिक्के असलेले राज्याभिषेक शक ५१ चें एक आज्ञापत्र भा. इ. सं. मंडळानें छापविलेल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या विसाव्या खंडाच्या २७१–२७२ पृष्ठांवर प्रसिद्ध झालें आहे.

**विशेष माहिती**:—वरील भोंसल्यांनीं दिलेल्या देणगीशिवाय राहूरी तालुक्यांतील एक लहरे हा गांवही या पीरस्थानास जहागीर आहे.

हिच्याशीं विजापूरकर इब्राहीम अदिलशहा याचें लग्न होण्याचें ठरलें; परंतु मूर्तुजा निजामशहा हा त्याच्या आड आला; या वेळीं मूर्तुजाशहा हा आपल्या वजिरावर सर्व राज्यकारभार सोंपवून अवश्याच्या किल्ल्यावर ईश्वरचिंतन करीत राहिला होता; व त्या ठिकाणीं मालोजी राजे भोंसले यांस त्याच्या तैनातीस ठेविलें होतें. मूर्तुजा निजामशहा हा इब्राहीम अदिलशहाच्या लग्नाच्या आड गेल्यानें अदिलशहानें रागाऊन आपला सरदार दिलावरखान यांस निजामशहावर पाठविलें; व त्याप्रमाणें तो अवश्याच्या किल्ल्यावर चाल करून आला; त्या वेळीं मालोजीनें मोठ्या पराक्रमानें व सफाईनें त्याला हटवून निजामशहाचें संरक्षण केलें. त्यामुळें मालोजीचें महत्व पुष्कळच वृद्धिंगत झालें; पुढें इ० सन १५९२ मध्यें दिलावरखान हा इब्राहीम अदिलशहाला सोडून अहमदनगर येथें येऊन निजामशहास मिळाला; व त्याच्या सल्ल्यावरून निजामशहानें मंगळवेढ्यापर्यंत× अदिलशाही प्रदेश जाळून पोळून उध्वस्त

९ स्वामींनीं करार केले असे, तरी कुलबाब कुल कानु देखील ( सह )
१० सरदेशमुखी इनाम दिल्हा आहे, तरी तुम्हीं मौजे मजकुरां
११ स मुजाहिम न होणें व कोण्हे विशीं यकराज उपसर्ग न
१२ देणें जाणिजे निदेश समक्ष

( उलटून )

सुरु सुदबार "

रुजु सुरनवीस

मर्यादेयं विराजते.

× मंगळवेढें हा गांव दक्षिण महाराष्ट्रांतील सांगलीच्या राज्यांत, सोलापूरच्या नैर्ऋत्येस ४२, पंढरपूरच्या दक्षिणेस १६ व सांगलीच्या ईशान्येस ६५ मैलांवर आहे.

केला; त्या वेळीं याही मोहिमेंत मालोजीनें विशेष पराक्रम गाजविला; ( वृहदीश्वर शिलालेख ) व लागलीच दुसऱ्याच वर्षी इ० सन १५९२ मध्यें, इब्राहीम अदिलशहाचा भाऊ इस्मईल यानें कोल्हापूर, व बेळगांव प्रांतीं बंड करून बुऱ्हाण निजामशहाची मदत मागितली; त्या वेळीं त्या मदतीच्या सैन्यांत सामील होऊन मालोजीनें, अदिलशाही सैन्यास कोल्हापूर प्रांतांत अतीशय भंडावून सोडिलें; थोडक्यांत सांगायाचें म्हणजे, मालोजी हा निजामशाहींत नौकरीस राहिल्यावर दिवसेंदिवस त्याचा सारखा उत्कर्ष होत चालला, व जाधवरावाचा व मालोजीचा बराच घरोबा झाल्यामुळें मालोजीचा मुलगा शहाजी हाही जाधवरावाकडे नेहमीं जाऊं लागला; शहाजी हा दिसण्यांत सुस्वरूप व हुषार असल्यामुळें त्याच्यावर जाधवरावाचें प्रेम जडलें; जाधवरावास जिजाऊ ऊर्फ जिजाबाई या नांवाची एक कन्या असून ( जन्म इ. सन १५९५ मध्यें ) ती व शहाजी हे उभयतां पुष्कळ वेळां एकत्रही खेळत असत. पुढें इ. सन १५९९ या वर्षीं शिमग्याच्या सणांत रंगपंचमीनिमित्त जाधवरावानें आपल्या घरीं एक मोठा समारंभ केला; त्याकरितां त्यानें आपल्या इष्टमित्रांना अमंत्रण केलें; व त्यांतच त्यानें मालोजीसही बोलाविलें. त्याप्रमाणें मालोजी हा आपला पांच वर्षांचा मुलगा शहाजी यांस बरोबर घेऊन त्या समारंभाकरितां जाधवरावाच्या घरीं गेला. त्यावेळीं जाधवरावानें शहाजीस हांक मारून लडिवाळपणानें आपणांजवळ बसवून घेतलें. इतक्यांत त्याची लाडकी मुलगी जिजाबाई हीही घरांतून येऊन त्याच्याजवळ बसली व बालस्वभावानुरूप तीं एकमेकांवर गुलाल उधळूं लागलीं. हें पाहून सर्वांना मोठें कौतुक वाटलें; व जाधवराव विनोदानें म्हणाला, " मुली, तुला हा नवरा आवडतो काय ? हा जोडा फारच सुंदर दिसतो." जाधवरावानें हे शब्द त्या समारंभांत सर्वांसमक्ष सहज विनोदानें उच्चारिलें; परंतु मालोजीनें ते जमेस धरून–अगदीं अक्षरशः खरें असें मानून–तो लागलीच उठून उभा राहिला; व तेथें जमलेल्या सर्व मंडळीस उद्देशून तो मोठ्यानें म्हणाला " ऐकाहो, जाधवराव काय बोलले तें; आजपासून जाधवराव हे आमचे व्याही झाले; व जिजाऊ ही आमची सून झाली. आतां हा निश्चय बदलणार नाहीं. थोर लोक अशा सभेंत बोललेले शब्द मागें घेणार नाहींत." वास्तवीक पाहतां जाधव-

राव हा वरील शब्द सहज विनोदानें बोलून गेला होता; त्यामुळें, या विनोदाचें पर्यवसान अकल्पित रीत्या अशा प्रकारें झालेलें पाहून तो अगदीं चकित झाला; भांबावून गेला; आणि त्यावर मालोजीस कांहींही उत्तर न देतां स्तब्ध राहिला.

अशा रीतीनें हा समारंभ आटोपल्यानंतर दुसऱ्या दिवशीं जाधवरावानें सर्व इष्टमित्र मंडळीस आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें. त्यावेळीं त्यानें मालोजीसही निमंत्रण केलें. परंतु मालोजीनें तें नाकारून जाधवरावास असा निरोप पाठविला कीं, "तुम्ही आम्ही आतां व्याही झालों; त्यामुळें यापुढें लग्नसमारंभाच्या वेळीं तुमच्याबरोबर आमचें भोजन होईल; तोंपर्यंत आपण आम्हांस बोलावूं नये; " त्यानंतर हा सर्व प्रकार जाधवरावाची स्त्री म्हाळसाबाई (कांहीं ठिकाणीं गिरजाबाई असा उल्लेख आढळतो.) हीस समजल्यावर तिला मालोजीचें हें वर्तन उद्धटपणाचें आहे, असें वाटून अतीशय राग आला; व " मालोजी हा आपल्या बरोबरीचा सरदार नाहीं. सबब त्याच्या मुलाशीं आपल्या मुलीचा विवाह करणें अगदीं अनुचित आहे; असें असतां तुम्हीं ही गोष्ट कशी मान्य केली ?" वगैरे प्रकारानें ती जाधवरावास टाकून बोलली; " सोयरीक या मुलीस करणें ती मातबर, मनसबदार पाहून ही कन्या बहुत समारंभें ज्याचे घरीं फार दौलत, वस्त्रें अलंकार तेथें द्यावयाची; आपण सभेंत बोलला तें अनुचित; यांस देणें आमचे चित्तास येत नाहीं." असें म्हणून तिनें या विवाहास आपला नकार स्पष्टपणें जाधवरावास कळविला. त्यावर " त्या समारंभांत मी असें सहज विनोदानें बोललों होतों; परंतु त्याबद्दल माझें वचन कोणत्याही प्रकारें गुंतलेलें नाहीं; " असें त्यानें म्हाळसाबाईस सांगून तिचें समाधान केलें, व मालोजीस " ही सोयरीक करण्यास आपण तयार नाहीं;" असा निरोप पाठविला; " शरीरसंबंधाची गोष्ट आपण बोलूं नये; आमचे घरांत कोणाचे विचारास येत नाहीं; ब्रह्मसूत्र [ असेल ] तेथें घडेल;" असें मालोजीस स्पष्ट कळविलें; त्यावर मालोजीनें जाधवरावास पुन्हां असा जबाब पाठविला कीं, " आपण दिलेला शब्द थोरामोठ्यांचा आहे, तो व्यर्थ कसा जाईल ? आपण इतक्या लोकांसमक्ष बोलला तें अप्रमाण कसें होईल ? आम्हांस आपल्याशीं सोयरीक अवश्य कर्तव्य आहे." मालोजीच्या ह्या जबा-

बानें जाधवरावास अतीशय राग आला; मालोजीच्या उद्धट वाटणाऱ्या ह्या वर्तनानें जाधवरावाच्या अंगाचा तिळपापड उडाला, आणि त्याच संतापाच्या भरांत, त्यानें मालोजी व विठोजी या उभयतांचा हिशोब चुकता करून त्यांना ताबडतोब आपल्या नोकरींतून रजा दिली; तेव्हां ते उभयतां वेरूळ येथें परत आले, व पूर्वीप्रमाणें शेती करून तेथेंच ते वास्तव्य करून राहूं लागले.

अशा रीतीनें जाधवराव व मालोजी यांच्यामध्यें उडालेली ही पहिली चकमक, हींच जाधव व भोंसले या दोन सारख्याच प्रसिद्ध, शूर, कर्तबगार, करारी व करामती घराण्यांतील भावी काळांतील सतत चालू राहिलेल्या चुरशीच्या सामन्यांतील उडालेली पहिली चकमक होय; या वेळेपासूनच हीं उभयतां घराणीं एकमेकांचीं कट्टी दुष्मन बनलीं; जिजाऊचा हात शहाजीच्या हातीं दिला गेला, तरी त्यांचें सख्य न होतां उलट शत्रुत्व अधीक वृद्धिंगत होत गेलें; नात्याचा नाजुक संबंध डोळ्याआड होऊन शहाजीचें शीर तरवारीनें तोडून टाकण्यापर्यंत या शत्रुत्वाची परमावधी झाली ! मराठा मंडळांत प्रमुख, प्रबळ व प्रसिद्ध म्हणून नांवाजलेल्या जाधव घराण्यावर मात करून, आणि लुकजीचा नकशा उतरून त्याची मुलगी जिजाबाई हिचें लग्न आपला मुलगा शहाजी याच्याशीं लावून जाधवरावावरील आपल्या अपमानाचा सूड मालोजीनें बरोबर उगवून घेतला; निजामशाहा व मलिकंबर यांनीं मालोजीचा पक्ष घेऊन, लुकजीच्या मानेवर तरवार ठेवून जबरदस्तीनें त्याच्याकडून जिजाईचा हात ज्या दिवशीं मालोजीच्या पोराच्या–शहाजीच्या–हातांत देवविला, त्याचवेळेपासून शिंदखेडकर जाधव व वेरूळकर भोंसले, यांच्यामधील स्पर्धा, वैमनस्य व युद्धकलह हीं ऐन रंगांत येण्यास प्रारंभ झाला; आपल्या वर्चस्वाच्या मार्गाच्या आड येणारा शहाजीचा कांटा पार उखडून नामशेष करावा, म्हणून जाधवांनीं सारखा अट्टाहास केला; उलटपक्षीं मराठा मंडळांत अनेक वर्षांपासून जाधवाकडे चालत आलेला अग्रपूजेचा मान, त्यांच्याकडून हिसकावून घेऊन आपल्या हातीं ठेवण्याकरितां सतत पंचवीस वर्षें भोंसल्यांनीं खटपट केली, व त्यांत ते यशस्वी झाले; व त्यामुळें जाधवांचें महत्व पूर्णपणें नष्ट झालें.

# भोंसलें घराणें.

## बाबाजीराजे भोसलें.

जन्म इ. सन १५३३.

### मालोजीराजे भोंसले.

जन्म इ. सन १५५० लग्न फलटणकर जगपाळराव निंबाळकर याची बहीण नामें दिपाबाई हिजबरोबर; इ. सन १६०४ पासून निजामशाहींत मनसबदार झाला; पंधरा वर्षे मनसबदारीचा उपभोग घेतल्यावर इ. सन १६१९ मध्यें मृत्यू; [ "शके १५४२रौद्रनाम संवतसरे, फसली सन १०३१ या सालीं मालोजीराजे यांस देवआज्ञा जाहाली. मुक्काम येरुळ धुरमेस्वर येथें त्याचें उत्तरकार्यधाकटे पुत्र शरीफजी राजे याचे हातून केले. व शहाजी राजे यांनीं दानधर्म उदंड द्रव्य खर्च केलें." म. द. रु. प. ]

### विठोजीराजे भोंसले.

यांस आठ मुलगे;

टीपः—या वंशांतून पुढें सातारा व तंजावर वंशांत दत्तक घेतले गेले आहेत. [ या वंशाची स्वतंत्र वंशावळ दिली आहे, ती पहा. ]

शहाजीराजे. | शरीफजीराजे.

जन्म इ. सन १५९७; मूर्तुजा निजामशहाच्या आईनें मोंगली सैन्याशीं मिलाफ केल्यामुळें शहाजी इ. सन १६२७ मध्यें माहुली सोडून विजापुराकडे वळला, त्या वेळीं त्यानें शरीफजीस निजामशहाजवळ ठेविलें होतें. " दौलताबादेस शहाजीराजे याचे धाकटे बंधू सरीफजीराजे हे निजामशाईतून निघोन मोंगलाईंत दिल्लीवाले अवरंगजब पादशहा याचे फौजेंत मोठे तोलदारीनें निजामशाईंतून पंधराशें स्वारानिसी जाऊन दिल्लीवाले याजकडेस चाकरीत राहिले. हे पादशाही उमराव म्हणवीत होते. मग दिल्लीवाले पातशहा याजकडून जातीचे तैनातीबद्दल चाकण चौऱ्याशी परगणा राजे याजकडे दिल्लीवाले सरकारांतून लाऊन दिल्हा. त्यांतच चाकणच्या किल्लयासुद्धां सरीफजीराजे याजकडेस दिल्हा. ते तेथें दौलताबादेस राहिले. सरीफजीराजे यास पुत्र त्रिंबकजोरीज, यास पुत्र बाबाजीराजे, यास पुत्र त्र्यंकोजीराजे, याचे स्त्रीचें नांव कमळजाबाई यांचे पोटीं पुत्र साहा जाहल. वडील पुत्र संभाजीराजे,दुसरे माणकोजी खानवटेकर, तिसरे शहाजीराजे, चौथे सरोफजीराजे, पांचवे तुकोजीराजे, साहावे बाबाजीराजे शेडगांव व कोटारे देऊळगांवकर याच्या वोंशाचा सहाजणाचा विस्तार भीमातीरीं वगैरे गांवीं आहे." म. द. रु. पहिला पहा.]

मालोजी व विठोजी या उभयतांना जाधवरावानें आपल्या नोकरींतून रजा दिल्यामुळें, जरी त्यांचा व जाधवरावाचा संबंध सुटला, तरी मालोजी हा अपमानाचें दुःख विसरला नाहीं; त्याला अहंकारांच्या यातनाचें विस्मरण झालें नाहीं. आपलें घराणें जाधवरावासारखेंच उच्च असूनही आपण निर्धन, म्हणूनच जाधवरावानें आपणांस झिडकारिलें, व आपला मानभंग केला ही गोष्ट मालोजीच्या मनाला सारखी खाऊं लागली; तेजोभंगाच्या यातना कोडगेपणानें विसरून जाण्याइतका त्याचा स्वभाव अळणी नसल्यानें–बनला नसल्यानें–अशा अप्रतिष्ठेचें जिणें त्याला अत्यंत कष्टदायक वाटूं लागलें; आणि "करीन तर शहाजीस जाधवरावाची मुलगी जिजाऊ हीच बायको करीन" अशा हट्टी निश्चयानें पुढें कोणत्या प्रकारें खटपट करावी, या विचारांत तो मग्न होऊन गेला.

अशाच विचारमग्न स्थितींत तो आपला भाऊ विठोजी यासह एका माघ महिन्यांतील पौर्णिमेच्या रात्रीं आपल्या शेताची राखण करण्यास गेला; तेथें गेल्यावर विठोजी निजला, व मालोजी शेताची राखण करीत बसला; मालोजी हा तुळजापूरच्या देवीचा एकनिष्ठ भक्त होता; ती देवी या वेळीं त्या ठिकाणीं प्रगट झाली; व तिनें मालोजीस दर्शन देऊन असा वर दिला कीं, "तुझे मनोरथ सिद्धीस जातील; व तुझे वंशीं श्रीसांबाचा अवतार शककर्ता निर्माण होईल. यांस प्रमाण; जवळच्या वारुळांत द्रव्य आहे तें घे; तेणेंकरून तुझें कार्य होईल." असें म्हणून देवी अदृश्य झाली. तेव्हां मालोजीनें आपल्या बंधूस जागें करून त्यास ही सर्व हकीकत सांगितली; व देवीच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं तें वारूळ खणिलें; त्यांत त्यांना पुष्कळ द्रव्य मिळालें; तें मालोजीनें श्रीगोंदें येथें शेषाप्पा नाईक पुंडे या नांवाचा एक प्रसिद्ध व साखीचा सावकार रहात असे त्याच्याकडे नेऊन ठेविलें;+ व त्याच्याच मदतीनें मालोजीनें

---

+ह्या वेळीं मालोजीनें, "आम्हास अथवा आमच्या वंशजांस राज्यप्राप्ती झाल्यास आम्ही तुमच्या घराण्याचें उर्जित करूं" असें शेषाप्पास वचन दिलें होतें; हा शेषाप्पा नाईक मोठा श्रीमान्, प्रामाणिक, एकवचनी, व सत्यवादी असून ह्यावेळेपासूनच (इ. सन १६०१–१६०२ च्या सुमारापासून)

एक हजार घोडीं खरेदी केलीं; व शिलेदार बारगीर* नौकरीस ठेवून त्यानें आपला इतमाम व महत्व वाढवीत नेण्यास सुरवात केली. शिवाय तो पहिल्या-

---

त्याच्या घराण्याचा व भोंसले घराण्याचा अगदीं निकटचा संबंध व घरोबा जमला. या शेषाप्पाचा नातू दुसरा शेषाप्पा हा शिवाजीनें रायगड ही राजधानी केल्यानंतर, आपल्या मुलांमाणसासह रायगड येथें येऊन राहिला होता, व रायगड येथील बाजारपेठेंत त्याचें एक दुकान होतें. या शेषाप्पाचें स्मारक म्हणून त्याच्या दुकानासमोर एक अजमासें पांच हात लांब व एक हात रुंद असा एक चौकोनी दगड बसवून त्यावर एक नागाचें चित्र काढलेलें आहे; शिवाय किल्ल्याच्या पायथ्याशीं वाडी येथें त्याचा एक बाग असून त्याचें "नागयाबाग" हें नांव आहे. हा शेषाप्पाही आपल्या आज्याप्रमाणेंच मोठा श्रीमान्, प्रामाणिक, एकवचनी, व सत्यवादी असून शिवाजीची त्याच्यावर अतिशय मेहेरनजर व विश्वास असे. मालोजीनें पहिल्या शेषाप्पास, आमचें भाग्य उदयास आल्यास आम्ही तुमचें ऊर्जित करूं, असें वचन प्रमाण दिलेलें होतें; त्यामुळें शिवाजीनें त्यास आपला जामदारखाना कामगार नेमिलें होतें, व पुढें शिवाजीस राज्याभिषेक झाला, त्यावेळींही तोच त्याच्या जामदारखान्याचा कारभारी होता.

श्रीगोंदें ऊर्फ चांभार गोंदे ( गोविंद या नांवाच्या एका चांभार साधूवरून या गांवास चांभार गोंदें हें नांव प्राप्त झालें आहे. ) हें तालुक्याचें ठिकाण अहमदनगर जिल्ह्यांत, अहमदनगरच्या दक्षिणेस अजमासें बत्तीस मैलांवर व दौंड मनमाड रेल्वेच्या पिंपरी या रेल्वे-स्टेशनापासून सडकेनें चार मैलांवर आहे.

* बारगीर व शिलेदार या उभयतांच्या अर्थामध्यें महत्वाचा फरक आहे; तो थोडक्यांत असा कीं, स्वतःचें घोडें व हत्यारें बाळगून एखाद्या राज्यकर्त्याच्या अथवा सरदाराच्या पदरीं नौकरी करीत असेल त्यास शिलेदार असें म्हणतात; आणि नौकरीस ठेवणाऱ्या राज्यकर्त्याच्या, अथवा सरदाराच्या—नौकरीस ठेवणाऱ्याच्या मालकीचें घोडें व हत्यारें जवळ बाळगून शिलेदारापेक्षां कमी पगारावर नौकरी करणारा त्यास बारगीर असें म्हणतात.

पासूनच भाविक व धार्मिक प्रवृत्तीचा होता; पुत्रजन्मामुळें त्याच्या या प्रवृत्तींत भर पडली होती; आणि देवी कुलस्वामिनीचें दर्शन व तिच्या अनुग्रहानें द्रव्यलाभ, यामुळें तर त्याचा भाविकपणा विशेषच वाढून, आपण नानाप्रकारचे दानधर्म करावे, अनेक धर्मकृत्यें करून लौकिक संपादन करावा, कीर्ति मिळवावी, अशी त्यास इच्छा झाली; त्याप्रमाणें ज्या शेतांत मालोजीस हा द्रव्यलाभ झाला तें शेत त्यानें एका ब्राम्हणास दान केलें; ज्या वारुळांतून द्रव्य मिळालें त्या वारुळावर त्यानें एक सुंदर देवालय बांधविलें; श्रीशिखर शंभू महादेव येथें दरवर्षी चैत्र महिन्यांत मोठी यात्रा भरत असे; व त्या यात्रेस लाखों लोक जमत असत; पण तेथें उदक नव्हतें; व यात्रेकरूंना फार लांबून पाणी आणण्याचा अतिशय त्रास होत होता. म्हणून मालोजीनें त्या ठिकाणीं एक उत्तम स्थळ पाहून तेथें विस्तीर्ण तलाव बांधिला. वेरूळ येथील श्रीघृष्णेश्वराचें देवालय अगदीं जीर्ण झालें होतें, त्याचा उद्धार केला; व आणखीही कित्येक ठिकाणीं तळीं, विहिरी, धर्मशाळा, वगैरे बांधून व अनेक प्रकारें दानधर्म करून त्यानें पुष्कळ लौकीक संपादन केला.

मालोजीची पूर्वस्थिति—म्हणजे तो पहिल्यानें जाधवरावाच्या आश्रयास जाऊन राहिला होता, त्या वेळेची स्थिति–आणि या काळांतील स्थिति, यांत अतिशयच फरक झालेला होता. त्या वेळीं तो निर्धन होता; आतां तो धनवान् झाला होता; त्या वेळीं तो दुसऱ्याच्या आश्रयानें जगत होता; आतां त्यानेंच हजार बाराशें लोकांस आपल्या आश्रयास ठेविलें होतें; त्या वेळीं त्याला लौकिक दृष्टया कांहींही महत्त्व नव्हतें; या वेळीं त्यानें आपलें महत्त्व वाढवून लौकिक संपादन केला होता; गरीबीमुळें उत्पन्न होणारी नालायकी आतां नाहींशीं झालेली होती; अर्थात् आतां आपण जाधवरावाच्या तोडीचे झालों

---

छत्रपति शिवाजीनें दरबारांत फारशी भाषेऐवजीं संस्कृत भाषा वापरण्याचा उपक्रम केला, त्यावेळीं "पंडितराव" रघुनाथ भट्ट उपाध्ये चंदावरकर ( रघुनाथ नारायण हणमंते ) यानें एक संकृत "राजव्यवहार कोश" तयार केला त्यांतही "शिलेदार" या शब्दाची "शिलेदारः स्वतुरंगी" म्हणजे स्वतःचा घोडा बाळगून नौकरी करणारा, अशीच व्याख्या केलेली आहे.

असें त्यास वाटूं लागलें, व त्यानें जिजाबाई शहाजीस देण्याविषयीं पुन्हां जाधवरावाकडे मागणी केली; परंतु ती जाधवरावानें अमान्य केली. तेव्हां मालोजीनें जगदेवराव निंबाळकरामार्फत मूर्तुजा निजामशहा यांजकडे त्या-बद्दल गाऱ्हाणें केलें; तेव्हां शहानें मालोजींची कर्तबगारी ध्यानीं आणून मध्यस्थी केली; व जाधवरावाकडून जिजाबाई शहाजीस देवविली; त्याप्रमाणें इ० सन १६०४ च्या एप्रील महिन्यांत शहाजी व जिजाबाई यांचें लग्न मोठ्या थाटानें झालें; व जाधवरावावर मात करून मालोजीनें या लग्नसंबंधीचा आपला निश्चय अखेरीस यशस्वीपणानें सिद्धीस नेला.

या काळांतील निजामशाहींतील राजकीय परिस्थितिही मालोजीच्या उत्कर्षास बऱ्याच प्रमाणानें कारणीभूत झाली होती. निजामशाहीस या वेळीं काळ नष्ट आलेला होता; तें राज्य खडतर आपत्तीच्या भोंवऱ्यांत सांपडलें होतें; संकटामागून संकटें येऊन त्यामुळें निजामशाहीचा पाया खिळखिळा होण्यास सुरवात झाली होती; बलिष्ठानें आरंभिलेल्या स्पर्धेत निजामशाही जगते का मरते, अशी अनिश्चित स्थिति उत्पन्न झाली होती; बादशहा अकबर हा निजामशाही नामशेष करण्याकरितां दक्षिणेंत चाल करून आलेला होता; शरिरांतील मुख्य व महत्त्वाची रक्तवाहनी तुटल्यानंतर जसें तें निर्बल होतें. त्याप्रमाणेंच अकबरानें अहमदनगर जिंकून बहादूर निजामशहा यांस ग्वाल्हेर येथें नेऊन कैदेंत ठेविल्यामुळें निजामशाही राज्य निर्बल झालें होतें. शरिराचा एखादा आधारभूत अवयव कापून टाकिल्यावर तें जसें लुलें बनतें, त्या-प्रमाणेंच चांदबिबीच्या मृत्यूनंतर निजामशाही निर्जिव झाली होती; आणि हा डळमळता डोलारा केव्हां एकदम कोलमडून खालीं येईल, याचा कांहींच निश्चितपणा राहिला नसून सुद्धां, मलिकंबर हा खडकी येथें राजधानी करून निजामशाही जगविण्याकरितां मोठ्या जोराचे प्रयत्न करीत होता. अशा स्थितींत मालोजीसारख्या कर्तृत्ववान् पुरुषास आपल्या पक्षाकडे ओढून घेऊन राज्यरक्षणाच्या कामीं त्याचा उपयोग करून घ्यावा असें त्यास वाटणें स्वाभाविक होतें; म्हणून त्यानें आणि मुर्तुजा निजामशहानें—शहाजी व जिजाबाई यांच्या लग्नाच्या बाबतींत मध्यस्थी केली. मालोजीस पांच हजारी

मनसब व " राजे " हा किताब दिला;= शिवनेरी व चाकण हे किल्ले व त्याच्या आसपासचा प्रदेश सरंजामादाखल बहाल केला; आणि पुणें व सुपें या परगण्यांची त्यास जहागीर दिली. या जहागिरीसंबंधीची यादी शिवदिग्विजयांत दिली आहे, त्यावरून ही जहागीर पुणें, नाशिक, अहमदनगर व खानदेश, या चार जिल्ह्यांत होती, व या प्रदेशापैकीं बऱ्याच भागावर त्यावेळीं मोंगलांचा अंमल बसलेला होता, असें दिसतें. तथापि तशा स्थितींतही मालोजीनें आपला मुलगा शहाजी याच्या मदतीनें आपल्या जहागिरीचें मोठ्या दक्षतेनें संरक्षण केलें, यावरून त्याची श्रेष्ठ कर्तृत्वशक्ति निदर्शनास येते.

मालोजीनें निजामशाही दरबारच्या मदतीनें जाधवरावावर आपल्या अपमानाचा डाव साधून घेतला, व शहाजी आणि जिजाबाई यांचा लग्नसंबंध घडवून आणिला. या मध्यस्तींत "कर्तबगार मनुष्य आपल्या पक्षांत ओढून

---

= भोंसल्यांचे अनेक कागदपत्त अलीकडे छापून प्रसिद्ध झाले आहेत. ( राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५ पहा. ) त्यावरून भोंसले घराण्याकडे " राजे " हा किताब मालोजीच्याही पूर्वकाळापासून चालू होता, असा उल्लेख आढळतो. निरनिराळ्या लेखांकांत " लखमोजी राजे " " सर्जाराव राजे, " " कृष्णाजी राजे " अशीं " राजे " हा किताब धारण केलेलीं नांवें आढळतात; आणि लेखांक ३६७ मध्यें तर बाबाजीनेंच स्वतःस " राजे " हें उपपद लाविलेलें आहे. त्याप्रमाणेंच बाबाजी राजे यानें इ० सन १५९७ मध्यें, मालोजी राजे यानें इ० सन १६०७ मध्यें, व संभाजी राजे यानें इ० सन १६२१ मध्यें उपाध्यायांस इनामें करून दिल्याचा—व तीं मलिकंबर यानें रुजू ठेविल्याचा—उल्लेख आहे. हे उपाध्ये मूळचे पुणें प्रांतांतील आरवी मुद्गल येथील राहणारे असून ते भोंसल्यांचे कुलगुरु होते; व पुढें भोंसले घराण्याचा राजकीय उत्कर्ष झाल्यानंतर तेच त्या घराण्याचे राजोपाध्ये झाले. या घराण्यांतील रामेश्वर भट उपाध्ये यांस शहाजी राजानें इ. स. १६२१मध्यें इनाम करून दिलें होतें. या घराण्याचा भोंसले घराण्याशीं पूर्वापार व विशेष प्रेमाचा व घरोब्याचा संबंध असून हें घराणें सधन होतें; व या राजोपाध्ये मंडळीपासूनच, भोंसले प्रसंगीं कर्ज वामही काढीत असत.

घेणें " हा तर निजामशाही दरबाराचा प्रधान हेतू होताच; पण निजामशाहींतील प्रसिद्ध मुत्सद्दी मलिकंबर यानें मालोजीस जहागीर म्हणून जीं ठाणीं, किल्ले, प्रदेश अथवा परगणे निरनिराळ्या ठिकाणीं लांबवर पसरलेले व निजामशाही, मोंगलाई व आदिलशाही यांच्या सरहद्दीवर असलेले दिलेले होते, त्यांतील बहुतेक भाग आधींच मोंगलांच्या ताब्यांत गेलेला असल्यामुळें "मेला तर मालोजी मरेल, अथवा बसला तर मोंगलावर ग्रह बसेल," अशा दूरदृष्टीचा तितकाच महत्त्वाचा व दुसरा प्रधान हेतूही मालोजीस ही जहागीर देण्यांत असावा, हें उघड होतें. पण हें कसेंही असलें तरी मालोजीनें, अशा स्थितींतही आसपासच्या राज्याशीं सलोख्याचा व्यवहार ठेवून आपल्या जहागिरीचें उत्तम प्रकारें संरक्षण केलें, यावरून तर त्याच्या श्रेष्ठ कर्तृत्वशक्तीस विशेषच उज्वल स्वरूप प्राप्त होतें.

अशा रीतीनें मालोजी हा निजामशाहींतील एक वजनदार मनसबदार बनला; ( इ. सन १६०४ ) व सतत पंधरा वर्षे त्यानें या स्वकष्टार्जित वैभवाचा मोठ्या इभ्रतीनें उपभोग घेतल्यावर तो इ० सन १६१९ मध्यें मृत्यू पावला* शिखर शिंगणापूर येथें मालोजीची छत्री आजतागायत अस्तित्वांत आहे.

---

* मालोजी कधीं, व कोठें मृत्यू पावला याबद्दल मतभेद आहे; आमचे मित्र रा. रा. या. म. काळे B. A. L. L. B. वकील बुलढाणा, यांस दक्षिण वऱ्हाडांत एक अस्सल सनद सांपडली असून तिच्यावर १५४३ हा शक (इ० सन १६२१-२२) आहे त्यावरून मालोजी हा इ० सन १६२१ मध्यें मृत्यू पावला, व त्याच वर्षाच्या अखेरीस शहाजीस मालोजीची जहागीर मिळाली, असें त्यांचें म्हणणें असून, त्यांनीं भा. इ. मं. च्या अकराव्या सम्मेलनांत तशा आशयाचा एक निबंध वाचला आहे.

परमानंद या नांवाचा एक प्रसिद्ध कवी शिवाजीच्या काळांत निर्माण झाला; त्यानें शिवाजीच्या आज्ञेवरून "शिव-भारत" हा ग्रंथ लिहिला; त्यांत असें लिहिलेलें आहे कीं, " बाबाजी भोंसल्यांचे मुलगे मालोजी व विठोजी हे भिमानदीच्या कांठीं कांहीं गांवाची पाटीलकी संपादून होतें; तेथून

मालोजी हा शिवाजीचा आजा असून त्याच्यापासून सतत तीन पिढ्या-मालोजी, शहाजी, व शिवाजी या तीन पिढ्या-मराठ्यांच्या कर्तृत्वशक्तीची व उत्कर्षाची सारखी वाढ होत गेली; मालोजीनें मनसबदारी मिळवून स्वतंत्र होण्याचा उपक्रम केला; शहाजीनें समशेरीच्या संजीवनीनें निजामशाही जिवंत करून, व "राजे निर्माण करणारा"-"किंग मेकर"- ही पदवी मिळवून तो बहुतेक स्वतंत्र झाला; आणि शिवाजीनें-क्षत्रीय कुलावतंस श्री छत्रपति शिवाजी महाराज यानें तर पूर्ण स्वतंत्र होऊन, व "स्वराज्य संस्थापक" हें नामाभिधान मिळवून आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेविलें.

---

ते निजामशहाच्या दरबारीं गेले; आणि तेथें तरवार गाजवून त्यांनीं अधिक ऐश्वर्य संपादन केलें; पुढें मालोजी इंदापूरच्या लढाईत बादशाही कामांत खर्ची पडला; त्यामुळें कांहीं वर्षेपर्यंत विठोजीनें सरदारकी चालविली; शेवटीं विठोजी मृत्यू पावल्यानंतर त्याचे व मालोजीचे मुलगे निजामशाही दरबारांत मलिकंबराच्या हाताखालीं राहून सरदाराचीं कामें करूं लागले." (आपटे-कृत इतिहासमंजरी; पान १६ ते १९ पहा.) म्हणजे मालोजी इंदापूरच्या युद्धांत मृत्यू पावला, असा शिवभारतांत उल्लेख केलेला आहे.

## परिच्छेद दुसरा.

### शहाजीचें पूर्वचरित्र.

" तुम्ही शिसोदें क्षत्रीय कुलांत निर्माण होऊन त्या कुलास अनुरूप, असा अलौकिक पराक्रम केला; व हिंदु प्रजेस यवनांच्या क्लेशप्रद सत्तेतून सोडवून स्वराज्य स्थापन व स्वराज्य रक्षण करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करून त्यांत (तुम्ही) यशस्वी झाला हें पाहून मला पराकाष्टेचें समाधान व धन्यता वाटत आहे. आमच्या वडिलांस (मालोजी राजे यांस) असा दृष्टांत झाला होता कीं, तुमच्या कुलांत शककर्ता निर्माण होऊन तो हिंदु धर्माचें व हिंदु प्रजेचें यवनापासून रक्षण करील. हा दृष्टांत खरा होता, हें तुम्ही आपल्या अलौकिक कर्तृत्वानें (आमच्या) प्रत्ययास आणून दिलें. तुमच्या ठायींच्या शौर्य-वीर्यादि अनुपम गुणांच्या योगानें आमच्या कुलाचा पुनरपि भाग्योदय झाला आहे. (आणि) असा प्रतापशाली पुत्र आमच्या उदरीं निर्माण झाला म्हणून, आम्ही त्रैलोक्यांत धन्य झालों आहों. "

—शहाजीचे धन्योद्गार.

मालोजी मृत्यू पावला त्यावेळीं शहाजीचें वय पंचवीस वर्षांचें असून, त्याचा धाकटा भाऊ शरीफजी हा बावीस वर्षांचा होता; मालोजीच्या काळांत शहाजीस बालपणापासूनच राजकीय शिक्षण मिळण्यास सुरवात झाली होती, आणि इ० सन १६०६ पासूनच शहाजीनें मालोजीबरोबर बऱ्याच मुलुख-गिऱ्या पाहिलेल्या होत्या. या काळांत मलिकंबर हा निजामशाही राज्याचा

सूत्रचालक असून, तो मालोजीप्रमाणेंच शहाजीचीही कर्तबगारी ओळखून होता; त्यामुळें त्यानें शहाजीस लागलीच मनसबदारीचीं वस्त्रें दिलीं; तथापि तीं मिळण्यास वर्ष दीड वर्षांचा कालावधि लागला, आणि "मालोजीच्या मृत्यूनंतर मालोजीची सर्व जहागीर व सैन्य यांचें आधिपत्य दरबारी शिरस्त्याप्रमाणें वर्ष दीड वर्षानें शके १५४३ दुर्मति संवत्सरीं शहाजीस प्राप्त झालें" असा बृहदीश्वर शिलालेखांत उल्लेख आहे.

शहाजीच्या पूर्वचरित्राचें विवेचन करण्यापूर्वी तत्कालीक राजकीय परिस्थितीसंबंधीं थोडक्यांत विवेचन करणें अत्यावश्यक आहे; रा. राजवाडे यांनीं राधामाधव-विलास-चंपू या काव्यग्रंथांत या बाबतींत मोठें मननीय विवेचन केलें आहे, ते असें कीं, "त्या कालीं सध्याच्या प्रमाणेंच महाराष्ट्रांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, व अतिशूद्र असे पांच वर्ण असून मुसलमान व रानटी अनार्य असे दोन हिंदुबाह्य लोकसमूह असत. पैकीं कातकरी, कोळी, ठाकूर भिल्ल इत्यादि संपूर्ण किंवा अर्धवट रानटी अनार्यबाह्यांना तत्कालीन राज्ययंत्राचा अर्थ कळण्याची ऐपत नसल्यामुळें, तत्कालीन राजकीय परिस्थितीच्या अवलोकनक्षेत्रांतून त्यांना वगळावें लागतें. हे रानटी अनार्य लोक शिपाईगिरीहि करण्याच्या लायकीचे नव्हते, आणि मुत्सद्देगिरीची आकांक्षा तर त्यांच्या मनोभूमींत अंकुरित होण्याचा यत्किंचितही संभव नव्हता. रामरावणादीच्या पुरातन कालापासून तों अद्यापपर्यंत हे वनचर स्थितींत आहेत. चांभार, घेड, महार, मांग, इत्यादि अतिशूद्र यद्यपि वनचर स्थितींतून ग्रामचर स्थितींत आलेले होते, तत्रापि शिपाईगिरी किंवा मुत्सद्देगिरी त्यांच्या स्वप्नसृष्टींतहि उदय पावलेली नव्हती. गांवांतील गलिच्छ व कावाडकष्टाचे बिनभानगडीचे धंदे करून व चोऱ्यामाऱ्या करून पोटभर भाकर मिळविण्यांत ह्यांची सर्व रग जिरत असल्याकारणानें राजयंत्राचे अवयव होण्यास त्यांना अवकाश नव्हता. व्यापार व शेतकी ही जी मनुप्रणित वैश्यवृत्ति ती ह्या कालीं दुभंग होऊन व्यापारी व शेतकरी या दोन वर्गांत वांटली गेली होती. निव्वळ व्यापारधंदा व शिल्पकला करणारे जे सोनार शिंपी, तांबट इत्यादि कारुकर्में त्यांच्या अनेक जाति बनून ते आपापल्या धंद्यांत निमग्न असून, त्यांना राज्ययंत्रांत घालमेल करण्याची पिढीजाद संवय नव्हती; व

तसलीं नवीन संवय संपादन करण्याची कलही त्यांनीं अद्याप दाखविलेला नव्हता. वैश्यवृत्तीचा दुसरा भाग जो शेतकी तो वैश्यांनीं सोडून दिल्यामुळें शूद्रांच्या हातीं सर्वस्वीं जाऊन कुणबी म्हणून एक वर्ग आस्तित्वांत येऊन त्या कालीं शेंकडों वर्षे लोटलीं होतीं. पाणिनीकालीन अनिरवसित शूद्र प्रागार्यकालीन नागलोक, वैश्यवर्ण व क्षत्रिय वर्ण ह्या चार लोकांचे पुरातन कालीं शरीर-संबंध होऊन महाराष्ट्रांत कुणबी ऊर्फ कुलपति हा वर्ग निर्माण झालेला होता. ह्या वर्गांतील लोक कधीं मोलमजूरीचीं शूद्रकर्मे करून कधीं वाणिज्यादि वैश्य कर्मे करून, व कधीं शिपाईगिरीचें क्षात्रकर्म करून प्रायः कृषि-कर्मांहि वैश्य धर्मांत गढलेले असत; आपण जातीचे शूद्र आहो, वृत्तीनें वाणी आहों, व आपल्या पूर्वजांनीं रामदेवराव जाधवाच्या आमदानींत लढायांत भाग घेतला होता, असें जें स्वतः तुकाराम व त्याचा कुळकट म्हणतो त्याची आणि वरील विधानाची एकवाक्यता येणे-प्रमाणें इतिहासप्रसिद्ध आहे. शहाजीकालीं सैन्यांतून सामान्य शिपायांचा जो हजारोंनी भरणा होत असे तो ह्या सुप्रज व बहुप्रज कुणबी ऊर्फ कुल-पती यांच्यांतून होई. ह्या सामान्य शिपायांना मुत्सद्देगिरी, राजकारण इत्यादि बडा व्यवहार करण्याची ऐपत नसे; परंतु मोसमांत शेतकाम करून, बाकीच्या काळांत शिपाईगिरीवर पोट चालविण्याची धमक ह्या कुणबी लोकांत उद्भवली होती; जो जास्त पोटगी देईल त्याची शिपाईगिरी करण्यास व त्याचा पाईक होण्यास हा वर्ग उत्सुक असे; मग तो धनी हिंदु असो कीं यवन असो, जुना असो कीं नवा असो, देव फोडणारा असो की जोडणारा असो; शिपाईगिरीची धामधुम करून लढाऊ राज्ययंत्राचा अंश होणारा असा हा कुणबी वर्ग त्या कालीं महाराष्ट्रांत होता. कशाकरितां लढावयाचें–व कदा-चित् लढून मरावयाचें–तर केवळ पोटाकरितां, अशांतला हा वर्ग होता. ह्या वर्गाच्या वरचा वर्ण म्हणजे क्षत्रिय जे मराठे त्यांचा; मराठ्यांत दोन धंदे करणारे लोक होते. देशमुख्या, पाटिलक्या, चौगुलक्या, मोकदम्या, पट-वाऱ्या, मोकाश्या, वगैरे करणारा वृत्तिवंत मराठ्यांचा पहिला वर्ग, आणि केवळ शेतकीवर निर्वाह करणाऱ्या गरीब मराठ्यांचा दुसरा वर्ग; हा दुसरा वर्ग आप-णाला मराठा कुणबी म्हणून म्हणवी. शूद्र कुणबी निराळा आणि मराठा कुणबी

निराळा. शूद्र कुणबी फावल्या वेळांत सामान्य पाइकी करी आणि मराठा कुणबी पाटील देशमूख इत्यादि लोक हवालदारापासून सरलष्करपर्यंतच्या लहानमोठ्या हुद्देदाऱ्या करी. शूद्रांप्रमाणेंच ह्यांनाही मुसलमान किंवा हिंदु असा वाटेल तो धनी चाले. एक भाऊ पातशाही नौकर व एक भाऊ शिवशाहीही नौकर असलीं उदाहरणें महाराष्ट्राच्या इतिहासांत शेंकडो आहेत. तात्पर्य शूद्राप्रमाणेंच ह्या मराठे लोकांतहि स्वराज्य व स्वराष्ट्र यांचा निःसीम अभिमान बाळगणारे लोक शहाजीकालीं फार विरळा असत. तात्पर्य एतत्कालीन मराठे केवळ आयुधोप जीवीगण बनले होते, व स्वराष्ट्रसंरक्षक क्षत्रियत्वाचें वारें त्यांच्यांतून लुप्त झालें होतें. क्षत्रिय जे मराठे त्यांच्याप्रमाणेंच ब्राह्मणांचीहि दशा होती. मुसलमान किंवा हिंदु अशा वाटेल त्या धन्याची सेवा करण्यांत हे सारखेच राजी असत. मराठे व ब्राह्मण यांना यवनाची सेवा मनापासून आवडत असे, असा मात्र ह्या राजीपणाचा अर्थ केल्यास ती चूक होईल. अनन्यगतिक म्हणून हे लोक यवनसेवा पतकरीत. स्वतंत्र हिंदु राज्य स्थापण्याची शक्यता नसल्यामुळें विजयनगरच्या राजघराण्याचा अस्त झाल्यावर, यवनसेवा केल्यावांचून ह्या लोकांना गत्यंतर राहिलें नव्हतें. स्वतंत्र हिंदु राज्य स्थापण्याची शक्यता ह्या मराठा किंवा ब्राह्मण लोकांत नसण्याचें कारण असें होतें कीं मराठा क्षत्रीय व ब्राह्मण यांची लोकसंख्या शूद्र कुणब्यांच्या लोकसंख्येहून फारच फार कमी होती. सामान्यतः हजार पांचशें वस्तीच्या गांवांत एखाद दुसरें ब्राह्मणाचें घर व एखाद दुसरें पाटलाचें घर असे. म्हणजे दहा पांच ब्राह्मणांचीं व दहा पांच मराठ्यांचीं माणसें असत. कित्येक दहा दहा पांच पांच गांवांचे गट असे असत कीं त्या साऱ्यांत मिळून एखादें ब्राह्मणाचें व दोन अडीच पाटलांचीं घरें असत. मिळून सर्व राष्ट्रांत एका ब्राह्मणास दोन मराठे व पंचवीस कुणबी असें सरासरी प्रमाण पडे; ब्राह्मणांत किंवा क्षत्रियांत जो स्वराज्यविषयक किंवा स्वधर्मविषयक ईर्ष्या, आकांक्षा व अभिमान संभाव्य असे तो शूद्रांत अद्याप जागृतहि झाला नव्हता. निरवासितत्वांतून अनिरवसितत्वांत येऊन म्हणजे अस्पृश्यत्वांतून स्पृश्यत्वांत येऊन व वनचरत्वांतून ग्रामचरत्वांत नांदून पोटाकरितां कोणाची पाइकी करण्याइतकी महत्त्वाकांक्षा शूद्रांत उद्भवली होती. हिंदुत्वा-

करितां, स्वधर्माकरितां, स्वराज्याकरितां हिंदुपक्षाच्या वतीनेंच तेवढा लढेन असें स्पृहणीय पक्षपातित्व शूद्र वर्गांत अद्याप जन्मले नव्हतें. त्यामुळें स्वतंत्र राज्याच्या उभारणीला मनुष्यबलाचा जो आत्मयज्ञपूर्वक निःस्वार्थी पाठिंबा लागतो तो ब्राह्मणक्षत्रियांना नव्हता. ब्राह्मणक्षत्रियांना शूद्रांचें निःस्वार्थी मनुष्यबल नव्हतें, इतकेंच नव्हे तर स्वार्थी किंवा द्रव्यार्थी मनुष्यबलहि पैदा करण्याचें सामर्थ्य तत्कालीन ब्राह्मणक्षत्रियापाशीं नव्हतें. ब्राह्मण तर बोलून चालून जातीचाच दरिद्री; तो द्रव्य देऊन मनुष्यबल कसचा पैदा करणार ? मराठ्यांचीहि मुसलमानी अमलाच्या प्रथम प्रहरांत तीच दुर्दशा होती. दहा पांच हजार पाईक पोशील, किंवा चार पांच हजार बारगीर बाळगील अशा तोलाचा मराठा क्षत्रिय शक तेराशेंपासून शक पंधराशेंपर्यंत एकही नव्हता; म्हणजे ब्राह्मण क्षत्रियापाशीं त्या काळीं मनुष्यबलहि नव्हतें, व द्रव्यबलहि नव्हतें. राहिलें ज्ञानबल. तें त्या काळीं निवृत्तीच्या पाठीमागें लागलें होतें. निवृत्तीच्या नदीवर गोव्याघ्र व हिंदुमुसलमान यांना सारखीच तृषा भागवितां येत असे; तात्पर्य स्वार्थी किंवा निःस्वार्थी मनुष्यबल, द्रव्यबल व ज्ञानबल या तिन्ही बलांचा अभाव ब्राह्मणक्षत्रियांच्या ठायीं त्या काळीं उत्कटत्वानें जाणवत असून, ते स्वतःच करूं नये ती यवनाची सेवा पोटाची खांच भरण्याकरितां पतकरीत असत. असल्या हतभाग्यांना कोठला स्वधर्म, व कोठलें स्वराज्य ! इतकीं तीनशें वर्षें ते जिवंत राहिले हेंच नशीब ! ”

“तत्कालीन हिंदूंची व रानटी अनार्यांची परीक्षा झाल्यावर, आतां मुसलमानांची परिक्षा करूं. त्या काळीं महाराष्ट्रांत तीन प्रकारचे मुसलमान असत. इराण, तुराण, अरबस्तान व अफगाणिस्तान यांतून येणाऱ्या मुसलमानांना अस्सल समजत; हा मुसलमानांचा पहिला वर्ग; ह्या अस्सलापासून शूद्रातिशूद्र स्त्रियांच्या ठायीं झालेल्या लेकवळ्या मुसलमानांचा दुसरा वर्ग; आणि येथीलच खाटीक, हलालखोर, तांबोळी, पटवेगार, मोमीन, रंगरेज, लोहार, बोहरी, इत्यादि बाटलेल्या जातींचा तिसरा वर्ग; वतनें राखण्याकरितां कित्येक ब्राम्हण व मराठे जे बाटले तेहि या तिसऱ्या वर्गांतच पडतात; पैकीं या तिसऱ्या वर्गांतील लोकांचा पेशा उदम्यापैकीं असल्यामुळें राजकीय विचारांत त्यांची गणती करण्याची जरूर नाहीं. मुसलमानी रिवाजांत मूळच्या जाती

नाहींत; तेव्हां येथील आर्यानार्य स्त्रियांच्या पोटून त्यांना जी संतती झाली ती ते लेकवळे, किंवा युरोपियन मानतात त्या प्रमाणें हाफक्यास्ट मानीत नाहींत; फुलक्यास्टच मानतात. लेगवळा हा शब्द येथें मिश्रविवाहोत्पन्न संतती एवढ्याच दृष्टीनें योजिला आहे. हे लोक येथें स्थाइक होऊन कित्येक पिढ्या झालेल्या होत्या, व त्यांना दक्षिणी किंवा दख्खनी असें नामाभिधान पडलें होतें. इराण, तुराण, अरबस्तान, इकडून जे नवीन मुसलमान येत त्यांना परदेशी ही संज्ञा असे. ह्या दक्षिणी व परदेशी मुसलमानांतून निजामशाही व अदिलशाही राज्यांत मुत्सद्दि व लष्करी अंमलदार मिळत; आणि त्यांच्याच कर्तबगारीवर राज्याची स्थिरस्थावरता अवलंबून असे. निजामशाही व आदिलशाही रियासतीच्या प्रारंभीच्या पन्नास शंभर वर्षांत दक्षिणी परदेशी असा भेद मुसलमानांत उद्भवला नव्हता; सर्वच मुसलमान परदेशी होते; पुढें जीं घराणीं ह्या देशांत पिढ्यान पिढ्या कायम होऊन राहिलीं, त्यांना दख्खनी किंवा दक्षिणी अशी संज्ञा पडली; ह्या दक्षिणी मुसलमानांचे येथें कायमचे हितसंबंध निर्माण झाले, आणि त्यांच्या हितसंबंधाची व पातशाही हितसंबंधाची तेढ पडूं लागली; या तेढीला तोड म्हणून पातशाहा परदेशी नवीन मुसलमानांना आपल्या दरबारीं सदा बोलावीत; कारण नवीन परदेश्यांत हितसंबंध उत्पन्न झाले नसल्यामुळें पातशाही हितसंबंधांशीं परदेशी कायमचे दक्षिणी बनत तोंपर्यंत कांहीं काल त्यांच्यात तेढीही हीं उद्भवत नसत. दक्षिणी व परदेशी असे हे दोन पक्ष एकमेकांविरुद्ध चालवून शाहा आपल्या हाताखालील अंमलदारांना दाबांत ठेवण्याचा प्रयत्न करीत. मनुष्यांना वागविण्याची नाजुक करामत ज्या सुलतानाला साधे त्याच्या हातीं हा प्रयत्न फलप्रद होई; परंतु एखादा सुलतान कमअक्कल किंवा दुर्बल किंवा पोरसवदा निपजला म्हणजे हे दोन्ही पक्ष उरमट होऊन सुलतानाच्या कह्यांत न वागतां त्याच्यावरच कुरघोडी करीत. अशा कालीं एकच तोड शिल्लक राही; ती ही कीं नवीन तिसरा एक पक्ष उभा करून, पूर्वीच्या दोन पक्षांना दाबांत ठेवावयाचें. शहाजी जेव्हां वडिलाच्या जहागिरीचा मालक होऊन निजामशाही दरबारांत शक १५४३ त वावरूं लागला त्यावेळीं त्या दरबारांत हें दक्षिणी व परदेशी बंड ऐन

रंगांत येऊन अगदीं पिकून गेलें होतें. त्यावेळीं निजामशाही तख्तावर मूर्तिजा, मूर्तजा, किंवा मुर्तुजा, हा नरम, चैनी, ऐदी, व नाकर्ता सुलतान होता. मीर राजूचा सासुरवास दुःसह झाला म्हणजे मलिकंबरची कांस धरावी, आणि मलिकंबरचा जाच असह्य झाला म्हणजे राजूची पायधरणी करावी, अशीं कांहीं वर्षें मूर्तिजानें काढल्यावर, त्यानें दक्षिणी व परदेशी यांच्या पीडेपासून मुक्त होण्याकरितां, तिसरा एक पक्ष निर्माण केला; तो पक्ष म्हणजे मराठ्यांचा पक्ष; अवश्यास व परिज्यास असतांना मूर्तिजानें मालोजी भोंसले यांस जवळ केलें होतें. मालोजीचा मुलगा शहाजी याचें लग्न जाधवरावाच्या मुलीशीं जुळवून देण्यांत मूर्तिजाचें बरेंच अंग होतें;ह्या कृत्यानें मालोजी उपकार बद्ध झाला;व जाधवरावाच्या बरोबरीचा तोलदार सरदारहि बनला आणि अशा तऱ्हेनें तिसरा पक्ष उभारण्याच्या लायकीचा ठरला. परंतु ह्या तृतीय पक्षाचें पुढारीपण गाजवीत असतां मालोजी शक १५४१ त वारल्यावर पक्षाध्यक्षत्व शिताफीनें गाजविण्यास नाना प्रकारांनीं लायक असा आणिक एक पुरुष मूर्तिजाला लाभला. तो कर्ता पुरुष म्हणजे तरुण, महत्त्वाकांक्षी व कर्तबगार शहाजी भोंसला हा होय. शहाजी राजाचें जें गुणवर्णन जयराम कवीनें केलें आहे त्याचा अनुमाद शिव-दिग्विजय व शिव-प्रताप ह्या दोन्हीं बखरींत सांपडतो. शूर, गुणज्ञ, परेंगितज्ञ, जातीनें मर्द, युद्धव्यूहकुशल, शहाची मर्जी सांभाळून वागणारा, परंतु स्वतःचा कुर्रा जाऊं न देणारा, असा गुणगणमंडित जो शहाजी भोंसला, त्याच्या द्वारा राज्यांत मराठ्यांचा तिसरा पक्ष उभारून दक्षिणी व परदेशी पक्षांना जरबेंत ठेवण्याची व्यवस्था मूर्तिजानें केली. दरबारीं, एकान्तांत व लोकांतांत जाण्यायेण्याची शहाजीला सदर परवानगी असे; शहाच्या मर्जीचें एक मासलेवाईक उदाहरण बखरकार देतो. शक १५४५ त शहाजीला संभाजी हा प्रथम पुत्र झाला, तेव्हां शाहानें स्वतः मोठा समारंभ करून शहाजीस वस्त्रें, भूषणें, अलंकार, परगणे व किल्ला बक्षीस दिला ( शिवाजीप्रताप ). शहाच्या मर्जीचें दुसरें उदाहरण बखरकार देतो तेंहि असेंच मासलेवाईक आहे. मूर्तिजाचा जेव्हां अंत झाला तेव्हां त्यानें दक्षिणी व परदेशी मुसलमानांवर विश्वास न ठेवितां मराठा जो शहाजी राजा त्याच्यावर आपल्या बायकापोरांना सांभाळण्याचें काम

निरोपानें सोंपविलें. मूर्तिजाच्या अंतकाळीं शहाजी निजामशाहींत नव्हता, ही बाब लक्षांत घेतली म्हणजे शहाजीनें शाहाचा केवढा विश्वास संपादिला होता, ह्या विधानाच्या सिध्यर्थ ह्याहून जास्त पुरावा देण्याची जरुरी नाहीं."

"राजकीय दृष्ट्या देशांतील लोकस्थिति व दरबारांतील पक्षस्थिति वर्णिल्यानंतर रियासतीच्या भोंवतालील राजकीय परिस्थिति सांगणें सोईस्कर होतें. शहाजीच्या उमेदवारीच्या काळीं, निजामशाहीच्या शेजाराला एकंदर चार शाह्या होत्या; उत्तरेस दिल्लीची प्रचंड व विस्तीर्ण मोंगलाई, व दक्षिणेस विजापूरची आदिलशाही, बेदरची बेरीदशाही व गोवळकोंडयाची कुतुबशाही. पैकीं बेदरची बेरीदशाही मरणोन्मुख झाली असून कुतुबशाहीहून आदिलशाही व आदिलशाहीहून मोंगलाई एकाहून एक बलिष्ठ होत्या. सर्वांत मोंगलाई अत्यंत बलिष्ट असून, तिचा रोख दक्षिणेंतील साऱ्या शाह्या खाऊन टाकण्याचा स्पष्ट व सर्वजनदृढ होता. दिल्लीच्या मोंगलांनीं निजामशाहीचे मोठमोठे लचके तोडिले असून राजू, मलिकंबर व मालोजी यांच्या कर्तबगारीनें ती शाही कांहीं काळ जिवंत राहिली होती; आणि निजामशाही वारली तर बाकीच्या शाह्या निजामशाहीचें अनुकरण करितील असा रंग दिसत होता. तत्रापि निजामशाही व आदिलशाही यांच्या आपसांत लढाया चालूच होत्या. भोंवतालची राजकीय परिस्थिति ही असल्या प्रकारची होती.

"खुद्द निजामशाहींतील अंतस्थ राजकीय स्थिती पाहिली तर तीही वाखाणण्यासारखी नव्हती. मुख्य शहा जो मूर्तिजा उर्फ बुऱ्हाणशहा तो दुर्बल असून मोंगलांनीं दिलेल्या पंचवीस वर्षांच्या मारानें त्याची व त्याच्या बरोबर रियासतीची इज्जत उतरून गेलेली होती. मूर्तिजाच्या पहिल्या अमदानींत राजू व अंबर ह्या दोघां दक्षिणी व परदेशीं पुढाऱ्यांनीं राज्याचा पूर्व व पश्चिम भाग अनुक्रमें वांटून घेतला होता; व मूर्तिजाला आवश्याच्या किल्ल्याभोंवतील कांहीं खेडीं निर्वाहार्थ लावून दिलीं होतीं ! मूर्तिजाच्या उत्तर आमदानींत मलिकनें राजूला जमिनदोस्त करून सर्व सत्ता आपल्या एकाट्याच्या हातांत एकवटविली होती; व शहाला तो कस्पटासमान लेखीत होता. शेवटीं राजूचा घरचा कांटा काढून टाकिल्यावर मोंगलाशीं, व आदिलशहाशीं झगडण्यांत अंबर गुंतला होता. अशा आणीबाणीच्या वेळीं शहाजी

राजा भोंसला तत्कालीन राजकीय आखाड्यांत उमेदीनें व ताज्या दमानें अवतीर्ण झाला. शहाजी आपला वाली होईल, व म्हाताऱ्या अंबराच्या प्राण घेणाऱ्या मगरमिठींतून आपणांस सोडवील अशा आशेनें मूर्तिजाचें होतें तेवढें सर्व वजन शहाजीच्या पाठीला होतें. त्या वजनाचा पूर्ण उपयोग करून घेऊन, निजामशाहीची पडती इमारत शहाजीनें कांहीं काळ सांवरून धरिली; आणि इतकेंही करून ती कायमची मोडल्यावर, स्वतःचें सामर्थ्य वाढवून आदिलशाही व मोंगलाई यांचीं हाडें खिळखिळीं करण्याचा मार्ग आपला प्रतापी मुलगा जो शिवाजी, त्याला मोकळा करून दिला." निजामशाही राज्याच्या व निजामशहाच्या पडत्या काळांतील स्थितीचें स्वरूप थोडक्यांत वर लिहिल्याप्रमाणें आहे.

या काळापूर्वीं अजमासें पंचवीस वर्षांपासून निजामशाही राज्याची राजकीय स्थिती जी अतिशय अस्थीर व धोक्याची होत गेलेली होती ती, यादी काळांत तशीच कायम होती; आणि बहादूर निजामशहा याची अकबरानें ग्वाल्हेर येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत रवानगी केल्यानंतर, मिआन राजू व तो फुटून मोंगलास मिळाल्यानंतर मलिकंबर व शहाजी हे उभयतां निजामशाई जगविण्याकरितां अश्रांत परिश्रम घेत होते; मलिकंबरनें मोंगलांच्या ताब्यांत गेलेला निजामशाही प्रदेश पुन्हां आपल्या ताब्यांत मिळविण्याचा प्रयत्न आरंभिला; विजापूरकर इब्राहीम आदिलशहाचें मन वळवून त्यास आपल्या पक्षांत मिळवून घेतलें; आणि त्याची मदत मिळवून व शहाजी व लुकजी जाधवराव यांना बरोबर घेऊन मलिकंबरनें मोठ्या धडाडीनें मोंगलाई सुभेदाराचें मुख्य ठाणें जें बऱ्हाणपूर, त्या शहरास वेढा दिला; त्या वेळीं तेथील मोंगली सैन्यानें आपली शिकस्त केली, परंतु एकवटलेल्या शत्रुसैन्यापुढें त्याचा निभाव लागला नाहीं; व अखेरीस मलिकंबरनें मोंगलांच्या ताब्यांत गेलेला निजामशाही प्रदेश पुन्हां परत मिळविला; या युद्धांत शहाजीनें अतिशय पराक्रम गाजविला, व त्यामुळें, मालोजीच्या मृत्यूनंतर शहाजी जहागिरीचा मालक झाला न झाला तोंच त्याचें शौर्य, पराक्रम व कर्तृत्व हीं मलिकंबर, मोंगल व आदिलशहा यांच्या नजरेस येऊन त्याचा लौकिकही पुष्कळच प्रमाणांत वृद्धिंगत झाला.

तथापि निजामशाही राज्याचा हा पुन्हां परत मिळविलेला घांस सहज घशाखालीं उतरवून पचवून टाकणें मलिकंबर यांस शक्य नव्हतें; बलिष्ठाच्या पंजाखालीं गेलेला प्रदेश परत हिसकून ताब्यांत मिळवितां आला तरी तो कितपत आपल्या ताब्यांत ठेवितां येईल याचा संशयच होता; आणि बलिष्ठाच्या केलेल्या आगळिकीचे परिणाम निसंशय भोगावे लागणार, हेंही मलिकंबर हा पूर्णपणें जाणून होता. मोंगल बादशहा जहांगीर याला मलिकंबर यानें केलेलीं ही आगळीक समजल्याबरोबर तो अतीशय संतापला; आणि त्यानें आपला कर्तृत्ववान व पराक्रमी मुलगा जो शहाजहान, त्याला तावडतोब दक्षिणेंत पाठवून निजामशाहीचा नकशा उतरण्याचा, व मलिकंबरला नामशेष करून त्यानें ताब्यांत घेतलेला प्रदेश पुन्हां हस्तगत करून घेण्याचा हुकूम दिला; त्याप्रमाणें शहाजहान हा तावडतोब दक्षिणेंत येऊन धडकला, आणि निजामशाही नामशेष करण्याच्या उद्योगास त्यानें निरनिराळ्या प्रकारें मोठ्या उत्साहानें व नेटानें प्रारंभ केला.

मध्यंतरीं मलिकंबर यानें मोंगलांच्या तांब्यांतून निजामशाही प्रदेश हस्तगत करून घेतल्यानंतर, आदिलशाही प्रदेशास उपद्रव देण्याचा व आदिलशाहीस तंबी देण्याचा उपक्रम आरंभिला होता; त्यामुळें स्वाभाविक रीत्याच अदिलशहा व मलिकंबर यांची जूट फुटलेली होती, ही गोष्ट शहाजहानच्या चांगलीच पथ्यावर पडली; व त्यानें इब्राहीम अदिलशहास आपल्या पक्षांत लागलीच मिळवून घेतलें; व निजामशाही राज्यांतील फुटतील तितके सरदार, दरकदार, व मनसबदार फोडून आपल्या पक्षास मिळवून घेऊन आपला पक्ष प्रबळ, व निजामशाहीचा दुर्बळ, करण्याचा शहाजहान यानें सारखा प्रयत्न सुरू केला; व लुकजी जाधवरावांसही त्यानें या जुटींतून फोडिलें; म्हणजे निजामशाहीच्या जुटीच्या बळांतील साह्यकारी सत्ताधारी इब्राहीम अदिलशहा व निजामशाहींतील पराक्रमी सरदार व मदतगार लुकजी जाधवराव हे उभयतां या जुटींतून शहाजहान यानें फोडिलें, व त्यांच्या मदतीनें मलिकंबर व शहाजी या उभयतांना नामशेष करून निजामशाही पालथी घालण्याचा त्यानें घाट घडविला.

लुकजी जाधवराव हा निजामशाहींत एक महत्त्वाचा मनसबदार होता; सरदार होता; तो मोठा शूर होता; कर्तबगार, करारी व करामती मर्द गडी

होता; कसलेला योद्धा होता; रणविद्याविशारद सेनानायक होता; मोठा करारी, निश्चयी व बाणेदार वीर पुरुष होता; सतराव्या शतकाच्या प्रारंभी भोंसल्यांचें घराणें उदयास येण्यापूर्वीच फलटणचे निंबाळकर, मलवडीकर, घाटगे, मोरे, शिर्के, महाडिक, गुजर, मोहिते वगैरे मराठा सरदार घराणीं प्रसिद्धीस पावलेलीं होतीं, आणि त्या सर्वांत शिंदखेडकर जाधवांचें महत्त्व तर परमावधीसच गेलेलें होतें. ज्या वेळीं निजामशाहीच्या इतिहासांत मलिकंबर, मालोजी व शहाजी हीं नांवेंही प्रसिद्धीस पावलेलीं नव्हतीं, त्या काळांत लुकजी जाधवराव हाच निजामशाही राज्याचा एक प्रमुख आधारस्तंभ होता; मोंगल बादशहा अकबर याचा मुलगा शहाजादा मुराद यानें अहमदनगर शहरास वेढा दिला, त्यावेळीं ( इ० सन १५९४ मध्यें ) प्रसिद्ध चांदबिबी हिनें जो अलौकिक पराक्रम गाजविला, व पुढें निजामशाही जगविण्याकरितां तिनें जे अविश्रांत परिश्रम घेतले, त्यांत जाधवरावानें प्रमुखत्वानें भाग घेतलेला होता; आणि मोंगलांच्या दुसऱ्या हल्ल्यांत, चांदबिबीचा खून झाल्यानंतर, व अहमदनगरचा किल्ला मोंगलांच्या हातीं गेल्यानंतर (इ० सन १६००) लुकजी जाधवरावानें दुसरें सरदार जमा करून, अज्ञान राजास पळवून दुसरीकडे नेऊन निजामशाहीचें आयुष्य कांहीं काळ लांबविलें होतें; तो निजामशाहींतील दहा हजारांचा एक मोठाच बलाढ्य मनसबदार होता; त्यानें आपल्या बाहुबलानें निजामशाही राज्य कांहीं काळ जगवीत ठेविलें होतें; निजामशाहीची किसमत कांहीं काळ लुकजीच्या किसमतींत मिसळलेली होती; " आपण म्हणूं ती पूर्व दिशा " असा एके काळीं निजामशाहींत त्याच्या शद्बाचा जोर होता; जोंपर्यंत लुकजीच्या नशिबाचे तारे त्याला अनुकूल राहून शुक्राच्या ताऱ्याप्रमाणें निर्वेधपणें चमकत होते,—जोंपर्यंत जाधवरावाच्या नशिबांचे फांसे, तो मागेल, त्या वेळीं म्हणेल त्या ठिकाणीं, व फेंकील त्या जागीं त्याला पाहिजे तें, आणि तो इच्छील तेंच अगदीं तंतोतंत दान त्याच्याकरितां सारखे फेंकीत होते, तोंपर्यंत निजामशाहीच्या राजकीय रंगपटावरील प्रत्येक डाव तो सारखा जिंकीत राहिला होता; परंतु फिरत्या कालचक्राबरोबर त्याच्या नशिबाचे फांसे फिरलें; आणि त्याचें व मलिकंबराचें सख्यत्व नाहींसें होऊन त्याच्या वर्चस्वास साफ ओहोटी लागली ! शहाजी व जिजाबाई यांचा विवाह-

संबंध सक्तीच्या खुषीनेंच घडून आलेला असल्यामुळें शहाजीविषयीं त्याचें मन शुद्ध नव्हतें; आणि इष्टी निश्चयाला यश आल्यामुळेंच जांवई बनलेल्या शहाजीस तो नेहमींच पाण्यांत पहात असे; शहाजी अतिशय धोरणी व त्याचा दिवसेंदिवस होत चाललेला उत्कर्ष, आणि जाधवराव तितकाच अदूरदर्शी आणि त्याचें उत्तरोत्तर कमी होत चाललेलें महत्त्व, यामुळें जाधवरावाच्या मनांतील शहाजीविषयींच्या द्वेषांत भर पडलेली होती; आणि याच वेळीं मोंगलांनीं लाचाची लालूच दाखविल्यामुळे तो निजामशाही पक्ष सोडून मोंगलास जाऊन मिळाला होता. जाधवरावास मोंगलाकडून चोवीस हजार पायदळ व पंधरा हजार स्वारांची मनसबदारी मिळाली. ( इ० सन १६२१ ) आणि त्याच्या नातलगासही बादशहानें मोठमोठ्या मनसबी दिल्या; तथापि जाधवरावाच्या ह्या वागणुकीमुळें निजामशाही दरबार त्याच्या पूर्णपणें विरुद्ध झाला; शहाजीस अतिशय राग आला, आणि उभयतांमध्यें चांगलेंच वैमनस्य आलें.

तथापि जाधवराव हा, मोंगलांनीं लालूच दाखविल्यामुळेंच नव्हे, तर शहाजीचें निजामशाहींत परमावधीस पोहोंलेलें महत्त्व त्यास सहन न झाल्यामुळें, आणि शहाजीविषयीं त्याच्या हाडीं मासीं खिळत असलेल्या द्वेषामुळें तो निजामशाही पक्ष सोडून मोंगलास जाऊन मिळाला असेंच म्हणावें लागतें. मलिकंबर जिवंत असतांनाच शहाजीचें महत्त्व परमावधीस गेलें होतें. दुसरा मूर्तुजा निजामशहा मृत्यू पावला, त्यावेळीं त्याचे दोन्ही मुलगे अगदींच अज्ञान, म्हणजे सात सात वर्षांचे होते. परंतु या मुलांची आई मोठी हुषार व कर्तृत्ववान होती. या वेळीं अनंत साबाजी या नांवाचा एक मोठा हुषार, मुत्सद्दी व राजकारणनिपुण पुरुष निजामशाहींत होता; त्याच्या सल्ल्यानें राजमातेनें शहाजीस निजामशाही राज्याचा सर्व अधिकार सोंपाविला. त्यामुळें शहाजी हा बालराजा मूर्तुजा निजामशहा ( तिसरा ) यांस आपल्या मांडीवर घेऊन दरबारांत तख्तावर बसत असे. व सर्व सरदारांना-आणि जाधवराव हाही एक सरदार असल्यामुळें त्यालाही-दरबारांत आल्यावर तख्तापुढें कुरनिसात करावी लागत असे. परंतु जाधवरावास त्याबद्दल अतिशय वाईट वाटत असे आपल्या देवडीवर असलेल्या मालोजीचा मुलगा—

आपल्या इच्छेविरुद्ध आपला झालेला जांवई–शहाजी याच्यापुढें, अशा रीतीनें मान वांकविणें त्याला अत्यंत अपमानास्पद वाटूं लागलें; त्यामुळें शहाजीविषयीं त्याचा द्वेष दुणावला; निजामशाही राज्याविषयींचें त्याचें प्रेम नष्ट झालें, तो– आपल्या कित्येक नातलग व इतर मराठे सरदारांसह– मोंगलांना जाऊन मिळाला, व त्यानें निजामशाही नष्ट करण्याच्या मोंगलांच्या प्रयत्नांत त्यांना मदत केली, असेंच निदर्शनास येतें. *

* "शके १५४७ क्रोधी नाम संवतसरे फसलीसन १०३५ या सालीं निजाम मूर्तुजा पादशहा हे मृत्यू पावले. त्यांनीं राज्य केलें वर्षे ३२. निजाम मूर्तिजा पादशाहा याचे पुत्र लहान होते. ते समई शहाजी राजे निजाम मूर्तिजा पादशहा याचे पुत्रास आपण त्यास मांडीवर घेऊन तक्तावर बसू लागले. तेव्हां पादशहा जादीची व त्याचे पुत्राची शहाजी राजे याजवर कमाल मेहेरबानी दिवसे दिवस फारच जाहली व पादशाहा जादीचे मर्जीनें फारच वागू लागले व फौजेचे वगैरे काम पाहू लागले. तेव्हां पादशहाजादीचे व त्याचे पुत्राची शहाजी राजे याजवर कमाल मेहेरबानी दिवसेदिवस फारच जहाली व पादशहाजादीचे मर्जीनें फारच वागूं लागले व फौजेचें वगैरे काम पाहूं लागले. तेव्हां पादशहाजादीचे व त्यांचे पुत्राचे हुकुमावरून लुखजी जाधवराव वजीर याजवर हुकमत करू लागले. तेव्हां उभयतांचें वांकडें येऊन दिवसेंदिवस द्वेष वाढू लागला. कांहीं दिवस वजीरीचें काम आपण जातीनें शहाजी राजे करू लागले. ते समई लखूजी जाधव वजीर यांनीं मनांत आणिलें कीं आम्ही पादशहाचे वजीर असता शहाजी राजे पादशहाचे पुत्रास मांडीवर घेऊन तक्तावर बसतात आणि आम्हास पादशहाचे मुलास खुरनुसा करावा लागतो यामुळें आमचा अपमान होतो ही गोष्ट जाधवराव वजीर याणी आपले मनांत आणून हें कांहीं चांगलें झाले नाहीं, म्हणोन इराद्यानें शहाजी राजे याजबरोबर वागू लागले" ( मराठी दफ्तर, रुमाल पहिला; पहा. )

या बाबतींत तंजावरच्या शिलालेखांत ( इतिहास मंजरी; पान १९ पहा ) व राधामाधव विलासचंपू या ग्रंथांत अशी हकीकत दिली आहे कीं शहाज-

अशा रीतीनें अदिलशहा व लुकजी जाधवराव हे आपल्या पक्षांत ओढून घेतल्यावर आतां निजामशाही आपणास सहज पालथी घालतां येईल असें शहाजहान यांस वाटूं लागलें, व तो निजामशाहाची राजधानी जें अहंमद-

---

हान हा निजामशाहीवर स्वारी करून येणार आहे, ही हकीकत मूर्तुजा निजामशहा यांस कळतांच त्याच्याशीं सामना करण्याची तयारी फर्माविण्याच्या इच्छेनें मूर्तिजानें व मलिकंबर यानें रियासतींतील प्रमुख प्रमुख सरदारांस सदरेस बोलावून एक मोठा दरबार भरविला. त्या दरबाराला लुकजी जाधवराव, शहाजी, शरीफजी व विठोजी राजाचे आठही मुलगे, जाधवरावाचा मुलगा दत्ताजी, खंडागळे वगैरे सरदार मंडळी हजर राहिली होती; भोंसले व जाधव मंडळी यांच्यांत कित्येक वर्षांपासून वितुष्ट असून तें जगजाहीर होतें; दरबार खलास झाल्यावर सर्व सरदार मंडळी आपापल्या लवाजम्यानिशीं परत जाऊं लागली; त्या दाटणींत भोंसले पक्षाच्या खंडागळे यांचा हत्ती बेफाम होऊन त्यानें जाधवाकडील कित्येक पाईक चिरडले; तेव्हां लुकजी जाधवरावाचा मुलगा दत्ताजी यानें संतापून तो हत्ती ठार मारला; हें पाहून खंडागळे व जाधव यांच्यांत झटापट सुरू झाली; भोंसल्यांनीं खंडागळ्याची बाजू उचलली; विठोजीचे आठी मुलगे त्याच्या मदतीस धांवून आले; "तुम्हास मध्यें लुडबूड करण्याचें कारण नाहीं," म्हणून दत्ताजी ओरडला, व त्यानें त्वेषानें भोंसल्याकडील पुष्कळ लोकांस जखमी केलें; त्या दंगलींत विठोजीचा वडील मुलगा संभाजी याच्या हातून दत्ताजी जाधवराव ठार झाला ! ही बातमी ऐकून लुकजी जाधवराव तात्काळ त्या ठिकाणीं आला, व त्यानें संभाजी भोंसल्यावर चाल करून त्यास तात्काळ जागच्याजागीं ठार केलें; लुकजी जाधवराव संभाजीवर चाल करून जात आहे, हें पाहिल्याबरोबर जाधवरावाचा जांवई शहाजी हा संभाजीच्या मदतीस धांवला; तेव्हां त्यासही लुकजी जाधवरावानें पट्टयाचा वार करून मूर्च्छित केलें; मूर्तुजा निजामशहा, हा शहाजीवर पुत्राप्रमाणें प्रेम करीत असे; त्याला ही हकीकत समजल्याबरोबर तो तावडतोब त्या ठिकाणीं आला; लुकजी जाधवरावास दोष देऊन व त्यास चार शहाणपणाच्या गोष्टी सांगून ही मारामारी थांबविली; परंतु मूर्तुजाशहानें शहाजीचा

नगर शहर त्यावर चाल करून आला; या जंगी मोंगली फौजेचें आधिपत्य लष्करखान या नांवाच्या सरदाराकडे असून जाधवराव व अदिलशहा या उभयतांचें सैन्य मोंगली सैन्याच्या मदतीस आलेलें होतें; जाधवरावाच्या सैन्यांत स्वतः लुकजी जाधवराव उदाराम ऊर्फ उध्दवराव माहूरचा देशमूख, विश्वनाथ, अचलोजी, बहादूरजी, दादाजी, राघोजी, व जसवंतजी, असे त्याचे सात मुलगे असून शिवाय त्याच्या तैनातींतील जलाखान, खजीरखान, खरमुल्लाखान, सुजाखान, जहानखान, शिकंदरखान, खलेलखान, व हिसामदखान हे सरदार त्याच्या बरोबर होते; व अदिलशाही सैन्यांत रुस्तुमखान, मुस्तफाखान, काहमदखान, दिलावरखान, याकूतखान, अंबारखान, मुशेखान, फरादखान, सर्जाखान, जोहरखान, अंकुशखान, वगैरे सरदार हजर असून घाटगे प्रमृति मराठे सरदार, व धुंडीराज प्रभृति ब्राम्हण सरदार हजर होते; व आदिलशाही सैन्याचें आधिपत्य मुल्ला महमद लारी ऊर्फ मुल्ला बाबा सरलष्कर याच्याकडे होतें. हें जंगी सैन्य अहंमदनगरच्या रोखानें चाल करून येत आहे, असें पाहून मलिकंबरनें या सैन्याशीं युद्ध करण्याची तयारी केली;

---

पक्ष घेतल्यामुळें भोंसल्यांचें व जाधवरावाचें वैर दुणावलें; व शहा व मलिकंबर या उभयतांविषयीं त्याच्या मनांत विकल्प आला; ह्याच सुमारास जिजाबाईस चवथ्यान्दा किंवा पांचव्यांन्दा गर्भार राहून पुत्र झाला; त्याचें नांव, आपल्या द्वंद्व युद्धांत मृत्यु पावलेल्या चुलत भावाच्या स्मरणार्थ, शहाजीनें संभाजी हें ठेविलें; ( शके १५४५ ) बारशाच्या दिवशीं खुद्द मूर्तुजा निजामशहा येऊन मोठ्या समारंभानें ह्या मुलाचा नामकरणविधी झाला; त्यावेळीं शहानें शहाजीस बढतीखातर कांहीं जास्त जहागीरहि दिली; शहानें शहाजीच्या केलेल्या ह्या अहेरानें व आदरानें जाधव व भोंसले यांच्यामधील वैरभाव वृद्धिंगत झाला; ही बातमी आदिलशहास कळल्यावर त्यानें जाधवरावास निजामशाहींतून फोडिलें, व नंतर जाधवराव हा मोंगलास जाऊन मिळाला—म्हणजे ह्या हकीकतीवरून सुद्धां भोंसल्यासंबंधीं—व विशेषतः शहाजीसंबंधीं जाधवरावाच्या हाडींमासीं खेळत असलेल्या द्वेषामुळें व वैरामुळेंच तो मोंगलास जाऊन मिळाला असेंच निदर्शनास येतें.

निजामशाही सैन्याचें आधिपत्य स्वतःकडे घेतलें, आणि शहाजी, शरफोजी, मृत संभाजी वगळून, विठोजीचे खेळोजी, मालोजी, मंबाजी, नागोजी, परसोजी, मकाजी, व त्र्यंबकजी, असे सात पुत्र ही भोंसले मंडळी असून सीहमीरखान, मुधाखान वगैरे हबशी सरदार व सारतखान, याकूतखान, पनसूरखान, सुरुपखान, जोहारखान, फत्तेखान, व अहमदखान, हे तुर्क सरदार, कर्नाटकांतील बल्लाळ राजा व बेरडांचा नाईक सिंहराज हे सरदार, व ह्याखेरीज विठोजी, नागोजी, दत्ताजी, नरसिंहराजे, जगदेवराजाचे पुत्र सुंदरराजे वगैरे मराठे सरदार यांच्यासह मोंगली सैन्याशीं युद्ध करण्यास तो पुढें सवसावला; नंतर या परस्पर सैन्यांचा मुकाबला भातवडी* या गांवाच्या रानांत होऊन मोठाच घनघोर युद्धसंग्राम झाला; व त्यांत अदिलशाही व मोंगलाई सैन्यांचा पूर्ण पराभव होऊन निजामशाही सैन्यानें त्यांची दाणादाण उडवून दिली; ( इ. स. १६२४ ) या युद्धांत युद्धोपयोगी जंगी सामान सरंजामासह मोंगलांचे चाळीस हजार सैन्य, व आदिलशहाचें चाळीस हजार मदती सैन्य मिळून मोंगलांतर्फें ऐंशीं हजार सैन्य समरभूमीवर आलेलें असून मलिकंबरबरोबर शत्रुपक्षाच्या निम्मे म्हणजे फक्त चाळीस हजारच सैन्य होतें; तरीसुद्धां या युद्धांत निजामशाही सैन्य विजयी झालें; शत्रुसैन्याचा पूर्ण धुव्वा उडाला; या युद्धांत शहाजीनें आपलें अद्वितीय शौर्य व्यक्त केलें. या युद्धांत शहाजीनें शेंकडों आदिलशाही व मोंगली सरदार, अमीरउमराव व इतर लोक पाडाव करून धरून आणिले;+ व बाकी अवशेष राहिलेल्या सैन्यावर

---

* भातवडी हें गांव अहंमदनगरपासून अजमासें दहा मैलांवर मेहकरी नदीच्या कांठीं आहे; व याच गांवीं हल्लीं ती नदी बंधारा घालून अडवून, तेथें तलाव करून त्याचें पाणी पाटानें आसपासच्या शेतांस देण्यांत येत आहे.

+ या पाडाव झालेल्या मंडळींतच प्रसिद्ध आदिलशाही सरदार रणदुल्लाखान हा असून तो या वेळीं निजामशहाच्या नोकरींत राहिला; व याच वेळीं त्याचा व शहाजीचा जो स्नेह जडला, तो मरणांत अकृत्रिम कायम राहिला.

या युद्धांत लुकजी जाधवराव, व माहूरचा देशमुख, आणि वाशीमचा राजा उदाराम ऊर्फ उद्धवराव हे उभयतां हजर होते; आणि मलिकंबर यानें मोंगली

तर मोठाच कहर उसळला ! मोंगली व आदिलशाही सैन्यांतील लोकांनीं जिवाच्या भीतीनें समरभूमींतून पळ काढिला, व शहाजीचा धाकटा भाऊ

---

सैन्यावर छापा घातला, त्या वेळीं त्यांच्यावरही मोठेंच प्राणसंकट गुदरलें होतें; परंतु ते मोठ्या लगबगीनें, कसा तरी आपला जीव घेऊन पळाले, म्हणूनच बचावले.

वशीमकर राजे उदाराम, याचें घराणें जाधवरावांच्या खालोखाल महत्वाचें, व इतिहासप्रसिद्ध आहे. या घराण्याची हकीकत थोडक्यांत अशी आहे कीं, (काळे कृत वऱ्हाडाचा इतिहास पहा;) उदाराम घराण्याचा मूळ पुरुष उद्धवराव हा असून त्याच्या वडिलाचें नांव रामाजीपंत होतें; व कागदोंपत्रीं त्याचें नांव " उद्धव रामजी " असें लिहीत असल्यामुळें त्याचा अपभ्रंश होत होत " उदाराम " हा अपभ्रंश झालेला आहे. उद्धवराव हा मूळ वाशीम येथील राहणारा ऋगवेदी देशस्थ ब्राम्हण असून वाशीमजवळील सावरगांव, चिवरें वगैरे गांवांचें कुळकर्णीपणाचें वतन त्याच्याकडे असे. उद्धवराव हा संस्कृत, फारशी, अरबी वगैरे भाषांत निष्णात होता; तथापि घरची अतीशय गरीबी, त्यामुळें तो वाशीम येथून नोकरी शोधण्याकरितां दिल्ली येथें गेला; या वेळी त्याचा मामा दिल्ली येथें, अकबराच्या कारकीर्दींत दिवाणी खात्यांत नोकरीवर होता; त्यामुळें उदाराम दिल्ली येथें गेल्यावर त्याचा लागलीच सरकीरी नौकरींत प्रवेश झाला; त्याची हुषारी व कर्तबगारी अकबराच्या नजरेस आली; आणि त्यानें उदारामाचा दरजा वाढवीत वाढवीत, इ० सन १५९२ मध्यें ( हिजरी सन १००२ ) त्याला पांच हजारांची मनसब दिली.

अनंत कृत भक्त रहस्य, ( अध्याय ९ ) या नांवाच्या हस्तलिखित ग्रंथांत उदाराम याच्या गरीबीचें व भाग्योदयाचें वर्णन केलें आहे; तें असें कीं, " उदाराम हा इतका गरीब होता कीं, तो दररोज तेथील पाटलाच्या घरून ताक मागून आणीत असे; एके दिवशीं पाटलाच्या बायकोनें त्याच्या निरुद्योगीपणाबद्दल त्याची निर्भत्सना करून "ताक नाहीं" असें त्यास खडखडीत-पणें सांगितलें; व त्यानें ताकाकरितां नेलेला तांब्या त्यास फेंकून मारला; त्यामुळें त्यास आपल्या हीन स्थितीबद्दल दुःख व वैताग उत्पन्न होऊन, तो शिरपूर

शरफोजी यानें निजामशाही सैन्यासह त्या पळणाऱ्या सैन्याची लांडगेतोड करण्यास सुरवात केली तेव्हां आदिलशाही सरदार जोहरखान यानें

---

येथें वंजारी कुणबी जातीचा पद्माजी या नांवाचा एक सत्पुरुष होता, त्यास शरण गेला; व त्यास आपली दुःखद कहाणी त्यानें निवेदन केली; त्यावरून त्या साधु पुरुषानें उदाराम यांस आपल्या सान्निध ठेवून घेतलें, व पुढें त्यांस "शहरास" जाऊन रोजगार कर, म्हणजे तुझा भाग्योदय होईल असें सांगितलें (त्या वेळीं त्या भागांत "शहर" हें नांव औरंगाबाद, या शहरास होतें.) त्याप्रमाणें उदाराम हा औरंगाबाद येथें गेला, व एका अमीराच्या दिवाणाच्या घरीं राहून त्याच्या बरोबर तो दिल्ली येथें गेला; त्या ठिकाणीं असतां, एकदां बादशाहानें त्या अमीरास सांगितलेली कांहीं महत्वाची कामगिरी उदाराम यानें बजाविली, व ती गोष्ट त्या अमीरानें अकबर बादशाहास निवेदन केली; त्यावरून बादशाहानें उदाराम यांस आपणासमक्ष बोलावून त्यास उत्तेजन दिलें; व पुढें वाढवीत वाढवीत त्यास माहूरपासून वाशीमपर्यंत बावन्न चावड्यांची देशमुखी, पांच हजारांची मनसब, व नौबत निशाण वगैरेची सनद देऊन, त्याची बादशाहानें दक्षिणेंत रवानगी करून दिली.

लष्करी कामांतही उद्धवरावानें फार बहादुरी दाखविली; शहाजहान याच्या वेळींही उद्धवरावास ( त्यास नंतर " उदाजीराम " असें कागदोंपत्रीं व सर्वत्र नांव पडलें. ) वरील दोन्हीं सरकारांतील देशमुखीवतन व कांहीं जहागिरी मिळाल्या.

उदारामाची मुख्य कमागिरी जहांगीरच्या कारकीर्दींत घडलेली असून फारशी ग्रंथांवरून असें दिसतें कीं, लुकजी जाधवरावाप्रमाणेंच, उदाराम हाही प्रथम निजामशाहींत मलिकंबर याच्या हाताखालीं प्रसिद्धीस आला; व इ० सन १६१७ मध्यें मलिकंबरविरुद्ध राजपुत्र खुर्रम ( भावी शहाजहान ) यानें जें युद्ध चालविलें, त्यांत तो मलिकंबरचा पक्ष सोडून बादशाही पक्षास मिळाला; शहाजहानबरोबर तो दिल्ली येथें गेला; व इतर यशस्वी सरदारांबरोबर त्याचाही जहांगीरनें गौरव करून त्यास अधिकारसंपन्न केलें.

त्यानंतर, भावी काळांत शहाजहान यानें जहांगीरविरुद्ध बंड करून

पळून जाणाऱ्या सैन्यास थोपवून धरून, या पाठलाग करणाऱ्या निजामशाही सैन्याला तोंड दिलें; व एक जोराची चकमक उडून तींत शरफोजी वीर स्वर्ग

---

त्याऱ्याशीं युद्ध केलें; त्यांत लुकजी व उदाराम हे उभयतांही शहाजहानच्या पक्षांत होते. शहाजादा पार्वीझ व मोहबतखान यांनीं शहाजहान याचा पाठलाग केला असतां सर्व मुसलमान सरदार शहाजहान याचा पक्ष सोडून बादशाही पक्षास मिळाले; परंतु लुकजी व उदाराम हे उभयतांही शेवटपर्यंत शहाजहान याच्याच पक्षास चिकटून राहिले; आणि त्यांनीं त्यास आपल्या मुलखांत ठेवून घेऊन, व त्यास सर्व तऱ्हेची मदत देऊन, त्याची पुढें रवानगी करून दिली.

माहूरचा किल्ला उदाराम याच्या ताब्यांत असून तो तेथेंच रहात असे. त्यानें शहाजहान यांस माहूर येथें नेलें; शहाजहान यानें तेथें आपलें जड-जवाहीर, हत्ती, घोडे वगैरे सामान ठेविलें व आपण, आपली बायको मुम्ताज-महाल, व पुत्र दाराशोको, सुजा व औरंगझेब यांसह तेथें कांहीं दिवस राहून ( Beniprasad's Jahangir हें पुस्तक पहा. ) नंतर तैलगणांतून तो बंगाल प्रांतांत गेला.

अशा रीतीनें, शहाजहान यांस लुकजी व उदाराम या उभयतांनीं आश्रय दिल्यामुळें त्यांच्यावर बादशहा जहांगीर याची गैरमर्जी झाली; व पुढें शहा-जहान याचें बंड मोडल्यावर लुकजी व उदाराम यांना अनुक्रमें आपला मुलगा व भाऊ यांना बादशहाजवळ ओलीस ठेवून पुढें नौकरी करावी लागली.

उदाराम हा, दक्षिणेंत मोंगलांतर्फे एक महत्त्वाचा सरदार म्हणून गणला जात असे, व मोठमोठ्या महत्त्वाच्या कामगिरीवर त्याची नेमणूक व रवानगी करण्यांत येत असे. शहाजहानच्या कारकीर्दीत, निजामशाही सैन्याची व मोंगली सैन्याची लढाई सुरू झाली, त्यावेळीं लुकजी जाधवराव व राजे उदाराम हे मोंगलांतर्फे लढत असतां, इ. स. १६२४ मध्यें, भातवडी या गांवाजवळ मलिकंबर यानें मोंगली लष्करावर अचानक छापा घातला; त्यांत लुकजी व उदाराम हे उभयतां बेसावध असल्यामुळें त्यांच्या सैन्याचा अती-शय नाश झाला, इतकेंच नाहीं तर खुद्द उदाराम व लुकजी हे मोठ्या लग-

पावला ! ही हकीकत शहाजीस कळल्याबरोबर त्यानें खेळोजीस बरोबर घेऊन ते उभयतां जोहारखानावर तुटून पडले, व उरल्या सुरल्या मोंगली व आदिलशाही सैन्याचाही त्यांनीं पूर्ण फडशा उडविला.

---

बगीनें घोड्यावर स्वार होऊन कसे तरी आपला जीव घेऊन पळाले, म्हणूनच बचावले.

उद्धवरावाच्या पूर्वी मोंगलांतर्फे हरचंदराय या नांवाचा एक रजपूत सरदार त्या प्रांतावर अंमल करीत होता; परंतु त्याच्या कारकीर्दीत मुलूख ओसाड होऊन तो बंडखोर निघाला, म्हणून त्यास कामावरून काढून टाकून त्या जागीं उदाराम याची बादशहाकडून नेमणूक झाली; परंतु हरचंदराय त्या प्रदेशाचा ताबा सोडीना; त्यामुळें अखेरीस उदाराम यास त्याच्याशीं युद्ध करून, व त्यांत त्याचा पराभव करून त्या प्रदेशाचा ताबा घ्यावा लागला; तरी सुद्धां पुढें कांहीं काळ हरचंदराय व त्याचे साथीदार यांच्या कडून त्या प्रदेशास सारखा उपसर्ग पोहोंचत राहिला होता; उद्धवराव हा चाळीस वर्षें मोठ्या इभ्रतीनें व पराक्रमानें कारभार करून इ. स. १६३२ (हिजरी सन १०४२ ) मध्यें आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षी मृत्यू पावला व त्याचा मुलगा जगजीवनराव हा दौलतीचा अधिकारी झाला; त्यास बाबूराव या नांवाचा एक मुलगा असून प्रसिद्ध "रायबागीण" ही या जगजीवनरावाचीच बायको होय; ही स्त्री मोठी शूर व कर्तृत्ववान होती; जगजीवनराव मृत्यू पावला, (इ. स. १६५८मध्यें) त्या वेळीं बाबूराव लहान होता; ही संधी साधून मोंगलांचा बंडखोर सरदार हरचंदराय यानें पुन्हां उचल खाल्ली; त्यावेळीं जगजीवनरावाची स्त्री व बाबूरावाची आई रायबागीण ही गोषांतील स्त्री असूनही (या उदारामच्या ब्राह्मण घराण्याच्या सर्व शाखांत अद्यापही पडद्याची चाल आहे.) मोठी शूर व कर्तबगार असल्यामुळें, ती या आणिबाणीच्या प्रसंगीं पुढें सरसावली; आपल्या लोकांस " बहिणीची लज्जा राखा " असें उत्तेजन देऊन; व त्याची खूण म्हणून निशाणास चोळी लावून तिनें लष्कर उभें केलें; व हरचंदरायाचा पराभव करून त्यास तिकडून कायमचें हांकलून लाविलें; नंतर ही खबर औरंगझेबास कळल्यावर औरंगझेबास त्याबद्दल विशेष कौतुक वाटलें;

या वेळीं मलिकंबर हा अजमासें ऐशीं वर्षांचा असून त्याच्या वृद्धापकाला-मुळें, जरी तो निजामशाही सैन्याचा मुख्य सेनापति होता तरी, युद्धाची सर्व

---

व त्यानें या बाईचा गौरव करून तिला " पंडिता " व " रायबागीण " ( स्त्रीशार्दूल; तंजावर येथील बृहदीश्वर शिलालेखांत या शूर स्त्रीला " राजव्याघ्री " असें म्हटलेलें आहे. ) असे दोन किताब दिले; शाएस्ते-खानाच्या स्वारीच्या वेळीं, या बाईनें, औरंगझेबाच्या हुकुमानें शिवाजीच्या प्रदेशांत बराच धुमाकूळ उडविला असून, या बाईचें व शिवाजीचें इ. सन १६७० मध्यें उमरखिंडींत युद्ध झालें असल्याबद्दल बखरींत उल्लेख आहे.

या बाईसंबंधीं साग्र हकीकत, व या घराण्याची अधीक माहिती, पुढें शिवाजीच्या हकीकतींत येणार असल्यामुळें त्या संबंधीं या ठिकाणीं अधीक उल्लेख केला नाहीं.

खुलासा—वाशीम हें तालुक्याचें गांव वऱ्हाडांत अकोलें जिल्ह्यांत अकोल्या-पासून सडकेनें अजमासें ५१ मैलावर आहे. उमरखेड हें यवतमाळ जिल्ह्यांत पुसद तालुक्यांत आहे, व जवळच उमरखिंड आहे. जी. आय. पी. रेल्वेच्या नागपूर लाईनीवरील मूर्तिजापूरपासून यवतमाळपर्यंत जो फांटा गेला आहे, त्यावर दारव्हा म्हणून एक स्टेशन आहे; तेथून दिग्रस, पुसद, उमरखेड व माहूर असा रस्ता गेलेला आहे. दारव्हा येथून दिग्रस अजमासें १८, पुढें पुसद १८, पुढें उमरखेड २०, व तेथून निजामच्या हद्दींत २० मैलांच्या आंतच माहूर हें ठिकाण आहे. माहूर हें श्रीगुरुदेवदत्त महाराजांचें निद्रास्थान असून तें एक तीर्थयात्रेचें, महत्वाचें, प्रसिद्ध व साक्षात्कारी देवस्थान आहे. निजामच्या राज्याची हद्द व वऱ्हाडची हद्द यांच्यामध्यें उमरखिंड आहे; उमरखेड येथें प्रसिद्ध गोचर स्वामीचा मठ असून तें व मेहकर हीं पैनगंगानदीच्या कांठीं आहेत; शिंदखेड मेहकर तालुक्यांत असून, वाशीम व मेहकर येथें श्रीबालाजी महाराजांचीं प्रसिद्ध देवालयें आहेत; व हे दोन्हींहि तालुके अनुक्रमें अकोलें व बुलढाणा जिल्ह्यांत असून तें निजामच्या राज्याच्या सरहद्दीवर आहेत; शिरपूर हें अकोलें—वाशीम सडकेवर, अकोल्यापासून अजमासें ४५ मैलांवर व वाशीमपासून ६ मैलांवर असून येथें अंतरिक्ष पार्श्वनाथाची मूर्ति आहे;

# माळोजी राजे भोसले.

- शरीफजी राजे
  - व्यंकोजी राजे
    - संभाजी
    - माणकोजी खानवट वंश.
    - शहाजी बिलवडी ( भीमातीरीं ) वंश
    - शरीफजी
    - तुकोजी दुधवाडा ( नगर जिल्ह्यांत ) वंश
      - सुभानजी
        - व्यंकोजी (नागपुरास आहे.)
    - बाबाजी शिडगांव वंश.
      - राणोजी
        - एसाजी
          - व्यंकोजी
          - भागोजी
          - रामजी
        - बाबाजी

जानराव खंडेराव भवानजी खंडेराव आनंदराव हणमंतराव यशवंतराव

खंडेराव → संताजी

यशवंतराव → जानराव

खंडेराव → माधवराव, चिमणाजी, हरीश्चंद्र

माधवराव → बळवंतराव → माधवराव

चिमणाजी → अंबाजी → व्यंकोजी

माधवराव — यास साताराची राणी सगुणाबाई (छत्रपती शहाजी अप्पासाहेबांचें कुटुंब) हिनें दत्तक घेऊन त्याचें नांव राजाराम ऊर्फ आबासाहेब असें ठेविलें होतें. मृत्यु इ.सन१८६५मध्यें.

व्यंकोजी — यास छत्रपती शहाजी अप्पासाहेबानें दत्तक घेतला होता. यास प्रथम बुचर बेटांत व नंतर नगर येथें कैदेंत ठेविलें होतें. मृत्यू इ०सन १८६४.

व्यवस्था व व्यूहरचनेची सर्व तजवीज त्याला करतां येणें शक्य नव्हतें; म्हणून ही सर्व व्यवस्था त्यानें शहाजींवर सोंपविली होती, आणि शहाजीनेंही ही जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन ती मोठ्या यशस्वीपणानें तडीस गेली होती. या युद्धांत शहाजीनें जो असामान्य पराक्रम गाजविला, व जें असाधारण कर्तृत्व व्यक्त केलें, त्याची बातमी निजामशहाच्या कानीं गेली, आणि या युद्धानंतर मलिकंबर, शहाजी व इतर मंडळी जेव्हां शहाच्या दर्शनास गेली त्यावेळीं, मलिकंबर यांस जरी त्यानें दरबारी शिरस्त्याप्रमाणें योग्य आदरानें वागविलें तरी त्यानें त्यावेळीं शहाजीचाच विशेष बहुमान व विशेष आदर केला; परंतु ह्या गोष्टीचें मलिकंबर यांस अतीशय वैषम्य वाटलें; आपण निजामशाही राज्य जगविण्यांत आद्य प्रवर्तक आहोंत, आणि आपल्या सूत्रचालकत्वामुळेंच निजामशाही राज्य जगत आहे, हा असून सुद्धा मुर्तुजा निजामशहा हा आपल्यापेक्षां शहाजीचा अधीक बडेजाव माजवितो, याबद्दल मलिकंबरच्या मनांत शहाजीविषयीं अतीशय विकल्प उत्पन्न झाला; आणि याच वेळेपासून शहाजी व मलिकंबर या उभयतांमध्यें द्वेष, मत्सर व वैमनस्य उत्पन्न झालें.

मलिकंबर यानें मोंगल व अदिलशहा या उभयतांचा भातवडी येथील युद्धांत पूर्ण पराजय केल्यानंतर, आदिलशहास पुरा जमिनदोस्त करून आपल्या शेजारचा हा शत्रू पार जमिनदोस्त करून टाकावा असा घाट घातला; व शहाजी व खेळोजी भोंसले या उभयतांसह निजामशाही सैन्यानें आदिलशाही प्रदेशावर विजापूरच्या रोखानें स्वारी केली; मार्गातील त्याच्या ताब्यांतील सोलापूरचा भुईकोट किल्ला हस्तगत करून घेतला; व विजापूरजवळील नवरसपूर* हें गांव जाळून पोळून खाक करून ( इ. स. १६२५ ) हें विजयी सैन्य राजधानींत, अहंमदनगर येथें पुन्हां परत झालें.

---

आणि शीरपूर व इलीचपूरच्या ईशान्येस सात मैलांवर, सातपुड्याच्या दक्षिणेस बैतूल जिल्ह्यांत, मुक्तागिरी, हीं दोन जैन लोकांचीं मोठीं प्रसिद्ध यात्रास्थानें आहेत.

* तोरवें, ऊर्फ नवरसपूर, ऊर्फ नवरोजपूर हें ठिकाण विजापूरच्या पश्चिमेस, विजापूरपासून चार मैलांवर आहे. इब्राहीम अदिलशाहा जगद्गुरू

मूर्तुजा निजामशहा हा हलक्या कानाचा, अस्थीर मनाचा, अशाश्वत बुद्धीचा व दुबळ्या कर्तृत्वाचा असा नालायक राज्यकर्ता होता; व मलिकंबरच्या मनांत शहाजींविषयीं वैमनस्य उत्पन्न झालेलें होतें; त्यामुळें मलिकंबरच्या बगल-बच्च्यांचें, दोस्त, भगत व हस्तकांचें, व शहाजींच्या हितशत्रूंचें चांगलेंच फावून त्यांनीं शहाजींविरुद्ध खटपटी आरंभिल्या; आणि जरी भातवडी येथील युद्धांत व नवरसपूरवरील मोहिमेंत शहाजीनें पराक्रम गाजवून उत्तम कामगिरी केली होती, तरी त्यांनीं मूर्तुजाशाहाच्या मनांत असें भरवून दिलें कीं, " भातवडींच्या युद्धांत व नवरसपूर वरील मोहिमेंत वास्तवीकरित्या शहाजीनें विशेष पराक्रम केला नसून खरें कर्तृत्व व खरा पराक्रम खेळोजी राजे भोंसलें यानेंच केलेला आहे; " अर्थात ही गोष्ट शहास खरी वाटली, व त्यानें नवरसपूरच्या मोहिमेवरून विजयी निजामशाही सैन्य परत आल्यावर शहा-

---

यांस गाण्याचा फार नाद होता; म्हणून त्यानें हल्लीं ज्या ठिकाणीं तोरवें हा गांव आहे, तेथें इ० सन १५८८ मध्यें " संगित महाल " व " नारी महाल " असे दोन महाल बांधिले; व त्यांस त्यानें अनुक्रमें " नवरस महाल " व " सुंदर महाल " अशीं नांवें ठेविलीं. यापैकीं " सुंदर महाल " हा त्याची सुंदर या नांवाची राणी होती तिच्याकरितां त्यानें बांधिला होता; या बादशहास गाण्याचा अतिशय नाद असल्यानें त्याच्याजवळ पुष्कळ गवई होते, व त्यानें त्यांना चांगलीं वेतनें करून देऊन आपल्या आश्रयाला ठेविलें होतें; व त्या लोकांस राहण्याकरितां म्हणून तेथेंच आपला वजीर शहान-वाजखान याच्या देखरेखीखालीं इ० सन १५९८ मध्यें नवरसपूर हें गांव वसविलें. विजापूर येथील प्रसिद्ध अवलिया मिरानी शमशुल ओशाख याच्या वंशांतील पांचवा पुरुष हजरत मौलाली हुसेनी यांस दिल्लीचा बादशहा महं-मदशहा यानें इ० सन १७३३ मध्यें बोबलाद, कोरहाल, व उपरीनिर्दिष्ट तोरवें हा गांव इनाम दिला तो आज तागायत त्याच्या वंशजाकडे चालत आलेला आहे. मलिकंबर यानें नवरसपूर हें गांव जाळून पोळून खाक केल्या-नंतर लवकरच इब्राहीम अदिलशहा मृत्यू पावला; व त्या दिवसापासून तों हा कालपर्यंत हें गांव अगदीं वैराण होऊन राहिलें आहे.

जीला न गौरवितां खेळोजीचाच विशेष गौरव केला; त्यामुळें शहाजीस अतिशय वाईट वाटलें; तो खिन्न झाला; जाधवरावाप्रमाणेंच मलिकंबर, खेळोजी व प्रत्यक्ष मूर्तुजा निजामशहा हे आतां आपले शत्रू झाले, असें त्याच्या मनानें पूर्णपणें घेतलें; आतां यापुढें निजामशाहींत राहणें धोक्याचें आहे, अशी त्याची खात्री झाली; आणि स्वतःच्या सुरक्षिततेचा मार्ग धुंडाळण्यास त्यानें सुरवात केली.

शहाजीचें मन निजामशाहीविषयीं विटलें आहे, ही हकीकत विजापूर दरबारला समजल्यावर, शहाजी सारखा शूर सरदार आपल्या पक्षाला लाभावा म्हणून आदिलशाहीच्या सूत्रचालकांनीं गुप्तपणें पुष्कळ खटपट केली; शहाजींशीं संधान बांधिलें; व त्यांच्या खटपटीस यश येऊन शहाजी हा आपल्या सैन्यासह, निजामशाही सोडून ( इ० सन १६२५ च्या अखेरीस ) अदिलशहास जाऊन मिळाला, व नंतर लवकरच ( इ० सन १६२६ मध्यें ) शहाजीस अदिलशहाकडून त्याच्या इतमामास साजेल अशी मनसब व अक्कलकोट वगैरे परगणे जहागिरीदाखल मिळाले.

शहाजी हा अदिलशाही नौकरींत दाखल झाल्यानंतर, भातवडी, सोलापूर व नवरसपूर, येथील अपमानाचा सूड उगविण्याची इब्राहीम अदिलशहा यानें तयारी केली, व निजामशाही राज्यांतील धारूरच्या प्रांतावर स्वारी करून तो प्रांत त्यानें आपल्या हस्तगत करून घेतला. व शहाजीनें आपल्या पुणें व जुन्नर कडील जहागिरींत राहून तिकडून निजामशाहीला शह द्यावा, असा त्यास हुकूम देऊन त्याची तिकडे रवानगी केली; व त्याप्रमाणें तो जुन्नर प्रांतीं जाऊन राहिला; तथापि जमल्यास आपण पुन्हां निजामशाहींत जावें, अशी शहाजीची इच्छा होती; म्हणून त्यानें मूर्तुजा बुऱ्हाणशहाच्या आईकडे*

---

* हिचें नांव बेगमसाहेब हें असून, तिला मूर्तुजा बुऱ्हाणशहा व दरबारी लोक "मा साहेब" म्हणत असत; व तिचा शद्ब मूर्तुजा कुराणाप्रमाणें पूज्य मानीत असे; इतकेंच नाहीं तर कधीं कधीं राजपत्रांवर तिची निशाणी मथळ्यावर लिहिण्यांत तो भूषण मानीत असे.

सूत्र बांधून मूर्तिजाचें मन आपणाकडे वळवून घेतलें, व नंतर लवकरच तो पुन्हां अदिलशहास सोडून निजामशाही पक्षास येऊन मिळाला.+

इतक्यांतच मध्यंतरीं, इ० सन १६२६ मध्यें आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी मलिकंबर मृत्यू पावला; × आणि शहाजी हाच सर्व निजामशाही राज्याचा सूत्रचालक बनला. त्यानें साबाजी अनंत या मुत्सद्द्याच्या मार्फत निजामशाहाची आई व निजामशहा यांना आपल्या वर्चस्वकक्षेखालीं आणिलें; व सर्व निजामशाही राज्याचा तो स्वतःच कारभार पाहूं लागला. इकडे मलिकंबर मृत्यू पावल्याबरोबर शहाजहान बादशहानें जाधवरावाच्या मदतीनें निजामशाही राज्याबरोबर पुन्हां मोठ्या निकरानें युद्ध सुरू केलें; आणि मोंगल सैन्य निजामशाही प्रदेशाची सारखी लांडगेतोड करीत मोठ्या धडाडीनें राजधानीवर चाल करून आले. त्यावेळीं त्या सैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं अशी शहाजीची खात्री झाली; तेव्हां तो विचारांत वेळ न दवडितां मूर्तुजा निजामशहा व त्याची

---

+ मलिकंबरचें व शहाजीचें वैमनस्य आल्यावर शहाजी अदिलशाही पक्षास जाऊन मिळण्याच्या विचारांत होता; परंतु इतक्यांतच मलिकंबर अजारी पडून मृत्यू पावला, म्हणून शहाजी अदिलशाही पक्षास जाऊन न मिळतां निजामशाही राज्यांतच राहून त्या राज्याचा सूत्रचालक बनला, असाही कित्येक ठिकाणीं उल्लेख केलेला आहे.

× अहंमदनगर जिल्ह्यांतील शेवगांव तालुक्यांतील शेवगांव-तिसगांव सडकेवरील अमरापूर या गांवीं मलिकंबर याची कबर आहे; व अहंमदनगरजवळील आगड गांव हें औरंगझेबाचें मृत्युस्थान असून तेथें त्याचा दर्गा आहे; अहंमदनगर येथें शहराबाहेर भुईकोट किल्ला, भिस्तबाग, फऱ्याबाग, बागरोजा वगैरे प्रेक्षणीय स्थळें असून नगर भिंगारपासून पांच मैलांवर शहा डोंगरावर "चांदबीबीचा महाल" या नांवाची एक दगडी इमारत असून तीही मोठी प्रेक्षणीय आहे.

आई या उभयतांना आपणांबरोबर घेऊन कल्याणजवळील माहुली* या किल्ल्याच्या आश्रयास गेला. तेथें युद्धसामुग्री भरून घेतली, व तेथूनच तो निजामशाही राज्याचा कारभार पाहूं लागला.

---

* माहुलीचा प्रसिद्ध डोंगरी किल्ला ठाणें जिल्ह्यांत कासारा घाटांत शहापूर तालुक्यांत शहापूरच्या वायव्येस सुमारें चार मैलांवर " माहुली " या नांवाच्या डोंगरावर बांधिलेला आहे. या डोंगराची उंची २८२५ फूट असून त्याच्या दक्षिणेकडील टोंकास सुमारें ८०० फूट खोल अशी एक भयंकर दरी आहे. माहुलीच्या डोंगरावर तीन शिखराला तीन किल्ले आहेत; त्यापैकीं उत्तरेकडील शिखराला पळसगड, मध्य शिखराला माहुली व दक्षिणेकडील शिखराला भंडारगड असें म्हणतात. यांतील माहुलीचा किल्ला सर्वांत मजबूत व मोठा आहे; व त्याची लांबीरुंदी बहुतेक सारखीच अजमासें अर्धा मैलाची आहे. या किल्ल्याला पाण्याचा पुरवठा उत्तम असून आंतील जमीनही उत्तम आहे. हा किल्ला अतीशय अवघड जागीं असून त्याची चढण फारच अवघड, आणि माथ्याजवळील चढण तर एका भयंकर दरींतूनच आहे; व तिच्या माथ्याशीं एक मजबूत दरवाजा आहे; व त्याच्या दोन्ही बाजूस दोन व माथ्यावर एक असे तीन बुरुज असून दरवाजाच्या भिंती बाहेरच्या बाजूस थेट तुटलेल्या कड्यापर्यंत वाढवीत नेलेल्या आहेत; शिवाय दरवाजाच्या जरा पलीकडे टेंकडीच्या माथ्यावर एका उंचवट्याच्या जागेवर एक बुरूज आहे, त्यास परथळगड असें म्हणतात. माहुलीच्या किल्ल्यावरून उत्तरेस पळसगड व दक्षिणेस भंडारगड येथें जाण्यास मार्ग असून खालील सपाट प्रदेशावरून फक्त पळसगडावरच जातां येतें. माहुलीच्या किल्ल्यावर जाण्याचा जुना रस्ता पूर्वेच्या बाजूस माची या नांवाच्या एका खेड्यावरून होता; त्याचा दरवाजा एका तुटलेल्या दरीच्या तोंडाशीं असून, दरीच्या माथ्यावर दरवाज्याच्या संरक्षणाकरितां एक भिंत उभारली असून, ती मोठी मजबूत व आजतागायत अस्तित्वांत आहे.

योगायोग कसे चमत्कारिक येतात—मानवी प्राण्याच्या सामाजिक स्थित्यंतराबरोबरच त्याचें मानसिक स्थित्यंतर हीं कसें होत जातें—याचें " माहुलीचा

शहाजी हा—राजमाता व बालराजा मूर्तुजानिजामशहा यांच्यासह—माहुली येथील किल्ल्याच्या आश्रयास गेल्यावर, मोंगल सैन्यानें जाधवरावाच्या मदतीनें त्या किल्ल्यास लागलीच वेढा घातला. तथापि शहाजीनें न डगमगतां किल्ला लढविण्याचा निश्चय केला. मोंगली फौज किल्ला हस्तगत करून घेण्याकरितां त्या ठिकाणीं अधीक अधीक जमू लागली. तरी सुद्धां हिंमत न सोडतां, कच न खातां, मोंगली सैन्यास कोणत्याही प्रकारें दाद न देतां, शहाजी त्या सैन्याशीं सारखा झगडत राहिला. मोंगली सैन्याची रसद मारून त्यानें त्या सैन्यास अतीशय हैराण केलें; सारख्या चिकाटीनें सतत सात महिने किल्ला लढविला, आणखीहि कित्येक महिने तसाच लढवूं अशा निश्चयानें तो झगडत राहिला; आणि मोंगलांच्या भेदनीतीस यश आलें नसतें, तर आणखी कित्येक महिने त्यानें तो किल्ला तसाच चिकाटीनें खात्रीनेंच लढविला असता. परंतु मोंगलांची भेदनीति यशस्वी झाली ! जाधवरावाच्या प्रयत्नास यश आलें! आणि शहाजीचें "मनोराज्य" जागच्याजागीं लयास गेलें ! जाधवरावानें मूर्तुजा निजामशहाच्या आईशीं गुप्तपणानें मिलाफाचें बोलणें लाविलें व आपण

---

किल्ला" हें एक महत्त्वाचें व लक्षांत ठेवण्यासारखें उदाहरण आहे. बादशहा शहाजहान, हा शहाजादा खुर्रम असतांना त्यानें आपल्या वडिलां-विरुद्ध—बादशहा जहांगीर याच्या विरुद्ध—बंड करून तो दक्षिणेंत आला; त्यावेळीं त्यानें आपलीं बायकामुलें, व जडजवाहीर गोपाळदास या नांवाच्या आपल्या एका शूर व विश्वासू रजपूत सरदाराच्या स्वाधीन करून त्यांना याच किल्ल्यावर ठेविलें होतें; व पुढें जहांगीर मृत्यू पावल्यावर शहाजहान बादशहा झाला तेव्हां त्यानें गोपाळदासाचा मुलगा मनोहरदास यांस माहु-लीचा किल्लेदार नेमिलें होतें. ( R. A. S. Journal March 1915 पहा. ) परंतु शहाजहान प्रमाणेंच या वेळीं निजामशाही राज्यकर्ता मूर्तुझा-शहा, राजमाता व शहाजी यांनीं त्याच किल्ल्याचा आश्रय घेतला, त्यावेळीं तोच शहाजहान माहुलीचा किल्ला मोठ्या अट्टाहासानें हस्तगत करून घेतांना आपली पूर्वस्थिती पूर्णपणें विसरून गेला !

शत्रूस मिलाफी झाल्यास आपलें स्वातंत्र्य नाहींसें होईल, निजामशाही राज्य नष्ट होईल, ही गोष्ट लक्षांत न घेतां राजमाता मोंगल पक्षास सामील झाली ! त्यामुळें शहाजीस अतीशय राग आला; ज्यांच्याकरितां स्वतःचा जीव धोक्यांत घालून किल्ला लढवावयाचा, तेच मुळीं शत्रुपक्षास मिळाल्यावर आतां तेथें राहण्यांत अर्थ नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें, आणि त्यानें माहुली येथून निघून जाण्याचा बेत ठरवून तो राजमातेस कळविला, व आपली तशी तयारीही केली. पण इतकें झालें तरी शहाजीची निजामशाही-बद्दलची निष्ठा कायम होती; त्याला राजमाता व बालराजा निजामशाहा यांच्याबद्दल काळजी होती; म्हणून त्यानें आपल्या विश्वासांतील कांहीं मंडळींना त्यांच्याजवळ ठेविलें, आणि एका रात्रीं आपल्या निवडक व विश्वासू लोकांनिशीं अकस्मात किल्ल्याबाहेर पडून, शत्रूचा फळी फोडून (इ० सन १६२७ ) तो मोठ्या धडाडीनें विजापूरकडे निघून गेला.

यावेळीं शहाजीबरोबर त्याची स्त्री जिजाबाई, व वडील मुलगा संभाजी ( जन्म शके १५४५ म्हणजे इ० सन १६२३ मध्यें दौलताबाद येथें ) हीं उभयतां असून जिजाबाई ही यावेळीं सात महिन्यांची गरोदर होती. शहाजी माहुलीचा किल्ला सोडून निघून गेल्याचें जाधवराव यांस कळल्याबरोबर तो आपल्या सैन्यानिशीं शहाजीच्या पाठलागावर निघाला; व त्यानें शहाजीचा मोठ्या निकरानें व त्वेषानें सारखा पाठलाग चालविला. त्यामुळें आपण जाधवरावाच्या हातीं सांपडूं नये म्हणून शहाजीस सारख्या मोठमोठ्या दौडा कराव्या लागल्या. परंतु जिजाबाई गरोदर असल्यानें तिला घोड्यावरून शहाजीबरोबर पळवेना; म्हणून मार्गांतच आपला स्नेही श्रीनिवासराव हा जुन्नर येथें—हें ठिकाण पुण्याच्या उत्तरेस अजमासें पन्नास मैलांवर आहे—निजामशाहीचा एक अधिकारी असून तो स्वतंत्रपणें तेथील अधिकार पहात होता. त्याच्या आश्रयानें तिला जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्यांत ठेवून तो तसाच फलटणकडे वळला. यावेळीं नारो त्रिमल हणमंते, व गोमाजी नाईक पाणसंबळ वगैरे मंडळी तिच्या तैनातींत होतीं; व त्यापैकीं गोमाजी हा जिजाबाईचें शहाजीशीं लग्न झालें त्या वेळेपासूनच जाधवरावानें माहेरचा व आपल्या विश्वासाचा मनुष्य म्हणून तिच्या तैनातीस दिलेला होता

शहाजी हा जिजाबाईस शिवनेरी येथें ठेवून फलटणकडे वळला न वळला तोंच त्याच्या पाठलागावर असलेला जाधवराव त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला. तेव्हां त्यास, जिजाबाई शिवनेरी किल्ल्यांत असल्याचें समजलें; पण शहाजी-विषयींच्या द्वेषाग्नींत त्याचें अपत्यप्रेम नष्ट झाल्यासारखें असल्यामुळें आपली स्वतःची मुलगी ही त्याला शत्रूप्रमाणेंच वाटत होती; तिचा कोणत्याही प्रकारें अपराध नसतां, "ती शहाजीची स्त्री" याच अपराधाचें प्रायश्चित तिला अन्यायानें भोगावें लागत होतें, आणि किल्ल्यांत जाऊन आपल्या मुलीची भेट घेण्याचीही त्याला इच्छा नव्हती; परंतु बरोबर असलेल्या मंडळींनीं त्यास जिजाबाईची भेट घेण्याविषयीं आग्रह केला; आणि "शहाजीचें व तुमचें वैर असलें तरी तुमच्या मुलीनें कांहीं तुमचा तिळमात्रही अपराध केलेला नाहीं; तेव्हां तिला भेटून तुम्ही तिचा समाचार घेणें योग्य आहे," असा उपदेश केला तेव्हां जाधवरावाचें मन ठिकाणावर आलें; व त्यास आपल्या मंडळींनीं दिलेला सल्ला पटून त्यानें आपल्या मुलीची भेट घेतली. या प्रसंगाचें चित्र अत्यंत हृदयद्रावक आहे ! शत्रूरूपानें लेखणारा, शत्रू-प्रमाणें वागणारा, भेटीस आलेला बाप, आणि जीव जगविण्याकरितां, जिवंत पकडले न जाण्याकरितां, नवरा टाकून गेल्यानंतर, निराधार स्थितींत आलेली मुलगी, यांच्यामधील ही दुःखदायक भेट होती ! मोंगलांच्या वशिल्यानें वैभवशिखरास पोहोंचलेला पिता, आणि तिऱ्हाइताच्या मेहेरबानीच्या आश्रयानें अत्यंत कष्टांत आयुष्य कंठीत असलेली कन्या, यांच्या मधील ही दुःखदायक मुलाखत होती. जाधवराव शहाजीचा वैरी होता; आणि त्यामुळेंच तो आपल्या मुलीला पाण्यांत पहात होता; पण मुलीला पाहिल्याबरोबर त्याच्या दगडी वाटणाऱ्या मनाला द्रव आला ! आपल्या मुलीची अशी विपन्नावस्था होण्याला आपणच कारणभूत आहोंत अशी त्याची खात्री झाली ! लहानपणीं मोठ्या प्रेमानें व लडिवाळपणानें कडेखांद्यावर खेळविलेल्या आपल्या मुलीची अशी दीन व भणंग स्थिती करण्यांत आपणच प्रवर्तक आहोंत, याबद्दल त्यास पश्चात्ताप वाटला ! आणि त्यानें तिला "माहेरीं शिंदखेड येथें चलावयाचें काय ?" म्हणून विचारिलें. पण तिनें लागलीच "मला माहेरीं यावयाचें नाहीं." असा जाधवरावास खडा जबाब दिला. तेव्हां जाधवराव

तेथून निघून पुन्हां शहाजीचा पाठलाग करूं लागला. पण या अवधींत शहाजी निंबाळकराच्या राज्यांत जाऊन पोहोंचला होता; त्यामुळें आपण फलटण राज्याच्या हद्दींत शहाजीच्या पाठलागावर गेल्यास, निंबाळकर शहाजीस मदत करून ही जोडगोळी उलट कदाचित आपलाच मस्तकभेद करील असें जाधवरावास वाटून त्यानें माघार घेतली, आणि इकडे शहाजी निंबाळकराच्या मदतीनें पुढील उद्योगास लागला.

मातुश्री जिजाबाई, हिच्या संबंधानें छत्रपति शिवाजीच्या चरित्रांत ठिकठिकाणीं प्रसंगानुसार उल्लेख हा येणारच आहे; तथापि या ठिकाणीही तिच्या संबंधी थोडासा उल्लेख करणें आवश्यक आहे. जिजाबाई हें जगांतील एक अत्यंत उज्ज्वल, व अत्यंत अलौकिक असें स्त्रीरत्न निर्माण होऊन गेलें; एका साम्राज्य-संस्थापक अशा अत्यंत थोर, व पूज्य विभूतीला जन्म देणाऱ्या या देदीप्यमान मातेची थोरवी किती वर्णन करावी ! ज्याचा तीही लोकीं झेंडा अशा राष्ट्रपुरुषाला प्रसवणाऱ्या या आईच्या थोरवीबद्दल किती प्रशंसा करावी ? तिनें राष्ट्रपुरुषास निर्माण केलें. मातुश्री जिजाबाई हीस शिवरायाच्या जन्माच्या वेळीं झालेल्या प्रसूतिवेदना ह्या साम्राज्यजन्माच्या वेदना होत्या; महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यप्रसूतीच्या वेदना होत्या; या अलौकिक स्त्रीनें प्रत्येक संकटाला व आपत्तीला, हताश न होतां, मोठ्या हिंमतीनें तोंड देत राहून महाराष्ट्राला सुखाचे व स्वातंत्र्याचे दिवस दाखविले; महाराष्ट्राचा उद्धार केला. जिजाबाई हिला शिवाजीसह एकंदर सहा अपत्यें झालीं; त्यापैकीं पहिलीं चार अल्पायुषी होऊन वारलीं; पांचवें अपत्य संभाजी; याचा जन्म इ० सन १६२३ मध्यें झाला, व शिवाजीचा जन्म इ० सन १६२७ मध्यें झाला. म्हणजे संभाजी शिवाजाहून चार वर्षांनीं मोठा होता. शहाजीच्या वंशापैकीं हें वडील घराणें असून यांस "जितांवंश" असें म्हणतात. संभाजीच्या स्त्रीचें नांव मकाऊ हें असून तिचें पोटीं पुत्रसंतान नाहीं, म्हणून विठोजी राजे भोंसल्यांचा सहावा मुलगा परसोजी, याचा मुलगा उमाजी हा दत्तक घेतला. उमाजी राजे हा वेडसर होता; संभाजी राजे हा शहाजी राजाजवळ तंजावर प्रांतीं असून, पुढें आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी, इ० सन १६५३ मध्यें कनकगिरीच्या

वेळ्यांत मारला गेला.× संभाजीच्या जन्मानंतर चार वर्षांनीं, ती गर्भवासी असतां जाधवरावाच्या कठोर करणीमुळें तिला जी आपत्ती भोगावी लागली, त्या आपत्तीचें दुःख टाळण्याकरितां तर तीं माहेरी गेलीं नाहींच, पण पुढेंही केव्हां सुद्धां ती माहेरीं गेली नाहीं ! या एकाच गोष्टीवरून सुद्धां या असामान्य स्त्रीच्या ठायीं वसत असलेला करारी स्वभाव, कष्टदायक आयुष्य कंठण्याची तयारी, स्वतःची इभ्रत व अभिमान कायम ठेवण्याकरितां त्रासांत आयुष्य कंठण्याची तत्परता, माहेरचे मिंधें न राहण्याची प्रवृत्ति, स्वतःची कर्तृत्वशक्ति व धमक याबद्दल आत्मविश्वास, वगैरे श्रेष्ठ व प्रशंसनीय सद्गुण व्यक्त होतात. जिजाबाई शिवनेरी येथें राहिल्यावर, शालिवाहन शक १५४९, प्रभवनाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी, रोहिणी नक्षत्र सोमवार या दिवशीं उत्तर रात्रीं ( ता० १० एप्रिल इ० सन १६२७ ) नवमास पूर्ण होऊन

---

× या बाबतींत थोडीशी निराळी हकीकत उपलब्ध आहे. ती अशी कीं, संभाजीच्या स्त्रीचें नांव जयंतीबाई हें असून त्याच्या मुलाचें नांव उमाजी असें होतें; हा उमाजी वेडसर असून त्याची स्त्री मकाऊ हीस मूल नव्हतें; म्हणून तिनें दत्तक घेतला; त्याचें नांव परसोजी; ( राजवाडे; म. इ. सा; खंड १५ लेखांक ५९ पहा. ) त्याप्रमाणेंच रा. राजवाडे यांनीं " एपिग्राफिका कर्नाटिका " या राईटकृत ग्रंथाच्या आधारानें प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून शके १५७६, १५७७ व १५८५ ( म्हणजे इ० सन १६६४, १६६५, व १६७३ ) ह्या सालांच्या संभाजीच्या सनदा उपलब्ध आहेत; त्या अर्थी संभाजी हा इ० १६६५ पर्यंत तरी निदान जिवंत असला पाहिजे, असें दिसतें; शिवाय " संभाजी राजे ह्यास उमाजी राजे नामक पुत्र कार्तिक वद्य १२ शके, १५७६ ( इ० सन १६६४ ) रोजीं झाला " असाही दाखला आढळतो; सारांश संभाजी कधीं मृत्यू पावला, याबद्दल नक्की दाखला आजतागायत उपलब्ध झालेला नाहीं.

ती प्रसूत झाली; व तिला मुलगा झाला.* तोच मराठी साम्राज्य संस्थापक छत्रपति शिवाजी हा होय.

शहाजीनें निंबाळकरामार्फत अदिलशाही राज्यांत अगोदरपासूनच संधान जमवून ठेविलें होतें; शिवाय अदिलशाही राज्याचा कारभारी मुरार जगदेव, व सेनापती रणदुल्लाखान यांच्याकडे मुद्दाम आपल्या विश्वासांतील बाळकृष्णपंत हणमंते यांस पाठवून त्या उभयतांशीं सख्यत्वाचें बोलणें सुरू केलें होतें तथापि यावेळीं शहाजी व अदिलशहा या परस्परांचे हेतू, परस्पराशीं सख्य करण्यांत अगदींच भिन्न होतें. शहाजीचा विचार अदिलशाही सैन्याची मदत घेऊन निजामशाही जगवावी, असा होता; आणि आदिलशहास शहाजीची कर्तबगारी माहीत असल्यानें, त्यानें त्यास निजामशाही जगविण्याकरितां जरी मदत देण्यानें कबूल केलें होतें तरी, निजामशाही न जगली तर शहाजीच्याच मदतीनें त्या राज्यांतील जितका प्रदेश आपणांस काबीज करून घेतां येईल तितका घ्यावा, असा शहाचा हेतू होता. आणि त्याप्रमाणें त्यानें आपलें कांहीं सैन्य शहाजीच्या मदतीस दिलेंही होतें.

मध्यंतरीं निजामशाही राज्यांतील भानगडी पुन्हां अधिकच जोरांत आल्या; आणि मलिकंबरचा मुलगा फत्तेखान हा निजामशाही राज्याचा सूत्रचालक बनला. परंतु त्याच्यांत मलिकंबराची कर्तृत्वशक्ती अथवा राजधोरण नव्हतें; शिवाय तो गर्विष्ठ व क्रूर होता; आणि राज्यांतील सरदार मंडळीला प्रेमानें वागवून, व आपल्या दाबांत ठेवून, राजयंत्र सुरळीत व सुव्यवस्थितपणें चालविण्याची त्याच्या ठायीं पात्रता नव्हती. फत्तेखान अधिकारस्थानापन्न झाल्यावर त्यानें कांहीं काळ मोंगल सरदार खानजहान लोदी याच्याशीं युद्ध चालविलें; परंतु त्यांत त्यास यश मिळण्याची आशा न वाटल्यानें त्यानें लोदीशीं

---

* शिवाजीची जन्मतिथी शके १५५१ फाल्गुन वद्य तृतीया ( ता० १९ फेब्रूवारी इ० सन १६३० ) ही असल्याबद्दल एक नवा शोध लागला आहे; परंतु त्याबद्दल अद्याप एकमत नसल्यामुळें, आम्ही या ठिकाणीं या बाबतीचा फक्त उल्लेखच काय तो केला आहे.

तह केला; परंतु ही गोष्ट निजामशहास आवडली नाहीं; फत्तेखान हा मोंगलास सामील आहे, असें त्यास वाटलें; म्हणून त्यानें फत्तेखानास पदभ्रष्ट करून खीवर येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें आणि तकरीबखान या नांवाच्या दुसऱ्या एका सरदाराची वजिरीपदावर स्थापना केली. तकरीबखान हा निजामशाही राज्याचा वजीर झाल्यावर आणि शहाजीचा सारखा सलणारा कांटा निजामशाही राज्यांतून निघून गेल्यामुळें—जाधवरावाच्या मनांत, " आपण पुन्हां निजामशाही राज्यांत नौकरी करावी " असें आलें व त्यानें तकरीबखानामार्फत " मी पुन्हां आपल्या आश्रयास येतों " अशी विनंती केली; परंतु शहा हा स्वभावानें खुनशी असून लखूजी हा आपला पक्ष सोडून मोंगलास जाऊन मिळाला, त्यामुळें त्याच्या मनांत लखूजीविषयीं तीव्र द्वेष उत्पन्न झाला होता; त्याबद्दलचा सूड उगविण्याची इच्छा शहाच्या मनांत पूर्णपणें वसत होती; जाधवरावास नामशेष करण्याचा त्यानें मनसुबा केला होता; आणि " आपल्या राज्यांतील पूर्वीचा सरदार व माहितगार लखूजी जाधवराव हा मोंगलास मिळालेला आहे, आणि तोच आपल्या राज्यांतील छिद्रें मोंगलांस दाखवून देत असल्यामुळें मोंगल आपणांस भारी झाले आहेत. याकरितां कसेंहि करून पहिल्यानें लखूजीचा बंदोबस्त केल्याखेरीज आपणास केव्हांहि विजय प्राप्त व्हावयाचा नाहीं. " असें शहाच्या सल्लागारांनीं त्याच्या मनांत पूर्णपणें भरवून दिलें; त्यामुळें तर कोणत्याही युक्तिप्रयुक्तीनें लखूजीस बोलावून आणून त्यास कैद करण्याचा त्यानें बेत केला होता; तथापि वरपांगी तसें कांहीहि न दर्शवितां मायावी ममत्व व कांगावी कळवळा दाखवून त्यानें लखुजी जाधवास भुरळ पाडिली, व त्यास आपल्या भेटीस दौलताबाद येथें बोलावून घेतलें. त्याप्रमाणें लखुजी हा आपल्या घरच्या मंडळीसह दौलताबाद येथें येऊन, त्यानें आपल्या सैन्यासह शहराबाहेर तळ दिला; व त्याचा भाऊ जगदेवराव हा किल्याबाहेर कोतुलुकच्या तळ्यावर उतरला. नंतर ठरलेल्या दिवशीं लखुजी जाधवराव हा आपले मुलगे अचलोजी व राघोजी, व नातू यशवंतराव व इतर आप्तस्वकीय बरोबर घेऊन किल्ल्यावर शहाच्या भेटीस गेला; तेथें गेल्यावर ह्या सर्व लोकांना असें समजाविण्यांत आलें कीं, " सरकार स्वारीस तुमची भीति वाटते; म्हणून

तुम्ही पहाऱ्यावर आपलीं हत्यारें ठेवून राजवाड्यांत गेलांत तरच तुमची व हुजूरची भेट होईल; नाहींतर होणार नाहीं." लखूजीच्या मनांत, शहा आपणांस दगा करील, असा, तिळमात्रहि संशय नसल्यामुळें त्यानें शहाच्या इच्छेप्रमाणें पहाऱ्यावर आपली तरवार सोडून ठेविली; व आपल्या सर्व अनुयायांकडूनहि तसेंच करविलें नंतर ही सर्व मंडळी राजवाड्यांत गेली; दरबार होऊन निजामशाहाची भेट झाली, व निजामशाहा क्षणभर बसून व बोलून कांहीं निमित्तानें उठून गेला; तोंच दरबारच्या दिवाणखान्यांत मारेकरी घुसले; व लखूजीस कैद करूं लागले; परंतु कैद होण्यापेक्षां मरण बरें, असें वाटून तो त्या मारेकऱ्यांबरोबर लढण्यास तयार झाला; मारेकऱ्यांनीं तरवारी चालविल्या; लखूजी व त्याचे अनुयायी यांच्या कमरेस फक्त कट्यारी राहिल्या होत्या; तरी मारेकऱ्यांवर चढाई करून ते मारतां मारतां गतप्राण झाले;+ या कत्तलींत लखूजीबरोबर त्यांचे मुलगे अचलोजी, व राघोजी व

---

+ लुकजी जाधवरावास "एक उम्दा अमीर जाधवराव" असें म्हणत असत. जाधवराव हा निजामशाही राज्यांतील एक अत्यंत शूर, व बलिष्ट सरदार होता. त्यास निजामशहानें दग्यानें ठार मारल्यानंतर व शहाजीनें निजामशाहीबरोबरील आपला संबंध साफ सोडल्यानंतर निजामशाहींतील याकूतखां या मुसलमान व उदाजीराव या मराठा सरदारांनीं मिळून शहास असा अर्ज केला कीं, "अशा नाजूक प्रसंगीं, व मोंगलासारखा प्रबळ शत्रू समोर युद्धास उभा राहिला आहे अशा वेळीं इमानी व शूर अशा जाधवरावाला मारून टाकण्याची आपणांस कोणीं सल्ला दिली, तें समजत नाहीं. आतां जाधवरावाच्या मागें आपल्या निजामशाही राज्याचें व दौलतीचें संरक्षण करील, असा दुसरा कोण सरदार आहे ?"

" इसी जमानेका जिक्र है के याकूनखां और उदाजीरावनें बादशहाकी खिदमतमें अरजी इस मज्मूनकी लिखीके ऐसे नाजूक और जरूरतके वक्तमें मुगलोंके मानिंद जबरदस्त दुष्मन सिरपर काबू ढुंढता मौजूर और मुन्ताजिर बैठा है जादवराव कदीम नमक रूकारको मारनेकी आपको किसने सलाह

नातू वसंतराव व दुसरे कित्येक आप्त इष्ट मारले गेले. ही अनर्थाची बातमी किल्ल्याबाहेर जगदेवराव उतरला होता, त्यास कळतांच तो व त्याचा मुलगा बहादूरजी हे तात्काळ शिंदखेड येथें पळून गेले; मागें लष्करांत लखूजीची बायको ( जिजाबाईची माता ) म्हाळसाबाई उर्फ गिरजाबाई ही एकटीच होती; तिला ही बातमी समजल्या बरोबर ती न डगमगतां, तळावर असलेल्या मंडळीसह शत्रुसैन्याच्या देखत देखत शिंदखेड येथें निघून गेली. ही कत्तल शके १५५२ श्रावण शुद्ध १५ म्हणजे इ० सन १६३० च्या आगष्ट महिन्यांत झाली. ( भा० इ० सं० मंडळ त्रैमासिक वर्ष १ लें अंक पहिला, व जेधे यांची शकावली पहा. ) त्यानंतर लखूजीच्या ( याचें सर्व नांव लुकजी कुकजी यादव असें असल्याचें " मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें " खंड १५ " शिवकालीन घराण्यांचे पत्रव्यवहार " लेखांक २ पान १३ वर लिहिलेलें आहे. ) सरदारकीस औरस वारस न राहिल्यामुळें मोंगल बादशाहानें ती सरदारी त्याचा भाऊ जगदेवराव यांस दिली; व त्याच वेळीं जगदेवरावाचा मुलगा बहादूरजी व नातू मानसिंगराव यांसही मोंगली फौजेंत निरनिराळ्या मनसबा मिळाल्या. तथापि " मराठे कुळांचे इतिहास " भाग पहिला यांत या घराण्यासंबंधीं जी हकीगत दिली आहे त्यावरून असें दिसतें कीं लखूजीस वारस होता; हा वारस म्हणजे लखूजीचा नातू व अचलोजीचा मुलगा सुजनसिंग उर्फ संताजी हा होय; म्हणजे लखूजीचा मुलगा अचलोजी,

---

दौथी–अब ऐसा कौन षख्स है के दौलतखान ये सर्कारी और रियासतका बंदोबस्त करे. "

" बसातीन–इ–सुलातीन. "

" याने तारीख बादशहाने विजापूर. "

यावरून जाधवरावाची केवढी योग्यता होती, हें निदर्शनास येतें; माहूरकर उदाजी राजे व याकूबखान हे उभयतां हिंदु मुसलमान सरदार लखुजी जाधवाची योग्यता जाणून होते; व लखुजीच्या मृत्यूनंतर निजामशाहीचें व दौलतीचें संरक्षण करण्यायोग्य असा त्याच्या तोडीचा बुद्रुक सरदार कोणीही नव्हता, हें वरील विवेचनावरून उघड होतें.

अचलोजीचा सुजनसिंग उर्फ संताजी; संताजीचा शंभूसिंग व त्याचा मुलगा म्हणजे भावी प्रसिद्ध सरदार धनाजी जाधव, अशी वंशपरंपरा असल्याचा उल्लेख आढळतो. या घराण्यांतील धनाजी जाधव वगैरे मंडळी भावी काळांत जरी मराठ्यांना येऊन मिळाली तरी सर्वसाधारणतः लखूजी जाधवाचा व त्याच्या आप्तस्वकीयांचा निजामशाहानें विश्वासघातानें नाश केला, त्या वेळेपासून हें जाधवाचें घराणें अखेरपर्यंत मोंगलांचीच नौकरी करून राहिलें.×

---

× विशेष खुलाशाची टीपः—

श्री छत्रपति शिवाजीच्या काळांत लुकजी जाधवराव याचा नातू मोंगलातर्फे नाशीक–त्रिंबकच्या ठाण्यावर ठाणेदार होता; त्यावर इ० सन १६७२ मध्यें शिवाजीचा सरदार पेशवा मोरो त्रिंबक पिंगळे यानें हल्ला करून, त्यांत त्याचा पूर्ण पराभव करून, त्यांस कैद केलें होतें.

लुकजी मृत्यु पावला त्यावेळीं तो ८० वर्षांचा होता; लुकजीच्या मृत्युनंतर इ. सन १६३४–१६३५ मध्यें, जिजाबाईची आई म्हाळसाबाई व नातू सुजनसिंह उर्फ संताजी वगैरे मंडळी, जिजाबाईजवळ पुणें प्रांतीं राहण्यास आलीं, व तिकडेसच स्थाइक राहिली आणि त्यांनीं शिवाजीच्या राजकारणांत त्यास साह्य करीत राहून आपलें सर्व आयुष्य तिकडेसच खर्च केलें.

लुकजीचा भाऊ जगदेवराव हाही लुकजी प्रमाणेंच विशेष पराक्रमी व कर्तबगार होता. मोंगली सैन्यानें निजामशाहीविरुद्ध चालविलेल्या अखेरच्या युद्धांत त्यानें मोठाच पराक्रम गाजविला; त्यावरून लुकजीच्या वेळची बावन्न चावड्यांची देशमुखी, जगदेवरावाच्या नांवानें करून देण्यांत आली; व त्या शिवाय फौजेच्या खर्चाकरितां स्वतंत्र जहागीरही तोडून देण्यांत आली. त्यापैकीं कांहीं जहागीर निजामचे राज्यांत त्याच्या वंशजांकडे अद्याप चालू आहे; शिवाय याच वेळीं त्यास “ रुस्तुमराव ” हा किताबही मोंगलाकडून मिळाला; जगदेवराव हा इ० सन १६५०मध्यें दिल्ली येथें मृत्यु पावला; जगदेवरावांनतर त्याचें घराणें दिल्ली येथें राहिलें; व “ रुस्तुमराव ” हा किताबही त्याच्या वंशजाकडे चालू राहिला. याच घराण्यांतील मानसिंग रुस्तुमराव जाधव याची

या वेळीं म्हणजे निजामशाहानें जाधवराव वगैरे मंडळीस दग्यानें ठार मारिलें त्या वेळीं शहाजी हा परिंडा+ येथें होता; त्यास ही दग्याची हकीगत कळल्यावर तो अतीशय चिडीस गेला; आणि निजामशाहीशीं आपला असलेला संबंध साफ तोडून टाकून तो स्वतंत्र झाला. परिंडा येथून ताबडतोब आपल्या सैन्यासह निघून रस्त्यांतील प्रदेशाची लुटालूट व जाळपोळ करीत तो×संगमनेर

---

कन्या नामें राजसबाई उर्फ अंबिकाबाई, ही दिल्ली येथें इ० सन १६९९ मध्यें औरंगझेबाच्या मध्यस्थीनें, व त्याच्या मुलीच्या आग्रहानें शाहू राजे यांस दिली, ती पुढें लवकरच दिल्ली येथें मृत्यू पावली.

लुकजी व त्याचा मुलगा अचलोजी यांना निजामशाहानें ठार मारल्यानंतर अचलोजीचा मुलगा संताजी उर्फ सुजनसिंह याचें संगोपन जिजाबाईनें केलें; छत्रपति शिवाजी याचा वडील भाऊ संभाजी व हा संताजी हे उभयतांही बहुतेक समवयस्क असून पुढें ते दोघेही शहाजी राजे याचे जवळ कर्नाटक प्रांतीं असत; व ते उभयतांही कनकगिरी काबीज करण्याच्या प्रयत्नांत असतांनाच मारले गेले. संताजीस संभूसिंग या नांवाचा एक मुलगा होता; तो शिवाजी जवळ रहात असे; हा संभूसिंगही मोठा पराक्रमी निपजला, व प्रसिद्ध बाजी प्रभू देशपांडे व संभूसिंग, या उभयतांनीं मोंगलाशीं युद्ध करीत राहून शिवाजी रांगणा किल्ल्यांत पोहोंचेपर्यंत मोठ्या मर्दपणानें खिंड अडवून धरिली. याच संभूसिंहाचा मुलगा म्हणजे भावी काळांतील मराठ्यांचा प्रसिद्ध व पराक्रमी सेनापति धनाजी जाधव "जयसिंग" ( जन्म इ० सन १६५० च्या सुमारास ) हा होय.

+ परिंडा हा गांव निजामच्या राज्यांत नळदुर्ग जिल्ह्यांत एक तालुक्याचें ठिकाण असून तें अहंमदनगर जिल्ह्याच्या सरहद्दीवर आहे; व येथील किल्ला पूर्वकाळीं विशेष महत्वाचा म्हणून गणला गेलेला आहे.

×संगमनेर हें तालुक्याचें ठिकाण, अहंमदनगर जिल्ह्यांत, अहंमदनगरच्या वायव्येस अजमासें ४९ मैलांवर, व दौंड मनमाड रेलवेच्या बेलापूर स्टेशनपासून अजमासें ३२ मैलांवर, प्रवरानदीच्या कांठीं आहे; तेथून सिन्नरवरून नाशीक, नारायण गंज ते खेडवरून पुणें, व अकोल्यावरून इगतपुरीकडे

येथें आला; व संगमनेरपासून पुण्यापर्यंतचा सर्व प्रदेश व किल्ले हस्तगत करून घेऊन तो पुणें येथें आला; ह्या धामधुमींत विजापूरकरांचाही कांहीं प्रदेश शहाजीनें लुटला; व हस्तगत करून घेतला; तेव्हां आदिलशाहानें मुरारराव उर्फ मुरारपंत या नांवाच्या एका शूर ब्राम्हण सरदारास शहाजीवर पाठविलें; त्याप्रमाणें मुरारपंतानें तिकडे जाऊन शहाजीच्या ताब्यांतील कांहीं प्रदेश, व पुणें इंदापूर वगैरे ठिकाणें आपल्या हस्तगत करून घेऊन शहाजीचा वाडाही जाळून टाकिला. तथापि या वेळी शहाजीजवळ फारसें सैन्यबळ नव्हतें; त्यामुळें विजापूरकरांचें सैन्य आपणांवर चाल करून येत आहे, असें पाहतांच तो जुन्नर येथें गेला, व आपला स्नेही आणि तेथील सुभेदार श्रीनिवासराव याच्या आश्रयानें त्या ठिकाणी कांहीं काळ वास्तव्य करून राहिला.

इकडे मुरारपंतानें शहाजीस पुन्हां आदिलशाही प्रदेशांत धामधुम करतां येऊं नये म्हणून बंदोबस्ताकरितां पुण्यापासून अजमासें तीस बत्तीस मैलांवर असलेल्या "भिलसार" उर्फ "भुलेश्वर"च्या टेकडीवर एक किल्ला बांधिला; त्याचें नांव "दौलत मंगळ" असें ठेविलें; व रामराव या नांवाच्या एका सरदारास दोन हजार सैन्यानिशीं त्या ठिकाणीं ठेविलें; आणि चंद्रराव मोरे व बाजी दळवी वगैरे सरदारांना तळ कोंकण काबीज करण्याकरितां पाठवून तो विजापूर येथें परत गेला.

त्यानंतर शहाजीनें लागलीच पुन्हां आपलें वर्चस्व स्थापन करण्याचा

---

सडका गेलेल्या असून येवलें—नगर ही एक पोटसडक गेलेली आहे. त्यामुळें पूर्वकाळीं दळणवळणाच्या दृष्टीनें संगमनेर हें मध्यवर्ती व महत्त्वाचें ठिकाण म्हणून गणलें गेलें होतें; प्रसिद्ध अनंदफंदी कवी हा संगमनेर येथेंच होऊन गेला असून संगमनेर जवळच त्याच तालुक्यांत प्रवरा नदीच्या कांठीं अश्वी येथें मोठें कुरण असून पूर्वी पेशव्यांच्या वेळीं तेथें सरकारी घोड्याची पागा रहात असे; याच तालुक्यांत निमगांव जाळी या नांवाचें एक खेडेगांव असून दुसऱ्या बाजीरावाचा कंठमणी प्रसिद्ध त्रिंबकजी डेंगळे, याचे वंशज त्या ठिकाणीं रहात आहेत.

उद्योग आरंभिला. तो तात्काळ जुन्नर येथून निघाला; त्याच प्रांतांत भीमगड या नांवाचा एक मोडकळीस आलेला किल्ला होता, तो दुरस्त करवून त्यास " शहागड " हें नांव दिलें, व तो तेथें राहूं लागला. × त्यानंतर लवकरच त्यानें फौजेची जमवाजमव करून नाशीक त्रिंबक पर्यंतचा आसपासचा निजामशाही प्रदेश काबीज केला; इतकेंच नव्हे तर अहंमदनगर व दौलताबाद पर्यंतचा बालेघाटचा प्रदेशही त्यानें आपल्या अमलाखालीं आणून तो पुन्हां पूर्वीप्रमाणेंच निजामशाहीस, व मोंगल बादशाहीस एक बलिष्ट शत्रू होऊन राहिला.

इ. सन १६२७ हें वर्ष ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचें व क्रांतिकारक आहे- गोब्राह्मणप्रतिपालक, व महाराष्ट्र देशउद्धारक छत्रपति शिवाजी याच वर्षी इकडे दक्षिणेंत जन्मास आला; आणि तिकडे उत्तरेंत मोंगल बादशहा जहांगीर हा मृत्यू पावून त्याचा पराक्रमी पुत्र शहाजहान हा गादीवर आला. शिवाजीच्या जन्मापूर्वी थोडेसें अगोदर—इ. सन १६२६ मध्यें, विजापूरचा पराक्रमी व लोकप्रिय बादशहा इब्राहीम आदिलशहा, आणि निजामशाहींतील अलौकिक योद्धा व मुत्सद्दी मलिकंबर हे उभयतां कर्तृत्ववान पुरुष कालवश होऊन दोन्हीं राज्यें निर्बल झालीं होतीं; तथापि त्यांतल्या त्यांत निजामशाही राज्याचा तर, मलिकंबरच्या मृत्यूमुळें, व नंतर पूर्णपणें बोजवारा उडत चालला होता. बादशहा शहाजहान हा पूर्वीपासूनच निजामशाही राज्य बुडविण्याच्या विचारांत होता; त्यामुळें मलिकंबराच्या मृत्यूमुळें त्याला आपला बेत सिद्धीस नेण्यास एकप्रकारें उत्तेजनच मिळालें. इतक्यांतच त्याचा प्रसिद्ध सरदार खानजहान लोदी यानें त्याच्या विरुद्ध बंड केलें; ( इ. सन १६२८ ) बुंदेलखंड व गोंडवण प्रांताच्या मार्गानें तो दक्षिणेंत आला; व बागलाणांत शिरून निजामशाहीच्या सरहद्दीवरील डोंगराळ प्रदेशाचा त्यानें आश्रय घेतला. बादशहा बाबर यास हिंदुस्थानांत बोलाविणारा प्रसिद्ध सरदार दौलतखान

× " शहाजीनें भीमगढको काबीज किये, बादनिजामशाह बोहोतसे मुल्कपर अपना कब्जा कर्लिया; और ७–८ हजार सवारभी जमा करके खुदमुख तारीका झंडा खडा कर्दिया. " " बसातीन–इ–सुलातीन. "

लोदी याचा, पीरखान ऊर्फ खानजहान हा मुलगा असून तो पूर्वी शहाजादा पर्वीझ हा दक्षिण प्रांताचा सुभेदार असल्यावेळीं त्याचा मदतनीस म्हणून त्या प्रांतांत राहिलेला होता; आणि आपल्या सुनी पंथाचा मलिकंबर यांस मिळून त्यानें निजामशाहींतील मोंगलांनीं जिंकलेल्या प्रदेशापैकीं बराच प्रदेश त्या राज्यास परत देऊन उपकारबद्ध केलें होतें. त्यामुळें निजामशाहींतील मोठमोठ्या सरदारांचें व त्याचें पूर्वीपासूनच सख्य होतें; म्हणून त्यांनीं—आणि शहाजी व निजामशहा यांनीं—त्याचा पक्ष घेतला, व मोंगलांशीं युद्ध करण्यास सुरवात केली. मोंगल सैन्यही मोठ्या नेटानें झगडूं लागलें; परंतु लोदी हा स्वतःच शूर होता; कसलेला योद्धा होता; आणि यावेळीं तर शहाजीसारखा पराक्रमी सरदार त्यास साह्यकारी असल्यामुळें मोंगली सैन्यानें आपली पराकाष्ठा केली तरी लोदी आवरला जात नव्हता. ही हकीकत शहाजहान यांस कळल्यावर हें बंड फैलावतें कीं काय, याबद्दल त्यास भीती वाटली; अतीशय राग आला, व निजामशाही, लोदी व शहाजी यांना नामशेष करण्याच्या निश्चयानें, तो स्वतः पुष्कळ सैन्यानिशीं, मोठ्या धडाडीनें दक्षिण प्रांतांत येऊन दाखल झाला. आपल्या सैन्याचे तीन भाग करून लोदीला जोराचा शह दिला; त्यामुळें त्याच्या सैन्याची वाताहत होऊन तो आश्रयाकरितां भटकूं लागला; निजामशाही व आदिलशाही राज्यांत आश्रय मिळविण्याकरितां त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, व तो निष्फळ झाल्यामुळें लोदी पुन्हां उत्तरेकडे वळला. परंतु मोंगल सैन्य सारखें त्याचा पिच्छा पुरवीत असल्यानें त्यास अखेरीस त्या सैन्याशीं युद्ध करावें लागलें; आणि कालिंजर नजीक बादशाही सैन्याशीं युद्ध करीत असतांनाच तो ठार मारला जाऊन हें लोदीचें बंड नामशेष झालें.

लोदी दक्षिण प्रांतांत होता, त्यावेळेपासूनच त्याच्या पक्षांतील मराठे सरदारांना फोडून आपल्या पक्षास मिळवून घेण्याचा शहाजहान यानें सारखा प्रयत्न आरंभिला होता; व लोदीचा पक्ष सारखा कमजोर होत जाऊन शहाजहानच्या प्रयत्नास यश येत चाललें होतें; अशी परिस्थिति पाहून, व बादशाही सैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं, हें ओळखून शहाजीनें २ जिमखान या नांवाच्या एका सरदारामार्फत शहाजहानकडे संधान बांधिलें;

व " मी बादशाही नौकरींत राहण्यास तयार आहें; " असा त्याजकडे अर्ज केला; बादशहाचे मनांत निजामशाही बुडवावयाची होती. आणि शहाजीचा पराक्रम व कर्तबगारीही तो पूर्णपणें ओळखून होता. त्यामुळें निजामशाही संबंधाचे आपले इष्ट हेतू सिद्धीस नेण्यास आपणास शहाजीचा अतीशय उपयोग होईल, अशी त्यानें अटकळ बांधिली; व शहाजीस आपल्या भेटीस बोलाविलें. त्याप्रमाणें तो आपलें दोन हजारांचें पथक बरोबर घेऊन शहाजहान बादशहास भेटला. ( इ. सन १६२९ ) त्यावेळीं बादशहानें त्याचा योग्य गौरव करून, त्यास पांच हजारी मनसब देऊन दोन लक्ष रुपये खर्चास दिले; व निजामशाही सरकारकडून त्यास पूर्वी मिळालेली जहागीर त्याच्याकडे कायम करून शिवाय आणखीही कांहीं प्रदेश त्याच्या दिमतीस दिला; याच वेळीं शहाजहान यानें शहाजीस फत्तेखानाचीही जहागीर दिली होती, असा उल्लेख आढळत असून, शिवाजीनें पुढें अहंमदनगरच्या प्रांतावर आपला हक्क सांगितला होता, त्यावरून तो प्रांतही या वेळीं बादशहानें शहाजीस बहाल केला असावा, असें दिसतें. शहाजीप्रमाणेंच, याचवेळीं त्याचा चुलतभाऊ, आणि विठोजीचा दुसरा–संभाजीच्या पाठचा–मुलगा खेळोजी हा आपले दोन बंधू मालोजी व परसोजी यांसह शहाजहानच्या पक्षास मिळाला, व त्यासही बादशहानें पांच हजारांची मनसब करून दिली, व शहाजीच्या बरोबरीतील इतर कित्येक नातलगांस, व मराठा सरदारांनाही बादशाही सैन्यांत मनसबा बहाल करण्यांत आल्या. खेळोजी हा मोठा शूर होता; तो इ. सन १६३९ पर्यंत जिवंत होता; त्या वर्षी अवरंगझेबानें त्याची राहण्याची गुप्त जागा शोधून काढून, त्यास मोठ्या युक्तीनें पकडून ठार मारिलें.+ शहाजीस

---

+ खेळोजी हा इ. सन १६२९पासून इ. सन १६३३पर्यंत मोंगलांच्या आश्रयानें होता. त्यावर्षी मोंगलांनीं दौलताबाद येथील किल्ल्यास वेढा घालून तो हस्तगत करण्याचा उद्योग आरंभिला; त्यावेळीं त्यानें मोंगलांचा पक्ष सोडिला; विजापूरच्या आदिलशाही राज्यांत नौकरीस राहिला; व त्यानंतर त्या राज्यातर्फें मोंगल सैन्याशी त्यानें अनेक युद्धप्रसंग केले. अशा स्थितींत त्याची बायको गोदावरी नदीवर स्नानास जात असतां तिला एका मोंगल

बादशहाकडून सरंजाम मिळाल्यानंतर बादशहाच्या हुकुमाप्रमाणें तो प्रथम जुन्नर मागून संगमनेर व नंतर बायझापूर* येथें आपल्या जहागिरींत राहिला; व नंतर पावसाळ्यांत त्यानें आपली छावणी नाशीक येथें ठेविली. ( इ. सन १६३१ ) त्यावेळीं श्रीसमर्थ रामदास स्वामी पंचवटींत वास्तव्यास असून स्वामींचें बारा वर्षांचें अनुष्ठान बहुतेक पूर्ण होत आलेलें होतें; अर्थात् अशा प्रसिद्ध साधुपुरुषाची शहाजीनें या वेळीं भेट घेतली असावी, असें अनुमान करण्यास जागा राहते.

यावेळीं दक्षिण प्रांतांत मोठा भयंकर दुष्काळ पडला; ( सन १६३० ) इ० सन १६२९ मध्येंच पाऊस न पडल्यानें तें वर्ष लोकांनीं कसें तरी कष्टानें पार पाडिलें; परंतु १६३० च्या दुष्काळानें तर लोकांच्या आपत्तीचा कडेलोटच केला ! लोकांची अन्नान्न दशा झाली ! लाखों लोकांचा दुष्काळानें संहार उडाला ! लाखों जनावरें कालमुखीं पडलीं ! जगलेल्या लोकांपकीं पुष्कळांनीं आपले प्राण जगविण्याकरितां निवडुंगेसुद्धां भक्षण केलीं ! त्यांतच पुन्हां पटकीशी सांथ उद्भवला व त्यामुळें ही पुष्कळ लोक

---

अधिकाऱ्यानें पकडलें; तेव्हां खेळोजीनें निरुपायानें त्या अधिकाऱ्यास चार लाख रुपये देऊन तिची सुटका करविली. त्यानंतर लवकरच विजापूरकर व शहाजहान यांचा तह झाला, तेव्हां आदिलशहानें त्यास आपल्या नौकरींतून कमी केलें; तेव्हां तो आपल्या पूर्वजांच्या वतनाच्या वेरूळ या गांवीं येऊन राहिला, व आपलें स्वतंत्र सैन्य जमवून तो आसपासच्या मोंगली प्रदेशांत लुटालूट करूं लागला. या वेळीं अवरंगझेब हा दक्षिण प्रांताचा कारभार पहात होता; ( ता० १६ जुलई इ. सन १६३६ ते ता. २८ मे इ. सन १६४४पर्यंत ) त्यास ही बातमी कळल्याबरोबर त्यानें मलिक हुसेन या नांवाच्या एका सरदारास त्याच्या तपासावर पाठविलें व त्यास युक्तीनें पकडून ( इ. सन १६३९ आक्टोबर ) आणून ठार मारिलें.

* बायझापूर–वैजापूर हें तालुक्याचें ठिकाण नगर जिल्ह्याच्या सरहद्दीवरील औरंगाबाद जिल्ह्यांत, औरंगाबाद शहराच्या पश्चिमेस अजमासें २५ मैलांवर आहे.

सारखे पटापट मृत्युमुखीं पडूं लागले ! या दुहेरी दैवी आपत्तींमुळें, सर्व देश उजाड झाला ! आणि थोड्याथोडक्या जगलेल्या लोकांची अत्यंत विपन्नावस्था झाली ! त्यांतल्यात्यांत निजामशाही राज्याची स्थिति तर अतीशयच खालावली ! सर्व सरदार फुटलेले, तिजोरीस क्षय लागलेला, दुष्काळामुळें सरकारी वसुलीस जबर धक्का बसलेला, राज्यकर्त्यांचें पोरवय, कर्तृत्ववान् योद्धयांचा अभाव, राजकारणी पुरुषाची न्यूनता, मार्गदर्शक पुढाऱ्याची कमतरता,—या सर्व कारणांमुळें तें राज्य अगदीं डबघाईस येऊन गेलें; व तकरीबखानासारख्या नालायक वजिराच्या हातीं राज्यसूत्रें असल्यामुळें तीच स्थिति कायम राहून उलट तींत अव्यवस्थेची सारखी भरच पडत गेली !

यावेळीं निजामशाही राज्य जिंकण्याची कामगिरी, महाबतखान या नांवाच्या एका शूर सरदारावर सोंपवून शहाजहान बादशहा उत्तर प्रांतीं परत निघून गेला होता; तरी सुध्दां मोंगल सैन्यास उत्तरेतून आणखी कुमक येऊन दाखल झाली होती; आणि अशा स्थितींत "राज्य कसें जगवावें" हीच मुख्य विवंचना निजामशहास सारखी लागलेली होती. आपल्या या सर्व आपत्तीला आपला नालायक व कर्तृत्वहीन वजीर तकरीबखान हाच मुख्यतः कारणीभूत आहे, असें त्याच्या मनानें घेतलें; फत्तेखान हा शहाचा मामा असल्यानें त्यास बंधमुक्त करण्याबद्दल त्याची बहीण—म्हणजे शहाची आई—त्यास सारखा आग्रह करीत होती. त्याचा शहाच्या मनावर परिणाम झाला; व फत्तेखानास खिवरच्या किल्ल्यांतील प्रतिबंधांतून मुक्त करून त्याच्या हातीं पुन्हां निजामशाही राज्याचीं सूत्रें सोंपविल्यास राज्यव्यवस्थेची पुन्हां सुव्यस्थित घडी बसेल, असें त्यांस वाटूं लागलें होतें. त्याप्रमाणें त्यानें तकरीबखानास अधिकारभ्रष्ट केलें. तकरीबखानास हा मानभंग असह्य होऊन तो निजामशाहीचा पक्ष सोडून मोंगलास जाऊन मिळाला; व तिकडे त्यास सहा हजारांची मनसब मिळून तो त्यांचा सरदार बनला; आणि फत्तेखानाची प्रतिबंधांतून मुक्तता करून ( इ० सन १६३० ) त्यास पुन्हां पूर्वीप्रमाणें वजिरीपदावर स्थानापन्न केलें.

परंतु फत्तेखानास बंधमुक्त करण्यांत शहाची चूक झाली; आणि त्यास

पुन्हां अधिकारापन्न केल्यामुळें तर ती पुढें घोडचूक ठरली. मोंगलांची निजामशाहीवर धाड आल्याबरोबरच, मोंगलांनीं निजामशाही नष्ट केल्यानंतर तोच प्रसंग ते आपल्या अदिलशाही राज्यावर आणितील असा दूरदर्शीपणाचा विचार करून, महंमद अदिलशहा यानें मूर्तुजा निजामशहा याच्याशीं एक मित्रत्वाचा तह केला होता; व त्या अन्वयें उभयतांनीं परस्परांना, मोंगलांच्या विरुद्ध जरूर पडेल त्या त्या प्रसंगीं मदत करावी, असें आपसांत ठरलेलें होतें. त्यामुळें फत्तेखानास बंधमुक्त करण्याचीच मुळीं आवश्यकता नव्हती. परंतु मूर्तुजाशहानें अविचारानें त्यास बंधमुक्त केलें; पहिल्यासारखाच सत्ताधीश बनविलें; व त्यानंतर लवकरच त्यानें आपला भस्मासुरी हात शहाच्या डोक्यावर ठेवून त्याला इहलोकांतून नष्ट करून टाकिलें.

फत्तेखान हा निजामशाही राज्याचा सूत्रचालक बनल्याबरोबर आपल्या हातीं आलेली सत्ता कायम रहावी म्हणून त्यानें निरनिराळीं घोर व विश्वासघाताचीं कृत्यें करण्यास सुरुवात केली; मूर्तुजा निजामशहा यास भ्रमिष्ट ठरवून त्याची प्रतिबंधांत रवानगी केली; राज्यांतील अजमासें पंचवीस मोठमोठ्या सरदारांना ठार मारिलें; सर्व राज्याधिकार आपल्या हातीं घेतला; मोंगलास मिलाफी होण्याचें ठरवून " मी आपणांस शरण आलों आहे " असा अर्ज त्याच्याकडे आपला मुलगा अबदुल रसूल याच्या हस्तें पाठविला; खंडणी पाठविली; बादशाही हुकुमाचें मीष करून मूर्तुजा शहास गळफांस देऊन ठार मारिलें; ( इ० सन १५३१ ) आणि त्याचा अज्ञान दहा वर्षांचा मुलगा शहा हुसेन ऊर्फ हुसेनशहा यास गादीवर बसवून, मोंगल बादशहाचा मांडलीक, या नात्यानें तो राज्यकारभार चालवूं लागला.

इतक्यांत पूर्वी ठरलेल्या तहाअन्वयें, विजापूरकरांचें सैन्य, निजामशाही सैन्यास मोंगलाविरुद्ध मदत करण्याकरितां त्या राज्यांत येऊन दाखल झालें. परंतु ज्याच्याशीं तह झाला होता, तो राज्यकर्ता मूर्तुजाशहा यावेळीं मृत्यू पावलेला होता; व फत्तेखान तर उघडउघडच मोंगलांना सामील झालेला होता. त्यामुळें अदिलशाही सैन्याची फसगत झाली. मोंगलांनीं त्या सैन्याचा पूर्णपणें पराभव केला; व पुष्कळ नुकसान सोसून त्यांना परत जाणें भाग पडलें. इकडे फत्तेखानानें शहाजहान याचें वर्चस्व मान्य केल्यानंतर, त्यानें फत्तेखानाकडे

निजामशाही खजिन्यांतील अनेक मौल्यवान् जडजवाहीर व हत्ती वगैरेंची मागणी केली; परंतु ती फत्तेखानानें अमान्य केली; तेव्हां शहाजहान यानें त्याच्यावर पुन्हां सैन्य पाठविलें. त्यावेळीं या सैन्याबरोबर आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून तो बादशहास शरण गेला; त्याच्या सर्व मागण्या मान्य केल्या; त्यास आठ लाख रुपये नजराणा भरला; आणि दरवर्षी नियमीतपणें खंडणी देत जाण्याचें कबूल करून त्यानें या संकटांतून आपली मुक्तता करून घेतली.

इकडे शहाजी हा मोंगलांच्या नोकरींत असतां, फत्तेखान हा शहाजहान बादशहास शरण आल्यावर त्यानें त्यास कांहीं प्रदेश जहागिरीदाखल दिला; त्यांतच पुणें व सुपें, हे शहाजीच्या जहागिरीचे प्रांत बादशहानें फत्तेखानास दिले; त्यामुळें शहाजीस अतीशय वाईट वाटून, त्याच्या मनांत अतीशय वैषम्य उत्पन्न होऊन, त्यानें मोंगलांचा पक्ष सोडिला. व नाशिक, त्रिंबक, संगमनेर, जुन्नर, व उत्तर कोंकणांतील कांहीं प्रदेश त्यानें आपल्या ताब्यांत घेतला; शिवाय फत्तेखानाच्या एकंदर विश्वासघाताच्या वागणुकीचाही त्यास अतीशय राग आला; व आपण निजामशाही जगविण्याचा प्रयत्न करावा, असें त्यास वाटूं लागलें. त्याप्रमाणें त्यानें विजापूर दरबारचा प्रसिद्ध व प्रधानवजा असलेला ब्राह्मण सरदार मुरारराव याच्या मार्फत आदिलशहाशीं सख्य केलें; फत्तेखानाच्या विश्वासघातकी वागणुकीबद्दल त्या दरबारची खात्री पटवून दिली; निजामशाहींत कशी बेबंदशाही माजली आहे, हें निदर्शनास आणून तिचा फायदा करून घ्यावा, त्या राज्यांतील साधेल तितका प्रदेश आपल्या हस्तगत करून घ्यावा, अशी त्या दरबाराला सल्ला दिली; आणि दौलताबादच्या प्रसिद्ध, व महत्वाच्या किल्ल्यावर यावेळीं फारशी धान्यसामुग्री नसल्यामुळें, तो हस्तगत करून घेण्यास, अदिलशाही सैन्य रवाना केल्यास, आपण त्या सैन्याला यशस्वी होण्यास मदत करू असें त्यास अभिवचन दिलें. त्याप्रमाणें अदिलशाही सैन्य त्या किल्ल्यावर चाल करून आलें; त्यावेळीं फत्तेखानानें लागलीच ही हकीकत मोंगल बादशहा शहाजहान यास निवेदन केली; व दौलताबादचा किल्ला मी आपल्या ताब्यांत देण्यास तयार आहे, असें कळवून त्याच्याकडे विजापूरकराविरुद्ध मदत मागितली. तेव्हां बाद-

शहानें लागलीच मोहबतखान यांस त्याच्या मदतीस पाठविलें; व त्यानंतर उभयतांच्या सैन्यामध्यें भयंकर युद्धसंग्राम झाला. शहाजीनेंही अदिलशाही सैन्यातर्फे मोठ्या शौर्यानें युद्ध केलें; परंतु अखेरीस मोहबतखान विजयी झाला; व अदिलशाही सैन्यास माघार घेऊन परत जाणें भाग पडलें.

त्यानंतर अदिलशहानें फत्तेखानास मोंगलांच्या पक्षांतून फोडून आपल्या पक्षाकडे ओढून घेतलें; तेव्हां फत्तेखान यानें दौलताबादचा किल्ला मोंगलास देण्याचें नाकारिलें; व किल्ल्यांतून त्यानें, व बाहेरून अदिलशाही सैन्य व शहाजी, यांनीं मोंगल सैन्यास सारखा उपद्रव देण्यास सुरवात केली; परंतु फत्तेखानाच्या या विश्वासघातकी वागणुकीमुळें मोहबतखान अतीशय चिडीस गेला; फत्तेखानाचा व निजामशाही राज्याचा समूळ उच्छेद करण्याच्या अट्टाहासानें त्यानें जोरानें युद्ध चालविलें; व अखेरीस विजयी होऊन त्यानें दौलताबादचा किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला ( ता० १३ जून इ० सन १६३३ ). फत्तेखान व बालराजा हुसेन, हे मोहबतखानास शरण आले. त्यानें त्या उभयतांना शहाजहान बादशहाकडे पाठविलें; शहाजहान यानें हुसेनशहास ग्वाल्हेर येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें; फत्तेखानास सालिना दोन लक्षांची नेमणूक करून देऊन त्याची लाहोर येथें रवानगी करून दिली; त्याचा दुसरा भाऊ चंगीझखान यांस मनसूरखान असा किताब देऊन त्यास बादशाही सैन्यांत दोन हजारांची मनसब दिली; आणि निजामशाही राज्य खालसा करून आपल्या मोंगली साम्राज्यांत सामील करून टाकिलें.

परंतु मरून मोंगलाच्या महाराज्यांत मिसळून गेलेला हा निजामशाही राज्यपुरुष, आपल्या समशेरीच्या संजीवनीनें पुन्हां जिवंत करण्यास एक धडाडीचा कर्तबगार वीर पुढें सरसावला; व त्यानें त्या राज्यपुरुषास जिवंत करून तो राजा निर्माण करण्याचा, व राज्यकारभार चालविण्याचा धंदा करूं लागला. या वीरपुरुषानें स्वीकारिलेला हा धंदा, हीच मराठ्यांच्या राज्यसंस्थापनेची पूर्व तयारी होती; हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवरील मराठ्यांच्या भावी काळांतील उत्कर्षाची हीच नांदी होती; या मराठा सरदारानें सुरू केलेला हाच धंदा पुढें मराठ्यांनीं चालू ठेविला; आणि इ. सन १७७१

च्या दिसेंबर महिन्यापर्यंत तर ते या धंद्यांत इतके पटाईत, इतके तयार, इतके तरबेज बनले कीं, त्यांनीं आपल्या सैन्यानें व शस्त्रानें, तरवारीस तोफखान्याचें जंगी पाठबळ देऊन बादशहा शहाअलम यास, तो अलाहाबादेहून दिल्ली येथें येण्यास निघाल्यावर कुरा प्रांताच्या सरहद्दीपर्यंत त्याला पोंहोंचविण्यास आलेला इंग्रजतुकडीवरील अधिकारी " मराठ्यांची संगत धरूं नका " असें बजावीत असतांही, जो " डोळे मिटून " पण वास्तवीक उघडे डोळे ठेवून, मराठ्यांना येऊन मिळाला, त्या बादशहा शहाअलम यास, दिल्ली येथील बादशाही तख्तावर सहज स्थानापन्न करून टाकिलें. म्हणून, आणि या दृष्टीनें विचार केला म्हणजे " निजामशाही राज्य एका मराठा सरदारानें पुन्हां जिवंत करणें" ही गोष्ट, जरी त्यांत अखेरीस अपयश आलें, तरीसुद्धां अत्यंत महत्वाचीच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हा मराठा वीरपुरुष म्हणजे छत्रपति शिवाजीचा पिता शहाजीराजे हा होय; मोंगली सैन्य निजामशाही राज्याचा निकाल उडवून परत फिरतें न फिरतें तोंच शहाजीनें पुन्हां आपलीं प्रचंड कारस्थानें मोठ्या जोरानें व धडाडीनें सुरू केलीं; निजामशाहा व मोंगल यांच्यामधील युद्धांत जगदेवराव जाधव हा मोंगलातर्फे शहाजींशीं युद्ध करीत होता; तथापि त्याच्याकडून अथवा मोंगलाकडून शहाजीचें पारिपत्य झालें नाहीं, अथवा त्यांना त्यास हतवीर्यही करतां आलें नाहीं; इतकेंच नाहीं तर शहाजीनें सह्याद्रीपर्वताच्या डोंगरी प्रदेशाचा* आश्रय घेऊन लवकरच बरेंच मोठें सैन्य जमविलें; व तो

---

* शहाजीनें सह्याद्रि पर्वताच्या डोंगरी प्रदेशाचा आश्रय घेऊन ज्या हालचाली व दौडा केल्या, त्याची योग्य कल्पना होण्याकरितां खालील महत्त्वाची भूगोलविषयक माहिती लक्षांत ठेवणें आवश्यक आहे; तीः—

सह्याद्रि पर्वतापासून डोंगराच्या कित्येक रांगा पश्चिमेकडून पूर्वेकडे गेलेल्या आहेत, त्यांस " सह्याद्रीचे फांटे " असें म्हणतात; या सर्व डोंगरांची व फाट्यांचीं नांवें त्यांतील मुख्य शिखरांवरून पडलेलीं आहेत. या फाट्यांत साल्हेर मुल्हेरचे डोंगर, चांदवडचे डोंगर, व औंढ्या पट्टयाचे डोंगर हे विशेष मोठे व महत्वाचे आहेत; त्यांपैकीं साल्हेर मुल्हेरच्या डोंगराची ओळ

पुन्हां मोठ्या जोरानें व ईर्षेनें निजामशाहीचा उद्धार करण्याच्या खटपटीस लागला.

या काळांत, म्हणजे इ. सन १६३० ते इ. सन १६३३ पर्यंतच्या तीन वर्षांच्या काळांत, शहाजींच्या संसारिक आयुष्यक्रमांत दोन महत्वाच्या गोष्टी

---

बागलाण व मालेगांव तालुक्यांतून पूर्वेकडे गेली आहे; या ओळींत साल्हेर ( ५२५३ फूट ), मुल्हेर ( ४३२० फूट ), गाळणें ( २३१६ फूट ), हीं शिखरें असून त्यांवर डोंगरी किल्ले आहेत.

चांदवडच्या डोंगराची ओळ ही चांदवड व डिंडोरी या तालुक्यांच्या उत्तर सरहद्दीवरून सरळ पुढें जाऊन नंतर मनमाडजवळ दक्षिणेस वळली आहे; व पुन्हां पूर्वेस वळून नांदगांव व येवलें या तालुक्यांच्या मधून ती पूर्वखानदेशांत गेली असून त्यास " अजिंठ्याचे डोंगर " असें म्हणतात; यांतच प्रसिद्ध " अजिंठ्याचीं लेणीं " आहेत. या चांदवडच्या डोंगराच्या ओळींतच सप्तशृंगचा डोंगर (४६५९ फूट), धोडपचा किल्ला ( ४७६१फूट ), इंद्राईचा किल्ला ( ४५२६ फूट ), चांदवडचा किल्ला ( ३९९४ फूट ) व अणकाईचा किल्ला ( ३१८२ फूट ) हीं ठिकाणें आहेत. औंढ्या पट्टयाच्या डोंगराची ओळ इगतपुरी व सिन्नर तालुक्याचे दक्षिण हद्दीवरून पुढें गेलेली आहे; व त्याच्या तीन ओळी असून पहिलींत कळसूबाई, वितनगड, अवंढा प्रतापगड, सोनगड व महाकाळी हीं शिखरें व किल्ले आहेत; त्यांत कळसूबाई हें सर्वांत उंच शिखर असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून ५४५० फूट आहे. दुसरी ओळ म्हणजे रतनगडापासून निघालेली " बालेश्वरी " डोंगराची ओळ ही होय; प्रसिद्ध प्रवरा नदी ही रतनगडाजवळच उगम पावत असून या ओळींत कात्राबाई, सुरा, बालेश्वर, व धुम्या हे डोंगर व उंच शिखरें आहेत; व तिसरी ओळ म्हणजे " ब्राह्मण वाड्याचें डोंगर " ही असून ती हरीश्चंद्रगडापासून पूर्वेकडे व अग्नेयीकडे गेलेली आहे; व " ब्राह्मण वाड्याचा घाट " पुणें–नाशीक मार्गावर आहे. हरीश्चंद्रगडापासून निघालेला सह्याद्रीचा फाटा हा महत्वाचा पाणलोट असून याचे दक्षिणेकडील पाणी भिमा नदीकडे व उत्तरेकडील गोदावरी नदीकडे वहात जातें. चांदवडचे डोंगर व औंढ्या

लागोपाठ घडून आल्या; त्यांपैकीं पहिली म्हणजे इ. सन १६३० मध्यें शहाजीनें विजापूरकरांचा प्रसिद्ध व एकनिष्ठ सरदार, सुपें येथील बाजी मोहिते " अमीरराव " पोगरवाडीकर याची बहीण नामें तुकाबाई हिच्याशीं दुसरा विवाह केला, ही होय; या वेळेपासून ती व राजे संभाजी हीं उभयतां शहाजीबरोबर असत. या बाईचे पोटीं शहाजीस इ. सन १६३१ मध्यें

---

पट्टयाचे डोंगर यांच्यामधील प्रदेशास " गोदावरी नदीचें खोरें " असें म्हणतात; व भिमा नदीच्या कांठच्या प्रदेशास " भिमथडी " म्हणतात. विशेष माहितीः—

(१) घोडप येथें पहिल्या माधवराव पेशव्यानें त्याचा काका राघोबादादा याचा पराभव करून (इ. सन १७६८) त्यांस पकडलें.

(२) गाळणें हा किल्ला पूर्वी होळकराचे ताब्यांत असून त्यांत इ. सन १८३४ पर्यंत होळकराची टांकसाळ होती.

(३) साल्हेर हा किल्ला हल्लीं गायकवाडाच्या ताब्यांत आहे; ह्या किल्ल्यावर मोंगल व मराठे यांच्यामध्यें इ. सन १६७२ मध्यें एक मोठी लढाई झाली.

(४) मुल्हेर, मोसम नदीच्या काठीं; या ठिकाणीं उद्धवस्वामीची समाधी आहे; आश्विन शुद्ध १५ स रास होतो, त्यावेळीं यात्रा भरते.

(५) दिंडोरी, धामण नदीच्या कांठीं; तालुक्याचें ठाणें; पहिल्या माधवराव पेशव्याची आई गोपिकाबाई ही नाशीकजवळील गंगापूर या गांवीं राहण्यास आल्यानंतर दिंडोरी तालुका पेशव्यांनीं तिच्या खासगी खर्चास तोडून दिला होता.

(६) गंगापूर, नाशीकपासून अजमासें सहा मैलांवर, गोदावरी नदीच्या तीरीं आहे. येथील वनश्री आनंददायक असून या गांवीं गोदावरी नदीचा धबधबा आहे; त्याची उंची सरासरी ३२ फूट असून त्यास " दुधस्थळी " व गंगापुरास "गोवर्धन–गंगापूर " असें म्हणतात. येथें गोपिकाबाई इ. सन १७६४ मध्यें राहण्यास आली; व ती तिचा काल होईपर्यंत तेथेंच राहिली. गंगापूर येथें नदीच्या कांठीं गोपिकाबाईस राहण्याकरितां एक सुंदर वाडा बांधण्यांत आला होता; शिवाय नदीस घाट बांधून लहान लहान आराम-

एक पुत्र झाला, तोच व्यंकोजी राजे तंजावरकर हा होय.× आणि दुसरी व पहिलीहूनही अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जिजाबाई व बाल शिवाजी या उभयतांवर आलेलें प्राणसंकट, व त्यांतून ईश्वरीकृपेनें त्यांची झालेली मुक्तता, ही होय. मोंगलाबरोबर युद्ध चालू असतां शहाजीनें मोंगली सैन्यास

---

मंदिरेंही बांधिलीं होतीं; सांप्रत हा वाडा नामशेष झालेला असून त्याच्या जोत्याचे अवशेष मात्र कांहीं ठिकाणीं दृग्गोचर होत आहेत.

गंगापूरच्या पूर्वेस सुमारें तीन मैलांवर "आनंदवल्ली" हें ठिकाण आहे; हें ठिकाण म्हणजे रघुनाथराव ( राघोबा दादा ) पेशव्याचें अमनचमन उडविण्याचें, भाऊबंदकीचीं भुतें नाचविण्याचें, आणि फंदफितुरी व कारवाई-कारस्थानें करण्याचें आवडतें निवासस्थान होय.

( ७ ) हरीश्चंद्रगड–हें थंड हवेचें ठिकाण आहे.

× शहाजीस याशिवाय नाटकशाळेपासून झालेले पांच पुत्र होते; त्या सर्वांच्या आयांचीं नांवें उपलब्ध नाहींत. परंतु शहाजीनें कोणी मता या नांवाच्या एका नाइकिणीस जमीन इनाम दिल्याचा तपशील उपलब्ध आहे. या पांच पुत्रांपैकीं हिरोजी फर्जंद हा शिवाजीच्या जवळ असे; पुढील काळांत आग्रा येथून शिवाजी निसटून आला त्या वेळीं तो त्याच्या बदलीं पलंगावर निजला, व दुसऱ्या दिवशीं "शिवाजी महाराजाकरितां औषध आणण्यास जातों" असें पहारेकऱ्यांना सांगून तो मोठ्या राजरोसपणानें मोंगलांच्या छावणींतून निघून गेला. शहाजीस या हिरोजीशिवाय संताजी, भिवजी, प्रतापजी व रायभान असे चार नाटकशाळेपासून झालेले पुत्र होते; ते कर्नाटकांत तंजावर प्रांतीं व्यंकोजीजवळ रहात असत. त्यांपैकीं संताजी हा शहाजीची गौण स्त्री नामें नरसाबाई हिचे पोटीं झालेला पुत्र असून तो शहाजीचा अतीशयच लाडका होता. "शहाजी महाराजांचा उजवा नव्हे, डावा नव्हे, तर केवळ हातच असा होता" ( रा. म. वि. चंपू पहा. ). तो पुढें, त्याला व्यंकोजीची वागणूक न आवडून त्याच्याशीं भांडून शिवाजी कर्नाटकच्या मोहिमेवर आला असतां त्याला त्रिवादी येथें येऊन भेटला; त्यास शिवाजीनें

अतीशय मंडावून सोडिलें; दौलताबादच्या किल्ल्यास मोंगलांचा वेढा पडला असतां त्या सैन्यावर सारखे छापे घालून शहाजीनें त्यांस अतीशय हैराण केलें; त्यामुळें मोंगल सरदार मोहबतखान चिडीस गेला, आणि शहाजीचा सूड उगविण्याकरितां त्यानें एका निराळ्याच मार्गाचें अवलंबन केलें. शहाजीची पहिली बायको जिजाबाई व मुलगा शिवाजी हीं उभयतां यावेळीं बायझापूर–हें शहर औरंगाबाद शहराच्या पश्चिमेस अजमासें पंचवीस मैलांवर आहे–येथें होतीं; त्यांना पकडून आपल्या ओलीस ठेवून शहाजीस वठणीवर आणावा, व त्याच्या मोंगली सैन्याविरुद्धच्या सर्व चळवळी बंद पाडाव्या, असा त्यानें बेत केला. मोहबतखान हा पहिल्यापासूनच शहाजीस पूर्णपणें ओळखून होता; त्यास तो आपला "एक कट्टा व जबरदस्त प्रतिस्पर्धी" म्हणून समजून होता. शहाजीचे सर्व उद्योग, व त्याचीं सर्व कारस्थानें हाणून पाडण्याचा तो सारखा प्रयत्न करीत होता; पूर्वी फत्तेखान हा निजामशाही राज्याचा सूत्रचालक असतां शहाजी बलाढ्य होऊं नये म्हणून त्यानें पुष्कळ खटपट केली होती. त्या वेळीं फत्तेखानाच्या अमलास कंटाळून गालना येथील किल्लेदार तेथील किल्ला, शहाजीस–त्याच्या जवळून कांहीं सांपत्तिक मोबदला घेऊन–देण्यास तयार झाला असतां मोहबतखानानें मोठी खटपट करून, त्या किल्लेदारास मोठी लालुच दाखवून, आपल्या पक्षांत ओढून घेऊन, तो किल्ला आपल्या स्वाधीन करून घेतला होता आणि या वेळीं, जिजाबाई व शिवाजी या उभयतांना पकडून आपल्या हवालीं करण्याची कामगिरी बजावील, अशा मनुष्याच्या तो तपासांत होता. इतक्यांतच त्याच्या सुदैवानें त्याला ती कामगिरी बजाविणाऱ्या योग्य मनुष्याचा लाभ झाला. हा मनुष्य म्हणजे त्रिंबक* येथील किल्लेदार

---

विशेष सन्मानानें वागविलें, व प्रसिद्ध चंदी येथील ठाण्यावर मुख्य अधिकारी म्हणून त्याची नेमणूक केली.

या शिवाय कोयाजी या नांवाचा एक रक्षापुत्र शहाजीस होता, व त्याच्यावर व्यंकोजीची फार कृपादृष्टी होती (रा. म. वि. चंपू पद्य). असा उल्लेख आढळतो.

* त्रिंबक हें गांव व प्रसिद्ध क्षेत्रस्थान नाशिक जिल्ह्यांत, नाशिकपासून

म्हालदारखान हा होय; निजामशाही राज्यावर मोंगलांनीं चढाई केल्याबरोबर म्हालदारखान हा अतीशय घाबरला व तो मोहबतखानास शरण गेला; आणि "मला बादशाही नौकरींत दाखल करा;" म्हणून त्यानें मोहबतखानास विनंती केली. त्या वेळीं खानानें त्यास सांगितलें कीं, शहाजीचें कुटुंब जिजाबाई व मुलगा शिवाजी हीं उभयतां हल्लीं बायझापूर येथें रहात आहेत; त्यांना, तूं जर पकडून आणून आमच्या स्वाधीन करशील तर, तुझ्या इमानीपणाबद्दल बादशहाची खात्री होऊन तो तुला आपल्या नौकरींत दाखल करील. ही अट त्या किल्लेदारास मान्य झाली; त्यानें जिजाबाई व शिवाजी या उभयतांना पकडण्याचे प्रयत्न सुरू केले; आणि युक्तिप्रयुक्तीनें त्यांना पकडून मोहबतखानाच्या छावणींत आणिलें. यावेळीं लखूजीचा भाऊ जगदेवराव जाधव–जो मोंगलांतर्फे शहाजीबरोबर युद्ध करीत होता तो शहाजीचा चुलत सासरा जगदेवराव जाधव–हाही तेथेंच होता. त्यास ही हकीकत कळल्याबरोबर तो खानास जाऊन भेटला. "शहाजीचें व आमच्या घराण्याचें वांकडें आहे; त्यामुळें त्यानें जिजाबाईस व तिच्या मुलास टाकून दिलेलें आहे; शहाजीचें व जिजाबाईचें पटत नाहीं म्हणून त्यानें मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजबरोबर दुसरा विवाह केला आहे. म्हणून जिजाबाईस व तिच्या मुलास पकडल्यानें शहाजीस वाईट वाटण्याच्या ऐवजीं उलट आनंदच होईल; परंतु त्यामुळें आमचा अतीशय कमीपणा होऊन आमच्या घराण्याची मात्र अब्रू जाईल;" असें खानास सांगून, त्या उभयतांना सोडून देण्याबद्दल त्याच्याजवळ रदबदली केली. खानासही जगदेवरावाचें हें म्हणणें खरें वाटलें. व त्यानें त्या उभयतांना जगदेवरावाच्या स्वाधीन केलें (इ. सन १६३४). तेव्हां त्यानें त्यांना शहाजीच्या ताब्यांतील कोंडणा× किल्ल्यावर लागलीच

---

अजमासें वीस मैलांवर असून, तेथून त्रिंबकपर्यंत पक्क्या सडकेचा रस्ता आहे. बारा ज्योतीर्लिंगांपैकीं "श्री त्रिंबकेश्वर" हें प्रसिद्ध ज्योतिर्लिंग ह्या ठिकाणीं आहे, व येथून जवळच असलेल्या ब्रह्मगिरीच्या डोंगरावर गोदावरी नदीचा उगम असून त्यास "गंगाद्वार" अथवा "गोदाद्वार" असें नांव आहे.

× कोंडणा, कोंडाणे अथवा सिंहगड हा किल्ला पुणें जिल्ह्यांत हवेली तालु-

सुरक्षितपणें पोंचवून दिलें; व अशा रीतीनें जिजाबाई व शिवाजी हीं उभ-यतां या संकटांतून मुक्त झालीं.

शहाजीनें निजामशाहीचा उद्धार करण्याचा पुन्हां उद्योग आरंभिल्या-

---

क्यांत, पुण्याचे नैर्ऋत्येस पंधरा मैलांवर सिंहगड–भुलेश्वर ( हें एक प्रसिद्ध देवस्थान आहे ) डोंगराच्या रांगेतील एका उंच टेंकडीवर बांधलेला आहे. हा किल्ला समुद्रसपाटीपासून ४३२२ फूट व खालील सपाट प्रदेशापासून २३०० फूट उंचीवर आहे. या किल्ल्याची उत्तर–दक्षिण बाजूची चढण फारच बिकट असून ह्याच बाजूस तो फार उंचहि आहे. पुणें येथून सिंहगड येथें जातांना मार्गांत विठ्ठलवाडी, खडकवासलें, डोणजे, व किल्ल्याच्या पायथ्याशीं अतकरवाडी वगैरे खेडीं लागतात; किल्ल्याचा सुमारें दीड मैल चढाव चढून गेलें म्हणजे मेट या नांवाची एक विसावा घेण्याची जागा लागते. तेथून सुमारें एक मैल चढाव चढून वर गेलें म्हणजे किल्ल्याच्या बाहेरच्या बाजूस एक गुहेसारखा भाग दृष्टीस पडतो, व त्यांत खोल पाणी आहे. किल्ल्यावर जाण्याला कांहीं बिकट पायवाटा असून दोन साधारण सोपे मार्ग आहेत. किल्ल्यांत जाण्याला या दोन साधारण सोप्या मार्गांत दोन दरवाजे लागतात. त्यांपैकीं ईशान्येकडील दरवाजास पुणें दरवाजा, व अग्नेयीकडील दरवाजास कल्याण अथवा कोंकणी दरवाजा असें म्हणतात. यांपैकीं कोंकणी दरवाजा-कडील रस्ता पुणें दरवाजाच्या रस्त्याहून सोपा आहे; व त्याच्या रक्षणाकरितां एकाच्या मागच्यांत दुसरा असे आणखी तीन दरवाजे बांधलेले असून प्रत्येक दरवाजाला भक्कम बुरूज बांधलेले आहेत. किल्ल्यांत शिरल्याबरोबर तोंडाशीं खडकांत खोदलेली सुमारें शंभर घोडे बांधतां येतील एवढी एक मोठी घोड्याची पागा आहे. हा किल्ला साधारणतः त्रिकोणाकृति असून त्याची तट-बंदी फार मजबूत आहे. किल्ल्याचें क्षेत्रफळ सुमारें दोन मैल, पूर्वपश्चिम लांबी १००० फूट व उत्तर–दक्षिण रुंदी २५०० फूट असून त्याची उत्तरेकडील बाजू, त्या अंगास अतीशय खोल कडा तुटलेला असल्यामुळें, स्वतःसिद्धच फार मजबूत आहे. इ० सन १६६४ मध्यें, शिवाजी सुरत शहर लुटून परत फिरतो न फिरतो तोंच त्यास शहाजीच्या मृत्यूचें दुःखद वर्तमान सम-

नंतर त्यानें पहिल्यानें विजापूरकरांची मदत मिळविली. यावेळीं खवासखान या नांवाचा एक सरदार अदिलशाही राज्याचा वजीर होता; त्याच्याकडे शहाजीनें मुरारपंतामार्फत बोलणें सुरूं केलें; व त्यास असें कळविलें कीं,

---

जलें; तेव्हां तो लागलीच सिंहगड येथें परत आला, व याच ठिकाणीं त्यानें आपल्या पित्याचें और्ध्वदेहिक कर्म यथासांग करून पुष्कळ दानधर्म केला.

छत्रपति राजाराम महाराज (शिवाजीचा धाकटा मुलगा, व छत्रपति संभाजीचा धाकटा भाऊ) जालना शहर लुटीत असतां त्याच्यावर एकदम मोंगल सैन्य चाल करून आलें; त्यामुळें घाईघाईनें परत येत असतां राजारामास प्रवासांत अतीशय त्रास होऊन नवज्वर झाला व तो सिंहगड येथें आला; तोंच इ. सन १७०० फेब्रुवारींत छातींत विकार होऊन त्यास रक्ताच्या उलट्या होऊं लागल्या; ताप येऊं लागला व लवकरच (इ. सन १७०० मार्च) हा मराठ्यांचा तिसरा छत्रपति एकाएकीं याच सिंहगडावर मृत्यू पावला.

शिवाजीचा नित्यपुजेचा बाण राजाराम जवळ ठेवून पूजित असे. त्याची स्थापना सिंहगडीं करून, व राजारामाची तेथेंच छत्री बांधून, रामचंद्र निलकंठ अमात्य हुकमत पन्हा (हुकूम चालविणारा) यानें त्याच्या व छत्रीच्या पूजानैवेद्याचा व पुण्यतिथीचा खर्च चालण्यास गांव व सरंजाम नेमून दिला. त्याप्रमाणें वहिवाट चालत आहे.

शिवाजीचा प्रसिद्ध स्नेही तानाजी मालुसरे व मोंगल सरदार शूर रजपूत राठोड सरदार उदेभान हे उभयतां याच ठिकाणीं लढून मृत्यू पावले (इ० सन १७७०. फेब्रुवारी). त्यांचीं थडगीं एकमेकांपासून सुमारें दीडशें यार्डांच्या अंतरावर किल्ल्याच्या वायव्य कोंपऱ्यांत आहेत; त्यापैकीं उदेभानाचें थडगें हें पिराचें स्थान मानितात.

ह्या किल्ल्यांत एक हजार मनुष्य राहण्यासारखी जागा असून आंत पाण्याचीं लहान मोठीं दहा बारा टाकीं आहेत; व त्यांचें पाणी स्वच्छ व थंडगार असून फार गोड आहे. किल्ल्यांत एक धर्मशाळा असून तेथें पाहिजे त्यास रहावयास जागा मिळते. हा किल्ला अद्यापि फार चांगल्या स्थितींत आहे.

" निजामशाहीचे एकंदर ८४ किल्ले आहेत; त्यांपैकीं एक दौलताबादचा किल्ला मोंगलांच्या हस्तगत झाला, तरी तेवढ्यामुळें निराश होण्याचें बिनकूल कारण नाहीं; आणि अदिलशाही दरबारानें मला मनापासून मदत केल्यास, मी निजामशाहीची पुन्हां स्थापना केल्याशिवाय राहणार नाहीं. " निजामशाहीच्या नरडीस मोंगलांनीं नख दिलें, ही गोष्ट विजापूरकरास बरी वाटली नाहीं. आपणावर व आपल्या राज्यावर, पुढें केव्हां तरी असाच प्रसंग येणार, अशा वाजवी भितीनें, व निजामशाहींतील कांहीं प्रदेश आपणास मिळेल, या आशेनें अदिलशहा शहाजीस मदत करण्यास तयार झाला. मोंगलांनीं निजामशाहीचा सगळाच मोठा घांस आपल्या घशाखालीं उतरविला, तो विभागून त्याचा थोडासाही भाग त्यांनीं अदिलशहास दिला नाहीं, ही गोष्ट, अदिलशाही मदत मिळण्यास, शहाजीच्या अतिशय फायद्याची झाली; आणि खवासखान, सेनापती रणदुल्लाखान, मुरार जगदेव-कदमराव वगैरे अदिलशाही राज्यांतील प्रमुख मंडळी, व अदिलशहा, हे सर्व शहाजीच्या पक्षास मिळाले. त्यांनीं शहाजीस मदत करण्याचें अभिवचन दिलें; व त्यानंतर लागलीच शहाजीनें पुढील उद्योगास मोठ्या धडाडीनें सुरुवात केली.

शहाजीच्या या उद्योगाची बातमी मोंगल सरदार मोहोबतखान यांस समजल्यावर त्यानें शहाजीस या कार्यापासून परावृत्त करण्यास आपली शिकस्त केली. शहाजीनें मोंगलांची नोकरी सोडिली तरी त्याचे चुलत भाऊ मालोजी, परसोजी व खेळोजी, हे मोंगली सैन्यांतच नोकरीस होते. त्यांपैकीं परसोजी व मालोजी यांच्यामार्फत, मोहबतखान यानें, स्वतः नामानिराळे राहून, दौलताबादचा किल्लेदार इरादतखान यांजकडून शहाजीकडे असा प्रेष पाठविला कीं, " बावीस हजार स्वारांची मनसबी तुम्हास दिल्याबद्दलचें फरमान आम्ही बादशहाकडून आणवून ठेविलेलें आहे; तरी तुम्ही आरंभिलेला उद्योग सोडून देऊन पुन्हां बादशाही नोकरींत येऊन दाखल व्हा; शिवाय तुमचे मुलगे संभाजी व शिवाजी यांनाही स्वतंत्र मोठ्या मनसबा देववूं, आणि तुमच्या इतरही कांहीं मागण्या असल्यास त्याही बादशहाकडून मान्य करवून देऊं." परंतु शहाजीनें मोंगलांचें हें म्हणणें मोठ्या धिक्कारानें अमान्य

केलें × ( काव्येतिहाससंग्रह पत्रें यादी, नंबर ४३८ पहा ). पूर्वीच्या वंशांतील मूर्तुजा या नांवाचा एक दहा वर्षांचा मुलगा, जुन्नरच्या पश्चिमेस तीस मैलांवर असलेल्या जीवधन ऊर्फ अंजराई येथील किल्ल्यांत कैदेंत होता, त्यास तेथून मुक्त करून ( इ. सन १६३३ सप्टेंबर ) भीमगड येथें आणून तख्तावर बसविलें. निजामशाहींतील अनेक कर्तबगार मंडळींची मदत मिळवून त्यानें त्या राज्याचा अंमल पुन्हां पूर्वीप्रमाणें चालू केला. बरेच किल्ले व प्रदेश आपल्या ताब्यांत मिळविले आणि कित्येक हुषार ब्राम्हण आपल्या नौकरींत ठेवून त्यांच्या सल्ल्यानें तो कारभार पाहूं लागला.

---

× काव्येतिहाससंग्रह पत्रें यादी नंबर ४३८ यांत शहाजी भोंसले याची कैफियत दिली आहे; ती पुष्कळ मोठी आहे; म्हणून त्यांतील महत्वाचा मजकूर थोडक्यांत खालीं दिला आहे तो:—

शहाजी महाराज भीमगडी जाताच निजामशाही प्रांत पुणें व जालना बालेघाट पर्यंत जुन्नर व अहंमदनगर, व संगमनेर, व नाशीक व त्रिंबक पर्यंत घेतलें; आणि सात आठ हजार स्वार ठेवून प्रांत लुटूं लागले. इरादतखान दौलताबादेस होते; त्यांस मालोजी भोंसले यांजकडून स्नेह केला, आणि उमेदवार शहाजहां ( शहाजहान ) पादशहा याच्या कृपेचें म्हणून मनसब बेवीस हजारी करार करून फर्मान शहाजी महाराज यांच्या नांवें व वस्त्रें पादशहाचीं आणून दिलीं. आणि शहाजी महाराज ज्याप्रमाणें सांगतील त्याप्रमाणें दिल्लीहून आणवून देऊन शहाजहांचे चाकर करून विजापूरच्या पादशहाचा मुलूक ( ? ) असें इरादतखान याच्या चित्तांत होतें. हें वृत्त महाराजास समजून ते हुशारच होते. मुरारपंतास न कळतां खवासखान याजकडून कागद पत्रें येत होतीं. शहाजी महाराज यांणीं लिहिलें कीं, तुम्हांकडून कांहीं उपराळा ( मदत ) जहाला असतां आम्ही पुनरपि निजामशाही उभी करितो. त्यास खवासखान याच्या चित्तांत होतें; परंतु मुस्तफाखान याच्या विचारास येईना. खवासखान दौलताबादेस गेले. अजुर्देपणानें ( खिन्नतेनें ) इरादतखान याशीं स्नेह केला; आणि शहाजी महाराज यांचें भय होतें, परंतु ही मसलत, याजवरून बहुत संतोष वाटला, आणि पत्राचें उत्तर पाठ-

या वेळीं निजामशाही राज्यांतील तळकोंकण प्रांतावर, सिद्दी सैफ या नांवाचा एक सरदार त्या दरबारातर्फे कारभार पहात होता; त्यास शहाजीनें " नवीन निजामशहाचें स्वामित्व मान्य करून त्यास मुजरा करण्यास यावें, व आम्हास मदत करावी, " म्हणून कळविलें. परंतु त्यानें शहाजीचें हें म्हणणें

---

विलें कीं, वंश निजामशाही म्हणून गादीवर बसवावें असें लिहिलें. मुरारपंत याजबरोबर फौज देऊन कुमकेस शहाजी महाराजांकडे रवाना केलें. शहाजी महाराज श्रीवर्धन किल्ल्याहून निघून कोंकणांत जाऊन निजामशाही वंश कैदेंत होते, त्यांतून दहा वर्षांचा मूल मुरतजा नामें होता त्यास आणून भीमगडीं येऊन तक्तावर बसाविलें. आणि प्रांत घेण्याच्या उद्योगास लागले. सिद्दी साबासफेखान कोंकण प्रांत घेऊन भिवंडीस होता, त्यांस शहाजी महाराज यांणीं पत्र आपल्या व मुरारपंत यांच्या नांवें तुम्ही निजामशहास येऊन भेटावें असें लिहिलें. तेव्हां महाराजांच्या लिहिण्यास राजी न होतां अद्दिलशहाची चाकरी करावी म्हणून कोंकण प्रांत शहाजी महाराज यांच्या स्वाधीन करून निघाले. तों शहाजी महाराज यांणीं फौज त्याच्या पाठलागास पाठविली. तेव्हां उभय लष्करची गांठ पडून युद्ध होऊं लागलें. दोहीं-कडील मनुष्यें बहुत जायां झालीं. सिद्दी अंबर तोफखानाचा सरदार होता, त्यास कैद केला, आणि सफेखान याच्याही फौजेस वेढा दिला. इतक्यांत मुरारपंताकडील फौज कुमकेस येऊन सफेखान यास घेऊन नंतर विजापुरास जाऊन पादशहाची भेट घेतली. बादशहांनीं त्यास दोन लक्ष होन देऊन हरपनहल्ली÷ येथें ठेविलें. नंतर ( ते तेथें ) कांहीं दिवसांनीं मृत्यू पावले. शहाजी महाराजांनीं श्रीनिवासराव यांस मेजवानीस बोलावून कैद करून त्यांजकडील किल्ले व प्रांत घेऊन मुरतजा पादशहास जुन्नरास घेऊन येऊन द्रव्य व सरंजामही बहुत संग्रह केला. दहाबारा हजार स्वार जमविले.

---

÷ हरपनहल्ली हें ठिकाण, व तालुक्याचें गांव हल्लीं मद्रास इलाख्यांतील बल्लारी जिल्ह्यांत, बल्लारीपासून ६६ मैलांवर, व हॉसपेट रेल्वे स्टेशनपासून ५५ मैलांवर आहे. हा गांव उत्तम व नीटनेटका वसलेला असून त्यामुळें प्रेक्षणीय आहे; व येथें जैन लोकांचीही एक वसाहत आहे.

मान्य केलें नाहीं; तथापि महाडपासून जव्हारपर्यंतची सर्व तळकोंकणपट्टी त्यानें शहाजीच्या हवालीं केली; व विजापूर दरबारीं नौकरी करण्याच्या उद्देशानें तो तिकडे जाण्यास निघाला. तेव्हां शहाजीनें पावळ कहूस जवळील खेड या गांवीं त्याच्यावर हल्ला करून त्याचा पराभव केला; त्यास खेडच्या ठाण्यांत कोंडून त्याच्या सैन्याचा अतीशय नाश उडविला; व अखेरीस मुरारपंतानें मध्यस्थी केल्यामुळेंच तो बचावून सुरक्षितपणें विजापूर येथें गेला. अशा रीतीनें सर्व कोंकणपट्टी शहाजीच्या ताब्यांत आली. शिवाय त्यानें पूर्वेस अहंमदनगरपर्यंत व दक्षिणेस निरानदीपासून चांदवडच्या + किल्ल्यापर्यंत सर्व प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला, व तो पुन्हांही पूर्वीप्रमाणेंच बलाढ्य होऊन बसला.

बालराजा मूर्तुजा यांस भीमगड येथें तख्तावर बसविण्याच्या वेळीं विजापूरकरातर्फे मुरारपंत ऊर्फ मुरार जगदेव हा मुद्दाम तेथें आला होता; नंतर

+चांदवड हें नाशीक जिल्ह्यांत एक तालुक्याचें ठिकाण असून तें नाशीकपासून ईशान्येस अजमासें चाळीस मैलांवर व जी. आय. पी. रेल्वेच्या लासलगांव रेलवे-स्टेशनपासून सडकेनें अजमासें बारा मैलांवर आहे. हें गांव "चांदवडच्या डोंगराच्या" पायथ्याशीं वसलेलें असून डोंगरावर एक किल्ला आहे; तो समुद्रसपाटीपासून ३९९४ फूट उंचीवर असून किल्ल्याची चढण अवघड आहे. खानदेश व मुंबई मार्गांमधील महत्वाच्या घाटाजवळील "चांदवडचा किल्ला" हा नाक्याचा असल्यामुळें पूर्वकाळीं तो अतीशय महत्वाचा म्हणून गणला गेलेला होता. चांदवड हें गांव मोंगलाईंत महत्वाची व्यापारी पेठ असून तें पूर्वीं होळकराच्या ताब्यांत होतें. या ठिकाणीं होळकराचा "रंगमहाल" या नांवाचा एक मोठा सुंदर व भव्य वाडा आहे; शिवाय येथें रेणुका व कालिका देवींचीं प्रसिद्ध देवालयें आहेत; तेथून जवळच चांदवडचा डोंगरी किल्ला असून किल्ल्यांत पूर्वीं होळकराची टांकसाळ होती.

लासलगांव स्टेशनपासून तीन मैलांवर मराठ्यांचा प्रसिद्ध व शूर सरदार विठ्ठल शिवदेव दाणी विंचूरकर याच्या संस्थानचें मुख्य ठिकाण विंचूर हें गांव आहे.

हा समारंभ आटोपल्यावर ते उभयतां दौलताबादेवर चाल करून येण्यास निघाले; त्यावेळीं मार्गांत कोरेगांवनजीक भिमा व इंद्रायणी या नद्यांच्या संगमावरील नागरगांव ऊर्फ तुळापूर मुक्कामीं ता. २३ सप्टेंबर इ. सन १६३३ रोजीं, ( शके १५५५, श्रीमुखनाम संवत्सर, भाद्रपद महिना, अमावास्या, सोमवार रोजीं अकरा घटकेस ) सूर्यग्रहण पडलें; ही सूर्यग्रहणपर्वणी साधून मुरारपंतानें सांग व साभरण गजदान, अश्वदान, व गोशतदान केलें; आणि सुवर्णरजतादि चोवीस तुळादानें दिलीं. शिवाय सबंध तुळापूर गांव सोळा ब्राम्हणांस-१ सोनभट देवगिरिस्थ, २ नरसिंहभट अग्निहोत्री, ३ त्र्यंबकभट नांदुरकर, ४ त्र्यंबकभट सुदामे, ५ त्र्यंबकभट खेडकर, ६ भानभट तळेगांवकर, ७ महादेवभट पुरंदरे, ८ त्र्यंबकभट पुराणीक, ९ पुरुषोत्तमभट वैष्णव, १० भानभट वैष्णव, ११ गोपातिभट ढेरे, १२ आपदेव चित्राव, १३ बाळपाठक नाशिककर, १४ रंगनाथभट ग्रामज्योतिषी, १५ सोमनाथभट ग्रामज्योतिषी, १६ पुंडलीक हरिदास पंढरपूरकर ह्या सोळा ब्राम्हणांस अग्रहार दिला; व त्याबद्दल विजापूरकर आदिलशाहाचीं पत्रें करून दिलीं. अग्रहार देण्याची अट अशी आहे कीं, दात्यानें देयांना सालंकृत घरें बांधून देऊन खेरीज झालीं नसतील त्यांचीं लग्नें करून द्यावीं; त्याप्रमाणें गौड नांवाच्या कारागिराकडून ब्राम्हणांना त्यानें सोळा घरें बांधून दिलीं. या व्यतिरिक्त कालिदास या नांवाच्या कवीला, वररुचि या नांवाच्या विद्वानाला, त्रिमलभट या नांवाच्या स्वपुरोहिताला, व रायाराय या आडनांवाच्या ब्राम्हणाला त्यानें भूमिदानें दिलीं; व पुष्कळच इतरही दानधर्म केला; यावेळीं हत्तीची रौप्य-तुला करून तें रुपें ब्राम्हणांना दान करावें, असा मुरारपंतानें विचार केला; परंतु हत्तीची तुला कशी करावयाची, याविषयीं कोणासही युक्ति सुचेना. त्यावेळीं शहाजीनें मुरारपंतास सुचविलें कीं, हत्तीस होडींत चढवावें, आणि त्याच्या भारानें ती ज्या मर्यादेपर्यंत पाण्यांत बुडेल, त्या ठिकाणीं खूण करावी; नंतर हत्तीस होडींतून खालीं काढून तींत पुन्हां दगड भरावे; व केलेल्या खुणेपर्यंत ती पाण्यांत बुडाली म्हणजे ते सर्व दगड काढून घेऊन त्यांचें वजन करावें, म्हणजे हत्तीचें बरोबर वजन कळेल. त्या-

प्रमाणें हत्तीची तुला करून तें रुपें ब्राम्हणांना दान करण्यांत आलें; व त्या वेळेपासून त्याचें पूर्वीचें नागरगांव हें नांव मागें पडून त्यास तुळापूर * हें नांव प्राप्त झालें.

शहाजांनें अदिलशाही सैन्याच्या मदतीनें निजामशाहींतील पुष्कळ प्रदेश व किल्ले आपल्या हस्तगत करून घेतले; परंतु भीमगड हें ठिकाण राजधानीस योग्य नसल्यामुळें, जुन्नर येथें राजधानी न्यावी, असा त्यानें विचार केला. यावेळीं श्रीनिवासराव हा तेथील किल्लेदार असून तो शहाजीचा स्नेही

*याच तुळापूर गांवीं अवरंगझेबानें छत्रपति संभाजी याचा वध केला असून ( ता. ११ मार्च इ.सन १६८९; मनूची. ) त्याठिकाणीं त्याची समाधी जीर्ण स्थितींत आहे. ( भा. इ. सं. वृत्त; १८३४–६९ ). तुळापूर गांवच्या अग्रहारासंबंधींच्या शाहुकालीन पत्रांत खालील मजकूर आहे; मुराररावानें अग्रहार इनाम करून देऊन विजापूरकर पादशाहाचीं पत्रें करून दिलीं; " त्याप्रमाणें महाराज राजेश्री शाहाजी राजे व थोरले कैलासवासी महाराज ( छत्रपति शिवाजी )यांनीं पत्रें देऊन मौजे मजकूर पूर्ववत प्रमाणें समस्त ब्राम्हणांस अग्रहार इनाम चालविला; त्या उपरी आलमगीर बादशाहाचा मुक्काम तुळापूर मजकुरीं होता ते समयीं समस्त ब्राम्हणांनीं पूर्वील पत्रें पादशाहाची दाखवून अर्ज केला, त्यावरून आलमगीर पातशाहांनीं दिवाणी परवाना करून देऊन मौजे मजकूर समस्त ब्राम्हणांस इनाम चालविला. व महाराज राजश्री काकासाहेब (छत्रपति राजाराम) यांनीं इनाम चालविला. कुलबाब कुलवानू देखील सर देशमूख व इनाम तिजाई हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हकदार करून इनाम करून दिल्हा. " म्हणजे शहाजीनेंही या बाबतींत ब्राम्हणांना पत्र दिलें होतें,हें सिद्ध होतें; व पुढील काळांत शिवाजी,राजाराम व शाहू यांनींही तो अग्रहार चालू ठेविला असें स्पष्ट होतें; व या अग्रहारपत्रावरूनच हिंदु व हिंदुधर्मद्वेष्टा म्हणविणाऱ्या प्रसिद्ध अवरंगझेबानें दिवाणी परवाना करून देऊन तुळापूर गांव अग्रहार म्हणून समस्त ब्राम्हणांस इनाम चालविला, ही विशेष महत्वाची व विचारांत घेण्यासारखी गोष्टही स्पष्टपणें निदर्शनास येते.

होता; त्यामुळें तो गोडीनें जुन्नर हें ठिकाण आपल्या ताब्यांत देईल असें शहाजीस वाटत होतें; म्हणून त्यानें श्रीनिवासरावास बोलावून घेऊन सांगितलें कीं, "निजामशहास राहण्यास योग्य जागा नाहीं; सबब तुझ्या ताब्यांत असलेले जुन्नर व आसपासचे किल्ले तूं सरकारांत परत दे; व त्याऐवजीं आम्ही तुझी दुसरीकडे व्यवस्था करून देतों." परंतु त्याचें हें म्हणणें श्रीनिवासराव यानें कांहीं केल्या मान्य केलें नाहीं; तेव्हां नाइलाजानें शहाजीनें त्यास कैद केलें; त्याची सर्व दौलत सरकारजमा केली; जुन्नर शहराचा ताबा घेतला; आणि त्याबरोबरच जीवधन, भोरग, परशगड, हर्षगड, माहुली, सौंदा ऊर्फ सुंडा व खूज हे आसपासचे किल्ले शहाजीच्या ताब्यांत आले. त्यानंतर त्यानें मूर्तुजाशहास जुन्नर येथें आणिलें; व तें शहर कांहीं काळ निजामशाहीची राजधानी बनलें.

अशा रीतीनें शहाजीने मोठ्या धडाडीनें सिद्दीसैफ व श्रीनिवासराव या उभयतांचें पारिपत्य केल्यामुळें त्याचा अतीशय लौकीक झाला; महत्व वाढलें; त्यास गोवळकोंडेकरांची मदत मिळाली. निजामशाहीचा अभिमान बाळगणारी जहागिरदार, दरकदार—देशमूख, व इतर मंडळी त्याच्या पक्षास मिळाली; बेकार होऊन इकडे तिकडे भटकत फिरणारें निजामशाहीचें बारा तेरा हजार सैन्य आपण होऊन त्याच्याकडे येऊन, त्याच्या नौकरींत राहिलें; आणि स्वकीयांची सहानुभूती व साह्य, आणि विजापूर व गोवळकोंडे येथील परकीय राज्यांची मदत, यामुळें त्यास दुप्पट हिंमत येऊन त्यानें मोंगलांचा प्रतिकार करण्याची मोठ्या निश्चयानें व जोरानें तयारी केली.

इकडे मोंगल सरदार मोहबतखान हाही शहाजीचे सर्व बेत हाणून पाडण्याची खटपट करीत होता; त्यामुळें परांडा येथील प्रसिद्ध व नाक्याचा किल्ला आपल्या ताब्यांत घेण्याचा त्याचा मनसुबा होता; उलटपक्षीं हा महत्वाचा किल्ला मोंगलांच्या ताब्यांत जाऊ नये, याबद्दल अदिलशहाची खटपट चालू होती. त्याप्रमाणें विजापूरकरांनीं तेथील किल्लेदारास वळवून व त्यास तीन लक्ष होन देऊन तो किल्ला आपल्या ताब्यांत घेतला; त्यामुळें मोहबतखानास अतीशय राग आला; त्यानें शहाजादा सुजा यास, मोठें सैन्य बरोबर देऊन परांड्याचा किल्ला हस्तगत करून घेण्यास पाठविलें; त्या-

प्रमाणें सुजानें तिकडे जाऊन किल्ल्यास वेढा घातला; तेव्हां मुरारपंतानें किल्ल्यांतील लोकांच्या मदतीस आणखी फौज रवाना केली; मोंगल सैन्याशीं युद्ध चालविलें; आणि आपल्या बाजूनें उठावणी करून मोंगलांस पायबंद बसविण्याविषयीं शहाजीस निकडीचीं पत्रें रवाना केलीं.

शहाजीस ही हकीकत कळल्यावरोबर त्यानें अहंमदनगरजवळ मोठी फौज जमविली; दौलताबाद व बेदर या प्रांतांवर स्वारी करून तिकडील प्रदेश लुटून फस्त केला; मोंगल लष्कराकडे जाणारी धान्यसामुग्रीचीं कारवानें रस्त्यांतच लुटलीं; आणि त्यांचे दळणवळणाचे सर्व मार्ग बंद करून मोंगली सैन्यास अतीशय त्रास दिला. तेव्हां मोहबतखानानें त्याच्यावर पुन्हां स्वतंत्र सैन्याची रवानगी केली; परंतु हें सैन्य नजदीक आल्याबरोबर शहाजीनें लागलीच डोंगरी प्रदेशाचा आश्रय घेतला; त्यामुळें त्या सैन्यास तसेंच परत जावें लागलें; इकडे, हें सैन्य परत गेल्याबरोबर शहाजीनें पुन्हां लागलीच मोंगल सैन्यास त्रास देण्यास सुरवात केली; आणि चोहोंकडून पूर्ण नाकेबंदी करून सुजा व त्याचें मोंगली सैन्य उपाशी मरण्याचा प्रसंग आणिला. त्यामुळें त्या सैन्याचे अतीशय हाल होऊं लागले; आणि त्यांतच अदिलशाही सैन्यानेंही बाहेरून सारखा उपद्रव दिला; त्यामुळें अखेरीस नाइलाजानें—पुष्कळ नुकसान सोसून व अपयश घेऊन—वेढा उठवून ( इ० सन १६३४; मे ) सुजा यांस आपल्या सैन्यासह बऱ्हाणपुरकडे परत जाणें भाग पडलें.

ही हकीगत शहाजहान यांस कळल्यावर तो अतीशय संतापून गेला; गनीमीकाव्याच्या युद्धानें सतत दहा वर्षें आपल्या सैन्यास शहाजीनें अतीशय सतावून सोडिलें, याबद्दल त्यास शहाजीचा अतीशय राग आला. आपण नामशेष केलेली निजामशाही शहाजीनें पुन्हां उभी केली, आपला सर्व खटाटोप व्यर्थ झाला, यामुळें शहाजहान चिडीस गेला; विजापूरकर व गोवळकोंडेकर या उभयतांकडून शहाजीस मिळणारी मदत बंद पाडण्याकरितां दक्षिण प्रांताचा त्याकाळापर्यंत फक्त एकच " खानदेश " या नांवाचा सुभा होता तो मोडून दौलताबाद व अहंमदनगर हे दोन भाग केले; ( इ० सन १६३४ ). खान डौरान व खान झमन या दोन सरदारांना त्यांच्या बरोबर पुष्कळ सैन्य देऊन

शहाजीवर पाठविलें; व ते उभयतां दक्षिणेंत येऊन पोंहोंचल्याबरोबर खान डौरान यानें शहाजीवर मोहीम करण्याची मोठ्या जारीनें तयारी केली.

शहाजीस मोंगलांच्या एकंदर हालचालीची पूर्ण बातमी असल्यामुळें तो पहिल्यापासूनच सावध होता. त्यानें, खान डौरान आपणांवर चाल करून येण्याच्या पूर्वींच, आपल्या ताब्यांतील निरनिराळ्या महत्वाच्या ठाण्यांवर अधीक शिबंदी पाठवून त्यांच्या बचावाची तजवीज केली; व आपला बारा वर्षांचा मुलगा संभाजी याजबरोबर दोन हजार स्वार देऊन, व त्यास संगमनेर येथें ठेवून, त्या ठाण्याचें संरक्षण करण्याची, व वेळ पडल्यास जुन्नर येथें कुमक करण्याची कामगिरी त्याच्याकडे सोंपविली; आणि आपण दौलताबादच्या आसपास तळ देऊन राहिला. इतक्यांत खान डौरान त्याच्यावर चाल करून आला; तेव्हां तो तेथून निघून रामदुधाकडे गेला; व त्या परगण्यांत त्यानें लुटालूट आरंभिली; तोंच खान डौरान तेथें येऊन दाखल झाला; तेव्हां शहाजी लागलीच शेवगांव+ परगण्यांत घुसला; व तेथून मोहरीच्या×

---

+ शेवगांव हें तालुक्याचें ठिकाण अहंमदनगर जिल्ह्यांत ईशान्येस, अजमासें बेचाळीस मैलांवर, अहंमदनगर-पैठण-औरंगाबाद सडकेवर आहे. या तालुक्याच्या सरहद्दीवर गोदावरी नदी असून पलीकडे निजामच्या राज्यांतील प्रदेश आहे; व पैठण हें निजाम हद्दींत शेवगांव पासून बारा मैलांवर गोदावरी नदीच्या कांठीं असून तेथें एकनाथ महाराजाची समाधी आहे. तेथें फाल्गुन वद्य ६ ला फार मोठी यात्रा भरते. येथें एक मोठा दगडी रांजण असून त्यांत हजारों लोक पाणी आणून टाकीत असतात; परंतु तो भरत नाहीं; पण यात्रेच्या म्हणजे नाथषष्ठीच्या दिवशीं तो उचंबळून वाहूं लागतो. हाच चमत्कार पाहण्यासारखा आहे. पूर्वी या शहरास " प्रतिष्ठान " असें म्हणत असत.

×मोहरी घाट हा नगर जिल्ह्यांत जामखेड महालांत खर्डे-जामखेड-जातेगांव या सडकेच्या रस्त्यावर आहे.

विशेष माहितीः—खर्डे हा गांव जामखेड महालांत असून तो इतिहासप्रसिद्ध आहे; त्यास " शिवपट्टण " असेंही म्हणतात; येथील भुईकोट किल्ला पाहण्यासारखा असून याच ठिकाणीं मराठे व निजाम यांच्यामधील प्रसिद्ध

घाटानें निसटून पारगांवाकडे गेला; याप्रमाणें सतत सहा महिने मोंगल सैन्य शहाजीच्या पाठीस लागलेलें होतें; तरी एकदां सुद्धां या सैन्याची शहाजीशीं गांठ पडली नाहीं. तथापि एकदां खान डौरान यानें शहाजीच्या सैन्याच्या एका तुकडीवर हल्ला करून तिचा पूर्ण पराभव केला; पुष्कळ लोकांची कत्तल उडवून तीन हजार लोक कैद केले;व धान्य वगैरे सामुग्रीनें भरलेल्या आठ हजार बैलांचा तांडा आपल्या हस्तगत करून घेतला; परंतु त्यामुळें शहाजीचें फारसें नुकसान झालें नाहीं; उलट त्याचा सारखा पाठलाग करून करून मोंगली सैन्य मात्र थकून व त्रासून गेलें; व इतक्यांतच पावसाळा लागल्यामुळें त्या सैन्यास छावणीकरितां मुक्कामास परत जाणें भाग पडलें.

शहाजीनें दक्षिणेंत माजविलेली बंडाळी अजूनही मोडत नाहीं, उलट अधीक वाढत आहे, असें पाहून शहाजहान हा आपणाबरोबर पन्नास हजार फौज घेऊन ताबडतोब दक्षिणेंत आला; व दौलताबाद येथें मुक्काम करून राहिला; ( ता० २२ फेब्रूवारी इ० सन १६३६ ). नंतर त्यानें लागलीच आपले वकील विजापूरकराकडे पाठविले, आणि अदिलशहाशीं असें बोलणें लाविलें कीं, “ निजामशाही राज्याचे तुम्ही घेतलेले सर्व किल्ले परत द्यावें; तुम्ही परिंडा किल्ल्यावरून विजापूर येथें नेलेली “ मुलुख मैदान ” तोफ आम्हांस द्यावी; विशेषतः शहाजीचा पक्ष सोडावा व त्यास अथवा त्याच्या पक्षांतील लोकांस बिलकुल मदत करूं नये. याप्रमाणें वागण्यास तुम्ही कबूल असल्यास निजामशाही अमलाखालील सर्व कोंकणपट्टी, सोलापूरचा किल्ला व त्याखालील प्रदेश, तुम्हास देऊं; व त्याप्रमाणें तुम्ही कबूल नसाल तर तुमचेंही राज्य आम्हां निःसंशय बुडवून टाकूं;” परंतु अदिलशहानें शहाजहानच्या अटी

---

खर्डा येथील मोठें युद्ध होऊन ( इ० सन १७९५ ) त्यांत मराठ्यांनीं निजामावर मोठाच विजय मिळविला.

या मोहिमेच्या दरम्यान नागलवाडी ( ता० कर्जत ) येथें सीना नदीच्या कांठीं मराठ्यांच्या सैन्याचा तळ पडला होता; त्या वेळीं सोईस्कर जागा करण्यासाठीं सिना नदीच्या पात्रांत जमीन करून प्रवाह वळण देऊन पलीकडे सारिला तो अद्याप तसाच आहे.

मान्य केल्या नाहींत; तेव्हां शहाजहान यानें आपल्या सैन्याचे चार भाग करून त्यांतील दोघांची विजापूरकरावर व दोघांची शहाजीवर रवानगी केली; त्यावेळीं खान डौरान यांस त्याच्या मदतीस आणखी एक सरदार देऊन विजापूरकरावर पाठविलें; आणि शहाजीवर पाठविलेल्या सैन्यापैकीं एका भागावर शाइस्तेखानाची नेमणूक केली; व त्यास शहाजींच्या ताब्यांतील चांदवड, नाशीक व संगमनेरकडील सर्व प्रदेश व किल्ले हस्तगत करून घेण्याची कामगिरी सोंपविली; व दुसऱ्या भागावर खान जमान यांस नेमून शहाजीस दक्षिणेंतील मैदान प्रदेशांतून हांकलून त्याचा पाठलाग करण्याची व त्याच्या ताब्यांतील कोंकणपट्टींतील प्रदेश व किल्ले हस्तगत करून घेण्याची कामगिरी सांगितली.

खान डौरान विजापूरकरावर चाल करून निघाल्यावर मार्गांत भोंसल्यांच्या मूळ वस्तीच्या गांवांपैकीं चांभारगोंदें उर्फ श्रीगोंदें× वगैरे गांवें त्यानें लुटिलीं; व शहाजीची बातमी ठेवून तो पारगांवकडे+ आला. त्याठिकाणीं त्याची व शहाजींची गांठ पडली; तथापि शहाजीनें सतत तीन महिने त्यास धुलकावण्या दाखविल्या; व अतीशय त्रासवून सोडिलें. इतक्यांत, " विजापूरकर मोंगलाशीं तह करण्याच्या वाटाघाटींत आहेत; " असें त्यास कळलें; तेव्हां तो तसाच पश्चिमेकडे वळला; तोंच खान जमान त्याच्या पाठीवर येऊन थडकला; व त्यानें शहाजीस भीमापार पुण्यापर्यंत घालवीत नेलें. नंतर शहाजीनें लोह-

---

× श्रीगोंदे हें तालुक्याचें गांव, दौंड मनमाड रेलवेवरील पिंपरी स्टेशन पासून अजमासें सात मैलांवर व अहंमदनगरपासून अजमासें बत्तीस मैलांवर दक्षिणेस आहे.

+पारगांव ऊर्फ पेडगांव, हें श्रीगोंदें तालुक्यांत असून श्रीगोंदें व पारगांव हीं दोन्हीं गांवें सरस्वती नदीच्या कांठीं आहेत; ही नदी कोथूळ जवळच्या डोंगरांत उगम पावून, तेथून दक्षिणेकडे वहात जाऊन पारगांवाजवळ भीमा नदीस मिळते; म्हणजे पारगांव हें ठिकाण सरस्वती व भिमा या दोन नद्यांच्या संगमावर आहे. पारगांव येथें बहादूरगड ह्या नांवाचा एक भुईकोट किल्ला आहे; व पूर्वकाळीं हें महत्त्वाचें ठाणें म्हणून गणलें गेलेलें असून पेशव्यांच्या वेळीं ह्या ठिकाणीं परगण्याची कचेरी होती, असा उल्लेख आढळून येत आहे.

गडच्या माचीचा आश्रय घेऊन तिकडील सर्व मार्ग बंद केले; त्यामुळें खान जमानाचा नाइलाज होऊन तो अहंमदनगर येथें परत आला, व शहाजी तेथून निघून पुण्याजवळ येऊन राहिला.

इकडे शहाजीचा मुलगा संभाजी हा संगमनेर येथें तळ देऊन राहिला होता, त्याच्यावर शाइस्तेखानानें स्वारी केली; ( इ० सन १६३६ मार्च ) व त्यास तेथून हुसकावून लाविलें; तेव्हां संभाजी नाशीक ÷ येथें गेला; त्याच्या

---

÷ नाशीक, हें शहर इ० सन १८६९ पासून जिल्ह्याचें मुख्य ठिकाण झालें आहे; व ऐतिहासिक व धार्मिक दृष्टया हें शहर महत्वाचें असून तें गोदावरी नदीच्या कांठीं वसलेलें आहे; नदीचा प्रवाह शहराच्या उत्तर व पूर्व दिशेनें वहात असून हें शहर जी. आय. पी. रेलवेच्या नाशीकरोड स्टेशन पासून पांच मैलांवर आहे. पुराणांतरीं या शहरास पद्मनगर, त्रिकंटक, व जनस्थान अशीं नांवें दिलेलीं असून मुसलमानी अमलांत त्यांस " गुलछनाबाद " हें नांव होतें. त्यावेळीं शहराला गढी व तट होता; तो आतां अगदीं पडला असून तटाचे भगूर दरवाजा, त्रिंबक दरवाजा, आसराची वेस, ह्या वेशी अद्यापि कायम आहेत. ह्या भागास "जुनें नाशीक" असें म्हणतात. या भागांत जुम्मा मशीद व पीर जाद्यांचें थडगें असून त्यांस सरकारी नेमणूक आहे; शिवाय " जोग" ह्यांच्या वाड्यांत मदिना येथून सोळाव्या शतकांत आलेल्या शादक-शाह हुसेनी या साधूचें थडगें असून त्याचा दरवर्षी मोठा उरूस भरत असतो. नाशीक हें शहर इ० सन १७६२ पासून, म्हणजे पहिल्या माधवराव पेशव्याच्या कारकीर्दीपासून, विशेष भरभराटीस येण्यास प्रारंभ झाला; पेशव्यांनीं आपणांस राहण्याकरितां तेथें एक वाडा बांधला, व ते मधून मधून तेथें येऊन राहूं लागले. ह्या वाड्यास " पेशव्यांचा वाडा " अथवा " सरकारवाडा " असें म्हणतात. ह्याचें बांधकाम, व चौथऱ्याचा गुळगुळीत व तोंड दिसण्या-इतका सफाईदार दगड, हें पाहण्यासारखें आहे; पेशव्यांनीं गंगेवरील कोट, घाट व पटांगण हीं बांधलीं आहेत; ह्या भागास "नवें नाशीक " असें म्हणतात. त्याचे " नाव दरवाजा " " दिल्ली दरवाजा " " मल्हार दरवाजा " वगैरे

पाठोपाठ शाइस्तेखानही तेथें गेला; तो आला असें पाहून संभाजी कोळवणांत शिरला; व दुसऱ्या घाटानें परत येऊन त्यानें अहंमदनगरपर्यंत लूटालूट

---

मुख्य रस्ते आहेत. शहरांत व आसपास बरींच प्रसिद्ध देवालयें व प्रेक्षणीय स्थळें आहेत. त्यांची माहिती थोडक्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे तीः—

( १ ) सुंदर नारायण—हें देवालय जुन्या तऱ्हेच्या बांधणीचें असून नव्या पुलाजवळ आहे; व त्यांस सरकारातून आठशें रुपयांची नेमणूक आहे.

( २ ) बालाजी—हें मंदिर इ० सन १७७१ मध्यें बाप्पाजी बोवांनीं बांधिलें असून त्यास तेरा गांवें इनाम आहेत; व त्याशिवाय कांहीं संस्थानिकांनींही ह्या देवस्थानास नेमणुका दिलेल्या आहेत; त्यामुळें हें संस्थान श्रीमंत आहे.

( ३ ) गोरारामः—हें मंदिर चांदोरीचे जहागिरदार हिंगणें यांनीं बांधिलें.

( ४ ) तिळ भांडेश्वर—हें देवालय त्रिंबकराव मामा पेठे यांनीं इ० सन १७६३ मध्यें बांधलें.

( ५ ) भद्रकाळी—हें देवालय गणपतराव पटवर्धन यांनीं इ० सन १७९० मध्यें बांधिलें.

गोदावरी नदीच्या उत्तर तीरावर, नाशीकच्या समोरच "पंचवटी" हें गांव वसलेलें असल्यानें, नाशीक मध्येंच त्याचा समावेश करितात; येथें अनेक प्रसिद्ध व प्रेक्षणीय देवालयें व स्थळें आहेत; त्यांची माहिती स्थलाभावामुळें अगदींच थोडक्यांत दिली आहे, ती खालीं लिहिल्याप्रमाणेंः—

( १ ) काळारामः—हें मंदीर विशेष प्रेक्षणीय असून तें रंगराव ओढेकर यांनीं इ०सन १७८२ मध्यें बांधिलें; त्यास तेवीस लक्ष रुपये खर्च आला. या देवालयास वापरलेला दगड रामशेजच्या डोंगरांतून आणला होता. दर रामनवमीस येथें मोठा उत्सव होतो; व चैत्र शु० ११ स रथोत्सवाच्या वेळीं या ठिकाणीं मोठी यात्रा भरत असते. या उत्सवाच्या व देवस्थानाच्या खर्चाकरितां शिगवें हा गांव इनाम करून देण्यांत आला आहे. ओढें हा गांव नाशिक जिल्ह्यांतच गोदातीरीं असून तो रंगराव ओढेवर यांस पेशव्याकडून जहागीर मिळालेला आहे.

चालविली. ही हकीकत शाइस्तेखानास कळल्याबरोबर तो तावडतोब नाशीक सोडून अहंमदनगरच्या बचावाकरिता तिकडे धांवून आला; व त्याच वेळीं पंधराशें लोकांची एक टोळी त्यानें जुन्नर–शिवनेरी हस्तगत करून घेण्याकरितां तिकडे पाठविली; आणि इकडे शाइस्तेखानाची पाठ वळल्याबरोबर संभाजी

---

( २ ) कपालेश्वर–हें शिवालय जुन्या तऱ्हेचें बांधलेलें असून तें पुढें मोंगलांनीं उद्ध्वस्त केल्यावर इ० सन १७२८ त कोळी राजानें बांधविलें; व पुन्हां अलीकडेही त्याची दुरुस्ती करण्यांत आलेली आहे. या देवालयांत नंदी नाहीं, हें येथील एक मोठेंच वैशिष्ट्य आहे.

( ३ ) रामेश्वर— हें शिवालय नारो शंकर दाणी राजेबहादूर मालेगांव-कर यांनीं बांधिलें; या देवालयाच्या पुढील दरवजावरील दगडी चोकोनी जागेत, एक मोठी घंटा टांगलेली असून ती वसई येथून पोर्तुगीज लोकां-कडून आणिलेली आहे; ती इ. सन १७२१ मध्यें ओतलेली असून तिचा अवाज तीन मैलपर्यंत ऐकू जातो. या देवालयावर प्रशस्त गच्ची असून तेथें व घंटा टांगलेल्या ठिकाणीं जाण्याला उत्तम जिने आहेत.

गोदावरी नदीस नाशीक येथें दुतर्फा घाट असून नदीच्या पात्रांत अनेक कुंडें आहेत; त्यांतील राम, लक्ष्मण, सीता, अहल्या वगैरे कुंडें प्रसिद्ध आहेत; नदीस, पात्रावरून जाण्यायेण्यास सांडवे ( लहान पूल ) बांधलेले आहेत; व दोन्ही बाजूस कांठावर सुंदर मंदिरें, वगैरे असल्यामुळें येथील देखावा मोठा आल्हादकारक व आनंददायक असतो; त्याप्रमाणेंच तपोवनांतील दाट झाडी, देवालयें, व नदीचा सुंदर देखावा ही असून सीता गुंफा, मुठे यांचें राममंदीर, वगैरे अनेक स्थळें पाहण्यासारखीं आहेत; शिवाय, नाशीकच्या उत्तरेस चार मैलांवर म्हसरूळ येथें सिता सरोवर व डोंगरांत जैनांचीं लेणीं, आणि मुंबई–आग्रा सडकेवर, नाशीकच्या पश्चिमेस सहा मैलांवर, तीन हजार फूट उंचीच्या डोंगरावर, पांडव लेणीं, हीं स्थळेंही विशेष प्रसिद्ध असून प्रेक्षणीयही आहेत.

इतर विशेष ऐतिहासिक माहितीः—

(१) चांदोरी—हा जहागिरी गांव याच जिल्ह्यांतील निफाड तालुक्यांत

अहंमदनगरकडून निसटून पुन्हां आपल्या पूर्वस्थानीं संगमनेर येथें येऊन दाखल झाला; त्यामुळें मोंगल लोकांनीं आतांपर्यंत केलेला सर्व खटाटोप व्यर्थ झाला.

जुन्नरवर मोंगल सैन्य चाल करून येत आहे, असें पाहून जिजाबाई आपला नऊ वर्षांचा मुलगा शिवाजी यांस बरोबर घेऊन माहुलीच्या किल्ल्याच्या आश्रयास गेली; त्यावेळीं जुन्नर येथें रहात असलेला नवा निजामशहा मूर्तुजा हाही तिजबरोबर तिकडे गेला; त्यानंतर मोंगल सैन्य जुन्नर येथें येऊन पोहोंचलें; व त्यांनीं जुन्नरचें ठाणें आपल्या ताब्यांत घेतलें. ही बातमी संगमनेर येथें संभाजीस समजतांच तो आपल्या कुटुंबांतील माणसें—आपली आई व भाऊ—व निजामशहा याच्या बचावाकरितां जुन्नर येथें तावडतोब निघून आला; परंतु त्या पूर्वींच ही सर्व मंडळी तेथून निसटून माहुली येथें गेलीं असल्याचें त्यांस समजलें; संभाजी जुन्नर येथें येतांच मोंगलांनीं तेथील ठाण्याबाहेर येऊन त्याच्याशीं युद्ध केलें; परंतु त्यांत बाल संभाजीनें मोंगलांचाच पराभव करून त्यांना आपल्या ठाण्यांत परत पिटाळून लाविलें; व जुन्नर शहरास वेढा घालून त्यांचा कोंडमारा केला. ही हकीकत शाइस्तेखानास समजतांच तो लागलीच जुन्नर येथें आला; ( मे,

---

गोदावरी नदीच्या कांठीं आहे; मराठ्यांचे दिल्ली येथील वकील हिंगणे, यांना हा गांव जहागीर आहे.

कोठूरें—दादो ऊर्फ दाजी विठ्ठल बरवे नेवरेकर ( नेवरें हा गांव कोकणांत रत्नागिरीच्या उत्तरेस दहा मैलांवर आहे. ) यांची कन्या नामें राधाबाई ही बाळाजी विश्वनाथ पेशव्यास दिली होती; दादोपंताचा मुलगा मल्हारपंत ऊर्फ महादजी यांस, छत्रपति शाहू यानें हा गांव इ० सन १७१९ मध्यें जहागीर दिला; महादजीचा मुलगा अंताजी ऊर्फ बाबूराव बर्वे यांस बहिरोपंत पिंगळे याच्या भावाची मुलगी शाहूच्या विद्यमानें देण्यांत आली, व तेव्हां पासून देशस्थ व कोंकणस्थ यांचे विवाहसंबंध होऊं लागले. कोठूरें हें गांव नाशीक जिल्ह्यांत सिन्नर तालुक्यांत गोदावरी नदीच्या कांठीं आहे. बाबूराव बर्वे हा इ० सन १७४९ मध्यें कोठूरें येथें मृत्यू पावला.

इ० सन १६३६ ). संभाजीस वेढा उठविण्यास भाग पाडून त्या सैन्याची मुक्तता केली; संभाजीच्या सारखा पाठीवर राहून त्यास भीमा नदीच्यापलीकडे घालवून दिलें आणि बरोबर तोफखाना नसल्यामुळेंच शिवनेरीचा मजबूत किल्लाX हस्तगत करून घेण्याच्या भानगडींत न पडतां, जुन्नरच्या ठाण्याचा योग्य बंदोबस्त करून, तो शहाजहान बादशहाच्या भेटीकरितां दौलताबाद येथें निघून गेला.

---

Xशिवनेरी उर्फ जुन्नरचा किल्ला, हा पुणें जिल्ह्यांत जुन्नरच्या पश्चिमेस सुमारें अर्ध्या मैलावर आहे. त्याची उंची एक हजार फूट, लांबी अजमासें एक मैल, व आकार त्रिकोणाकृति आहे. किल्ल्यांत जाण्याची वाट जुन्नरच्या नैर्ऋत्य दिशेकडून आहे; व मार्गांत "बारा बावडी" या नांवाची एक मोठी विहीर आहे. तेथून थोडे पुढें सुमारे सहाशें कदमांवर एक मोठें वडाचें झाड आहे. तेथून किल्ल्याच्या चढावास प्रारंभ होतो; व तेथून जवळच पहिला दरवाजा अजमासें ८०-९० पावलांवर; दुसरा म्हणजे "परवानगीचा दरवाजा" पुढें तितक्याच अंतरांवर; तिसरा म्हणजे "हत्ती दरवाजा" लागतो; येथून वीस पावलांवर चौथा दरवाजा आहे, व त्याच्याचजवळ एक पिराचें स्थान आहे; म्हणून त्यास "पिराचा दरवाजा" म्हणतात. येथून अजमासें अडीचशें कदमांवर पांचवा म्हणजे "शिवाई देवीचा" अथवा "शिवा बाईचा दरवाजा" म्हणून दरवाजा आहे. हा दरवाजा मोठा भक्कम व भव्य असून त्याला अणीदार मोठमोठे लोखंडी खिळे मारिलेले आहेत. या दरवाजाच्या आंत डाव्या बाजूस कांहीं लेणीं व टांकीं असून उजव्या बाजूस टेंकडीवर जाण्याच्या रस्त्याशिवाय आणखी एक दरवाजा आहे; त्या रस्त्यानें २९० यार्डांवर एक लहान कमानदार दरवाजा आहे, व त्याच्या आंत थोड्याशा पायऱ्यावर चढून गेलें म्हणजे त्या ठिकाणीं शिवाई देवीचें देवालय आहे. हें देवालय एका भुयारावर बांधिलेलें असून देवीच्या मागील बाजूस आहे; किल्ल्यांत हनुमान व गणपती या दोघांच्या मूर्ती असून "कमान टांके, गंगाजमना टांके, मोती टांके," वगैरे बावन्न टाकीं आहेत; त्यांतील गंगाजमना या टाक्याचें पाणी फारच उत्तम आहे, व ह्या टाक्याच्या आंतून मोठमोठे दगडी खांब कोरिलेले

मध्यंतरीं शहाजहान बादशहाची, शहाजी व अदिलशाही राज्याविरुद्धची, ही सर्व प्रचंड तयारी पाहून गोवळकोंडेकर अब्दुल्ला कुत्बशहा हा घाबरून गेला; त्यानें बादशहास शरण जाऊन त्याचें स्वामित्व मान्य केलें; व त्यास दरसाल खंडणी देण्याचें कबूल केलें. मोंगल बादशहाची तावेदारी पत्करून

---

आहेत. किल्ल्यांत "कोळी चौथरा" या नांवाचा एक फरसबंदी चौथरा आहे; इ० सन १६५०च्या सुमारास पुणें प्रांतांतील कोळी लोकांनीं फार मोठें बंड केलें;त्यावेळीं मोंगलांनीं आपलें सैन्य पाठवून त्यांचा पराभव केला;हजारों लोक कैद केले, व हजारों कोळ्यांचीं डोकीं उडविलीं; त्यांची ज्या ठिकाणीं कत्तल केली, त्या ठिकाणांस " कोळी चौथरा " असें म्हणतात. त्याप्रमाणेंच किल्ल्याखालीं " पंच लिंगाचें स्थान " आहे. इ० सन १७७७ मध्यें नाना फडणिसाचा मेहुणा बळवंतराव बडे यानें पांच बंडखोर व फरारी झालेल्या कोळ्यांना पकडून किल्ल्याखालीं ठार मारिलें; ते पिशाच्चरूपानें त्याच्या पाठीस लागले; तेव्हां त्यांना शांत करण्याकरितां त्यानें किल्ल्याच्या पायथ्याशीं त्यांच्या नांवानें पांच लिंगें स्थापन करून त्यांवर एक देवालय बांधिलें,त्यांस"पंचलिंगाचें स्थान" म्हणतात. इ. सन १६५७ मध्यें शिवाजीनें जुन्नरवर स्वारी करून अकरा लाख रुपयांची लूट मिळविली; व इ० सन १६७० व इ. सन १६७५ या दोन वर्षीं शिवाजीनें शिवनेरी किल्ला हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं; पुढें इ. सन १७१६ मध्यें छत्रपति शाहू याच्या कारकीर्दींत मराठ्यांनीं तो मोंगलापासून हस्तगत करून घेतला. इ. सन १७९३ मध्यें राघोबा दादाचे चिरंजीव द्वय बाजीराव व चिमणाजी या उभयतांना नाना फडणिसानें जुन्नरच्या गडींत प्रतिबंधांत ठेविलें होतें. इ० सन १७९५ मध्यें सवाई माधवराव मृत्यू पावल्यावर परशुरामभाऊ पटवर्धन जुन्नरास आला; व " गाईचें शेंपूट धरून " शपथ विधी होऊन पुढें दुसरा बाजीराव पेशवाई पदावर आला. इ. सन १८१८ मध्यें, मेजर एल्ड्रिज हा बाजीरावाचा पाठलाग करीत जुन्नर येथें येऊन त्यानें ता० २१ मे रोजीं शिवनेरी किल्ला हस्तगत करून घेतला. येथें अण्णाभाई रत्तीकर या नांवाचा एक किल्लेदार होता; तो आधींच हडसरच्या किल्ल्यावर पळून गेला होता; त्यास

त्यानें भावी अरिष्टांमधून आपली मुक्तता करून घेतली; परंतु अदिलशहा त्याच्याप्रमाणें बादशहास शरण आला नाहीं. तेव्हां शहाजहान यानें शहाजीवरील जोराच्या मोहिमेचें कार्य तात्पुरतें बाजूस ठेवून, विजापूरकरांवर तीन बाजूंनीं एकदम सैन्य रवाना केलें. हीं सैन्यें विजापूरकरांच्या हद्दींत शिरल्यावर त्यांनीं तिकडे अतिशय धुमाकूळ माजविला; अनेक शेतांची नासाडी केली; घरेंदारें जाळिलीं; गुरें ढोरें हरण केलीं; ठिकठिकाणीं अनेक लोकांच्या कत्तली उडविल्या; पुष्कळ लोकांस पकडून गुलाम केलें; अनेक शहरें, गांवें, व किल्ले ताब्यांत घेतले; अनेक गांवें बेचिराख केलीं; अशा रीतीनें निरनिराळ्या प्रकारानें भयंकर प्रळय उडवीत हीं सैन्यें राजधानीवर चाल करून आलीं; तरी सुद्धां अदिलशहानें न डगमगतां मोंगली सैन्याशीं निकराचा सामना केला; व अखेरीस शहापूरच्या तलावाचा बांध फोडून विजापूरच्या आसपासचा सर्व प्रदेश जलमय करून टाकिला; त्यामुळें मोंगली फौजा निरुपाय होऊन तशाच परत फिरल्या; व त्यांनीं पुन्हां विजापूरच्या राज्यांत लुटालूट आरंभिली; तेव्हां अदिलशाही सेनापती रणदुल्लाखान त्यांच्यावर चाल करून गेला; व केव्हां त्याची तर केव्हां मोंगलांची सरशी होत जाऊन हें युद्ध कांहीं दिवस तसेंच चालू राहिलें.

बादशहा शहाजहान हा जसा निष्णात योद्धा होता, तसाच तो राजकारण निपुण मुत्सद्दीही होता. म्हणून पुढें लढाईचा हंगाम फारच थोडा शिल्लक असून लवकरच पावसाळा लागणार, त्या पूर्वीच शहाजीचा बंदोबस्त करावा, असें त्यानें ठरविलें. यावेळीं महंमद अदिलशहा वयांत आल्यासारखा असून तो स्वतः—शहाजीचे पुरस्कर्ते खवासखान व मुरारपंत या उभयतांना बाजूस ठेवून—नवीन मंत्र्यांच्या साह्यानें राज्यकारभार पहात होता; ही गोष्ट शहाजहान यांस समजली होती; म्हणून त्यानें प्रत्यक्ष अदिलशहाशींच समेटाचें

---

पुढें इंग्लिशांनीं पकडलें. इ. सन १८४१ मध्यें इंग्लिशांनीं या किल्ल्यांत चिनी कैदी ठेविले होते; व पुढें इ. सन१८४५मध्यें राघोजी भांगरे यानें बंड केलें, त्यावेळीं इंग्लिशांनीं आपल्या सैन्याची एक तुकडी या किल्ल्यांत आणून ठेविली होती. हा किल्ला अद्यापि बऱ्याच सुस्थितींत आहे.

बोलणें सुरू केलें; आणि " तूं जर तह करण्यास तयार असशील तर निजाशाही राज्य आपण आपसांत वांटून घेऊं; व या वांटणींत तीन हिस्से तुला देईन; " असें त्यास कळविलें. शहाजहानचें हें म्हणणें आदिलशहास अतीशयच फायदेशीर असल्यामुळें त्यानें तें तात्काळ मान्य केलें; त्यानें शहाजीचा पक्ष सोडला; आणि मे महिन्यांतच त्या उभयतांमध्यें तह झाला; त्यांत खालील कलमें ठरलीं तीं:-(१) आदिलशहानें मोंगल बादशहाचें वर्चस्व मान्य करावें, व यापुढें त्याचे हुकूम पाळण्याचे कबूल करावें. ( २ ) निजामशाही राज्य नष्ट झालें असें समजून त्या राज्यांतील प्रदेश आदिलशहा व मोंगलबादशहा या उभयतांनीं वांटून घ्यावा, व हा वांटलेला प्रदेश ताब्यांत घेण्यास मोंगल सरदारांना आदिलशहानें हरकत घेऊं नये. ( ३ ) सोलापूर, वांगी, परिंडा, भालकी, चिदगुपा, पुणें, सुपें व चाकण सुद्धां निजामशाहीच्या ताब्यांतील कोंकणप्रांत-म्हणजे एकंदर ८० लाख उत्पन्नाचे पन्नास परगणे-आदिलशहानें घ्यावें; व बाकीचा सर्व निजामशाहीचा प्रदेश मोंगल बादशहानें घ्यावा. ( ४ ) आदिलशहानें शहाजहान बादशहास नजराणा म्हणून वीस लाख रुपये द्यावे. ( ५ ) गोवळकोंडेकर कुतबशहाच्या प्रदेशास आदिलशहानें कोणत्याही प्रकारें उपसर्ग करूं नये; ( ६ ) कोणींहि एकमेकांच्या सरदारांस फितवूं नये, अथवा आश्रय देऊं नये; ( ७ ) शहाजी भोसले, हा जुन्नर, त्रिंबक व दुसरे कांहीं किल्ले बळकावून बसला आहे ते सर्व तो मोंगल बादशहाच्या स्वाधीन करीपर्यंत त्यास आदिलशहानें आश्रय देऊं नये. येणेंप्रमाणें तह ठरल्यानंतर शहाजहान यानें ता० ६ मे इ. स. १६३६ रोजीं हीं तहाचीं कलमें, सोन्याच्या पत्र्यावर कोरवून मोठ्या समारंभानें आदिलशहाकडे रवाना केलीं.

अशा रीतीनें अदिलशहास शहाजीच्या पक्षांतून फोडल्यामुळें, शहाजीचा आधार व मदत नष्ट होऊन तो उघडा पडला; विजापूरकराशीं तह झाल्यामुळें सर्व मोंगल सैन्याच्या एकवटलेल्या आणि त्यांतच विजापूरकरांच्या सैन्याची भर पडलेल्या शक्तीबरोबर त्याला एकट्यालाच आतां झगडण्याचा प्रसंग प्राप्त झाला होता. तथापि हताश न होतां, अथवा हिंमत न सोडतां

अखेर पूर्ण नाइलाज होईपर्यंत, तो मोंगलांशीं झगडत राहिला, यावरूनच त्याची हिंमत, कर्तबगारी, धडाडी व करारी बाणा, हीं निदर्शनास येतात.

विजापूरकराबरोबरील तह झाल्यानंतर, मोंगल सरदार शाहिस्तेखान यानें चांदवड, नाशिक व संगमनेरकडील, त्रिंबक, शिवनेरी व कोंडाणा वगैरे किल्ल्यांशिवाय, सुमारें पंचवीस किल्ले हस्तगत करून घेतले; इकडे खान जमान हा जूनच्या प्रारंभीं अहंमदनगर येथून निघून शिवनेरीचा किल्ला हस्तगत करून घेण्याकरितां जुन्नर येथें आला; व नवीन तहाअन्वयें विजापूरकराकडून सेनापती रणदुल्लाखान याची सैन्यासह रवानगी झाली होती, तोही त्यास येऊन मिळाला. जुन्नर येथें आल्यावर तोफखान्याच्या मदतीशिवाय शिवनेरीचा किल्ला हस्तगत करून घेतां येणार नाहीं, अशी खानजमान याची खात्री झाली. तेव्हां तो हस्तगत करून घेण्याच्या भानगडींत न पडतां, तेथें किल्ल्यास शह देण्याकरितां दोन हजार लोक ठेवून, तो, शहाजी पुण्यास येऊन राहिला होता, तिकडे त्याच्यावर जून महिन्याच्या अखेरीस चाल करून निघाला. परंतु वाटेंत पावसानें झोड उडविल्यामुळें त्यास घोडनदीवर एक महिना मुक्काम करून रहावें लागलें. या अवधींत विजापूरकर सरदार रणदुल्लाखान यानें शहाजीशीं समेटाची वाटाघाट सुरू केली, व त्यास आपल्या ताब्यांतील किल्ले मोंगलांच्या हवालीं करून विजापूर येथें आपणांबरोबर येण्याविषयीं सुचविलें; परंतु तें शहाजीनें मान्य केलें नाहीं. इतक्यांत पावसाळाही समाप्त झाला; तेव्हां खानजमान लोहगांवांपर्यंत पुढें चाल करून आला;हें पाहातांच शहाजी पुणें सोडून कोंडाणा व तोरणा या किल्ल्यांच्या दरम्यान असलेल्या डोंगराळ प्रदेशाच्या आश्रयास जाऊन राहिला; तेव्हां तिकडील पहाडी प्रदेशांत जाणें निरर्थक आहे, असें जाणून खानजमान बोर घाटानें खालीं उतरला; व आपल्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या करून, सर्व उत्तर कोंकणभर त्यानें धुमाकूळ माजविला. इकडे शहाजी हा कुंभारलीच्या घाटानें खालीं उतरला; व चोहोंकडे पांगलेल्या मोंगली टोळ्यावर सारखे छापे घालून त्यांना अतीशय हैराण केलें, व त्यांचा पुष्कळ नाश उडविला. तेव्हां खानजमान यानें हें सर्व पांगलेलें सैन्य पुन्हां एकत्र जमविलें; व तो शहाजीवर चाल करून आला. परंतु शहाजी पुन्हां तेथून निसटला; व घांट चढून वर निघून गेला. तेव्हां

खानजमान यानें शहाजीचा नाद सोडला; व तो उत्तर कोंकणांतील शहाजीच्या ताब्यांतील सर्व किल्ले आपल्या हस्तगत करून घेण्याच्या उद्योगास लागला. व माहुलीचा किल्ला हस्तगत करून घेण्याकरितां तिकडे वळला. तेव्हां त्या ठिकाणीं शहाजीचें कुटुंब–जिजाबाई, बालशिवाजी व मूर्तुजाशहा हीं रहात असल्यामुळें शहाजीस किल्ल्याच्या संरक्षणाकरितां तिकडे जाणें भाग पडलें. त्याप्रमाणें शहाजी हा माहुली येथें येऊन पोहोंचला; तोंच खानजमान तेथें येऊन दाखल झाला; तेव्हां शहाजी माहुली सोडून मनरंजनच्या किल्ल्यावर गेला. तेथेंही सारख्या जोराच्या पावसांत चिखलांतून मोंगल फौज दौडत आली; व तेथें उभयतांमध्यें एक लहानशी चकमक झडली; व मोंगलांनीं निजामशहाची छत्री, नौबत, पालखी वगैरे सामान व घोडे, उंट वगैरे जनावरें पकडलीं; तथापि शहाजी तेथून निसटला व पुन्हां माहुली येथें परत आला. त्याच्या पाठोपाठ खानजमानही त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला. त्यानें लागलीच किल्ल्यास वेढा दिला; मोर्चे बांधिले; व किल्ला हस्तगत करून घेण्याचा मोठ्या निकरानें उद्योग आरंभिला.

इकडे शहाजीनें माहुलीच्या किल्ल्यांत आल्यावर, खानजमान येऊन पोहोंचण्याच्यापूर्वीच किल्ला लढविण्याची तयारी केली होती; व त्याप्रमाणें त्यानें कांहीं दिवसपर्यंत मोंगल व विजापूरकरांच्या एकवटलेल्या सैन्यास दाद न देतां मोठ्या मर्दुमकीनें किल्ला लढविलाही; परंतु अखेरीस किल्ल्याच्या माचीलगत धान्याचीं कोठारें होतीं, तीं मोगलांनीं लुटिलीं; त्यामुळें उपासमार होण्याचा प्रसंग येऊन शहाजीचा सर्वस्वीं नाइलाज झाला. यावेळीं शहाजीचा पुरस्कर्ता विजापूरकर सरदार रणदुल्लाखान हा खानजमानबरोबर युद्ध भूमीवर असून, तो मोंगलाशीं तह करण्याबद्दल शहाजीस सारखा आग्रह करीत होता. अखेरीस याच्याच मार्फत शहाजीनें खानजमानाशीं तहाचें बोलणें सुरू केलें; परंतु नवा सुलतान मूर्तुजा निजामशहा, व सिंहगड, पुरंदर, लोहगड, माहुली, शिवनेरी, व त्रिंबक या सहा किल्ल्यांच्या सोडचिठ्ठ्या, शहाजीनें पहिल्यानें आपल्या स्वाधीन केल्याशिवाय खानजमान हा त्यास तिळमात्रही सवलत देण्यास तयार नव्हता; त्यामुळें अखेरीस मूर्तुजा निजामशहा, व उपरी

निर्दिष्ट साही किल्ल्यांच्या सोडचिठ्ठ्या, खानजमान याच्या हवालीं करून ( इ० सन १६३६; आक्टोबर ) शहाजी या संकटांतून मुक्त झाला. खानजमान यानें मूर्तुजा शहास योग्य बंदोबस्तानें आग्रा येथें शहाजहान बादशहाकडे रवाना केलें; × बादशहानें त्याची ग्वाल्हेर येथील किल्ल्यांत रवानगी केली; व त्याच ठिकाणीं प्रतिबंधांत तो पुढें मृत्यू पावला.

त्यानंतर शहाजी हा, जिजाबाई व शिवाजी या उभयतांना पुण्यास ठेवून, आपला वडील मुलगा संभाजी यांसह, रणदुल्लाखान याच्याबरोबर विजापूर येथें गेला; व त्यानेंच तेथें शहाजीची व अदिलशहाची भेट करून दिली. दरबारांत भेटीच्या वेळीं मोठा समारंभ झाला; त्यावेळीं शहाजीवर मोर्चेले झडत होती. आणि दोन कमी अधिक ऐश्वर्याचे राजे एकमेकांस भेटतात

---

× शहाजहान बादशहानें अदिलशहाशीं तह केला, त्याच सुमारास शरण आलेल्या गोवळकोंडेकर अब्दुला कुतबशहानें चाळीस लाख रुपये शहाजहानकडे नजराणा म्हणून पाठविले; व चार लाख होन खंडणी देण्याचें कबूल केलें; तथापि कुतबशहा आपणांस कोणत्याही प्रकारें त्रास न देतां शरण आला ही गोष्ट लक्षांत घेऊन शहाजहान यानें त्यास अर्धी खंडणी माफ केली. अदिलशहाशीं तह झाल्यानंतर त्यानें बादशहास विनंती केली कीं, " येथें आपण मोठमोठ्या फौजा घेऊन राहिल्यानें लोकांचे शेतकी वगैरेचे धंदे चालत नाहींत; शिवाय शहाजीच्या ताब्यांत असलेले किल्ले आम्ही हस्तगत करून घेऊं; तरी आपण आतां येथून परत गेल्यास बरें होईल. " अदिलशहाचें हें म्हणणें बादशहास मान्य झालें; व तो ता० ११ जुलई इ० सन १६३६ रोजीं दौलताबाद सोडून मांडवगडाकडे गेला, व मार्गांतच तीन दिवसांनीं ता० १४ रोजीं त्यानें अवरंगजेबास दक्षिण प्रांताचा सुभेदार नेमिलें; व त्यानें ता० १६ जुलै इ० सन १६३६ पासून ता० २८ मे इ० सन १६४४ पर्यंत या प्रांताचा कारभार पाहिला. या वेळीं मोंगलांच्या ताब्यांतील प्रदेशाचे, खानदेश, वऱ्हाड, तैलंगण, व अहंमदनगर हे चार जिल्हे असून, त्यांत एकंदर ६४ किल्ले होते; व या सर्व प्रदेशाचा चार कोट रुपये वसूल होता.

तशा प्रकारचा हा समारंभ होता. त्यानंतर, अदिलशहानें, पुणें, सुपें, इंदापूर, बारामती, व चाकण, वगैरे प्रांताची जी जहागीर निजामशाहींतून शहाजीकडे चालू होती तीच, त्याच्याकडे चालू ठेविली. आणि निजामशाहींतील, भिमा व निरा या दोन नद्यांच्या मधील मोंगलाकडून मिळालेल्या नवीन प्रदेशाची व्यवस्था लावण्याकरतां मुरार जगदेव × याच्या मदतीस त्यास पाठविलें. शहाजीस या प्रदेशाची उत्तम माहिती होती; त्यामुळें मुरारपंतास त्याचा अतीशय उपयोग झाला; व ही कामगिरी शहाजीनें उत्तम प्रकारें बजाविली. याबद्दल मुरारपंतानें त्याची शहाजवळ अतिशय तारीफ केली. त्यानंतर शहानें कर्नाटक व द्रवीड प्रांतांतील जो नवीन प्रदेश त्यास मोंगलाकडून मिळाला होता त्याचा बंदोबस्त करून तिकडील व्यवस्था लावण्याकरितां रणदुल्लाखान यास तिकडे पाठविलें. तेंव्हां त्याच्या हातांखालीं शहाजीस नेमून त्याचीही तिकडे रवानगी केली ( इ. सन १६३७ ). त्यावेळीं नारो त्रिंबक हणमंते यास त्यानें आपला कारभारी म्हणून बरोबर नेलें होतें. कर्नाटक प्रांतीं गेल्यावर रणदुल्लाखान यानें तिकडील मुख्य पाळेगार कॅंपगौडा याच्यावर स्वारी केली. तींत त्याचा पूर्ण पराभव केला; त्यास सावनदुर्गच्या+ किल्ल्यांत हांकलून लाविलें; कावेरी नदीच्या उत्तरेकडील सर्व प्रदेश जिंकून घेतला; व त्याचें राहाण्याचें मुख्य ठिकाण बंगळूर, हस्तगत करून घेऊन तेथेंच तो राहूं लागला (इ. सन १६३८). या मोहिमेंत शहाजीनें उत्तम कामागिरी बजाविल्यामुळें अदिलशहानें त्यास कर्नाटक मधील बंगळूर, कोलार, होसकोट (ऊसकोटा), दोड्ड-

---

× मुरार जगदेव व वजीर खवासखान, या उभयतांना महंमद अदिलशहा यानें इ० सन १६३५ मध्यें ठार मारिलें; त्यामुळें जरी मराठी बखरींत मुरारपंताचें नांव दिलें आहे तरी हा दुसरा कोणी सरदार असावा असें दिसतें.

+ सावनदुर्गचा डोंगरी किल्ला म्हैसूर प्रांतांत बंगलोर जिल्ह्यांत असून तो समुद्रसपाटीपासून अजमासें ४०२४ फूट उंचावर आहे. व त्याचें मागाडी ( Magadi ) हें स्थानिक नांव असून या किल्ल्याचा घेर अजमासें आठ मैलांचा आहे.

बाळापूर, व शिरें हे पांच प्रांत जहागीर दिले. व पुढें रतनपूर, देवगड, कनकागिरी, व राजदुर्ग हे चार परगणे अदिलशहानें शहाजीस दिल्यानें तेंही त्याच जहागिरींत पुढें सामील झाले. शिवाय अदिलशहानें त्यास इंदापूर, बारामती, व मावळ प्रांत जहागीर दिला; कऱ्हाड प्रांतांतील बावीस गांवांची देशमुखी दिली; आणि रणदुल्लाखान हा कर्नाटक प्रांतामधून इ. सन १६३९ च्या सुमारास परत गेल्यानंतर शहानें त्यासच त्या प्रांताचा मुख्य अधिकारी नेमिलें. या वेळेपासून शहाजी कर्नाटक प्रांतामध्येंच स्थाईक झाला; तथापि पहिल्यापहिल्यानें पर्जन्यकाळीं विजापूर येथें छावणीस यावें, व पर्जन्यकाल खलास झाल्यानंतर पुन्हां कर्नाटकांत मोहिमेवर जावें असा शहाजीनें कांहीं वर्षे क्रम ठेविला. तथापि पुण्याकडील जहागिरीवर त्याची विशेष भक्ति असून जिजाबाई व बालशिवाजी त्या ठिकाणीं रहात असत. "जिजाबाईची त्यावेळीं सुमारें चाळिशीची उमर असून, ह्यापुढें तिला संतति झाली नाहीं. संभाजी, शिवाजी, व एक मुलगी अशीं तीनच अपत्यें तिचीं जगलीं होतीं. आणिक चार पांच अपत्यें तिला झालीं म्हणून बृहदीश्वर शिलालेखकार लिहितो. तीं सर्व लहाणपणींच निवर्तलीं. शके १५२५ त लग्न झाल्यापासून शके १५५८ त शहाजी विजापुरास जाई तोंपर्यंतच्या तेहतीस वर्षांत शिंदखेड, दौलताबाद, अहंमदनगर, परांडा, भीमगड, संगमनेर, त्र्यंबक, वैजापूर, जुन्नर, पुणें, कोंडाणा, व शेवटीं माहुली अशा अनेक स्थलांचीं ऐश्वर्यें, संकटें, पळापळी, धराधरी, लढाया, खून, छापे, द्वंद्वयुद्धें इत्यादि भारततुल्य प्रसंग पाहून व सोहाळे भोगून शहाजीच्या धोरणाचा तिला पूर्ण अभ्यास व अनुभव आला होता. एक लढण्याची कला सोडून दिली तर बाकीच्या बहुतेक सर्व राजकीय कला शहाजीच्या इतक्याच तिच्या आंगवळणीं पडल्या होत्या. अकबर, जहांगीर, शहाजहान, इब्राहीम अदिलशाहा, महंमद अदिलशाहा, चांदबिबी, मलिकंबर, फत्तेखान, लोदी, मोहबतखान, नूरजहान, आसदखान, खवासखान, मुस्तफाखान, मूर्तुजा निजामशाहा, मासाहेब, वडी साहेबीण, मुरारपंत, चतुर साबाजी, ह्या मोंगलाई, निजामशाही व आदिलशाही प्रसिद्ध व्यक्तींचे गुणदोष तिनें प्रत्यक्ष पाहिले असून मालोजी, शहाजी, विठोजी, खेळोजी, लुकजी, अचलोजी, इत्यादि सासरमाहेरच्या मंडळींच्याहि प्रकृत्या तिनें अनुभविलेल्या होत्या.

नवरा मोहिमेवर असतांना त्याच्या बरोबर तिनें लढाया पाहिल्या होत्या, व बरोबर नसल्या वेळीं न्यायमनसुबी केलेली होती. अशा ह्या कर्त्या व पोक्त बाईच्या हवालीं पुण्याकडील जगाहीर करून, दादाजी व सोनोपंत या वृद्ध मुत्सद्यांच्या सल्ल्यानें शिवाजीचें व जहागिरीचें पालनपोषण करण्यास ह्या बाईस शहाजीनें आपला प्रतिनिधी नेमिलें, व निर्धास्त अंतःकारणानें विजापूरचा रस्ता धरिला. शिवाजीचें वय ह्या वेळीं नऊ वर्षांचें असून जिजाबाई व शहाजी यांच्या बरोबर दौलताबादेपासून माहुलीपर्यंतच्या स्थळीं त्या त्या कालीं तो होता " ( रा. मा. वि. चंपू राजवाडे; ). शहाजीनें दादोजी कोंडदेव या नांवाच्या एका हुषार, विश्वासू, इमानी, व वृद्ध मुत्सद्यास आपल्या पुण्याकडील जहागिरीचा कारभारी नेमिलें, तेव्हांच सिद्दी हिलाल या नांवाच्या एका मनुष्याची त्यानें दादोजीच्या हाताखालीं नेमणूक केली;त्याच्या दिमतींत एक हजार स्वार देऊन, त्याच्यावर तेथील बंदोबस्ताची कामगिरी सोंपविली; त्याप्रमाणेंच कर्नाटक प्रांतांत नारोपंत हणमंते याच्या मदतीन त्यानें तिकडील प्रांताची सुव्यवस्था करण्याचा उद्योग आरंभिला, व त्यांत तो यशस्वी होऊन त्यानें लवकरच तिकडील प्रदेश भरभराटीस आणिला.

# परिच्छेद तिसरा.

## शहाजीचें उत्तर चरित्र

" शहाजी राजे यांची (बेदनूरकर भद्राप्पा नाईक याच्या-बरोबरील युद्धांत) फत्ते झाल्यामुळें, तेथून कूच करून दुसरी ठाणीं बखेडदार होतीं, त्यांचा बंदोबस्त करावा, म्हणून तुंग-भद्रातीरीं बेदिकरें उर्फ बसवपट्टण येथें आले; तेथें अनेक श्वापदें उत्पन्न झालीं. राजांस (शहाजीस) शिकार करावयाची इच्छा होऊन हरणाचे पाठीस लागले. ईश्वरईच्छा, त्या योगें घोड्याचा पाय भंडोळीत अडकून घोडा, व राजे एकावच्छेदें पडले ते गतः प्राण झाले. मागाहून लोक माणसें आली; त्यांनीं व्यंकोजी राजांस तेथें आणविलें. व्यंकोजी राजे यांनीं उत्तर क्रिया सांग केली. आदिलशहाकडून दुखवटा येऊन मनसबदारीचीं वस्त्रें व्यंको-जीच्या नांवें झाली. शिवाजीस वृत्त कळून जिजाबाईसुद्धां शोक-समुद्रीं पडन बहुत विलाप केला. शहाजी राजे तुंगभद्रातीरीं [illegible], त्या जाग्यास छत्री इमारत मजबूद करविली, आणि पादशाही सनद घेऊन बेदिकरें गांव तेथील खर्चास लावून दिला, तो गांव छत्रीकडे अद्याप चालत आहे. "

शहाजीचा मृत्यू शके १६८५;<br>
माघ शुद्ध षष्ठी, शनीवार;<br>
(ज्यानेवारी इ० सन १६६४.)

शहाजी कर्नाटक प्रांतांत गेल्यानंतर, इ० सन १६३८ पासून इ०सन १६४७ अखेरपर्यंतच्या दहा वर्षांत त्यानें त्या प्रांतांतील अनेक बंडखोर सर-

दारांना आपल्या नियंत्रणाखालीं आणिलें; कर्नाटक प्रांतांत असलेली अव्यवस्था व माजलेली अंदाधुंदी पूर्णपणें मोडून टाकून सर्व कर्नाटकभर आदिलशाहाची सत्ता स्थापन केली; इ० सन १५६५ मध्यें, (शके १४८६, माघ शुद्धपंचमी) राक्षसतागडी येथील युद्धामध्यें रामराजाचा नाश होऊन, विजयानगर येथील साम्राज्यसत्तेचा चुराडा उडाल्यानंतर सर्व कर्नाटक प्रांतामध्यें बेबंदशाही माजली; "ठिकठिकाणचे मांडलीक राजे, पाळेगार व जमिनदार, स्वतंत्र होऊन, आपल्या ताब्यांत येईल तेवढा प्रांत बळकावून बसले; आणि विजापूर, गोवळकोंडें येथील बादशहांचा फारच त्रास झाला तर तेवढ्यापुरती खंडणी अथवा करभार देऊन व त्यांचें सार्वभौमत्व स्वीकारून नम्रपणें वागावें, व बादशाही सैन्यानें पाठ फिरविली कीं पुन्हां स्वतंत्र होऊन शिरजोरपणानें वागावें, असा त्यांनीं क्रम चालविला होता. विजापूर, अहंमदनगर, व गोवळकोंडे, ह्या तिन्हीं राज्यांमध्यें, अंतःकलह, परस्पर मत्सर, आणि दरबारी मुत्सद्द्यांची स्वार्थसाधक चढाओढ, ह्यांच्या योगानें सुयंत्रित राज्यव्यवस्था कोठेंही चार दिवस देखील टिकेनाशी झाल्यामुळें, कर्नाटक प्रांतांतील पाळेगार व मांडलीक राजे ह्यांच्यावर सक्त नजर ठेवण्यास कोणासच सवड मिळाली नाहीं. त्यानंतर सतराव्या शतकाच्या प्रारंभापासून दिल्लीच्या मोंगल सैन्यानें दक्षिण प्रांत जिंकून घेऊन, तेथें दिल्लीपतीची सत्ता प्रस्थापित करण्याचा अटोकाट प्रयत्न चालविल्यामुळें, वर निर्दिष्ट केलेल्या—म्हणजे विजापूर गोळकोंडें व अहंमदनगर येथील अदिलशाही, कुतबशाही व निजामशाही ह्या तिन्ही राज्यांच्या मुसलमानी बादशहाना, आपलीं राज्यें सांभाळतां सांभाळतां पुरेवाट झाली. अर्थात् अशा स्थितीमध्यें कर्नाटकचे पाळेगार, जमिनदार व मांडलीक राजे अधिक शिरजोर व स्वतंत्र व्हावेत, ह्यांत आश्चर्य नाहीं. ह्याप्रमाणें म्हैसूर, तंजावर, जिंजीं, चंद्रगिरी, कनकगिरी, मधुरा, बेदनूर, त्रिचनापल्ली इत्यादि ठिकाणचे हिंदु राजे व सुभेदार, पाळेगार व जमिनदार इ० सन १६०० पासून इ० सन १६३० पर्यंत, अगदीं स्वतंत्र रीतीनें वागूं लागले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं" (पारसनीस; तंजावरचें राजघराणें). अशा प्रकारची चालू असलेली अंदाधुंदी मोडून टाकून कर्नाटकचा प्रदेश आपल्या हस्तगत करून घ्यावा, या इच्छेनें अदिलशहानें शहाजीची त्या प्रांतीं रवानगी केली, व

इ० सन १६३८ पासून इ० सन १६४७ अखेरपर्यंतच्या दहा वर्षांत त्यानें अनेक युद्धपराक्रम करून व त्या प्रांतांत अदिलशाहाची सत्ता पूर्णपणें प्रस्थापित करून, उत्तम प्रकारची राज्यव्यवस्था केली; परंतु या दहा वर्षांत त्यानें जे अनेक युद्धपराक्रम केले व जी राज्यव्यवस्था केली, तिचा संपूर्ण वृत्तांत उपलब्ध होत नाहीं; तथापि तंजावरच्या शिलालेखावरून असें कळून येतें कीं, या अवधींत त्यानें विधुपुरचा राजा वीरभद्र, श्रीरंगपट्टणचा राजा कंठीरव, कोंगदेशचा राजा कोंगनायक, कावेरीपट्टणचा राजा जगदेव, तंजावर ऊर्फ तंजापूरचा राजा विजयराघव, चंदीचा राजा व्यंकटनायक, मदुरेचा राजा तिरुमलनायक, वार्ली गुंडापूरचा राजा अरिकाल वेंकटनायक, विजयानगरचा राजा रंगशायीनायक, इसकुटपुरचा राजा तम्मोगोड ऊर्फ तम्मागोड नायक, वगैरे बलिष्ठ पाळेगारांना जिंकून त्यांच्याकडून खंडण्या घेतल्या; ÷

---

÷ या बाबतींत " राधामाधव विलासचंपू " मध्यें खालीलप्रमाणें थोडीशी निराळी हकीकत दिली आहे; ती अशी कीं:--शक १५५९ सालीं चैत्रवैशाखांत शहाजी विजापुरीं दाखल झाला. व याच वर्षाच्या पावसाळ्यानंतर त्याची रवानगी रणदुल्लाखानाबरोबर कर्नाटकांत म्हणजे सध्याच्या म्हैसूर प्रांतांत झाली. तेथील कित्येक पाळेगारांनीं व राजांनीं दक्षिणचा सुभा जो अठरा वर्षांचा औरंगझेब त्याच्याशीं संविधान बांधून आदिलशहाच्या दपटशांतून मुक्त होण्याची खटपट चालविली होती. त्यांना ताळ्यावर आणण्याकरितां आदिलशहास त्या प्रांतीं सैन्य पाठविणें इष्ट दिसलें. रणदुल्लाखान हा वरिष्ठ सरदार, सबब लढण्याचा वगैरे सर्व भार शहाजीवर सहजच पडला. रायगिरी येथील राजा वीरभद्र यांजकडून खंडणीचा पैसा थकला, करतां त्याचा समाचार ह्या वर्षीं व शक १५६० च्या प्रारंभीं घेऊन रणदुल्ला व शहाजी विजापुरास परत आले. शक १५६१ प्रमाथी संवत्सरांतील दुसऱ्या वर्षींच्या मोहिमेंत शहाजीनें बसवापट्टण सर केलें; ह्या वर्षीं मोहीम करून विश्रांतीस परत आल्यावर कनकगिरीच्या सनदा महंमदाशहानें खुष होऊन शहाजीस बहाल केल्या. १५६२ सालीं शहाजी राजास नूतन अर्जानी झालेल्या कनकगिरीच्या जहागिरींतील गिराशांनीं बंड केलें. जवळच्याच एका तालुक्यांत शहाजी मोहिमे-

शहाजी हा प्रारंभीं बंगळूर येथें रहात असे; परंतु त्यानें चिक्क रायल तिम्म-
गौडा ह्या पाळेगार राज्यकर्त्यापासून कोलार प्रांत जिंकून घेतल्यानंतर तो

---

वर होता. तों इतक्यांत ( विजापूरकरांचा प्रसिद्ध सरदार ) अफझलखान
हा कनकगिरी प्रांतांतून जात असतां बंडखोर गिरास्यांची व अफझलखानाची
गांठ पडली; बहुत कजाखीचें युद्ध झालें, त्यांत अफझलखानाचा पराभव
झाला. हें वृत्त कळतांच ताबडतोब कनकगिरीवर चाल करून घेऊन शहाजीनें
कनकगिरीकरांचें पारिपत्य केलें. शहाजीच्या ह्या साह्याचें भूषण न मानतां,
अफझलखान दूषण मानूं लागला, आणि तेव्हांपासून तो शहाजीचा द्वेष करूं
लागला. या मोहिमेंत शहाजी असतां वैशाख शुद्ध पंचमीस शिवाजीचें पहिलें
लग्न सईबाईशीं पुण्यास दादाजी पंतांनीं उरकून घेतलें. ही वार्ता विजापुरीं
महंमद आदिलशहास व ( त्याची आई ) बडी साहेबीण हीस कळून राजे
शहाजी मोहिमेहून राजधानींत परत आल्यावर, त्यांनीं "मुलाचें लग्न असें
गुपचूप कां उरकून घेतलें ?" असा त्यास प्रश्न केला, आणि शहाजी राजास
हुकूम केला कीं, मुलास आणून येथेंच समारंभानें त्याचें पुन्हां दुसरें लग्न
करावें. तेव्हां जिजाबाई व शिवाजी यांस विजापुरास आणून तेथें शिवाजीचें
दुसरें लग्न पुतळाबाई ऊर्फ सोयराबाई इजशीं, आदिलशहा स्वतः हजर
राहून, आषाढांत मोठ्या थाटानें लाविलें. ह्यावेळीं शक १५६२ त शिवाजीचें
वय तेरा वर्षांचें होतें. मुजरा वगैरे न करण्याचा प्रकार जो झाला तो ( शिव-
दिग्विजय, १११ व ११२ ) ह्या वर्षाच्या पावसाळ्यानंतर दसऱ्याचा दर-
बार भरला असतां झाला. त्रेसष्ट, चौसष्ट, व पासष्ट, या सालींहि लखमेश्वर
वगैरे प्रांतावर स्वाऱ्या करून, बंकापूर, हरीहर, बसवापट्टण, तालीखेडा, वगैरे
तालूके शहाजीनें आस्ते आस्ते अमलाखालीं आणिले. पाऊसकाळीं शिरस्त्या-
प्रमाणें तो छावणीस विजापूरप्रांतीं येई. १५६६ सालीं शिरें व बंगळूर हे
प्रांत घेऊन म्हैसूरचा पूर्वेकडील प्रांत अदिलशाहीच्या हुकमतींत आला. अली-
कडे कांहीं वर्षें रणदुल्लाखान प्रकृती नादुरुस्त म्हणून विजापुरीं राही, व शहाजी
एकटाच मोहिमेचें काम संभाळी. शेवटीं शके १५६५ त रणदुल्लाखान दुख-
ण्यानें वारला, व सदुसष्ट सालीं शहाजीनें वीरभद्राकडून बल्लारी तालुका घेतला.

मधून मधून कांहीं दिवस बाळापूर उर्फ दोड्ड बाळापूर* येथें व कांहीं दिवस कोलार येथें रहात असे. हा कोलार प्रांत शहाजीच्या ताब्यांत आल्यानंतर त्यानें त्या ठिकाणीं आपला वडील मुलगा संभाजी यांस ठेविलें, व त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा सुरतसिंग हा कोलार§ येथें राहून त्या प्रांतांचा कारभार पाहूं लागला.

शहाजीनें आपल्या ताब्यांतील कर्नाटकमधील प्रदेशाच्या जमाबंदीची उत्तम व्यवस्था लावण्याकरितां दक्षिणेंतून कांहीं हुषार व भरंवशाची ब्राह्मण मंडळी तिकडे नेली; + व जमाबंदीची नवी पद्धति सुरू करून सरकारी उत्पन्नाचीहि ही पुष्कळच वाढ केली, व त्यामुळें तिकडील प्रजा सुखी व आबाद झाली. जमाबंदीची नवी व्यवस्था करितांना शहाजीनें प्रथम सर्व परगण्यांची योग्य विभागणी केली; व त्याचें संमत, तर्फ, मौजें, मजरें, असे पोटविभाग केले; व त्यांवर निरनिराळे अंमलदार नेमिलें. पूर्वी हा प्रदेश विजयानगरच्या राज्यांत मोडत होता त्यावेळीं " संप्रति " म्हणून अंमलदार होते; ते शहाजीनें बदलून देशमूख, देशपांडे, कुळकर्णी, नाडगौड, सर नाडगौड, कानगो, सरकानगो असे नवे अंमलदार, व सर्व परगण्यांत नवे शिरस्तेदार नेमून सर्व प्रांतांचे हिशोब त्यांच्याकडून तयार करविले. शिवाय, ज्यावेळीं एखाद्या किल्ले·

---

शहाजीच्या ह्या अलौकिक पराक्रमामुळें त्याची कीर्ति व बोलबाला सर्वत्र विशेष झाला.

* दोड्ड म्हणजे मोठें, व चिक्क म्हणजे लहान; दोड्ड बाळापूर हें म्हैसूरच्या राज्यांत, अर्कावती नदीच्या पूर्व किनाऱ्यावर बंगलोरपासून २७ मैलांवर आहे.

§ कोलार हें ठिकाण बंगलोरपासून वायव्येस पायमार्गानें ४३ मैलांवर, व कोलार रोड रेल्वे स्टेशनपासून १० मैलांवर आहे; या ठिकाणीं म्हैसूरचा प्रसिद्ध राज्यकर्ता हैदरअल्ली, याचा बाप फत्ते महंमद, याची कबर आहे.

+ या दक्षिणी मंडळींचे वंशज आजतागायत त्या प्रांतांत अस्तित्वांत आहेत; व देशमूख, देशपांडे, कुळकर्णी, शिरस्तेदार, वगैरे दक्षिणी उपनांवांनीं तें हल्लींही " मूळचे दक्षिणी " म्हणून ओळखले जात आहेत.

दारास अथवा मनसबदारास सरकारांतून जहागीर द्यावयाची असेल, त्यावेळीं पूर्वीच्या वसुलाचे हिशोब पाहून नवीन बमाबंदी ठरेल त्याप्रमाणें त्यास उत्पन्न नेमून द्यावें, अशी नवी पद्धति त्यानें अंमलांत आणली. त्यामुळें, अशा रीतीनें वसूल ठरवितांना इनामें वगैरे बाबी वजा करून निव्वळ आकार कमी किंवा जास्त झाला हें तेव्हांच समजून येऊं लागले. ( पारसनीस; तंजावरचे राजघराणें हें पुस्तक पहा. )

शहाजीनें तंजावर प्रांत आपल्या ताब्यांत मिळविल्यानंतर, तो तंजावर तेथें राहूं लागला; व " तंजावर ही जागा चांगली पाहून अंतःकरणांत आपलें राहण्यास योग्य आहे, असें सर्वानुमतें प्रशस्त करून तुकाबाई व व्यंकोजी, व व्यंकोजीची बायको दिपाबाई यांस तेथें ठेविलें, व ती आपली राहण्याची जागा केली. " शहाजीनें तंजावर प्रांत कधीं व कसा मिळविला, याबद्दल मतमेद आहे; तथापि एकंदरींत असें दिसतें कीं, तंजावरचा राज्यकर्ता पंची रंगू आणि मुद्गलचा पाळेगार जंजाप्पा नाईक या उभयतांमध्यें कलह उत्पन्न होऊन जंजाप्पानें शहाजीस आपल्या मदतीस बोलावून घेतलें; व नंतर त्यांचें युद्ध होऊन त्यांत पंची रंगू ठार मारला गेला. त्यानंतर तंजावर प्रांताच्या ताब्याबद्दल शहाजी व जंजाप्पा या उभयतांमध्यें कलह लागून शहाजीनें जंजाप्पास ठार मारिलें, व तंजावर आणि मुद्गल हे दोन्हीही प्रांत आपल्या ताब्यांत घेतले, नंतर शहाजीनें ही सर्व हकीकत अदिलशाही दरबारास कळ-वून तिकडून या नवीन जिंकलेल्या प्रदेशाबद्दल संमती आणविली; व ते प्र आपला मुलगा व्यंकोजी ह्याच्या नांवानें करून घेतले; तथापि पंची रंगूचा वंशज विजयराघव हा या वेळीं जिवंत होता; व शहाजीच्या हयातींत तो सत्ता-हीन व परतंत्र स्थितींत तंजावर येथें अस्तित्वांत होता; पुढें इ० सन १६७५ मध्यें व्यंकोजीनें ह्या नामधारी नायक राजास आजिबात नाहींसें करून तंजा-वर येथील प्राचीन चोल मंडलाधिपतीचें सिंहासन हस्तगत केलें व त्या ठिकाणीं आपली नवी राजगादी स्थापन केली, व याच काळापासून व्यंकोजीचें घराणें, " तंजावरचें X राजघराणें " म्हणून ओळखण्यांत येऊं लागलें.

X या परिच्छेदाच्या शेवटीं " तंजावरचें राजघराणें " या संबंधीं, परिशिष्ट पाहिलें, यामध्यें त्रोटक हकीकत दिली आहे, ती पहा.

अशा रीतीनें शहाजी कर्नाटकांत स्थाइक झाल्यानंतर त्यानें, तिकडील प्रजेस प्रेमानें वागवून, व जमीनमहसुलीची उत्तम व्यवस्था ठेवून व वसुलाची ठरीव रक्कम विजापूर येथें नियमीतपणें पाठवून, पुष्कळ संपत्ति संग्रहीं ठेविली; साधल्यास आपण कर्नाटकमध्यें स्वतंत्र राज्यसंस्थापना करावी, असा शहाजींचा उद्देश होता, व त्यामुळें, लोकसंग्रह व धनसंचय करून व सैन्य, व तोफखाना वगैरे सरंजाम नेहमीं उत्तम व जय्यत स्थितींत ठेवून तो आपली शक्ति सारखी वाढवीत होता; परंतु शहाजीच्या ह्या वाढत्या वर्चस्वामुळें अदिलशाही दरबारांत त्याच्याविषयीं मत्सर व द्वेषभाव उत्पन्न झाला. या वेळीं मुस्तफाखान हा अदिलशाही राज्याचा वजीर होता, व अफझलखान हा त्याचा स्नेही व मदतगार होता; या उभयतांचें मन शहाजीविषयीं शुद्ध नसून, ते त्याला आपला शत्रू समजत असत; मुस्तफाखान व अफझलखान हे एक पक्षाला, व रणदुल्लाखान, खवासखान, व मुरारपंत हे दुसऱ्या पक्षाला, अशी आदिलशाही दरबारांत स्थिती होती; या दोन पक्षांचें वैर परमावधीस गेलेलें होतें, आणि रणदुल्लाखान, खवासखान, व मुरारपंत यांचा व शहाजीचा अत्यंत स्नेह होता; त्यामुळें मुस्तफाखान व अफलखान हे शहाजीस "आपला शत्रू" असें समजत होतें. खवासखान हा अदिलशाही राज्याचा वजीर होता तोंपर्यंत शहाजीस, आपला विरुद्ध पक्ष वर डोकें काढील अशी फारशी भीति बाळगण्याचें कारण नव्हतें; परंतु खवासखान व त्याचा उजवा हात मुरारपंत यांचे मुस्तफाखानाच्या मदतीनें खून झाल्यानंतर शहाजीचा मोठाच आधार नष्ट झाला; व उलटपक्षीं मुस्तफाखान हा वजीर होऊन त्याचा पक्ष जोरांत आला; तथापि शहाजीचा स्नेही रणदुल्लाखान हा जिवंत असल्यामुळें शहाजीस त्याचा पुष्कळच आधार होता; व त्यामुळेंच विरुद्ध पक्षाच्या कारस्थानांना पुष्कळच आळा बसलेला होता; तथापि इ. सन १६४३ मध्यें रणदुल्लाखान मृत्यू पावल्यानें शहाजीचा तोही आधार नष्ट झाला, व शहाजीच्या शत्रूस त्याच्या विरुद्ध कारस्थानें करण्यास उत्तम संधी प्राप्त झाली. शहाजीनें कर्नाटक प्रांतांत गेल्यानंतर तो प्रदेश चार पांच वर्षांतच जिंकून आदिलशहास मिळवून दिला; पण त्याबरोबरच शहाजीनें आपलें वर्चस्वही अतीशयच वृद्धिंगत केलें; त्यामुळें अदिलशाही

दरबार व खुद्द अदिलशहा यांसही शहाजीविषयीं संशय उत्पन्न झाला होता, आणि रणदुल्लाखानाच्या मृत्यूनंतर आसदखान, रुस्तुमजमान, अहमंदखान वगैरे सरदार शहाजीच्या जोडीला, त्याच्या हालचालीवर बारीक नजर ठेवण्याला, कर्नाटक प्रांतीं पाठविण्यांत येत होते; रणदुल्लाखान मृत्यू पावला त्या सुमारास शहाजीचे हितशत्रू मुस्तफाखान व अफझलखान या उभयतांनीं महमंदशहा व त्याची आई बडीसाहेबीण या उभयतांचें मन शहाजीविषयीं अतिशय कलुषीत केलें; व " शहाजी हा अंतस्थरित्या कर्नाटकमधील पाळेगारांना व राजकर्त्यांना आपल्याविरुद्ध चिथापणी देत असून, आपणावरही उलटण्याचा त्याचा इरादा आहे" असें त्यांच्या मनांत भरवून दिलें; त्यामुळें अदिलशहाच्या मनांत शहाजीविषयीं अतिशय भीति उत्पन्न झाली; आणि त्याची आई बडीसाहेबीण हिनें तर शहाजी दरवर्षी पर्जन्यकाळीं विजापूर येथें आल्यावर, मुलुखगिरी केल्याबद्दल त्याचा सन्मान न करितां, उलट मानभंग करण्यास सुरवात केली. इतक्यांतच, रणदुल्लाखानानें आपल्या मृत्यूपूर्वी शहाजीस असा गुप्त इषारा दिला कीं, " तुम्हांला दरबारांत शत्रू उत्पन्न झाले आहेत, तेव्हां या उपरि तुम्हीं विजापुरीं राहूं नये; जहागिरीवर बंगळूरासच राहणें करावें " ( शिवदिग्विजय; पान १४७ ). त्यामुळें शहाजीनें बरसातींत विजापूर येथें छावणीस येण्याचें अगदींच बंद केलें, इतकेंच नाहीं तर खुद्द अदिलशहानें त्याला विजापूर येथें येण्याविषयीं दोन तीन निरोप पाठविले, तरी सुद्धां त्यानें कांहींना कांहीं सबब काढून तिकडे जाण्याचें टाळलें; तेव्हां शहानें आपला वजीर, व शहाजीचा हितशत्रू जो मुस्तफाखान त्यास, शहाजीच्या हालचालीवर देखरेख ठेवण्याकरितां, इ. सन १६४७ मध्यें, कर्नाटक प्रांतीं रवाना केलें.

शहाजी हा सैन्य, तोफखाना वगैरे सरंजामानिशी जय्यत असल्यामुळें, त्याला राजरोसपणें कैद करण्याची अदिलशहा अथवा मुस्तफाखान यांची प्राज्ञा नव्हती; इतकेंच नव्हे तर तसा नुसता उद्देश जाहीर करणें त्यांच्या शक्तीबाहेरचें होतें; अर्थात्, मुस्तफाखानाला कर्नाटक प्रांतांत पाठविण्याला महंमद अदिलशहाला एक निराळेंच कारण, म्हणजे विजयानगरकर श्रीरंग नायक याच्यावरील स्वारी, हें कारण जाहीर करावें लागलें; यावेळीं श्रीरंग नायक

त्यानें अदिलशहाविरुद्ध जाहीररीत्या शस्त्र उगारलें होतें. त्याचा मांडलीक बेदनूरकर शिवाप्पा नायक याची त्याला मदत होती; त्यानें भारी फौज जमविलेली होती; तो जय्यत तयारींत होता; बेदनूरच्या डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घेऊन त्यानें आजूबाजूच्या आदिलशाही प्रदेशांत मोठाच धुमाकूळ उडवून दिला होता आणि अदिलशाही सैन्याशीं झालेल्या कित्येक लहानमोठ्या चकमकींत त्यांनीं त्या सैन्याचा पराभव केला होता; त्यामुळें त्या उभयतांना नामशेष करण्याच्या दर्शनी उद्देशानें महंमदशहा यानें मुस्तफाखानाची कर्नाटक प्रांतीं रवानगी केली; व शहाजी, आसदखान, व विजयानगरकर श्रीरंगनायक याच्या ताब्यांतील गंडीकोट + ह्या किल्ल्यास वेढा देऊन बसलेला अदिलशाही सरदार सिद्दी रैहान यांना मुस्तफाखानास जाऊन मिळविण्याविषयीं हुकूम पाठविले; त्याप्रमाणें हे तीन्हीही सरदार आपआपल्या सैन्यासह मुस्तफाखानास येऊन मिळाले; व उभयतांमधील युद्ध जोरांत येण्यास सुरुवात होऊन येल्लूर× येथें एक मोठेंच निकराचें युद्ध झालें; (इ. सन १६४७). त्यावेळीं मुस्तफाखानाचें सैन्य मध्यभागीं, व त्याच्या उजव्या बाजूस सिद्दी रैहान व डाव्या बाजूस शहाजी व आसदखान हे होते; बेदनूरकराकडील सरदार दामलवाड यानें मध्यभागीं असलेल्या मुस्तफाखानाच्या सैन्यावर मोठ्या निकराचा हल्ला करून त्याचें खास लष्कर फोडून भग्न केलें, व शहाजी व आसदखान यांच्या सैन्यावर चाल करून जाऊन आसदखानासही जखमी केलें आणि त्यावेळीं मुस्तफाखान हा युद्धभूमीपासून जवळच एका टेकडीवरून हा युद्धचमत्कार

---

+ गंडीकोटा, गंडीकोट, ऊर्फ गंजीकोटचा डोंगरी किल्ला मद्रास इलाख्यांतील कडाप्पा जिल्ह्यांत येर्रा मलईच्या डोंगरांत ( Yerramalai mountains ) असून, तो समुद्रसपाटीपासून १७६० फूट उंचीवर असून, पूर्वकाळीं तो विशेष मजबूत म्हणून त्याची प्रसिद्धी आहे.

× येल्लूर ऊर्फ एल्लूर, एल्लोर ( Ellore ) हें गोदावरी जिल्ह्यांत हल्लीं एक तालुक्याचें ठिकाण असून, तें राजमहेंद्रीपासून ५२ मैलांवर ताम्मालेर नदीच्या कांठीं आहे; व तेथें गांवानजीकच एक किल्ला असून तो हल्लीं मोडकळीस आलेला आहे.

पहात होता, त्याच्यावर तो चाल करून गेला; इतक्यांत सिद्दी रैहान यानें दामलवाड याच्या पिछाडीवर हल्ला करून त्यास ठार केलें. त्यामुळें हिंमत खचून बेदनूरकरांचें सैन्य त्या ठिकाणाहून आपला जीव घेऊन पळालें, व अदिलशाही सैन्यास विजय प्राप्त झाला.

तथापि ह्या विजयाचें यश कोणीं मिळविलें, हा प्रश्न उत्पन्न झाला. युद्धास सुरवात झाल्यावर या युद्धाचा सर्व भार प्रारंभीं शहाजी व आसदखान या उभयतांच्या सैन्यावर पडला, व त्यांत जरी आसदखान जखमी झाला तरी त्याबरोबरच त्या उभयतांच्या सैन्याशीं झगडण्यांत दामलवाड याची बहुतेक सर्व शक्ति खर्च होऊन गेली, व त्यामुळेंच सिद्दी रैहन याला दामलवाडावर जय मिळवितां आला. अशी स्थिति असल्यामुळें शहाजी व आसदखान यांच्या पक्षांतील मंडळी आपण जय मिळविला, असें म्हणूं लागली, व सिद्दी रैहन हा तो मान आपला आहे, असें म्हणूं लागला; अखेरीस हा वाद निवाड्याकरितां मुस्तफाखानापुढें आला; परंतु त्यानें स्वतःच सर्व युद्धचमत्कार अवलोकन केलेला असल्यामुळें कोणत्याही एका पक्षाची त्याला तरफदारी करतां आली नाहीं; त्यामुळें अखेरीस दोन्हीही पक्ष नाखुष झाले. त्यामुळें सिद्दी रैहन व मुस्तफाखान यांचें वाकडें पडलें; त्यामुळें, शहाजी अंतस्थरीत्या बेदनूरकराला सामील आहे, हा मुस्तफाखानाचा संशय दृढ झाला; शहाजीनें ह्या एकंदर मोहिमेंत अंगचोरपणा केला, बेदनूरकरांचा जितका पक्का बंदोबस्त करावयास पाहिजे होता, तितका केला नाहीं, असें मुस्तफाखानास वाटलें. त्यामुळें शहाजी व मुस्तफाखान यांच्यांत पूर्वीपासूनच वैमनस्य होतें, तें अधिक दुणावलें; मुस्तफाखानानें शहाजीच्या हालचालीवर नजर ठेवण्याकरतां आपल्या हाताखालील सरदारांस हुकूम केला, व त्यानंतर लवकरच ( इ. सन १६४८ ) मुस्तफाखान हा शिद्दी रैहानसह जिंजी ऊर्फ चंदीकडे व शहाजी हा आपल्या जहागिरींत जाऊन राहिला.

परंतु याच वेळेपासून शहाजी व मुस्तफाखान या उभयतांमधील वैमनस्य परमावधीस पोंचलें; शहाजी मुस्तफाखानाचे हुकूम मानीनासा झाला; मुखत्यारीनें वागूं लागला; मुस्तफाखानानें “शहाजी आपला म्हणजे अदिलशहाचा हुकूम मानीत नाहीं;” अशी महंमद अदिलशहाकडे तक्रार केली; महमंदशहा हा

आधींपासूनच शहाजीविषयीं साशंक होता; " शहाजी स्वतंत्र होऊन आपणावर उलटेल " ही जी महंमदशहाची फार दिवसांची भीति, ती खरी झाली, असें त्यास वाटूं लागलें; आणि शिवाजीनें अदिलशाही प्रदेशामध्यें माजविलेल्या धुमाकुळामुळें तर त्याची तशी निःसंशय खात्रीच होऊन गेली. शिवाजीनें गेल्या दोन वर्षांत, म्हणजे इ. सन १६४६ व १६४७ मध्यें, चाकणपासून शिरवळपर्यंतचा पुण्याच्या लगतचा दक्षिणोत्तर प्रांत हस्तगत करून घेतला, आणि कांगोरी, तुंग, तिकोना, भोरप, कावरी, लोहगड, राजमाची, पुरंदर, सिंहगड, रायरेश्वराचा डोंगर इत्यादि घाटमाथ्यावरील किल्ले काबीज करून घेतले. यामुळें अदिलशाही दरबारांत मोठीच खळबळ उडून गेली होती; इतक्यांतच मुल्ला अहंमद यानें विजापूर येथें येऊन कल्याण प्रांतांत घडलेली सर्व हकीकत अदिलशाहास कळविली. त्यामुळें त्यास अतीशय राग आला; शिवाजीच्या ह्या बंडाळीस शहाजीची अंतस्थरीत्या फूस आहे, असें त्यास वाटूं लागलें; शहाजी व शिवाजी या उभयतांनीं संगनमत करून अदिलशाही सत्ता झुगारून देण्याचा इरादा खास धरिला, असा शहाच्या मनाचा निश्चय झाला, आणि पहिल्यानें शहाजी व नंतर शिवाजी अशा क्रमानें उभयतांनाही चिरडून टाकावें, असे विचार त्याच्या मनांत निश्चितपणें घोळूं लागले.

तथापि ह्या दोन्हींही गोष्टी अदिलशहाच्या शक्तीबाहेरच्या होत्या; कर्नाटकमधील मुस्तफाखान व सिद्दी रैहान यांच्या हाताखालील सैन्य चंदीकडे गुंतलेलें होतें, आणि तेंही शहाजीशीं सामना करण्याच्या तोलाचें नव्हतें व कांहीं सैन्य मोंगलांच्या हद्दीवर किल्लोकिल्ली पसरलेलें होतें, तें तेथून हलविण्याची सोय नव्हती अशा दुर्बल स्थितींत, " कपटयोजना " एवढाच काय तो एक मार्ग शिलक राहिला होता; तथापि आपणाला भारी असलेल्या प्रतिस्पर्ध्याला चीत करण्याकारितां, कपटयोजना करतांना, यशाची खात्री असली तरी सुद्धां दुर्बलांना विचारच करावा लागतो; व सक्तीचा इलाज करण्याची ताकद नाहीं, व साध्या इलाजानें काम होत नाहीं, तेव्हां आतां कपटयोजना केल्याखेरीज दुसरें गत्यंतरच राहिलें नाहीं, अशी त्याची पूर्ण खात्री झाल्यानंतरच तो कपटमार्गाचा अवलंब करतो; तसाच प्रकार

महंमद आदिलशाच्या बाबतींतही घडून आला; शिवाजीनें उडविलेल्या एकंदर धुमाकुळाची बातमी आदिलशहास कळल्यावर त्यानें शिवाजीस आवरण्याबद्दल शहाजीस धमकी दिली; " तुम्ही पादशाही चाकर, आणि शिवाजी ( तुमचा ) लेंक पुण्याकडे पाठवून यांणीं पादशाहाशीं बदलून हरामखोरी केली. चार किले पादशाही घेतले. देश मुलूख काबीज केला, व मारिला. एक दोन राज्यें बुडविलीं, व एक दोन राजे पातशाही रुजुवात (बादशाहाशीं राजनिष्ठ)होते ते मारिले. आतां लेकास कैदवार ठेवणें ( आतां शिवाजीस आपल्या ताब्यांत ठेवावें) नाहींतर पादशाही हवाला घेतील. " असें शहाजीस धमकीवजा पत्र पाठविलें त्यावर शहाजीनें आदिलशहास असें स्पष्ट कळविलें कीं, " शिवाजी आपला पुत्र परंतु आपणाजवळून पळोन गेला; तो आपल्या हुकुमांत नाहीं. आपण तों पादशाहाशीं रुजवात एकनिष्ठेनें आहों. शिवाजी आपला पुत्र, याजवरी हल्ला करावी. मन मानेल तें करावें. आपण दरम्यान येत नाहीं. " परंतु शहाजीच्या ह्या उत्तरानें अदिलशहाचें बिलकुल समाधान झालें नाहीं; शिवाय " शिवाजीच्या बंडाळीस शहाजीच कारणीभूत आहे, त्याचीच शिवाजीस गुप्त रीतीनें फूस, मदत, व उत्तेजन आहे, आणि खुद्द शहाजी-चाही स्वतंत्र राज्य स्थापना करण्याचा मनापासून उद्योग सुरू आहे अशा-बद्दल अदिलशहास स्वतंत्र पुरावा मिळाला; + त्यामुळें तर शहाजीची या

---

+ह्या बाबतींत म्हैसूरच्या इतिहासांत ( Wilke's Mysore; Vob. I पहा. ) असा उल्लेख केलेला आहे कीं, जेव्हां आदिलशाही सैन्यास शिवाजी भोजीनासा झाला व बादशाही सत्तेसही त्यानें धाब्यावर बसविलें, त्याच वेळीं लागलीच "शिवाजीचें हें अनियंत्रित वर्तन तावडतोब बंद करावें" अशी अदिल-शहानें शहाजीस ताकीद दिली. त्याच वेळी विजापूर दरबारांतील कित्येक लोक तर उघड उघड असेंही बोलू लागले कीं, शिवाजीच्या ह्या सर्व वर्त-नास अंतस्थरीत्या शहाजीचीच फूस आहे. तथापि शहाजीनें कानावर हात ठेवून अदिलशहास असें कळविलें कीं, " मी दुसरें लग्न करण्यापूर्वीच माझी पहिली बायको व हा मुलगा ( शिवाजी ) यांच्याबरोबरील धर्मशास्त्रानुरूप

पुढें उपेक्षा करण्याची सोयच राहिली नाहीं, अशी आदिलशहाची पूर्ण खात्री झाली, व त्यानें मुस्तफाखानास शहाजीला कपटानें पकडण्याचा हुकूम दिला; या वेळीं मुस्तफाखान चंदी प्रांतांत असून दिलावरखान, फराद-

---

सर्व संबंध पूर्णपणें तोडून टाकला आहे; त्यामुळें आतां त्यांचा माझा बिलकूल संबंध राहिला नाहीं." परंतु शहाजीची अंतस्थरीत्या शिवाजीस फूस होती, इतकेंच नाहीं तर खुद्द शहाजीचाही स्वतंत्र राज्यस्थापना करण्याचा उद्योग सुरू होता, ही गोष्ट सिद्ध करण्यास भरपूर पुरावा सांपडला आहे; त्या-पैकीं पहिला हा आहे कीं, शहाजीनें दिलेल्या कांहीं सनदा व दुसरे कागद-पत्र उपलब्ध झाले आहेत; त्यांतील भाषेंत रीतीप्रमाणें "वरिष्ठ सरकार तर्फे" असा उल्लेख नसून "शहाजी राजे भोंसले यांच्या दरबारांतून" असा उल्लेख केलेला आहे; आणि दुसरा पुरावा हा आहे कीं, बाजी घोरपडे यानें अदिल-शहाच्या हुकुमानें शहाजीस दग्यानें पकडलें याबद्दल त्याचा सूड घेण्याविषयीं शहाजीनें मोठ्या आग्रहानें शिवाजीस पुढें लजावलें; व त्याप्रमाणें शिवाजीनें बाजी घोरपड्यास ठार मारल्याचें शहाजीस समजलें तेव्हां त्यास फार कृत-कृत्यता वाटली. म्हणजे अदिलशहास शहाजीविरुद्ध उपरीनिर्दिष्ट पुरावा मिळाल्यामुळें त्यानें शहाजीस पकडून कैद करण्याची तजवीज केली.

याशिवाय तिसराही एक पुरावा उपलब्ध आहे; तो असा कीं, शहाजी या अदिलशाही प्राणसंकटांतून मुक्त होतांच त्यानें वास्तवीकरीत्या शिवाजीस अशी ताकीद द्यावयास पाहिजे होती कीं, "पुन्हां असा बंडावा करून माझ्या जिवावर संकट आणूं नकोस." पण तसें न करितां उलट रोहिडखोरेकर कान्होजी नाईक जेधे देशमूख याच्या पासून बेल रोटीवर हात ठेवून त्यानें अशी आणभाक घेवविली कीं, "चिरंजीव राजश्री सिउबा (शिवाजी) खेडे बारियात व पुणां आहेत. त्या जवळ तुम्ही जमावानसीं राहावें. तुमची जबरदस्ती त्यां प्रांतें आहे. अवघे मावळचे देशमूख देखील त्यांसी (शिवाजीशीं) रुजू होऊन त्यांचे आज्ञेंत वर्तेत येसा विचार करून जबरदस्तीनें राहावें. येखादी मोंगलाई कडील फौज व ईदिलशाहीकडील (विजापूराकडील) फौज आली तरी आपण इमान राखावें त्यासी लढाई करावी, येसी शफत इमान पुरस्कर

खान, आसदखान, मसूदखान, अज्जमखान, सर्जाखान, यादुहखान, अंबारखान, जोहारखान, बाळाजी हैबतराव, राघोजीराव, बाजीराव घोरपडे, यशवंतराव, कन्नोळ राजा, वेदाजी भास्कर अर्णीकर वगैरे हिंदु मुसलमान सरदार त्याच्या छावणीत हजर होते. मुस्तफाखानास शहाजीस कैद करण्याबद्दलचा शहाचा हुकूम मिळाल्यावर त्यानें शहाजीस निरोप पाठविला की, "पुढील वर्षाच्या मोहिमेच्या कार्याची आंखणी व योजना ठरवावयाची आहे, तेव्हां आपल्यासारख्या धुरंधराची सल्ला घेतल्यावांचून कोणताही कार्यक्रम निश्चित करणें योग्य होणार नाहीं; सबब आपण सत्वर निघून आमच्या छावणीत यावें." मुस्तफाखानाच्या ह्या निरोपांत कांहीं तरी कपट असावें, असें शहाजीनें लागलीच ताडलें; तथापि बाह्यात्कारीं तसें कांहीं एक न दाखवितां त्याने खानाचें आमंत्रण स्वीकारून त्याच्या मुक्कामावर चंदीकडे जाण्याची तयारी केली; आपला मुलगा संभाजी याच्या ताब्यांत बंगलूरचा किल्ला व तेथील फौज देऊन त्यास कांहीं कमजास्त झाल्यास तयारीत असण्याविषयीं बजावलें, आणि खंडाजी, मानाजी माने, तानाजी, बंधूजी, दसोजी, मेघोजी, व भांडवलकर या सात इमानी सरदारांना आपणाबरोबर घेऊन तीन हजार सैन्यासह तो मुस्तफाखानाच्या भेटीस गेला. खानानें वरनागीं मोठी अदब दाखवून त्याची भेट घेतली, त्याला निरनिराळ्या सबबी सांगून आपणाजवळ ठेवून घेतलें; नंतर एके दिवशीं पहाटेस शहाजी हा तंबूत निजला असतां आसदखान, यशवंतराव, व बाजी घोरपडे, यांनीं त्या तंबूला वेढा दिला; त्याचा गलबला ऐकून शहाजी जागा झाला, व घोड्यावर बसून निसटून जाणार इतक्यांत बाजी घोरपड्यानें त्याचे पाय धरून त्यास पकडलें; × इतक्यांत ही हकीकत शहाजीच्या सरदारांना व

---

बेल रोटीवर हात ठेवून घेतली." (भा. इ. सं. मंडळ चतुर्थ संमेलनवृत्त; पान १७९-१८० पहा.). यावरून शिवाजीनें निराळें राहून स्वतंत्र राज्य मिळवावें अशाबद्दल शहाजीचा गुप्त प्रयत्न होता हें उघड होतें.

× शहाजीस बाजी घोरपड्यानें कसा पकडला याबद्दल निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे उल्लेख आढळतात; शहाजी व बाजी घोरपडे या उभ-

सैन्याला कळून त्यांच्या व मुस्तफाखानाच्या सैन्यामध्यें एक जोराची चकमक उलाली; परंतु त्यांत शहाजीच्या पक्षास अपयश आलें; व बरेंच सामान मुस्तफाखानाच्या हातीं लागलें; परंतु शहाजीचे तीन हजार स्वार व सरदार बंगळूरकडे निसटून गेले. इकडे बाजी घोरपड्यानें शहाजीस पकडल्यावर, त्यास मुस्तफाखानाकडे नेऊन हजर केलें; व मुस्तफाखानानें योग्य तो बंदोबस्तानें त्याची लागलीच विजापूर येथें महंमद अदिलशहाकडे रवानगी करून दिली.

---

यतांमध्यें युद्ध होऊन घोरपड्यानें शहाजीस वार करून पकडलें, असा तंजावरच्या शिलालेखांत उल्लेख आहे. परंतु बखरीमध्यें शहाजीचा मुक्काम तंजावरजवळ जिरावाडी येथें असतां बाजी घोरपड्यानें त्यास आपल्या घरीं मेजवानीस बोलावून दग्यानें त्याचे पाय धरून त्याला कैद केलें, असा उल्लेख आहे.

फारशी तवारिखींतही या बाबतींत उल्लेख आढळतो; तो खालीलप्रमाणें:—

इ० सन १६४७मध्यें, विजापूरकर सरदार मुस्तफाखान यानें कर्नाटक प्रांतांतील प्रसिद्ध व बळकट असा दक्षिण अर्काट जिल्ह्यांतील, कृष्णागिरी ( किस्तनागिरी ) ( Kistnagiri ) येथून समुद्रकिनाऱ्याला जाणाऱ्या सडकेवर त्रिवेंद्रम येथून अजमासें अठरा मैलांवर असलेला जिंजीचा किल्ला व सर्व दक्षिण भाग हस्तगत करून घेतला; ( ता० १७ दिजंबर इ० सन १६४९ ). त्या वेळीं अदिलशहाच्या हुकमाप्रमाणें मुस्तफाखानानें बाजी घोरपडे यांस शहाजीस पकडण्यास सांगितलें; त्याप्रमाणें घोरपड्यानें शहाजीस दग्यानें न पकडतां छापा घालून पकडलें, असा कित्येक ठिकाणीं उल्लेख आहे; पण तो छापाच मुळीं दग्याचा होता, असें "बसातीन-ई सलातीन" या अदिलशाही राज्याच्या फारशी तवारिखींत ( पान ३०९–३११ पहा ) लिहिलेलें आहे; यासंबंधीं जहूर जहूरी याने आपल्या "महमंदनामा" या तवारिखींत असें लिहिलें आहे कीं, ( पान ३७१–३७२ पहा ) जिंजी येथील वेढा व युद्धप्रसंग पुष्कळ दिवस चालू राहिला; तेव्हां शहाजीनें मुस्तफाखान यांस अशी विनंती केली कीं, "माझें सैन्य या सततच्या युद्धप्रसंगामुळें थकून गेलें आहे; तरी सैन्याला विश्रांती देण्याकरितां मला माझ्या प्रदेशांत

शहाजी विजापूर येथें येऊन पोचल्यानंतर अदिलशहानें त्यास फर्माविलें कीं, " तुमच्या मुलानें बंडाळी माजविली असून त्यांत तुमचेंही अंग आहे; तरी त्याचा बंदोबस्त तुम्हीं तावडतोब करावा. " त्यावर शहाजीनें अदिल-शहास विनंती केली की, " मुलगा आमच्या काह्यांत नाहीं. मी माझ्या

---

तंजावरकडे जाण्याची परवानगी मिळावी." परंतु, "तुमच्या जाण्यानें वेढ्याच्या कार्यांत व्यत्यय येईल " असें खानानें शहाजीस सांगून त्यास परत जाण्यास परवानगी दिली नाहीं; त्यावर शहाजीनें खानास उलट असें कळविलें कीं, " छावणींत धारण अतीशय महाग झाली आहे; त्यामुळें माझ्या सैन्याची उपासमार होत आहे; व ही उपासमार, व हे युद्धाचे कष्ट यापुढें सोशीत राहण्यास माझें सैन्य अगदींच असमर्थ आहे; आणि अशा स्थितींत आपण मला जाण्याची परवानगी दिली नाहीं तरी मी जाणार, हें निश्चित आहे. " तेव्हां शहाजीच्या मनांत दगा आहे व तो आपणाशीं युद्ध करील अशी खानाची खात्री झाली. त्यानें शहाजीस मोठ्या युक्तीनें पकडलें; व त्याची सर्व मालमिळकत सरकारांत जप्त केली.

वरील महमुदनाम्यांत दिलेल्या हकीकतीविषयीं अधीक माहिती बसातीन–ई–सलातीन या अतीशय विश्वसनीय तवारिखींत दिलेली आहे. ती अशी कीं:–शहाजीनें मुस्तफाखानाच्या हुकुमाचा अनादर करून तो खानाचा प्रतिकार करूं लागला तेव्हां खानानें त्यास कैद करण्याचें ठरविलें; व एक दिवस बाजी घोरपडे व यशवंतराव आसदखानी या उभयतांना अगदीं पहाटेसच आपल्या सैन्यासह शहाजीच्या तळावर त्यास कैद करण्याकरितां पाठविलें; त्या वेळीं शहाजी निजलेला होता; परंतु हे उभयतां सरदार तेथें आल्यावर शहाजीस जागें करून त्यास ही हकीकत सांगण्यांत आली; तेव्हां आपणा-वर हा अचानक घाला आला असें पाहून, घाबरून, शहाजी जिवाच्या भीतीनें एकटाच घोड्यावर स्वार होऊन पळाला; तेव्हां बाजी घोरपडे यानें त्याचा पाठलाग करून त्यास पकडून मुस्तफाखानासमोर आणून उभें केलें; व खानानें त्यास प्रतिबंधांत ठेविलें. त्याचें तीन हजार सैन्य उधळून लाविलें; व त्याचा सर्व तळ लुटला. ही हकीकत अदिलशहास कळल्यावर, त्यानें

पहिल्या बायकोचा व तिच्या ह्या मुलाचा ( शिवाजीचा ) कधींच त्याग करून दुसरें लग्न केलें आहे; त्यामुळें त्यांचा आमचा आज पुष्कळ वर्षे कोणत्याही प्रकारचा तिळमात्रही संबंध नाहीं. तो सरकारचा गुन्हेगार असल्यानें त्याचा आपणांस योग्य वाटेल त्याप्रमाणें बंदोबस्त करावा. आपण आड येत नाहीं." त्यानंतर शहाजीस देहांत शासन करावें कीं काय, याबद्दल दरबारांत बरीच वाटाघाट होऊन शहाजीचा प्राणनाश न करितां, "शहाजीनें जर अमूक दिवसांत शिवाजीचा बंदोबस्त केला नाहीं, व शिवाजी आम्हास शरण येईल अशी व्यवस्था केली नाहीं तर त्यास भिंतींत चिणून ठार मारण्यांत येईल" अशी धमकी देण्यांत आली. भिंतींत दगडाचा एक कोनाडा करून त्यांत बसण्यापुरती जागा ठेवून, तींत शहाजीस बसवून एक चिरा मात्र लावावयाचा बाकी ठेवण्यांत आला. या कोनाड्यांतून दिवसांतून एक दोन वेळां बाहेर काढून, शहाजीस थोडा वेळ उघडी हवा मिळाल्यावर पुन्हां त्या कोनाड्यांत ठेवावयाचें, असा नित्यक्रम सुरू झाला; आणि या अत्यंत खडतर, कष्टदायक व दुर्धर स्थितींतच त्याला आपल्या आयुष्याचा पुढील कांहीं काळ कंठीत राहणें प्राप्त झालें.

शहाजी वरील या प्राणांत प्रसंगाची बातमी संभाजी व शिवाजी या उभयतांना मिळाल्याबरोबर त्यांनीं दोन्हींकडून अदिलशहास जोराचा शह देण्याला सुरुवात केली; संभाजीनें आपला सर्व फौजफाटा व जंगी तोफखाना

---

शहाजीस विजापूर येथें आणण्याकरितां, आपला सरदार अफझलखान यांस रवाना केलें; व त्याची सर्व मालमिळकत जप्त करण्याकरितां एका खोज्याचीही त्याच्याच बरोबर रवानगी केली; ( इ० सन १६४८ नोव्हेंबर ). त्यानंतर अफझलखानानें शहाजीस बेड्या घातलेल्या स्थितींत विजापूर येथें आणिलें.

यावरून शहाजीस पकडण्यास जरी बाजी घोरपडे व यशवंतराव आसदखानी हे दोन सरदार त्याच्या तळावर गेले होते तरी फक्त बाजी घोरपड्यानेंच शहाजीचा पाठलाग करून पकडलें, म्हणजे बाजी घोरपड्यानेंच शहाजीवर हा प्रसंग आणिला, व शहाजी दग्यानेंच पकडला गेला, ह्या गोष्टी उघड होतात.

घेऊन मुस्तफाखानाच्या ताब्यांतील प्रदेश सारखा हैराण करण्यास सुरुवात केली; फरादखानाचा पराभव करून त्याला पळवून लाविलें, आणि मुस्तफाखानासही तो आटोपेनासा झाला; पण एवढ्यानेंच मुस्तफाखानाच्या मागील पीडा संपली असें नाहीं; संभाजीचें उदाहरण पाहून आदिलशहाचा उभा दावेदार असलेला चित्रकल येथील नायक बिच्चकती भरमा यानें हीच संधी साधून अदिलशहाविरुद्ध मोठ्या जोराची उठावणी केली; चित्रकलकर भरमा हा मोठा शूर योद्धा होता; पराक्रमी सेनानायक होता; कर्नाटकातील एक अत्यंत संपत्तिमान संस्थानिक होता; त्याची लष्करीशक्ति दांडगी होती; त्याच्या सैन्याची साऱ्या कर्नाटकांत " कजाख " म्हणून ख्याती होती; "मूर्तिमंत काळ " म्हणून प्रख्याती होती. अदिलशाही सैन्यास तर त्यानें केव्हांच खाऊन टाकिलें असतें; पण निव्वळ शहाजीचा दरारा, कर्तबगारी, पराक्रम, व लष्करी बळ यांना दबूनच शहाजी कर्नाटकांत होता तोंपर्यंत भरमा आदिलशहाविरुद्ध कोणतीही गडबड न करितां स्वस्थ राहिला होता; तो इतका श्रीमान होता, कीं त्याच्या तरवारीचें म्यान सोन्याचें होतें, व त्याच्या स्वारांच्या तरवारींचीं म्यानें रुप्याचीं होतीं; तो तीन हजार घोडेस्वारांचा मालक होता; आणि या घोडेदळाशिवाय त्याच्या संग्रही तीन हजार जबरदस्त पायदळ होतें. असा हा अदिलशहाचा एक कट्टा दुष्मन असलेला जबरदस्त प्रतिस्पर्धी, कर्नाटकांतील शहाजींचें दडपण नाहीसें झाल्याबरोबर आदिलशहावर उलटला; एकाद्या जंगी तुफानाप्रमाणें आदिलशाही सैन्यावर कोसळला. त्यानें विजापूरकरांच्या प्रदेशांत लूटमार करून मनस्वी धुमाकूळ उठविला, व थेट विजापूरपर्यंत चाल करून येऊन खुद्द विजापूरची पेठही त्यानें लुटून फस्त केली. थोडक्यांत म्हणजे संभाजी व भरमा यांच्या बंडाळीमुळें सर्व कर्नाटकभर पुन्हां दंगेधोपे सुरू झाले. आदिलशाही अंमल बहुतेक उठल्यासारखा झाला. शहाजीला पकडल्यानें, गांधील माशांचें मोहोळ उठल्याचा अनुभव महंमदशहास व आदिलशाही दरबारास पूर्णपणें येऊन चुकला; व याच वेळीं इकडे शिवाजीनेंही तशीच धामधूम उडविल्यामुळें भरीत भर पडून महंमदशहा व त्याचा दरबार अत्यंत चिंतामग्न होऊन गेला.

शहाजीच्या जिवावर बेतल्याचें शिवाजीस कळतांच पुढें काय करावें या-

बद्दल त्याला मोठाच विचार उत्पन्न झाला. त्याला स्वतःलाही प्रारंभी आदिलशहानें विजापूर येथें बोलाविलें होतें, आणि खुद्द शहाजीकडूनही त्यास विजापूर येथें निघून येण्याबद्दल पत्र पाठविलें होतें. परंतु माता जिजाबाई व पत्नि जिजाबाई, व इतर मंडळींनीं त्यास विजापूर येथें जाण्याची सल्ला दिली नाहीं म्हणून त्यानें तो बेत टाळला; मोंगल बादशहा शहाजहान यांजकडे वकील पाठवून, व त्याच्यामार्फत, "आपण बादशाही नौकरी करण्यास तयार आहों" असें बादशहास, व त्याचा दक्षिण प्रांताचा सुभेदार असलेला मुलगा शहाजादा मुरादबक्ष यांस कळवून तिकडे संधान बांधिलें; व आदिलशाही प्रदेशांत धुमाकूळ माजविण्यास सुरवात केली. तेव्हां महंमदशहानें बल्लाळ बेडर, फत्तेखान व मुसेखान या तीन सरदारांना शिवाजीवर रवाना केलें. या वेळीं शिवाजी पुरंदरच्या किल्ल्यांत होता. त्यामुळें हा किल्ला हस्तगत करून घेण्याची कामगिरी फत्तेखान व मुसेखान या उभयतांनीं आपणाकडे घेतली, व बल्लाळ बेडराकडे, पुरंदरपासून तीन कोस पलीकडे असलेला शिरवळचा किल्ला हस्तगत करण्याची कामगिरी सोंपविली. त्याप्रमाणें बेडरानें येऊन शिरवळचें ठाणें काबीज केलें. या वेळीं शिवाजीचा सरदार भींवराव हा शिरवळच्या आसपास होता; त्यानें शिरवळच्या ठाण्याचें योग्यप्रकारें संरक्षण न करितां तो शिवाजीकडे परत आला; परंतु हें त्याचें वर्तन शिवाजीस पसंत पडलें नाहीं; त्यानें भींवरावास आल्या पावलानें परतून शिरवळचें ठाणें पुन्हां हस्तगत करून घेण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणें भींवरावानें तिकडे जाऊन मोठ्या त्वेषानें हल्ला चढवून शिरवळचा किल्ला हस्तगत केला; त्या वेळीं उडालेल्या चकमकींत बल्लाळ बेडर ठार झाला, व त्याच्या उरलेल्या सैन्याची पूर्णपणें पांगापांग उडाली. इकडे फत्तेखान व मुसेखान यांनीं पुरंदरवर हल्ला चढविला; पण तो शिवाजीनें परतून लाविला; तेव्हां इरेस चढून संधी साधून त्या उभयतांनीं पुन्हा निकराचा हल्ला चढवून ते थेट किल्ल्याच्या दरवाजाशीं येऊन भिडले; तेव्हां ह्या ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं शिवाजी आपल्या कांहीं निवडक सैन्यासह किल्ल्याच्या बाहेर पडून शत्रूसैन्यावर मोठ्या निकरानें तुटून पडला; व त्या सैन्यास त्यानें तेथून पिटाळून लाविलें. त्या खणाखणींत मुसेखान प्राणास मुकला, व

फत्तेखान व आदिलशाही सैन्य तेथून जीव घेऊन पळालें. अशा रीतीनें तिकडे कर्नाटकांत संभाजी व भरमा व इकडे पुणें प्रांतांत शिवाजी यांनीं आदिलशहाचा पूर्ण बोजवारा उडवून दिल्यामुळें तो अतिशय गांगरून गेला; इतक्यांतच, " शिवाजीनें शहाजहान बादशहाशीं संधान बांधिलें; त्यांत तो यशस्वी झाला, व बादशहाची मदत घेऊन तो अदिलशाही प्रदेशावर स्वारी करणार आहे, " अशी महंमद आदिलशहास बातमी समजली; त्यामुळें तर त्याचें धाबेंच दणाणलें; व या प्राणसंकटांतून सुरक्षितपणें कसें मुक्त व्हावें, या विवंचनेंत तो पूर्णपणें मग्न होऊन गेला.

ह्या वेळीं दिल्ली येथें बादशहा शहाजहान हा राज्य करीत असून निजामशाही राज्याच्या वांटणींत मोंगल बादशाहीच्या अमलाखालीं जो प्रदेश आला, त्यावर "दक्षिण प्रांताचा सुभेदार" म्हणून बादशहानें आपला मुलगा मुरादबक्ष याची नेमणूक केली होती. ह्या बादशाही प्रदेशाचा बंदोबस्त आदिलशाही प्रदेशाच्या मानानें पुष्कळच चांगला होता; आणि मोंगल बादशहा व विजापूरकर आदिलशहा या उभयतां सत्ताधाऱ्यांशीं एकदम वैरभाव सुरू केल्यास आपला निभाव लागणार नाहीं, हें शिवाजी पूर्णपणें जाणून होता; म्हणून जरी त्यानें आदिलशाही प्रदेशास पुष्कळ उपद्रव दिला होता, व त्या राज्यांतील कांहीं प्रदेशही हस्तगत करून घेतला होता तरी मोंगली प्रदेशास त्यानें यत्किंचितही उपद्रव दिला नव्हता. त्यामुळें मोंगली बादशाहीशीं त्याचा तिळमात्रही वैरभाव उत्पन्न झाला नव्हता. शिवाय दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें नष्ट करण्याचा शहाजहान याचा निश्चय ठरून चुकला होता; त्यामुळें आदिलशाही राज्याविरुद्ध शिवाजीनें माजविलेल्या जोराच्या बंडाळीमुळें, शहाजहान यांस वाईट न वाटता उलट समाधानच वाटत होतें. ही राजकीय परिस्थिती शिवाजीच्या पूर्णपणें ध्यानांत होती. म्हणून त्यानें शहाजहान बादशहाकडे दादोजी कोंडदेवाच्या काळांतील जुना कारकून रघुनाथपंत यांस वकील म्हणून पाठविलें; व "आपण बादशाही नोकरींत येण्यास तयार आहों" असें त्याच्या मार्फत शहाजहान यांस कळविलें. शहाजहान यानेंही शिवाजीची विनंती तात्काळ मान्य केली. शहाजीस आपल्या नोकरींत ठेवून शिवाजीस पांच हजारी मनसब देण्याचें त्यानें अभिवचन दिलें; आणि शहाजीस बंधमुक्त करण्या-

विषयींही त्यानें तात्काळ आदिलशहास पत्र पाठविलें. त्यावेळीं दक्षिण प्रांताचा सुभेदार शहाजादा मुरदबक्ष याच्याकडून शहाजी व शिवाजी या उभयतांना ता० ३० नोव्हेंबर इ० सन १६४९ चीं दोन निरनिराळीं पत्रें आलीं; त्यापैकीं शहाजीस पाठविलेलें पत्र (राजवाडे, म. इ. सा. खंड ८ लेखांक ३ पहा.) खालीं लिहिल्याप्रमाणें आहे तें:—

"उमरावी सरदारीच्या योग्यतेचे, शूर, पराक्रमी, दौलतीचे उत्तम अभीष्टचिंतक, राजनिष्ठ शिरोमणी, महत्कृपेस पात्र, शहाजी भोंसले यांणी बादशाही कृपेस आपला सत्कार जाणोन समजावें कीं, तुमचें पुत्र शिवाजी याणीं अर्जदास्त हुजूर येण्याविशीं पाठविली, ती पाहून कृपेसकारण जाले. पेशजीच्या गोष्टी मनांत न आणितां निजामशाही जगविण्याच्या प्रयत्नांत मोंगली सैन्याशीं शहाजीनें जे युद्धप्रसंग केले, ते मनांत न आणितां–तुमची मोकळीक करण्याविषयीं लिहिलें आहे. त्यास हल्लीं आम्ही दिल्लीकडे जात आहों. तुम्हांस खुष खबर देतों कीं, तुम्ही सर्व प्रकारें खातरजमा ठेवावी, जे, आम्ही हुजूर पावलियावरी–म्हणजे आम्हीं दिल्ली येथें जाऊन शहाजहान बादशहाची भेट घेतल्यावर–तुमचे मजकुराविषयीं अर्ज करून बंदोबस्त करून देऊं. परंतु तुम्ही आपला एक वकील इतबारी (विश्वासू) द्यावा; म्हणजे त्यासमागमें फर्मान कौलाचें, चिरंजीव संभाजी वगैरे सरकार कृपेस पात्र होऊन पेशजीप्रमाणें मनसबा, व नूतन सरफराज पावतील. इकडील स्नेहांत व इकडील लक्षांत वागणें हें सर्व आपलें मनोरथ पूर्ण करून घेण्यास कारण आहे. म्हणोन तसे वागोन खातरजमा ठेवावी. आणि तुम्हाकरितां पोषाख पाठविला हा घेऊन आपणांवर पूर्ण लोभ आहे, असें मनांत आणावें. छ ५ माहे जिल्हेज, सन २३ जुलूस, सन १०५९ हिजरी."

बादशहा शहाजहान यांजकडून, शहाजीस सोडून देण्याविषयीं अदिलशहास हुकूमवजा पत्र आल्यानंतर, शहाजीस अपाय करण्याची अथवा त्या पत्राचा अनादर करण्याची, त्यास हिंमत झाली नाहीं; बादशाही पत्राचा अव्हेर करण्याची महंमद अदिलशहास छाती झाली नाहीं. शिवाजीनें दिलेला शहाजहानचा शह असा जोरदार व बलवान् होता कीं, त्याला शहाजीस धड सोडितांही येईना, अथवा त्याला प्रतिबंधांत ठेवून मोंगल

बादशहाशीं शत्रुत्व संपादन करून घेण्याचा मार्गही स्वीकारतां येईना ! निजामशाहीवर आलेली मोंगलाची घाड महंमद अदिलशहा विसरला नव्हता; शहाजहाननें निजामशाही राज्य नामशेष करण्याकरितां केवढा अट्टाहास केला व तें राज्य नष्ट केल्यावरच तो कसा शांत झाला, हें त्याच्या आठवणींत होतें; तो शहाजहानचा मांडलीक म्हणवीत होता; त्याला अतीशय भीत होता; आणि शहाजीमुळें शहाजहानशीं वैर उत्पन्न केल्यास तो आपली व आपल्या राज्याची पाळेंमुळें खणून काढील, अशी अदिलशहास पूर्ण खात्री होती; शिवाय तो भोळा व शांत वृत्तीचा असून त्याची प्रकृतिही पुढें सारखी नादुरुस्त राहिल्यानें त्याच्यातील हिंमत व तडफदार नाहींशी झाली होती. आणि दरबारांतही शहाजीच्या पक्षाची मंडळी असून ती त्याच्या मुक्तेबद्दल खटपट करीत होती. इतक्यांतच ज्याच्या बळावर महंमदशहा उडया मारीत होता, तो शहाचा बदसल्लागार सरदार मुस्तफाखान हा एकाएकीं मृत्यू पावला; पण शहाजीविषयीं त्याच्या मनांत इतका उभा दावा होता कीं, मरतांमरतांही " शहाजीवर चांगली नजर ठेवा; " असें सांगून त्यानें प्राण सोडिला ( इ० सन १६४८ ). मुस्तफाखान मेल्यामुळें तर अदिलशहा अगदींच निराधार झाला. शहाजीशीं नरम गोष्टी बोलूं लागला; " तुमच्याकडे कांहीही अपराध नाहीं; तुम्हाला पकडण्याचा मी मुस्तफाखानाला हुकूम दिला नव्हता; फक्त दरबारीं एकदां येऊन जा एवढाच काय तो निरोप तुम्हास पोहोंचविण्यास मुस्तफाखानास सांगितलें होतें; परंतु त्यानें बेवकूबपणानें तुम्हास अटक केली; आतां दिलसफा करून व झाल्या गोष्टी विसरून जा; मी आपणास कर्नाटकमध्यें परत जाण्याची परवानगी देतों. आपण उभयतां पुत्रांना आंवरून धरा, व आपल्या जहागिरीवर सुखरूप अंमल करा." अशा गोड, मऊ, व नरम भाषा महंमदशहा वापरूं लागला, व त्यानें शहाजीस बंधमुक्त करून कर्नाटकमध्यें परत जाण्याची परवानगी दिली+

+या वेळीं आदिलशानें त्याची सक्त कैद कमी करून त्यास जामिनावर खुलें केलें; परंतु कर्नाटकमध्यें परत जाण्याची परवानगी न देतां त्यास विजापूर येथेंच आपल्या नजरेखालीं ठेविलें; त्या ठिकाणीं तो इ०सन१६४९ते इ०सन १६५२

( इ० सन १६४९ ). त्या वेळीं अदिलशहानें त्यास तीन अटी घातल्या त्याः-( १ ) संभाजी अदिलशाही प्रदेशांत पुन्हां धामधूम करणार नाहीं, अशी तजवीज करावी. ( २ ) शिवाजीनें ह्या वेळेपर्यंत जो अदिलशाही प्रदेश हस्तगत करून घेतला असेल तो त्याच्याकडून आम्हांस परत देववावा; व ( ३ ) चित्रकलकर नायक बच्चकती भरमा याचा पूर्णपणें बंदोबस्त करावा. यांपैकीं पहिलें व तिसरें कलम शहाजीनें मान्य केलें; व दुसऱ्या कलमासंबंधीं पूर्वीप्रमाणेंच ह्या वेळींही त्यानें शहास असें स्पष्ट सांगितलें कीं, " शिवाजी हा माझ्या कह्यांत नाहीं, व तो माझें ऐकेल किंवा न ऐकेल याचीही मला खात्री देतां येत नाहीं. " अर्थात दुसऱ्या कलमासंबंधानें जिम्मा घेण्याचें शहाजीनें पतकरलें नाहीं; तथापि महंमदशहानें या बाबतींत शिवाजीशीं शिष्टाई करून खटपट करण्याची कामगिरी पुढें शहाजीवर लादलीच; नंतर शहाजी कर्नाटकमध्यें परत गेला; त्यानें संभाजीस लागलींच थोपवून धरिलें, व चित्रकलकर भरमा यांस नामशेष करण्याच्या उद्योगास त्यानें लागलींच प्रारंभ केला.

शहाजी हा या प्राणसंकटांतून मुक्त होऊन कर्नाटकप्रांतीं सुरक्षित पोहोंचला, हें ऐकून शिवाजीस अत्यानंद झाला; परंतु अदिलशहानें घातलेल्या तीन अटींपैकीं पहिलें कलम शहाजीनें मान्य करून व दुसऱ्या कलमाच्या बाबतींत शिष्टाई करण्याचें मान्य करून-म्हणजे या दोन मानहानीकारक अटी पत्करून शहाजीनें आपली मुक्तता करून घेतली, याबद्दल शिवाजीस फार वाईट वाटलें; आणि वास्तविक पाहतां संभाजीनें फरादखानाचा पराभव करून व आपण मुसेखान, फत्तेखान व बल्लाळ बेडर यांना धुळीस मिळवून, व अदिलशहाला, शिवाय मोंगल बादशहाकडूनही शह देववून शहाजीच्या मुक्ततेसंबंधाची तजवीज केली असूनही महंमद अदिलशहाच्या उपरीनिर्दिष्ट

---

पर्यंत अजमासें चार वर्षें होता; त्यानंतर इ० सन १६५३च्या प्रारंभीं आदिलशहानें त्यास कर्नाटकमध्यें जाण्याची परवानगी दिली, व शहाजीची सुटका महंमदशहानें सन १६४९ मध्यें, ( शक १५७१ जेष्ठ शुद्ध पौर्णिमा ) विजापूर येथें न करतां कोंढाणा ऊर्फ सिंहगड येथें आणून केली, असाही उल्लेख आढळतो.

दोन्ही अटी मान्य केल्यासारखें करून आपली सुटका करून घेतली. याबद्दल शिवाजीस अतीशय राग आला;× त्याला शहाजीची ही धरसोड व तज्जन्य मानहानी बिलकूल पसंत पडली नाहीं; तथापि तो पितृभक्त असल्यानें त्यानें वडिलांस ( शहाजीस ) एक शब्दानेंही दुखविलें नाहीं; परंतु शहाजींचें धोरण कसें चुकलें याचें मनन करून त्या चुका आपल्या हांतून घडूं नयेत म्हणून शिवाजीनें पूर्ण खबरदारी घेतली; व तीच त्याच्या स्वतंत्र स्वराज्य संस्थापनेच्या कार्याला पुष्कळ वेळां प्रमुखत्वानें मार्गदर्शक ठरली.

---

× परमानंद कवीकृत "शिवभारत" या काव्यग्रंथाच्या सोळाव्या अध्यायांत, (इतिहास मंजरी, भाग १ पहा.) असें वर्णन केलेलें आहे कीं, शके १५७१ मध्यें, शहाजीस कैदेंतून सोडतांना विजापूर दरबारानें (१) संभाजीनें बेंगरूळ सोडावें, आणि (२) शिवाजीनें सिंहगड सोडावा, अशा दोन मानहानीकारक अटी घातल्या; व त्या शहाजीनें मान्य करून प्रतिबंधांतून आपली मुक्तता करून घेतली; वास्तवीक पाहतां संभाजीनें फरादखानाचा पराभव करून, व शिवाजीनें मुसेखान व फत्तेखान यांनां धुळीस मिळवून, (व अदिलशहास मोंगली बादशाही शह देऊन) शहाजीच्या मुक्ततेची तजवीज केली होती; परंतु महंमद अदिलशहाच्या उपरीनिर्दिष्ट दोन्हीही अपमानकारक अटी शहाजीनें मान्य करून आपली सुटका करून घेतली; हें ऐकून शिवाजीस अतीशय राग आला, व त्यानें आपल्या वडिलांचें धोरण कसें चुकत आहे, वडिलांनीं मुसलमानी राज्यकर्त्यांची नौकरी इमानें इतबारें केली, आपला सर्व जन्म त्यांच्या सेवेंत घालविला, तरी त्यांच्या हातून म्हणण्याजोगी महत्वाची कामगिरी झाली नाहीं, उलट दुटप्पी वर्तनामुळें त्यांच्यावर कैदेचा मात्र प्रसंग आला, तेव्हां यवनांच्या नौकरींत महत्व प्राप्तकरून घेण्याचा प्रयत्न किती व्यर्थ आहे, यासंबंधीं आपले विचार आपला वृद्ध मुत्सद्दि सोनाजी पंडित (सोनोपंत डबीर) यांजजवळ बोलून दाखविले, व विजापूरकरावर स्वारी करण्याचा निश्चय केला; त्यावेळीं सोनाजीपंतांनीं खरी राजनीति कोणती हें सांगून त्याचा राग शांत केला; यासंबंधी तंजाउरचा शिलालेख पृष्ठ २४ (बृहदीश्वर शिलालेख) मधील उतारा, व इतर विवेचन पुढें चवथ्या परिच्छेदांत "शहाजीची योग्यता" या सदराखालीं केलेलें आहे.

शहाजीचें इ० सन १६३७च्या पुढील चरित्र जुळविण्याचीं साधनें फारशीं उपलब्ध नाहींत; तथापि जीं थोडींशीं उपलब्ध आहेत, त्यावरून सुद्धां शहाजीचें कर्तृत्व सहज सिद्ध होत आहे. "शहाजी हा विजापूरकरांच्या नोकरींत शिरल्यानंतर, ( भा. इ. सं. मंडळ; त्रैमासिक; अंक पहिला; मालोजी व शहाजी हा रा. खरेशास्त्री यांचा निबंध पहा. ) पहिल्या तीन चार वर्षांत शहाजीच्या मनोवृत्तींत जो क्षोभ उत्पन्न झाला त्यांतच शिवाजीच्या राज्यस्थापनेचें बीज आहे. राज्यसंस्थापकाच्या पदवीस पोंचलेल्या शहाजीस हें परमुलखांत सेवावृत्तीचें लाजिरवाणें जिणें पतकरणें कशामुळें प्राप्त झालें ? मोंगलांच्या नांवानें तो जळत होताच; पण विजापूरकरांनीं आयत्या वेळीं आपणांस दगा देऊन स्वतःचा स्वार्थ साधून घेतला, याबद्दल त्याचें मन फार दुखावलें होतें. " महंमद अदिलशहानें विश्वासघात करून माझें राज्य बुडविलें, आणि जहागीर दिल्याचा उपकार दाखवून मला हद्दपारीची शिक्षा भोगावयास लाविलें; ज्यांच्या मांडीस मांडी लावून बसण्याची योग्यता आपण संपादन केली होती, त्यांचीच आतां ताबेदारी सोसावी, चाकरी करावी, मर्जी धरावी, असे दिवस आपणांस प्राप्त झाले ! आणि इतकें असून याबद्दल तोंडांतून अक्षरही काढण्याची सोय नाहीं, हा गुपित मारा निमूटपणें यावज्जीव सोसलाच पाहिजे," असे विचार उद्भवून त्याच्या मनास फार खेद वाटे ! " ज्यांनीं हें सर्व केलें, त्या शत्रूंवर अगर हितशत्रूंवर सूड उगविण्याच्या संधी आतां माझ्या आयुष्यांतून निघून गेल्या. तर मग या अपमानाचें परिमार्जन कुणी करावें ? हें उसनें कोणी फेडावें ? असें जेव्हां जेव्हां त्याच्या मनांत येई तेव्हां तेव्हां शिवाजीची आठ वर्षांची छोटी मूर्ती त्याच्यासमोर उभी राही ! करील तर हें सर्व माझा शिवाजीच करील असें त्यास वारंवार वाटे. हा त्याचा अंदाज पुढें किती पूर्णपणें खरा ठरला ! शहाजी हा पराक्रमी कारस्थानी पुरुष—हा राज्यक्रांती करणारा चळवळ्या—दक्षिणेंत राहूं दिला तर आपलीं राज्यें नांदूं देणार नाहीं, असें म्हणून दिल्लीचा शहाजहान विजापूरचा महंमद यांनीं शहाजीस कर्नाटकांत डांबून घातलें, व पुन्हां त्यानें दक्षिणेंत येऊं नये असा बंदोबस्त केला. पण पुढें लवकरच बापाहून सुद्धां पराक्रमानें अधिक दैदीप्यमान शिवाजी आपल्या राज्यांवर एकाहून एक भयंकर

तडाके लगावील हें मोंगल व विजापूरकर या दोघांच्याही स्वप्नांतसुद्धां त्या वेळीं आलें नाहीं."

"शिवाजीनें स्वतंत्र राहून निराळें राज्य करावें, ही कल्पना शहाजीला सुचली खरी, पण तो अशा बिकट परिस्थितींत सांपडला होता कीं, ती अमलांत आणितांना फार सावधपणानें वागणें त्यास प्राप्त होतें. शिवाजीचा जन्म झाल्यादिवसापासून शहाजीचा सर्व काळ लढायांच्या धामधुमीत गेल्यामुळें मुलाचा सहवास त्याला फारच थोडा लाभला होता. मुलगा मोठा होऊं लागला तसतशी त्याची चालचर्या पाहून आपला बेत पक्का करणें त्यास जरूर होतें. त्यासाठीं त्यानें सन १६३८।३९त व पुढें १६२१त शिवाजीस आपणांकडे बोलावून जवळ ठेवून घेऊन परीक्षा पाहिली. त्यांत उदयोन्मुख अपूर्व तेज त्याच्या चांगलेंच दृष्टोत्पत्तीस आलें. मग त्यानें आपल्या कारभारी मंडळाशीं खलबत करून पुढें योजिलेला बेत पार पाडण्यासाठीं एव्हांपासून एक एक पाऊल धीरें धीरें कसें टाकावयाचें हा निश्चय ठरविला. नंतर जिजाऊ आपणांस आवडत नाहीं, शिवाजी आपल्या मर्जीबाहेर वागणार, सबब जवळ ठेवण्याच्या सोयीचा नाहीं, असें खोटेंच निमित्त ठेवून त्या दोघांसही आपणांपासून दूर पुण्यास ठेवण्याची मसलत योजिली; आणि त्यांस विश्वासू दिवाण दादोजा कोंडदेव याजबरोबर पुण्यास रहावयास पाठविलें, आणि त्याबरोबरच आपलें कारभारीमंडळही कोणत्याना कोणत्या तरी निमित्तानें तिकडे रवाना केलें."

"यावर कोणी अशा शंका घेईल कीं, शिवाजीनें स्वराज्याची स्थापना केली, ती शहाजीच्याच प्रेरणेकरून केली, असें तुम्ही सांगतां, पण बखरींत किंवा तवारिखांत याबद्दल उल्लेख नाहीं. अथवा त्या अभिप्रायाचा शहाजीचा लेखही कोठें मिळालेला नाहीं. मग तुम्ही म्हणतां हें खरें कशावरून? या शंकेला उत्तर एवढेंच कीं, शहाजी मोंगलाचा प्रतिद्वंद्वी होता, तोंपर्यंत तवारीखवाल्यांनीं त्याचा थोडा बहुत परामर्ष घेतला. बाकी गोष्टीबद्दल खोल पाण्यांत शिरून शोध घेण्याचें या तिर्‍हाइतांना काय कारण? बखरी लिहिणारांनीं याबद्दल कांहीं लिहावयाचें, पण त्याची शहाजीबद्दलची माहिती किती कोती व अव्यवस्थित आहे, हें पूर्वीं सुचविलेंच आहे. आतां शहाजीच्या लेखाविषयीं

पाहिलें तर ज्यांच्या ताबेदारींत त्याला रहावयाचें, त्यांच्याच राज्यावर तूं घाले घालीत जा, असें तो शिवाजीला पत्र लिहून कळवील ? असलीं धोक्याचीं व गूढ कारस्थानें हे मुळीं पांढऱ्यावर काळें करण्याचे विषयच नव्हत. अत्यंत विश्वासू माणसाबरोबर निरोपानिरोपी या गोष्टी चालावयाच्या. तेव्हां या बाबतींत शहाजीच्या लेखाची अपेक्षा करणें वेडेपणाचें होय."

" पण एवढ्यावरून आम्हीं म्हणतों, याला कांहीं आधार नाहीं असें मात्र कोणी समजूं नये. आमचें विधान सिद्ध करण्यास वाचकांची खात्री होण्या जोगे पुष्कळ मुद्दे आम्हांस दाखवितां येतील. ते मुद्दे असेः–जिजाऊ व शिवाजी यांजबरोबर शहाजीनें दादोजी कोंडदेवास जहागीर सांभाळण्याकरितां पुण्यास पाठविलें, हें योग्यच झालें; पण यांबरोबर शामराव निळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुजुमदार, सोनोपंत डबीर, व रघुनाथ बल्लाळ सबनीस हे चार इसम जे शहाजीनें पुण्यास पाठविले, तें कशाकरितां ? जिथें गादीची जागा असते, जिथें राज्याचा कारभार चालतो, तेथें पेशवे, मुजुमदार, डबीर, सबनीस इत्यादि अधिकारी लागतात. पुणें परगण्याचा शेंपन्नास खेड्यांचा कारभार आंवरायला दादाजीसारखा महालकरी बस्स होता. त्याला पेशवे, मुजुमदार कशाला पाहिजेत. शहाजीच्या अनेक संकटकाळीं उपयोगी पडलेले मुलकी व लष्करी कामांतले वाकबगार, शत्रूचे किल्ले व ठाणीं फितुरानें किंवा हल्ल्यानें घेण्यांत तरबेज असलेले, असे हे मलिकंबरच्या वेळेपासूनचे शहाजीचे विश्वासू कारभारी यांनीं पुण्यास राहून काय करावयाचें होतें ? जिथें शेतीभाती करावयाची असते तिथें हत्ती कशाकरितां लागतात ? हे कारभारी लोक पुण्यास नेहमीं राहण्याकरितां पाठविण्यांत राज्यस्थापनेखेरीज शहाजीचा दुसरा कांहीं हेतु दिसत नाहीं."

" शिवाजी दहा वर्षांचा होता, त्यावेळचा म्हणजे इ० सन १६४० तला त्याचा शिक्का आहे तो असाः—

**॥ प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥**
**॥ शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भाति यशस्विनी* ॥**

---

*अर्थः–प्रतिपदेच्या चंद्ररेखेप्रमाणें वाढत जाणारी, व सर्व जगाला वंद्य असलेली, अशी, शहाजीचा मुलगा शिवाजी याची कीर्तिदायक मुद्रा प्रकाशमान होते.

शिक्यांतले शब्द गंभीरार्थ पूर्ण आहेतच; पण इतर प्रकारामुळेंसुद्धां हा शिक्का चमत्कारिक आहे. शिक्यांत देवाचें तरी नांव असावें, नाहींतर राजाचें तरी असावें. येथें दोन्हीं नाहींत ! दुसरी गोष्ट अशी कीं, बापाच्या हयातींत निराळा अधिकार मिळाला असल्याखेरीज मुलानें निराळा शिक्का करण्याचें प्रयोजनच नाहीं. बापाच्या शिक्क्यावरच मुलानें सरकारी काम भागवावयाचें असतें. शहाजीपेक्षां शिवाजीला निराळा अधिकार कोणता चालवावयाचा होता? असला हा स्फूर्तिजनक चमत्कारिक शिक्का कल्पून तो सरकारी कागदपत्रांवर करण्याची कल्पना, दहा वर्षांच्या मुलाला आपण होऊनच सुचली, असें तर कोणाचें म्हणणें नाहीं ना ? हा नवीन शिक्का शिवाजी करीत असतो, व त्याचे कारकून स्वतःस पेशवे, मुजुमदार, डबीर, म्हणवीत असतात, ही गोष्ट शहाजीला मुळीच ठाऊक नसेल, असेंही संभवत नाहीं. तर मग हा शिक्का चालू करणारे लोक कोण ? शहाजीच्या गर्भित संमतिखेरीज शिवाजीच्या दरबारांत असला नवीन शिक्का कसा सुरू होऊं शकेल ?"

" इ. सन १६३८च्या अखेरीस शिवाजी बेंगरूळहून पुण्यास आला. येतांच त्यानें " बारा मावळें " काबीज केलीं असें सभासदाच्या बखरींत लिहिलें आहे. पण तेव्हां तर शिवाजी आठ वर्षांचा होता. आठ वर्षांच्या मुलानें हीं मावळें काबीज करावयाचीं कशीं ? अर्थात् त्याच्या नांवावर हणमंते

---

शिवाजी नऊ वर्षांचा होता, त्या वेळीं, म्हणजे इ. सन १६३९ मधील आक्टोबरांतील एका कागदावर खालीलप्रमाणें शिवाजीची राजमुद्रा ( राजवाडे खंड १५-४३७ पहा ) दिलेली आहे तीः—

॥ प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
॥ शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

अर्थः—आज ही मुद्रा प्रतिपदेच्या चंद्ररेखेप्रमाणें अल्प असली तरी ती उत्तरोत्तर वृद्धी पावून सर्व लोकांना वंद्य होणार आहे; आणि ती शहाजीपासून शिवाजीला प्राप्त झाली असून केवळ लोककल्याणाकरितांच ती त्यानें धारण केली असल्यामुळें ती शोभत आहे.

वगैरे कारभाऱ्यांनीं ही मुलुखगिरी केली हें स्पष्ट आहे. " येतांच " या बखरींतील पदावरून बेंगरुळास ठरलें होतें त्याप्रमाणें शिवाजीनें पुण्यास येतांच बारा मावळें काबीज केलीं, असा ध्वनी निघतो. बेंगरुळाहून येणें, व मावळें काबीज करणें, यांतला कार्यकारणभाव आम्हाला तर स्पष्ट दिसतो. चिटणीशी बखरींत तर " ( शिवाजी महाराज ) शके १५६२ त या ( व राज्यस्थापनेच्या) मसलतीचा आरंभ करिते झाले." असें स्पष्टच म्हटलें आहे. शके १५६२ त शिवाजीस बारावें वर्ष लागलें होतें. शहाजीला कळविल्याखेरीज मसलतीचा प्रारंभ शिवाजीच्या कारभाऱ्यांनीं आपल्याच जबाबदारीवर केला, असें कसें घडेल ?"

" शिवाजीच्या बंडाला मूळ कारण शहाजी आहे, याबद्दल खात्रीलायक पुरावा मिळाला असल्याखेरीज विजापूरचा सुलतान, शहाजीसारख्या असामान्य महत्वाच्या प्रधानपुरुषाची केवळ संशयावरून हुरमत घेऊन त्यास ठार मारण्यास तयार होईल, हें संभवत नाहीं. या अरिष्टांतून मुक्त होतांच खरें पाहिलें तर, पुन्हां असा पुंडावा करून माझ्या जिवावर संकट आणूं नकोस, अशी शहाजीनें शिवाजीस ताकीद द्यावी; पण तसें न करितां उलट तो कान्होजी नाईक* जेध्यापासून आणभाक घेतो कीं, " चिरंजीव राजश्री

* शहाजीस ( जेधे शकावली ) मुस्तफाखानानें बाजी घोरपड्यामार्फत चंदीजवळ पकडलें, ( शके १५७०, सर्वधारीनाम संवत्सर, श्रावण वद्य प्रतिपदा; इ० सन १६४८ ). त्या वेळीं त्याच्याबरोबर कान्होजी नाईक जेधे, दादाजी ऊर्फ दादो कृष्ण लोहोकरे व त्याचा मुलगा रत्नाजीपंत हे मावळ प्रांतातील वतनदार शहाजीबरोबर होते; त्यांनाही पकडून कनकगिरीच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवण्यांत आलें; त्या ठिकाणीं रत्नाजीपंत मृत्यु पावला; पुढें इ० सन १६४९मध्यें ( शके १५७१ विरोधी संवत्सर ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा ) शहाजी, कान्होजी जेधे, व दादोकृष्ण यांना कोंडाणा येथें आणून त्या ठिकाणीं त्यांची प्रतिबंधांतून मुक्तता केली; " शहाजी महाराजांची व त्यांची भेट झाली ते समयीं महाराज बोलिले कीं, " तुम्ही आम्हामुळें बंदीवासी, श्रमी जालेस; ( झालांत ) याउपरि आम्ही

ासिउबा खेडेबारी यांत व पुणां आहेत त्यांजवल तुम्ही जमावानसी राहावें तुमची जबरदस्ती त्यां प्रांतें आहे. अवघे मावळचे देशमूखदेखील त्यासी रुजू होऊन त्यांचे आर्शेत वर्तेत येसा विचार करून जबरदस्तीनें राहावें. येखादी मोंगलाईकडील फौज व ईदिलशाहीकडील फौज आली तरी आपण इमान राखावें. त्यांसी लढाई करावी, यैसी शपथ इमान पुरस्कर बेलरोटीवर हात ठेवून घेतली." ( भा. इ. सं. मंडळ चतुर्थ संमेलनवृत्त पृ. १७९-१८० ) शिवाजी आपल्या मनोदयाप्रमाणें वागत आहे, असें वाटत असल्याखेरीज शहाजींच्या हांतून असें वर्तन कसें घडेल ?"

" इ० सन १६४०पासून जिजाऊ व शिवाजी यांवर शहाजीची इतराजी होऊन त्यांचें तोंडसुद्धां पहावयाचें नाहीं, असा त्यानें खरोखरच निश्चय

---

पातशाहासी तह केला कीं बारा गांवांतून मुजरा करून हुकुमाप्रमाणें कर्नाटक प्रांतें मसलत करावी. त्यावरून बेंगरूळ प्रांत पांचालक्षा होनाचा जाहागीर दिल्हा आहे. याकरितां आपणांस कर्नाटकची मसलत करावी लागली. तुमचें वतन मावळांत आहे. चिरंजीव राजश्री सिउबा ( शिवाजी ) खेडे बारिया व पुणा आहेत. त्या जवळ तुम्हीं जमावानसी राहावे तुमची जबरदस्ती त्या प्रांतें आहे. अवघे मावळचे देशमूखदेखील त्यासी रुजू होऊन त्याचे आर्शेत वर्तेत येसा विचार करून जबरदस्तीनें रहावें. येखादी मोंगलांकडील फौज व यदलशाहीकडील फौज आली, तरी आपण इमान राखावा. त्यासी लढाई करावी." यैसी शपथ इमान पुरस्कर बेलरोटीवर हात ठेवून घेतली. तैसीच त्यांणींहि कान्होजी नाइकास शपथ दिल्ही, आणि कान्होजी नाईक यांस वस्त्रें देऊन बराबर हुजऱ्या व पत्रें देऊन राजश्री शिवाजीराजे यांजकडे पाठविलें."

कान्होजी जेधे व दादोकृष्ण या उभयतांनीं पुढील काळांत, अफझलखानाबरोबरील युद्धप्रसंगीं शिवाजीची मोठीच महत्वाची कामगिरी बजावली; कान्होजी नाईक जेध्याचे वंशज भोर संस्थानांत, रोहिड खोऱ्यांतील कारी या गांवीं असून त्यांना कारीकर इनामदार जेधे देशमूख म्हणतात; व दादोकृष्णाचे वंशज हल्लीं भोर येथें फडणिशी कामावर असतात.

केला होता असें जरी मानलें, तरी त्या दोघांवर संभाजीची नाराजी होण्यास कांहींच कारण नव्हतें. संभाजीचा व जिजाऊची विजापुरास शेवटची भेट झाली, त्यानंतर तो तेरा वर्षे जिवंत होता. त्या मुदतींत जिजाऊनें आपल्या थोरल्या मुलास भेटण्याकरितां एकदांसुद्धां कर्नाटककडे जाऊं नये, अगर आईला भेटण्याकरितां त्यानें एकदांसुद्धां पुण्यास येऊं नये, हें कसें घडलें? पुण्याच्या मंडळींनीं कर्नाटककडे बघूं नये आणि कर्नाटकच्यांनीं पुण्यास आपलीं कोणीं माणसें आहेत, हें मुळीं अजीबात विसरून जावें, हा सारा शहाजीनें कांहीं मतलबामुळें मुद्दाम घडवून आणिलेला प्रकार दिसतो. शिवाजी-कडून धुंडावा करावायचा, आणि आपण नामानिराळें रहायचें, याखेरीज यांत दुसरा मतलब दिसत नाहीं" सारांश शिवाजीनें स्वतंत्र राहून राज्यसंस्थापना केली, तरी शहाजीस ती पाहिजेच होती, व शहाजीचा स्वतः निदान मांडलिकी राज्य तरी स्थापन करण्याचा इरादा होता, असें, शहाजीच्या वर्तनावरून निदर्शनास येतें.

मुधोळकर बाजी घोरपडे यानें महंमद आदिलशहाच्या हुकुमानें शहाजीस पकडलें होतें; त्यामुळें संधी साधून शहाजी हा बाजी घोरपड्याचा सूड उग-वील अशी शहाची खात्री होती. त्यामुळें शहाजीच्या सूडापासून बाजी घोर-पड्याचें संरक्षण करण्याला तो अत्यंत दक्ष होता. म्हणून शहाजीस कर्ना-टकांत परत जाण्याची रजा देण्यापूर्वी त्यानें " मी बाजी घोरपड्यास अथवा त्याच्या जहागिरीस कधींही तिळमात्रसुद्धां उपद्रव देणार नाहीं;" अशी त्याच्याकडून शपथ घेवविली; आणि उभयतांमध्यें सख्य झालें हें दर्शविण्या-करितां उभयतांनीं आपापल्या इनाम जमिनींची अदलाबदल करावी, असें ठरवून त्याप्रमाणें व्यवस्था केली. शहाजीनें स्वतः या शपथेचें शब्दशः पालन केलें. त्यानें स्वतः बाजी घोरपड्यास अथवा त्याच्या जहागिरीस तिळमात्रही उपद्रव दिला नाहीं; पण त्याच्या विषयींचा शहाजीच्या मनांतील दंश लवमात्रही कमी झाला नाहीं. म्हणून कर्नाटकमध्यें येऊन पोहोंचतांच शहाजीनें शिवाजीस असें पत्र पाठविलें कीं, " तुम्ही जर माझे खरे पुत्र असाल तर, बाजी घोरपड्याचा सूड घेतल्याशिवाय तुम्हीं कधींही राहणार नाहीं." शहाजीनें असें पत्र मुद्दाम लिहून जरी शिवाजीस

बाजी घोरपडयाला शिक्षा करण्याविषयीं कळविलें नसतें, तरी शिवाजीनें त्याची उपेक्षा केली नसतीच. शहाजीचें पत्र आल्यानंतर बाजी घोरपडयास नामशेष करण्याची योग्य संधी शिवाजी सारखा पहात टपून बसलेला होता; ती संधी शिवाजीस पुढें नऊ वर्षांनीं प्राप्त झाली. इ०सन १६६१ मध्यें वाडीकर लखम सांवत, विजापूरकर सरदार खवासखान, व बहिलोलखान, व मुधोळकर बाजी घोरपडे हे एकत्र होऊन शिवाजीस नामशेष करण्याच्या विचारांत होते; इतक्यांत कर्नाटकमधून शहाजीचें शिवाजीस पत्र आलें, व त्यावरून बाजी घोरपडे हा भावी मोहिमेच्या तयारीसाठीं मुधोळ येथें गेला असल्याचें त्यास कळलें. या वेळीं शहाजीनें शिवाजीस जें पत्र पाठविलें, त्यांत त्यानें त्याला असें कळविलें कीं, " बाजी घोरपडे यानें स्वधर्म संरक्षण करण्याच्या कार्याला मदत तर केली नाहींच, पण उलट तो मुसलमान व तुर्क यांच्या दग्याच्या कारस्थानांत त्यांना सामील झाला; आणि निंद्य व कपटाचें आचरण करून तो आम्हांला विजापूर येथें घेऊन गेला. तेथें आम्हास नेल्यावर आमच्यावर कोणता दुर्धर प्रसंग ओढवला होता, याची तुम्हास जाणीव आहेच; मराठ्यांची सत्ता स्थापित करून, स्वधर्म संरक्षण करण्याची तुम्ही जी महत्वाकांक्षा धारण केली, ती यशस्वी होऊन, तुमचा मनोरथ सिद्धीस न्यावा, असाच त्या सर्वशक्तीमान परमेश्वराचा संकल्प आहे, असें आतां उघड उघड निदर्शनास येत आहे; आणि म्हणूनच आमच्या वरीलही तो दुर्धर प्रसंग टळला, हें उघड आहे. हल्लीं खवासखान हा तुमच्याविषयीं दुर्बुद्धि मनांत धरून तुमच्यावर स्वारी करून येत आहे, आणि मुधोळकर बाजी घोरपडे व सांवत वाडीकर लखम सांवत व खेम सांवत हे त्याला ह्या स्वारींत साह्यकारी झालेले आहेत. ह्या प्रसंगीं शिव आणि भवानी हीं तुम्हास यश देवोत. ह्या सर्वांचा पूर्णपणें सूड घ्यावा अशी आमची इच्छा आहे; आणि आपल्या पित्याची कोणतीही इच्छा पूर्ण करण्यास नेहमीं तत्पर असा तुमच्यासारखा आज्ञाधारक पुत्र सुदैवानें आम्हांस लाभला असल्यामुळें, तुम्हीं ही कामगिरी तडीस न्या, अशी आमची तुम्हास आज्ञा आहे. हल्लीं बाजी घोरपडे हा आपल्या लोकांसह मुधोळ येथें पुढें गेलेला आहे. " शिवाजीस शहाजीचें हें पत्र मिळाल्याबरोबर तो आपणाबरोबर तीन

हजार निवडक सैन्य घेऊन तावडतोब विशाळगड* येथून निघाला व मोठ्या झपाट्याचें कूच करीत मुधोळ+ येथें आला; आपल्या वडिलांना दग्यानें पकडणाऱ्या बाजी घोरपड्यास त्यानें मुधोळ येथें अचानक गांठलें. शहाजीच्या ह्या शत्रूचा पूर्णपणें सूड घेण्याची संधी शिवाजीस ह्या वेळीं मिळाली. त्यानें बाजी घोरपड्यावर त्याच्या मनींमानसीं नसतां, आणि म्हणूनच तो बेसावध असतां अचानक मोठ्या जोरानें छापा घातला; त्याच्यावर मोठ्या निकरानें तुटून पडला. या वेळीं बाजी घोरपडे बेसावध होता, तरी तो मोठा शूर व कर्तृत्ववान सरदार असल्यानें तो शिवाजीशीं मोठ्या शौर्यानें व हिंमतीनें लढत राहिला; आणि अखेरीस तो स्वतः, त्याचे मुलगे, इतर नातलग, व त्याचें सैन्य रणक्षेत्रांत ठार झालें. या वेळीं शिवाजीनें घोरपडे मंडळींना ठार मारिलें. बाजी घोरपड्यावर पूर्णपणें सूड उगवून घेतला; त्याच्या सर्व प्रदेशाची धूळधाण उडविली; त्याचा सर्व प्रदेश लुटून मुबलक संपत्ति मिळविली; मुधोळचा प्रांत आपल्या ताब्यांत घेतला; आणि शहाजीस ही सर्व हकीकत पत्रानें कळविली.× ती ऐकून शहाजीस अतीशय आनंद झाला; त्याला अतीशय धन्यता वाटली; आणि अशा रीतीनें वडीलांची इच्छा पूर्ण करून शिवाजी पितृऋणांतून मुक्त झाला.

---

* विशाळगड हे संस्थान कोल्हापूरकर छत्रपतींचे मांडलीक असून तेथील संस्थानिकास "पंत-प्रतिनिधी" असा किताब आहे. विशाळगड ही या राज्याची पूर्वीची राजधानी असून, मलकापूर ही हल्लींची राजधानी आहे. विशाळगड हें ठिकाण मलकापूरपासून अजमासें ३६ मैलांवर असून मलकापूर हें कोल्हापुरापासून पश्चिमेस २४ मैलांवर शाळी नदीच्या कांठीं आहे.

+ मुधोळ हें शहर दक्षिण महाराष्ट्रांत, विजापूर जिल्ह्यांतील बागलकोट या तालुक्याच्या ठिकाणापासून ३३ मैलांवर व सदर्नमराठा रेलवेच्या मिरजेपलीकडील कुडची स्टेशनपासून ३६ मैल जमखिंडी व तेथून पूढें सडकेनें दक्षिणेस बारा मैलांवर मलप्रभा नदीच्या कांठीं आहे.

× या मोहिमेच्या बाबतींत शहाजीच्या पत्राचें शिवाजीनें जें उत्तर पाठविलें, त्यांत बाजी घोरपड्याच्या बाबतींत त्यानें शहाजीस जो मजकूर

शहाजीनें अदिलशहास कबूल केल्याप्रमाणें कर्नाटकांत गेल्याबरोबर चित्रकलकर भरमा याच्यावर स्वारी केली; व आपल्या सैन्यसरंजामासह तो अचानक चित्रकल येथें येऊन धडकला; त्या वेळीं भरमा माशाची शिकार करीत होता. त्यास शहाजी आपणावर चाल करून आला असें कळतांच मोठ्या तांतडीनें तो घोडेस्वार झाला; आपल्या सैन्याची जमवाजमव केली; आणि शहाजीवर चाल करून गेला. उभयतांमध्यें मोठेंच जोराचें युद्ध झालें; व त्यांत भरमा शहाजीच्या हांतून ठार झाला; ( इ० सन १६४८ ). तेव्हां भरम्याची सर्व बिरुदें व बाडबिछायत शहाजीनें जप्त केलीं. तीं घेऊन तो अदिलशहाकडे विजापूर येथें आला, व भरम्याच्या त्रासांतून शहाजीनें आपणास मुक्त केलें याबद्दल शाहास समाधान वाटून त्यानें तीं शहाजीस परत बक्षीस दिलीं. तेव्हांपासून तंजावरकर भोंसल्यांचें राजघराणें हीं बिरुदें वापरूं लागले.

शहाजी विजापूर येथें आल्यावर अदिलशहानें त्यास मोठ्या इतमामानें आपणाजवळ अजमासें चार वर्षें ठेवून घेतलें; ( इ० सन १६४९ ते इ० १६५२ पर्यंत. ). शहाजीस आपणाजवळ ठेवून घेण्यांत आपण त्याचा मोठाच सन्मान करीत आहों, असें आदिलशाहानें वरकरणी दाखविलें. परंतु असें करण्यांत त्याचे बरेच अंतस्थ हेतू होते. शहाजी कर्नाटक मध्यें स्वतंत्र राज्यस्थापना करील, अशी त्यास भीती होती. शहाजीला आपण विजापूर येथें राहवून घेतल्यास त्याला आपण ओलीस ठेविलें, असें समजून शिवाजी

---

लिहून कळविला तो असाः—" आपलें पत्र मिळाल्यावर आम्ही आपल्या सैन्यासह मुधोळ येथें गेलों. त्या प्रदेशाची धूळधाण उडविली; व तिकडील ठाणीं हस्तगत करून घेतलीं. बाजी घोरपडे यांस ही हकीकत कळल्यावर त्यानें आमच्याबरोबर युद्ध केलें; परंतु त्यांत तो व त्याचे सरदार मारले गेले. मोठा घनघोर युद्धसंग्राम झाला. नंतर आम्ही मुधोळच्या सर्व प्रदेशभर स्वारी करून तो सर्व प्रदेश मनसोक्त लुटला. त्या वेळीं आम्हांस अतीशयच लूट मिळाली. नंतर आम्ही त्या प्रदेशांतील लोकांनीं शांत राहावें, असें जाहीर करून तो प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला."

आपणाविरुद्ध बंडाळी माजविणार नाहीं, अशी त्याची खात्री होती; व खुद्द विजापूर येथेंच शहाजीचें वास्तव्य राहिल्यानें शिवाजी व शहाजी यांच्यामध्यें पत्रव्यवहार घडत असल्यास तें सहज उमगून येणें सुलभ होईल, अशी त्यानें योग्य अटकळ बांधली होती, व म्हणूनच त्यानें वरपांगी शहाजीचा गौरव करीत राहून त्यांस आपणाजवळच विजापूर येथें ठेवून घेतलें होतें; आणि त्यामुळेंच, तात्पुरती का होईना, पण आदिलशाहाची धोक्याची राजकीय परिस्थिति थोडी फार सावरली गेली होती. शहाजीस जवळ ठेवून घेतल्यामुळें, तो कर्नाटकमध्यें स्वतंत्र राज्यस्थापना करील, ही शाहाची भीती नष्ट झाली. या चार वर्षांच्या अवधींत शिवाजीनें आदिलशाही प्रदेशास उपद्रव दिला नाहीं, त्यामुळें शहाची एक मोठीच काळजी नाहीशी झाली, आणि या चार वर्षांच्या अवधींत " शहाजी व शिवाजी यांचा पत्रोपत्रींहि तिळमात्रही संबंध नसून शिवाजी शहाजीच्या सल्ल्यानें बिलकुल वागत नाहीं " अशी शहाची पक्की खात्री होऊन शहाजीबद्दलचा त्याचा संशय दूर झाला. तथापि शहाजी पुष्कळ दिवस कर्नाटकच्या बाहेर राहिल्यामुळें तिकडील राजकीय वातावरणांत पुन्हां मोठ्या जोराची खळबळ सुरू झाली. शहाजीच्या लोखंडी हातांखाली दबून राहिलेल्या कर्नाटकमधील पाळेगारांनीं पुन्हां सारखी बंडाळी माजवून सर्व कर्नाटकभर धुमाकूळ उडवून दिला; बेदनूरकर शिवाप्पा नाईक, पेनगोंडेकर राजा रायल, अलमगडकर नायक वगैरे पाळेगार मंडळींनीं कर्नाटक मधील मिळेल तितका प्रदेश आंगाखालीं घालण्याचा उद्योग आरंभिला, आणि कुत्बशाहाचा प्रसिद्ध वजीर मीरजुम्ला यानें गंडी-कोटचा दुर्भेद्य किल्ला हस्तगत करून घेऊन अर्काट पर्यंत कुत्बशाही हद्द वाढविली. मीरजुम्ला हा मोठा शूर असून पांच हजार घोडेस्वार व वीस हजार पायदळ त्याच्या संग्रहीं होतें. तो अतीशय संपत्तिमान होता. आपल्या जोरदार सैन्याच्या साह्यानें तीनशें मैल लांब व पन्नास मैल रुंद इतका पूर्व कर्नाटकचा विस्तीर्ण प्रदेश हस्तगत करून घेऊन, कुत्बशहास धाब्यावर बसवून तो बहुतेक स्वतंत्र राज्यकर्ता बनला होता; व त्याच्या राज्याची हद्द शहाजीच्या ताब्यांतील बंगळूरच्या प्रदेशाला भिडून ती सरकत सरकत आदिलशाही प्रदेशांतही घुसली होती; आणि शहाजीच्या ताब्यांतील बंगळूर

प्रांताचा कांहीं भागही त्यानें बळकाविला होता. अर्थात या बलाढ्य शत्रूशीं झुंजण्यास तसाच बलिष्ट व खंदा वीर कर्नाटकप्रांतीं पाठविणें आदिलशहास भागच होतें; व तसा वीर पुरुष एकटा शहाजी हाच असल्यामुळें त्यासच तिकडे पाठविणें आवश्यक होतें. त्यामुळें त्यानें शहाजीस कर्नाटकप्रांतीं जाऊन मीरजुम्ला व इतर पाळेगार यांचा बंदोबस्त करण्याचा हुकुम दिला, व त्याप्रमाणें इ० सन १६५३ मध्यें शहाजी पुन्हां कर्नाटकमध्यें येऊन दाखल झाला.

या वेळीं आदिलशाहा व शजाजी या उभयतांच्या मनांत दोन निरनिराळे विशिष्ट उद्देश साधावयाचे होते; आणि म्हणूनच आदिलशाहानें शहाजीस कर्नाटकमध्यें परत पाठविलें होते, व शहाजीनेंही आदिलशहाचा हा हुकूम तात्काल मान्य करुन कर्नाटकप्रांतीं प्रयाण केलें होतें. मीरजुम्ला व शहाजी हे उभयतांही अत्यंत बलिष्ट होते; त्यामुळें ह्या उभयतां बलिष्ठांच्या चिकाटीच्या सामन्यांत मिरजुम्ला नामोहरम झाला, तर बाहेरचा एक प्रबळ शत्रू कमी झाला, आणि शाहाजी नामशेष झाला तर आपल्या अस्तनींतील निखारा कायमचा विझला, म्हणजे या दोन्हीं पैकीं कोणताही परिणाम घडून आला तरी आपला फायदाच होईल, ह्या विशिष्ट उद्देशानें शहाजीवर ही कामगिरी लादली; आणि आपली जहागीर सुरक्षित राहावी, व आपण कर्नाटक मध्यें पुन्हा परत जाऊन, आपली सत्ता पूर्वीप्रमाणें स्थिर करून व वाढवून जमल्यास आपण स्वतंत्र व्हावें, अशी शहाजीची उत्कट इच्छा असल्यामुळें शहानें त्यास कर्नाटकप्रांतीं परत जाण्याचा हुकूम दिल्याबरोबर त्यानें तिकडे प्रयाण केलें होतें; आणि सर्वांत प्रबळ जो मीरजुम्ला त्याचा समाचार शहाजीनें प्रथम घेतला. या बाबतींत जयराम कवी लिहितो कीं, ( रा. मा. वि. चंपू पहा; ) " शहाजीनें मीरजुम्ला याची इतकी दुर्दशा उडवून दिली कीं, थकून व रंजीस येऊन तो शहाजीशीं धड लढेहिना; धड आडकाठीहि करीना; किंवा धड खडा राहून भिडेहिना. एक पळण्याचा तेवढा धडा मीरजुम्ला जेरीस येऊन गिरवीत बसला. शेवटीं दे माय धरणी ठाय अशी त्याची स्थिती होऊन, तो शहाजीचे रट्टे खात खात गुत्तीच्या किल्लयांत शिरला; तेव्हां शहाजीनें वेढा देऊन चोहों-

बाजूंनीं रस्ता बंद केला. शेवटीं दातीं तृण धरून जुम्ला एकदाचा शाहाजी सांगेल तो तह मान्य करण्यास राजी झाला. ह्या युद्धांत हत्ती, घोडे, तोफा, वगैरे जुमल्याचा सर्व जंगी सरंजाम शाहाजीच्या हातीं लागून शिवाय जड-जवाहीर वगैरेंहि शहाजीस बरेंच मिळालें. जुम्ला शहाजीस पेषकस म्हणजे खंडणी व लढाईचा खर्च देण्यास राजी झाला. ह्या युद्धाचा असा परिणाम झाला कीं, कुत्बशाहा किंवा त्याचा कोणी सरदार यांनीं पुन्हां कर्नाटकांत पाऊल म्हणून घातलें नाहीं. पूर्व समुद्रापर्यंत सारें कर्नाटक शहाजीच्या चरणीं मिलिंदायमान झालें. मीरजुम्ला हा हिंदुस्थानांतील व हिंदुस्थानाबाहेरील सर्व मोठमोठ्या दरबारांत प्रसिद्ध असून त्याचा धुव्वा शहाजीनें उडविला ही बातमी जेव्हां शहरोंशहरीं व प्रांतोप्रांतीं पसरली तेव्हां शहाजीच्या सामर्थ्याची वडेजाव चोहोंकडे झाली. जयराम लिहितो, "ह्या पराक्रमानें शहाजीचें नांव सेतुबंध रामेश्वरापासून रूमशामपर्यंत ज्याच्या त्याच्या तोंडीं निघूं लागलें. मीर जुम्ला याच्या सारख्या तोलदार सरदाराची ही दुर्दशा उडालेली पाहून शहानशहा जो शहाजहान तोही दचकला. महंमद आदिलशाहा तर मनांतल्या मनांत खजील होऊन गेला. मीरजुमल्यावर जय मिळून आदिलशाहीचा दबदबा राहिला या विचारानें यद्यपि त्यास आनंद झाला, तत्रापि शहाजीचा बोलबाला अंदाजाबाहेर झालेला पाहून तो अतिशय विषण्ण होऊन गेला. शहाजीनें विजापूरचें नांव राखिलें, शहाजीच्या पराक्रमानें आदिलशाहीचें रक्षण झालें, वगैरे गौरवाची भाषा आदिलशाहा वापरी; परंतु त्या भाषेंत केवढें थोरलें तथ्य भरलें आहे, हें मनांत येऊन त्यास शहाजीचें भय वाटे." यावरून शहाजी राजे हे आदिलशाहींतील एक किती बडें प्रस्थ होतें, याची सहज कल्पना करता येतें.

अशा रीतीनें मीरजुम्ला याची वाताहत केल्यानंतर ( इ० सन १६५३) शहाजीनें विजयानगरकर रायलू याच्यावर स्वारी करून व त्याचा जंतकल येथें पराभव करून त्याचें बंड मोडून टाकिलें. पेनकोंडा, कर्नूल, वेल्लोर, कपली वगैरे पूर्वेकडील प्रांत काबीज केले; अल्लमगड हस्तगत करून पोर्तुगीजांच्या ताब्यांतील गोंवा प्रांतावर स्वारी केली, आणि तेल्लीचेरीपर्यंत आपली दौड करून बहुतेक सर्व कर्नाटक प्रांत त्यानें पुन्हां पूर्वीप्रमाणें आपल्या

ताब्यांत आणिलें. तथापि इतक्यांतच कनकागिरीकर सरदार अप्पाखान यानें बंड केलें; तेव्हां तें मोडून टाकून कनकागिरी हस्तगत करून घेण्याकरितां शहाजीनें आपला वडील मुलगा संभाजी यांस तिकडे पाठविलें. या वेळीं विजापूरचा प्रसिद्ध व शूर सरदार अफ्झलखान हा कर्नाटक प्रांतांमध्यें असून त्यानें तिकडे अनेक युद्धप्रसंग करून कीर्ती मिळविली होती. संभाजीनें कनकगिरी हस्तगत करून घेण्याकरितां त्या किल्ल्यावर हल्ला चढविला; त्या वेळीं अफ्झलखानानें दगा केल्यामुळें संभाजी मारला गेला! शहाजीस ही हकीकत कळल्यावर त्याच्या मनाला भयंकर धक्का बसला! पुत्रशोक झाला! आपल्या लाडक्या मुलाचें निधनवृत्त ऐकून त्याचें हृदय दुःखाग्नीनें होरपळून गेलें! तथापि त्यामुळें हताश होऊन रडत बसणारा तो अभिमानशून्य मनुष्य नव्हता; कच्चा दिलाचा नव्हता; फडफडत्या मनाचा नव्हता; इभ्रतीचा पुरुष होता. राष्ट्रजन्म देणाऱ्या विभूतीला जन्म देणारा तो नरशार्दूल होता; पुत्रशोकाचें दुःख गिळून जाऊन त्यानें लागलीच धडाक्यानें कनकागिरीवर हल्ला केला; आपल्या दुष्मनाला नेस्तनाबूद केलें; कनकागिरी हस्तगत करून घेतली, आणि संभाजीच्या मृत्यूचा सूड उगवून तो तंजावर येथें परत आला.

संभाजी हा शहाजीचा अतीशय लाडका मुलगा होता. लहानपणापासून आपल्या वडिलासन्निध राहून क्षात्रधर्माचे धडे घेत घेत तो पटाईत सेनानायक झालेला होता, व लहानपणांपासूनच त्याची कर्तबगारी दिसून आली होती. अशा हा कर्ता मुलगा नाहींसा झाला, या बद्दल शहाजीस तर अतीशय दुःख झालेंच असेल; पण माता जिजाबाई हिच्या मनाची, ही दुःखद वार्ता ऐकून काय स्थिती झाली असेल! बाळपणीं लग्न होईपर्यंत तिला काय थोडें फार सौख्य लाभलें असेल तेवढेंच! पण त्या नंतर या माऊलीचा सर्व जन्म दुःखांत, कष्टांत व मानसिक विवंचनेंत पार झाला! स्त्रियांचें नातें स्थित्यंतरापासून निरनिराळें बनत जातें; व मुलगी, बायको, व आई ही त्यांचीं तीन स्थित्यंतरें होतात. जिजाबाई गृहिणीपदाला प्राप्त झाल्यापासूनच बाप आणि नवरा यांच्यामधील चुरशीच्या कलहाला प्रारंभ झाला व ती मातृपदाला पोहोंचल्यानंतरही हा कलह जाधवरावाच्या मृत्यूपर्यंत—जाधवरावास मूर्तुजा निजामशहा विश्वासघातानें ठार मारीपर्यंत—सुरूच होता. त्या-

नंतर शहाजीची कैद, व संभाजीचा मृत्यु, हे प्रसंग तिनें पाहिले; पुढें शहाजीचा मृत्यु होऊन वैधव्याचा खडतर प्रसंग तिच्या नशीबीं आला! शिवाजीच्या केविलवाण्या दुःखी मुद्रेकडे पाहून सहगमनाचा विचार रहित करून ती आयुष्याचे दिवस कंठूं लागली, तोंच तिची सुशील व सुस्वभावी स्नुषा, शिवाजीचें वडील कुटुंब, दुर्दैवी छत्रपति संभाजी महाराजांची माता सईबाई ती दोन वर्षांचा असतां, मृत्यु पावली, हें दुःख तिनें पाहिलें! संभाजीचा पितृद्रोह तिनें पाहिला; युवराज संभाजी छत्रपति शिवाजीचा शत्रू झाला, मोंगलांस फितूर झाला, दुर्वृत्त झाला, समर्थ रामदासस्वामीच्या सन्निध ठेवूनही त्याचा कांहींही उपयोग न होतां तो विषयी व व्यसनी निघाला, हा नशिबाचा योगायोग तिनें पाहिला! महाराष्ट्र धर्म वाढविणारा, गोब्राह्मण प्रतिपालक शिवाजीमहाराज, याचाच प्रत्यक्ष मुलगा, संभाजी, मोंगल सरदार दिलीरखानास मिळून भूपाळगडावर चाल करून आला. पिता शिवाजी मराठाशाहीची प्राणप्रतिष्ठा करीत असतांनाच पुत्र संभाजी, त्याच मराठाशाहीच्या नरडीस नख देण्याचा उद्योग करूं लागला, हें दुःख तिनें अनुभविलें; गोब्राह्मण प्रतिपालन हें ज्यांचें ब्रीद त्या शिवरायाचा मुलगा संभाजी यानें एका ब्राह्मणाच्या स्त्रीशीं दुर्वृत्त करण्याचा प्रयत्न केला, तिजवर बलात्कार केला, यामुळें त्या थोर विभूतीस झालेलें दुःख तिला पाहावें लागलें; आणि आपला दुसरा प्राण असलेल्या शिवबाचा राज्याभिषेक पाहून अजमासें पंधरा दिवसांनीं या अलौकिक स्त्रीच्या इहलोकीच्या जीवनयात्रेचा शेवट झाला.

संभाजीचा मृत्यू झाला, त्याच वर्षी शहाजीचा प्रामाणिक, स्वामिनिष्ठ, व मुत्सद्दी कारभारी नारो त्रिमल हणमंते हा मंगळूर येथें मृत्यू पावला; इ० सन १६३८ पासून इ० सन १६५३ पर्यंत नारोपंत हा शहाजीच्या कर्नाटक मधील जहागिरीचा कारभारी होता; व त्यानें त्या जहागिरीची उत्तम व्यवस्था ठेविली होती, त्याच्या मृत्यूमुळें शहाजीस दुःख झालें; त्यास रघुनाथ व जनार्दन असे दोन मुलगे होते; × त्यापैकीं रघुनाथपंत हा आपल्या

× नारोपंत हणमंते, हा दादोजी कोंडदेवाप्रमाणेंच, मलिकंबरच्या हाताखालीं राज्यव्यवस्थेच्या बाबतींत शिक्षण घेतलेल्या ब्राम्हण मुत्सद्यांपैकीं

वडिलाप्रमाणेंच कर्तृत्ववान् असून त्यानेंही तंजावरच्या राज्याची उत्तम व्यवस्था ठेविली होती. या रघुनाथपंताची हकीकत पुढें शिवाजीच्या चरित्रांत येणार असल्यानें त्यासंबंधीं या ठिकाणीं अधीक उल्लेख केला नाहीं,

---

एक असून त्याच्यावर शहाजीचा अतीशय विश्वास व लोभ होता; व शहाजीनें त्यास आपल्या पुण्याच्या जहागिरींतील बाणेरें हा गांव वंशपरंपरें इनाम करून दिला होता. त्या संबधीचें शहाजीचें पत्र उपलब्ध आहे; (इतिहास संग्रह ) त्यांत असा मजकूर आहे कीं, " अजरखतखानें महाराज राजश्री शहाजी राजे दाइमदौलत हूं बजानेब हूं कारकुनानी हाल, व इस्तकबल, व देशमुखांनीं प्रांत पुणें बिदानद सु॥खम सैन अलफ. दरवजे बाबत इनाम रा. नारायण ( नारो ) त्रिमल दिक्षित यांस इनाम मौजे बाणेरें, ता. हवेली, प्रांत पुणें, देहे एक देखोल नख्तयाती व महसूल व बाजे उजबती देखील तालुका ठाणें, व तालुका देहाय, व ठाणे बाब, व सैल बैल, व मोईन व सादीलवार, व खर्चपट्टी व पायपोसी व दसरापट्टी, व ठाणें भेट, व हुजूर भेट, व मोहीमपट्टी, व हेलकटी, व तमाखू, व बागाईत व अहीस्थान व विराहीस्थान व मोहतर्फा व थळजकाती, निकाळू व पैसाळू व अश्वजकाती व ठाणबंदी, व गाडा व घोडा व बंदा व बरदा व मेढीस्थळ व वेसीपेढी व पालभारा व बेगारी व राबता व आडपाली व कानू व गैरकानू व कमाविस हाल व पेस्तर, वेठे बेगार, फरमासी व सरद रसत व बार नगजग, अंबराई कुलबाब कुलकानू बाब महसुलेखी मौजे मजकूर देह १ एक अजरामऱ्हामत करून इनाम दिधला असे. दुमाले करणें. अवलाद अफलाद चालविणें. यास मुसलमान होऊन जो कोणी इस्कील करील, त्यास मकेमध्यें सूर मारल्याची सोगंध असे. व हिंदु होऊच जो कोणी इस्कील करील त्यास कासीमध्यें गाय मारल्याचें पाप असे. हर दरसाल ताजे खुर्द खताचा उजूर न करणें. तालीक लिहोन घेऊन अस्सल दिक्षित मजकुरापासीं परतोन देणें. छ १० जिल्हेज. " पुढील काळांत, ( छत्रपति शाहूच्या कारकीर्दीत ) त्रिमल रघुनाथाचे चिरंजीव गंगाधर त्रिमल व रघुनाथ त्रिमल यांनीं सातारा मुक्कामीं येऊन, राजशक ६२ म्हणजे इ० सन

इ० सन १६५३ पासून ह्मणजे शहाजी हा विजापूर येथून कर्नाटक प्रांतांत परत गेला त्यावेळेपासून, इ० सन १६६२ पर्यंत अजमासें दहा वर्षें तो आपला धाकटा मुलगा व्यंकोजी, व कुटुंबांतील इतर मंडळीसह आलटून पालटून तंजावर व बंगळूर येथें रहात असे; मध्यंतरीं इ० सन १६५६ मध्यें ( ता० ४ नोव्हेंबर ) महंमद आदिलशाह हा दुखण्यानें व काळजीनें खंगून मृत्यू पावला, व त्याचा अठरा वर्षांचा मुलगा अली हा गादीवर आला. " त्याला खाऊन टाकण्याला चार नक्र टपून बसले होते. पहिला नक्र शिवाजी, दुसरा नक्र शहाजी, तिसरा नक्र औरंगझेब, व चौथा नक्र अमीर उमराव. ह्या चार नक्रांतून पहिली कुरापत औरंगझेबानें काढली. " ही औलाद महंमद-शहाची नव्हे" असा आरोप बिचाऱ्या अलीवर अवरंगझेबानें आणिला. अलीशाहा औलाद असो, अफलाद असो, कीं नक्कल असो त्याच्यामुळें अवरंग-झेबाचें कोणतें गोत्र बिघडत होतें तें देव जाणे! हा आरोप अलीच्या कारभा-ऱ्यांनीं साहजीकच नाकबूल केला एवढें कारण लढाई पुकारण्याला औरंगझेबा-सारख्या बीलझिबलला बस झालें. दुसरें सैतान शिवाजी. त्या कज्जेदलालाला हें भांडण निघालेलें पाहून केवळ हर्षवायू झाला. नवरा मरो, नवरी चुलींत जावो, दोहीं कडून अवदान मारण्यास सवकलेल्या ह्या बुभुक्षितानें दोन्हीं कडून आपला डाव साधण्याचा बेत केला. अलीशहालाही मदत करण्याचें

---

१७३५ मध्यें ( ता० २९ आक्टोबर ) श्रीमंत छत्रपति शाहू महाराजा-कडून बाणेरें गांवाबद्दल नवीन सनद करून घेतली.

नारो त्रिमल यांस एकंदर किती मुलगे होते, तें नक्की समजत नाहीं. तथापि इ० सन १६६२ मध्यें, शहाजी हा शिवाजीच्या भेटीस दक्षिणेंत आला, त्यावेळीं त्रिंबक नारायण हणमंते हा त्याचा या स्वारींतील कारभारी होता; त्यावरून रघुनाथपंत व जनार्दनपंत, हे दोन मुलगे तर होतेच पण तिसराही एक मुलगा असावा असें दिसतें. या हणमंते घराण्यापैकीं बाळकृष्ण-पंत हणमंते यांस शिवाजीनें पुढें फडणिशी कामावर नेमिलें होतें; या घरा-ण्याची हकीकत पुढें प्रसंगानुसार दिलेली असल्यामुळें, त्या बाबतींत या ठिकाणीं अधीक खुलासा केला नाहीं.

अभिवचन दिलें, व औरंगझेबाचाही पक्ष उचलला. खबरदारी मात्र अशी ठेविली कीं, एकाची बातमी दुसऱ्यास न मिळे. तिसरे बुड्ढेमिया शहाजी. ह्या वृद्ध कपींनी आपण कशांतच नाहीं, ह्मणून कानावर हात ठेविले. आपलें बेंगलूर बरें कीं आपण बरें. शहाजी ह्मणजे आज साठ सत्तर हजार प्याद्यांचा व घोड्यांचा मालक. तो जर अलीशहास मिळता तर औरंगजेबासारख्या टारग्याची बिचाऱ्या अलीशहाला बुडविण्याची काय माय व्याली होती ? पण ह्या वेळीं कर्नाटक सुरक्षित ठेविलें पाहिजे, व तेथून आपणांला हलतां येत नाहीं, असा बहाणा ह्या म्हाताऱ्यानें केला. आणि तेंही खरेंच. औरंगजेबानें कर्नाटकांतील संस्थानिकांना चिथवून त्यांच्याकडून बंडाळी खरीच माजविली होती. चौथी भुतें अलीशहाचे अमीर उमराव. ह्यांची तर सर्वांवर कडी. खाल्ल्या घरचे वांसे जाळणारे हे शहाणे आपल्या धन्याशीं हरामपणा करून बाहेरच्या चोराला जाऊन मिळाले. अशी सारी वेताळसभा भावड्या अलीशहाच्या भोंवतीं कोलितें घेऊन नाचूं लागलीं असतां औरंगजेबानें बेदर शक १५७९च्या आषाढ शुद्ध तृतीयेस एका खटक्यासरसें हांटलें. नंतर कल्याणीही झपाटली. औरंगजेबानें ही बडी शिकार मारली, तर शिवाजीनें त्याच्याही वर ताण केली. औरंगजेबाला दिलेल्या वचनाला जागून, औरंगजेबानें बेदर घेण्याच्या अगोदर एक महिना, म्हणजे १५७९च्या वैशाखांत अदिलशहाचें जुन्नर लुटून शिवाजी पहिला पंत झाला; आणि एवढ्यानें औरंगजेब कदाचित् खूष होणार नाहीं म्हणून त्याच वर्षाच्या अश्विन वद्य द्वादशीस कल्याण भिवंडी हबकून अदिलशहाचा कोंकणांतील राज्यभार त्यानें हलका केला. औरंगजेबाला दिलेलें अभिवचन अक्षरशः पाळीत असतां अलीशहाशीं केलेला करार शिवाजी विसरला नाहीं. अली अदिलशहाच्या मर्जीखातर शिवाजीनें औरंगजेबाच्या अहमदनगर प्रांतांतील गांवें व खेडीं लुटून खुद्द अहंमदनगरास नसीरीखानाशीं दोन हात करून तें शहर लुटलें. येणेंप्रमाणें दोन्ही पक्षांना रिझविण्याच्या कामगिरींत शिवाजी गुंतला असतांना शहाजीनें ह्या नाटकाला रंग आणिला. जदुनाथ सरकारदेखील म्हणतात, Shahaji Bhonsla disobeyed his new master and set up for himself. अली अदिलशहा औरंगजेबानें व शिवाजीनें असा नागवि-

लेला पाहून शहाजीनेंही त्याच्या नाकाडावर ठोसा चढवून दिला, आणि कर्नाटकांतील त्याच्या इष्टेटीचा ताबा घेतला. नाटक असेंच कांहीं वर्षे रंगत रहावें व त्यांत आपल्याला मनाजोगतीं सोंगें घेतां यावीं, अशी शहाजी व शिवाजी यांची इच्छा होती. परंतु दाराशुकोहची माशी शिंकून लढाई एकदम बंद झाली, व तह झाला. त्यामुळें शहाजी व शिवाजी यांना आपल्या बेतांना निराळें स्वरूप द्यावें लागलें. तहानें बेदर, कल्याणी, परांडा, निजामशाही कोंकण व वांगीमहाल इतक्या प्रांताला अदिलशाही मुकली. पैकीं निजामशाही कोंकण शिवाजी दाबून बसलाच होता; आणि विजापूर प्रांतापासून म्हैसूरच्या उत्तरेकडील तुंगभद्रेपर्यंतचा प्रांत तेवढा अदिलशहाच्या ताब्यांत मोंगलांचा मांडलीक म्हणून राहिला; व तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील प्रांत शहाजीनें कायमचा बळकाविला होताच. महम्मदशहा मेल्यानंतर फक्त एका वर्षांत त्याच्या दिखाऊ ऐश्वर्याचें भांडवल फुटून, अदिलशाही दौर्बल्य अगदीं उघडकीस आलें." ( राजवाडे ). शहाजी विजापूर दरबारचे हुकूम न मानतां स्वतंत्रपणें कर्नाटकमधील कारभार करूं लागला; " महाराज शहाजीराजे " या मायन्यानें, " अमूक जहागीर ताबडतोब द्यावी; नाहींतर आपण पादशाही खिदमत सोडून देऊं " अशी धमकी दिली. अशी धमकी देतांना, " दोनचार पातशाहींत आपण नोकरी केली, पण कोठेंही आपली इज्जत कमी करून घेतली नाहीं; " असें त्याला स्पष्ट लिहिलें; आणि या " इज्जतीच्या " शद्बाला दुजोरा ह्मणून " आपण रजपूत लोक " आहो, हें उच्चवंशदर्शक वाक्य शहाजीनें अली आदिलशहाच्या नजरेस आणिलें; आणि आपल्या अंगीकृत कार्यांत खंड न पडूं देतां, आपल्या वर्चस्ववृद्धीचें कार्य सारखें चालूं ठेविलें.*

---

*शके १५७८ मध्यें महंमद आदिलशाह मृत्यू पावल्यावर शहाजीनें त्याचा मुलगा अली आदिलशाहा यांस खालील ( इतिहासमंजरी पहा. ) धमकीचें पत्र पाठविलें तें

खान अलीशान फैरोजी निशान

अजम अकरम ममलकत मदार दवामयक बाहलु व इजललाहु ।। ऽ ।। अमारत व अलायत पुन्हान शुजा अत व शमामत दस्तगाह अजमत व

याच महत्वाच्या काळांत इकडे शिवाजीनें चंद्रराव मोरे व अफझलखान या उभयतांचा नाश करून व शिद्दीजोहार, वाडीकर सावंत व बाजी घोरपडे वगैरे सरदारांशीं दोन हात करून, आदिलशाही राज्यावर पाहिजे तसा हात मारण्याचा सपाटा चालविला होता. त्यामुळें अली आदिलशाह अतीशय भिऊन

---

शौकत इतिहाद एकबाल व इजलाल हमराह अलिशान रफी अलकदर खुलदमकान उमदेह वजरायेजमा कूद व उमराय नसरत निशान

अर्जी बदिल माहिद माहाराज शाहाजी राजे सलाम बाजद सलाम महबत आंजम महवत मुराय आंकी; प॥ कनकगीर पेशअर्जी दरगाह ( बादशाही सेवेस. )

बंदगीस पेश ( अर्पण केला ) केली त्याचा मुबादला आपल्यास मन्हमत जाला. यावरी प॥ अनागोंदीहि पेश केली ( पाचा ) महिना जाला. हनोज ( तथापि ) मुबादलियाचा सरंजाम जाला नाहीं. जमेयतीचाही दिलासा जाला पाहिजे. कुंदगोलकार मनेवारे ( बंडखोर ) आपले जागी व तामगौड तर्फेस तसवीस देउनु ( देऊन ) फिसाद केली आहे. त्यास गोशमाल (शिक्षा) द्यावयाबद्दल -हजरत जान्हपन्हा साहेबी आपल्यास रजा ( आज्ञा ) दिल्ही. ते तर्फेस मैसूरकराचीही सरहद्द नजदीक आहे. वगैरे संगीनत मुराई दफे होऊनु ( बंडखोरांचा हकालपट्टा होऊन ) पातशाही नामोश ( किर्ती ) राहत नाहीं. आजी वास्ते हजार दीड हजार जाज ती कामाचे लोक ठेविले आहेती. वगैरे जागीर लोकांची समजावीस होत नाहीं. तरी दर बंदगीस अर्ज करुनु अने गोंदीच्या मुबादलियाचा सरंजाम केला पाहिजे. यास ऐवज ए तर्फेस कर्यात अकोलोज व तपे टेंभुरणी व भतग्राम अगर पेडर्णे हे कदीम मुलकांत देणें. सदरहु देणें नसेल तरी व मामले बादशाहबा देखाले जागा नसेल तरी प॥ वडेरु या मामले मजकुराखाले चंजाऊरकरास दिधले आहे ते तन्ही मुबादलियास दिधले पाहिजे. आपण हरामखोर मनेवार चंजाऊरकरास गोशमाल देउनु सोडउनु घेऊनु. ( आपण चंदावरकरास शिक्षा देऊन सोडवून घेऊं ) हरामखोर मनेवरास दिधल्यांत काय फायदा ! कुल मनेवाराचे

गेला. शिवाजी आटपत नाहीं, असें पाहून त्याच्याशीं सामोपचारानें सख्य करावें असा त्यानें विचार केला; व शिवाजी वळला तर शहाजीमार्फतच वळेल असें जाणून अदिलशहानें शहाजीस विजापूर येथें बोलावून घेऊन त्यास शिवाजीची समजूत घालण्याची कामगिरी सोंपविली. इ० सन १६३७

---




हेजीब मीरजुमला बराबरी गेले आहे तीं. व पा। मुसलकल आपली जागीर पेशजी भिस्त रोजी रुस्तुमजमा बराबरी माहो-लीहून हुजूर आलों ते वख्तीं चौलाखाची जागीर दिधली. त्या मध्यें मुसलकलचा फर्मान आपलें नांवें दिधला. यावरी दुसरे वख्ती मरहुमी खाने अजम असदखानाचे गुजारतीनें लक्ष्मेश्वराचे वख्ती मोकरर आली तेही वख्तीं, व तिसरियानेंही मरहुमी खा। अहमदखान याचे वख्ती मोकरर फर्मान दिधले तेही वख्ती मुसलक-लचा फर्मान आपलेच नांवें आहे. ऐसे तीन वख्त आपले नांवें फर्मान पा। मा। चे आपलें नांवें आहेती. या फर्मानाच्या नकला पातशाही दफतरीं असतील त्या काहाडून पाहिल्या पाहिजेत. आपले भाई व फर्जंद यांचे दिलासिया बा। क ++++ विले व फर्मान त्याचे नांवें करुनु दिधले. तरी ते काय ससमुबाली इरकसीने गलथ. हुजूर मा ++ करणारी करुनु मुसलकलचा मुबादला पंधरा खेडीं कर्याती कारवे आपली जागीर त्रिंबकजीस द्यावया काय निसबत धरिते. हजरत साहेबाचा तरी कौल करारदाद आपल्यास आहे कीं तुमचे जागीरपैकीं एक चावर कसीदगी करणे नाहीं. जरूर एक वख्त पातशाही कामा बा। कांहीं कसीदगी केले तरी अवल सवाईन मुबादला देउनु बाजद कासीद करावे. आमा ( परंतु ) अकार्तुकाचे बोले करनु आपले जागिरींत नाहक गैर हिसाबी पादशहा खलेल करवितातीं. तरी आपण रजपूत लोक अजीतलग पेशजीही दोघा चौपादशाहींत खिदमत केली. आमा ( परंतु ) गैरहिसाबी जाजती सोसुनु कम इजतीन व गैर मेहेरबानीन पेशजीही खिदमत

त पुणें प्रांताला रामराम ठोकून कर्नाटकांत आल्याला शहाजीला ह्या वेळीं, ( इ० सन १६६१मध्यें ) चोवीस वर्षें होऊन गेलीं होतीं. त्यामुळें आपण दक्षिणेंत जावें, असा त्याचा फार दिवसापासून हेतू होता. शिवाजीनें ह्या वेळेपर्यंत अनेक पराक्रम गाजविले असल्यामुळें शहाजीस अतीशय आनंद

---

केला नाहीं व पुढेंही न करू. उमेदीनें आपण आजी दीड वर्ष जाजती सोसिली ते याच दमा ( वर ) कीं थोरले हजरतसाहेबाचे नवाजीस ( मेहेर-बानीतले)व हजरत साहेबीही जहांबक्षी केली आहे व वख्तही एक जवाचा समजोनु आपण सबूरी करुनु तहमुल ( सहन ) करावयास तकसीर ( कमी ) केलें नाहीं. पेस्तर हजरत साहेबास आपली दरकार असेल तरी हिसाबी आपला सरंजाम सदरहू केला पाहिजे. आणि दरकार नसेल तरी खुसनुदीन ( संतोषानें ) रजा दिधली पाहिजे. आपल्यास असलाद पुन्याई मामल्याचीही हवस ( हौस ) कांहीं राहिली नाहीं. एखादे आपले हिंदुचे तीर्थी बसोन हकतालाची बंदगी करुनु ( परमेश्वराची सेवा करून ) हजरत साहेबास द्वा ( दुवा ) देउनु फर्जंद भाई आहेती यांपासुनु खिदमत घेतली पाहिजे. अगर त्याहीपासुनु खिदमत घेणें नसेल तरी त्यासही रजा द्यावी. बाजे भाईबंद जेथें आपलीं पोटें भरिताती तेथें हेही भरितील. असा नाहक आपल्यास बदनाम केलें न पाहिजे. दरी बाब हजरत बंदगीस हाली अर्जदास्त पाठविली आहे. तरी बडेभाईनें हि हजरत बंदगीस अर्ज करुनु सदरहुप्रमाणें अनागोंदीच्या सुबादलियाचा सरंजाम व पंधरा खेडियाचा फर्मान आपल्याच नांवें देविला पाहिजे अगर आपल्यास खुषनुदीन रजा दिधली पाहिजे. व पा। कनकगीर अनागोंदीही दरगाह बंदगीस पेश केली. एक कपली खेडे दिढादो हजाराचे आपण तेथें राहिलों होतों. तेव्हडे आपल्यास असो दिधले पाहिजे. तेथे बाग आपण केले. हवासीर जागा आहे. तरी दरगाह बंदगीस अर्ज करुनु मोकरर कर नु देणे म्हणौनु मसुरल दौलत सांवतराऊ यांस लिहिले होते. सांवतराउ मा। इलेने अर्ज केला. असा हजरत साहेबी हुकूम फर्माविला कीं अनेगोंदीच्या मेहतानास कपली पाहिजे. सोडून देणें. म्हणौनु राऊ मा। इलेने लिहिले. यावरी आपल्यास राहावयास जागाहि नव्हती. व

झाला होता. शिवाजीनें बाजी घोरपड्याचा निकाल उडविल्यामुळें त्या आनंदांत भर पडून त्याला शिवाजीबद्दल मोठी धन्यता वाटूं लागली होती; आणि आपल्या ह्या स्वराज्यसंस्थापक, वैभवशाली, पराक्रमी, व सद्गुणसंपन्न पुत्राची भेट घ्यावी, आपली पुणें प्रांतांतील जहागीर, जिजाबाई, युवराज बाल संभाजी, व इष्टमित्र वगैरेंना स्वनेत्रांनीं पहावें, कुलस्वामी जो शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव त्याचें व कुलस्वामिणी जी तुळजापूरची श्रीभवानी तिचें दर्शन घ्यावें, अशी त्याला सारखी उत्कंठा लागली होती. इतक्यांत

---

तमगौड तर्फेहूनहि ताजा खबर आली कीं कुंदगोलकरास आपले लोकांनीं शिकस्त दिधली होती. असा तो मागती सवारीनु कोटास एउनु दिलगोव्याची फिकीर करितो. मदत नव्हता जागा राहणार नाहीं. अजी वास्ता हजरत साहेबहि पेशजीच रजा दिधली होती. म्हणौनु छ ४ माहे सैवाली कपली साहेबाचे लोकाचे व कनकवेलीकराचे लोकाचे हवाले करुनु आपण स्वार जालों. एक मजली आलियावरी आनेगोंदीकार व हलालखोर हे दूर गलथ मालूम करणाराचे बले करुनु आले आहेती. तेहि पादशाही लोकावरी हिस्सा करुनु कपली त्याजपासुनु घेतली हे खबर आपण कपलीस आलियावरी पाहरा रात्री आपल्यास आली होती. ते पेशजीच लिहिली आहे. पेशजी सिदी अजब सिदी संबूल आलियावरी आना गोंदीस व कपलीस व वाजे विलायतीस दखल होऊं देतील की ने देतील हे दि पेस्तर रोशन होईल. सैंभरा वर्षांचे मुठमर्द त्यास गोशमाल देउनु मुठमर्द हरामखोरास जेही देविले असतील त्यास याचा जबाब पुसिला पाहिजे. साहेब अजी सबा जमजम स्वार होउनु येतील म्हणौनु सबूरी करुनु दीड महिना राह साहेबाचे यावयाची पाहिलों. आमासाहेबाचे यावयास मातल जाले. मग आपण पादशहाचे रजेवरुनु स्वार होऊनु बलदारी नजदीक आलों. पुढेंही दरभजलां तामगौड तर्फेस जात आहों ”

या पत्रावरून शहाजीच्या मनोवृत्तीची व तत्कालीन राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन आपलें महत्व प्रस्थापित करण्याच्या प्रवृत्तीची योग्य कल्पना करितां येते.

अदिलशहानें त्यास आपण होऊन शिवाजीची समजूत घालण्याची कामगिरी सोंपविली. तेव्हां " माझा पुत्र ( शिवाजी ) माझ्या स्वाधीन नाहीं, हें सरकारास विदित आहेच; तथापि होईल तितका यत्न करून पाहतों " असें अदिलशहास कळवून शहाजी कर्नाटक प्रांतीं परत गेला. महाराष्ट्रांत येण्याची तयारी केली व शिवाजीस ही हकीकत कळविण्यांत आली. ती ऐकून जिजाबाई व शिवाजी या उभयतांना अत्यानंद झाला. शिवाजीनें शहाजीस तसें कळविलें, व वडिलांच्या स्वागताची तयारी करण्यास त्यानें मोठ्या उत्साहानें व जारीनें सुरवात केली.

शहाजीनें कर्नाटक मधून निघण्यापूर्वी ज्योतिषी बोलावून " या वेळीं आपले ग्रह कसे आहेत, " या बद्दल विचारपूस केली; व ज्योतिषांनीं ते उच्चीचे व फायदेशीर आहेत, असें सांगितल्यावर चांगला दिवस पाहून, आपलें दुसरें कुटुंब तुकाबाई, आणि कनिष्ठ पुत्र व्यंकोजी व कारभारी त्रिंबक नारायण हणमंते यांना बरोबर घेऊन, मोठ्या वैभवानें, पुष्कळ परिवार व लवाजमा यांसह तो दक्षिण प्रांतीं येण्यास निघाला. कूच दरकूच करीत प्रथम तुळजापूर* येथें येऊन तेथील कुलदेवता श्रीभवानी हिचें दर्शन घेतलें. शिवाजीनें स्वराज्य संस्थापनेचा उद्योग सुरू केल्यानंतर, त्याच्या स्वराज्य संस्थापनेस यश आल्यास " आपण एक लक्ष रुपयाचें सोनें घेऊन, त्याच्या मूर्ती घडवून त्या श्रीस अर्पण करूं " असा शहाजीनें तुळजापूर येथील श्रीभवानी देवीस नवस केला होता; त्याप्रमाणें त्यानें एक लक्ष रुपयांचें सोनें खरेदी करून व उत्तम कारागिरांकडून त्याच्या मूर्ती घडवून, त्या त्यानें कर्नाटकमधून आपल्या बरोबर आणल्या होत्या. त्या त्यानें ह्या प्रसंगीं श्रीदेवीस अर्पण केल्या. नंतर

---

* तुळजापूर हें ठिकाण निजामच्या राज्यांतील नळदुर्ग जिल्ह्यांत एक तहशिलीचें गांव असून तें जी. आय. पी. रेलवेच्या पुणें–रायचूर मार्गावरील माढा ( सोलापूर जिल्ह्यांतील एक तालुक्याचें ठिकाण ) रेल्वे स्टेशन पासून अजमासें तीस मैलांवर आहे. येथील देवीस श्रीभवानी ऊर्फ तुकाई देवी असें ह्मणतात; व दरवर्षी आश्विन महिन्यांत ( आक्टोबर ) येथें फार मोठी यात्रा भरत असते.

तेथून पंढरपूर येथें येऊन तेथील श्रीविठोबाचें दर्शन घेतलें. नंतर शिखर शिंगणापूर येथें येऊन श्रीशंभू महादेवाचें, व आपले वडील मालोजी राजे यांच्या छत्रीचें दर्शन घेतलें व शिखर उतरून आपले संबंधी जे फलटणचे निंबाळकर त्यांची भेट घेऊन, शिवाजीची भेट घेण्यासाठीं तो पुणे प्रांतीं येण्यास निघाला. शहाजीनें आपल्या ह्या एकंदर प्रवासांत प्रत्येक देवस्थानीं पुष्कळ दानधर्म केला, ब्राह्मणभोजनें घातलीं व गोरगरिबांस पुष्कळ खैरात वाटली. शिवाजीनें ब्राह्मणांच्या विचारानें आपल्या वडीलांची भेट जेजुरी येथें घेण्याचें ठरवून त्यांच्या स्वागताची उत्कृष्ट तयारी केली. शिवाजीस घटकोघटकीं शहाजीच्या आगमनाची बातमी होतीच; त्यामुळें शहाजी राजे जवळ आले असें ऐकून शिवाजीनें आपली फौज, हत्ती, घोडेस्वार, मुत्सद्दी व कारकून मंडळी वगैरे बरोबर देऊन सरनोबत यांस, त्यांस घेण्याकरितां सामोरें पाठविलें. पेशवे, मोरोपंत पिंगळे यांस पुढें पाठवून मुहूर्त ठरवून जेजूरी येथें श्रीखंडोबाच्या देवालयांत भेटीची योजना निश्चित करण्यांत आली; व शहाजीस मोठ्या समारंभानें वाजतगाजत श्रीच्या देवालयांत आणून उतरविण्यांत आलें. शिवाजीराजे सौभाग्यादि संपन्न वज्रचुडेमंडित जिजाई आऊसाहेब, पुतळाबाई* आदिकरून खाशीमंडळी बालयुवराज संभाजी

---

* या वेळीं ( इ० सन १६६२ ) बाल युवराज संभाजीराजे याची माता, व शिवाजीमहाराजाची वडील पत्नी सईबाई ही जिवंत असून, ती जेजूरी येथें ह्या भेटीच्या वेळीं हजर होती, असा बऱ्याच ठिकाणीं उल्लेख आढळतो; पण तो बरोबर नाहीं. संभाजीचा जन्म इ० सन १६५७च्या जून महिन्यांत ( ज्येष्ठ शुद्ध द्वादशी, शके १५७९ ) झाला; व अफझलखानाबरोबरील युद्धप्रसंगाच्या काळांतच, शिवाजीचा मुक्काम प्रतापगडाखालीं असतां, इ० सन १६५९च्या सप्तेंबर महिन्यांत ( भाद्रपद वद्य चतुर्थी, शके १५८१; सर्वपितरी अमावास्येच्या आदले दिवशीं ) मृत्यू पावली; अर्थात् ह्या भेटीच्या प्रसंगीं सईबाई जिवंत होती, हें म्हणणें चुकीचें आहे. सईबाई मृत्यू पावली, त्या वेळीं युवराज संभाजी दोन वर्षांचा असून ह्या वेळीं तो सहा वर्षांचा होता;व जिजाऊ आऊसाहेबही त्याचा प्रतिपाल करीत होती.

राजे याच्यासह आधींच देवालयांत जाऊन शहाजीमहाराजांची मार्गप्रतीक्षा करीत बसली होती. भेटीस चोवीस+ वर्षें होऊन गेलेलीं, सबब शास्त्रविधीनें भेट घेणें प्राप्त झालें. शहाजीराजे देवालयांत येतांच राजोपाध्ये यांणीं श्रीची यथासांग पूजा करवून सघृत अशा काशाच्या ताटांत, स्त्री, पुत्र, स्नुषा व पौत्र यांचीं मुखें शहाजीमहाराजाकरवीं एकसमयावच्छेदेंकरून अवलोकन करविलीं; व नंतर परस्पर भेटी झाल्या. शिवाजीनें शहाजीराजांच्या चरणीं मस्तक ठेविलें; राजांनीं त्यास हातांनीं उचलून आलिंगन दिलें; उभयतांच्याही नेत्रांत प्रेमाश्रू निघाले; नंतर शहाजी राजास पालखींत बसवून, पालखीची तबकडी धरून मोठ्या मर्यादेनें अनवाणी चालून, शिवाजीनें राजास त्यांच्या डेऱ्यांत पोहोंचविलें; नंतर राजे बिछायतीवर बसल्यावर शिवाजीनें त्यास नम्रपणानें अशी विनंती केली कीं, " मी विजापूरकराशीं वैर केल्यामुळेंच आपणांवर प्राणसंकट ओढवलें; हा मजकडून मोठाच अपराध घडला; त्याबद्दल मला वडिलांनीं योग्य वाटेल ती शिक्षा करावी; " शिवाजीचें हें भाषण ऐकून शहाजीराजे सद्गदित झाले. त्यांनीं मोठ्या प्रेमानें व आग्रहानें शिवाजीस आपणाजवळून बसवून घेऊन त्यास ते म्हणाले, " तुम्ही शिसोदे क्षत्रीय कुलांत निर्माण होऊन त्या कुलास अनुरूप असा अलौकिक पराक्रम केला, व हिंदु प्रजेस यवनांच्या क्लेशप्रद सत्तेतून स्वराज्य स्थापन व स्वराज्य रक्षण करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करून त्यांत यशस्वी झाला, हें पाहून मला पराकाष्ठेचें समाधान व धन्यता वाटत आहे. आमच्या वडिलांस ( मालोजी राजे

---

+माता, पिता, पती, पत्नी, भगिनी, बंधू, पुत्र, कन्या, स्नुषा व पौत्र, ह्यापैकीं कोणाच्याही भेटीस पूर्ण बारा वर्षें, व त्याहून अधिक काळ लोटला असल्यास पुढें केव्हांही त्यांची भेट व्हावयाची असल्यास ती देवालयांतच उपाध्याकडून श्रीची पूजा यथासांग करवून पहिल्यानें व्हावी, व ज्याची भेट व्हावयाची, त्याचें भेट घेणारानें प्रत्यक्ष मुखावलोकन न करतां त्याचें मुख पहिल्यानें पाण्यानें, तेलानें किंवा तुपानें भरलेल्या काशपात्रांत प्रतिबिंबरूपानें पाहावें, व तसें पाहिल्यानंतरच प्रत्यक्ष भेट व्हावी, असा शास्त्रविधी आहे; त्यास अनुसरून ही अशी विधिपूर्वक भेट घेण्यांत आली होती.

यांस ) असा दृष्टांत झाला होता कीं, तुमच्या कुलांत चक्रकर्ता निर्माण होऊन तो हिंदु प्रजेचें व हिंदुधर्माचें यवनापासून रक्षण करील. हा दृष्टांत खरा होता, हें तुम्ही आपल्या अलौकिक कर्तृत्वानें ( आमच्या ) प्रत्ययास आणून दिलें. तुमच्या ठायींच्या शौर्यवीर्यादि अनुपम गुणांच्या योगानें आमच्या कुलाचा पुनरपि भाग्योदय झाला आहे. असा प्रतापशाली पुत्र आमच्या उदरीं निर्माण झाला, म्हणून आम्ही त्रैलोक्यांत धन्य झालों आहों.'' शहाजीच्या ह्या अत्यंत प्रेमाच्या व हृदयस्पर्शी भाषणानें शिवाजी सद्गदित झाला; त्यानें पुन्हां वडिलांच्या चरणीं मस्तक ठेविलें; आणि मोठ्या नम्रपणानें म्हटलें कीं, "मजकडून जें कांहीं यत्किंचित् झालें आहे, तें सर्व आपल्याच पुण्याईनें घडून आलें; आणि मला आपला आशीर्वाद होता, म्हणूनच मी माझ्या अंगीकृत कार्यांत अल्प प्रमाणांत यशस्वी झालों आहे.'' अशारीतीनें पितापुत्राच्या भेटीचा समारंभ झाल्यानंतर, शिवाजीनें आपल्या सर्व सरदार व कारभारी मंडळींच्या शहाजीशीं भेटी करविल्या. शिवाजीनें आपली सापत्न माता तुकाबाई हिलाही जिजाबाईप्रमाणेंच योग्य सन्मान दिला; योग्य आदर दाखवून दर्शन घेतलें; सापत्न बंधू व्यंकोजी यांसही, मनांत कोणताही दुजा भाव न ठेवतां, प्रेमानें आलिंगन दिलें. नंतर शहाजी राजाबरोबरील सरदार कारभाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांचीही मोठ्या प्रेमानें विचारपूस केली. शिवाजीनें ह्या प्रसंगीं मोठा आनंदोत्सव केला; पुष्कळ दानधर्म केला. ब्राह्मणभोजनें घातलीं; गोरगरिबांस पुष्कळ खैरात वाटली; व नंतर ह्या सर्व मंडळीसह शिवाजी पुणें येथें येऊन मुक्कामास राहिला.

त्यानंतर शिवाजी आणि विजापूरकर यांच्यामध्यें शहाजीमार्फत एक तह झाला.× ( इ० सन १६६२ ) त्यांत खालील कलमें ठरलीं तीं:— ( १ ) विजापूर दरबारनें शिवाजीच्या सर्व मागण्या कबूल कराव्या. ( २ )

---

× हा तह शहाजी कर्नाटक प्रांतीं असतां त्याच्यामार्फत, अल्ली अदिलशहा यानें आपला वजीर अब्दुल महंमद याच्या सल्ल्यानें गुप्तपणें केला, व नंतर अदिलशहाची परवानगी घेऊन शहाजी दक्षिण प्रांतीं आला, असाही कांहीं ठिकाणीं उल्लेख आढळतो.

उत्तरेस कल्याणपासून दक्षिणेस फोंड्यापर्यंत आणि पश्चिमेस दाभोळपासून पूर्वेस इंदापूरपर्यंतचा सर्व प्रदेश शिवाजीच्या ताब्यांत राहावा. ( ३ )शिवाजी हा आपला मांडलीक आहे, असें विजापूर दरबारनें या पुढें न म्हणतां, " शिवाजी हा स्वतंत्र राज्यकर्ता आहे " असें मान्य करावें; त्या नात्यानें त्याच्याशीं यापुढें व्यवहार ठेवावा; व दरसाल सात लक्ष होन रोकड पेषकष ( खंडणी ) अदिलशहानें शिवाजीस द्यावी. ( ४ ) परस्परांनीं एक-मेकांना प्रसंग पडेल त्या त्या वेळीं मदत करावी. ( ५ ) विजापूरचा वकील शिवाजीच्या दरबारीं नसावा. ( ६ ) शिवाजीतर्फे अदिलशाही दरबारांत एक वकील राहावा. ( ७ ) शामजी नाईक पुंडे याची, वकील म्हणून त्या दर-बारीं नेमणूक करण्यांत आली आहे; त्याप्रमाणें विजापूर येथें दरबारांत राहून, त्या दरबारच्या व शिवाजीच्या म्हणजे दोघांकडीलही कामाची त्यानें विल्हे-वाट करीत जावी. हा तह, शहाजीमार्फत झाला म्हणूनच विजापूर दर-बारास तो बराच फायदेशीर असा झाला; व तो त्या दरबारानें लागलाच मान्य केला. याच वेळीं, "आम्ही जिवंत आहों तोंपर्यंत तुम्ही इतःपर विजापूरकरांशीं झगडूं नये, अशी शहाजीनें शिवाजीला शपथ घातली; व ती मान्य करून त्याप्रमाणें वागण्याचें शिवाजीनें मान्य केलें. ही हकीकतही शहाजीनें अदिलशहास कळवून, व पुढें शाहाची भेट झाल्यावर, त्यास समक्ष सांगून, त्याबद्दल त्याची खातरजमा केली. शिवाजीचाही या तहानें, त्याचें स्वातंत्र्य जाहीर होऊन, पुष्कळच फायदा, व त्याचें सर्व श्रेय आपल्या वडिलानांच आहे, हें जाणून शिवाजीस शहाजीराजाबद्दल अतीशयच धन्यता वाटली.

शहाजीनें आपणाबरोबरील सर्व मंडळीसह पुणें येथें पावसाळाभर मुक्काम केला; या अवधींत शिवाजीनें शहाजीची उत्कृष्ट प्रकारें बरदास्त ठेविली; आपली सावत्र आई तुकाबाई हिला अतीशय आदरानें व सन्मानानें वाग-विलें; सावत्र बंधू व्यंकोजी यांसही अतीशय प्रेमानें वागवून शहाजीबरो-बरील सर्व मंडळींचा उत्तम परामर्ष घेतला; शहाजीस आपली सर्व संपत्ति दाखविली; शहाजी तेथें होता तोंपर्यंत त्याच्या विचारानें व नांवानें राज्य-कारभार चालविला; पावसाळा संपल्यानंतर शिवाजीनें शहाजीस आपणाबरो-

बर घेऊन, त्यास, आपल्या नूतन संपादित राज्यांतील राजगड, तोरणा, सिंहगड, पुरंदर, लोहगड, प्रतापगड, व रायरी ( रायगड ) वगैरे आपल्या ताब्यांतील किल्ले व तेथील व्यवस्था दाखविली; व त्या वेळेपर्यंत केलेल्या अनेक राजकारणांची सर्व हकीकत त्यास निवेदन केली. शहाजी हा मोठा अनुभवी, पटाईत सेनानी, व युद्धशास्त्रविशारद असल्यानें, त्यानें हे सर्व किल्ले पाहिल्यावर, रायरी हाच किल्ला सर्वांत बळकट, कुबल कठीण, संरक्षणास व आश्रयास उत्तम, व राजधानीस योग्य, अशी त्याची खात्री झाली; तेव्हां त्यानें "तुम्ही राजगड येथील आपली राजधानी बदलून रायरी हें राजधानीचें ठिकाण करावें;" अशी त्यानें शिवाजीस आज्ञा केली; आणि शिवाजीची तशीच खात्री होऊन त्यानें ती गोष्ट मान्य केली. त्या किल्ल्याचें रायरी हें नांव बदलून "रायगड" हें नांव ठेविलें, व ह्या वर्षापासूनच (इ० सन १६६२ ) रायगड ही शिवाजीची राजधानी झाली.

नंतर ही सर्व मंडळी रामदासस्वामींचें दर्शन घेऊन पन्हाळगडावर आली. शिवाजीचे किल्ले, कोट, ठाणीं, जागा, राजधानी, अठरा कारखाने, शिबंदी, फौज, हत्ती, घोडे, तोफा, वगैरे जंगी सरंजाम पाहून शहाजीराजे परम संतुष्ट झाले;शहाजीस अत्यंत आनंद झाला;आणि "तुझ्या अलौकिक पराक्रमानें व कर्तृत्वानें मी संतुष्ट झालों;" असें म्हणून शहाजीनें आपली "तुळजा" नांवाची प्रासादिक तरवार शिवाजीस बहाल केली; व वडिलांची देणगी म्हणून मोठ्या पूज्यबुद्धीनें शिवाजीनें ती भवानी तरवारीजवळ नित्य पूजेस ठेविली. पन्हाळगडीं आल्यावर, शहाजीनें कर्नाटकप्रांतीं परत जाण्याचा आपला मानस शिवाजीस कळविला; तेव्हां शिवाजीस अतीशय वाईट वाटलें. आपल्या वडिलांनीं सन्निध राहून राज्याचा कारभार पाहावा अशी शिवाजीची इच्छा होती; आग्रह होता; परंतु "मी इकडे राहिल्यास अत्यंत कष्टानें कर्नाटकांत संपादन केलेली दौलत नाहींशी होईल, आणि मी कर्नाटक प्रांतीं राहिलों तरच मला तुमच्या अंगिकृत कार्यास अनेक प्रकारें पुष्कळच साह्य करतां येईल" असें शहाजीनें शिवाजीस सांगितलें. तेव्हां आपला आग्रह सोडून शिवाजी शहाजीची रवानगी करण्याच्या तयारीस लागला. त्यावेळीं शहाजीच्या सन्मानार्थ शिवाजीनें पुन्हां एक मोठा समारंभ केला. शहाजी, तुकाबाई व

व्यंकोजी यांना नाना प्रकारच्या मौल्यवान वस्तु अर्पण केल्या; शहाजीचा कारभारी त्रिंबक नारायण हणमंते यास उंची पोषाख व जवाहीर देऊन ढाल तरवार बक्षीस दिली; राजाच्या परिवारांतील इतर सर्व मंडळींना ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें, जवाहीर, पोषाख, व वस्त्रें वगैरे दिलीं. आणि शहाजीबरोबर जवाहीर, हत्ती, घोडे, वाटखर्चास भरपूर खजीना व सरंजाम देऊन त्याची कर्नाटक प्रांतीं रवानगी करून दिली. यावेळीं शहाजीचें वय ६८ वर्षांचें होतें; म्हणून शिवाजीनें त्याच्याबरोबरील मंडळीस पुन्हां पुन्हां "थोरले महाराज वयोवृद्ध झाले आहेत; त्यांची अतीशय काळजी घ्या;त्यांच्या जिवास अतीशय जपा;" असें आग्रहानें बजाविलें. हा वियोगाचा प्रसंग मोठाच दुःखदायक होता. शहाजी वयोवृद्ध असल्यामुळें तर तो परमावधीचाच दुःखदायक होता; आणि आतां पुन्हां आपली सर्वांची भेट होते कीं नाहीं, अशी शंका येऊन, शहाजी, जिजाबाई व शिवाजी यांना वियोगजन्य दुःखाचा उमाळा येणें स्वाभाविक होतें. त्यामुळें सर्वांनाच परमावधीचें दुःख झालें; सर्वांनीं अश्रुपूर्णनेत्रांनीं एकमेकांचे निरोप घेतले, आणि हाच वियोग पुढें लवकरच ( इ० सन १६६४मध्यें ) कायमचा होऊन मातुश्री जिजाबाईस—फक्त शिवाजीच्या आग्रहाच्या पायधरणीमुळेंच अग्निप्रवेश करण्याचा बेत तहकूब करून—वैधव्याचें खडतर दुःख भोगीत आयुष्य कंठण्याचा, आणि शिवाजीस पितृहीन होण्याचा दुःखद प्रसंग ओढवला.

शहाजी सहा महिने दक्षिण प्रांतीं राहून कर्नाटक प्रांतांत जाण्यास निघाल्यानंतर, पहिल्यानें विजापूर येथें जाऊन अली अदिलशहास भेटला; व इतःपर शिवाजीकडून विजापूरच्या प्रदेशास कोणत्याही प्रकारें उपद्रव होणार नाहीं अशी त्याची पुन्हां खातरजमा केली. उलटपक्षीं शहाजीनें मध्यस्थी करून शिवाजीशीं तह घडवून आणल्याबद्दल शाहानेंही त्याचा योग्य प्रकारें गौरव केला. नंतर शाहाचा व सर्व दरबारी मंडळींचा निरोप घेऊन शहाजी कर्नाटक प्रांतीं परत गेला; व तिकडील प्रांताचा बंदोबस्त करण्याच्या उद्योगास त्यानें पुन्हां लागलीच सुरवात केली.

शिवाजी व शहाजी या उभयतांची भेट झाली, त्या वेळीं शहाजीनें शिवाजीस, " आपल्या पश्चात् तुम्ही व्यंकोजीचें योग्यप्रकारें पालन करावें;"

अशी आज्ञा केली होती, असें दिसतें. कारण, शिवादिग्विजयांत लिहिल्याप्रमाणें, शहाजी तंजावर येथें "परत गेल्यावर व्यंकोजीस बोलावून त्यानें आज्ञा केली कीं, "शिवाजीनें जवांमर्दीनें नवें राज्य मेळविलें आहे. तुम्हीं आमची दौलत संपादिली आहे; यांत विठोजीराजे आमचे काका, यांचें कुटुंबाचें, व शरीफजी राजे आमचे भाऊ, यांचे वंशाचें वंशाचें तुम्हीं वडीलपणें चालवावें, आणि प्रजापालन करून राज्य करावें. वडील शिवाजीराजे यांनीं सर्वांचें संगोपन करून चालवावें, तरी त्यांनीं पृथ्वी आक्रमण करण्याचा इरादा धरिला. तेव्हां ईश्वरकृपें करून त्यांचे मनोरथ पूर्ण झाले असतां, सर्वांचें संगोपन करावयास अधिकारीच आहेत; करतील. कदाचित् त्यांजवरी समय गुदरला तरी आम्हीं पादशहापासून इतका तोडून दौलतीचा बचाव करून घेतला आहे. ही दौलत तुम्हां उभयतांची. परंतु दौलत रक्षावयाकरितां तुम्हीं वडीलपणें सांभाळ करावा. मुख्यार्थ आमचे कुळीं आम्हीं, आमचे कुटुंबांत शिवाजीराजे जेष्ठ; त्यांचें ठायीं तुम्हीं; त्यास राजधर्म प्रवाहें तुम्हीं वडीलपणें कुटुंबी यांचा सांभाळ करणें; पराक्रमी शिवाजीराजांचे तुम्हीं भाऊ; आमचे चिरंजीव; त्यांहून आवडते विशेष आहां; तरी सर्वांपासून चांगलें म्हणून घ्याल, पदरीं वडिलोपार्जित दोनचार माणसें आहेत, त्यांचें विचारें तुम्हीं चालल्यास तुमचें कल्याण आहे." असा शहाजीनें व्यंकोजीस उपदेश केला. हा उपदेश अत्यंत महत्वाचा व मौल्यवान आहे; आपणांस वैभव प्राप्त झालें असतां,—अनुकूल स्थितींत—आप्त स्वकीय व सहवासांतील इतर मंडळी यांचा कसा प्रतिपाळ करावा, हें या उपदेशांत दिग्दर्शित केलें आहे; आणि प्रत्येक कर्त्या संसारी मनुष्यानेंही तो ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे.

शिवाजीची व नंतर आदिलशाहाची भेट घेऊन इ. सन १६६२मध्यें शहाजी कर्नाटक प्रांतीं परत जातो न जातो तोंच बेदनूरकर भद्रापा नाईक यानें तिकडे मोठाच पुंडावा आरंभिल्याची बातमी त्यास समजली. या भद्राप्पा नाइकाचें मूळ नांव शिवाप्पा नाईक हें असून, त्याच्या घराण्याचा संस्थापक भद्राय्या ऊर्फ भद्राप्पा नाईक याच्या नांवावरून फारशी तवारिखांत, त्याचा उल्लेख भद्राप्पा नाईक या नांवानें केलेला आहे. त्याला

"मालनदचा राजा" ( मालनद हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ "डोंगराळ प्रदेश" असा आहे. ) असेंही म्हणत असत; सतत पंचेचाळीस वर्षें ( इ० सन १६१८ ते इ० सन १६६३ )बेदनूरचा प्रदेश त्याच्या ताब्यांत होता. तो मोठा संपत्तिमान असून या वेळीं ( इ० सन १६६२ ) तर तो विशेषच प्रबळ झालेला होता. सर्व दक्षिण कानडा, म्हैसूरचा वायव्येकडील प्रदेश, व गंगावती नदीपर्यंतचा उत्तर कानडा, एवढा व्यापक प्रदेश त्याच्या ताब्यांत होता, आणि विजापूरकरांच्या ताब्यांतील शक्य तेवढा प्रदेश बळकविण्याच्या उद्योगास तो लागला होता. त्यामुळें अशा ह्या प्रबळ शत्रूचा पहिल्यानें बंदोबस्त करणें शहाजीस आवश्यक होतें. म्हणून त्यानें कर्नाटक प्रांतीं आल्याबरोबर भद्राप्पा नाईकावर स्वारी करण्याची सिद्धता केली. अदिलशाहानें त्याच्या मदतीस पाठविलेला सरदार सर्जेखान यांस बरोबर घेऊन तो बेदनूरकरावर चाल करून गेला. तेव्हां तिकडून भद्राप्पा नाईकही आपल्या कसलेल्या सैन्यासह शहाजीशीं युद्ध करण्याकरितां पुढें सरसावला; व उभयतांमध्यें मोठ्या चिकाटीचे अनेक युद्धसंग्राम झाले. इतक्यांतच मध्यंतरीं इ० सन १६६३मध्यें, ( ता० ९ मार्च ) अदिलशाहा दुसरा हा स्वतः कर्नाटकच्या मोहिमेवर जाण्याकरितां आपल्या सर्व दरबारी मंडळीसह विजापूर येथून–धारवाडपासून अजमासें शेहेचाळीस मैलांवर असलेल्या–बंकापूर या ठाण्याकडे गेला. हें ठिकाण त्या वेळीं अब्दुर्रहीम बहलोलखान या नांवाच्या सरदाराच्या जहागिरींत असून तो सरदार त्या वेळीं कर्नाटकमधील नाईक पाळेगार लोकांवरील युद्धांत गुंतलेला होता. त्याची आई त्या वेळीं बंकापूर येथें ठाण्यांतच होती. तिनें अदिलशहास पहिल्यानें ठाण्यांत येण्यास मनाई केली; परंतु मागाहून त्यास ठाण्यांत येऊं देण्याकरितां वेशीचे दरवाजे उघडले. त्यामुळें शहानें रागावून बहलोलखान, शहाजी, व इतर सरदार मंडळींना कर्नाटकमध्यें पत्रें पाठवून " आपणास ताबडतोब येऊन भेटा " असा हुकूम फर्माविला; त्याप्रमाणें ती सर्व सरदार मंडळी सारखा जलदीनें प्रवास करीत–तुंगभद्रा नदीस मिळणाऱ्या–वर्धानदीच्या कांठीं अदिलशहाची छावणी असतांना त्यास येऊन भेटली. त्या वेळीं शहा अतीशय रागांत असल्यानें त्यानें बहलोल व शहाजी या उभयतांनांही ताबडतोब पकडून त्यांना जेव्हा

घालून प्रतिबंधांत ठेविलें; (इ. सन १६६३. जून महिन्याच्या अखेरीस). परंतु दोनच दिवसांनीं त्यानें शहाजीची प्रतिबंधांतून मुक्तता केली; तथापि कित्येक दिवसपर्यंत त्याचा सर्व अधिकार काढून घेतला, व नंतर त्यानें त्यास पुन्हां पूर्वीप्रमाणें अधिकारापन्न केलें;‡ म्हणजे शहाजीची कोणत्याही प्रकारें तिळमात्रही चूक नसतांनासुद्धां निव्वळ अदिलशहाच्या लहरीमुळेंच त्यास दोन दिवस कारागृहवास भोगावा लागला, व अधिकारभ्रष्टही व्हावें लागलें. तथापि त्यानंतर लवकरच, अदिलशहाची शहाजीवर पुन्हां पूर्ण मेहेरनजर झाली. शहाजीनें आपल्या पराक्रमानें व कर्तृत्वानें अदिलशहास पूर्णपणें संतुष्ट केलें. नंतर शहानेंही त्याबद्दल त्याचा जाहीररीत्या योग्यप्रकारें गौरव केला, व त्याची पुन्हां कर्नाटक प्रांतीं आपल्या जहागिरीवर परत रवानगी करून दिली.

शहाजी हा, असो आदिलशहानें तांतडीनें बोलाविल्यावरून भद्राप्पा नाईक बेदनूरकर याच्या बरोबरील युद्ध तात्पुरतें बंद ठेवून, बंकापूर येथें

---

‡ "On 1st March 1663, Ali Adilshah II, with all his court, left his capita lfor Bankapur. There they were at first denied entrance by the mother of Abdur Rahim Bahlol Khan, in whose fief it lay. But the gates were soon opened to the king. Adil Shah summoned Bahlol Khan, Shahji and other officers from the Karnatak, who come by forced marches and waied on the king on the bank of the Wardha, (on affluent of the Tungabhadra). Bahlol and Shahji were at once arrested and placed in chains (end of June, 1663); but Shahji was released in two days, though he continued to be deprived of his command for some time."

Sarkar's Shivaji and His Times; Page 300.

त्यास भेटण्यास गेला होता. त्यामुळें बंगळूर येथें आल्याबरोबर त्यानें पुन्हां युद्धाची तयारी केली; व सर्जेखानासह तो बेदनूरकरावर चाल करून गेला; व पुन्हां उभयतांमध्यें अनेक युद्ध प्रसंग झाले. तथापि अखेरीस शहाजीनें त्याचा पूर्ण पराभव करून त्यास अगदीं जेरीस आणिलें; तो दीन झाला; शहाजीस शरण आला; त्यानें विजापूरकरांचा बळकाविलेला सर्व प्रदेश सोडून दिला; व त्या नंतर त्यास एक लहानशी जहागीर बहाल करून आदिलशाहाचा अंकित करून ठेवण्यांत आलें. " हें वृत्त विजापुरीं कळल्यावर आदिलशहा बहुत संतोषी होऊन मोठे मरातबांनीं पत्र, वस्त्रें, भूषणें अलंकार, हत्ती, घोडें सुद्धां पाठवून, सर्व अमीर उमराव यांनीं तारीफ करून आपापली हकीगत स्नेह वादाची लिहून, गौरव केला. फत्ते झाल्यासुळें येथून कूच करून दुसरी ठाणीं बखेडेदार होतीं, त्यांचा बंदोबस्त करावा म्हणून तुंगभद्रातीरीं बेदिकेरें ऊर्फ बसवपट्टण + येथें आले. तेथें अनेक श्वापदें उत्पन्न झालीं; राजांस शिकार करावयाची इच्छा होऊन, घोड्यावर स्वार होऊन हरणाचे पाठीस लागले. ईश्वरेच्छा, त्या योगें घोड्याचा पाय भंडोळींत अडकून, घोडा व राजे एकावच्छेदें, पडले; " त्यांत डोक्याच्या कवटीस जखम होऊन ते गतःप्राण झाले. ( शके १५८५ माघ शुद्ध षष्ठी, शनीवार रोजीं; इ० सन १६६४ ज्यानेवारी ). मागाहून लोक माणसें आलीं; व्यंकोजी जवळ नव्हता, सबब भडाग्नि दिला. व्यंकोजी राजास डाकेने तेथें आणविलें; त्यांनीं उत्तरक्रिया सांग केली. आदिलशाहाकडून दुखवटा येऊन मनसबदारीचीं वस्त्रें व्यंकोजीच्या नांवें झालीं. मृत्यूसमयीं शहाजींचें वश ७० वर्षांचें होतें; व शिवाजीनें सुरत हें शहर लुटल्याची बातमी त्यास नुकतीच मिळालेली होती. कर्तव्य करीत असतां, मृत्यू येणें ही खरोखर मोठीच ईश्वरी कृपा होय. अर्थात् दुखण्याबाहण्यानें व हालयातनेनें खितपत न पडतां वीर पुरुषाला

---

+ हें ठिकाण म्हैसूरच्या राज्यांत, शिमोगा जिल्ह्यांत, हरीहरच्या दक्षिणेस अजमासें चाळीस मैलावर आहे. सोळाव्या शतकांत पाळेगारांमधील तारिकेरे या नांवाचें घराणें या ठिकाणीं अंमल चालवीत होते. येथें त्या काळचा एक किल्ला असून तो हल्लीं मोडकळीस आलेला आहे.

उचित असाच मृत्यू ह्या पुण्यश्लोक नरशार्दूल शहाजी राजास आला हेंही खरोखर त्याच्या पुण्याईचें, मालोजी राजे यांच्या परोपकारी बुद्धीचें, व ईश्वरी श्रद्धेचें आणि परमेश्वराच्या पूर्ण कृपेचें फल होय. शहाजी राजाच्या मृत्यूस परंपरेनें कारणीभूत झालेल्या ह्या बेदनूरकरांचा शिवाजीनें पुढें चांगलाच बंदोबस्त केला; व पुढील काळांत त्या भागांत त्यानें जलमार्गानें सफर केली, त्यावेळीं बेदनूरकरांना शरण येणें भाग पाडिलें; आणि "आम्हीं दरसाल आपणांस तीन लक्ष होन खंडणी देत जाऊं" असें त्यांनीं कबूल केल्यानंतरच त्यांची शिवाजीच्या तडाक्यांतून मुक्तता झाली.

शहाजीच्या अकस्मात् मृत्यूची दुःखद वार्ता ऐकून "शिवाजी राजे यांनीं बहुत शोक केला; सर्वही विधान करून दानधर्म अपार केले; आणि बोलले कीं, 'मजसारख्या पुत्राचा पराक्रम ( शहाजी ) महाराज पाहते तरी उत्तम होते. आपण आपला पुरुषार्थ (आतां) कोणास दाखवावा ? मागें अफझलखान मारिला, व शास्तेखानास शास्ती ( शिक्षा ) केली; पराभवातें पावविला; तें पराक्रमाचें वृत्त ऐकून महाराज (शहाजी राजे) संतुष्ट झाले;+ समाधानपत्रें आपणांस वरचेवर येत होतीं; तैशींच अलंकार वस्त्रें पाठवीत होते; या उपरी त्या मागें आपणांस कोणी आतां वडील नाहीं,' म्हणून बहुत खेद केला." मातोश्री जिजाऊ आईसाहेब हिच्यावर तर शहाजीच्या निधनानें आकाशच कोसळलें! तिचा शोक अनावर झाला! ती सती जाण्यास सिद्ध झाली; तिनें अग्निप्रवेश करण्याचा निश्चय केला. तेव्हां तर शिवाजीच्या हृदयानें ठाव सोडला! "वडील गेले, मातुःश्रीही जाणार," ह्या विचारानें शिवाजीस अत्यंत दुःख झालें; त्याच्या मनाची कालवाकालव झाली! युद्धक्षेत्रांत चमकतांना,

---

+ शिवाजीच्या चरित्रांतील कांहीं आख्यानें जयराम कवीच्या मुखानें शहाजी व व्यंकोजी या उभयतांनीं बंगलोर ( बेंगरूळ ) येथें गौरीविलास सभेंत ऐकिलीं, आणि शहाजीच्या मृत्यूनंतर व्यंकोजीनें व इतर राजवंशीय मंडळींनीं याच कवीचीं आणखी कांहीं काव्यें ऐकिलीं, असा "पर्णालपर्वतग्रहणाख्यान" या ग्रंथामध्यें उल्लेख केलेला आहे.

रणभूमीवर शत्रू सैन्याशीं झगडतांना, शेंकडों युद्धांत हजारों मानवी जीवांचा संहार उडविण्याच्या संवईनें ज्याचें अंतःकरण वज्राहून कठीण झालेलें, तोच शिवाजी मोहवश होऊन ह्या प्रसंगीं दिङ्मूढ बनला! शिवाजीनें जिजाबाईचे घट्ट पाय धरून दुःखाश्रूनें तिची नानाप्रकारें समजूत केली. दीनवाणीनें मोठाच आकांत आरंभिला; परंतु ती साध्वी ऐकेना. यावेळीं मोरोपंत पिंगळे, निराजीपंत, दत्ताजीपंत वगैरे कारभारी मंडळी सन्निध होती; त्यांनीही मातुःश्रीस विनंती केली कीं, "आपण अग्निप्रवेश केल्यास महाराज प्राण ठेवणार नाहींत; त्यामुळें बहुत कष्टानें संपादन केलेलें राज्य आजच नष्ट होण्याचा प्रसंग येईल; व शिवाजी महाराज व थोरले महाराज यांचें नांवही मागें राहणार नाहीं. तरी ह्या गोष्टीकडे नजर देऊन महाराजास ( शिवाजीस ) ओसंगीं घ्यावें. मन घट्ट करून राहावें. ( आपण ) हेका धरून सती गेला तर वंशक्षय केला, ही अपकीर्ती जगांत होईल." शिवाजीनेंही "तिचे मांडीवर बसून गळां मिठी घालून, आण घालून राहविली." "आपला पुरुषार्थ पाहावयास कोणी नाहीं; तूं जाऊं नको" असें म्हणून मोठा यत्न करून राजियांनीं ( शिवाजीनें ) व सर्व थोर थोर लोकांनीं राहविली;" व सर्वांच्या आग्रहावरून जिजाबाईनें आपला सती जाण्याचा बेत रहित केला.

शिवाजीस शहाजीची निधनवार्ता कळल्यावर त्यानेंही सांप्रदायाप्रमाणें सिंहगड येथें वडिलांची उत्तरक्रिया केली; प्रीति श्राद्धादि विधि यथासांग करून लक्षभोजनें घातलीं; पुष्कळ दानधर्म केला. शहाजी बेदनूर प्रांतीं बेदिकेरें ऊर्फ बासवापट्टण जवळ तुंगभद्रेच्या कांठीं अरण्यांत घोड्यावरून पडून मृत्यु पावला; त्या ठिकाणीं शिवाजीनें, पुष्कळ संपत्ति खर्च करून आपल्या वडिलांची छत्री बांधली; तेथें पुष्कळ दानधर्म केला; या छत्रीच्या पूजेसाठीं शिवाजीनें यरगटनहळ्ळी* हें गांव विजापूरकरांकडून मागून घेऊन तें

*यरगटन हळ्ळी हें खेडेगांव बेदिकेरें या गांवाजवळच तुंगभद्रा नदीच्या कांठीं आहे. शहाजी राजा शिकारीस गेला त्या वेळीं त्याचा व त्याच्या सैन्याचा तळ यरगटनहळ्ळी येथें होता. हा गांव अदिलशहानें शिवाजीच्या मागणीप्रमाणें

छत्रीस इनाम करून दिलें; आणि पुढें पंधरा वर्षांनीं, म्हणजे इ० सन १६७९मध्यें शिवाजी व त्याचा सावत्र भाऊ व्यंकोजी या उभयतांमध्यें तह झाला, त्या वेळीं शहाजीराजे यांच्या छत्रीची नेमणूक व्यंकोजीनें उत्तमप्रकारें चालवावी, अशाबद्दल शिवाजीनें व्यंकोजीस मुद्दाम बजाविलें; व त्याच्या बरोबरील तहांत " महाराजांचे ( शहाजीराजे याचे ) छत्रीकडे नेमणूक दरमाही चौघडथासुद्धां तुम्हीं ठेवावी; घोडा, हत्ती, कारकून असावे; येविशीं ढील होऊं नये;" असें एक स्पष्ट कलम ( कलम १८ ) घातलेलें आहे. शिवाजीनें केलेल्या ह्या व्यवस्थेप्रमाणें शहाजीराजे याच्या ह्या छत्रीसन्निध-ह्या वीर पुरुषाच्या आत्म्याच्या शांतवनाकरितां, व सन्मानाकरितां–पुष्कळ वर्षें नंदादीप जळत असत; परंतु आतां तर ही छत्री अगदींच मोडकळीस आलेली असून तिचे अवशेषच मात्र हल्लीं काय ते अस्तित्वांत राहिले आहेत.

शिवाजीनें शिखर शिंगणापूर येथेंही शहाजी राजाची एक मोठी डौलदार छत्री बांधविली. " शिखर शिंगणापुरास छत्रीची पूजाअर्चा भोंसल्यांचे कर्मे तेथें अद्याप करितात. शिखर शिंगणापुरावर भोंसल्यांची फार भक्ती असे; आणि भक्ती बसण्यासारखेंच तें स्थान आहे. तेथून पूर्वेस नगरापासून सोलापुरापर्यंतचा सर्व बालेघाट दिसतो; दक्षिणेस मिरजेपर्यंतचा टापू नेत्रकक्षेंत येतो; पश्चिमेस पन्हाळ्यापासून रायरी, सिंहगडपर्यंतचा डोंगराळ प्रदेश कनीनिकेवर प्रतिबिंबित होतो; आणि उत्तरेस फलटण, बारामती, पाटस, खेड, व जुन्नर, या तालुक्यांची मखमल पृथ्वीवर हंतरलेली दृष्टिपथांत भरते. असें हें महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाण राष्ट्राच्या पितरांचें शेवटचें विश्रांतिस्थान होण्यास सर्वथैव लायक आहे;" आणि महाराष्ट्रधर्मसंस्थापक, व गोब्राह्मणप्रतिपालक क्षत्रियकुलावतंस, राष्ट्रपुरुष छत्रपति शिवाजीमहाराज

---

शहाजी राजाच्या छत्रीच्या खर्चाकरितां दिला होता, परंतु " शिवाजीनें तेथील वसूल गोळा करून तो छत्रीची पूजाअर्चा व इतर व्यवस्था, यांत खर्च करावा, पण त्या गांवावर विजापूरकरांचा ताबा व हुकमत असावी " अशा अटीवर आदिलशहानें तो छत्रीस इनाम दिला होता.

यांचे आजे मालोजीराजे, व वडील शहाजीराजे, यांचें हें शेवटचें विश्रांतिस्थान असल्यानें तें महाराष्ट्राला, व महाराष्ट्रीयांना केव्हांही सर्वथैव पूज्यच व वंदनीयच आहे.

शहाजी मृत्यु पावला, त्यावेळीं कर्नाटक ऊर्फ बंगलोर प्रांताची जहागीर व तंजावर, पोर्टो नोव्हो व अरणी हे प्रांत* त्याच्या ताब्यांत होते. त्यांपैकीं अरणी प्रांताचा कारभार, वेदो ऊर्फ वेदोजी भास्कर या नांवाचा एक ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण सरदार पहात असे. हा सरदार मोठा शूर, व शहाजीच्या अतीशय विश्वासांतील होता; व तो पुढें रघुनाथपंत हणमंत्याप्रमाणेंच व्यंकोजीचा पक्ष सोडून, शिवाजीस मिळाला. त्यास आठ मुलगे असून, मराठेशाहींतील दक्षिण हिंदुस्थानांतील हें एक प्रसिद्ध व प्राचीन घराणें आहे; व या घराण्यानें मराठेशाहीची पुष्कळ कामगिरी बजाविली आहे. वेदोजी भास्कर हा शिवाजीस जाऊन मिळाल्यामुळें, व्यंकोजी हा

---

* अरणी हें ठिकाण उत्तर अर्काट जिल्ह्यांत चेयाईर नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर, अर्काटपासून सोळा मैलांवर आहे. अरणी हें एक जहागिरीचें ठिकाण असून ती जहागीर वेदो भास्कर या नांवाच्या एका देशस्थ ब्राह्मणाच्या घराण्याकडे आजतागायत चालू आहे; या जहागिरींत १८२ गांवें असून तिचें क्षेत्रफळ औरस चौरस १८३ मैलांचें व उत्पन्न अजमासें दोन लाखांवर आहे. येथील किल्ला पूर्वकाळीं मोठा प्रसिद्ध असून तो हल्लीं मोडकळीस आला आहे, व येथील "देवीपुरम्" हें मंदीर प्रसिद्ध, प्राचीन व प्रेक्षणीय आहे.

तंजावर हें मद्रास इलाख्यांत रेल्वेनें मद्रासपासून २१७ व त्रिचनापल्लीपासून ३७ मैलांवर आहे; व पोर्टो नोव्हो हें दक्षिण अर्काट जिल्ह्यांत एक शहर व बंदर असून तें एक रेलवेस्टेशनही आहे. या शहरास "फिरंगी पेठ," आणि "महंमद बंदर" अशीं दोन नांवें आहेत. हें शहर व्हेलार नदीच्या मुखाशीं पांडेचरीच्या दक्षिणेस ३२ मैलांवर असून तेथून सिलोन व अचीनकडे अतीशय व्यापारी दळणवळण चालू आहे; व बंदर या नात्यानें या शहरास अतीशय महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

त्याच्यावर व त्याच्या मुलांवर त्याबद्दल सूड उगवील असें शिवाजीस वाटलें, म्हणून त्यानें पुढें व्यंकोजीशीं तह केला, तेव्हां त्यांत " अरणी प्रांत वेदो भास्कर व त्याचे आठ मुलगे यांजकडे चालवावा, त्यांस कोणत्याही प्रकारें तोसीस लावूं नये; " असें एक कलम घातलें. त्या काळापासून ही अरणी येथील जहागीर अस्तित्वांत असून वेदो भास्करचें घराणें आजतागायत तिचा सुखानें उपभोग घेत आहे.

भोंसल्यांचें घराणें अत्यंत धर्मनिष्ठ म्हणून पूर्वीपासूनच नांवाजलेलें असून शहाजी हाही मालोजीप्रमाणेंच धर्मनिष्ठ होता, व प्रसिद्ध आनंदतनय हा शहाजी भोसले याचा गुरू होता असें कळतें. या आनंदतनयाचें मूळ नांव गोपाळराव हें असून त्याच्या बापाचें नांव आनंदराव हें होतें. तो जातीचा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून तो अरणी येथील राहणारा होता. तो महान् शिवोपासक असून, कवी व योद्धा होता. प्रसिद्ध " नलदमयंती स्वयंवराख्यान " या काव्याचा कर्ता रघुनाथ पंडित ( शिवाजीचा " राजव्यवहार कोश " करणारा रघुनाथ पंडित तो हा नव्हे. ) हा आनंदतनयाचा व्याही होता. आनंदतनय हा आपला गुरू मुरार परब्रह्म याच्या प्रमाणेंच महान् ईश्वरभक्त होता. भागवत, रामायण, वगैरे ग्रंथांतून आनंदतनयानें मराठींत पुष्कळ कविता केलेल्या असून, जरी त्यांत अरबी व फारशी शब्दांचा पुष्कळ भरणा आहे तरी, त्या मोठ्या सुरस व सुबोध आहेत; शिवाय तो मोठा शूर असून अरणी येथील युद्धांत त्यानें मोठा पराक्रम गाजविला, अशी माहिती उपलब्ध आहे. शहाजीच्या काळापर्यंत महाराष्ट्र भाषा दैन्यावस्थेंत होती; शहाजीचा गुरू हा आनंदतनय यानें मराठी भाषेंत अक्षरगण वृत्तांची योजना अगदींच नव्यानें प्रथम सुरू केली. त्या प्रमाणेंच शहाजी कर्नाटकांत गेल्यावर जमीनीचें कौलपट्टे मराठी भाषेमध्यें लिहिण्याचा त्यानें नव्यानें प्रथम प्रघात घातला; व अशा रीतीनें शहाजीनें अप्रत्यक्ष व प्रत्यक्षपणें मराठी भाषेच्या उन्नतीच्या बाबतींतही महाराष्ट्राला ऋणी केलें. त्यानंतर पुढील काळांत, शिवाजीनें स्वराज्याची स्थापना केल्यानंतर हरएक बाबतींत स्वकीय देशी बाणा प्रचारांत आला; राजव्यवहार कोश निर्माण झाला; संस्कृत भाषेचें मोठ्या झपाट्यानें पुनरुज्जीवन झालें;

आणि मराठी भाषेंत फारशी ऐवजीं असंख्य संस्कृत शब्दांचा संग्रह होऊन, मराठी भाषा प्रौढ, प्रभावशील व प्रतिभासंपन्न बनली.

शहाजीच्या चरित्रांत मातुःश्री जिजाबाई हिच्या संबंधानेंही त्रोटक उल्लेख करणें आवश्यक आहे. जिजाबाई ही अत्यंत मानी, कर्तबगार व मोठ्या धीराची व खोल अकलेची स्त्री होती; आपल्या माहेरीं सुखांत राहण्यापेक्षां आपल्या सत्तेच्या जहागिरींत कष्टांत राहणें तिनें पसंत केलें होतें. शिवाजी तिचा प्राणविसावा होता. जिजाबाई हें शिवाजीचें आद्य दैवत होतें. आपल्या मातेचें कर्तृत्व शिवाजी जाणून होता. शिवाजी आपल्या कुळाचें नांव काढील, असें जिजाबाईस वाटत होतें. "शत्रूंचें पारिपत्य करून कुळाचा उद्धार करणारा शककर्ता आपलें कुळांत निपजणार आहे, म्हणून देवीचे दृष्टांत झाले आहेत; परंतु ते केव्हां खरे होतील कोण जाणें!" असे दुःखोद्गार ती वारंवार शिवाजीजवळ काढीत होती. महाभारत व रामायणांतील अवतार कृत्यें, युद्धाचीं वर्णनें, व पराक्रमाच्या गोष्टी वारंवार ऐकून व त्यांचें मनन करून "आपणास ईश्वरानें कांहीं विशिष्ट महत्कृत्य तडीस नेण्याकरितांच निर्माण केलें आहे," अशी शिवाजीची भावना होत चालली होती. जिजाबाई ही मोठी व्यवहारचतुर असून तिला लिहितांवाचतांही येत असे. तिनें स्वतः दादोजी कोंडदेवाच्या मदतीनें पुणें येथील जहागिरीचा कारभार चालविला होता; अनेक तंट्याचे निवाडे दिले होते, व अनेक लोकांना सनदा व उत्पन्नेंही तिनें करून दिलीं होतीं. त्याप्रमाणेंच पुढील काळांत शिवाजीच्या गैरहजरींत ती राज्याचा कारभार पहात असे, व राजकारणी हुकूम सोडून न्यायमनसुब्याचें कामही ती करीत असे, व तिनें दिलेले हुकूम, महजर व निवाडापत्रें हल्लीं उपलब्ध आहेत. त्याप्रमाणेंच समाजसुधारणेच्या बाबतींतही ती प्रमुख होती. बजाजी नाईक निंबाळकर यानें मुसलमानी धर्म स्वीकारून आदिलशहाच्या मुलीशीं लग्न करून तो कांहीं काळ विजापूर येथें राहिल्यानंतर परत फलटण येथें आला. त्यानंतर त्यास मुसलमान झाल्याबद्दल खेद वाटूं लागला; व स्वकीयाशीं व्यवहार बंद झाल्यामुळें त्यास फारच अडचण भासूं लागली. तेव्हां बजाजी शिंगणापूर येथें जाऊन श्रीशंभूमहादेवाचें दर्शन घेऊन जिजाबाईस येऊन

भेटला, व आपली सर्व हकीकत तिला निवेदन करून स्वधर्मांत परत येण्याची आपली उत्कंठा दर्शविली. निंबाळकरांच्या घराण्याशीं भोंसल्यांचा पिढीजाद संबंध होता. जगपाळराव निंबाळकराची बहीण दिपाबाई ही मालोजीस दिलेली होती. मालोजी, शहाजी, व शिवाजी या तिघांच्या उत्कर्षास हेंच निंबाळकर घराणें कारणीभूत होतें; आणि बजाजांसारखा बलिष्ठ सरदार आपल्या पक्षांत असावा म्हणून तिनें पुढाकार घेऊन त्याला जातगंगेंत पावन केलें; ' तिनें समस्त मराठा मंडळ जमवून, आपत्प्रसंगामुळें नाईकाकडे कांहीं दोष नाहीं, असें जाणवून शास्त्राधारें त्यांस शुद्ध करून गोतांत घेतलें ' आणि शिवाजीची मुलगी नामें सखुबाई हिचा बजाबाचा वडील मुलगा महादजी याच्याबरोबर विवाह करून दिला. त्या वेळीं शिवाजीनें आपल्या जांवयास मौजे वाल्हे, ता० पुरंदर, प्रांत पुणें या गांवची पाटिलकी इनाम करून दिली; ( इ० सन १६५७ ) व तसें ताकीदपत्र दिलें;× त्याच वेळीं

---

× शिवाजीचें ताकीदपत्र खालीलप्रमाणें आहे, तें:—

" ठाणेदार हजरतखान यांस रा. शिवाजीराजेसाहेब यांची ताकीद, सुमासमान–खमसैन–आलफ ( अरबीसन १०५८; ) चा हाना पैलत हुताषक जमा व बलुते; मौजे वाल्हे प्रांत पुणें,–बेदानतके ( म्हणजे कळावें कीं, ) मौजें मजकूरची मोकदमी वाल्हेकर करीत असतां, बाळजोशी कुळकर्णी मौजे मजकूर यांस बरवोजी पाटलानें कैनी जिवें मारिलें. हा समाचार मशारनिल्हे त्रिंबकराव हवलदार, प्रगणें शिरवळ, यांस कळल्यावरून, त्रिंबकराव धावणी करून, बरवोजी पाटील यास धरून नेलें. यास नागवण त्याचा खंड ( दंड ) होन बाराशें केले. या पैक्याचे उगवणीबद्दल म्हाकूजी भापकर मोकदम, मौजे लोणी हा प्रांत, यास जामीन दिले. याउपरी बरवोजी पाटील मौजे मजकूर याच्यानें पैक्याचा वसूल न होय, म्हणून म्हाकूजी भापकरास पाटीलकी बरवोजीनें मौजे वाल्हयाची दिली. म्हाकूजी पाटीलकी करीत होता तो मयत झाला. त्याचा लेक खंडूजी भापकर पाटिलकी करीत ( असतां ) बरवोजीनें कांहीं कसूर केला. म्हणून हरदूजपणें ( उभयतांनांही ) हुजूर बोलावून, अवघी हकीकत मनास आणून, हरदूजणांचें ( उभयतांचें ) समा-

शिंगणापूरच्या बडव्यासही दोनशें रुपयांचें इनाम देण्यांत आलें; तें आज तागायत त्यांच्या वंशजाकडे चालू आहे.

माता जिजाबाई ही लोकांचा–स्वकीयांचा परामर्ष घेण्यांत अतीशय दक्ष असे. सिलीमकर विठोजी हैबतराव देशमूख याची कन्या खंडेराव गोमाजी नाईक पानसंवळ याच्या मुलास देण्याचें ठरलें; त्या वेळीं जिजाबाईनें विठोजी देशमुखास खालीलप्रमाणें पत्र पाठविलें; ( राजवाडे, खंड १७ लेखांक १६ )

---

धान करून पाटीलकीची किंमत होन १२००पैकीं हुजुरानें हरदूजणाशीं वाटून दिले. होन बाराशें, बितपशीलः–

९०० खंडूजी बिन म्हाकूजी भापकर होन.

३०० बरवोजी वाल्हेकर घोडा १ एकुण होन.

येणेंप्रमाणें पैकीं ( वांटणीनें) देऊन पाटिलकी विकत घेऊन, राजश्री महादजी निंबाळकर, आमचे जांवई यांस मौजे मजकूरची पाटिलकी करतील. तुम्हीं त्यास राजी होऊन असणें. तालीक ( नक्कल ) लेहून घेऊन, अस्सल नाईक ( महादजी ) मशार निल्हे यांस फिरून देणें. शके १५७९ ( इ. सन १६५७ ) हेमलंबी नाम संवत्सरे, कार्तिक शुद्ध १ मोर्तब सूद.

विशेष खुलासाः–सखूबाई ही शिवाजीचें पहिलें कुटुंब सईबाई हिची मुलगी, व संभाजीची बहीण होती. महादजी निंबाळकर ( शिवाजीचा जांवई) हा शिवाजीच्या सैन्यांत एक प्रमुख सरदार असून संभाजीसही त्यानें पुष्कळ मदत केली होती. संभाजीच्या वधानंतर अवरंगजेबानें महादजी व सखुबाई यांस पकडून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें; व त्याच ठिकाणीं पुढें त्यांचा अंत झाला.

शिवाजीचा प्रसिद्ध सरनोबत नेताजी पालकर हाही असाच बाटून मुसलमान झाला होता; व उत्तर हिंदुस्थानांत असतां त्यानें मुर्शिदकुलीखान हें नांव धारण केलें होतें. पुढें तो दक्षिणेंत परत येऊन मातोश्री जिजाबाईस भेटला; तेव्हां तिनें कऱ्हाड क्षेत्रांतील ब्राह्मणांकडून त्यास शुद्ध करवून पून्हां जातींत घेतलें. या दोन उदाहरणावरूनच जिजाबाईची अलौकिक योग्यता व दूरदृष्टी निदर्शनास येते.

तें:—" लग्नविधी करावया कारणें तुम्हांस व तुमचे मातेस हुजूर बोलाविलें. त्यावरून तुम्हीं येऊन अर्ज केला जे, सांप्रत आपणांसी रोजीचें खावयास नाहीं. आणि लग्नविधी कैसा होईल. त्यावरून तुम्हांवरी मेहेरबानी करून लुगड्याबद्दल होन पंचवीस व ऐन जिन्नस सामान पांचशें माणसांचा, ऐसें बक्षीस दिधलें असे; सुखें घेऊन अलबत्ता लग्न सिद्ध करणें " यावरून लोकांचा परामर्ष घेण्याची जिजाबाईची दक्षता निदर्शनास येते.+

शिवाजीच्या राज्यव्यवस्थेप्रमाणेंच त्याच्या खाजगीकडील कारभाराचीही ठरीव व मोठी नमुनेदार व्यवस्था असे; आणि मातुःश्रीच्या व्यवस्थेंत तर तिळमात्रही कमी पडूं न देण्याविषयीं शिवाजी अतीशय काळजी घेत असे. शिवाजीनें तिच्या सेवेंत दक्ष व हुषार माणसें व बायका नेमून दिल्या होत्या. तिला स्वतंत्र नेमणूक असून पाहऱ्याचे शिपाई, पुजारी, पुराणीक वगैरे मंडळीची तिच्याकडे स्वतंत्र नेमणूक करून दिली होती; त्याप्रमाणेंच दानधर्माचीही स्वतंत्र व्यवस्था केलेली असून, एक दिवाण, एक चिटणीस, एक फडणीस, व एक पोतनीस इतके कामगार, व कारकून मंडळी तिच्या

---

+राजे शहाजी याची पत्नि,व संभाजी व शिवाजी यांची माता जिजाबाई ऊर्फ जिजाई हिच्या संबंधानें जयराम लिहितो कीः—

जशी चंपकेशी खुले फुल्ल जाई । भली शोभली ज्यास माता जिजाई ॥
जिचे कीर्तिचा चंबु जंबुद्विपाला । करी साउली माउलीसी मुलाला॥१२१॥

जिजाई ही शहाजीसारख्या धीर, उदार व पराक्रमी पुरुषाला चांगलीच साजण्यासारखी बायको होती. आणि ती केवळ नवऱ्याच्या कीर्तीवर विकत नसून, स्वतःच्या धीर, उदार व गंभीर वृत्तीनें तिची कीर्ती त्या काळीं सर्व भरतखंडभर पसरली होती; इतकेंच नव्हे तर तिच्या कीर्तीच्या चंबूखालीं म्हणजे घुमटाखालीं, म्हणजे घुमटाच्या सावलीखालीं सर्व जंबुद्वीप म्हणजे जंबुद्वीपांतील सज्जन लोक यवनांच्या जुलमाला कंटाळून आश्रयार्थ येत असत; असें जयराम लिहितो. ( रा. मा० वि० चंपू ) यावरून ही बाई किती तोलाची होती, कर्तबगार होती, गोरगरिबांचा समाचार घेणारी व गुणी सज्जनांना आश्रय देणारी होती, याची सहज कल्पना करितां येते.

तैनातींत ठेविलेली होती; शिवाय शिवाजी हा स्वतःही नेहमींच आपल्या आईची काळजी घेत असे; व प्रत्येक खाजगी, सामाजिक, व राजकीय बाबतींत तो आपल्या आईच्या सल्ल्यानें वागत असे. कधीं कधीं जिजाबाई व शिवाजी हीं उभयतां सोंगट्याही खेळत असत. त्यांच्या पदरीं पंताजी गोपीनाथ बोकील या नांवाचा शहाजीच्या वेळेपासूनचा एक मोठा इभ्रतदार एकनिष्ठ व नांव लौकिकास चढलेला मुत्सद्दी होता. त्याच्यावर जिजाबाईची विशेष मर्जी असून त्यास " पंताजी काका " असें म्हणत असत. व जिजाबाई व शिवाजीबरोबर त्याचा सोंगट्या खेळण्याचा अधिकार असे. याच पंताजीस शिवाजीनें पुढें अफझलखानाकडे आपला वकील म्हणून पाठविलें होतें. जिजाबाई ही पतिनिधनानंतर ( इ० सन १६६४, जानेवारींमध्यें शहाजीचा मृत्यू झाला. ) अजमासें दहा वर्षें जिवंत होती. ती शिवाजीस राज्याभिषेक झाल्यानंतर ( शके १५९६; जेष्ठ शुद्ध १३; ता० ६ जून इ० सन १६७४) बारा दिवसांनींच ( जन्म इ० सन१५९५ मृत्यू जेष्ठ वद्य ९ शके १५९६; ता० १८ जून इ० सन १६७४ ) रायगडचे खालीं पांचाड येथें मृत्यू पावली. त्यावेळीं तिची खाजगी मिळकत पंचवीस लक्ष होन अथवा " कांहींच्या म्हणण्याप्रमाणें अधीक, " किंमतीची होती, ती मृत्यूसमयीं तिनें शिवाजीस दिली. जिजाबाईच्या मृत्यूमुळें शिवाजीस अत्यंत दुःख झालें, व त्याला आपल्या मृत्यूपर्यंत जिजाबाईची नेहमीं आठवण येत राहून तो उदासीन स्थितींत राहिला. मृत्यूसमयीं जिजाबाईचें वय ७९ वर्षांचें होतें.

शहाजी हा खरोखरीच एक मोठाच वैभवशाली पुरुष होऊन गेला; इतकेंच नाहीं तर त्याच्या काळांत, इतका वैभवसंपन्न, व सत्ता आणि अधिकारपूर्ण असा अपवादादाखल तो एकटाच पुरुष उत्पन्न झाला. शहाजीच्या काळांतील मुसलमानी राज्यांतील मराठा सरदार मंडळींत त्याच्या तोडीचा दुसरा एकही अधिकारी पुरुष निर्माण झाला नाहीं, किंवा शहाजीसारखें वैभव एकासही प्राप्त झालें नाहीं. राधामाधव विलासचंपू+मध्यें जयराम

---

+ " राधामाधव विलास चंपू " या काव्याच्या कर्त्याचें नांव जयराम, त्याच्या आईचें नांव गंगाबा, बापाचें नांव गंभीरराव, उपनाम पिंड्ये, गोत्र

कवीनें शहाजीच्या वैभवाचें वर्णन केलेलें आहे. तें जयराम कवी शहाजीच्या आश्रयाला असल्यामुळें, अतिशयोक्तिचें असेल असें मानलें तरी सुद्धा त्यावरूनही, त्यासंबंधीं, व इतर अनेक बाबतींसंबंधीं पुष्कळच कल्पना करता येते. या चंपूमध्यें शहाजीच्या दिनचर्येचें जें वर्णन केलें आहे तें येणेंप्रमाणें:—

---

जामदग्निवत्स; नाशिक जिल्ह्यांतील डिंडोरी तालुक्यांत वणी या गांवाजवळ सप्तश्रृंगी या नांवाचा एक डोंगर असून त्यावर "सप्तश्रृंगी देवी" हें प्रासिद्ध स्थान आहे. या सप्तश्रृंगीच्या समोरील मार्कंड्याच्या डोंगराखालीं या कवीचें गांव होतें; ( गांवाचें नांव कवीनें दिलेलें नाहीं. ). आणि मार्कंडेय पर्वतापासून अहिवंत पर्वतापर्यंत जे सात किल्ले होते, त्यांची किल्लेदारी जयराम कवीचे वडील गंभीरराव यांजकडे होती; आणि अहंमद नगरच्या बाहिरीं निजामशहाच्या राज्याचें पुनरुज्जीवन शहाजी हा आपल्या पूर्ववयांत करीत असतां या गंभीररावाशीं त्याचा सहजच परिचय झालेला होता. पुढें शहाजीनें कर्नाटक प्रांतांत राज्यस्थापना केल्यावर, " बंगळूरच्या शहाजी महाराजाच्या " औदार्याची कीर्ती ऐकून, जयराम कवी कर्नाटकांत बंगळूर येथें गेला. ब्रम्हविद्या निष्णात शिवराय गोस्वामी या नांवाच्या शहाजीच्या दरबारांतील एका विद्वान् मनुष्यास भेटला; व शहाजीची भेट घेण्याचा आपला मनोदय त्यास निवेदन केला. शिवराय वेदांती यानें ती गोष्ट शहाजी राजाच्या कानावर घातली, व राजानें मान्यता दर्शवून शिवराय वेदांती, व कथा कल्पक वीरेश्वर वैद्य या उभयतांना कवीस सामोरें पाठवून जयराम कवीस दरबारांत आणविलें. हा जयराम कवी मोठा विद्वान् असून त्याला संस्कृत, प्राकृत गोपाचलीय ऊर्फ ग्वालेरी ऊर्फ ब्रज, (ग्वालेरच्या किल्ल्याला गोपाचल, गोपालगिरी पूर्वी म्हणत असत.) गुर्जर, वक्तर, ढुंढार, पंजाब, हिंदुस्थान, बागुल, यावनी, दाक्षिणात्य यावनी, व कर्नाटक या बारा भाषाचें उत्तम ज्ञान होतें, व तो वरील बाराही भाषेंत काव्यरचना करीत असे. त्याची विद्वत्ता पाहून त्याच्या पूर्व हकीकतीचा तपास करून व हा आपलाच आहे असें म्हणून शहाजीनें त्यास आपल्या आश्रयाला ठेवून घेतले; व रघुनाथपंत हणमंते यांस त्याची यथायोग्य बरदास्त ठेवण्याविषयीं आज्ञा केली.

" पहाटेस ( शहाजी राजाच्या ) शेज घराजवळ बाळसंतोष, कुडबुड्ये जोशी व शाहीर लोक भूपाळया वगैरेंचे मधुरालाप काढून राजास सुखशय्ये वरून उठवीत. इतक्यांत विश्वनाथ भट्ट उच्च स्वरानें प्रातःस्मरण संस्कृत भाषेंत करीत. कित्येक ब्राह्मण पुण्याह वाचनाचें, म्हणजे राजाला सुखाचा दिवस जावो, अशा अर्थाचे मंत्र म्हणत. कित्येक विप्र ॐकारपूर्वक वेदपठण करीत. कित्येक स्वस्ति साम्राज्यादि मंत्रांनीं आशीर्वाद देत; व कित्येक अग्निहोत्री वषट्कारार्पणांत गुंतत. मंत्रपठणाच्या, भूपाळयांच्या व प्रातःस्मरणांच्या ह्या धांदलींत राजा शेजेवरून उठून अंगणांत येऊन, आकाशाकडे पाहून अरुंधति, शची, देवसेना व आकाशगंगा, इत्यादि तारागणांवर नजर फेंकून, आणि शिव, विष्णु, स्कंद ऊर्फ खंडोबा, ब्रह्मदेव, लोकपाल, इंद्रादि देव, होमशालेंतील अग्नि इत्यादींचें दर्शन घेऊन दिशावलोकन करी. ह्याच सुमारास जंगम शंख फुंकीत; गुरव शिंग वाजवीत, व घडशी चौघडा सुरू करीत; ह्या मंगलध्वनींच्या निनादांत तुफान ऐरावत, सवत्स गाय, पुत्रिणी ब्राह्मणी, वर्धमान मानुष, म्हणजे विदूषक, ठेंगू ब्राह्मण, व पाण्यांतून नुकताच बाहेर निघालेला डुकर, हे शुभ चिन्हक प्राणी राजापुढून जात. नंतर वाड्याच्या समोरील पटांगणांत हजार पांचशें घोडेस्वार किंवा नाईक कवाईत करीत. त्यांची परेड देहली दरवाजाच्या बाहेर येऊन पाहून, रथ, पालख्या, शिबिका वगैरे वाहनांचें अवलोकन राजा

---

जयराम कवी हा शके १५७५ ( इ० सन १६५३ ) पासून शके १५८० (इ० सन १६५८) पर्यंत पांच वर्षें शहाजीच्या आश्रयाला होता. त्यावेळीं शहाजीचें वय साठीच्या घरांत आलेलें होतें; म्हणजे शहाजीच्या साठपासून पासष्ट पर्यंतच्या पांच वर्षांतीलच तेवढी प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत जयराम कवीनें चंपूंत दिलेली आहे. शेवटीं, त्यानें आपल्या मातापितरांस काशीवास घडावा, म्हणून राजापाशीं द्रव्य मागितलें, व तें शहाजीनें त्यास दिलें, असा उल्लेख केला आहे, व अखेरीस शहाजी राजासमोर अशीं सुंदर पदें गाऊन माझ्यासारखे पालखी पदस्थ व्हावें, म्हणून इतर कवींना उपदेश करून जयराम कवीनें परिशिष्ट खंडाची व चंपूची परिसमाप्ति केली आहे.

करी. इतक्यांत दरवेशी एखाद दुसरा सिंहाचा बच्चा, व थट्टी कामदार एखादा माजलेला पोळ राजापुढें नाचत बागडत आणीत. नंतर हंस, चाष, मत्स्य, यांचे शुभशकुन घेत घेत व दरवाजावरील तोरणाकडे पहात पहात वाड्यापाठीमागील अश्वत्थ, औदुंबर वगैरे शुभवृक्ष व पारिजातकादि पुष्पवृक्ष यांच्या छायेखालून राजा जाई. शेवटीं दक्षिणावर्त शंखांतल्या तीर्थांचा नेत्रांना स्पर्श करून व वेळूच्या लंबायमान दांडयाच्या अग्रावर लटकत व फडफडत असलेल्या जरिपटक्याकडे सकौतुक दृष्टिक्षेप चढवून, राजा नाडी परीक्षणार्थ आपला हात राजवैद्यापुढें करी. सवेंच एक ब्राह्मण एका हातांत तेलानें भरलेली रुप्याची परात, व एका हातांत तुपानें भरलेली सोन्याची परात राजापुढें आणी. त्यांत मुखाचें प्रतिबिंब पाहून व अष्टोदर्शी मंगलांचा शुभशकुन घेऊन राजा स्नानोपहारादि सेवन केल्यावर सभामंडपांत प्रवेश करी. सभामंडपाला ऊर्फ दरबाराला नवगजी असें नांव असे. या नवगजींत राजे, उपराजे, संस्थानिक, परराष्ट्रीय वकील व सरदार आधींच येऊन हजर असत. पंडित, कवि, शास्त्री, वैदिक इत्यादि सरस्वती पुत्रांचादि समुदाय राजदर्शनाची उत्कंठेनें वाट पहात असे. नंतर भालदारांच्या ललकाऱ्यांत व जनसंमर्दांतून वाट काढीत येणाऱ्या चोपदारांच्या ठणकाऱ्यांत महाराज हातांतील तरवारीचें अग्र जमिनीला टेंकीत टेंकीत ( कारण शहाजी महाराजांचें वय या कालीं साठीच्यापुढें गेलें होतें. ) सभास्थानांत गंभीर रुबाबानें प्रवेश करून सिंहासनारूढ होत. हा प्रातःकालीन कार्यक्रम झाला. भोजनोत्तर दोन प्रहरानंतरहि कधीं कधीं स्वारी शिकार नसल्यास पंडित व कारभारी यांच्या सभेंत बसून सायंकाल पावेतों राजकारण, ब्रह्मचर्चा, काव्यविनोद, दानधर्म, पंगुपरामर्ष, न्यायमनसुबा, जेठीमल्ल युद्धें इत्यादि लघु किंवा जड व्यवहारांत महाराज गुंतलेले असत. सायंकर्म आटोपल्यावर उपहारोत्तर खलबतखान्यांत शेलक्या मुत्सद्यांच्या समवेत गुप्त कारवाई चाले." अशी ही शहाजी महाराजांची दिनचर्या जयरामानें वर्णन केलेली आहे, व त्यावरून शहाजीच्या ऐश्वर्याची पुष्कळच कल्पना होण्याजोगी आहे.

शहाजी राजा हा स्वतः विद्वान् असून त्याला संस्कृत प्राकृत व इतरही अनेक भाषांचे ज्ञान होतें; व शहाजीनें जयराम कवीला "शतचंद्रं नभस्तलं"

ही समस्या स्वतः घातली, राधामाधव विलास हा संस्कृत चंपू सहृदयेनें श्रवण केला, व बारा भाषांत लिहिलेलीं पद्यें सरसतेनें श्रवण केलीं, यावरून तो विद्वान व बहुविध भाषाभिज्ञ होता, बहुविध विद्यांचा व काव्यांचा भोक्ता होता, असें स्पष्ट होतें. शहाजीच्या आश्रयाला नाना देशचे संस्कृत, व प्राकृत कवी, पंडित, शास्त्री, मराठी शाहीर इत्यादि गुणी मंडळी असून तो अशा विद्वान् मंडळींचा नेहमींच उत्तम प्रकारें परामर्ष घेत असे, कोणी कोठचाहि कवि आश्रयार्थ आला म्हणजे शहाजी राजा त्याला त्याच्या इच्छेप्रमाणें आदरानें ठेवून घेत असे, आणि तो जें ईश्वरविषयक, किंवा राजविषयक, किंवा मनोरंजनविषयक कवित्व त्याच्या जन्मभाषेंत करी, तें ऐकण्यांत फावला वेळ घालवून तो आपलें मन रिझवीत असे. शहाजी राजास गोवर्धनाचार्यकृत सुप्रसिद्ध आर्या फार आवडत, त्यामुळें राजाच्या सांगण्यावरून हुबेहूब गोवर्धनाच्या आर्येसारख्या आर्या जयरामानें रचून दाखविल्या व शाबासकी मिळविली, असा चंपूंत उल्लेख असून, काव्यशास्त्र विनोदानें धीमान् शहाजी महाराजाचा काळ कसा जात असे, त्याचेंही कवीनें चंपूच्या आठव्या उल्लासांत सुंदर वर्णन केलेलें आहे. जयराम कवीच्या वडिलाचा व शहाजीचा परिचय एवढ्याच कारणावरून जयराम कवी शहाजीच्या भेटीस गेला नाहीं, तर "बंगळूरच्या शहाजी महाराज भोंसल्यांच्या कर्णोपम दातृत्वावर देशोदेशींच्या अनेक विद्वानांचा योगक्षेम चालतो अशी वदंता चारणांच्या तोंडून ऐकून" जयराम कवी राजाच्या भेटीस व आश्रयाच्या इच्छेनें कर्नाटक प्रांतीं गेला, व तो विद्वान् असल्याबद्दल शहाजी राजानें स्वतः व आपल्या दरबारांतील विद्वान् मंडळीमार्फत खात्री करून घेतली, व नंतर त्याचें नांव गांव वगैरेची खात्री करून घेऊन, व "हा कोणी दूरचा नाहीं, आपलाच आहे," असें म्हणून त्यास आपल्या आश्रयाला ठेवून घेतलें, असें चंपूंत वर्णन आहे, त्यावरून शहाजी राजा विद्याविलासी, गुणिजनसंग्रही व विद्वज्जन आश्रयी होता, आणि त्याच्या कर्णासारख्या दातृत्वावर देशोदेशींच्या अनेक विद्वानांचा योगक्षेम चालत होता, हें उघड होतें.

शहाजीच्या खास दरबारांतील दरबारी व कारभारी मंडळी, पंडित व कवी मंडळी, ( आणि युवराज संभाजी वगैरे खाशी मंडळी ) मिळून एका-

हत्तर इसमांची नांवें जयराम कवीनें आपल्या चंपूंत दिलेलीं आहेत. व या शिवाय इतर किरकोळ बालकवी वगैरे दोनचार इसमांचाही त्यांत उल्लेख केलेला आहे; व या सर्व मंडळीमध्यें बहुतेक संस्कृत व प्राकृत भाषा जाणणारे असून कित्येक तर पट्टीचे शास्त्रज्ञ व कलाभिज्ञ होते, असें त्यानें दिग्दर्शित केलें आहे; त्यावरून इतकी गुणी मंडळी ज्याच्या दरबारीं शके१५७५ पासून शके १५८०पर्यंतच्या पांच वर्षांत जयरामानें प्रत्यक्ष पाहिली, त्या शहाजीमहाराजांचें ऐश्वर्य कोणत्या प्रतीचें असावें, याचा सहज अंदाज होण्यासारखा आहे. शहाजीनें देवशेषादि अनेक विद्वानांना वर्षासनें करून दिलीं होतीं, व त्याच्या दरबारीं अनेक हिंदु कवी तर होतेच, परंतु अल्लीखान या नांवाचा एक मुसलमान कवीही त्याच्या आश्रयाला होता; त्याप्रमाणेंच शहाजी राजा हा स्वतः तर विद्वान् होताच, परंतु संभाजी, व्यंकोजी, रक्षापुत्र कोयाजी वगैरे राजघराण्यांतील इतर मंडळीही विद्वान व संस्कृतज्ञ होती, असें त्यांच्यासंबंधीं जयरामानें वर्णन केलें आहे. चंपूमध्यें जीं एकाहत्तर नांवें जयराम कवीनें उल्लेखिलीं आहेत तीं खालीं लिहिल्याप्रमाणे:—

( १ ) शिवराम गोस्वामी ( गोसावी ) देशस्थ ब्राह्मण;—हा शहाजीच्या दरबारीं, आल्यागेल्याची घन्याला वर्दी, व गांठ घालून देणारा होता. शिवराम ( शिवराय ) गोसाव्यासंबंधीं पूर्व माहिती नाहीं.

( २ ) वीरेश्वर वैद्य;—देशस्थ ब्राह्मण; नांव पूर्वपरिचित नाहीं; शहाजीचा भिषग्वर असावा.

( ३ ) मल्लारिभट्ट पुरोहित—हा राजोपाध्याय होता; तो परम बुद्धिवान् व विद्वान् होता; त्यानें जयराम कवीस समस्या घातली होती.

( ४ ) नारोपंडित दिक्षीत,—सबंध नांव नारो त्रिमल हणमंते; शहाजीचा विद्वान कारभारी व प्रसिद्ध मुत्सद्दि; लग्नोत्तर जिजाबाईच्या पाठराखणीस हणमंते जाधवरावाकडून शहाजीकडे आले; शहाजी राजाच्या चरित्रांत त्याची हकीकत दिलेली असल्यामुळें येथें द्विरुक्ती केली नाहीं. यानें जयराम कवीस समस्या घातली होती.

( ५ ) नरहरि कवीश्वर—देशस्थ; हें नांव पूर्वपरिचित नाहीं; जयराम कवीस समस्या घातली होती. हा शहाजीच्या दरबारीं कवी असावा.

( ६ ) विष्णु ज्योतिर्विद;–हा शहाजीचा ज्योतिषी होता; नांव पूर्व परिचित नाहीं; यानें जयराम कवीस समस्या घातली होती.

( ७ ) रघुनाथभट्ट चाऊरकर उर्फ चवरे,-देशस्थ; शहाजीचा पंडित; नांव पूर्वपरिचित नाही. यानें जयराम कवीस समस्या घातली होती.

( ८ ) विश्वनाथभट्ट ढोकेकर;–देशस्थ; राजाच्या मर्जीप्रमाणें वागण्यांत चतुर; नांव पूर्वपरिचित नाहीं; यानें जयराम कवीस समस्या घातली होती.

( ९ ) निळकंठभट्ट श्रोत्रिय; ( श्रोत्री )–हा राजापुढें भारतादि पुराण वाची; यानें जयराम कवीस समस्या घातली होती. नांव पूर्वपरिचित नाहीं.

( १० ) प्रल्हाद सरस्वती–देशस्थ; दरबारांतील कवी; यानें जयराम कवीस समस्या घातली होती. नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ११ ) विश्वेश्वरभट्ट चतुर;–देशस्थ; हा राजाच्या पदरचा गायक; चतुर हें उपनांव; ( देशस्थ; निजामशाहींत याच उपनांवाचा साबाजीपंतचतूर या नांवाचा एक अतिशय प्रसिद्ध मुत्सद्दी होता. ) यानें जयराम कवीस समस्या घातली होती. नांव पूर्वपरिचित नाहीं.

( १२ ) अक्कय्य शास्त्री पल्लकचेरीकर;—कर्नाटक ब्राह्मण; तत्कालीन प्रसिद्ध विद्वान शास्त्री; यानें जयराम कवीस समस्या घातली होती; नांव पूर्व परिचित नाहीं.

( १३ ) तुकदेव;—हे देशस्थांत अडनांव आहे; पुराण सांगण्यांत मोठा पटाईत असे; यानें जयराम कवीस समस्या घातली होती. नांव पूर्व परिचित नाहीं.

( १४ ) शेष पंडित;—हा सर्व शास्त्रज्ञ होता; यानें जयरामकवीस समस्या घातली होती; नांव पूर्व परिचित नाहीं.

( १५ ) अनंत शेष पंडित;—हा काशींतील शेष उपनावाचा विद्वान पंडित; शालीवाहनाच्या तेराव्या शतकांत महाराष्ट्रांत जेव्हां सर्वत्र यावनी माजली तेव्हां पुणतांबें येथून शेष वगैरे पांच पट्टीच्या विद्वानांची घराणीं आपलीं हजारों पोथ्या पुस्तकें घेऊन श्री क्षेत्रवाराणशी येथें देशत्याग करून गेलीं, त्यांतील हें शेषाचें घराणें; ह्या शेष घराण्यांतील वीरेश्वर शेषापाशीं

प्रसिद्ध कवीश्वर जगन्नाथ पंडितानें पातंजल भाष्याचा अभ्यास केला असें जगन्नाथानें आपल्या रसगंगाधरांत लिहिलें आहे; अनंत शेष हा अलंकार शास्त्रज्ञ होता; त्यानें जयराम कवीस समस्या घातली होती; हें नांव परिचितांपैकीं आहे.

( १६ ) संभाजी राजे भोंसले;—शहाजी व जिजाबाई यांचा वडील मुलगा व शिवाजीचा वडील भाऊ; यानें जयराम कवीस ( संस्कृत ) समस्या घातली होती; यास विधियुक्त यौवराज्याभिषेक झाला होता; याची हकीकत शहाजीच्या चरित्रांत दिली असल्यामुळें,या ठिकाणीं द्विरुक्ती केली नाहीं.

( १७ ) यलोजी महाले घंटाघोष;—देशस्थ ब्राह्मण; महाले, घंटाघोष हीं दोन उपनांवें; योग, न्याय मिमांसा, काव्य, नाटक, अलंकार, इत्यादि शास्त्रांत व कलांत निष्णात होता; हा मोठाच विद्वान पंडित असून त्यानें जयरामास समस्या घातली होती; युवराज संभाजीराजे यांचा परम स्नेही; हें नांव पूर्वपरिचित नाहीं.

( १८ ) रघुनाथ पंडित, सबंध नांव रघुनाथ नारायण हणमंते;—नारोपंत हणमंते यांचा मुलगा, हा वयानें तरुण, परंतु बुद्धीनें पोक्त होता; याची हकीकत शहाजीच्या चरित्रांत दिलेली आहे.

(१९) सखोपंडित;—अडनांव दिलें नाहीं; हा भांडागार, बागा, थट्टी, कलावंत यांच्यावरील अधिकारी असून पगार वाटण्याचें काम त्याच्याकडे असे; सर्व लोकांशीं मित्रत्वानें वागण्यांत व मिठ्ठ बोलण्यांत तो प्रवीण असून शहाजी राजाचा तर केवळ बहिश्चर प्राण असे. नांव पूर्वपरिचित नाहीं.

( २०, २१ ) रघुनाथपंत व लक्ष्मणपंतः—शहाजीराजाच्या दरबारांतील मुत्सद्दी, हे उभयतां लोलिंब कर्मे म्हणजे नर्म कर्मे संपादण्यांत राजाचे साह्यकारी होते; राणीवंशाची व्यवस्था पाहण्याचें काम यांच्याकडे असावें; नांवें पूर्वपरिचित नाहींत.

( २२ ) दत्तो नागनाथ;—शहाजीच्या दरबारांतील मुत्सद्दी असावा; जयराम कवीचा नातेवाईक; नांव पूर्वपरिचित नाहीं.

( २३ ) विश्वनाथभट्ट मंगल पाठकः—याजकडेस प्रातःस्मरण उच्च व मधूर स्वरानें पढून राजाला उठविण्याचें काम असे; नांव पूर्वपरिचित नाहीं.

(२४) प्रभाकरभट्ट राजगुरुः–राजाचा वर्ष पुरोहित व राजगुरु; ह्यांचें चरणतीर्थ राजा ग्रहण करीत असे; नांव पूर्वपरिचित नाहीं.

(२५) मल्लीनाथ वंशजः—रघुवंशादि महाकाव्यांवर टीका करणारा मल्लीनाथ हा त्रिचनापल्लीचा राहाणारा, त्याचे तीन चार वंशज आश्रयार्थ राजाकडे आले असतां, त्यांची व राजाची गांठ प्रभाकर भट्ट राजगुरु यांच्या द्वारां जयराम कवीनें घालून दिली. नांवें कवीनें दिलीं नाहीत.

(२६) भीमरायः–हा जासुदांचा मुख्य होता; नांव पूर्वपरिचित नाहीं.

(२७) अभेद गंगाधरः–एकोजी (व्यंकोजी) राजा संभाजीच्या मृत्यूनंतर युवराज झाला, त्याचा हा आमात्य; उपनांव अभेद; हा वेद व्युत्पन्न असून अग्निहोत्री असे; मनाचा दयाळू, व पापभीरु असे; त्याची जयराम कवीवर कृपादृष्टि होती.

(२८) एकोजी, येकोजी ऊर्फ व्यंकोजीराजे भोंसले;:–शहाजी व तुकाबाई यांचा मुलगा; संभाजी राजाच्या मृत्यूनंतर हा युवराज झाला; याची हकीकत शहाजीच्या चरित्रांत दिली आहे.

(२९) कृष्णभट्ट विदूषकः–व्यंकोजी राजाच्या पदरचा खुषमस्कऱ्या; नांव पूर्वपरिचित नाहीं.

(३०) बघेल कवीः–नांव दिलेलें नाहीं.

(३१) जनार्दन पंडितः–जनार्दन नारायण हणमंते; ह्याची चालचलणूक रुबाबदार असून हा शिव व विष्णू या दोन्हीं देवनांचा उपासक होता; कर्नाटकांत शैव व वैष्णव यांचें बंड व द्वैत फार; सबब दोघांचाही मिलाफ एकमेव अद्वितीय ब्रह्मांत म्हणजे भागवत धर्मांत करणारा हा मुत्सद्दी शहाजी व व्यंकोजी राजाच्या दरबारीं होता; हें पूर्वपरिचित नांव आहे.

(३२) यशवंतरावः–हा व्यंकोजी राजाचा श्रीकरणधीश; हा राज्यांतील करवसुलीचा अधिकारी व विद्वान ब्राह्मणांचा कैवारी होता. नांव अपरिचित.

( ३३ ) कमलाकरः—हा यशवंतराव श्रीकरणाधीश याचा आश्रयदाता; याचे उपकार यशवंतरावानें योग्यतेस चढल्यावर फेडले; हें नांव किंवा उपनांव आहे तें समजत नाहीं; पूर्वपरिचित नाहीं.

( ३४ ) कोयाजीराजे भोंसलेः—हा शहाजीचा रक्षापुत्र; ह्याच्यावर व्यंकोजी राजाची फार कृपादृष्टि असे; हा कोयाजी राजा नृत्य, गायन, संस्कृत प्राकृत जाणणारा असून घोड्यावर बसणें, भालाबर्चा खेळणें, कुस्तीकवायत करणें, इत्यादि कलांत निपुण होता. त्यानें संस्कृत प्राकृताचा अभ्यास विश्वनाथ ज्योतिषाजवळ केला असून, तो मल्लविद्या नरषट्कसा या नांवाच्या प्रख्यात जेठीपाशीं शिकत होता; काव्य, नाटक, आख्यायिका, इतिहास, संगीत, नाना देश भाषा, इत्यादींच्या परिज्ञानांत त्यानें अत्यंत कौशल्य संपादिलें होतें. या कोयाजी राजाला नायकीण या नांवाची एक मुलगी होती, तिला गायन नर्तनाची तालीम कांहीं कवीश्वर देत असत. नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ३५, ३६ ) त्रिमल नाईक, व वेंकट नाईकः—हे उभयतां शहाजींच्या दरबारचे प्रख्यात कानडे गवई; नांवें पूर्वपरिचित नाहींत.

हीं छत्तीस नांवें शहाजी महाराजांच्या खास दरबारांतील कारभारी मुत्सद्दी, पंडित, व कवी, यांचीं आहेत. ह्या छत्तीस मंडळींपैकीं बहुतेक सर्व संस्कृत व प्राकृत जाणणारे असून कित्येक तर पट्टीचे शास्त्रज्ञ व कलाभिज्ञ होते; याशिवाय मराठी, व्रज, गुजराथी, बखतर, ढुंढार, पंजाबी, हिंदुस्थानी, बागलाणी, फारशी, उर्दू, व कानडी, अशा अकरा भाषांतील पसतीस कवी शहाजींच्या आश्रयाला होते; त्यांचीं नांवें (जयराम कवीशिवाय) खालीं लिहिल्याप्रमाणें:—

( ३७ ) रघुनाथ व्यासः—माहिती नाहीं. बैरनके वधू फिरे बेरनके बनमे, अशी समस्या रघुनाथ व्यासानें जयराम कवीला घातली; तिचें पूरण करतांना शहाजीचा रणदुंदुभी वाजला असतां शहाजहानच्या हृदयांत धडकी भरली, असें विधान केलें आहे.

( ३८ ) रघुनंदनः—हा व्रजभाखा कवी; याच्या समस्येच्या उत्तरांत जयरामानें बालकृष्ण वर्णन केलें आहे; शहाजीचा उल्लेख नाहीं.

( ३९ ) ठाकूर चतुरदः–यानें शहाजीच्या वर्णनपर यमकबद्ध सवायी करण्यास जयरामास सांगितलें. शहाजीनें हातीं फिरंग धरली कीं, फिरंग्याच्या ( पोर्तुगीज लोकांचा ) चेहऱ्याचा रंग उतरतो, असें जयरामानें वर्णन केलें आहे.

( ४० ) लछीरामः–लछीराम म्हणजे लक्ष्मीराम; याच्या समस्येच्या पूर्तींत शहाजीच्या कीर्तीचें काव्यमय वर्णन कवीनें केलें आहे. तींत ऐतिहासिक भाग नाहीं.

( ४१ ) श्याम गुसाईः–याच्या समस्येच्या समाधानांत शहाजीच्या शत्रूवर व त्यांच्या बायकांवर जयरामानें कांहीं काव्यकोट्या केल्या आहेत; ऐतिहासिक भाग नाहीं.

( ४२ ) ठाकूर शिवदासः–याच्या समस्येच्या पूर्तींत जयराम कवीनें शहाजीच्या शत्रूच्या बायकांवर कांहीं काव्यकोट्या केल्या आहेत; ऐतिहासिक भाग नाहीं.

( ४३ ) केहरीः–म्हणजे केसरी; याच्या समस्येच्या उत्तरांत शहाजीच्या किर्तीचें काव्यमय वर्णन जयरामानें केलें आहे. ऐतिहासिक भाग नाहीं.

( ४४ ) नारायणभट्ट गुरुः–शहाजी जर आपल्या बाजूला मिळेल तर आपल्याला फार जोर येईल, असें शहाजहान म्हणाला, या बाबीवर कवित्व करण्यास नारायणभट्टानें जयरामास सांगितलें; त्याच्या उत्तरांत जयरामानें कोटी करून, उत्तरेस शहाजहान व दक्षिणेस शहाजी हे उभयतां देशाचें संरक्षण करीत आहेत, असें दिग्दर्शित केलें; "इत शहाजू है उत शहाजहां है" ही तत्कालीन सर्वत्र प्रचलित असलेली म्हण जयराम कवीनें या वेळीं आपल्या काव्यांत गोंवून दिली आहे; यावरून इ० सन १६५०च्या सुमारास शहाजीचें केवढें प्रस्थ वाढलें असावें, याची कल्पना करितां येते. त्याप्रमाणेंच दुसऱ्या एका काव्यांत, "शहाजीनें एका युद्धांत आपल्या तरवारीनें समोर चालून आलेल्या हत्तीची सोंड उतरल्याचें वर्णन केलें आहे, त्यावरून शहाजीची हिंमत, ताकद व मर्दानीबाणा, यांचें योग्य अनुमान बांधितां येतें.

( ४५ ) गयंद कवीः–नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ४६ ) द्वारकादासः—याला शहाजीनें एक खास घोडा बक्षीस दिला होता; हा जातीचा वैश्य होता.

( ४७ ) देवकाशीकर:—याला शहाजीकडून वर्षासन होतें.

( ४८ ) शेषव्यास काशीकर—यालाहि शहाजीकडून वर्षासन होतें. देव व शेषव्यास वगैरे काशीकर विद्वानांचा, व भोंसल्यांचा संबंध केवळ शिवाजीच्या वेळीं नव्यानें घडून आला असें नव्हे; तर शहाजीमहाराजापासूनच काशीकर विद्वानांचा बडेजाव भोंसल्यांच्या दरबारीं होत आला आहे. व स्वदेशीं, व परदेशीं हजारों विद्वानांना शहाजीकडून वर्षासनें पोहोंचत असत, असें जयराम कवीनें वर्णन केलें आहे.

( ४९ ) बलिभद्र कविः—याला शहाजीनें हत्ती दान दिला होता. याच्या समस्येस उत्तर देतांना मीरजुम्ला याच्यावरील स्वारीचें विस्तृत वर्णन जयरामानें केलेलें आहे. आणि शहाजीनें त्यास गुत्तीच्या किल्ल्यांत कोंडून सडकून चोपला. मीरजुम्ला हा अत्यंत श्रीमंत असून पराकाष्ठेचा कवडीचुंबक होता; तो अखेरीस लाचार होऊन शहाजीस शरण आला. दिल्लीश्वराचा पुत्र जो अवरंगजेब, त्याचें पाठबळ होतें, तरीसुद्धां शहाजीपुढें त्याला मान वाकवावी लागली; व या विजयामुळें, शहाजीची चोहोंकडे कीर्ती झाली, अशा आशयाचें त्यानें कवित्व केलें आहे. या स्वारीची हकीकत शहाजीच्या चरित्रांत दिली असल्यानें ह्या ठिकाणीं तिची द्विरुक्ती केली नाहीं.

( ५० ) सुखलालः—मीरजुम्ला याच्यावरील स्वारीनंतर शहाजीनें विजयानगरकर रायलू याच्यावर स्वारी केली; व जंतकल येथील युद्धांत रायलूची सर्व फौज धुळीस मिळविली; व विजयानगरच्या राजानें क्षत्रियत्वाची लाज सोडून समरभूमींतून पलायन केलें, ही वार्ता ऐकून, "शहाजीची कीर्ति सर्व राजांहून श्रेष्ठ झाली, सर्वतोमुखी झाली; गुणीजनांना तो कर्ण किंवा भोज यांचा अवतार भासला, व त्यांनीं त्याला 'शिसोदे कुलावतंस' ही पदवी दिली;" असें कवीनें वर्णन केलें आहे. ( शिवाजीला पुढें "क्षत्रिय कुलावतंस" ही पदवी विद्वानांनीं दिली, तिच्या फार पूर्वीं शहाजीला शिसोदे कुलावतंस ही पदवी कवींनी दिलेली होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें

आहे. ) तो पुढें म्हणतोः—शहाजीची छाप गोवळकोंडा व श्रीरंगपट्टण या प्रांतावर बेमालुम बसली, व कर्नूळ वगैरे कर्नाटकांतील बहुतेक प्रांत शहाजीच्या हातीं आले. ह्या कालीं महंमद अदिलशहाची सर्व भिस्त शहाजीमहाराजावर होती. शहाजीजवळ ह्या काळीं साठ सत्तर हजार फौज असून अफझलखान महम्मदशाही हा अदिलशाही सरदार व शहाजहान हे त्याला वचकून असत. मोंगलाला सरहद्दीपलीकडे हांकून देऊन, सर्व दुष्मनांना जमिनदोस्त करून, व कर्नाटकांतील सर्व जमिनदार वठणीस आणून शहाजीनें महंमदशहाचें इतकें प्रेम संपादिलें कीं, तो सांवतराय या मुत्सद्यापाशीं वारंवार म्हणे कीं, " मेरी बादशाही शहाजीनें राखी है." ! ( या सांवतरायाच्या द्वारा शहाजी महंमदशहाशीं पत्रव्यवहार करीत असे. ) शिवाय कोणाच्याही हांतून झालें नाहीं तें कर्नाटक जिंकण्याचें काम शहाजीनें केलें, असेंही महंमदशाहानें उद्गार काढिले; व सेतुबंध रामेश्वरापासून रुमशामपर्यंत शहाजीच्या पराक्रमाची राय पसरून गेली. त्यानंतर कवीनें पिन्गोंडा उर्फ पेनकोंडा प्रांतावर शहाजीनें केलेल्या स्वारीचा उल्लेख केला आहे. तालीकोटच्या ( राक्षस तागडीच्या ) युद्धानंतर विजयानगरचे राजे पिन्गोंड्याच्या किल्लयांत रहात असत, व त्या कालीं तो किल्ला कर्नाटकांतील दुर्भेद्यातील दुर्भेद्य म्हणून मानला गेला होता; तो शहाजानें मोठ्या मर्दुमकीनें हस्तगत करून घेतला, ( व त्यानंतर तेलीचरी प्रांतावरही स्वारी केली; ) पण त्याचें श्रेय आदिलशहाच्या दरबारीं त्याला न मिळतां त्याच्या बरोबरील दुसरा सरदार यखलासखान यांस मिळालें, असें कवी म्हणतो ! म्हणजे याचा अर्थ काय ? अर्थ एवढाच कीं, मनुष्य कितीही शूर असो, पराक्रम करो, कर्तबगार असो, धाडसाचें कृत्य करो, परंतु जोंपर्यंत तो दुसऱ्याचा नौकर म्हणून मिरवितो, तोंपर्यंत त्याचें तेज परप्रकाशितच राहतें; व त्याच्या पराक्रमाचें सर्व श्रेयही त्या दुसऱ्याच्याच नांवाला जाते. बापाची ही मानहानीकारक गुलामगिरी पाहून शिवाजीनें प्रथमपासूनच कोणाची ताबेदारी न स्वीकारतां तो स्वतंत्र बाण्यानें वागूं लागला, हेंच शहाजी व शिवाजी यांच्या मधील वैशिष्ट्य आहे.

( ५१ ) अल्लीखानः—मुसलमान कवी; या कवीच्या समस्येस उत्तर

देतांना जयरामानें शहाजीच्या अलंगगडवरील स्वारीचें वर्णन मोठ्या बहारीनें केलें आहे. हा कवि पूर्वपरिचित नाहीं.

( ५२ ) बालकविः—– नांव दिलें नाहीं.

( ५३ ) रघुनंद रामानुजः—–नांवाचा पूर्वपरिचय नाहीं.

( ५४ ) जदुरायः—–या कवीनें शहाजी, व त्याचा रक्षा पुत्र संताजी यांची स्तुती गायली आहे; व नंतर जयरामानें दरबारांतील फाल्गुन मासाच्या वसंत लीलेचें वर्णन केलें आहे; नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ५५ ) दुर्गठाकूरः—हा शहाजीच्या सलगीतील कवी दिसतो; राजा ह्याला दर महिना एक होन पगार देत असे; व एकदां राजानें त्याला एक घोडा व पालखी बक्षीस दिली होती. ह्या कवीच्या सांगण्यावरून राजानें जयरामाला सत्तावीस मराठी पद्यरत्नें गुंफण्याची आज्ञा केली व ती जयरामानें आनंदानें करून तीं, व नंतर एकंदर बारा भाषांत पद्यें करून तीं, सर्व स्तुतीपर पद्यें शहाजी राजास अर्पण केलीं. पूर्वपरिचित नाहीं.

( ५६ ) सुबुद्धिरावः—हा उत्तर देशांतील ( कानपूरपासून २६ मैलांवर असलेल्या ) घाटमपूरचा राहणारा; याला शहाजीनें कांहीं दिवस आपणाजवळ ठेवून घेतलें होतें. या कवीनें उत्तर देशी भाषेंत शहाजीराजे शिसोदे यांचें स्तुतीपर वर्णन केलें आहे. नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ५७ ) ढुंढरीकविः—यानें ढुंढार भाषेंत शहाजी हा चितोडच्या राण्याचा भाऊबंद आहे, अशा आशयाचें कवित्व केलें; शहाजीच्या चरित्रांत त्या संबंधीं उल्लेख केला असल्यानें येथें द्विरुक्ती केली नाहीं; नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ५८ ) अकब्बरपूरचा कविः—यानें पूर्वी भाषेंत शहाजीचें स्तवन केलें आहे; नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ५९ ) अनामक पंजाबी कवीः—यानें पंजाबी भाषेंत शहाजीची स्तुती केली आहे; नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ६० ) हिंदुस्तानी अनाम कवीः—यानें हिंदुस्थानी भाषेंत शहाजीची स्तुती गायली आहे. नांव पूर्वपरिचित नाहीं.

(६१) फारसी कवीः–यानें शहाजीच्या स्तुतीपर फारसींत कवन केलें आहे.

( ६२ ) गुजराथी कवीः—यानें गुजराथी भाषेंत शहाजीची स्तुती केली आहे.

( ६३ ) मोरिर्‌ना भाटः—यानें बागलाणी भाषेंत शहाजीची स्तुती केली आहे; नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ६४ ) बर्गी कवीः—यानें शहाजीच्या स्तुतीपर कवन केले आहे; नांव पूर्वपरिचित नाहीं.

( ६५ ते ६८ ) मोदलराय, कोद्दा पोबराय, लालमनी, घनःशाम,ः— यांनीं शहाजीची स्तुती गायली आहे; हीं चारी नांवें पूर्वपरिचित नाहींत.

( ६९ ) विश्वंभर भाटः—कर्नाटक, कलिंग, व तेलंगण येथील राजांचा शहाजीनें पराभव केला, त्याचा स्तुतीपर उल्लेख या कवीनें आपल्या कवित्वांत केला आहे.

( ७०, ७१) बलदेव नरायन व अनंत नरायनः–हे उभयतां बंधू असावे असें दिसतें; यांनीं शहाजीची स्तुती गायली आहे; या उभयतांचीही नांवें अपरिचित आहेत.

वरील गुणी मंडळी ज्याच्या दरबारीं शक १५७५ पासून शक १५८० पर्यंतच्या पांच वर्षांत जयराम कवीनें प्रत्यक्ष पाहिली त्या शहाजी महाराजांचें ऐश्वर्य कोणत्या प्रतीचें होतें, त्याचा अंदाज कोणालाही करतां येण्यासारखा आहे; आणि प्रातरुत्थान, राजसभा, व सैन्य यात्रा, यांची जीं वर्णनें केलीं आहेत त्यावरून, त्याकालीं शहाजीचा सर्व थाट एखाद्या स्वतंत्र राज्यकर्त्या-प्रमाणें असे,ही गोष्ट अंदाजानें नव्हे, तर प्रत्यक्ष पुराव्यानें सिद्ध करता येत आहे.

थोडक्यांत म्हणजे शहाजीच्या कालांत, शहाजी हा एक अलौकिक पुरुष होऊन गेला, असेंच त्याच्या चरित्रावरून उघड होत आहे. निजामशाही, आदिलशाही, कुतबशाही व दक्षिणेंतील मोंगली बादशाही, ह्या एकाहून एक प्रबळ शाह्यांशीं कधीं झगडून तर कधीं सख्य करून, त्यानें कर्नाटकांत सनातन धर्माचें व स्वराज्याचें पुनरुज्जीवन केलें. शहाजीचें हें स्वराज्य मांडलिकी स्वरूपांतील होतें; आदिलशाही पासून तुटून विभक्त झालेलें नव्हतें. शहाजीला ज्या परिस्थितीशीं झगडून आपल्या वर्चस्वाचें ध्येय गांठावयाचें होतें, ती

परिस्थितीच मुळी अशा प्रकारची होती, कीं त्याहून श्रेष्ठ फल जें स्वतंत्र स्वराज्य तें त्याला त्यावेळीं प्राप्त होणें किंवा प्राप्त करून घेतां येणें शक्य नव्हतें; इतकेंच नाहीं तर शहाजीनें गांठलेलें ध्येयही त्याकालीं अपवाद म्हणूनच गणण्यासारखें होतें. " सनातनधर्मी प्रबळ मनसबदार जो शहाजी त्याला मलिकंबर व मूर्तिजाशहा ह्यांनीं ज्या दिवशीं दुखविलें त्याच दिवशीं हिंदुस्थानांत सहाशें वर्षें बांधीत आणिलेल्या इस्लामच्या तटांत पहिलें भगदाड पडलें, आणि सनातन संस्कृतीवरील इस्लामच्या मगरमिठींतील पहिली गांठ मोकळी झाली. " म्हणजे शहाजीला निजामशाहीनें दुखविलें, ही पहिली चूक झाली, आणि निजामशाही, आदिलशाही, कुत्बशाही, बेरीदशाही व मोंगली बादशाही यांनीं त्यास प्रबळ होऊं दिलें, ही दुसरी चूक होऊन तिचा भला भक्कम खिळा बनला; व त्यानें ह्या सर्व शाह्यांना आपला प्रताप दाखविला. ह्या चुकीनें " नुसती निजामशाहीच खाल्ली नाहीं, तर कुत्बशाही खांकेत मारिली, आदिलशाहीचे लचके तोडिले, बेरीदशाहीचा चकनाचूर होऊं दिला, आणि शेवटीं दिल्लीची मोंगलशाही रसातळास पोहोंचविली. औरंगझेबानें शिवाजीस निसटून जाऊं देण्याची एक चुकी केली, तर त्याला सव्वीस वर्षें दक्षिणेंत वनवास भोगावा लागून शेवटीं हताश होऊन मरावें लागलें. (परंतु) शहाजीला मनसबदारी देण्याच्या (व त्याला " एक हिंदुधर्मी प्रबळ मनसबदार बनू देण्याच्या ") चुकीनें त्याहूनहि घोर धक्का इस्लामास बसला. इस्लामी राजसत्ता हिंदुस्थानांतून कायमची बाद होण्याचा मार्ग खुला झाला. " मराठ्यांच्या इतिहासांत शहाजीनें बजाविलेली श्रेष्ठ कामगिरी ही अशा प्रकारची आहे. यवनांची सत्ता खिळखिळी करून मोडण्याच्या पंथास लावण्याचें जें असामान्य कार्य शहाजीनें केलें, त्याचें स्वरूप वरीलप्रमाणें आहे; आणि शहाजीनें घडवून आणिलेल्या ह्या अलौकिक कार्यामुळें महाराष्ट्र-इतिहासांत शहाजीस शिवाजीच्या खालोखाल श्रेष्ठ स्थान प्राप्त झालें आहे.

# परिच्छेद चवथा.

## शहाजीची योग्यता.

शिवाजी आणि शहाजी या उभयतांची तुलना करितां आली तरी अनेक कारणांमुळें तींत साम्य आढळून येणार नाहीं; कारण उभयतांचाही आयुष्य-क्रम प्रारंभापासूनच भिन्न आहे. मालोजीहून शहाजीचें कर्तृत्व पुष्कळच अधीक प्रमाणांत निदर्शनास येते; आणि मराठ्यांतील विशिष्ट प्रकारचा करारी व मानी स्वभाव मालोजी व शहाजी या उभयतांच्याही ठायीं पूर्णपणें वसत असल्याचें दृग्गोचर होतें. मालोजी, शहाजी व शिवाजी यांच्या चरित्रावरून भोंसले घराण्याची कर्तबगारी, चिकाटी, दृढनिश्चय, करामत व राजकारण-कौशल्य हीं स्पष्टपणें निदर्शनास येतात. मराठ्यांच्या उत्कर्षाची पूर्वतयारी शहाजीनें केली; मराठा तितका मिळवून एका विशिष्ट कर्तव्ययोजनेंत आण-ण्याच्या कार्याचा प्रारंभ पहिल्यानें शहाजीनें केला. मलिकंबरच्या मृत्यूनंतर सतत दहा वर्षें तीन राष्ट्रांशीं कारस्थानें व सामने करून, शहाजीनें जीं अनेक साहसाचीं व शौर्याचीं कृत्यें केलीं, तीं शिवाजीस त्याच्या भावी आयुष्यक्रमांत मार्गदर्शक झालीं. शहाजीचे दीर्घ उद्योग, प्रचंड कारस्थानें व मोठमोठ्या उलाढाली, यांनीं स्वराज्याचें मूर्तिमंत चित्र नेहमीं शिवाजीच्या डोळ्यापुढें कायम ठेविलें. शत्रूशीं झगडतांना नाना प्रकारचे कष्ट सोसूनही स्वतःतील कर्तबगारीचा शहाजीस आलेला आत्मप्रत्यय शिवाजीच्या कर्तृत्वशक्तीस जोराचें चलन देण्यास कारणीभूत झाला. परंतु शहाजीचा जन्म मुसलमानी राज्यांत झाला होता; मुसलमानी राज्याच्या आश्रयानें त्याचा उत्कर्ष झाला होता; व मलिकंबरच्या मृत्यूनंतर त्यानें स्वतः पुढाकार घेऊन ज्या अनेक उलाढाली केल्या- जीं अनेक धाडसाचीं व पराक्रमाचीं कृत्यें केलीं—तीं स्वराज्य संस्थापने-करितां नसून निजामशाहीचें मुसलमानी राज्य जगविण्याकरितां केलीं होतीं. तो राजे निर्माण करणारा होता; पण तें स्वराज्यांत नसून मुसलमानी राज्यांत निर्माण करणारा होता. शहाजीचें कर्तृत्व व पराक्रम हीं मुसलमानी राज्यांच्या कल्याणाकरितां होतीं. शहाजीनें आपल्या जन्मभर कष्ट करून, मुसलमानी

राज्यांची भर केली होती; जन्मापासून मुसलमानी अमलाच्या वातावरणांत सारखा वाढत गेल्यानें मुसलमानी धर्म व समाज यांच्याबद्दल त्याच्या मनांत वैषम्य अथवा वैरभाव नव्हता. निजामशाही व अदिलशाही राजघराण्यांवर त्याची विशेष्य भक्ती होती; तो व त्याचा भाऊ शरीफजी या उभयतांची हीं नांवें पिराच्या नांवावरून ठेविलेलीं होतीं. इ० सन १६५६ मध्यें महंमद अदिलशहा मृत्यू पावला त्यावेळीं शहाजीनें मुसलमानांचे अशौचविधी मनापासून पाळिले होते. सारांश, शहाजी स्वराज्याचा संकल्पक होता, तरी तो स्वतंत्र स्वराज्याचा संस्थापक नव्हता. मुसलमानी राज्यवृक्षाच्या छायेंतील स्वराज्याचा तो संकल्पक व संस्थापक होता; आणि जरी इ० सन १६२६ पासून इ० सन १६३६ पर्यंतच्या दहा वर्षांत त्यानें निजामशहाच्या नांवानें कारभार चालविला तरी वस्तुतः त्यावेळीं मुसलमानी राज्यवृक्षाच्या छायेंतील तें एक स्वराज्यच असून शहाजी हाच निजामशाहीचा पूर्ण स्वतंत्रपणें कारभार चालवीत होता. शहाजीनें राज्य संस्थापनेचा प्रयोग केला; पण तो वरील स्वरूपाचा होता; त्यांत व्यापक दृष्टी, अथवा राष्ट्रीय विस्तृत कल्पना, यांचा अभाव होता. व हीच उणीव पुढें शिवाजीनें भरून काढिली.

तथापि शहाजीनें आपल्या प्रचंड उद्योगानें दोन अत्यंत महत्वाच्या गोष्टी महाराष्ट्राच्या प्रत्ययास आणून दिल्या; त्यापैकीं पहिली ही कीं, हातीं मुबलक द्रव्य असल्यावर देशांतील लढवय्ये लोक नौकरीस ठेवून त्यांच्या मदतीनें हिंदुस्थानांत राज्यस्थापन करणें शक्य आहे, हा जो मोठा शोध पुढें शंभर वर्षांनीं फ्रेंच सरदार डुप्ले यानें जगाच्या निदर्शनास आणिला, तो शहाजीनें स्वतः अगोदरच प्रत्यक्ष अमलांत आणिला; आणि दुसरी गोष्ट ही कीं, जरी जवळ तोफा व पायदळ नसलें तरी गनिमी काव्याच्या युद्धाचें पूर्ण ज्ञान असल्यास–गनिमी काव्यानें शत्रूची रसद मारून, कहीं काबाड लुटून व शत्रूचा मुलूख लुटून जाळून व गनिमी युद्धानें अचानक छापे घालून शत्रुसैन्याची मनुष्यहानी करून; व त्याला सारखें भंडवून सोडून–शत्रूच्या दुप्पट फौजेसही हैराण करून तिचें अतीशय नुकसान करितां येतें, व प्रसंगीं तिची धूळधाघाणही उडवितां येते, आणि स्वतंत्र व निव्वळ मराठी ( बिन शिकलेली )

[ पुढील मजकूर २०७ पृष्ठावर पहा. ]

# शहाजी राजे

## मालोजी राज भोंसल, वेरूळकर;

पत्नि, निंबाळकर घराण्यांतील, नामें दिपाबाई

|

## शहाजी राजे.

जन्म, इ० सन १५९४ मध्यें; इ० सन १६०६ पासून मालोजी राजे याच्या हातांखालीं राजकीय शिक्षण मिळण्यास सुरवात; मालोजीच्या मृत्यूनंतर त्याची सर्व जहागीर व सैन्य यांचें आधिपत्य शके १५४३ दुर्मति संवत्सरीं, ( इ० सन १६२१ मध्यें) शहाजीस प्राप्त झालें; ( बृहदीश्वर शिलालेख ). दोन लग्नें झालीं; पहिली स्त्री नामें जिजाबाई; लुकजी जाधवराव शिंदखेडकर याची कन्या; ( जन्म, इ० सन १५९५; ) लग्न इ० सन १६०४ च्या एप्रील महिन्यांत; तिचे पोटीं पुत्र दोन; नामें संभाजी व शिवाजी; संभाजी, जन्म इ० सन १६२३मध्यें, दौलताबाद येथें; मृत्यू इ० सन १६५३ मध्यें कनकगिरी येथील वेढ्यांत; दुसरा पुत्र शिवाजी. मराठा साम्राज्य संस्थापक; छत्रपति; जन्म शालिवाहन शक १५४९ प्रभव नाम संवत्सर, वैशाख शुद्ध पंचमी रोहिणी नक्षत्र, सोमवार, त्या दिवशीं उत्तर रात्रीं, ( ता० १० एप्रील इ० सन १६२७ ) जुन्नर जवळील शिवनेरी किल्ल्यांत; मृत्यू; शके १६०२, चैत्र शुद्ध १५ रविवार, ( ता० ५ एप्रील इ० सन १६८० ) रायगडावर; जिजाबाई ही, शिवाजीचा राज्याभिषेक स्वनेत्रांनीं अवलोकन केल्यानंतर बारा दिवसांनीं जेष्ठ वद्य नवमी, शके १५९६, ( ता० १८ जून इ० सन १६७४ रोजीं ) रायगडाच्या पायथ्याखालीं असलेल्या पांचाड या खेडगांवीं मृत्यू

[ वंशावळ पुढें चालू ]

पावली. शहाजी राजे याची दुसरी स्त्री नामें तुकाबाई; ( संभाजी मोहिते याची कन्या; ) प्रसिद्ध आदिलशाही सरदार बाजी मोहिते, "अमीरराव" पोगरवाडीकर याची बहीण; लग्न इ० सन १६३० मध्यें विजापूर येथें; तिचे पोटीं एक पुत्र; नामें एकोजी ऊर्फ व्यंकोजी राजे; तंजावरच्या राज्याचा संस्थापक; शहाजीनें इ० सन १६३६ पर्यंत निरानिराळीं प्रचंड कारस्थानें करून निजामशाही जगविण्याचा प्रयत्न केला; व त्यानंतर इ० सन १६३८ मध्यें आदिलशाही नौकरींत दाखल झाला. इ० सन १६३८–१६४७ पर्यंत कर्नाटक प्रांतांत त्यानें आपलें राजकीय महत्व, व आदिलशाही स्थापन केली; इ० सन १६४८ मध्यें त्यास बाजी घोरपडे यानें दग्यानें पकडलें, व विजापूर येथें त्यास कारागृहवास घडला; इ० सन १६४९ मध्यें बंधमुक्तता झाली; व कर्नाटकमध्यें परत गेला; व त्याच वर्षी आदिलशाहाच्या हुकुमानें विजापूर येथें येऊन, अजमासे चार वर्षें तेथें राहिला; व इ० सन १६५३ मध्यें, पुन्हां कर्नाटक प्रांतीं परत गेला; त्या वेळेपासून इ० सन १६६१ पर्यंत कर्नाटक प्रांतीं मुक्काम; व विशेष महत्व स्थापना; इ० सन १६६१ मध्यें, आदिलशाहाच्या आग्रहावरून, शिवाजीची भेट घेण्यास कर्नाटक प्रांतांतून निघून महाराष्ट्रांत आला; व शिवाजीची भेट घेऊन, तो व आदिलशाहा यांच्यामध्यें तह घडवून आणला; ( इ० सन १६६२ ). तो इ० सन १६६३ मध्यें, परत जाण्यास निघून, पहिल्यानें विजापूर येथें जाऊन, अली अदिलशाहास भेटून कर्नाटक प्रांतीं परत गेला; याच वर्षी मार्च महिन्यामध्यें अली आदिलशाहा स्वतः कर्नाटकच्या मोहिमेवर जाण्याकरितां विजापूर येथून निघाला; व तुंगभद्रा नदीस मिळणाऱ्या वर्धा नदीच्या कांठीं त्याचा तळ असतांना, त्याच्या "आपणांस ताबडतोब येऊन भेटा;" या हुकुमाप्रमाणें, शहाजी त्यास जलदीनें प्रवास करीत येऊन भेटला; तेव्हां बहलोल व शहाजी या उभयतांही सरदारांना, त्यानें ताबडतोब पकडून त्यांना बेड्या घालून प्रतिबंधांत ठेविलें; ( इ० सन १६६३;

[ वंशावळ पुढें चालूं ]

जून महिन्याच्या अखेरीस;). परंतु दोनच दिवसांनीं त्यानें शहाजीची प्रतिबंधांतून मुक्तता केली. व कित्येक दिवसांनंतर त्यास पुन्हां अधिकारापन्न करून, पुढें लवकरच शहानें त्याचा जाहीररीत्या योग्य गौरव केला; व त्याची पुन्हां कर्नाटक प्रांतीं आपल्या जहागिरीवर परत रवानगी करून दिली. नंतर बेदनूरकर भद्राप्पा नाईक याच्याबरोबर युद्ध करून त्यांत फत्ते मिळविली; " हें वृत्त विजापुरीं कळल्यावर आदिलशाहा बहुत संतोषी होऊन मोठे मरातबांनीं पत्र, वस्त्रें, भूषणें, अलंकार, हत्ती घोडे सुद्धां पाठवून सर्व अमीर उमराव यांनीं तारीफ करून आपापली हकीकत स्नेह वादाची लिहून गौरव केला; शहाजी राजे याची फत्ते झाल्यामुळें तेथून कूच करून दुसरीं ठाणीं बखेडेदार होतीं, त्यांचा बंदोबस्त करावा, म्हणून तुंगभद्रातीरीं बेदिकरें उर्फ बसवपट्टण येथें आले; तेथें अनेक श्वापदें उत्पन्न झालीं. शहाजी राजास शिकार करावयाची इच्छा होऊन, घोड्यावर स्वार होऊन हरणाचे पाठीस लागले; ईश्वरेच्छा,त्या योगें घोडयाचा पाय भेंडोळींत अडकून घोडा व शहाजी राजे, एकावच्छेदें पडले; त्यांत डोक्याच्या कवटीस जखम होऊन राजे गतप्राण झाले; ( शके १५८५ माघ शुद्धषष्ठी, शनीवार रोजीं; इ० सन १६६४, जानेवारी; ). मागाहून लोक माणसें आलीं; व्यंकोजी राजे जवळ नव्हता;सबब भडाग्नि दिला; व्यंकोजी राजास डाकेने तेथें आणविलें;त्यांनीं उत्तर क्रिया सांग केली; आदिलशाहाकडून दुखवटा येऊन मनसबदारीचीं वस्त्रें व्यंकोजीच्या नांवें झालीं. शिवाजीस वृत्त कळून जिजाबाई सुद्धां शोकसमुद्रीं पडून बहुत विलाप केला; " जिजाबाई सती जाण्यास सिद्ध झाली; तेव्हां " शिवाजीनें तिचे मांडीवर बसून, गळां मिठी घालून आण घालून, राहविली; आपला पुरुषार्थ पहावयास कोणी नाहीं, तूं जाऊं नको, असें म्हणून मोठा यत्न करून ( शिवाजी ) राजियांनीं, व सर्व थोरथोर लोकांनीं राहविली; "शिवाजीस शहाजीची निधन वार्ता कळल्यावर त्यानें सांप्रदायाप्रमाणें सिंहगड येथें शहाजी राजे यांची उत्तर

[ वंशावळ पुढें चालू ]

क्रिया केली;प्रीतिश्राद्धादि विधी यथासांग करून लक्ष भोजनें घातलीं; पुष्कळ दानधर्म केला; शहाजी बेदनूर प्रांतीं बेदिकेरें ऊर्फ बासवापट्टणजवळ तुंगभद्रेच्या कांठीं,अरण्यांत घोड्यावरून पडून मृत्यू पावला; त्या ठिकाणीं शिवाजीनें पुष्कळ संपत्ति खर्च करून आपल्या वडिलांची छत्री बांधिली; येथें पुष्कळ दानधर्म केला; या छत्रीच्या पुजेसाठीं शिवाजीनें यरगटनहळ्ळी, हें गांव विजापूरकराकडून मागून घेऊन तें छत्रीस इनाम करून दिलें; शिवाजीनें केलेल्या ह्या व्यवस्थेप्रमाणें शहाजी राजे याच्या ह्या छत्रीसन्निध–ह्या वीर पुरुषाच्या आत्म्याच्या शांतवनाकरितां, व सन्मानाकरितां–पुष्कळ वर्षें नंदादीप जळत असत; परंतु आतां तर ही छत्री अगदींच मोडकळीस आलेली असून तिचे अवशेषच मात्र हल्लीं कायते आस्तित्वांत राहिले आहेत.

[ मागील मजकूर २०२ पृष्ठावरून चालु. ]

फौज लहान असली तरी तिला मोंगलासारख्या जबरदस्त शत्रूच्या मोठ्या सैन्यापुढें टिकाव धरितां येतो, व प्रसंगीं त्या सैन्याबरोबर टक्करही देतां येते, हें त्यानें कृतीनें प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविलें. म्हणजे मोंगलांच्या अमोघ सामर्थ्याचा बागूलबोवा त्यानें जमीनींत कायमचा गाडून टाकिला; आणि त्यामुळेंच, त्याच्या ह्या असामान्य कृत्यापासूनच पुढें स्वतंत्र मराठी राष्ट्रसंस्थापनेची कल्पना आविर्भूत झाली.

वरील विवेचनावरून शहाजीची योग्यता सहज निदर्शनास येते; ( मराठी रियासत पान २७७–२८३ पहा. ) " त्याचा पुत्र शिवाजी हा तर स्वतःच राज्यकर्ता झाला; परंतु शहाजी हा त्याचे खालोखालचा राज्याची घडामोड करणारा, हातांत धरीन त्यास राज्यपद देईन, अशा हिंमतीचा बाणेदार सरदार होता. शौर्य, उत्साह, धाडस हे गूण त्याच्या अंगीं वसत होतेच, तथापि त्याचा विशेष गूण म्हटला म्हणजे धन्याची नोकरी एकनिष्ठपणानें बजावणें, हा होय. निजामशाहीची नौकरी करितांना त्याजवर अनेक संकटें

आलीं; पण त्यास न जुमानितां त्यानें तेथची तड पोंचविली. पुढें विजापूरची नौकरी धरल्यावरसुद्धां त्याच्या चित्तास स्वस्थपणा प्राप्त झाला नाहीं. त्याजवर अनेक संकटें आलीं; व अनेक भानगडी उत्पन्न झाल्या. पुत्रास सामील आहे, अशा सबबीवर त्यास कैदेंत पडावें लागलें. तथापि सर्व संकटांपासून मुक्तता होऊन त्याच्या एकनिष्ठपणाविषयीं दरबारची खात्री झाली. आदिलशाहींची सत्ता कर्नाटक प्रांतावर बसविण्यास या पूर्वी पुष्कळांनीं खटपट केली होती; परंतु तें बिकट कार्य अखेरीस शहाजीनेंच तडीस नेलें. कनकगीर, तंजावर, व बेदनूर येथील त्याचे पराक्रम स्मरणीय आहेत. ह्या त्याच्या पराक्रमाची तपशीलवार हकीकत आतां उपलब्ध आहे. आणि मुलाच्या वाढत्या कीर्तीपुढें त्याची कर्तबगारी अखेरीस थोडीशी लोपून गेली; नाहींतर निजामशाही सोडल्यापासून पुढील पंचवीस वर्षें त्यानें पहिल्या इतकाच पराक्रम गाजविला, असें दिसून येतें. शहाजीस मुसलमान सरदारांचें पाठबळ असून, त्याच्या स्वामिभक्तीबद्दल सर्वांची खात्री होती; म्हणूनच त्याच्या हातून मोठमोठीं कृत्यें शेवटास गेलीं. मुसलमान इतिहासकारांनीं शहाजीविषयीं असे उद्गार काढिले आहेत कीं, "शिवाजीचा बाप शहाजी हा बंडखोर, फंदफितुरी, व संकटें उभीं करणारा होता; परंतु तोही अलीकडे धन्याचें खाल्लेलें मीठ स्मरून इमानानें व नम्रतेनें वागूं लागला. यामुळें शहाजीनें राहिलेलें आयुष्याचे दिवस धन्यास ओळखून सुरक्षितपणें घालविले" एकंदरींत शहाजीचें विजापूरकरांवर अत्यंत प्रेम होतें. त्यानें शिवाजीचा विजापूरकरांशीं तह जुळविला. तेव्हां, "मी जिवंत असेपर्यंत तरी विजापूरकराविरुद्ध उठूं नकोस" असें शहाजीनें पुत्राजवळ मागणें मागितलें होतें. शिवाजीच्या अडदांड कृत्यांबद्दल आरंभीं शहाजीस वाईट वाटत असे; तरी शिवाजीची खरी कर्तबगारी ओळखिल्यावर त्याजविषयीं शहाजीचे मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झालीच होती. शहाजीची व शिवाजीची भेट झाली, त्या वेळीं आपले पश्चात् व्यंकोजीचें पालन करण्याविषयीं शहाजीनें शिवाजीस सांगितलें असावें; कारण तंजावरीं "परत गेल्यावर व्यंकोजीस बोलावून त्यानें आज्ञा केली कीं, शिवाजीनें जवांमर्दीनें नवें राज्य मेळविलें आहे. तुम्ही आमची दौलत संपादिली आहे, यांत विठोजीराजे

आमचे काका, यांचें कुटुंबाचे व शरीफजी राजे आमचे भाऊ, यांचे वंशाचे तुम्हीं वडीलपणें चालवावें, आणि प्रजापालन करून राज्य करावें. वडील शिवाजीराजे यांनीं सर्वांचें संगोपन करून चालवावें, तरी त्यांनीं पृथ्वी आक्रमण करण्याचा इरादा धरिला. तेव्हां ईश्वर कृपेंकरून त्यांचें मनोरथ परिपूर्ण झाले असतां, सर्वांचें संगोपन करावयास अधिकारीच आहेत; करतील; कदाचित् त्यांजवरी समय गुदरला, तरी आम्ही पातशहापासून इतल्ला तोडून, दौलतीचा बचाव करून घेतला आहे ही दौलत तुम्हां उभयतांची म्हणजे (व्यंकोजी व शिवाजी यांची) परंतु दौलत रक्षावयाकरितां तुम्हीं वडीलपणें सांभाळ करावा. मुख्यार्थ आमचें कुळीं आम्ही, आमचें कुटुंबांत शिवाजीराजे जेष्ठ, त्यांचे ठायीं तुम्हीं; त्यास राजधर्म प्रवाहें तुम्हीं वडीलपणें कुटुंबियांचा सांभाळ करणें; पराक्रमी शिवाजी राजांचे तुम्हीं भाऊ; आमचे चिरंजीव; त्यांहून आवडते विशेष अहां; तरी सर्वांपासून चांगलें म्हणून घ्याल, पदरीं वडिलोपार्जित दोनचार माणसें आहेत, त्यांचें विचारें तुम्हीं चालल्यास तुमचें कल्याण आहे." ( शिवदिग्विजय; पान २०४–२०५ पहा. ) असा शहाजीनें व्यंकोजीस उपदेश केला; हा उपदेश ध्यानांत ठेवण्याजोगा असून पुढें– शिवाजीनें व्यंकोजीजवळ आपला हिस्सा मागितला त्या प्रसंगीं–त्याचे कामीं पडणार आहे.

"शहाजी हा मुत्सद्दीपणांतही फार नामांकित होता;–अतीशय पटाइत होता; व मलिकंबरच्या सहवासांत राहून गनीमी युद्ध, व मुत्सद्दीपणा यांत तो पूर्ण निष्णात बनलेला होता.–एवढेंच नव्हे तर सतराव्या शतकाच्या प्रथमार्धांत राज्याचा कारभार हांकणारे शहाजीच्या तोडीचे पुरुष फारसे नव्हते. यांस प्रमाण, साबाजी अनंत, अथवा चतुर साबाजी म्हणून जो त्याचें वेळीं नांवाजलेला पुरुष होता, त्याची व शहाजीची स्पर्धा पुष्कळ दिवस चालू असून शहाजीनें चतुर साबाजीस मागें टाकिलें होतें, असें दिसतें. कित्येक बखरीमध्यें असें लिहिलें आहे कीं, निजामशाहीच्या अखेरीस राज्यांत दोन पक्ष झाले; एका पक्षास जाधवराव, फत्तेखान, मलिकंबर, व चतुर साबाजी हीं मंडळी असून दुसऱ्या पक्षास शहाजी होता. निजामशहानें वरील चारही मंडळीस बाजूस सारून शहाजीच्या हातीं सर्व कारभार दिला. त्याजबद्दल

साबाजीस विषाद वाटून त्यानें मोंगलांकडें संधान बांधून, त्याचे पदरीं जाधवरावास ठेविलें, आणि मोंगलांच्या मदतीनें शहाजीचा पाडाव केला. ह्या भानगडीं चालू असतांच साबाजी मरण पावला, असा उल्लेख आहे. कित्येक बखरींमध्यें असा उल्लेख आहे कीं, चतुर साबाजी हा अदिलशाहीतील प्रसिद्ध मुत्सद्दी मुरार जगदेव ह्याच्या तालमेंत तयार झालेला होता. ज्यावेळेस निजामशाहामध्यें कोणी कर्तबगार मुत्सद्दी उरला नाहीं; तेव्हां साबाजीस निजामशहानें विजापूरकरांकडून विशेष आर्जव करून मागून घेतलें. त्याच्या कर्तबगारीबद्दल बखरींतून खालीं लिहिल्याप्रमाणें उल्लेख आढळतो तोः—"साबाजी अनंत कारभारी बहुत चतुर, गुणज्ञ, सर्व कला निपुण, विद्वान्, सव्यापसव्यांत (म्हणजे दोन्हीं हातांनीं) लिहिणार, धुरंधर, कोणत्याही गोष्टींत उणे नाहीं, असें दक्ष होते. त्यांनीं संपूर्ण दक्षिण प्रांत, हजरतीची अंमल, तितक्याची नजर पाहणी केली; तें समयीं विघोटीची काठी सात हात, पांच हात, त्याजवरील दस्त काय, हकदाराचा अंमल किती, सरकारी कानू कायदे काय, रयतेस सूट कशी असावी, अर्जबाब कशी द्यावी, व्यापारी, उद्मी, यांनीं सरकारी भरणा कोणता करावा, त्याची बरदास्त कोणती ठेवावी, इत्यादि धारे बांधून, वसाहत पडित रानाची लागणी करून दिली; याजमुळें त्यासच चतुर साबाजी म्हणत होते; त्यांचा मगतब पादशहाजवळ फारच फार; केवळ विश्वासांतील वागणार;" "साबाजी पंतानी कारभाराचा अटोप दौलतीचा केला; साबाजीपंत मर्द, शहाणे, नेकदार, रयतेचा वगैरे बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला;" "साबाजीपंतांनीं लावणीचे धारे व जमीन मोजणी वगैरे शिरस्ते केले; अद्यापि प्रसिद्ध वागतात; रयतेवरी जुलूम न करितां राजी राखून दोन रुपये घ्यावें. नापीक जालें तरी सोडावें; कोणास बैल अगर पोटास नसेल, तर त्याचा बंदोबस्त करून द्यावा. अशा रीतीनें आबादी अमरपुरीप्रमाणें उघड मार्गें सावकारी व्यापार करावा. वस्त्रे, भूषणें, अलंकार, ग्रहण करावें; बेपडदा शहरांत व मार्गांत फिरावें. सुतळीचा तोडा गमाविला तरी ज्यांस सांपडेल त्यांनीं ज्या हद्दींत असेल, तेथील जमीनदाराचे हवालीं करावा. ज्याचा जो विषय गेला, तो शोधींत असतां, त्याजला द्यावा;

अभिलाष करूं नये; वर्षे सहा महिने जाले, न आला तरी सरकारांत दाखल करावा. यांत तफावत कोणी केल्यास त्याचें पारिपत्य करावें." याप्रमाणें नियम साबाजीपंतांनीं अमलांत आणिलें. ( शिवप्रताप; पृष्ठ २८ पहा. ) हा चतुर साबाजी शहाजीचे वेळचा असून तो मुरार जगदेव, व मलिकंबर, यांच्या तालमेंत तयार झालेला होता. त्याचें अनुकरण शहाजीनें केलें, आणि शहाजीच्या अनुषंगानें दादोजी कोंडदेव, नारोपंत हणमते व शिवाजी यांनां ह्या मुत्सद्दीगिरीचा पुढें चांगला उपयोग झाला. सारांश, शहाजी हा राज्यकारभारात निपुण व युद्धकलेंत निष्णात शूर असा पुरुष होता. मराठा मंडळीस राज्यकारभार समजत नाहीं, असें विधान करणारांनीं शहाजीचें उदाहरण पहावें."

"लोकाभिमान व शौर्य वगैरे जे गुण पुढें शिवाजीच्या अंगीं पल्लवित झाले, ते शहाजीमध्यें अंकुरावस्थेंत होते; आणि निजामशाहीच्या तर्फे झगडतांना त्यांचा प्रादुर्भाव झाला होता. मुसलमानी राजघराण्यांवर शहाजीची भक्ति मूळपासूनच विशेष होती. त्याचें स्वतःचें नांव शहाजी व भावाचें शरीफजी, हीं पीरावरून ठेविलेलीं होतीं. सन १६५६त अदिलशहा मरण पावला. त्या वेळेस मुसलमानांचे अशौचाविधि शहाजीनें मनापासून पाळिलें. तो मोकळ्या मनाचा, निष्कपटी, व शूर पुरुषाप्रमाणें कित्येक वेळां प्रसंग पाहून वागण्यांत कुशल नव्हता; परंतु या गोष्टात शिवाजी बापाच्या उलट स्वभावाचा होता. शिवाजी धूर्त, होतां होई तों समोरासमोर लढण्याचा प्रसंग न आणितां कार्यभाग उरकून घेणारा होता. शिवाजी मधुर, परंतु मित भाषण करणारा असून शत्रूचेंही मन तेव्हांच गार करून सोडी. ती विद्या शहाजीस माहीत नव्हती. सारांश, शिवाजीसारख्या पराक्रमी पुत्रास शोभणारा बाप शहाजी होता, यांत संशय नाहीं."

"शहाजीचें खरें कर्तृत्व, निजामशाहींत इ. स. १६३३ च्या पुढें दिसून आलें. निजामशाही मोंगलांच्या हातांत सन १६३३ त पडली असतां, चार वर्षेपर्यंत शहाजीनें मोंगलांस जुमानिलें नाहीं. इ. स. १६०० मध्यें अकबर बादशहानें निजामशाही जिंकून विजयोत्सव केला; पण तो व्यर्थ होता, हें जसें मलिकंबरानें दाखविलें, तसेंच इ. स. १६३३ त शहाजीनें शहाजहान दशहासही दाखविलें. पण इ. स. १६०० तील निजामशाहींतील शक्ति व

सन १६३३ तील शाक्ति यांत महदंतर असल्यामुळें शहाजीस यश आलें नाहीं. तथापि शहाजीची योग्यता शहाजहान जाणून होता, म्हणूनच शहाजीच्या वाटेस तो पुढें गेला नाहीं. सारांश, मलिकंबर प्रमाणेंच शहाजीचा लौकिक त्यावेळीं चहूंकडे झाला होता. आदिलशहास त्याचा गौरव व दरारा दोनही वाटत होते. गौरव वाटत असल्यामुळें, शहाजीच्या शक्तीचा–कर्तबगारीचा–अदिलशहानें आपल्या कामाकडे उपयोग करून घेतला, व कर्नाटकांतील बंडाळी मोडली. दरारा वाटत असल्यामुळें, त्यास त्यानें स्वतंत्र राहूं दिलें नाहीं. कारण शहाजी स्वतंत्र राहता, तर जें काम पुढें शिवाजीनें केलें त्याचा उपक्रम शहाजीच्याच हातून उघडपणें झाला असता. स्वतः आदिलशहापेक्षां त्याचे सल्लागार रणदुल्लाखान* व मुरारपंत यांच्या मनांत शहाजी

---

* रणदुल्लाखान हा शहाजीचा जिवलग स्नेही असून, शहाजीवर जेव्हां विजापुर येथे प्राणसंकट ओढवलें, त्यावेळीं त्यानेंच शहाजींविषयीं बादशहाजवळ रदबदली केली व त्यामुळें शहाजींवरील प्राणसंकट टळलें. या बाबतींत असा उल्लेख आढळतो कीं ( रायरी बखर पहा ) शहाजीस बाजी घोरपडे मुधोळकर यानें पकडल्यानंतर आदिलशहानें त्यास असा हुकूम पाठविला कीं, "शहाजीस विजापूर येथें न आणितां, त्यास तिकडेच ठार मारावें." ही हकीकत रणदुल्लाखान यांस कळल्यावर त्याला अतीशय वाईट वाटलें; व त्यानें शहाजीस प्राणसंकटांतून मुक्त करण्याकरितां खालील युक्ति योजिली, ती अशी कीं, रणदुल्लाखानानें संसार सोडिल्याचें मीष करून व फकीराचा वेष धारण करून तो बादशहास जाऊन भेटला; व त्यानें मक्केस जाण्याची परवानगी मागितली. रणदुल्लाखान हा विजापूरच्या राज्याचा एक आधारस्तंभ असून तो मोठा पराक्रमी सेनानायक होता. त्यामुळें अशा शूर सरदारास मक्केस जाण्याची परवानगी देऊन आपल्या राज्याचें नुकसान करून घेण्यास अदिलशहा तयार नव्हता. म्हणून त्यानें खानाचा हात धरून त्यास आपणाजवळ बसविलें; व मक्केस जाण्याचा बेत रहित करण्याबद्दल त्यास अतीशय आग्रह केला; तथापि खान कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां अदिलशहानें त्यास "तुमची काय इच्छा आहे ती सांगा, म्हणजे ती मी लागलीच तृप्त

विषयीं विशेष पूज्यबुद्धि वागत होती. इ० सन १६३७पासून मृत्युकाला-पर्यंतचा शहाजींच्या कृत्यांचा खरा इतिहास अजून उपलब्ध नाहीं. शहाजींचें सामर्थ्य शहाजहानच्या मानानें फारच अल्प होतें; आदिलशहाच्या मानानेंही फारसें बरोबरीचें नव्हतें; तरी ह्या बादशहांना दक्षिणेंतील व्यवस्था लावितांना शहाजीचा विचार करावा लागे, हें तत्कालीन इतिहासावरून स्पष्ट दिसतें. शहाजीजवळ वीसपंचवीस हजार सैन्य असल्यामुळें, दोघानाही त्याची भीती वाटत होती; सन१६३७च्या पुढें शहाजीनें मनांत आणिलें असतें व आदिलशहानें त्याला आश्रय दिला नसता, तर आदिलशाहींतील कांहीं प्रांत बळकावून बसण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं होतें; परंतु शहाजीचा स्वभाव एकदेशीय व उतावळा नसून, अव्यवस्थित पुंडपणा करण्यापेक्षां, कोणत्याही पादशहाची व्यवस्थित मनसबदारी करणें, व अब्रूनें राहणें त्याला पसंत पडलें होतें जेथें जेथें तो जाई, तेथें तेथें त्याचें वजन अतोनात वाढत असे, व त्याच्याविषयीं इतर सरदारांच्या मनांत मत्सर उत्पन्न होत असे. शिवाजींच्या

करितों" असे सांगितलें; त्यावेळीं रणदुल्लाखान म्हणाला, "आपल्या राज्यास जो कांहीं अपाय आहे, तो शिवाजीमुळें आहे; शहाजीमुळें नाहीं. शहाजीराजे कांहीं आपल्या राज्याशीं वाईट रीतीनें वागले नाहींत. कुराणांत असें वचन आहे कीं, 'चांगल्यास इनाम द्यावें व वाईटास शासन करावें' ह्या धर्मोक्ति-प्रमाणें पाहतां शहाजी राजास जी शिक्षा देण्याचें आपण फर्माविलें आहे ती शिक्षा अन्यायाची, व रद्द होण्यास पात्र आहे." रणदुल्लाखानाचें हें भाषण ऐकून आदिलशहानें शहाजीस फर्माविलेली शिक्षा रद्द केली; व "शहाजी पुढें चागलें वर्तन ठेवील," याबद्दल खानास जामीन घेऊन, शहाजीस विजापूर येथें बोलावून घेतलें, व नंतर त्याचा बहुमान करून त्याची मोठ्या इतमा-मानें कर्नाटक प्रांतीं पुन्हां परत रवानगी करून दिली; अशी हकीकत राय-रीच्या बखरींत आहे; परंतु रणदुल्लाखान हा इ. स. १६४३ मध्यें मृत्यु पावला; व खवासखान व मुरारपंत यांचा आदिलशाहानें इ. सन १६३६ मध्यें वध केला; अर्थात् ह्यावेळीं त्यांचें साह्य शहाजीस होणेंच मुळीं शक्य नव्हतें, हें उघड आहे.

उदयासंबंधीं विचार करितांना शहाजीच्या ह्या उच्च स्थितीचाही अंदाज करून घेणें अगत्याचें आहे. ( राजवाडे, खंड ४ ). सारांश, महाराष्ट्र देशांत स्वतंत्र राज्यस्थापना करण्याचें काम जरी शिवाजीच्या हांतून तडीस गेलें, तरी त्या कामाची शक्यता व तयारी हीं शहाजीच्या हांतूनच घडलीं होतीं. प्रत्यक्ष शहाजीला स्वातंत्र्य नको होतें असें नाहीं. स्वतंत्र होणें देशकार्यासाठीं जरूर आहे, प्रयत्न केल्यास तें साध्य आहे, व तें तडीस नेण्याची शक्ति आणि धमक आपणांस आहे, हे सिद्धांत शहाजीच्याच मनानें ठरविलेले असून त्याजपासून ते शिवाजीनें उचलिले. मात्र ते सिद्धांत स्वतः अमलांत आणण्याची प्रत्यक्ष खटपट शहाजीनें आपण होऊन केली नाहीं. मुसलमानी अमलाखालीं तो वाढला असल्यामुळें, उघडपणें बंड करणें त्यास योग्य वाटलें नाहीं. कदाचित् तसें त्यानें केलें असतें तर इच्छित कार्य तडीस गेलें नसतें. एकदम बंडखोर म्हणून आदिलशाहशीं उघड युद्ध करण्यांत स्वशक्तीचा व्यय त्यास करावा लागला असता. परंतु शिवाजीच्या कृत्यांस त्याची आंतून संमति असली पाहिजे असें वाटतें. स्वतःचीं धोरणें जाणणारीं कित्येक योग्य मंडळी त्यानें शिवाजीच्या मदतीस दिलीं. दहा वर्षेपर्यंत शिवाजी जे उद्योग करीत होता, ते शहाजीस समजत होतें; आणि त्याची तशी संमती नसती तर मुलाचा बंदोबस्त करण्याचे कांहीतरी प्रयत्न त्यानें केले असते. कैदेंत पडल्यावरही आपल्या सुटकेकरितां त्यानें शिवाजीस आपले उद्योग बंद करण्यास सांगितलें नाहीं; ( उलट कान्होजी जेध्यापासून शिवाजीस मदत करण्याबद्दल शपथ घेवविली; ) आणि कर्नाटकांत तर त्यानें उघड उघड स्वातंत्र्य धारण केलें होतें. अर्थात् शिवाजीनें महाराष्ट्रांत, व व्यंकोजीनें कर्नाटकांत स्वतंत्रपणें राज्य करून लौकिक मिळवावा, अशी त्याची इच्छा असली पाहिजे. मात्र मुसलमानशाही बुडून नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत मराठ्यांचें एकछत्री स्वतंत्र राज्यस्थापन व्हावें, इतकी शिवाजीची धांव शहाजीच्या मनांत नव्हती. ह्यास पूर्वपरंपरा व वयोमान हेंही कारण आहे. ज्या गोष्टी करण्यास शहाजी कचरत असे, त्या पुष्कळशा शिवाजीनें बेलाशक तडीस नेल्या; परंतु मराठ्यांचें मर्यादित राज्य उत्पन्न होऊन, आपल्या लोकांचें, व व आपल्या कुलाचें आजपर्यंतचें नष्टचर्य संपून भाग्योदय व्हावा अशी मर्या-

दित महत्त्वाकांक्षा शहाजीची असावी, यांत संदेह दिसत नाहीं. ह्याच महत्त्वाकांक्षेस शिवाजीनें साकार व साक्षात् राष्ट्रीय स्वरूप आणून दिलें. म्हणून शिवाजीला जर आपण मराठशाहीचा "संस्थापक" म्हटलें तर शहाजीला मराठशाहीचा "संकल्पक" असें म्हणण्यास हरकत नाहीं. शहाजीची खरी योग्यता व कर्तबगारी अद्यापि बाहेर आलेली नाहीं; तथापि शहाजीच्या एकंदर आयुष्यक्रमावरूनसुद्धां जरी शहाजीचें उत्तर चरित्र फारसें उपलब्ध नाहीं तरी, शिवाजीप्रमाणेंच, पण त्याच्या खालोखाल शहाजीही स्वराज्यनिर्माणकर्ता, व महाराष्ट्र स्वातंत्र्याचा उत्पादक होता, हें कोणासही अवश्यमेव कबूल करावें लागेल."

शहाजीच्या ह्या प्रचंड उद्योगापासून शिवाजीस त्याच्या स्वराज्य संस्थापनेंत व वृद्धींतही अनेक फायदे झाले. शहाजीनें निजामशाही "आपली" या भावनेनें ती जगविण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न केला; म्हणून शिवाजी स्वतः "आपण निजामशाही राज्याचे वारस आहोंत;" मोंगल अथवा आदिलशहा हे नाहींत, असें समजत असे. ( मालोजी व शहाजी हा निबंध पहा ). "प्रथम प्रथम शिवाजीला बोभाटा न करितां, व फारसें वर्दळीवर न येतां पुण्याच्या आसपासच्या प्रदेशांत आपला अंमल कसा बसवितां आला, याची उपपत्ति लावितांना त्या प्रदेशांत नुकतीच घडून आलेली राज्यक्रांति अवश्य लक्षांत घेतली पाहिजे. निजामशाही व आदिलशाही यांमध्यें निरानदीची सरहद्द होती. निरे पासून चाकण पर्यंतचा मुलूख निजामशाहीपैकीं असून तेथें शहाजीचा अंमल होता; व तो लोकप्रिय होता. अलीकडे झालेल्या वांटणींत हा मुलूख विजापूरकराकडे गेला होता. तथापि त्यांचा तेथील बंदोबस्त ढिलाच होता. शहाजीचा अंमल उठून पांच चार वर्षें होतात न होतात तोंच तेथील लोकांच्या कानावर शिवाजीचें नांव वारंवार येऊं लागलें. तो काय करितो, व करणार काय इकडे सर्वांची कौतुकपूर्ण दृष्टि वळली. या मुलाचें बरें व्हावें, याचा मनोदय सिद्धीस जावा, याला शक्य ती मदत करावी, इकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ति होऊं लागली. निरेच्या अलीकडील प्रदेश शिवाजीला सहजासहजी मिळवितां आला याचें खरें कारण हेंच होय. सिंहगड, पुरंदर, तोरणा, लोहगड, राजमाची, वगैरे मोठमोठे किल्ले या टापूंत आहेत; परंतु यांतील एकहि

किल्ला घेण्यास शिवाजीला लढाई करावी लागली नाहीं. फारसा गाजावाजा नकरितां किल्लेदारांकडे संधानें लावून तर कोठें लांच देऊन, कोठें धाक दाखवून तर कोठें फितूर करून शिवाजीला हे किल्ले आपल्या हातांखालीं घालतां आले. या किल्ल्यांत शहाजीच्या नेमणुकीचे पूर्वीचे गडकरी लोक होते, तेच विजापुरकरांनीं कायम केले होते. त्यांनीं शहाजीच किल्ले वेळ आली तेव्हां शहाजीच्या मुलाला देऊन टाकिले ! कोंकणचा मुलूख निजामशाहीपैकीं होता; तो सर करितांना शिवाजीला पुष्कळदां वडिलांची पुण्याई अशीच उपयोगीं पडली. आबाजी सोनदेव यानें कल्याणवर स्वारी केली तो एकदोन महिन्यांतच त्यानें तो सुभा काबीज करून परत आला सुद्धा ! सुभा म्हटला म्हणजे त्याचीं मुख्य जागा बरीच बंदोबस्ताची, व बळकट असते. त्या सुभ्यांत किल्ले आणि ठाणीं असतात. त्यांतून सरकारी मालमत्ता सांठविलेली असते, आणि तिच्या रक्षणाकरितां हजार दोन हजार तरी शिपाई ठेविलेले असतात. इतकें असूनसुद्धां आबाजीनें कल्याणचा सुभा हं हं म्हणतां सर केला याचा अर्थ काय ? अर्थ इतकाच कीं, तिकडील किल्ल्यांतून व ठाण्यांतून जे लोक होते, त्यातील पुष्कळ शहाजीच्या नेमणुकीचे पूर्वींचेच होते ! " सारांश. शहाजीची लोकप्रियता, युद्धकौशल्य, पराक्रम, कार्नि, व्यवहारचातुर्य, व मुत्सद्दीपणा वगैरे गोष्टी शिवाजीस त्याच्या भावी आयुष्यांत मार्गदर्शक झाल्या, यात काहींही संदेह नाहीं.

शहाजीच्या चरित्रावर रचिलेलें एक काव्य ( राजवाडे कृत " राधा–माधव विलास चंपू " हें काव्य, पहा ) नुकतेंच अलीकडे प्रसिद्ध झालें आहे, व त्याच्या प्रस्तावनेंत शहाजीच्या स्वराज्य विषयक प्रचंड खटपटी, उद्योग व कारस्थानें या संबंधीं—म्हणजे शहाजीचें धोरण, ध्येय, व साधनें या संबंधीं उहापोह केला आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं, " शहाजी हा प्राधान्येंकरून व्यवहारचतुर मुत्सद्दी होता; केवळ कल्पनातरंगावर वाहवत जाणारा शेख महंमद नव्हता. त्याच्या आधीं व त्याच्या कालीं राष्ट्र सुधारण्याचे प्रयत्न करणारे शेख × महंमद थोडे थोडके झाले नव्हते; कली मातला

× शेख महंमद हा मुसलमान साधू नगर जिल्यांतील श्रीगोंदे या गावीं होऊन गेला. हा कबीराचा अवतार होता, असें मानितात. त्यास आपल्या

सबब समाजाला दैन्य आलें, व तें भोगिल्याखेरीज गत्यन्तर नाहीं, असें रडगाणें गाऊन स्वस्थ बसणारे ऐदी किती तरी होते. " विठोबा सर्व कांहीं योग्य वेळीं नीट करील, त्याला जनतेची काळजी आहे;" असें समाधान करून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसलमानी पेहराव, मुसलमानी चालीरिती, मुसलमानी भाषा, व मुसलमानी धर्म स्वीकारून समाजाच्या यातना बंद करूं पाहणारे किती तरी हिंदू प्रांतोप्रांतीं पीर होऊन बसले होते. यवनावर रुसून, त्यांच्याशीं व्यवहार बंद करून, त्यांचें मुखावलोकन न करणारी दासोपंतादि* मंडळीही आपल्याकडून यवनांच्या पारिपत्याचें प्रयत्न करीतच होती. यवनसेवा करून जनतेचा परामर्ष घेऊं पाहणारे दामाजीपंतही+ अनेक होऊन गेले. यवनाविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळ-

---

वयाच्या सोळाव्या वर्षी उपरति होऊन तो रामभक्त बनला. त्यानें "योग संग्राम" या नांवाचा एक वेदांतविषयक ग्रंथ इ० सन १६६४ मध्यें लिहिला; व या शिवाय, वेदांत विषयावरील त्याचे आणखीही कित्येक ग्रंथ आहेत. शेख महंमदाचे अनुयायी हिंदू प्रमाणें वागतात; परंतु ते मुसलमानाशीं शरीरसंबंध ठेवितात.

* दासोपंत (जन्म इ० सन १५७८; मृत्यू इ० सन १६१५) हा बहामनी राज्याच्या काळांत एक प्रसिद्ध साधु पुरुष व कवी होऊन गेला. त्याचा बाप बहामनी राज्यांत नोकरीस होता; व सेवेत अंतर पडल्यामुळें दासोपंतास ओलीस ठेवून तो बेदर येथून परत आला होता. दासोपंत हा महान् दत्तभक्त होता. तो बेदर येथें प्रतिबंधांत असतां त्यास तेथील लोकांनीं मुसलमान करण्याचें ठरविलें; तेव्हां त्यानें श्रीगुरु दत्तत्रयाचा धांवा केल्यावर दत्तानें त्याची सुटका केली. दासोपंताचा ग्रंथसंग्रह अतिशयच मोठा आहे. व सवालाख पदार्णव, व सवा लाख गीतार्णव, एवढा त्याचा ग्रंथसमूह मराठीत असून तितकाच संस्कृतांतही आहे दासोपंत हा जोगाईचें आंबें तेथें इ० सन१६१५मध्यें मृत्यू पावला; त्या ठिकाणीं त्याची समाधी व मठ आहे.

+ दामाजीपंत ( इ० सन १४७५ ) हा बहामनी राज्याच्या काळांत एक मोठा भगवद्भक्त होऊन गेला. तो मंगळवेढें येथें कारभारावर असतां

विणारेही कांहीं वेडे निपजले. मंत्रतंत्रांनीं यवनांना स्तंभित करण्याचा कित्ये-कांचा खटाटोप होता; यज्ञयागांचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्म-रक्षण करण्यांत कित्येकांनीं सर्वस्व खर्चिलें. गोरक्षण करून प्रजेंत जोम उत्पन्न करूं पाहणारे गोरखनाथाही देशांत वावरत होते; कथा कीर्तनें व रामायणभारतें देश भाषेत बनवून देशांतील लोकांच्या अंगीं स्फुरण चढवूं पाहणारे कीर्तनकार व ग्रंथकार तर त्या कालीं शेकडोनें मोजावें लागत. असे नानाप्रकारचे बरेबुरे उपाय जो तो आपापल्यापरी करीतच होता. परंतु असले हे उपाय तीनशें वर्षें करूनही यव-नांचें काडीमात्र कोणी नुकसान करूं शकलें नाहीं. तेव्हां जो तो समाधान असें करून घेई कीं, बीं रुजत घातलें आहे, तें योग्य वेळा रुजून त्याला फळें आल्याशिवाय राहणार नाहींत. ही भविष्यवादी विचारसरणी निरुत्तर करणारी असल्यामुळें भविष्यकाळीं तिची साफल्यता अनुभवास यावयाची असल्यामुळें, व भविष्यकाळाला अंत नसल्यामुळें, ह्या आशेचा निराशा तीनशें वर्षें निघून गेलीं तरीही कधींच झाली नाहीं. अशांतला आशावादी शहाजी नव्हता. तो पक्कें जाणत होता कीं, यवनांचें राज्य आहे; तें हिंदूंच्या हत्यारांहून श्रेष्ठतर हत्यारांच्या जोरावर व जरबेवर चाललें आहे; आणि या परदेशी अल्प संख्यांक राज्यकर्त्यांत आपसांतील यादवीमुळें ऐषा-

---

इ० सन १४६८ पासून इ० सन १४७५ पर्यंत दुर्गादेवीचा भयंकर पुष्कळ पडला होता. त्या वेळीं लोकांची भयंकर अन्नान्न दशा पाहून त्याचें मन द्रवलें; व त्यानें कोणत्याही प्रकारें मागचा पुढचा विचार न करितां तेथील सरकारी धान्याचीं कोठारें लोकांकडून लुटविलीं. ही हकीकत बादशहास कळल्यावर त्यानें दामाजीस पकडून आणविलें; व त्यास विचारपूस केली. त्या वेळीं दामाजीपंतानें आपला अपराध कबूल केला. तेव्हां बादशहा त्यास शिक्षा देत असतां पंढरपूरच्या विठोबानें विठू महाराचें रूप धारण करून त्या ठिकाणीं येऊन धान्याची सर्व किंमत सरकारांत भरून दिली. दामाजीचीं कांहीं पदें व कविता त्याप्रमाणेंच दामाजीची हृदयद्रावक कथा, प्रसिद्ध आहेत.

रामोत्पन्न आलस्यामुळें दौर्बल्य निर्माण झाल्यासही त्यांच्याहून श्रेष्ठतर निदान त्यांच्याबरोबराची हत्यारें, जित लोकांनीं पैदा केल्याशिवाय, त्यांचा पाडाव होणें अशक्य आहे."

"हत्यार चोख पाहिजे, आणि तें प्रतिपक्षाच्या हत्यारांहून श्रेष्ठतर पाहिजे; या बाबीचा जाणीव शहाजीच्या ठायीं स्वकालीन अनुभवानें अत्युत्कट बाणलेली होती;...एवढी मोंगलांची अफाट व प्रबळ सत्ता; परंतु पोर्तुगीज चाच्यांनीं कितीदा तरी समुद्रावर त्यांची इज्जत घेतली; ह्याचकालीं कस्तुंतुनियाच्या तुर्कांनीं व्हेनीशियन लोकांपासून श्रेष्ठ बंदुका व तोफा आणि दारूगोळा तयार करण्याची सर्वश्रेष्ठ कला अर्धमुर्धी व उष्टीमाष्टी किंचित आपलीशी केली होती; त्या अधवट तुर्क कारागिरांना पदरीं ठेवून दिल्लीचा मोंगल व दाक्षिणेतील शहा, हत्यारें व दारुगोळा बनवून त्याच्या जोरावर देशांतील अर्धवट सुधारलेल्या टाळकुट्या हिंदूंना व परस्परांना भिवडवीत असत. हा सर्व चमत्कार शहाजी पहात होता. उत्तम कारागिर हत्यार कोठून पैदा होतें, व कोण आणून देतो, ह्याचा अनुभव जुन्नरच्या घाटाखालील कोंकणांत त्याला आला होता. दमण, दीव, वसई, गोंवा, सुरत, तेलीचरी, इत्यादि स्थलींच्या टोपीवाल्यांकडून कारागीर हत्यारें पैदा करून निजामशाही, अदिलशाही, व मोंगलाई सैन्याहून शहाजी आपली फौज जास्त कर्तबगार ठेवूं लागला. अशा तऱ्हेनें पक्ष, सैन्य, व हत्यार, शहाजीनं निर्माण केलें; आणि त्यांच्या जोरावर प्रकट स्वराज्य, प्रच्छन्न स्वराज्य, मांडलीक स्वराज्य व निर्भेळ स्वतंत्र स्वराज्य, उत्तरोत्तर स्थापित असतां वेळोवेळीं येणाऱ्या विपत्तींत दम न सोडितां पूर्वींच्याहून जास्त हुरुपानें पुढील कर्तव्य तो बजावीत राहिला. सैन्य व हत्यार यांच्यावरील त्याचा विश्वास मोठ्या विपत्तीतही कधीं ओसरला नाही. शेवटीं या साधनांच्या जोरावर आपण विजयी होऊंच होऊं, अशी त्याची बालंबाल खात्री होती; व परिणामावरून पाहतां ही खात्री साधार होती. शहाजीच्या अलौकिक निर्धाराची व दमाची ही अशी मिमांसा आहे."

शहाजी हा अशा प्रकारच्या निर्धाराचा,-निधड्या छातीचा;-दमदार, अतीशय पराक्रमी, फार शूर, पटाइत सेनानी, कसलेला मुत्सद्दी, असूनसुद्धां त्याच्या हांतून स्वराज्य संस्थापनेचें कार्य का घडून आलें नाहीं, यासंबंधीं

" शहाजी व शिवाजी " या निबंधरूपी लेखांत, एके ठिकाणी ( ता. २४ एप्रील इ० सन १९२३च्या केसरी मधील अग्रलेख पहा.) मोठें मननीय विवेचन केलें आहे ते असें आहे कीं, " श्रीशिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत स्वराज्य संस्थापना कशी केली, त्यांच्या ह्या अलौकिक कर्तबगारीस भूतकालीन वा समकालीन अशा कोणत्या व्यक्तीचे प्रयत्न साहाय्यभूत झाले, आणि श्री शिवाजी महाराजाचें लहानपणांपासून धोरण काय होतें, याविषयीं इतिहासकारांत अद्यापि एकमत नाहीं. तथापि प्रसिद्ध इतिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे यांचा " मालोजी व शहाजी " हा निबंध आणि " राधा–माधव विलास चंपू " या काव्याची प्रसिद्धी करितांना राजवाडे यांनीं त्या ग्रंथास जोडिलेली प्रस्तावना, यांच्या योगानें या विषयावर बराच प्रकाश पडला आहे. " राधा–माधव विलास चंपू " हें काव्य शहाजींच्या चरित्रावर रचिलें असल्यानें त्याच्या प्रस्तावनेंत मुख्यतः शहाजीचेंच धोरण, ध्येय, व साधनें यांचा विस्तारशः उहापोह करण्यांत आला आहे; आणि " शहाजीचा प्रयत्न कां फसला ? " याची मिमांसा करितांना, शहाजी व शिवाजी यांच्या धोरणाची व साधनाची तुलना करणें भाग पडल्यामुळें, राजवाडे यांच्या प्रस्तावनेचा एकांगीपणा नाहींसा होऊन ती सर्वांग पूर्ण बनली आहे. "

" पारतंत्र्याची शृंखला महाराष्ट्राच्या पायांत ठोकली गेल्यानंतर ती तोडून टाकण्याविषयीं किंवा निदान तज्जन्य वेदना सह्य होतील, असें करण्याविषयीं शहाजीच्या पूर्वी कसकसे प्रयत्न करण्यांत आले, व ते कां विफल झाले, याचें मार्मिक वर्णन राजवाडे यांनीं एके ठिकाणीं केलें आहे; ते लिहितातः–"शहाजीच्या आधीं, व त्या कालीं राष्ट्र सुधारणेचे प्रयत्न करणारे शेख महंमद कांहीं थोडे थोडके झाले नव्हते. विठोबा सर्व कांहीं योग्य वेळीं नीट करील, असें समाधान मानून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. मुसलमानी पेहराव, चालीरीति, धर्म, भाषा स्वीकारून समाजाच्या यातना बंद करूं पाहणारे कितीतरी हिंदू प्रांतोप्रांतीं पीर होऊन बसले होते. यवनावर रुसून त्यांच्याशीं व्यवहार बंद करून त्याचें मुखावलोकनहि न करणारी दासोपंतादि मंडळी आपल्याकडून यवनांच्या पारिपत्याचे प्रयत्न करीतच होती. यवनाविरुद्ध बंड करून स्वराज्य मिळविणारेहि कांहीं वेडे निपजले. यवन सेवा करून जन-

तेचा परामर्ष घेऊं पाहणारे दामाजीपंतहि अनेक होऊन गेले. यज्ञयागांचा, व देव देवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करण्यांत कित्येकांनीं सर्वस्व खर्चिलें. गोरक्षण करून प्रजेंत जोम उत्पन्न करू पहाणारे गोरखनाथहि देशांत वावरत होते. कथाकीर्तनें, व रामायण भारतें, देश भाषेंत बनवून लोकांच्या अंगीं स्फुरण चढवूं पहाणारे कीर्तनकार व ग्रंथकार त्याकाळीं शेंकड्यानीं मोजवे लागत. असे नानाप्रकारचे बरेवुरे उपाय जो तो आपापल्या परीनें करीतच होता; परंतु असले हे सर्व उपाय तीनशें वर्षें करूनहि यवनांचें काडीमात्र कोणा नुकसान करूं शकले नाहीं. ”

“ शहाजीच्या पूर्वीच्या काळाचें यथार्थ चित्र वरील अवतरणांत प्रतिबिंबित झालें आहे. पारतंत्र्याच्या पंकांत रुतलेलें कोणतेंही राष्ट्र प्रथम कित्येक वर्षें केवळ स्तिमित होऊन नीष्क्रिय बनतें; व त्यानंतर कल्पना तरंगाच्या ओघावरांवर वहात जाऊन जो कोणता मार्ग यदृच्छेंकरून चोखाळतां येईल तो चोखाळण्यात सार्थक्य मानूं लागतें. पण हें सर्व प्रयत्न विस्कळित, अहेतुजन्य, आणि अदूरदृष्टीचे असल्यानें त्यापासून “ बुडत्याचा पाय खोलांत ” या म्हणीप्रमाणें राष्ट्राचा उद्धार होण्याऐवजीं तें परदास्यांत अधिकाधिकच गुरफटलें जातें. या नंतर सहकारितेचा मनु सुरू होतो; एका बाजूनें राज्यकर्त्यांचा पहिला जोम ओसरत जाऊन ते सुखास चाटावूं लागतात, आणि आपलीं किरकोळ कामें जित लोकांच्या अंगावर टाकून चैनीत गर्क होऊन जातात. दुसऱ्या बाजूनें जित लोकांनाहि वाटूं लागतें कीं, परकी राज्याचें जोखड कांहीं आपल्याला सर्वस्वीं झुगारून देतां येत नाहीं; आणि ते जर आपल्या मानेवर राहणारच तर त्यांतल्या त्यांत आपल्या हातीं जेवढा अधिकार लाभेल तेवढा तरी नीट बजावून आपल्या देशबांधवांचे हाल कमी करावे; आणि स्वराज्याची तहान सुराज्यानें भागवून घ्यावी. शहाजीच्या पूर्वीच्या पिढी पासूनच असली सहकारितेची विचरसरणी महाराष्ट्रांत सुरू झाली होती; आणि जाधवराव, मालोजी, मुरार जगदेव वगैरे योद्धे, व मुत्सद्दी यवनाशीं सहकारिता करून, साधेल तेवढा अधिकार बळकावून, म्लेन्छांच्या गांजणुकींतून रयतेस सोडवूं पहात होते; जित व जेते यांच्या व्यवहारांत अशी वेळ

ओघानेंच प्राप्त होतें; आणि त्यांतूनच महत्वाकांक्षी सहकारितावाद्यांना भावी स्वराज्याचीं स्वप्नें पडूं लागतात. ”

“ शहाजीच्या पूर्वीच्या पिढींतील मराठे मनसबदारांना असलें सुखस्वप्न क्वचित पडलें असेल. परंतु आपल्या अंगचें वाढतें कर्तृत्व, आणि यवनी सत्तेचें दौर्बल्य, यांची तुलना करून शहाजीनें असा कयास बांधिला होता कीं, स्वराज्याचें पक्व फळ यवनी सत्तेच्या वृक्षापासून तुटून अलगत आपल्या पदरांत पडल्या वांचून राहणार नाहीं. “ जुलमी परकीय राजाचा नाश करावयाचा म्हटला म्हणजे त्यांची नोकरी करून, व विश्वास संपादन करून योग्य समयीं त्यास गचांडी देण्याचा मार्ग जित लोकांना सदा श्रेयस्कर, सुरक्षित व न्याय्य आहे;” अशी शहाजीची समजूत झाली होती;आणि निजामशाहीची वजीरी करतां करतां लहानगा मूर्तिजा दरबाराला भितो, या मिषानें त्यास तख्त वर घेऊन बसण्याचा परिपाठ पाडून दरबाऱ्यांच्या नजरेला हिंदू राजा तख्तावर बसलेला पाहण्याची संवय लावून त्यानें आपलें ध्येय बहुतांशीं साध्य करून घेतलें. शहाजीचा मनसबदारी एखाद्या शहाला शोभेल अशी तोलदार फौज बाळगणारी झाली. असल्या मनसबदारीला कह्यांत ठेवणें मोठें जिवावरचें, व संकटाचें काम होऊन बसतें; “ सुखविली तर ती आयतीच अलगत प्रेमानें उरावर बसते, आणि दुखविली तर रागावून प्राण घेते.” शहाजीची समजूत अशी झाली होती कीं, मूर्तिजशहा व त्याचा दिवाण मलिकंबर हे आपणांस दुखवूं शकणार नाहींत; आणि यदाकदाचित् त्यांनीं तसला मूर्खपणा केलाच, तर आपण त्यांचा समूळ उच्छेद करूं शकूं; पण त्याचे हे दोनहि अंदाज चुकीचे ठरले; निजामशाहींतून त्याची हकालपट्टी झाली; आणि त्या बद्दलचा सूड उगविण्याचें आपलें सामर्थ्य अत्यंत कोतें आहे, असेंहि त्यास कळून आलें. ज्या दिवशीं शहाजीला निजामशाहीनें दुखविलें,त्या दिवशीं हिंदुस्थानांत सहाशें वर्षें बांधीत असलेल्या इस्लामाच्या तटांत पहिलें भगदाड पडलें, आणि इस्लामी सत्ता हिंदुस्थानांतून कायमची बाद होण्याच्या मार्गास लागली. ”

“ तथापि इस्लामी तट जमिनदोस्त करण्याची कामगिरी शहाजीसारख्या यावज्जन्म सहकारी मनसदारी करणाऱ्याच्या हातून होणें शक्य नव्हतें; तें

कां याची मिमांसा राजवाडे यांनीं केलेली नसल्यामुळें तिचें विवेचन करणें जरूर आहे. परकी सत्तेशीं सहकारिता करून एखादा मनसबदार कितीहि प्रबल झाला तरी त्याची धांव विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जाऊं शकत नाहीं. पूर्वीच्या काळांत तो दश हजारी मनसबदार बनला असता, किंवा कदाचित् काबूल, बंगालसारख्या प्रांतावर सुभेदारही नेमला गेला असता; हल्लींच्या काळीं त्याची उडी गव्हर्नरच्या पायरीपर्यंत किंवा अंडर सेक्रेटरीपर्यंत जाऊं शकेल; पण ज्या सरकारशीं सहकारिता करून त्याची सत्ता प्रबळ करण्याला मदत केल्यामुळेंच आपलें वैभव वाढलें असतें. त्या सरकारचा उच्छेद करण्या-इतकी शक्ति आपल्या मनसबदारींत येऊं शकत नाहीं. झाडावर चढून आपण बसलेली खांदी मुळाकडून तोडल्यास त्या फांदी बरोबरच आपलाहि अधः-पात होईल, ही गोष्ट प्रथम शहाजींच्या लक्षांत आली नाहीं. निजामशाहींतून निघून स्वतंत्र स्वराज्य स्थापना करण्याचा त्यानें जो पहिला प्रयत्न इ० स १६२९ त केला, त्यांत त्याला असाच कटू अनुभव येऊन तो प्रयत्न चार सहा महिन्यांतच आटोपला.पुढें चार वर्षांनीं त्यानें फिरून यत्न करून पाहिला, व त्याचीहि गति तीच झाली. त्यानंतर विजापूरच्या अदिलशहाशीं उघड वैर करण्याचें टाकून, कर्नाटकात अदिलशाहीच्या नांवावर मांडलिकी राज्य स्थाप-नेचा त्याचा तिसरा प्रयत्न बराच सफळ झाला. ''

'' यावरून हेच सिद्ध झालें कीं,ज्याचें बहुतेक सर्व आयुष्य सहकारितेंत गेलें, व ज्याच्या वैभवाचा उगम सहकारितेंतच झाला, त्याची उडी मांड-लिकी संस्थानाच्या पलीकडे जाऊं शकत नाहीं. याला कारणेंही तशींच नैसर्गिक असतात. एक तर असल्या मनसबदारांचें तेज सूर्यासारखें स्वयं-प्रकाशित नसून चंद्रासारखें प्रतिबिंबित असतें; त्यामुळें सूर्याचें तेज अड-विण्याचा चंद्रानें यत्न केल्यामुळें, सूर्याला खग्रास ग्रहण लागलें तरी त्या-बरोबर चंद्राच्याही तेजाचा लोपच होतो. तशीच स्थिति राजकीय वैभवाच्या झगड्यांतही घडून येते; दुसरें कारण असें कीं, दुर्बल राजाची पेशवाई, किंवा सरलष्करी करतां करतां त्याला हळूच ढकलून देऊं इच्छिणाऱ्या स्वरा-ज्यसंस्थापकावर कृतघ्नतेचा व स्वामिद्रोहाचा आरोप येतो; याचा परिणाम पारलौकिक किंवा नैतिक सुखदुःखांतच दिसून येणारा असता, तर त्याची

कोणी फारशी पर्वा केली नसती. इहलोकांतल्या आपल्या कोट्यावधि देश-बांधवांना पारतंत्र्याच्या नरकांतून काढून स्वराज्याच्या स्वर्गांत नेऊन ठेवता आलें तर स्वामिद्रोहाच्या पातकामुळें परलोकांत स्वतःपुरती नरकाची शिक्षा भोगण्याला कोणीही राष्ट्रवीर तयार होईल. पण या स्वामिद्रोहाच्या आक्षेपाचें पाप या लोकींच भोंवतें; व तें मनसबदारास स्वराज्य पचूं देत नाहीं. अशा मनसबदारानें आपलें पूर्वायुष्य स्वतःची बढती करून घेण्यांत घालविलेलें असतें; व त्या वेळेपासूनच त्याच्या भाईबंदांकडून त्याच्या उदात्त हेतूचा विपर्यास केला जातो, व ते त्याचे शत्रू बनतात. जेते वर्गांतील अधिकाऱ्यानंतर जितवर्गांतला हा उपटसुंभ आपणांस वरचढ होत असलेला पाहून मत्सरानें त्यांना पूर्ण पछाडलेलें असतें; व त्याचा नायनाट करण्याकरितां ते टपलेले असतात. अशा परिस्थितींत शहाजांसारख्या सहकारी मनसबदारानें परकी सत्ता ढकलून देण्याचा यत्किंतही प्रयत्न सुरू करतांच त्याला दुहेरी शत्रूंचा मारा सहन करावा लागतो; आणि त्या वावटळींत त्यानें सामर्थ्याचें परकीय अधिष्ठान तर आपण होऊन सोडलेलेंच असतें, व स्वकीय अधिष्ठान मिळणें पूर्वकालीन विश्वासाच्या अभावीं त्यास दुर्घट होतें. ''

'' अशा त्रिशंकूच्या स्थितींत दुसरा कोणी लेचापेचा सरदार असता तर तो चिरडूनच गेला असता; स्वकीय आणि परकीय सकारण व निष्कारण शत्रूंस दाद न देतां शहाजी बचावला, यांतच त्याचें धैर्य–शौर्यादि गुण व्यक्त होतात. या अनुभवानें शहाणपण शिकून त्यानें स्वतः पुनः अदिलशाहीशीं सहकारिताच स्वीकारिली; आणि कर्नाटकांतील मांडलिकी राज्याधिकारावरच तो बाह्यतः संतुष्ट राहिला. पण त्याच्या अंतःकरणांतील स्वराज्य स्थापनेची तळमळ थंडगार पडली नव्हती; आपलें ध्येय स्वतःस कां साधतां आलें नाहीं, याचा सर्व बाजूंनीं विचार करून आपल्या प्रतापशाली पुत्राच्या हांतून ध्येय सिद्धीस नेण्याची त्यानें ईर्षा बाळगिली; आणि स्वतःस आड आलेलीं विघ्नें आपल्या पुत्रास घातक होऊं नयेत, या विषयीं त्यानें प्रथमपासूनच सावधगिरी बाळगिली. परकी राजसत्तेशीं असहकारिता करून टिकाव धरण्याइतकी शक्ति आपल्या जेष्ठ पुत्राच्या म्हणजे संभाजीच्या अंगीं नाहीं, असें पाहून त्यास त्यानें आपल्या बरोबर घेतलें; आणि शिवाजीच्या अंगचें तेज लहानपणापासू-

नच ओळखून त्यास दादाजी (कोंडदेव) व जिजाबाई यांच्या स्वाधीन करून, आपल्या पुणें प्रांतांतील स्वतंत्र जहागिरीत, विजापूरापासून दूर ठेवून दिलें. ”

“ शिवाजी लहानपणापासूनच स्वकीयांच्या संगतींत आणि स्वतंत्रतेच्या वातावरणांत वाढला; वडिलांनीं दोन तपें परकीय सत्तेशीं एकनिष्ठ राहून जी कर्तबगारी केली, तिचें फळ त्यांनां अखेरीस कसें मिळालें, तें जाणून आपल्या पराक्रमाला स्वतंत्र अधिष्ठानाचा आश्रय घेण्याचा त्यानें संकल्प केला. कोणत्याही मुसलमानी शाहीशीं सहकारिता करावयाची नाहीं, असें जरी त्याचें मत ठरलें होतें तरी तो चतुर राजकारस्थानी पुरुष असल्यानें त्यानें उतावळेपणानें आपल्या मनांतील हेतु योग्य वेळ येईपर्यंत जाहीर केला नाहीं. त्याचप्रमाणें शहाजीच्या सहकारितेचें फळ जी जहागीर, सेना, मुत्सद्दीमंडळ, आणि संपत्ति यांचाही त्यानें अव्हेर केला नाहीं, उलट या सर्व साधन सामुग्रीचा आणि बापाच्या नांवलौकिकाचा जितका फायदा करून घेतां येईल तितका त्यानें करून घेण्यांत कसूर केली नाहीं. राजवाडे आपल्या प्रस्तावनेंत लिहितात कीं, “ दरबारी, मुत्सद्दी, लष्करी सरदार, लढाऊ सामान, जेधे आदिकरून शहाण्णव कुळींच्या मराठ्यांचें साहाय्य व शहाजीच्या नांवाचा दरारा, इतक्या देणग्या शहाजीकडून शिवाजीस मिळाल्या; यास्तव शहाजीलाहि स्वराज्य स्थापनेच्या श्रेयाचा वांटेकरी करणें इतिहासास प्राप्त आहे. ” परंतु यांत राजवाड्यांची दुहेरी चूक आहे. (कारण) जे मुत्सद्दी व सरदार शिवाजीला आरंभापासून अनुकूळ झाले, त्याचें त्यावेळेपावेतों महत्व तितपतच होतें; आणि जेधे, बांदल, वगैरे थोडेसे सरदार व देशमूख अपवाद दाखल सोडून दिल्यास निजामशाहींत किंवा आदिलशाहींत नांव गाजविलेले असे सरदार शिवाजीस साह्यभूत तर झाले नाहींतच, पण उलट शिवाजीच्या कार्याची खंबीर पायावर उभारणी होईपर्यंत त्यास त्यांनीं विरोधच केला. मोरे, निंबाळकर, घोरपडे, सावंत, मोहिते, वगैरे सरदार आरंभापासूनच हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेला अनुकूल असते तर शिवाजीचें कार्य कितीतरी सुकर झालें असतें. पण परकी शत्रू बरोबरच स्वकीय शत्रूंशीं दोन हात करून शिवाजीनें आपल्या वर्चस्वाचा जो पाया घातला, त्यांत शहाजीला वांटेकरी

करितां येत नाहीं. शिवाय " क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे " हा न्यायही विसरून चालावयाचें नाहीं. शहाजीनें स्वतःची जेवढी कमाई शिवाजीच्या स्वाधीन केली, तिच्याहून किती तरी पटींनीं अधिक कमाई केलेले, व हिंदुस्थानभर नांव गाजविलेले, मानसिंग, जसवंतसिंग, जयसिंग, इत्यादि रथी महारथी दिल्ली दरबारीं होऊन गेले; पण दिल्लीच्या मोंगली सत्तेचें मूळ त्यांना हलवितां आलें नाहीं. शिवाजीनें जे असले अचाट व अद्वितीय पराक्रम करून दाखविले, त्यांचें श्रेय अर्थात् त्याच्याच अलौकिक बुद्धिमत्तेस, धाडसास व राजकीय धोरणास दिलें पाहिजे. "

" शहाजीच्या वेळेपर्यंत देशांतील मराठ्यांची बहुमत संख्या यवनादींची सेवा करण्यांत दूषण मानावयाच्या ऐवजीं प्रायः भूषणच मानीत असे. हा राष्ट्रघातक ओघ बदलून देशांतील सर्व मराठा एका ठायीं मेळवावा, ही उच्चतम राष्ट्रीकरणाची सल्ला रामदासांनीं शिवाजीस दिली. समर्थांनीं महाराष्ट्रांत राष्ट्रभावना जागृत केल्यानें जे मराठे सरदार व बारगीर पूर्वी शहाजीच्या प्रयत्नाकडे वैर भावानें किंवा मत्सरबुद्धीनें पाहत असत, त्यांना शिवाजीच्या ध्येयाविषयीं आपलेपणा वाटूं लागला; या राष्ट्रीयत्वाच्या जागृतीच्या जोरावर शिवाजीचा स्वराज्यवृक्ष चोहों बाजूस फोफावूं लागला; आणि त्याचें मूळ वर इतकें चिवट बनलें कीं, अवरंगजेबानें त्याच्यावर तीस वर्षे आघात केले असतां, तें मूळ तुटण्याऐवजीं अवरंगजेबाच्या हातातील सत्तारूपीं शस्त्रच बोथट होऊन गेलें. एतावता शहाजीच्या साधनसामुग्रीप्रमाणेंच रामदासांच्या महाराष्ट्र धर्माच्या शिकवणीचा शिवाजीस कल्पनातीत दुजोरा मिळाला. तथापि शिवाजीच्या अंगीं नीतिमत्ता, निःस्वार्थता, न्यायप्रियता, समबुद्धि, आणि अष्टपैलू मुत्सद्देगिरी, हे अलौकिक गुण नसते, व त्यांच्या योगानें महाराष्ट्रीयांचीं अंतःकरणें विकसित झालीं नसतीं तर समर्थांचा उपदेश अरण्यरुदनवत् झाला असता. शहाजीच्या कर्तबगारींत सहकारितेच्या दोषामुळें स्वार्थाची जी छटा दिसत होती तिचा लवलेशही शिवाजीच्या चारित्र्यांत दृष्टिगोचर न झाल्यामुळें प्रत्यक्ष त्याच्या शत्रूपक्षीयांसही तो आद-

रणीय वाटूं लागला, व याच गुणांच्या जोरावर तो जयसिंगाच्या स्वारीनें ओढविलेल्या संकटांतून सुरक्षितपणें निभावला."

"स्वराज्य स्थापनेच्या पहिल्या एक दोन अंकांत शिवाजीनें वडिलांकडून मिळविलेल्या साधनसामुग्रीचा यावच्छक्य उपयोग करून घेतला; पण पुढील सगळी करामत त्याच्या स्वतःच्याच जोरावर उभारली गेली. परकीय सत्तेशीं असहकारिता करून स्वराज्यमंदिर निर्माण करावयाचें असल्यास शत्रूचा जेथें सहसा घाला पडूं शकणार नाहीं, असलें स्वतंत्र अधिष्ठान पाहावें लागतें. शहाजीला ही मोठी उणीव भासत होती. शिवाजीनें प्रारंभींच घाटाखालचीं बारा मावळें काबीज करून शत्रूच्या मार्गांत सह्याद्रीची दुर्घट धोंड उभी करून ही उणीव दूर केली. अरब व पोर्तुगीज व्यापाऱ्यांच्या वखारीशीं प्रत्यक्ष संबंध जोडून आपल्या सैन्याला उत्कृष्ट कारागिरीचीं हत्यारें आणि उमदे घोडे मिळण्याचा मार्ग निर्वेध करून ठेवला. इतक्याही अडचणींतून शत्रू अंगावर आला तर अखेरचें संरक्षणाचें साधन म्हणून सिंधुदुर्गासारखे किल्ले बांधविले; स्वतःचें आरमार सज्ज केलें; व संपत्तीची उणीव शत्रूच्या मुलखांत लुटालूट करून भरून काढली. या योगानें शत्रूपक्षीयांवर दरारा बसत चालला. त्यांची प्रतिकारशक्ति संकुचित होऊं लागली. आणि स्वपक्षीयांस लक्ष्मीच्या देखाव्यानें आणि आत्मरक्षणाच्या खात्रीमुळें धीर चढत चालला; व त्याच्या अनुयायांची संख्या झटाझट वाढत चालली. ज्या ज्या वेळीं ज्या शत्रूशीं प्रत्यक्ष झगडा चालू नसेल त्याच्याशीं संबंध ठेवल्यापासून अनहित न होतां प्रसंगविशेषीं आपल्या कार्यास तो संबंध हितकारकच होतो, हें जाणून त्यानें केव्हांही सर्वांशीं सर्व प्रकारचा संबंध ताडकन तोडून टाकला नाहीं. स्वराज्यसंस्थापनेचें दुर्धर कार्य एकदम सिद्धीस जात नाहीं, हें तत्त्व लक्षांत बाळगून अर्धेमुर्धें यश पदरांत पडत असल्यास त्याचा अव्हेर न करतां, व विषाद न बाळगतां आणि पुढील प्रयत्नाविषयीं हताश न होतां हस्तगत झालेला राज्यभाग पचनीं पाडून घेण्याचा दूरदर्शीपणा त्याच्या अंगीं जन्मसिद्ध होता. महत्संकटाच्या वेळीं बेफाम होऊन सर्वस्व गमावण्याचा वेडेपणा न करतां वेळप्रसंग ओळखून स्वराज्यमंदिराचा पाया तेवढा भक्कम शाबूत ठेवून तह करण्यांत त्यास नामुष्की वाटली नाहीं. आग्रा येथें बोलावून

शिवाजीच्या पायांत सुवर्णशृंखला, किंवा लोहशृंखला घालण्याचा कावेबाज डाव पाताळयंत्री अवरंगजेबानें टाकला असतां तें आव्हान स्वीकारण्यास शिवाजी डरला नाहीं, किंवा त्यांत हरलाही नाहीं."

"एवंच शहाजी व शिवाजी या पितापुत्रांनीं आपल्या परीनें स्वराज्य संपादण्याचा यावज्जन्म प्रयत्न केला. त्यांत शहाजीची मदार सहकारितेवर होती; त्यामुळें तिच्यांतील नैसर्गिक अतएव अनुल्लंघनीय दोषामुळें त्याची कामगिरी विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊं शकली नाहीं. शिवाजीनें आपल्या मार्गांत तसली अडचण आड येऊं दिली नाहीं. यावरून असहकारितेचा मार्ग निष्कंटक असें मानून चालावयाचें नाहीं. सहकारितेचा मार्ग स्वल्पिष्ठ घर्षणाचा असल्यानें चोखाळण्यास निर्भय असतो, यामुळें सामान्य कर्तृत्ववान माणसें साहजीकपणेंच त्या मार्गाकडे वळतात. शिवाजीनें आंखलेल्या मार्गांत ठिकठिकाणीं यमदूत खडे होते, तरी पण, भिकेची हंडी शिंक्याला चढत नाहीं, आणि "साहसे श्रीः प्रतिवसति" या तत्वाचें त्यानें सुगम पण अल्प-फलप्रद पंथ सोडून देऊन दुर्गम पण अतर्क्य फल देणारा, आणि केवळ स्वतःचें वैभवच कळसास चढविणारा नव्हे तर आसेतु हिमाचल हिंद राष्ट्राचा उद्धार करणारा पंथ स्वीकारिला. शिवाजीचें विभूतिमत्व यांतच संकलित झालें आहे. सद्गुणानें व आशावादित्वानें रेंसभर कमी असा जर दुसरा कोणी राष्ट्रपुरूष हें राष्ट्रकार्य हातीं घेता तर त्याच्या जिवाचे न भूतो न भविष्यति धिंडवडे निघाले असते. असले दुर्घट कार्य शिवाजीनें निःशंकपणें हातीं घेतलें, आणि अल्प काळांत व स्वकीयांना, आणि परकीयांनाहि स्वल्पतम दुःख सोसावयास लावून ते यशस्वी करून दाखविलें. या करितांच मुख्यतः महाराष्ट्र व पर्यायानें सर्व हिंदीराष्ट्र शिवाजीचें सदैव ऋणीच राहील, यांत शंका नाहीं."

शहाजीच्या कर्तबगारीविषयीं विचार करितांना, तत्कालीन इतर मनसबदार व शहाजी यांचीही तुलना केली पाहिजे. शहाजी लहान असतांनाच,—मालोजीच्या काळांत—जाधवराव हा निजामशाहींतील एक मोठा वजनदार व पराक्रमी मनसबदार होता. पुढें शहाजीच्या काळांतही दक्षिणेंतील निरनिराळ्या मुसलमानी राज्यांमध्यें अनेक मराठे मनसबदार असून त्यापैकीं मुरार जगदेव सारखे कांहीं तर राज्याचे आधारस्तंभ होते. या सर्व सरदारांच्या

मनाची ठेवण, व शहाजीच्या मनाची ठेवण, अगदींच भिन्न प्रकारची होती; हेंच शहाजी व इतर मराठे सरदार यांच्या स्वभावामधील महत्वाचें वैशिष्य आहे. जित राष्ट्रांतील कर्त्या व्यक्तींचा जन्म, उदय, व उत्कर्ष जेते असलेल्या राज्यकर्त्यांच्या वृक्षछायेंत झालेला असतो; व प्रचंड वृक्षाखालीं लहान झाडाची वाढ जशी खुरटून, कांहीं विविक्षित मर्यादेपर्यंतच ती होत जाते, त्याप्रमाणेंच त्या कर्त्या व्यक्तीनें राज्यकर्त्यांशीं सहकारिता केल्यानंतर,-व राज्यसत्ता, स्थीर व स्थाईक करून तिची वृद्धी करण्याचा प्रयत्न केल्यानंतर त्याच्या वैभवाची वाढ कांहीं ठरीव मर्यादेपर्यंतच जाऊं शकते. तथापि परकीय राजसत्तेच्या अमलाखालीं, जेते लोकांच्या बरोबरीनें, किंवा कांहीं प्रसंगीं, जेते लोकांहूनही अधिक अधिकार, सत्ता, व वैभव, जित लोकांपैकीं मुरारराव, जाधवराव, या सारख्या कांहीं कर्तबगार व्यक्तींस सहकारितेमुळें लाभल्यानंतर " मिळविलें तें टिकलें, व जमल्यास त्यांत भर घातली म्हणजे कमावलें " अशी त्यांची वृत्ती बनते. सहकारितेमुळें झालेलें वैभव, हेंच मुळीं राज्यकर्त्यांच्या मेहेरबानीमुळें लाभलेलें असल्यामुळें स्वतःच्या आयुष्यांत " स्वतः " ही व्यक्ति त्यास विसरावी लागते; व आपणाला राज्याच्या कल्याणाकरितां जें जें करावें लागतें, तें तें सर्व आपल्या व आपल्या जित बांधवांच्या कल्याणाकरितांच आपण करीत आहोंत, अशी त्याची भ्रामक समजूत होते; किंवा राजकार्य ही प्रधान गोष्ट, व लोककल्याण ही दुय्यम गोष्ट असें तो मानू लागतो. राज्यरक्षण व सुरक्षितता या दोन प्रधान बाबती संभाळून मग शक्य तें लोककल्याण करावयाचें अशी त्याची मनोवृत्ति बनते; अथवा याच विचारसरणीनें उलट घेतल्यास "आपण कितीही वैभव संपन्न असलों, तरीं अखेरीस आपण जितांपैकींच आहोंत, आणि आपलें हें वैभव निव्वळ सहकारितेमुळेंच कायम राहिलें आहे,-सहकारितेच्या संजीवनीनें तें जिवंत ठेविलें आहे," ही गोष्ट पूर्णपणें विसरून जाऊन " आपण जित लोकांच्या वर्गांतील नसून, जेत्यांच्या श्रेष्ठ वर्गांतील आहोंत" असें त्यास वाटूं लागतें. सहकारितेमुळें प्राप्त झालेल्या वैभवाच्या व सुखाच्या संवईनें-व ती संवय अंगांत मुरून त्याचा स्वभाव बनल्यानें-जित लोकांचा उत्कर्ष सुराज्यानें करितां येतो, अशी त्याची समजूत होते; आणि तो तें राज्ययंत्र

सुरक्षित रहावें, व सुरळीत चालावें, म्हणून खटपट करितो. इतकेंच नाहींतर त्या राज्ययंत्राची गति बंद करूं पाहणाऱ्या, अथवा त्या ऐवजीं दुसरें राज्ययंत्र स्थापित करूं पाहणाऱ्या चळवळ्या स्वराज्यवाद्यास, तो स्वकीय असूनही त्यास शत्रू मानून त्याचा प्रतिकार व नाश करण्यास मनोभावें सिद्ध होतो. हाच प्रकार शहाजी व इतर मराठे सरदार यांच्या बाबतींत घडून आला. याच कारणामुळें मोरे, निंबाळकर, घोरपडे, सांवत, मोहिते वगैरे मराठा सरदार मंडळी शहाजी व शिवाजी या उभयतांच्या उद्योगास अनकूल न होतां विरुद्ध गेली; व त्यांनीं त्या उभयतांचे प्रचंड उद्योग हाणून पाडण्यास मनापासून मोठे अविश्रांत परिश्रम घेतले.

शहाजीची मनसबदारी एखाद्या राज्यकर्त्याला तोलेल अशा तोलाची होती; व त्यानें स्वराज्य स्थापनेचा प्रचंड उद्योगही कांहीं प्रमाणांत सिद्धीस नेला होता. बाल राजा मूर्तुजा निजामशहा याला, तख्तावर घेऊन बसण्याचा परिपाठ पाडून जित व जेते या उभयतां दरबारी मंडळींच्या नजरेस हिंदू राजा तख्तावर बसलेला पाहण्याचा नवा संप्रदाय त्यानें सुरू केला होता; आणि जेत्या व राज्यकर्त्या मंडळींत त्यांच्याहूनही अधीक सहकारी वैभवाची शेवटची पायरी त्यानें स्वपराक्रमानें प्राप्त करून घेतली होती; म्हणजे जित समाजांतील कर्त्या व्यक्तीस स्वप्नांतसुद्धां लाभणें कठिण, असें अपवादात्मक असामान्य, अलौकिक, व कल्पनातित वैभव शहाजीस प्राप्त झालें होतें. अर्थात् या काळांत, शहाजीच्या मानानें पुष्कळच कमी वैभवांत असलेल्या, व शहाजीसारख्या राज्यवैभव उपभोगीत असलेल्या मराठा सरदार मंडळींची मनःस्थिती कशा प्रकारची होती, यांचें तुलनात्मक विवेचन केलें, म्हणजे "शहाजी हा अलौकिक पुरुष होऊन गेला" असेंच निदर्शनास येतें. मुसलमानी राज्यकर्त्याबरोबरील सहकारितेंत जन्म घालवून, मिळालेलें वैभव प्राप्त करून घेतलेलें असल्यामुळें, ही सरदार मंडळी सुखाला चटावलेली होती; सहकारितेचें वैभव त्यांच्या सुखास कारणीभूत झालेलें असल्यामुळें, सहकारिता हीच आपल्या सुखाची, कर्तृत्वाची, यशाची व उत्कर्षाची गुरुकिल्ली आहे, असा त्यांचा दृढ समज होता; व ज्या राज्यकर्त्यांशीं केलेल्या सहकारितेमुळेंच, आपणांस हें वैभव प्राप्त झालें, त्या राज्यकर्त्यांचीं भिकेची हंडी शिंक्यावर न

चढली तरी पत्करेल असें म्हणत, व आज नाहीं उद्यां चढेल, या आशेंत,— सहकारिता करून, आपली व आपल्या जित समाजाची उन्नती करून घेतली पाहिजे, असा या सरदार मंडळींच्या मनाचा सिद्धांत होता. शिवाय सहकारितेचा मार्ग मऊ, सुरक्षित, व फायद्याचा अथवा फायदेशीर होणारा असतो; अर्थात् असा सहकारितेचा मऊ, सुरक्षित, फायदेशीर, सुखकारक व वैभवदायक मार्ग सोडून, असहकारितेच्या खडकाळ, कांटेरी, धोक्याच्या व नुकसानकारक आडमार्गानें जाऊन, त्या पापाचें पुढें प्रायश्चित भोगा कशाला, व आपल्या जन्माचे धिंडवडेही करून घ्या कशाला ? असल्या विचारसरणीची त्यावेळची मराठा सरदार मंडळी होती. उलटपक्षीं शहाजीनें, एखाद्या राज्यकर्त्या प्रमाणें वैभव असूनही त्यानें सहकारितेच्या वैभवाचा त्याग करून स्वतंत्र होण्याचा उद्योग आरंभिला होता, हेंच शहाजीच्या चरित्रांतील महत्वाचें, मुख्य, व मननीय वैशिष्य आहे, आणि त्यामुळेंच शहाजी हा एक अलौकिक पुरुष होऊन गेला, आणि त्यानें शिवाजीच्या खालोखाल राष्ट्रीय कामगिरी बजाविली, असेंच निःशंकपणें म्हणणें प्राप्त आहे.

बादशहा शहाजहान याचा बलिष्ठ प्रतिस्पर्धी खानजहान लोदी याला मदत देऊन त्याला दखखनचा मालक करावा, व लोदीला यश मिळवून दिल्यानंतर त्या यशाच्या वांटणी करून घेऊन त्या ठिकाणीं प्रकटपणें आपलें स्वराज्य स्थापन करावें, हा शहाजीचा पहिला डाव होता; पण तो शहाजहान यानें साफ उधळून दिला, व त्याबरोबरच शहाजीच्या स्वराज्यस्थापनेचा हा पहिला प्रयत्न निष्फळ झाला.

शहाजीनें इ० सन १६२६ पासून इ० सन १६३६ पर्यंतच्या दहा वर्षांच्या काळांत निजामशाहीच्या नावानें राज्यकारभार सुरू केला. हा त्याचा प्रयत्न पूर्णपणें यशस्वी होऊन जर त्याच्या कारभारीपदाला स्थैर्य आलें असतें तर, भावी काळांत, कृतघ्नतेचा व स्वामिद्रोहाचा प्रतिपक्षाचा आरोप निमूटपणें ऐकून घेऊनही, निजामशाही राज्यलक्ष्मीचा तो स्वतःच मालक बनला असता; पण शहाजहान यानें शहाजीचा हा दुसराही डाव साफ उधळून दिल्यावर, त्याच्या स्वराज्य संस्थापनेच्या दुसऱ्या प्रयत्नाचाही बोजवारा उडाला, आणि त्याला नाइलाजानें आदिलशाहाची मनसबदारी पत्करावी लागली.

अशा रीतीनें स्वराज्य संस्थापनेच्या प्रयत्नांत दोनवेळां चांगलाच खडतर अनुभव आल्यानंतर शहाजीची पूर्वीची तडफ शिथिल झाली. सेवावृत्तींत अराजनिष्ठपणें वागल्यास त्याचे परिणाम कसे भोगावे लागतात याचा अनुभव घेतल्यानंतर त्याच्या ठायीं विचार उत्पन्न झाला. स्वतःच्या समशेरीच्या संजीवनींत निजामशाही जिवंत करण्याचें सामर्थ्य असलें, तरी ती कायमची जिवंत ठेवण्याचें सामर्थ्य तींत नाहीं, हा कटु अनुभव त्याला आला, आणि नाइलाजानें त्याला आदिलशाहाची नौकरी पत्करावी लागली. ज्यांच्याशीं आपण दोन हात केले, प्रसंगीं बरोबरीच्या नात्यानें व्यवहार केला, त्यांनीं शहाजीला दुखविलें असूनही, त्याला त्यांचा उच्छेद करण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें अपमानाच्या यातना नाइलाजानें गिळून टाकाव्या लागल्या; इतकेंच नाहीं तर स्वतःची इभ्रत, अहंकार, इज्जत, महत्वाकांक्षा, कर्तृत्वशक्ति व अभिमान, यांना उघड्या डोळयांनीं फारकत देऊन निमूटपणें सेवाधर्म पतकरून त्याला उलट त्यांच्याच आश्रयाला राहावें लागलें. स्वराज्य संपादण्याच्या दोन्हीही प्रयत्नांत पूर्णपणें अपयश आल्यानंतर, हें ध्येय आपल्या आटोक्याबाहेरचें आहे, अशी त्याची खात्री झाली. निजामशाही किंवा आदिलशाही राज्याची नौकरी करतांना त्यांच्या पासूनच प्राप्त झालेल्या परप्रकाशित वैभवाच्या जोरावर आपणांस स्वराज्य संस्थापना करतां येणें शक्य नाहीं, असें त्याला पूर्णपणें कळून चुकलें;आणि त्याच वेळेपासून त्याच्या महत्वाकांक्षेचें क्षेत्रही पुष्कळच मर्यादित होऊन बसलें. स्वराज्य संस्थापनेचे प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर त्या प्रयत्नामुळें उत्पन्न झालेली आपत्ती टाळण्याकरितां सेवाधर्माची दुसरी आपत्ती शहाजीला भोगावी लागली. आपण मुसलमानी सत्तेचा प्रतिकार करूं व करूं शकूं, अशी महत्वाकांक्षी इच्छा शहाजीच्या मनांत उत्पन्न झाली; परंतु या महत्वाकांक्षेला यशस्वी करणारें दांडगें सैन्यबळ त्याच्या संग्रहीं नव्हतें. आपण म्हणू तेथें लष्करी लोक पाहिजे तेव्हां, व पाहिजे तितके सज्ज उभे करण्याइतकी त्याची लष्करी सत्ता बलिष्ठ नव्हती. त्यामुळें, अपुऱ्या सैन्यबळाच्या आधारावरील त्याची महत्वाकांक्षा अयशस्वी ठरली, आणि कसाबसा तो या संकटांतून निभावला. त्याचवेळेपासून मुसलमान राज्यकर्त्यांशीं राजनिष्ठेनें राहून आपणांस प्राप्त झालेलें वैभव कायम ठेवणें, व शक्य तेव्हां तें वृद्धिंगत

करणें, हेंच आपल्या आयुष्यांतील इतिकर्तव्य आहे, असें त्यांस वाटूं लागलें. सहकारितेमुळें प्राप्त झालेल्या वैभवांत शिरजोर झालेल्या शहाजीस दमांत उखडून टाकल्यावर त्याच्या पूर्वीच्या तेजस्वी मनोवृत्ति पुष्कळच प्रमाणांत थंड झाल्या; आणि शहाजीचें डोईजड झालेलें लष्करी बळ खची केल्यानंतर, मुसलमानी सत्ताधोऱ्यांना जो निर्धास्तपणा वाटला, त्याच निर्धास्तपणाच्या सुखांत, आणि सेवावृत्ती पत्करल्या नंतरच्या मेहेरबानीमुळें शहाजीला कर्नाटकांत एक मांडलीक राज्य स्थापन करतां आलें. पण या परावलंबी स्थितीमुळें, त्याला आपल्या मनोवृत्तीही परावलंबी ठेवाव्या लागल्या; म्हणजे स्वतःच्या मनोवृत्ती व महत्वकांक्षा यांना मर्यादित क्षेत्रांतच डांबून ठेवण्याच्या इच्छेबरोबरच पूर्वीचा सर्वच आयुष्यक्रम त्यास मर्यादित करावा लागला, आणि आदिलशाहाशीं सख्यत्वानें राहून त्याच्या नांवावर, राजनिष्ठेच्या आश्रयानें कर्नाटकांत एक लहानसें मांडलीक राज्य निर्माण करून त्यावरच शहाजीस आपली स्वराज्याची महत्वाकांक्षा अखेरीस भागवून घ्यावी लागली.

शहाजीच्या स्वराज्यसंस्थापनेच्या प्रयत्नांस दोनदांही अपयश आल्यामुळें आणि त्यामुळेंच शहाजीची महत्वाकांक्षा झपाट्यानें कच खाऊन मागें फिरल्यानंतर लागलीच त्याच्या ठिकाणीं आशेचा लोभ उत्पन्न झाला;शहाजीच्या हातून अग्रपूजेचा मान हिसकावून घेण्याकरितां, त्याला दमांत उखडून टाकण्याच्या कारस्थानांत, अदिलशहाचे प्रत्यक्षपणें कान पिरगळून, आणि लांचाची लालूच दाखवून त्याला आपल्या पक्षांत मिळवून घेऊन, निजामशाही राज्यक्ष्मीची वांटणी करून घेण्याचा शहाजहान याचा डाव ज्या घटकेस सफळ झाला, त्याच वेळीं शहाजीच्या विचारसरणींत व वर्तनक्रमांत एकदम फरक पडला; पूर्वीचे ध्येय बदलून " राजाश्रयाच्या प्राप्तींतील भागीदारी " हें त्याचें विशिष्ट ध्येय बनलें. मानभंगाचें दुःख तो विसरला नाहीं; आपल्या तेजस्वी मनोवृत्ति ठेंचून टाकणाऱ्या दुष्मनांची आठवण तो विसरला नाहीं; पण दमांत उखडला गेल्यामुळें, आशेचा लोभही त्याला सोडतां आला नाहीं. आणि " कमविलें तें टिकलें, व टिकविलें म्हणजे मिळविली " अशी, अपयशामुळें उत्पन्न झालेल्या निराशेनंतर, त्याची मनोवृत्ती बनली; तिचा परिपोष होत गेला; आणि सेवाधर्मामुळें प्राप्त झालेलें वैभव कायम

ठेवावयाचें, राज्यकर्त्यांच्या मर्जीचा कल, व राजकीय परिस्थितीचा ओघ पाहून कालप्रसंगानुसार त्या वैभवाची वृद्धी करावयाची, आणि राज्यकर्त्यांची कृपादृष्टी नेहमीं कायम राहून तें वैभव आपणांस व आपल्या भावी पिढींस लाभत रहावें, म्हणून नेहमीं प्रयत्न करीत रहावयाचें, हेंच शहाजीच्या उत्तरचरित्रांत त्याचें मुख्य ध्येय होऊन बसलें. " स्वतंत्र स्वराज्याचें पक्क फळ आपण केलेल्या धकाबुक्कीनें यवनी सत्तेच्या वृक्षापासून तुटून अलगत आपल्या पदरांत पडेल " ह्या शहाजीच्या अटकळीचा बोजवारा उडाल्याबरोबर, मांडलीकी राज्याचें कच्चें फळ तरी राजनिष्ठेनें राहून, आपल्या पदरांत पाडून घ्या, अशी त्याची मनोवृत्ती बनली, व राजनिष्ठेच्या भारानें, व राजकीय परिस्थितीच्या योगायोगानें तें फळ यवनी सत्तेच्या वृक्षापासून अलगत तुटून शहाजीच्या पदरांत पडल्याबरोबर राजनिष्ठेचें आचरण, व राज्यकर्त्यांच्या कृपेचें आच्छादन या दोन भरभक्कम व निर्भय आधारावर आपल्या मांडलीकी संस्थानाची जेवढी भव्य इमारत उभारतां येईल तेवढी उभारावयाची, एवढेंच एक विशिष्ठ ध्येय शहाजीच्या उत्तरचरित्रांत अखेरीस कायम राहिलें.

शहाजीनें " स्वराज्याचें समग्र नाटक लिहून ठेविलें होतें; इतकेंच नव्हे तर त्याची रंगित तालीमही त्यानें करून पाहिली होती; फक्त त्या नाटकाचा महाराष्ट्राच्या रंगभूमीवर जाहीर प्रयोग व्हावयाचा होता; तो ( पुढें ) शिवाजीनें उत्कृष्ठपणें वठवून दाखविला. अहंमदनगर, विजापूर व दिल्ली, येथील राजवटीतून रुळलेल्या शहाजीस मुसलमानी दरबाराची खडान्खडा माहिती होती; करोल सैन्य होतें; अकलेस मूर्त स्वरूप देणारें शौर्य होतें, आणि हरएक व्यक्तीस ताब्यांत ठेवण्याचें कसब होतें. महाराष्ट्र भजनपूजनांत दंग असतां शेंकडों भजनी मंडळ्या व संतमंडळ्या, यांच्या टकळीनें जें महत्कार्य घडून येणारें नव्हतें, त्याची गुप्त तयारी मुसलमानांच्या पदरीं राहून शहाजीनें चालविली होती; स्वराज्याचा डोलारा शहाजीनें तयार करून ठेविला होता; फक्त त्याचा अनावरण समारंभ शिवाजीच्या हातून घडावयाचा होता. " परंतु शहाजीनें तयार केलेला स्वराज्याचा डोलारा, हा मांडलीकी स्वरूपाचा असल्यानें, त्या स्वराज्यांत व्यंगें होतीं; त्यांत "मांड-

लिकी स्वराज्य" हें प्रधान व्यंग होतें; शिवाय म्हटलें तर स्वतंत्र, म्हटलें तर परतंत्र अशा लिवालिवित स्थितींतील तें राज्य होतें; म्हणजे आदिल-शाहाशीं दोन हात करून, त्यांत विजयी होऊन स्थापन केलेलें तें स्वराज्य नव्हतें; हें शहाजीच्या स्वराज्यांतील प्रधान व्यंग होतें. शिवाय दुर्बळ कर्तृत्वहीन, व नालायक राजाची पेशवाई किंवा सरलष्करी करतां करतां, त्याला हळूच ढकलून देऊन स्वराज्य स्थापन करणाऱ्या व्यक्तीवर कृतघ्नतेचा व स्वामिद्रोहाचा आरोप प्रतिपक्षी आणूं शकतात, व ते आरोप निमूटपणें ऐकून घ्यावे लागतात; हा न्याय पेशवा किंवा सरलष्कर यांच्या प्रमाणेंच मांडलीक राज्यकर्त्यालाही लागू असतो; मूळ धन्याचें मांडलीकत्व पतकरितां पतकरितां तें सुसंधी प्राप्त झाल्याबरोबर, झुगारून देऊन स्वराज्यस्थापना करणें, हा प्रकारही असाच स्वामिद्रोहाच्या आरोपास पात्र ठरतो; तसाच प्रकार शहाजीच्या मांडलीकी राज्याचा होता; हें त्याच्या स्वराज्यसंस्थापनेंतील दुसरें व्यंग होतें, आणि शहाजीनें स्थापन केलेलें स्वराज्य कर्नाटकांत असून तें मांडलीकी स्वरूपाचें होतें, स्वराष्ट्रांत स्वतंत्र स्वराज्य नव्हतें, हें त्या स्वराज्यसंस्थापनेंतील तिसरें व्यंग होतें;म्हणजे शहाजीनें कर्नाटक प्रांतांत केवढीही सत्ता स्थापन केली तरी ती परमुलुखांत व मांडलीकी स्वरूपाची असल्यामुळें ती मांडलीकी स्वराज्य, आणि प्रच्छन्न स्वराज्य या मर्यादेपर्यंतची होती प्रच्छन्न स्वराज्य किंवा स्वतंत्र स्वराज्य शहाजीनें कधींही स्थापन केलें नव्हतें;म्हणजे मांडलीकी व प्रछन्न स्वराज्य हें प्रकट किंवा स्वतंत्र स्वराज्याच्या मानानें पुष्कळच कमी दर्जाचें असल्यामुळें, शहाजीनें स्थापन केलेलें राज्य स्वराज्य नव्हतें, असेंच म्हणणें प्राप्त होतें. शिवाजीच्या राज्यसंस्थापनेंत हीं व्यंगें नाहींत; तो प्रारंभापासूनच स्वतंत्र राहिला; निजामशाही, अदिलशाही व मोंगलाई यांच्या वशिल्यावर शिवाजीनें आपली स्वराज्याची इमारत उभारली नाहीं; मुसलमानी सत्तेचा मिंधा राहून, मिळेल तेवढी सत्ता मिळवून घेऊन शहाजीनें कर्नाटकांत राज्य स्थापना केली होती; पण शिवाजीनें मनगटाचा जोर, लोकसंग्रहाचा दुजोरा, स्वार्थत्यागाची परमावधी, प्रकट, मर्दुमकी, अढळ चिकाटी, असाधारण उद्योग, अप्रवादकारक धाडस, वगैरे अनेक गोष्टींच्या जोरावर स्वराष्ट्रांत, म्हणजे महाराष्ट्रांत स्वतंत्र राज्यस्थापना केली; अर्थात् स्वराज्य

या शब्दाच्या खऱ्या व्याख्येप्रमाणें, शहाजीनें कर्नाटकांत कानडी लोकांवर स्थापन केलेलें स्वराज्य हें खरें स्वराज्य नसून शिवाजीनें महाराष्ट्रांत स्थापन केलेलें स्वराज्य तेंच खरें स्वराज्य होतें, असें म्हणणें प्राप्त होतें.

शहाजीनें स्वराज्यस्थापनेकरितां-निजामशाही जगविण्याकरितां जे प्रचंड उद्योग केले, त्यांत त्याची पूर्णपणें फसगत झाल्यानंतर, अगदीं नाइलाजानें, व मोठ्या दुःखानें तो विजापूरकरांच्या नोकरींत राहिला. " विजापूरकरांच्या चाकरींत शिरल्यानंतर पहिल्या तीनचार वर्षांत शहाजीच्या मनोवृत्तींत जो क्षोभ उत्पन्न झाला, त्यांतच शिवाजीच्या राज्यस्थापनेचें बीज आहे. राज्य-संस्थापकाच्या पदवीस पोहोंचलेल्या शहाजीस हें परमुलुखांत सेवावृत्तीचें लाजिरवाणें जिणें पतकरणें कशामुळें प्राप्त झालें ? मोंगलांच्या नांवानें तो ( शहाजी ) जळत होताच; पण विजापूरकरांनीं आयत्या वेळीं आपणांस दगा देऊन स्वतःचा स्वार्थ साधून घेतला याबद्दल त्याचें मन फार दुखावलें होतें. ' महंमद आदिलशहानें विश्वासघात करून माझें राज्य बुडविलें, आणि जहागीर दिल्याचा उपकार दाखवून मला हद्दपारीची शिक्षा भोगावयास लाविलें; ज्यांच्या मांडीस मांडी लावून बसण्याची योग्यता आपण संपादन केली होती, त्यांचीच आतां ताबेदारी सोसावी, चाकरी करावी, मर्जी धरावी, असे दिवस आपणाला प्राप्त झाले ! आणि इतकें असून त्याबद्दल तोंडांतून अक्षरहि काढण्याची सोय नाहीं, हा गुपित मारा निमूटपणें यावज्जीव सोसलाच पाहिजे. ' असे विचार उद्भवून त्याच्या मनास अतीशय खेद वाटत असे; ' ज्यांनीं हें सर्व केलें, त्या शत्रूवर अगर हितशत्रूवर सूड उगविण्याच्या संधि आतां माझ्या आयुष्यांतून निघून गेल्या ' असे दुःखद विचार त्याच्या मनांत नेहमीं येत असत. " ( खरे-मालोजी व शहाजी हा निबंध पहा; ) ही सर्व गोष्ट खरी, पण आदिलशाही सत्तेशीं, नाइलाजानें का असेना, पण सहकारिता पतकरून मांडलीकी स्वराज्य स्थापन करण्याच्या आशेचा लोभ, तज्जन्य आसक्ति त्याला जडल्याबरोबर, त्याच्या मनांत आपल्या हितशत्रूबद्दल सूडाच्या भावना जागृत असूनहि त्या दाबून ठेवाव्या लागल्या. निदान वरकरणी तरी त्याला आपली राजनिष्ठा दाखवीत रहावें लागलें; इतकेंच नव्हे तर बलिष्ठाशीं केलेल्या अतिप्रसंगाचें प्रायश्चित्त

आपणाप्रमाणेंच शिवाजीसही भावी काळांत भोगावें लागूं नये, म्हणून त्याच्या स्वातंत्र्यप्रिय मनोवृत्तीस आळा घालून त्याची वाढ खुंटविण्याचाच त्यानें कांहींसा प्रयत्न केला, अथवा त्याला तो करावा लागला. कदाचित् औपचारिकहि असेल; पण असा प्रयत्न त्यानें केला, हें मात्र खरें आहे. इ. सन १६४२-४३ मध्यें, शिवाजी कांहीं दिवस विजापूर येथें शहाजीजवळ होता; त्यावेळीं शिवाजीची स्वातंत्र्यप्रिय मनोवृत्ती, व तिला साजेल असें तेजस्वी वजन, हीं पाहून शहाजीस अतीशय काळजी उत्पन्न झाली. त्यानें पहिल्यानें आपल्या कारभारी मंडळीकडून त्यास उपदेश करविला; आणि "आपले वडील शहाजी राजे हे सेवाधर्म पत्करून व यवनांची सेवा करून एवढ्या वैभवास चढले आहेत; म्हणून यवनांचा द्वेष अथवा तिरस्कार करणें आपणांस योग्य नाहीं; आपण आतां जाणते आहांत; वडिलांची अवज्ञा आपणांकडून होऊं नये," असें सांगविलें. नंतर शहाजीनें स्वतः शिवाजीस निरनिराळ्या प्रकारें उपदेश केला. "तुम्ही मुलें अद्याप लहान आहांत; ज्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत त्याबद्दल विषाद मानणें, बादशहास दरबारी पद्धतीनें लवून कुरनिसात न करणें, इत्यादि गोष्टी बऱ्या नव्हेत; आम्हांस ह्या गोष्टी समजत नाहींत असें नाहीं; आम्ही जर असे वागलों असतों तर आम्हास हे दिवस दिसले नसते. यासाठीं देशकालानुरूप वागाल तर तुमचें कल्याण होईल; लीनतेनें आर्जवपूर्वक वागाल तर राज्य तुमचें आहे; पण मागचा पुढचा विचार न करतां चालाल तर राज्यांतून हांकलून देतील, आणि मग पश्चात्ताप करण्याची पाळी येईल" असें त्यास बजाविलें; आणि "आमच्याप्रमाणेंच तुम्हीही ह्या दरबारीं आर्जवानें व नम्रपणानें वागून आम्ही मिळविलेली दौलत पुढें चालवावी" अशी इच्छा त्याच्याजवळ प्रदर्शित केली; शिवाय जिजाबाईसमक्ष आपण स्वतः शिवाजीस निरनिराळ्या प्रकारें उपदेश केला, व जिजाबाईस सांगून तिच्याकडूनही त्यास उपदेश करविला; परंतु त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं, तेव्हां त्यानें जिजाबाई व शिवाजी या उभयतांना पुणें येथें परत पाठवून दिलें. शहाजीच्या मनांत कांहींही असो; परंतु निदान बाह्यात्कारीं तरी शिवाजीशीं त्याचें वरीलप्रमाणें वर्तन घडलें आहे. त्यामुळें या त्याच्या वर्तनावरून तो विजापूरकरांच्या

नोकरींत राहिल्यानंतर याच्या मनोवृत्तींत कसा व कोणता फरक झाला, हें पाहणें आवश्यक आहे.

शहाजी विजापूरकरांच्या नोकरींत राहिल्यानंतर " मुसलमानांची सत्ता हिंदुस्थानांत प्रबळ असून ती उलथून पाडणें आपल्या अटोक्याबाहेरचें आहे; " अशी त्याची पूर्ण खात्री झाली; आणि सेवाधर्म पत्करून व यवनांची सेवा करूनच, कोणत्याही हिंदु पराक्रमी सरदारास प्राप्त करून घेणें शक्य असलेलें वैभव आपण प्राप्त करून घेणें हेंच आपल्या आयुष्यांतील इतिकर्तव्य आहे, अशी त्याची ठाम समजूत बनली. " यवनांचा द्वेष अथवा तिरस्कार करूं नये; " या शहाजीतर्फे, शहाजीच्याच सांगण्यावरून, करण्यांत आलेल्या उपदेशावरून ही गोष्ट अगदींच उघड होतें कीं, शहाजी आपल्या हितशत्रूबद्दल मनांतून कदाचित सारखा जळत असला तरी सुद्धां लौकिकदृष्टया त्यानें आदिलशाही सत्तेविरुद्ध द्वेष किंवा तिरस्कार कधींही दाखविला नाहीं; उलट तो कर्नाटक प्रांतांत बहुतेक स्वतंत्र होता तरी विजापूरकरांचा श्रेष्ठ अधिकार त्यानें कधींही झुगारून दिला नाहीं. शेवटपर्यंत तो आदिलशाहास " खाविंद " असेंच म्हणत राहिला, व त्याच्याच नांवावर शहाजीनें कर्नाटकमध्यें आपलें महत्त्व वृद्धिंगत केलें.

शहाजीनें शिवाजीस जो उपदेश केला, त्यावरूनही शहाजीच्या मनःस्थितीचा पुष्कळच बोध होतो. हिंदुस्थानांतील मुसलमानांची प्रबळ सत्ता उलथून पाडणें, ही गोष्ट ईश्वराधीन आहे, आपल्या हातची नाहीं, व ईश्वरी सत्तेनेंच ती हिंदुस्थानांत अस्तित्वांत व प्रबळ असल्यामुळें, त्याबद्दल विषाद मानणें योग्य नाहीं, अशी शहाजीची समजूत होती; व तिला अनुसरूनच, " बादशाहास दरबारी पद्धतीनें लवून कुरनिसात करीत जावा; " असा त्यानें शिवाजीस उपदेश केला होता. शिवाय, शहाजीच्या म्हणण्याप्रमाणें त्याला ( शहाजीला ) ह्या सर्व गोष्टी समजत होत्या; परंतु " मुसलमानी सत्तेशीं आम्ही फटकून वागलों असतों, तर आम्हाला हे वैभवाचे दिवस दिसले नसते, " असें त्याचें शिवाजीस सांगणें होतें; म्हणजे शिवाजीचें वर्तन योग्य, व तेजस्वीपणाचें आहे, अशी शहाजीची खात्री असूनही, तें काळवेळप्रसंगानुरूप नाहीं, असें त्याचें म्हणणें होतें. प्रसंग पाहून आपल्या

वर्तनाची दिशा बदलण्यांत जरी कित्येक वेळां स्वतःला कमीपणा आला तरी, त्यामुळें पुष्कळ वेळां आपणावरील भावी आपत्ती टळतात, हा स्वतःचा अनुभव शिवाजीच्या मनांत ठसवावा, असा त्याचा प्रयत्न होता. शिवाजीनें प्रसंग पाहून वागावें, म्हणजे त्याचे भावी आयुष्य सुखाचें जाईल, असें शहाजीचें मत होतें; म्हणजे आपले खरे विचार मनांत दाबून ठेवून, कालाला बगल देऊन, प्रसंग पडेल त्याप्रमाणें वागून, राजनिष्ठ राहून—शिरजोर होऊन त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या खडतर आपत्तीच्या भोंवऱ्यात न सांपडतां—आपणास सुखाचे दिवस आणून घ्यावे, व तें कायम राहतील अशाच प्रकारें राजनिष्ठेनें व सहकारितेनें वागत असावें, अशी शहाजीची मनोवृत्ती बनली होती, व त्याला अनुसरून तो स्वतः वागत असून आपणाप्रमाणेंच शिवाजीनेंही वागावें, अशी त्याची इच्छा होती; " लीनतेनें व आर्जवपूर्वक " वागूनच त्यानें अदिलशाहींत आपलें महत्व प्रस्थापित केलें होतें, आणि विजापूरचें राज्य " आपलेंच" आहे, अशी त्याची भावना होती; यावरून असेंही म्हणतां येईल कीं, या भावनेंत " स्वतंत्र स्वराज्य-संस्थापना " ही कल्पनाच मुळीं उत्पन्न होत नाहीं, व या कल्पनेचा उगमही शहाजीपासून निघालेला नाहीं; त्यामुळें शहाजीनें कर्नाटकमध्यें स्थापन केलेलें राज्य, हें " स्वराज्य " ह्या शब्दाच्या खऱ्या व्याख्येखालींच मुळीं येऊं शकत नाहीं. शहाजी शिवाजीस म्हणतो—" मागचा पुढचा विचार न करतां वागाल तर राज्यांतून हांकलून देतील, आणि पश्चाताप करण्याची पाळी येईल. " यावरून हें उघडच होतें कीं, शहाजी अद्दली घडून शहाणा झाल्या नंतर विचारी बनला; आपण अदिलशाहाशीं लीनतेनें व आर्जवपूर्वक वागलों नाहींतर आपली राज्यांतून हकालपटी होईल ही भीति नेहमीं त्याच्या मनांत जागृत राहिली; तो प्रसंग येऊं नये, म्हणून त्यानें अदिलशाहाशीं नेहमीं लीनतेचें व आर्जवाचेंच वर्तन ठेविलें,आणि ह्या सर्व गोष्टींचा विचार करून शिवाजीनेंही आपणाप्रमाणेंच वागावें, म्हणून त्यास शहाजीनें उपदेश केला; आणि शेवटीं " आम्ही मिळविलेली दौलत " तुमच्याकडे पुढें चालू रहावी, म्हणून तुम्हीही माझ्याप्रमाणेंच नम्रतेनें व आर्जवानें अदिलशाहाशीं वागा, असें त्यानें शिवाजीस बजाविलें. याचा अर्थ हा उघडच होतो कीं, मिळवि-

लेली दौलत जतन करण्याची उत्कट इच्छा, व ती आपल्या हांतून जाण्याची अनिवार भीति, यामुळेंच अदिलशाहापासून फूटून निघून स्वतंत्र होण्याची शहाजीस हिंमत झाली नाहीं. स्वतंत्र स्वराज्यस्थापना करण्याकरितां कर्नाटक-मधोल मांडलीकी जहागिरीवर पाणी सोडण्यास लागणारा प्रचंड स्वार्थत्याग त्याच्याच्यानें करवला नाहीं. शहाजीच्या ठायीं राष्ट्रीय भावना नव्हती असें नाहीं; त्याच्या ठायीं प्रबळ राष्ट्रीय भावना होती; तो तेजस्वी, पराक्रमी, व कर्तबगार वीर पुरुष होता; परंतु आशेचा लोभ, व प्रचंड स्वार्थत्यागाचा अभाव, ह्या मुळें, त्याच्या ठायीं राष्ट्रीय भावना वसत असूनही त्याला त्या भावनेला मूर्त स्वरूप देतां आलें नाहीं इतकेंच नाहीं तर, आपणाप्रमाणेंच राजनिष्ठ राहण्याविषयीं शिवाजीस उपदेश केल्यावांचूनही त्याच्याच्यानें राहवलें नाहीं. परंतु शहाजीची ही मनोवृत्ती व विचारसरणी शिवाजीसारख्या स्वतंत्र विचाराच्या राष्ट्रपुरुषाला केव्हांही मान्य होण्यासारखी नव्हती; शहाजीच्या ह्या विचारसरणीमुळें त्याच्या मांडलीकी राज्यांत अनेक व्यंगें राहिलीं; परंतु शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेंत असें एकही व्यंग नव्हतें; शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेचा पाया राज्यकर्त्यांच्या मेहेरबानीवर अथवा डळमळित मांडलीकी राज्याच्या पायावर उभारलेला नव्हता; स्वतंत्रतेच्या भक्कम पाया-वर उभारलेला होता. शहाजीच्या मांडलीकी स्वराज्यांत स्वार्थ मिसळलेला होता; शिवाजीचें स्वराज्य प्रचंड स्वार्थत्यागाच्या कोनशिलेवर उभारलेलें होतें. अदिलशाहाशीं मिंधेपणानें वागून स्वतःकरितां दौलत मिळविणें, मिळविलेली जतन करणें, व ती पुढील पिढीकरितां तशीच जतन करून ठेवणें, हें शहाजीच्या उत्तर आयुष्यांतील ध्येय होतें; उलटपक्षीं, प्रारंभापासूनच कोणाचाही मिंधा न होतां, अथवा राहतां, महाराष्ट्राचा उद्धार करण्याकरितां व महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन करण्याकरितां प्रचंड स्वार्थत्याग करून अहर्निश उद्योग करीत रहावा, हेंच शिवाजीच्या सर्व आयुष्यभर ध्येय होतें. आपणास स्वतंत्र स्वराज्यस्थापना करतां येईल, ही गोष्ट शहाजीस शक्य वाटत नव्हती; शिवाजीची, ही गोष्ट अशक्य नाहीं, अशी खात्री होती; शहाजीस, आदिलशाहाबरोबरील आपल्या नेहमींच्या व्यवहारांत, त्याला "खावंद" या धनीपणाच्या नात्यानें, नेहमींच श्रेष्ठ मान द्यावा लागत असे; शिवाजीला

कोणालाही खाविंद म्हणण्याची इच्छा नव्हती; व त्यानें कधीं कोणास तो श्रेष्ठत्वाचा मान दिलाही नाहीं. शहाजी अखेरपर्यंत परतंत्र राहिला; शिवाजी प्रारंभापासूनच स्वतंत्र राहिला; ह्या सर्व गोष्टी, हेंच शहाजी व शिवाजी यांच्या चरित्रांमधील वैशिष्य आहे, आणि त्यामुळेंच स्वराज्यसंस्थापनेचें श्रेय, शिवाजीच्या बरोबरीनें शहाजीस देतां येणार नाहीं, हें उघड आहे.

तथापि शहाजीनें महाराष्ट्राच्या इतिहासांत बजावलेली कामगिरी शिवाजी-च्या खालोखाल अत्यंत श्रेष्ठ दर्जाची आहे, यांत कांहींही संशय नाहीं. तत्कालीन सर्व मराठा सरदार मंडळींत राष्ट्रभावना नव्हती, अथवा सर्वच मराठे सरदार अधम संस्कृतीचे होते, असें म्हणतां येणार नाहीं. कांहींत नसली तरी कांहींत राष्ट्रभावना होती;व उच्च संस्कृतीहि होती; पण स्वराज्या-करतां आपल्या जहागीरीवर, इतकेंच नाहीं तर सर्वस्वावर पाणी सोडणारा प्रचंड स्वार्थत्याग त्यांच्या ठायीं नव्हता; आणि दक्षिणेंतील, व हिंदुस्थानांतील प्रबळ मुसलमानी सत्ता आपणास उलथून पाडतां येईल, ही गोष्ट त्यांना अशक्य वाटत होती; म्हणूनच त्यांनीं तसा उद्योग अंगावर घेण्याचे धाडस केलें नाहीं. परंतु तोच उद्योग शहाजीनें आपल्या अंगावर घेतला, व तो पुष्कळच प्रमाणांत सिद्धीस नेला, हेंच इतर मराठे सरदार व शहाजी यांच्या मधील महत्वाचें वैशिष्य आहे. आदिलशाहाची चाकरी करून, स्वतःला मनसबदारी मिळवून घेऊन, फक्त स्वतःचा फायदा करून घेणें, इतकीच निव्वळ आकुंचित वृत्ती शहाजीची नव्हती. शिवाजीच्यावेळीं राजकीय परिस्थिती बदलली; काळ बदलला, ही गोष्ट निराळी; पण शहाजीनेंही मर्यादित वर्चस्व-क्षेत्रांतील आपल्या मांडलीकी स्वदेशांत स्वधर्म, स्वभाषा, व स्वजन, यांचें पालन लालन व रक्षण केलें, ह्या आदरणीय गोष्टी, शहाजी आकुंचित वृत्तीचा असता तर त्याच्या हांतून कधींच झाल्या नसत्या. शहाजीच्या काळांतच इतर अनेक मराठे सरदार शहाजी सारखेच शूर व पराक्रमी असूनहि ते मुसलमानी राज्यांत वरिष्ठ दर्जाची मनसबदारी मिळविण्यांत व ती कायम ठेवण्याकरितां राज्यकर्त्यांशीं एकनिष्ठ राहण्यांत भूषण व आपल्या आयुष्याचें इतिकर्तव्य मानीत; पण शहाजीप्रमाणें मुसलमान राज्यकर्त्याविरुद्ध राजरोस हातांत शस्त्र घेऊन उभें राहण्याचें त्यापैकीं एकानेंही मनांत आणिलें नाहीं, अथवा तसें

वागण्याची एकाचीहि छाती झाली नाहीं, ही एकच गोष्टसुद्धां शहाजीचा अलौकिक पराक्रम व अचाट धाडस याची निदर्शक असून त्यावरूसुद्धां शहाजी हा एक अलौकिक पुरुष होऊन गेला, आणि स्वराज्य स्थापनेच्या मर्यादित कल्पना, शहाजीच्या वेळींच अत्यंत अंधुकपणें, व अत्यल्पांशानें कां होईना, पण उदय पावण्यास सुरवात झाली, असें म्हणणें वस्तुस्थितीस धरून होईल, हें उघड आहे.

शहाजीची निजामशाहींतून हकालपट्टी झाल्यावरहि आणि शहाजी हा विजापूरकर आदिलशहा , व प्रत्यक्ष मोंगल बादशाहा यांच्याशीं झगडला असतांनाहि, त्याला विजापूरकरांचा आश्रय कां मिळाला, व त्याला कर्नाटकांत एक मांडलिकी राज्य कां स्थापन करतां आलें, यांच्या कारणांचाही या ठिकाणीं विचार केला पाहिजे; व तो, तत्कालीन इतर मराठे मनसबदार व शहाजी यांच्या राजकीय स्थितीमध्यें कोणता महत्वाचा फरक होता, हें लक्षांत घेऊन त्या संबंधी विवेचन केलें पाहिजे. तत्कालीन इतर मराठे मनसबदार, हे त्यावेळीं सैन्य बाळगून होते; पण फार तर पांच ते दहा पंधरा हजार सैन्याचेच ते मालक होते; व त्यांची हत्यारें व सरंजामहि जय्यत स्थितींत नव्हता; अर्थात अशा तुटपुंज्या सैन्याच्या, व सैन्य सामुग्रीच्या बळावर मनसबदारांना कोणत्याहि एकट्याच सुद्धां मुसलमानी शाही विरुद्ध राजरोस हातांत शस्त्र घेऊन उभें राहणें केव्हांहि शक्य नव्हतें; उलटपक्षीं शहाजी हा साठ सत्तर हजार प्याद्यांचा, व घोड्यांचा मालक होता; अत्यंत बलिष्ठ मनसबदार होता; शहाजीचीही मनसबदारी एकाद्या शहाला शोभेल अशीच मोठी तोलदार, ताकदार व तयार फौज बाळगणारी अशी अतीशयच वरचढ होती; हें सैन्य हाच शहाजीच्या उत्कर्षाचा मुख्य आधार होता हीच फौज शहाजीस त्याच्या आपत्कालीं पाठीराखी होती; आणि याच सैन्याच्या जोरावर, स्वतःचा शक्य तितका उत्कर्ष करून घेण्याचा शहाजीचा इरादा व निश्चय होता. शहाजीनें ह्या आपल्या सैन्याला अत्यंत प्रेमानें वागवून त्याच्या ठायीं आपलेपणा उत्पन्न केला होता; व शहाजीच्या ममताळू वागणुकीमुळें हें त्याचें सैन्य त्याच्याकरितां प्राण देण्यासहि तयार होतें.

उत्तम कारीगार हत्यार कोठून पैदा होतें, व कोण आणून देतो, ह्याचा अनुभव जुन्नरच्या घाटाखालील कोंकणांत शहाजीस आलेला होता; म्हणून दीव, दमण, गोंवा, वसई, सुरत, तालेचरी वगैरे ठिकाणच्या युरोपियन लोकांकडून कारीगार हत्यारें पैदा करून निजामशाही, आदिलशाही, व मोंगलाई सैन्याहून शहाजीनें आपलें सैन्य अधीक कर्तबगार ठेविलें होतें; सैन्य व हत्यार यांच्यावरील त्याचा अढळ विश्वास अत्यंत आपत्तीच्या प्रसंगीही कायम होता या जय्यत सैन्याच्या जोरावर कधीं आपल्या बलिष्ठ प्रतिस्पर्ध्याशीं झगडून तर कधीं बगल देऊन, तो उत्तरोत्तर आपलें वर्चस्व वृद्धिंगत करीत चालला होता; आणि याच शक्ती व साधनाच्या जोरावर आपण शेवटीं आपल्या अंगिकृत कार्यांत यशस्वी होऊंच होऊं, अशी त्याची पूर्ण खात्री होती.

शहाजी मोंगल बादशाहीशीं झगडल्यानंतरहि त्याला नामशेष करण्याचा नुसता प्रयत्न करण्याचीसुद्धां शहाजहान याची छाती झाली नाहीं; याचें कारण शहाजीचें दांडगें सैन्यबळ हें होतें; इ० सन १६३६ मधील निजामशाहीविरुद्धची मोहीम पावसाळ्याच्या आंत खलास करण्याचे शहाजहानचें सर्व अंदाज शहाजीनें हुकविले, आणि शहाजी म्हणेल त्या अटीवर मोहीम कशी तरी शहाजहान याला संपवावी लागली, हा शहाजीच्या करामतीचा अनुभव शहाजहान यांस मिळालेला होता; शहाजीस दमांत उखडून त्याचें लष्करी बळ आदिलशाहा व शहाजहान यांनीं खच्ची केलें, तें शहाजीस पुन्हां निजामशाही उभी करतां येणार नाहीं, या व्याप्तीपर्यंतच फार तर खच्ची झाले होतें; त्यामुळें शहाजीची लष्करी सत्ता आदिलशाहास व थोड्या फार प्रमाणांत शहाजहान यांस भीतिदायक वाटणारी अशीच कायम होती; म्हणजे शहाजीची ही दांडग्या सैन्यबलानें विभूषित असलेली मनसबदारी ही मोठीच तोलदार होती; तिला कह्यांत ठेवणें मोठेंच जिवावरचें, नाजुक व संकटाचें काम होतें; सुखविली तर ती आयतीच अलगज प्रेमानें उरावर बसते, आणि दुखविली तर रागावून प्राण घेते," अशी दोन्हीकडून ही भीतिप्रद असणारी ही मनसबदारी होती; म्हणून इ० सन १६३६ नंतर शहाजहान शहाजीच्या वाटेस कधींहि गेला नाहीं, व निजामशाही नष्ट झाल्यानंतर त्यानें शहाजीचें हें प्राणसंकट आपल्या गळ्यांतहि बांधून घेतलें नाहीं;

पण शहाजीस मोकळे ठेवणेंहि तितकेंच धोक्याचें असल्यामुळें त्यानें त्याला मोकळेंहि सोडलें नाहीं. आपल्या पंजाखालून निसटून जाऊं शकणाऱ्या शहाजीला, आपल्या पंजाखालीं पूर्णपणें दाबून ठेवण्याचा अंतस्थ डाव शहाजहान याच्या मनांत असल्यामुळें, आदिलशाहींत नौकरींत राहण्याची त्यास परवानगी देऊन, म्हणजे अप्रत्यक्षपणें आदिलशाहास–आपल्या मांडलीक असलेल्या विजापूर दरबारास–शहाजीस नौकरांत ठेवून घेण्याविषयीं सुचवून, शहाजीच्या प्रचंड लष्करी सत्तेस त्यानें परभारें दाबांत ठेवण्याचें राजकारण साधलें. त्यांतहि पुन्हां, शहाजहान याचा दुसराहि एक राजकारणाचा डाव असण्याचा संभव आहे. तो असा कीं, आदिलशाहानें शहाजीची प्रचंड लष्करी शक्ती दाबांत ठेविली तर भावी काळांत आदिलशाही खातांना एका प्रबळ हिंदु लष्करी सत्तेचा होणारा अडथळा परभारें व त्रासाशिवाय नाहींसा झाला असें होईल; आणि शहाजीच्या लष्करी बळानें आदिलशाहास निःसत्व केलें तर थोड्याशा सायासानें शहाजीचें लष्करी बळ चिरडून टाकून, आदिलशाही खाऊन टाकण्याच्या प्रयत्नांत होणारा पुष्कळच त्रास, शहाजीच्या करणीनें वांचून सहजासहजीं आदिलशाही राज्यलक्ष्मी आपल्या घशाखालीं उतरवितां येईल; आदिलशाहा व शहाजी या उभयतांचे लष्करी बळ एकवटलेलें असतांना आदिलशाहीचा बडा घांस शहाजहानला आपल्या घशाखालीं उतरवितां येणें फारच कठीण होतें; आणि हा घांस फोडून खावयाचा तर आदिलशहा किंवा शहाजी या उभयतांना परस्पराविरुद्ध लढवून, अथवा त्यांना किंवा त्यांपैकीं एकाला निःसत्व करवून, नंतरच तो खातां व पचवितां येणें शक्य होतें; व याच दूरदृष्टीच्या धोरणानें शहाजहान यानें शहाजीस आदिलशाहाच्या पदरीं नौकरीस राहण्याची परवानगी दिली होती. उलटपक्षीं, यावेळीं आदिलशाही राज्य प्रबळ स्थितींत नव्हतें; व स्वतः आदिलशाहा निधड्या छातीचा नसून दुर्बल प्रवृत्तीचा राज्यकर्ता होता; त्यामुळें शहाजीचें लष्करी बळ आदिलशाही राज्याची सत्ता वृद्धिंगत करण्यास, व मोंगल बादशाहीच्या अतिक्रमणास आळा घालून आदिलशाही जगविण्यास, अतीशय उपयोगाचें होईल, या हेतूनें त्यानें शहाजीस आपल्या पदरीं आश्रय दिला; त्यामुळें आदिलशाही राज्याचा बराच फायदा होऊन,

इ० सन १६५७–५८ मध्यें, अवरंगझेबाच्या तडाक्यांतून आदिलशाही जगली; तथापि एकंदरीनें पाहतां, आदिलशाहाच्या उद्दिष्ट हेतूच्या मानानें अगदींच निराळा परिणाम घडून आला. शहाजीचें विजयोत्पादक सैन्य आपल्या ताब्यांत ठेवण्याची आदिलशाहाची कुंवत नव्हती; शहाजींसारख्या रणविद्याविशारद सेनानायकाला आपल्या दाबांत ठेवण्याइतका तो कर्तृत्ववान नव्हता; शहाजींच्या सशस्त्र व सज्ज सैन्याचे ज्वलत् घटकावयव आपल्या नियंत्रणाखालीं दाबून ठेवण्याला आवश्यक असणारे, त्याहून अधिक जबरदस्त व यथातथ्य लष्करी बळ, त्याच्या संग्रहीं नव्हतें; " शहाजीचें लष्करी बळ " हें आदिलशाहाच्या हातांतील एक खात्रीचें सर्वदाहक अस्त्र होतें; पण आदिलशाहींतील राजकीय तराजूच्या एका तागडींतील शहाजींच्या प्रचंड लष्करी बळाचा भार समतोल ठेवण्याकरितां प्रतितोलाचें असें कोणतेंही वजन दुसऱ्या तागडींत टाकण्यास आदिलशाहाच्या संग्रहीं नव्हतें; त्यामुळें शहाजींच्या लष्करी बळास डवचळण्याचा आपणाकडून थोडासाहि प्रमाद घडला, तर तेंच अस्त्र अनावर होऊन, राजकीय वातावरणांत एकदम उलथापालथ केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आदिलशाहास भीति होती; तें बळ अनियंत्रित होऊं नये, म्हणून तो अतीशय खबरदारी घेत होता; शहाजीस राजधानींत आपणाजवळ ठेवून घेण्यास उत्सुक नव्हता; शहाजीस कोठें तरी लांबवर अडकावून टाकून आपला जीव, व राज्य सुरक्षित करावें, असा अदिलशाहाचा हेतु होता; आणि त्यामुळेंच त्यानें शहाजीस, कर्नाटकप्रांत अदिलशाही हुकमतीखालीं आणून तिकडे शांतता प्रस्थापित करण्याची कामगिरी सोंपविली होती. यांत दोन्हीं दृष्टीनेंहि अदिलशाहाचा फायदाच होता. अदिलशाहानें कित्येक वर्षे, अनेक मुसलमान सरदार पाठवून कर्नाटक प्रांत हस्तगत करून घेण्याचे प्रयत्न केले होते; परंतु ते सर्व निष्फळच झालेले होते. त्यामुळें शहाजीस कर्नाटक प्रांतीं पाठवावें, म्हणजे एक तर तो कर्नाटकप्रांत जिंकून तेथें आदिलशाही सत्ता स्थापन करील, व त्यामुळें आपल्या राज्याची, व वसुलीची वृद्धी होईल; अथवा कर्नाटकमधील शिरजोर, श्रीमंत व सशस्त्र राज्यकर्ते, व पाळेगार, यांच्या जात्याच्या दोन तळींत, शहाजीची लष्करी शक्ति भरडली जाऊन, शहाजीच्या भीतीपासून आपली

परभारेंच मुक्तता होईल. अशा दोन्हींपैकीं कोणत्याही दृष्टीनें फायदेशीर असलेल्या हेतूनें अदिलशाहानें शहाजीस कर्नाटक प्रांतीं पाठविलें होतें; परंतु त्यामुळें अदिलशाहाचा पहिला उद्देश सिद्धीस गेला नाहीं; उलट शहाजीनें कर्नाटक प्रांतीं जाऊन आपल्या सैन्यबलानें, अदिलशाहाच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांचा पाडाव करून, आपल्या लष्करी बळाची तीव्रता, व सामर्थ्य, हीं अदिलशाहाच्या नजरेस आणून दिली. त्यामुळें जरी बाह्यात्कारीं अदिलशहानें शहाजीस दाबांत ठेवण्याचा आव आणिला, तरी त्याच्या अंतर्यामीं शहाजी संबंधाची भीति कायम राहिली; शहाजी जितका लांब राहील तितका बरा असें त्यास वाटूं लागलें; पण तो स्वतंत्र होऊं नये, म्हणूनही तो त्याच्या हालचालीचें बारकाईनें निरिक्षण करीत राहिला; आपल्या श्रेष्ठ अधिकाराचें बेगडी प्रदर्शन करण्याकरितां त्याने( अली अदिलशाहा यानें )शहाजीस बंकापूर येथें कैद केलें; पण शहाजीचें लष्करी बळ त्याच्या डोळ्यापुढें दिसत असल्यामुळें, त्यानें फक्त दोनच दिवसांनंतर शहाजीची प्रतिबंधांतून मुक्तता केली, व कित्येक दिवसपर्यंत त्याचा अधिकार काढून घेतल्याची बतावणी करून नंतर त्यानें त्यास पुन्हां पूर्वीप्रमाणें अधिकारापन्न केलें. अदिलशाहाची व त्याच्या राज्याची ही दुर्बलता शहाजी ओळखून होता; तत्कालीन राजकीय परिस्थितीचें त्यानें पूर्ण आकलन केलें होतें; आपल्या लष्करी बळाच्या जोरावर तो अदिलशाहास प्रसंगीं भिववीत होता; त्यामुळें; त्यानें ह्या गोष्टींचा शक्य तितका पूर्णपणें फायदा घेण्याचा निश्चय केला; प्रयत्न आरंभिला; व स्वतःच्या कर्तबगारीवर कर्नाटकमध्यें, एक मांडलीकी कां होईना, मराठ्यांचें राज्य निर्माण केलें, ही गोष्ट शहाजीचें असामान्य कर्तृत्व, असाधारण योग्यता, व अलौकिक कार्यक्षमता, यांची निदर्शक असल्याचें उघड उघडच सिद्ध होत आहे.

शिवाजीनें भावी काळांत अंगावर घेतलेल्या स्वराज्य संस्थापनेच्या कार्यात त्याला शहाजीची पुणें प्रांतांतील जहागीर, सैन्य, संपत्ति, मुत्सद्दी मंडळ इतक्या देणग्या शहाजीकडून मिळाल्या; व या सर्व साधनांचा, आणि शहाजीच्या नांव लौकिकाचा, आपणांस जितका फायद्याचा करून घेतां येणें शक्य आहे, तितका सर्व शिवाजीनें करून घेतला; तथापि शहाजीच्या वेळेपर्यंत

नांवाजलेले व पराक्रमी मराठे सरदार मुसलमानी राज्यांची सेवा करण्यांत भूषण मानीत होते; त्यामुळें ही सरदार मंडळी शिवाजीस त्याच्या स्वराज्य संस्थापनेच्या कार्यांत साह्यभूत तर झाली नाहींच, पण उलट शिवाजीच्या स्वराज्य स्थापनेस प्रारंभापासून त्यांनीं सारखा विरोधच केला; जेधे, बांदल, वगैरे नांवाजलेली थोडीशी अपवादादाखलची मंडळी सोडून दिली तर शिवाजीला प्रारंभी अनुकूल झालेली मंडळी पूर्व प्रसिद्ध व विशेष नांवाजलेली नसून, त्यांना राजकीय क्षेत्रांत म्हणण्यासारखें महत्वहि नव्हतें; अर्थात या मंडळींच्या मदतीनें, व लोकसंग्रह करीत राहून त्यांच्या साह्यानें, शिवाजीनें अचाट अद्वितीय पराक्रम करून जें स्वराज्य संस्थापनेचें कार्य सिद्धीस नेलें, त्या यशाचा शहाजीस वांटेकरी करतां येईल, असें म्हणतां येत नाहीं. परंतु त्यामुळें शहाजीनें बजाविलेली श्रेष्ठ व असामान्य कामगिरी कमी दर्जाची होती, असें म्हणणेंहि योग्य होणार नाहीं; शिवाय शहाजीनें केलेली अनेक पराक्रमाचीं, साहसाचीं व शौर्याचीं कृत्यें शिवाजीस त्याच्या भावी राज्य संस्थापनेच्या कार्यांत मार्गदर्शक झालेली असल्यामुळें, परंपरेनें कां होईना; पण शहाजीची शिवाजीस त्याच्या उद्दिष्ट कार्यांत मदत झाली नाहीं, असें म्हणणेंहि वस्तुस्थितीस धरून होणार नाही. म्हणजे शिवाजीच्या स्वराज्य संस्थापनेंत त्याला शहाजीची अप्रत्यक्षपणें मदत झाली, ही गोष्ट निर्विवाद आहे.

शहाजी व शिवाजी यांची तुलना करितांना एके ठिकाणीं ( A History of the Maratha People Part I Page 207-208 पहा. ) असें लिहिलें आहे कीं, " कार्थेज येथील प्रसिद्ध योद्धा ह्यामिलकार याचा मुलगा हॅनिबाल हा त्याच्याहून अधिक कर्तृत्ववान निपजल्यामुळें त्याच्या किर्ती वृक्षाखालीं ह्यामिलकाराची कीर्ति पार झांकली गेली, त्याप्रमाणेंच शिवाजीच्या कीर्तिवृक्षाखालीं शहाजीची कीर्तिही पार झांकली गेली. तथापि ह्यॅमिलकार व शहाजी यांनीं आपल्या कर्तृत्वानें जें कार्य घडवून आणिलें, त्यामुळेंच हॅनीबाल व शिवाजी या उभयतांना, त्यांनीं भावी काळांत जीं महत्कृत्यें केलीं, तीं करणें साध्य झालें. ह्यामिलकार यानें आपल्या सिसिलीमधील किल्ल्यांतून आपल्या देशबांधवांची अशी खात्री करून दिली की, उत्तम सेनापति, आणि सैन्याच्या हालचाली करण्याचें

कौशल्य ह्या गोष्टी साध्य असल्या तर कार्थेजियन सैन्याला रोमन लोकांच्या श्रेष्ठ प्रतीच्या कवायती पायदळ सैन्याशीं झगडून आपल्या ताब्यांत असलेलें तसेंच ताब्यांत ठेवितां येतें; त्याप्रमाणेंच शहाजीनेंही आपल्या दक्षिणेंतील बांधवांच्या असें निदर्शनास आणून दिलें कीं, हिंदु सेनापतींच्या हाताखालील हिंदु सैन्य, स्थानिक माहिती, व सैन्याच्या जलद हालचाली, यांच्या योगानें दिल्ली अथवा विजापूर येथील निवडक सैन्याबरोबर तोडीस तोड असा सामना देऊं शकतें. शिवाय शहाजीस जर खरोखरीच दिल्ली व विजापूर या उभयतांपैकीं कोणत्याही एकाच सत्तेशीं झगडावें लागलें असतें, तर त्यानें बहुधा अहंमदनगरचें राज्य पुन्हां स्थापन केलें असतें; व एखादें कळसूत्रीं बाहुलें तेथील गादीवर स्थापन करून, आपण त्याच्या नांवानें राज्यकारभार चालविला असता; परंतु त्यामुळें मराठ्यांना कितपत सौख्यलाभ झाला असता, याची शंकाच आहे; कारण ह्या शहाजीच्या राज्यांतहि निजामशाही राज्याच्या परंपरेप्रमाणेंच क्रौर्य, विश्वासघात, आणि खून यांची परंपरा चालूच राहिली असती; परंतु शहाजीस स्वराज्य संस्थापनेंत जें अपयश आलें, त्यामुळेंच शिवाजीस, एक अगदींच पूर्णपणें नवें, आणि एकंदरीनें विचार केला तर, ज्या राजकीय गुन्ह्यांमुळें, हिंदुस्थानांतील बहुतेक राज्यांच्या इतिहासास कलंक लागलेला आहे, व जे इंग्लंड व स्कॉटलंडच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या काळांतहि अनेक वेळां घडलेले आहेत, अशा राजकीय गुन्ह्यांपासून मुक्त असलेलें × असें अपूर्व राज्य स्थापन करितां आलें." यावरून, शहाजीची योग्यता, शहाजी व शिवाजी यांच्या कार्याची व्याप्ति, व शिवाजीनें स्थापन केलेल्या स्वराज्याचें श्रेष्ठत्व, हीं स्पष्टपणें निदर्शनास येतात.

शहाजीची कर्नाटक प्रांतांतील मांडलिकी राज्याची स्थापना, ही प्रांतिक स्वरूपाची व मर्यादित व्याप्तीची होती. परंतु मांडलिकी राज्याच्या ध्येयास शिवाजीनें गौणस्थान दिलें; त्यामुळें त्याची स्वराज्य स्थापना राष्ट्रीय स्वरूपाची

---

× मराठ्यांच्या इतिहासांत, फक्त एकच राजपुरुषाचा खून झालेला असून तो म्हणजे नारायणराव पेशवे याचा, त्याचा काका रघुनाथराव यानें केलेला खून, हा होय.

झाली; व नानाप्रकारचा लोकसंग्रह करून, त्याची राष्ट्रीय कार्यासाठीं एक अमोघ शक्ति बनविण्याची ताकद शिवाजीच्या ठायीं उत्पन्न झाली. मुसलमानी राज्यांत तोलदार मनसबदारी मिळविणें, ह्या गोष्टीस शहाजीच्या काळापर्यंत जें एक प्रकारें विशिष्ट महत्त्व प्राप्त झालें होतें, तें शिवाजीच्या राष्ट्रीय धोरणामुळें कमी कमी होण्यास प्रारंभ झाला; मुसलमानी राज्यकर्त्यांनीं दाखविलेल्या मनसबदारीच्या लालूचीकडे दुर्लक्ष करून, शिवाजीच्या राष्ट्रीय कार्यालाच आपण मदत करीत राहावें, अशा प्रवृत्तीचे नरस प्रभु, दादाजी नरस प्रभु, कान्होजी व बाजी सर्जेराव देशमुख, बाजी पासलकर, येसाजी कंक, तानाजी मालुसरे, फिरंगोजी नरसाळा, बाजी प्रभु, मुरार बाजी, बाबाजी व यशवंतराव बोवाजी सारखे अनेक एकनिष्ठ जवानमर्द निर्माण झाले; शिवाजीविरुद्ध मुसलमान राज्यकर्त्यांना मदत करणें, ही गोष्ट शिवाजीनें स्थापन केलेल्या राष्ट्राच्या हितास, अत्यंत विघातक आहे, असा विचार तत्कालीन महाराष्ट्रांतील नव्या पिढींतील कित्येक लोकांच्या मनांत येण्यास, व कृतींत उतरण्यास सुरवात झाली; शहाजीच्या काळांत अशा मतांचा प्रवाह जनतेंत सुरू झाला नव्हता; त्यामुळें मुसलमानी राज्यकर्त्यांच्या महत्त्वाला आव्हान करणें ही गोष्ट अशक्य कोटींतील होऊन बसली होती; म्हणजे शहाजीच्या राज्य संस्थापनेच्या काळांत, त्याच्या अपयशास सुद्धां, ह्याच राष्ट्रीय विचारांचा आभाव, हेंही एक बलवत्तर कारण झालें होतें; इतकेंच नाहीं तर प्रत्यक्ष शिवाजीलाहि मुसलमानी सत्ताप्रमाणेंच, मराठे सरदार मंडळींशींहि झगडून आपल्या स्वराज्याचा पाया स्थिर व भक्कम करावा लागला होता. महाराष्ट्रांत त्या काळीं निजामशाही टिकली काय, आदिलशाही राहिली काय, अथवा मोंगली बादशाही झाली काय, तीन्हींहि एकतंत्री शाह्या मराठ्यांच्या दृष्टीनें महाराष्ट्राला सारख्याच पारतंत्र्यांत डांबून ठेवणाऱ्या होत्या; फार तर यापैकीं कोणाची राज्यव्यवस्था अधिक सह्य व सुखकर झाली असती, एवढाच काय तो एक फरकाचा प्रश्न राहिला असता, पण त्यामुळें महाराष्ट्राची राजकीय उन्नती होणें शक्य नव्हतें; अशा स्थितींत मुसलमानी अमलाची महाराष्ट्रावरील पक्कड ढिली पडण्याकरितां, राष्ट्रीय स्वरूपाची चळवळ सुरू करणें, एवढाच एक रामबाण उपाय असल्यामुळें,

तोच शिवाजीनें हातीं घेतला, व त्यामुळेंच, ज्या कारणामुळें बहुतांशीं शहाजीस अपयश आलें, तें प्रमुख कारण नाहींसें होऊन, शिवाजी आपल्या आंगीकृत कार्यांत यशस्वी झाला.

शहाजीनें निजामशाही व आदिलशाही राज्यांत असतांना, स्वतःच्या हिंमतीवर केलेल्या प्रचंड उद्योगांतील कित्येक गोष्टी–जरी शहाजीला आपल्या उद्योगांत अपयश आलें तरी,–शिवाजीस त्याच्या भावी राष्ट्र संस्थापनेंत व संवर्धनांत मार्गदर्शक झाल्या; शहाजीचें उदाहरण लक्षांत ठेवून एकाच वेळीं अनेक शत्रू उत्पन्न होणार नाहींत अशी त्यानें खबरदारी घेतली; ज्या शत्रूशीं प्रत्यक्ष युद्ध चालू नसेल, त्याच्याशीं आगळिकीनें त्यानें शत्रुत्व उत्पन्न केलें नाहीं; आपल्या स्वराज्य संस्थापनेच्या कार्यांत मिळेल तितकें यश, व होईल तेवढा फायदा, यांचा त्यानें अव्हेर केला नाहीं; शहाजीच्या उद्योगाची चिकाटी तो विसरला नाहीं; आणि निराशेचें किंवा अपयशाचें दुःखही त्याला जाणवलें नाहीं; शहाजीजवळ सैन्य थोडें होतें; शिवाजीनें ती उणीव भरून काढिली; शहाजीजवळ तोफा व पायदळ सैन्य नव्हतें; त्यामुळें त्यास अहमदनगरसारखीं शहरें सुद्धां घेतां आलीं नाहींत; शिवाजीनें तोफा, व पायदळ सैन्य, यांचा मुबलक सरंजाम सज्ज ठेवून कित्येक किल्ले लढून घेण्यांत त्यांचा उपयोग केला; शहाजीनें नाशिकपासून चांदवड पर्यंतचे, मनमाड जवळील अणकाई, टणकाई, औंध, पट्टा, साल्हेर, मुल्हेर, मालेगांव जवळील धोडप वगैरे सत्तावीस किल्ले एक महिन्यांत हस्तगत करून घेतले; पण त्यांत पूर्ण बंदोबस्त करून प्रसंगीं प्रत्येक किल्ला लढविण्याची व्यवस्था करण्यास त्यास अवसर सांपडला नाहीं; त्यामुळें मोंगलांनीं हे सर्व किल्ले तितक्याच वेळांत पुन्हां परत आपल्या ताब्यांत घेतले; शिवाजीनें प्रत्येक किल्ला हस्तगत करून घेऊन तेथें तो कित्येक महिने लढविण्याचा उत्तम बंदोबस्त केल्यावर दुसरा याप्रमाणें अनेक किल्ले हस्तगत केले, व नेहमीं पुष्कळ पैसा खर्च करून त्या किल्ल्यांची उत्तम व्यवस्था ठेविली; त्यावेळीं जवळच्या मंडळींनीं, " किल्ले बहुत झाले; विनाकारण पैका खर्च होतो, " असा अर्ज केला; तेव्हां शिवाजी त्यांना म्हणालाः–" जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखितो तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत; तारवांस खिळे मारून बळकट करितात

तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे; किल्ल्यांच्या योगानें औरंगशहा ( अवरंगझेब ) सारख्याची उमर गुजरून जाईल. " ( म. सा. छो. बखर पान ३९ पहा. ) त्याप्रमाणेंच ( शिव दिग्विजयांत लिहिल्याप्रमाणें म्हणावयाचें ( म्हणजे, ) " आपणास धर्म संस्थापना व राज्य संपादन करणें; सर्वांस अन्न लावून, शत्रू प्रवेश न होय, तें किल्ल्यांमुळें होतें; सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा ( मोंगल बादशहासारखा ) शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुनें तीनशें साठ किल्ले हजरतीस ( आपल्या ताब्यांत ) आहेत; एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी तीनशें साठ वर्षें पाहिजेत. " यावरून शिवाजीस किल्ल्यांचें किती महत्त्व वाटत होतें, व शहाजीचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून तो किती दक्षतेनें वागत होता, हें कळून येतें.

शिवाजीनें महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापना केल्यानंतर इ. सन १६६२ मध्यें त्या स्वराज्याची शहाजीनें जी कामागिरी बजाविली, तिचाहि उल्लेख " शहाजीची योग्यता " या दृष्टीनें या ठिकाणीं करणें आवश्यक आहे. शिवाजीनें सांवत, दळवी, घोरपडे, जंजिरेकर वगैरे प्रमुख सत्ताधाऱ्यांना आपल्या योग्य दाबाखालीं आणिलें; अफ्जलखान व सिद्दीजोहार यांचे शिवाजीपुढें कांहीं न चालतां, उलट आदिलशाही सैन्याची नासाडी झाली, शिवाजीनें आदिलशाही राज्यावर आपला शह बसविला, तिकडे कर्नाटकमधील बंड सारखे बळावत चालले, व इकडे महाराष्ट्रांत शिवाजी व तिकडे कर्नाटकांत शहाजी, हे उभयतां अत्यंत प्रबळ झाले; शिवाजीनें आत्मयज्ञाच्या जोरावर आदिलशाहीशीं झुंजत राहून तिचें मनुष्यबळ, व द्रव्यबळ सारखें आटवीत राहण्याचा धडाका चालविला, वगैरे गोष्टींमुळें आदिलशहास दहशत बसली; या एकंदर राजकीय अस्वस्थतेमुळें तो अतीशय भिऊन गेला; शिवाजीशीं सामोपचारानें सख्य करावें, असा त्यानें विचार केला; व शिवाजी वळला तर शहाजीमार्फतच वळेल, असें जाणून, त्यास विजापूर येथें बोलावून घेऊन, शिष्टाईच्या मार्गानें शिवाजीशीं सख्यत्व करून देण्याची कामागिरी त्यास आदिलशहानें सोंपविली. ज्यावेळीं आदिलशहाच्या बाजूस अधीक शक्ति असून शिवाजी तुल्यबल नव्हता, त्यावेळीं अशा शिष्टाईचा मार्ग स्वीकारणें आदिलशहाच्या स्वप्नांतहि येण्याचें कारण नव्हतें; आणि ही शिष्टाई त्यावेळीं जर शिवाजीनें सुरू केली

असती तर ती याचक वृत्ती आहे, असें म्हणून आदिलशाहानें ती लागलीच फेंटाळून लाविली असती; पण शिवाजी आपणांहून बलाढ्य, निदान तुल्यबल, झाल्याची आदिलशहाची खात्रीं झाल्या-बरोबर याचकवृत्तीचें शिष्टाईत रूपांतर झालें; व शहाजीच्या मध्यस्थीनें शिवाजी व आदिलशाहा यांच्यामध्यें तह घडून आला, व तो आदिलशहास व त्याच्याहूनहि पुष्कळच अधीक प्रमाणांत शिवाजीस फायदेशीर झाला. विजा-पूरकराबरोबरील युद्ध, व शहाजीमार्फत आदिलशहाशीं झालेला तह, यामुळें कल्याणपासून तहत बेदनूर पर्यंत कोंकण किल्ले सुद्धां राज्य शिवाजीचें झालें; विजापूरची पादशाहत फार करून त्यांनीं घेतली.'' आणि वस्तुतः यावेळेस शिवाजीनें स्वराज्याची स्थापना संपूर्ण केली. ''शिवाजीची अगदीं प्रथमची अडचण निराळीच होती. विजापूरच्या ताबेदारींत मोठमोठीं सरदार घराणीं गुंतलेलीं होतीं. त्यांचें मनांत शिवाजीबद्दल अभिमान अगर पूज्य बुद्धि नव्हती व ती असण्याचें कारणही नव्हतें. हे सर्व सरदार आदिलशाहीचे पिढीजाद नौकर असून, स्वतंत्र राज्यस्थापना त्यांस कितीही संमत असली तरी ते त्या कामीं पुढाकार घेण्यास समर्थ नव्हते. मावळे लोक शिवाजीला एकदम मिळाले, यांत त्यांनीं मोठासा स्वार्थत्याग केला नाहीं. शिवाजीचा प्रयत्न फसून ते राज-द्रोही बनले असते, तरी त्यांचें नुकसान म्हणण्यासारखें झालें नसतें. परंतु सर-दारलोकांची स्थिति पुष्कळ निराळी होती. त्यावेळीं ते आपल्या धन्यावर उठून शिवाजीसारख्या बंडखोरास सामील झाले असते तर, शिवाजीचा पाडाव झाल्यास त्या सर्व घराण्यांची अत्यंत दुर्दशा झाली असती; त्यांचीं उत्पन्नें खालसा होऊन घरें दारें लुटलीं जातीं; आणि त्यांची पिढीजाद चालत आलेलीं वतनें जाऊन ते भिकेस लागले असते. शिवाजीच्या बंडास कायदेशीर राज्याचें स्वरूप येईपर्यंत लोकांना त्याचा पक्ष स्वीका-रितांना फार दूरवर विचार करावा लागे; म्हणून स्वजातीय सरदारांस आपल्या पक्षाची सत्यता व सामर्थ्य दाखविणें हें शिवाजीचें पहिलें काम होतें. मोहिते घोरपडे, भोरे, सांवत, दळवी, सुर्वे, वगैरे सरदार आरंभापासून कमीजास्त प्रमाणानें शिवाजीच्या विरुद्ध होते; तेव्हां '' मी तुमचें संरक्षण करण्यास समर्थ व योग्य आहे.'' अशा प्रकारचा वचक आपणांविषयीं स्वजातियांमध्यें

शिवाजीनें उत्पन्न केला; हा या वरील ( विजापूरकराबरोबरील ) युद्धाचा परिणाम होय. ह्यावरून शिवाजीची कर्तबगारी व्यक्त होते. इतर सरदारांप्रमाणें शिवाजीही आदिलशाहाचा अंकित होता; पण एकदां मनाची खात्री झाल्यावर अत्यंत साहस करून तो उघडपणें बंडखोर बनला, आणि लवकरच स्वतंत्र राज्य स्थापून त्यानें आपला बंडखोरपणा नाहींसा केला." ( मराठीरिसायत भाग पहिला; पान २७३पहा.) तथापि विजापूरकराबरोबरील हा तह शहाजी-मार्फतच घडून आला असल्यामुळें, शिवाजीच्या स्वराज्याची स्थापना संपूर्ण करण्याचें, व " स्वतंत्र राज्यकर्ता " या पदवीला त्याला नेऊन बसविण्याचें श्रेय, जरी मुख्यत्वेंकरून तें शिवाजीस आहे तरी शहाजीसहि तें कांहीं प्रमाणांत दिलें पाहिजे, हें उघड आहे.

शहाजीनें निजामशाहींत व आदिलशाहींत जे प्रचंड उद्योग केले त्यामुळें जित लोकांमधील एक हिंदु अथवा मराठा सरदार, या नात्यानें त्याची कर्तबगारी मुसलमानी राज्यकर्त्यांच्या नजरेपुढें येऊन, कोणताहि हिंदु सरदार बलिष्ठ मुसलमानी सत्तेविरुद्ध केव्हांहि वर डोकें काढूं शकणार नाहीं, हा त्या राज्यकर्त्यांचा नाहींसा झाला; पण त्यापासून महाराष्ट्रास व्यापक दृष्टीचा राष्ट्रीय फायदा झाला नाहीं; समाजास जिवंतपणा आला नाहीं; राष्ट्रास शिस्त लागली नाहीं. शहाजीच्या काळापर्यंत महाराष्ट्रांतील मराठे व इतर लढाऊजाती, जो धनी आपल्या पोटाला देईल, त्याची नौकरी करीत असत; आणि कोणता धनी स्वकीय आहे, व कोणता परकीय आहे, ह्या प्रधान भेदास महत्व न देतां, कोणत्या धन्याकडून आपणांस भाकरी मिळेल, ह्या गौण प्रश्नास महत्व देत असत; महाराष्ट्रांतील एकाच गांवांतील व गोतांतील भाऊबंदापैकीं, कांहीं लोक मराठा सरदारांच्या, कांहीं मुसलमान सरदारांच्या, कांहीं दक्षिणेंतील शाह्यांच्या व कांहीं मोंगली बादशाहीच्या लष्करी नौकरींत असत; आणि खुद्द शहाजीची ही स्थिति तशाच प्रकारची होती. तो व त्याचा बाप मालोजी हे उभयतां निजामशाही नौकरींत होते; तो स्वतः नंतर आदिलशाही नौकरीत राहिला होता. त्याचे चुलत भाऊ, व सासरा जाधवराव यांचें घराणें मोंगली बादशाहीच्या नौकरींत होते; व त्याचे कुळभाऊ आदिलशाही व बेरीदशाही सैन्यांत होते; अशा परावलंबी व स्वार्थी स्थितींत

स्वावलंबनाच्या व आत्मयज्ञाच्या मार्गानें महाराष्ट्रास स्वराज्य प्राप्त करून घेण्याची नुसती कल्पना सुद्धां देशांत उद्भवणें शक्य नव्हतें. मुसलमान राज्यकर्त्यांच्या नौकरींत राहून त्यांच्या मेहेरबानीनें प्राप्त होणाऱ्या अल्पस्वल्प फायद्यावर, अथवा फार तर राजाश्रयाच्या भरभक्कम वांटणीवर तत्कालीन मराठा सरदार मंडळी संतुष्ट होती; मुसलमानी राज्यकर्त्यांच्या मेहेरबानीशिवाय, इतर स्वयंभू विशिष्ट प्रकारची लायकी व कर्तृत्व आपणांत आहे, ही कल्पनाहि तत्कालीन मराठा सरदार मंडळींना झाली नाहीं; अथवा अपवादादाखल कित्येकांना झाली असली तरी राज्यकर्त्यांच्या दराऱ्याच्या दिव्य तेजाखाली ती लोपल्याशिवाय राहिली नाहीं; शिवाय अपसांतील वैमनस्यें व विरोध, यामुळें उत्पन्न झालेल्या द्वेषाग्नीला उद्दीपन देऊन आपली राजसत्ता बळकट स्थितींत कायम ठेवण्याचा मुसलमान राज्यकर्त्यांचा प्रयत्न चालूच होता; आणि आपसांत भाकरीच्या तुकड्यासाठीं, भांडणें लावून, तो मिळविण्यांत राज्यांतील बलिष्ठ होणें शक्य असलेला वतनदार वर्ग परस्परांत झगडत राहिला म्हणजे आपली राजसत्ता निर्भय राहील, अशा प्रकारचे राज्यकर्त्यांचे उद्योग सुरूच होते; तरी सुद्धां, ही स्थिति बदलून व्यवस्थितपणें आत्मयज्ञ करण्यास राष्ट्र तयार होऊन मुसलमानी राज्यकर्त्यांचें मनुष्यबळ, व द्रव्यशक्ति आटविण्याचा अट्टाहास केल्याशिवाय स्वराज्य प्राप्ती होणार नाहीं, ही कल्पना शहाजीच्या काळांत महाराष्ट्रांत उत्पन्न झाली नव्हती. "जुलमी परकीय राजांचा नाश करावयाचा म्हटला म्हणजे त्यांची नौकरी करून व विश्वास संपादून योग्य समयीं त्यांस गचांडी देण्याचा मार्ग जित लोकांना सदा श्रेयस्कर, सुरक्षित व न्याय्य गणलेला आहे. तो मार्ग शहाजीच्या बापानें चोखाळून आपल्या मुलाला साफ करून ठेविला होता." पण या मार्गानें शहाजीस स्वराज्य स्थापन करतां येणें शक्य नव्हतें. झाडावर बसून, आपण बसलेली फांदी मूळाकडून तोडून, त्या फांदीबरोबरच आपलाहि अधःपात करून घेण्यातारखा हा घातकारक प्रयत्न होता; पण यदाकदाचित तो यशस्वी झाला असता तरी शिवाजीनें स्थापन केलेल्या स्वराज्याची योग्यता, त्या राज्यास आली नसती; व तितकें महत्व व उपयुक्ताहि प्राप्त झाली नसती. शहाजीच्या काळापर्यंत सतत तीनशें वर्षें महाराष्ट्र देश मुसलमानी

अमलाखालील पारतंत्र्यदुःखांत खितपत पडलेला होता; हें सतत तीनशें वर्षें महाराष्ट्राच्या कपाळीं एकसारखें जडलेलें दुःख सोशींत असतांना उत्कर्षाचा काळ उत्पन्न करण्यास, व तो परिपक्व झाला असतां त्या काळाचा पूर्ण फायदा घेण्यास, राष्ट्राच्या उपयोगीं पडेल असें, शरिराला, मनाला व बुद्धीला लावण्याचें महत्वाचे कार्य शहाजीच्या, त्यानें स्थापन केलेल्या अथवा निजामशाही पायावर उभारलेल्या, राज्याकडून झालें नसतें; व महाराष्ट्रास आत्मयशाचा व राष्ट्रीय कार्याचा धडाहि मिळाला नसता. शहाजीच्या राज्यांत, गरीब मराठे व हिंदु समाजाचे पोट कसें भरेल, हा प्रश्न थोड्याफार प्रमाणांत सुटला असता; व कित्येक ब्राह्मण, मराठे, व हिंदु कुटुंबाच्या पोटापाण्याची तजवीज झाली असती; कांहीं दीनदुबळ्यांच्या हालअपेष्टा नाहींशा झाल्या असत्या; कांहींच्या दुःखावर फुंकर घालून त्यांचा दुःखभार हलका करण्यांत आला असता; म्हणजे व्यक्तिविषयक सुखाच्या सवलती, मुसलमानी राज्यांच्या मानानें शहाजीच्या राज्यांत अधिक प्रमाणांत लाभल्या असत्या; पण राष्ट्रीय दृष्टया त्या गौण स्वरूपाच्या असल्यामुळें त्यांचें महत्वहि तितपतच होतें. कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांचा संसारांतील आनंद, धर्म व राजसत्ता ह्या दोन प्रधान गोष्टीवर अवलंबून असतो; लोकांच्या मनाचें समाधान धर्मावर व पोटाचें समाधान राजसत्तेवर अवलंबून असतें; त्यामुळें ह्या दोन गोष्टीवर घाला आला म्हणजे राष्ट्र परतंत्र होऊन त्याचा संसार दुःखपरंपरेचा बनतो; पण ही दुःखपरंपरा विलयाला जाऊन महाराष्ट्राचा संसार सुखाचा होण्याला शहाजीच्या राज्याचा कांहींहि उपयोग झाला नसता; अथवा त्यामुळें स्वराज्य संस्थापनेला आधारभूत असलेली वीरवृत्ति, किंवा प्रतिकाराची तीव्र बुद्धि अथवा जाणीव, महाराष्ट्रांत उत्पन्न झाली नसती. ही वीरवृत्ति, ही बुद्धि अथवा जाणिव महाराष्ट्रांत शिवाजीनें उत्पन्न केली. स्वराज्य मिळविण्याच्या राष्ट्रीय चळवळीचा मुख्य पाया निःस्वार्थाच्या श्रद्धेवर, व सर्वस्व नाशाच्या तयारीवर उभारावा लागतो; व या तयारीबरोबरच राष्ट्रांत प्रतिकाराची प्रवृत्ति उत्पन्न करून, व तिला संघटित व व्यवस्थित स्वरूप देऊन, स्वराज्याला उद्देशून आत्मयज्ञ करण्याची संवय लावावी लागते. प्रसंगानें मनुष्याच्या अंतःकरणांतील प्रतिकाराची प्रवृत्ती, उचंबळून वर येत

असते; व ती दृढमूल झाली, व पायरी पायरीनें पराकाष्ठेपर्यंत वाढत गेली, म्हणजे तिलाच वीरवृत्तीचें स्वरूप प्राप्त होतें; ही वीरवृत्ति कायम टिकविण्याकरितां, राष्ट्रीय चळवळींत यशाचा आधार असलेली श्रद्धा डळमळित होऊं नये, यासंबंधीं पूर्ण खबरदारी घेण्यासाठीं, निःस्वार्थी, व सर्वस्व नाशाचीहि क्षिती न बाळगणाऱ्या श्रेष्ठ विभूतींच्या हातीं राष्ट्राचें सूत्रचालकत्व असावें लागतें; ती विभूती आपल्या कर्तबगारीनें राष्ट्रांत विश्वास व श्रद्धा उत्पन्न करिते; ह्याच विश्वासामुळें, व श्रद्धेमुळें, रणांगणावर प्रत्यक्ष मरणास तयार होणारें सैन्य निर्माण होतें; व त्याबरोबरच ती राष्ट्रीय विभूती, एक दिवा जसा दुसऱ्या दिव्यास पेटवितो त्याप्रमाणें, एकाच्या अंतःकरणांत पेटलेली वीरवृत्तीची ज्योत दुसऱ्याच्या अंतःकरणांतील वीरवृत्तीला पेटविण्याचें कार्य राष्ट्रभर करीत राहते. अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे एका बाजूनें राज्यकर्ते जित लोकांवरील आपली सत्ता कायम रहावी म्हणून,व दुसऱ्याबाजूनें वीरवृत्तीच्या पायरीला पोंचलेले जितलोक, जे त्यांचा आपणावरील अंमल झुगारून यावा म्हणून उभयतांमध्यें तीव्रप्रमाणावरील झगड्यास प्रारंभ होतो; आणि राज्यकर्त्यांच्या मानानें, असह्य संकटें, अनिवार्य अडचणी, अननुभवित हाल आपत्तीं, व अगम्य कारस्थानें यांनां तोंड देण्याचा मोठाच दुःखाचा व सर्व नाशाचाप्रसंग जित लोकांवर, येऊन कोसळतो. अशावेळीं, विवेकानें, एकोप्यानें, एकताननतेनें, देशभक्तांच्या श्रद्धेनें, भावीकाळांत जिवंतपणाचीं सुखें राष्ट्रास लाभावीं या इच्छेनें, पुढील कार्यावर दृष्टी देऊन जर त्या प्रसंगाला मोठ्या हिंमतीनें तोंड दिलें तर ह्या दुःखाच्या व सर्व नाशाच्या प्रसंगांतूनच जित लोकांत स्वराज्य प्राप्त करून घेण्याची लायकी उत्पन्न होते, व ते स्वराज्य प्राप्तीला पात्र ठरतात. ही पात्रता शहाजीच्या राज्यसंस्थापनेनें महाराष्ट्रांत उत्पन्न झाली नसती, व नव्हती; ती पात्रता शिवाजीनें आपल्या कर्तबगारीनें महाराष्ट्राच्या आंगीं आहे असें भावीकाळांत सिद्ध केलें. म्हणून शिवाजीच्या कर्तृत्वाला शहाजीच्या कर्तबगारीच्या मानानें श्रेष्ठस्थान दिलें पाहिजे, हें निर्विवाद आहे.

शिवाजीनें केलेल्या स्वराज्य संस्थापनेची श्रेष्ठता, व त्यासाठीं त्यानें केलेला कल्पनातीत स्वार्थत्याग, यांची थोरवी वर्णन करावी, तेवढी थोडीच आहे; जित राष्ट्रांतील रंजले गांजलेले लोक सुद्धां, सर्व नाशाचा प्रसंग उत्पन्न झाल्या-

शिवाय प्रतिकाराला तयार होत नाहींत; दुःखें सहन करीत राहतात, पण त्यांची प्रतिकाराची बुद्धि जागी होत नाहीं; परंतु स्वराज्य संस्थापनेच्या कार्याला प्रारंभ करितांना तें कार्य शेंकडा शंभर हिश्शांनी सिद्धीस जाईल कीं नाहीं, याचा विचार करीत तो बसला नाहीं; यशाच्या मोजमापावर आपल्या कर्तव्यनिष्ठेचें प्रमाण त्यानें ठरविलें नाहीं. शहाजीचा चुलत भाऊ खेळोजी याला अवरंगझेबानें ठार मारिलें, ही गोष्ट शिवाजीस माहीत होती; त्यावेळीं ( इ० सन १७३९; आक्टोबर ) तो अजमासें बारा वर्षांचा होता; हुसेन निजामशाहा यानें आपला आजा लुकजी जाधवराव व मामा अचलोजी यांना ठार मारिलें, ही गोष्ट शिवाजीस माहीत होती; त्या-वेळीं ( इ० सन १६२९ मध्यें ) शिवाजी दोन वर्षांचा होता; शहाजीवरील प्राणसंकटांची शिवाजीची आठवण ताजी होती; अशा रीतीनें आपल्याच नात्यांतील कर्त्या पुरुषांचे झालेले वध व वडिलांना भोगाव्या लागलेल्या आपत्ति यामुळें, एखादा साधारण मनुष्य तर असलें अचाट राष्ट्रकार्य अंगावर घेण्याच्या भानगडींत, सर्व नाशाचा प्रसंग स्वतःवर आल्याशिवाय कधींच पडला नसता; परंतु शिवाजी ही विभूती अत्यंत श्रेष्ठ दर्जाची होती; स्वराज्य संस्थापना करण्याचें अलौकिक कार्य हातीं घेणाऱ्या या विभूतीला राष्ट्राच्या सर्व नाशाचाही प्रसंग उत्पन्न होण्याची जरुरी लागली नाहीं. राष्ट्राचा सर्व नाश होईपर्यंत ही विभूती स्वस्त बसली नाहीं; तिला स्वस्थ बसवलें नाहीं. शिवाजीनें स्वतः कष्ट सोसून व मार्गदर्शकत्व पत्करून जनतेची प्रति-काराची बुद्धि जागृत केली. त्या बुद्धीला कायमपणा आणून, ती योग्य नेतृत्वाखालीं व नियंत्रणाखालीं संघटितपणें उद्दिष्ट कार्यास लावून, उदरंभरण हेंच आपलें ध्येय, व हीच आपल्या जन्माची इतिकर्तव्यता, अशा बुद्धीच्या गुलामांच्या राष्ट्रांतील लोकांच्या भाकरीची काळजी वाहण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन महाराष्ट्राचा संसार सुखाचा बनविला. स्वतःच्या राजकीय उन्नती अर्थी राज्यकर्त्यांच्या मेहेरबानीवर अवलंबून न राहतां स्वतःचें कर्तृत्व व लोकसंग्रहाचें पाठबळ, यांवर भिस्त ठेवून प्रयत्न केल्यास, व करीत राहिल्यास राष्ट्राला आज नाहीं उद्यां, केव्हां तरी सुखाचे व स्वातंत्र्याचे दिवस खास दिसतील, ही गोष्ट शिवाजीनें स्वतः पुढाकार घेऊन महाराष्ट्राच्या

अनुभवास आणून दिली. मुसलमानी राज्यकर्त्यांच्या अमलाखालील मनसबदारी, हें परतंत्र राष्ट्राच्या उन्नतीचें साधन नसून, त्या राजसत्तेला स्थिर व स्थाईक ठेवण्याकरतां, ती राजाश्रयाची लांच आहे, ही प्रधान गोष्ट शिवाजीनें ओळखली. राजाश्रय व स्वातंत्र्यप्राप्ती, ह्या दोन गोष्टी परस्पर अगदींच विरुद्ध आहेत; त्यापैकीं पहिलीच्या आश्रयानें दुसरी केव्हांहि साध्य होत नाहीं, व दुसरी साध्य करण्याकरितां पाहिलीचा त्याग केल्याशिवाय ती मिळणें शक्य नाहीं, ही गोष्ट शिवाजीनें महाराष्ट्राच्या प्रत्ययास आणून दिली. परतंत्र राष्ट्रांतील बहुजनसमाजाचा संसार नेहमींच परकीय जेते राज्यकर्त्यांच्या राजाश्रयावरच अवलंबून असतो; व तो तसा अवलंबून रहावा, अशीच राज्यपद्धति ते राज्यकर्ते नेहमीं चालू ठेवितात. हा राजाश्रय पोटाला भाकरी देत असल्यामुळें, संसारासाठीं बहुजन समाजाला राजाश्रयाचा उपयोग करून घेतल्याखेरीज गत्यंतरच नसतें; परंतु ज्या सत्तेमुळें जे त्यांच्या हातीं राजाश्रय गेला आहे, ती सत्ता मिळविण्यासाठीं राजाश्रयावर अवलंबून राहण्याची जरूरी नाहीं, इतकेंच नाहीं तर राजश्रयावर अवलंबून राहिल्यास ती सत्ताहि मिळणें शक्य नाहीं, ही गोष्ट शिवाजीनें महाराष्ट्रास पूर्णपणें पटवून दिली. पण ह्यापैकीं एकहि गोष्ट शहाजीच्या निजामशाहीच्या पायावर उभारलेल्या राज्यांत अथवा कर्नाटक मधील मांडलीकी राज्यांत घडणें शक्य नसल्यामुळें, राष्ट्रीयदृष्टया शहाजीच्या प्रचंड उद्योगाला, शिवाजीच्या श्रेष्ठ कर्तृत्वाइतकें महत्व केव्हांहि देतांच येणार नाहीं, हें उघड आहे.

शहाजी व शिवाजी या उभयतांच्या वर्तनांतहि अतिशयच विरोध आहे. शहाजी प्रसंगाला अनुरूप असें घरसोडीचें धोरण व वागणूक ठेवीत असे. त्यामुळें त्याच्या वर्तनांत नेहमींच विसंगतता होत असे, व या दुटप्पी वर्तनामुळेंच त्याची मानखंडनाहि होत असे; " स्वतःच्या दरबारांत यवनांची किंचित् कुचेष्टा झालेली शहाजीला खपत असे. बाहेर कागदोंपत्रीं शहाजी आदिलशाहाला आपला अधिराज म्हणून अदबीनें संबोधी आणि घरीं दरबारांत त्याचे कवी शहाजीनें आदिलशाहाचें राज्य राखिलें आहे, म्हणून शहाजीची प्रौढी गात. बाहेर बोलावयाचे झालें म्हणजे शहाजहानला

शहानशाहा म्हणून किताब लावावा, आणि घरांत बोलतांना त्याच्याशीं ( राज्याची ) वांटणी करून बसलों आहों, अशी बरोबरीची भाषा वापरावी, असा दुटप्पी प्रकार शहाजीचा असे; आणि हा सर्व प्रकार आदिलशाहा, शहाजहान वगैरे लोकांच्या कानावर त्यांचे अखबरनवीस घालीत असत. परिणाम असा होई कीं, शहाजीसंबंधानें आदिलशाहा किंवा शहाजहान यांच्या मनांत सदा संशय वास करी. त्याच्यावर विश्वास कोणाचाच नसे. कामापुरता शहाजीला जवळ करावयाचा, आणि काम संपलें म्हणजे त्याला हाकून द्यावयाचा, असा प्रकार शहाजीच्या चरित्रांत कितीदा तरी घडला आहे. या दुटप्पी वर्तनानें जी मानखंडना होई ती शहाजीच्या अंगवळणी पडलेली होती. स्वतःचा कार्यभाग कसा साधेल इतकेंच शहाजीचें पाहणें असे. त्यांत मानखंडना होते, कीं मानमंडणा होते, ह्याचा कीस करीत बसण्यास त्याला अवकाश नव्हता; परंतु शिवाजी सारख्यांना ही धरसोड व तज्जन्य मानहानि बिलकूल खपत नसे.'' ( रा. मा. वि. चंपू पहा. ) शहाजीनें मानहानीकारक अटी पत्करून, आदिलशाहाच्या प्रतिबंधांतून आपली मुक्तता करून घेतली, याबद्दल शिवाजीस अतिशय वाईट वाटलें; शहाजीच्या ह्या वागणुकीचा शिवाजीस अतिशय राग आला; व वडिलांचें धरसोडीचें धोरण व वर्तन त्यांनांच आजपर्यंत कसें नडत आलें, व त्याचा परिणाम वडिलांनाच कसा भोगावा लागला, यासंबंधीं शिवाजीनें, आपला वृद्ध मुत्सद्दी सोनोपंत डबीर याच्याजवळ आपले मोठे मननीय विचार बोलून दाखविले; यासंबंधी बृहदीश्वर शिलालेख पृष्ठ २४ मध्यें खालील मजकूर आहे तोः—'' अपुले वडील शाहाजीराजे यांनीं अल्ली यदलशाहा ( आदिलशाहा ) पासून मोकळीक होणेंस्तव लाभलें राज्य देखील सोडून सातारांस ( सातारा येथें ) येऊन राहिल्यावरी शिवाजीराजे पुरंदरगडांत होते, त्यांनीं आपला मंत्री सुवर्णनामक ब्राह्मण ( सोनोपंत डबीर) यांस बलाऊन येकांती सांगितलें 'जे अमुचे वडील शाहाजीराजे परम शूर आणि योगवंतहि. त्यांनीं केलीं कामेंहि निर्मल मनेंकरून केलीं. परंतु त्यांत थोडा भाव सुचतो. तो असा कीं, ते प्रथम निजामशाहाच्या संगतीस होते; ते अल्ली यदलशाहाचे बोलावण्यावरून त्या

कडे आले. परतून निजामशहांनीं बलावितांच याकडे गेले. पुन्हां अल्ली यदलशहाकडेहि आले. ऐशा दोन तीन येरझारा जाहल्या. यवनांच्या संगतीस ते जितके दिवस होते तितके दिवस त्यांचीं कामें इमानानें करूनहि त्यांनां यांचे ठाईं कपटच भासावयाजोगें जाहलें. परंतु आपलें ह्मणून विश्वास धरावयास स्थळ राहिलें नाहीं. यवनांनीं यांच्या (शहाजीच्या) हातून आपलीं कामें करवून घेऊन तदनुसार मान बहुमान केले, येवढेंच. परंतु 'हें आपलें' ह्मणून मानावयाजोगी करणी वडिलांकडून घडली नाहीं. याचें कारण हेंच कीं थोर मनुष्यांनीं येकाची संगति धरिल्यावरी त्याशी बिगडताच नये. कदाचित बिगडावयाजोगें (जाल्यास) परतून त्याशी मिळूं नये. हेतो प्रसिद्ध नीति आहे. त्यांतहि वडील अंगेकरून शूर आणि इमानानें वर्तले तरीहि कृत्रिमी यवनापासून वडिलांस ईश्वरें राखिलें इतकेंच. आह्मी प्रयासानें घेतल (घेतलेला) सिंव्हगडहि व आपण बहुत प्रयत्न करून संपादिलें (संपादिलेलें) ब्यंगळूर हीं यवनास सोडून देऊन सातान्यांत येऊन राहिले. आतां त्यास (शहाजीस) वृद्धाप्यदशाहि आली. याउपरी आह्मास सुचल्या बुध्धीनें वागलें पाहिजे. अल्ली यदलशहाकडे वडिलांनीं अनेक प्रयास केले तरीहि त्यांचे चित्तांत आह्मी जड जाहलों. आह्मास तोडावें ह्मणूनच (त्यांचें चित्तांत) आहे. तसेंच निजामशहाचें राज्य जिंकून देवगिरीदुर्गांत (दौलताबादच्या किल्लयांत) आहे, त्या अवरंगजबासहि आह्मी येक शल्य होऊन आहों. आम्हांस तोडावें ह्मणावयाचेंच त्याच्या मनांत आहे. या दोन प्रबल शत्रूमध्यें आह्मी पुरंदरगडांत असून राज्य करावें ह्मणिजे आह्मांस कदापि साधणार नाहीं. येखादे वेळेस दगा करून आह्मांस बुडवितील. याकरितां आह्मी बाहेर निघून या दोघांसहि आवरावें तेव्हांच आमचा टिकाव होईल. हे तजवीज तुम्हांस मानते काय?' म्हणून विचारल्यास त्यांनी (म्हणून शिवाजीनें विचारिलें; तेव्हां सोनोपंतांनीं) उत्तर दिल्हे जे. महाराजांनीं केली तजवीज इतुकी ही खरीच. प्रस्तुत महाराजांनीं योजिलें कार्यहि करावेंच. ईश्वरहि साह्य होईल म्हणून त्यांनीं (सोनोजीपंतांनीं) जबाब दिल्हा. त्यावरून महाराज शिवाजी राजे फौजेची संजोगणित्व करून (जमवाजमव व तयारी करून) यवनावरी राजकारणास प्रवर्तले." या

लेखावरून अनेक गोष्टींचा बोध होतो. शहाजीनें बंगळून व सिंहगड आदिलशाहास देण्याचें कवूल करून आपली प्रतिबंधांतून मुक्तता करून घेतली; परंतु आपण केलें तें अयोग्य केलें, असें त्याचें त्यांसच वाटून उदास होऊन, "लामलें राज्य देखील सोडून" तो कांहीं दिवस सातारा येथें घेऊन राहिला होता; व त्या वेळीं शिवाजी पुरंदरच्या किल्ल्यावर होता, असें निदर्शनास येतें. शिवाजीचा सोनोपंताशीं जो संवाद झाला, त्यावरून, शहाजीच्या निजमशाही राज्यांत "दोन तीन येरझारा" झाल्या असें कळून येतें. शहाजीनें आपल्या जन्मभर यवनांची सेवा केली, पण "हे आपलें म्हणून मानावयाजोगीं करणी" शहाजीच्या हांतून घडली नाहीं; "याचें कारण हेंच कीं, थोर मनुष्यांनीं येकाची संगति धरिल्या वरी त्यासी बिगाडतांच नये" त्याचा पक्ष सोडतांच कामा नये; "कदाचित बिगडावयाजोगें जाल्यास परतून त्याशीं मिळूं नये" त्याच्या पक्षास पुन्हां मिळतांच कामा नये; "हे तों प्रसिद्ध नीती आहे" पण ह्या नीतीचा शहाजीनें त्याग केला; आपले वर्तन दुटप्पी ठेविलें; व त्यामुळेंच "आपलें म्हणून" मानण्यासारखी एकहि करणी शहाजीच्या हांतून झाली नाहीं. तो जसा काळ, वेळ, व प्रसंग पाहून दुसऱ्याशीं वागत असे, तसेच दुसरेहि त्याला कामापुरते जवळ करीत असत; व काम झाल्यावर दूर लोटीत असत; शहाजीचा कोणावर विश्वास नव्हता; शहाजीवर कोणी विश्वात ठेवीत नव्हते; त्यामुळें शहाजीनें मुसलमानी राज्यांच्या कल्याणाकरितां जन्मभर, व मर मर खटपट केली, तरीहि त्याचें योग्य चीज न होतां त्यांना "शहाजीच्या ठायीं कपटच भासावयाजोगें जाहलें." यावरून, मुसलमान राज्यकर्त्यांच्या नौकरींत आपली राजकीय उन्नती करून घेण्याचा शहाजीचा प्रयत्न किती व्यर्थ होता, याची शिवाजीस अगोदरपासूनच पूर्ण जाणीव होती, व म्हणूनच त्यानें पहिल्यापासून स्वतंत्र राहून महाराष्ट्राची राजकीय उन्नती करण्याचें कार्य आंगावर घेतलें होतें, हें उघड होतें. आदिलशाहा व शहाजहान या दोन प्रबळ शत्रूशीं टक्कर देऊन बचावून आपणांस स्वराज्य संस्थापना करावयाची आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवून शिवाजीनें त्या धोरणानें आपला पुढील कार्यक्रम आंखला होता, ही गोष्ट शिवाजीच्या उद्गारावरून स्पष्ट होते; "शिवाजीचा सिद्धांत खरा होता

यांत संशय नाहीं; परंतु शहाजीचा व्यवहार त्या सिद्धांताहूनहि खरा होता, हें व्यवहारज्ञ स्वतःच्या अनुभवानें सांगूं शकतील. अपवाद खरे असतात, म्हणूनच सिद्धांतांना चिटकविलेले असतात. स्थितीच अशी होती कीं, दुटप्पी-पणाशिवाय शहाजहान, औरंगझेब मीरजुम्ला, महंमदशहा, फत्तेखान, मुस्तफाखान, इत्यादि कपटनाटक्यांच्या मध्यें शहाजीचा सरळपणानें टिकाव लागला नसता." ही गोष्ट खरी असली तरी, थोडक्यांत सांगायाचें म्हणजे, शहाजीची घरसोडीची वागणूक व तिचे अनिष्ट परिणाम, व शिवाजीची निश्चित वागणूक, त्यामुळें शिवाजीची झालेली महत्ववृद्धि व तिचे फायदेशीर परिणाम, शिवाजीचें असामान्य दूरदर्शित्व, परिस्थितीचें योग्य आकलन करण्याची अलौकिक बुद्धिमत्ता, निःस्वार्थी मनानें व आत्मयज्ञानें अननुभवित अशीं दुःसह संकटें, व दुर्धर प्रसंग भोगीत राहून महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन करण्याची कार्यक्षमता, वगैरे गोष्टी, वरील लेखावरून व शिवाजीच्या उद्गारावरून स्पष्ट होतात; व त्यावरूनच शहाजीची मर्यादित आकांक्षा दृष्टोपत्तीस येऊन शिवाजीची व्यापक दृष्टी, व अलौकिकत्व हीं सिद्ध होतात.

तथापि, महाराष्ट्राच्या दृष्टीनें, शहाजीचा काळही, शिवाजीच्या काळाच्या खालोखाल का होईना, पण अत्यंत महत्वाचा, असाच आहे; शहाजीच्या काळापासून महाराष्ट्रांतील जनतेंत कित्येक नव्या कल्पना, व विचार उत्पन्न होण्यास सुरवात झाली; महाराष्ट्रांतील जनतेंत लायकी उत्पन्न करण्याचा प्रयोग सुरू करण्यांत आला; कित्येक शतकें मुसलमानी अमलाखालीं, व सूत्र-चालकत्वाखालीं दुय्यम दरजांचीं कामें करीत राहण्याचेंच तत्कालीन मराठे मंडळीच्या आंगवळणी पडलेलें असल्यामुळें, जबाबदारी अंगावर टाकल्या-मुळेंच उत्पन्न होणारी लायकी शहाजीच्या काळापर्यंत त्यांच्यांत नव्हती; व अशी लायकी आपणांत असेल, आहे, अथवा येईल, अशीही कोणालासुद्धां फारशी कल्पना नव्हती; परंतु कर्त्याव्यक्तींच्या अंगावर जबाबदारी टाकून त्यांच्यांत ती लायकी शहाजीनें प्रथम उत्पन्न केली; सेवावृत्तीच्या सांप्रदा-यांत जबाबदारी अंगावर घेण्याची संवय नसल्यानें दुय्यम अधिकार चालवून वरिष्ठांचे हुकूम बजावणें एवढेंच कार्य करीत राहण्याची अंगांत मुरलेली

पुष्कळ वर्षांची संवय घालवून अंगावर जबाबदारी टाकून लायकी उत्पन्न करण्याच्या महत्वाच्या कार्यास शहाजीच्या काळापासून प्रारंभ झाला. कित्येक शतकें पारतंत्र्यांत राहण्याची संवय झाल्यामुळें, पारतंत्र्यांतील वैभवसुखांत कालक्रमणा करीत राहण्याची मराठे सरदार मंडळींत भिनलेली आकुंचित व स्वार्थी प्रवृत्ति, शहाजीच्या काळापर्यंत कायम होती. ही प्रवृत्ति, उदात्त कल्पना, उच्च राष्ट्रीय कर्तव्य, व उज्वल देशकार्य, यांच्या नेहमींच आड येणारी असल्यानें ती नाहींशी करणें, हीच प्रमुख, व महत्वाची बाबत असून ती सिद्धीस नेण्याच्या प्रयत्नास शहाजीनेंच प्रथम सुरुवात केली. स्वराज्य स्थापून विविक्षित मर्यादेंत स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश, व स्वजन यांचें पालन, लालन, व संरक्षण करण्याच्या श्रेष्ठ कर्तव्याचा खडतर मार्ग आक्रमण्यास, अनेक आपत्तींशीं झगडत राहून, शहाजीनेंच पहिल्यानें प्रारंभ केला. मुसलमानी राजकर्त्यांची चाकरी करून पोटाला भाकरी मिळविणें, यांतच आपल्या जन्माची इतिकर्तव्यता नसून त्यापलीकडील लोककल्याणाचें श्रेष्ठ कर्तव्य करून जगात अखंड कीर्ती मिळविण्यांतच आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता आहे, ही भावना तत्कालीन मराठा मंडळांत शहाजीच्याच ठायीं प्रथम उत्पन्न झाली. मराठ्यांच्या अंगीं माणुसकी आहे, ते जित मुसलमान राज्यकर्त्यांच्या आश्रयानें गुलामगिरींत सुख मानून नांदत आहेत तरीसुद्धां त्यांचा स्वाभिमान जिवंत आहे, ही जाणीव मुसलमानी राज्यकर्त्यांना शहाजीनें आपल्या कर्तबगारीनें प्रथम करून दिली. स्वराज्य संस्थापनेच्या कल्पना, कांहीं अंशानें कां होईना, उदय पावण्यास शहाजीच्या काळापासून पहिल्यानें प्रारंभ झाला. प्राप्त झालेल्या परिस्थितींत जें श्रेष्ठ फळ मिळविणें शक्य होतें तें मिळविण्याचा उद्योग शहाजीनेंच पहिल्यानें आपल्या शिरावर घेतला. कधीं काळाला बगल देऊन तर कधीं काळाबरोबर झगडून स्वराज्य संस्थापनेचा प्रयोग, मर्यादित व्याप्तींत का असेना, शहाजीनेंच पहिल्यानें यशस्वीपणें सिद्धीस नेला. स्वराज्य संस्थापनेच्या पहिल्या प्रयत्नांत अपयश आल्यावर, आणि दुसऱ्या प्रयत्नांत माघार घेणें भाग पडल्यावरही, हताश न होतां हिंमत बांधून पुन्हांही प्रयत्न करीत राहून यशस्वीपणें आपलें ध्येय गांठण्याचें महत्कार्य शहाजीनेंच प्रथम घडवून आणिलें.

दख्खनच्या राजकीय पटावरील, आदिलशाही, कुत्बूशाही, निजामशाही व

मोंगलाई मोहरीं कशी हालचाल करीत आहेत, याचें निरिक्षण करून त्या धोरणानें आपलीं मोहरीं चालवून, कधीं त्यांना शह देऊन तर कधीं त्यांनीं दिलेल्या शहामुळें माघार घेऊन, त्या सर्वांवर अखेरीस मात करण्याचा पहिला मान प्रारंभी शहाजीनेंच मिळविला. शहाजीसारख्या स्वराज्यवाद्यांच्या चळवळी जागच्याजागींच, पार नामशेष करून ते पुन्हां केव्हाही वर डोकें काढणार नाहींत इतक्या परमावधीपर्यंत त्यांना झोडपून काढून जिंकलेल्या प्रजेवर दहशत बसविण्याचा मुसलमानी राज्यकर्त्यांनीं पुष्कळ वेळां प्रयत्न केला. परंतु अशा आपत्तींना तोंड देऊन व आपली चळवळ कायम ठेवून शांत वृत्तीनें स्वराज्य–संस्थापनेचा खडतर मार्ग आक्रमीत राहण्यास शहाजीनेंच प्रथम पुढें पाऊल टाकिलें. स्वतः पुढाकार घेऊन कांहींही न करतां, आद्य प्रवर्तकत्वाची प्रसंगीं सर्वनाश करणारी जबाबदारी दुसऱ्यावर टाकून, युक्तीच्या चार गोष्टी सांगण्याचा आव आणून दुसऱ्यांना तोंडानें उपदेश करीत बसण्यापेक्षां, स्वतः पुढाकार व जबाबदारी पतकरून, आपल्या प्रत्यक्ष वर्तनाचा धडा लोकांपुढें ठेवून, त्या वर्तनाच्या जोरावर जनतेमध्यें चोहोंकडे सारखी जागृती फैलावणें, व फैलावीत राहणें, हें जें स्वराज्यवाद्याचें आद्य कर्तव्य, तें शहाजीनें आपल्या वर्तनानें व आत्मयज्ञानें प्रथम सिद्ध करून दाखविलें. या कर्तव्यसिद्धीमुळें मराठ्यांत आत्मविश्वास उत्पन्न झाला; मुसलमानी राज्यकर्त्यांची, निदान वरपांगीं तरी बुद्धि पालटली; मराठ्यांबद्दल त्यांच्या मनांत द्वेष असला तरी वरपांगीं ते त्यांना योग्य मानसन्मान देऊन वागवूं लागले. शहाजीनें आरंभिलेल्या स्वराज्य संस्थापनेच्या सत्कार्याला सहानुभूती असलेल्या लोकांचीं मनें खंबीर होऊन, व त्यांची बुद्धि स्थिर होऊन, त्या सत्कार्याची प्रवृत्ती बळावत गेली; व त्या बरोबरच मुसलमानी राज्यकर्त्यांना नरम पाडण्याची जित मराठ्यांची शक्तीही वृद्धिंगत होत गेली. शहाजी हा प्रारंभापासूनच मुसलमानी राज्यकर्त्यांचा आश्रित, मदतगार व कैवारी असून सुद्धां, त्याला ज्या अर्थी स्वराज्य–संस्थापनेचा उद्योग हातीं घ्यावा लागला, त्याअर्थी मुसलमानी राज्यपद्धती मुळांतच सदोष असली पाहिजे, हें उघड होतें. शहाजीनें निजामशाही व आदिलशाही राज्यें जगविण्याकरितां, व त्यांचें वैभव वाढविण्याकरितां आपली

इतकी पराकाष्ठा केली कीं, तो " मुसलमानी राज्यकर्त्यांचा प्रमुख कैवारी " म्हणून त्या काळांत गणला गेलेला होता. असें असून सुद्धां हाच " मुसलमानी राज्यकर्त्यांचा कैवारी " त्यांच्यावरच कां उलटला ? आपल्या मालकीचें स्वतंत्र राज्यस्थापन करण्याचा प्रयत्न करण्याइतकी त्याची बुद्धी कां पालटली? स्वतःच्या ह्या कैवारालाच नामशेष करण्याचा प्रयत्न करण्याचा प्रसंग मुसलमान राज्यकर्त्यांवर कां ओढवला ? अशी स्थिती कां उत्पन्न झाली ? अशी स्थिती उत्पन्न होण्यास परकीय सत्ता हें प्रमुख कारण, व त्यांची राज्य पद्धती व राज्यव्यवस्था, ह्यांमधील अनेक दोष, व अव्यवस्थित राज्यकारभार, हीं दुय्यम कारणें घडलेलीं आहेत. हे दोष व ही अव्यवस्था स्वतंत्र राज्य–संस्थापनेशिवाय नाहींसे करतां येणें शक्य नाहीं, अशी शहाजीची खात्री झाली; आणि इतर मराठा सरदार मंडळींच्या मानानें तो प्रखर तेजाचा वीरपुरुष असल्यामुळें त्यानें, स्वतंत्र राज्य–संस्थापनेच्या कार्यास प्रारंभ केला. संस्कृती, आचारविचार, राहणी, वगैरेशीं प्रत्येक बाबतींत जमीन अस्मानाचें अंतर असलेल्या परकीय मुसलमानी अमलाखालीं महाराष्ट्र देशाची सारखी अधोगती होत चालली होती; स्वाभिमान नाहींसा झालेला होता; आत्मविश्वास नष्ट दशेप्रत जाऊन पोचला होता; व जनता सर्व बाबतींत परावलंबी, व राजाश्रयांतील वांटणीबद्दल आशाळभूत बनून आपलें स्वतंत्र अस्तित्वच साफ विसरून गेलेली होती. महाराष्ट्र देश पारतंत्र्यांत खितपत पडल्यानें साहजीकच निर्माण झालेल्या दुःखद व दारुण परिस्थितीचे असह्य तडाके बसत असूनही–राष्ट्राचा संसार नासला, हें उघड उघड दिसत असून सुद्धां–राष्ट्रोद्धाराचें पवित्र कार्य अंगावर घेण्यास एकही सरदार पुढें आला नाहीं. अशावेळीं तें कार्य शहाजीनें हिंमत बांधून, मोठ्या मर्दपणानें आपल्या शिरावर घेतलें. स्वःतच्या कर्तबगारीनें जनतेंत आत्मविश्वास व अभिमान उत्पन्न करून महाराष्ट्रांतील लष्करी वृत्तीच्या मराठ्यांना आपणांतही राज्य मिळविण्याची, टिकविण्याची, व चालविण्याची पूर्ण लायकी आहे, असें वाटावयास लावून मुसलमानी राज्यांविरुद्ध एक नवा सांप्रदाय उत्पन्न करण्याचें महत्कार्य शहाजीनेंच प्रथम घडवून आणिलें; व दक्षिणेंतील शाह्यांची कमकुवत स्थिती शहाजीस पूर्णपणें माहीत असल्यामुळें त्याचा हा

सांप्रदाय पुढें सारखा बळावत गेला. शहाजीस आपल्या पक्षांत सामील करून घेण्याचा, आदिलशाहा व शहाजहान या उभयतांनींही दुबळेपणा दाखविल्यामुळें, शहाजी हा आस्तेआस्ते सारखा अधिक अधिक सत्ताधीश व बलिष्ठ बनत गेला, व त्यानें आदिलशाही तख्ताच्या पायाखालील जमीन पोखरण्यास सुरवात केली. कर्नाटकमध्यें एक मांडलीकी स्वराज्य स्थापना केलें. कोणत्याही श्रेष्ठ अशा अंगीकृत कार्यातील यशाच्या प्रमाणाच्या सोनेरी काटयानें त्या कार्याच्या व्याप्तीचें व यशापयशाचें मोजमाप करावयाचें नसतें. स्वराज्य-संस्थापनेचा शहाजीचा प्रयत्न व्हावा तितका पूर्णपणें यशस्वी झाला नाहीं, म्हणून त्यानें हातीं घेतलेल्या महत्कार्याचें श्रेष्ठत्व व महत्व तिळमात्रही कमी झालें नसतें, व कमी होतही नाहीं. अंगीकृत कार्यांत पूर्णपणें अथवा कांहीं प्रमाणांत यश येणें, अथवा पूर्ण किंवा कमीअधिक प्रमाणांत अपयश येणें, ह्या गोष्टीवर त्या कार्याचें श्रेष्ठत्व अथवा महत्व केव्हांही अवलंबून नसतें. अपयश येणें हा कार्यकर्त्याचा गुन्हा नाहीं; अंगीकृत कार्य श्रेष्ठ दरजाचें आहे कीं नाहीं, हाच प्रधान प्रश्न सोडवावयाचा आहे; ध्येय उच्चतर आहे कीं नाहीं हीच महत्वाची बाब विचारांत घ्यावयाची आहे; म्हणजे अंगीकृत कार्य श्रेष्ठ दरजाचें आहे, ध्येय उच्चतर आहे, हें नक्की ठरल्यावर, पूर्ण यश आलें, कांहीं प्रमाणांत आलें, पूर्ण अपयश आलें, कांहीं प्रमाणांत आलें, तरी तें कार्य, व तें कार्य करण्यांत पुढाकार घेणारी ती व्यक्ती, केव्हांही अभिनंदनीयच ठरतील हें उघड आहे.

शहाजीनें आदिलशाही राजसत्तेचा पाया पोखरला ही गोष्ट अगदीं खरी आहे; आणि त्याच्या कार्याचें श्रेष्ठत्व व महत्वही मान्य करणें आवश्यक आहे, हेंही तितकेंच सत्य आहे. परंतु मुसलमानी राजसत्तेचा डोलारा कोसळून पाडण्याचें अलौकिक कार्य शहाजीच्या हांतून पूर्णतेस गेलें नाहीं. तें महत्कार्य शिवाजीनें तडीस नेलें. शिवाजीच्या सांप्रदायांतील मराठा मंडळींनी तडीस नेलें, ही गोष्ट तितकीच सत्य आहे. स्वराज्याची स्थापना करण्याचें कार्य शहाजीच्या हांतून पूर्णतेस गेलें नाहीं, तरीसुद्धां त्या कार्याची सुरवात त्याच्याच वेळेपासून झालेली होती. शहाजीच्या काळापासूनच महाराष्ट्रांत स्वराज्य–संस्थापनेचें कार्य सुरू झालें होतें. दक्षिणेमधील आपसांतील मुसल-

मानी राज्यांचे कलह, मोंगलांची त्या राज्यांबरोबरील स्पर्धा, व बाह्य राजकीय उलाढाली, स्थित्यंतरें व परिस्थिती यांचा सहजगत्या जेवढा फायदा शहाजीच्या पदरांत पडावयास पाहिजे होता, तेवढा पडला होता; पण शिवाजीनें जें महत्कार्य केलें, तें करण्यास शहाजाचें मन कधींहि धजलें नाहीं. शहाजीच्या काळांतील राजकीय परिस्थितीपेक्षां, शिवाजीच्या काळांतील राजकीय परिस्थितींत कांहीं प्रमाणांत फेरबदल झाला होता, असें जरी मानिलें, तरी सुद्धां बुद्धिमत्ता व साधनांची अनुकूलता शहाजीच्या काळांत कमी होती, शिवाजीच्या वेळेइतकी नव्हती, असें मात्र कधींही ह्मणतां येणार नाहीं. तथापि शहाजीच्या काळांत पुष्कळ प्रमाणांत न्यून होतें तें श्रद्धेसंबंधानें होतें. स्वराज्य-संस्थापनेचें कार्य आपल्याहातून सिद्धीस जाईल अशी परमावधीस पोंचलेली श्रद्धा शहाजींतही नव्हती, व तत्कालीन महाराष्ट्रांतही नव्हती. शहाजीच्या-काळांत महाराष्ट्र देशांतील मराठ्यांची बहुतम संख्या मुसलमानांची सेवा करण्यांत दूषण मानण्याऐवजीं प्रायः भूषणच मानीत होती; मराठा वर्ग सेवाधर्मी बनलेला होता; सेवाधर्माच्या राष्ट्रघातक प्रवृत्तींत मुरलेला होता; शहाजी लहानपणापासूनच मुसलमानांच्या सहवासांत व परतंत्रतेच्या वातवरणांत वाढलेला होता. मुसलमानी राजघराण्यांवर शहाजीची भक्ति प्रारंभापासूनच विशेष होती. त्याचें स्वतःचें नांव शहाजी व भावाचें नांव शरीफजी हीं नांवें पीरावरुनच ठेविलेलीं होतीं; ह्मणजे मुसलमानी राजघराणीं, व साधू फकीर यांच्या संबंधी, शहाजीच्या जन्मकाळापूर्वीपासूनच, मालोजीच्या ठायीं श्रद्धा वसत होती; व तीच श्रद्धा शहाजीच्या मनांत वसत जाऊन पुढें ती दृढ होत होत इतक्या परमावधीस जाऊन पोंचली होती कीं, इ० सन १६५६ मध्यें, (ता० ४ नोव्हेंबर) विजापूरकर प्रसिद्ध व सदाचारी राज्यकर्ता महंमद आदिलशाहा मृत्यू पावला, त्यावेळेस मुसलमानांचें धार्मिक अशौचविधी त्यानें मनापासून पाळले होते; ह्मणजे मुसलमान राज्यकर्त्यांशीं फटकून वागून नव्हें, तर त्या राज्यकर्त्यांना चिकटून राहण्यांतच आपलें कल्याण अधीक होईल, शहाजीची श्रद्धा होती. उलटपक्षीं मुसलमान राज्यकर्त्यांशीं फटकून राहिल्यानेंच आपलें, आपल्या समाजाचें, देशाचें, व धर्माचें कल्याण अधिक होईल, अशी शिवाजीची श्रद्धा होती. धर्मसेवेनें

श्रद्धा दृढमूल होऊन तिचा विकास होत जातो; आणि श्रद्धेची जोपासना धर्मसेवेनेंच करावी लागते. ही जोपासना पतित महाराष्ट्रांमध्यें त्याकाळीं साधूसंत ईश्वरी प्रेरणेनें करूं लागले होते; आणि प्रत्यक्ष शहाजीच्या ठायींहि ही धार्मिक श्रद्धा वास करीत होती; परंतु ती परमावधीस अथवा पूर्णत्वास पोंचलेली नव्हती; ह्मणजे ह्या धार्मिक श्रद्धेच्या जोरावर कल्पनातीत हाल, आपत्ती व कष्टसायास सोसण्यास, व येणारीं संकटें शांतपणें सोशीत राहण्यास, राष्ट्रांतील कर्तेपुरुष व लढवय्या बहुजन समाज पुढें सरसावेल अशी मनाची खात्री पटण्याइतकी शहाजीची स्वतःची श्रद्धा जाज्वल्य नव्हती; इतकेंच नाहींतर, जरी महाराष्ट्रांत ही श्रद्धा आस्ते-आस्ते सारखी पसरत चालली होती तरीसुद्धां, शिवाजीनें स्वराज्यसंस्थापनेचा उद्योग प्रत्यक्ष शेवटास नेईपर्यंत, महाराष्ट्राचा स्वतःचाच विश्वास खुद्द स्वतःच्याच श्रद्धेवर बसलेला नव्हता. तथापि भावी काळांत ही स्थिति साफ पालटली. शिवाजीनें स्वराज्य-संस्थापनेचें कार्य सिद्धीस नेल्यानंतर महाराष्ट्राचा श्रद्धेवरील विश्वास अढळ झाला; आणि शिवाजीचा मृत्यु व संभाजीचा वध, यानंतरच्या काळांत मोंगल बादशाहा औरंगझेब याच्याशीं, जें स्वातंत्र्याचें युद्ध महाराष्ट्रास इ० सन १६०७ पासूत सतत अठरा वर्षे एकसारखें करावें लागलें, त्या सर्व अवधींत, साधुसंतांनीं उत्पन्न केलेल्या श्रद्धेवर, आणि राष्ट्रां-तील कर्तेपुरुष व लढवय्या बहुजनसमाज, यांनीं जोपासना करून वाढीस लाविलेल्या श्रद्धेवरील अढळ विश्वासाच्या जोरावर एकतानतेनें झगडत राह-ण्याचा प्रसंग प्राप्त झाल्यामुळें, श्रद्धा व श्रद्धेवरील अढळ विश्वास यांचें पुण्य-म्हणजे साधुसंत, कर्तेपुरुष, व लढवय्या बहुजनसमाज यांचें पुण्य-मूर्तिमंत राष्ट्रापुढें उभें राहून ह्या भयंकर आपात्तीतून राष्ट्र बचावून यशस्वीपणें बाहेर आलें. आत्मयज्ञ हा केव्हांही श्रद्धेशिवाय शक्यच नाहीं; आणि बहुजन समा-जाच्या आत्मयज्ञाशिवाय केवळ हातांवोटांवर मोजतां येणाऱ्या थोड्याशा कर्त्या व्यक्तींच्या आत्मयज्ञानें-राष्ट्रास वळण दिलें गेलें, धडा मिळाला गेला, तरी सुद्धां-राष्ट्राचें संवर्धन व संगोपन होणें शक्य नाहीं. श्रद्धेमध्यें शक्ती उत्पन्न करण्याची संजीवनी असल्यामुळें श्रद्धेच्या वाढीबरोबरच राष्ट्राच्या शक्तीचीही वाढ झाली; आणि शिवाजीच्या काळांतच श्रद्धेंतील शक्ती जनतेच्या प्रत्ययास

येऊन भावी काळांतील स्वातंत्र्ययुद्धांत तिला विराट स्वरूप प्राप्त झालें. श्रद्धे-मध्यें राष्ट्रप्रेम, धर्मबुद्धी व एकतानवृत्ती उत्पन्न करून स्थीर करण्याचें सामर्थ्य असल्यामुळें, इ० सन १६४६ मध्यें शिवाजीनें तोरणा किल्ला घेऊन, इ० सन १६८० पर्यंतच्या चौतीस वर्षांत जी सतत तपश्चर्या करून श्रद्धेची सिद्धी मिळविली, तिच्या पुण्याईनें महाराष्ट्र देश एकतानतेनें अलौकिक आत्मयज्ञ करण्यास समर्थ झाला. राष्ट्राचा उद्धार होऊन तें स्वतंत्र व स्वावलंबी बनलें. श्रद्धेमध्यें संयतेंद्रिय होऊन स्वसुखाचा त्याग करण्याची व करीत राहण्याची प्रवृत्ती उत्पन्न करून ती दृढ व स्थिर करण्याची शक्ति असल्यामुळें, आत्मयज्ञ कसा करावा, हें शिवाजीच्या श्रद्धेनें व श्रद्धेच्या सिद्धीनें आपोआप राष्ट्राच्या ध्यानीं आलें, आणि राष्ट्र श्रद्धावान, एकतानप्रिय, आत्मयज्ञपूर्ण, कार्यतत्पर व संयतेंद्रिय होऊन, शिवाजीच्या सिद्धीचें फळ जें स्वराज्य तें राष्ट्राच्या पदरांत पडून अखेरीस महाराष्ट्र स्वराज्याच्या शिखरास पोहोंचला. शहाजी व शिवाजी यांच्या कर्तृत्वामध्यें हा महत्त्वाचा फरक आहे. उभयतांच्या तपश्चर्येमध्यें हा मननीय भेद आहे. दोघांची वागणूक, विचारसरणी, व श्रद्धा यामध्यें हें महत्त्वाचें व मननीय वैशिष्य आहे, आणि म्हणूनच शिवाजीचें कर्तृत्व शहाजीहून श्रेष्ठ प्रकारचें आहे, हें उघड आहे.

तथापि—म्हणजे शिवाजीचें कर्तृत्व शहाजीच्या मानानें अधिक श्रेष्ठ दरजाचें असलें तरी सुद्धां शहाजीच्या अंगींही असाधारण कर्तृत्वशक्ति वसत होती, यांत तिळमात्रहि संदेह नाहीं; व त्याबद्दल त्यास योग्य तें स्थान दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. शहाजी अथवा इतर मराठा सरदारमंडळी मुसलमान राज्यकर्त्यांना मोठीशी प्रिय होती, असें नाहीं; पण मराठ्यासारखा लढवय्या समाज, आपल्या लगामीं ठेविल्यास तो आपल्या राज्याला व अंतर्बाह्य राजकीय शांतलेला बळकटी आणण्याला, व परशत्रूशीं झगडून आपणाला सुरक्षित करण्याला, अत्यंत उपयुक्त असल्यामुळें ते मराठ्यांना वरपांगीं मान देत असत; म्हणजे मराठा सरदारमंडळीला व विशेषतः शहाजीला असा मान देण्यांत मुसलमान राज्यकर्त्यांच्या अंतःकरणांत मतलबवृत्ति वास करीत होती. मराठा समाज आपणांशीं राजनिष्ठेनें वागतो, म्हणून त्या समाजाविषयीं कृतज्ञताबुद्धि व्यक्त करणारा अंतःकरणाचा ओलावा त्यांत असला तरी फारसा

नव्हता; मराठा मंडळाकडून आपल्या राज्याचें संरक्षण व संवर्धन होतें, म्हणून तो समाज त्यांनीं कामापुरता जवळ केलेला होता; फोड-झोड पद्धति अंगिकारिली होती; आणि इनामें, व तनें, जहागिरी, शिलेदारी, मनसबदारी, सरदारी, वगैरे प्रकारच्या राजाश्रयानें त्या समाजाचें पोट मुसलमानी राज्यकर्त्यांच्या हातांत गेलेलें होतें. म्हणजे मराठा समाज राजनिष्ठ राहिल्यास राजाश्रयाची वृद्धि करावी, व अराजनिष्ठ होऊं म्हणाल्यास त्याच्या पोटाला सहज चिमटा घेतां यावा, असें नियंत्रण त्या राज्यकर्त्यांनीं आपल्या हातीं ठेविलें होतें. त्याचा परिणाम असा झाला कीं, मुसलमान राज्यकर्त्यांविरुद्ध राजकीय चळवळ करण्याचें एखाद्या मराठा सरदाराच्या मनांत आलें तरी सुद्धां वृत्तिच्छेदाची भीति पुढें उभी राहिल्याबरोबर त्याचे विचार जागच्या जागीं जिरून जात असत; व राजनिष्ठ राहणेंच त्यांना भाग पडत असे. ह्या भीतीमुळें मराठा सरदारमंडळी प्राप्त स्थितींतच समाधान मानून कालक्रमणा करीत होती; परंतु शहाजी हा या सरदार मंडळीच्या मानानें विशेषच कर्तबगार, तेजस्वी व धडाडीचा पुरुष असल्यामुळें प्राप्त झालेल्या स्थितींत समाधान मानून न राहतां आपल्या कर्तबगारीनें आपणांस, मुसलमान राज्यकर्त्यांशीं प्रसंगीं झगडून सुद्धां, जें श्रेष्ठ पद मिळविणें शक्य होईल, तें आपण मिळविलेंच पाहिजे, या महत्वाकांक्षेनें त्यान आपल्या भावी उद्योगाची दिशा रेखाटलेली होती. मराठा मंडळांत त्या काळापर्यंत जाधव घराण्याकडे चालत आलेला अग्रपूजेचा मान आपणांसच मिळाला पाहिजे, मुसलमान राज्यकर्त्यांच्या दरबारांतील मराठा मंडळांत श्रेष्ठ पदाचें ऐश्वर्य आपणांसच प्राप्त झालें पाहिजे, या महत्वाकांक्षेनें जाधव घराण्याकडे चालत आलेला अग्रपूजेचा मान त्या घराण्याकडून हिसकावून आपल्या हातीं घेऊन तो आपणाकडेसच कायम ठेवावा, श्रेष्ठपदाचें ऐश्वर्य आपणच भोगावें, यासाठीं वेरूळकर भोंसल्यांनीं–मालोजी व शहाजी या उभयतांनीं–अश्रांत परिश्रम घेतले; अथवा मराठा मंडळांतील अग्रपूजेचा मान आपणांसच मिळाला पाहिजे, या महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन, स्वतःचें श्रेष्ठत्व व महत्त्व प्रस्थापित करण्याकरितां शहाजीनें भावी काळांत जे अश्रांत परिश्रम घेतले, त्यामुळेंच तो अग्रपूजेचा मान जाधव घराण्याकडून भोंसले घराण्याकडे गेला. शहाजीचें वर्चस्व परमा-

वर्णीस गेलें, व त्यावरोबरच जाधवांचें महत्व पूर्णपणें नष्ट झालें. स्वतःच्या कर्तबगारीवर अढळ विश्वास, व अंगीकृत कार्यावर पूर्ण नजर ठेवून, महाराष्ट्र राजकारणाची कांटेरी धुरा मोठ्या आनंदानें स्वशिरावर घेऊन शहाजीनें मोठ्या नेटानें व उत्साहानें विविक्षित मर्यादेपर्यंत महाराष्ट्राची अमोल्य सेवा बजाविली. तत्कालीन राजकीय परिस्थितीची योग्य जाणीव करून घेऊन महाराष्ट्र देश हल्लीं कोणत्या स्थितींत आहे, व त्या स्थितीला योग्य असें राष्ट्राचें कर्तव्य कोणतें आहे, हें आकलन करण्याची श्रेष्ठ बुद्धिमत्ता शिवाजीच्या खालोखाल शहाजीच्या ठायीं वसत होती. या बुद्धीच्या जोरावर त्यानें आपल्यापरीनें आपली सर्व शक्ति एकवटून राष्ट्रकार्य करण्यास मोठ्या उत्साहानें सुरवात केली. शिवाजीच्या श्रेष्ठ कार्यक्षमतेचा प्रश्न बाजूला ठेवून असें म्हणणेंच भाग आहे कीं, शहाजी हा शिवाजीप्रमाणेंच कार्याची विचक्षणा करीत बसला नाहीं; कार्याचा कीस काढीत राहिल्यानें कार्यहानी होते, कार्याची विचक्षणा केल्यानें कार्यनाश होतो, उलटपक्षीं पुढारी कार्यतत्पर आहे, आणि जनता त्या पुढाऱ्याच्या पावलावर पाऊल टाकण्यास मोठ्या उत्साहानें तयार आहे, अशी स्थिति असेल त्याच वेळीं, म्हणजे पुढारी व सामान्य जनता यांची विचारसरणी एक होऊन व उभयतांच्याही कार्याची एक्यवाक्यता होऊन उभयतांही जेव्हां स्वार्थत्याग व आत्मयज्ञ करण्यास तयार होतात, त्याच वेळीं कार्यसिद्धी होते; निदान ती होण्याची तरी आशा वाटूं लागते. शहाजीच्या काळांत कांहीं प्रमाणांत अशी मनोभूमी तयार झाली. कार्याचें स्वरूप व्यापक नव्हतें, आकुंचित होतें; पण महाराष्ट्राचा नवा संसार कसा मांडावा, ह्या विचाराचें बीज त्या कार्यांत वसत होतें; त्यामुळें शहाजीनें सतत अश्रांत परिश्रम घेऊन आपल्या शक्ति व विचारसरणीप्रमाणें महाराष्ट्राचा नवा संसार मांडण्याचा कसून प्रयत्न केला; व त्यांत त्यानें कांहीं प्रमाणांत यशही मिळविलें. साधारण जनतेच्या संसारांत ज्याप्रमाणें अनेक अडचणीं व संकटें उद्भवतात, त्याचप्रमाणें राष्ट्राच्या संसारांतही तीं नेहमींच उत्पन्न होतात. त्या नियमाला अनुसरून रा संसार मांडूं पाहणाऱ्या शहाजीवरही अनेक संकटें आलीं. तथापि शहाजीनें न डगमगतां त्याच्या ठायीं वसत असलेल्या शिवाजीच्या खालोखालच्या म्हणजे दुय्यम

दरजाच्या श्रद्धेप्रमाणें, स्वातंत्र्याच्या यज्ञांत उडी घालून, आपलें अंगीकृत कार्य तसेंच नेटानें पुढें चालवून, कर्नाटकमध्यें एक मांडलीकी स्वराज्य निर्माण केलें, आणि आपल्या करामतीनें महाराष्ट्रास एक नवीन दिशा दाखविली, हेंच शहाजीच्या चरित्रांतील श्रेष्ठत्व आहे, हें उघड आहे.

वरील विवेचनावरून, शहाजीराजे यानें केवढालीं प्रचंड कारस्थानें केलीं, जसजशी राजकीय परिस्थिति अधिक अधिक बिकट व खडतर होत गेली तसतसा तो अधिक अधिक उत्हासानें व चिकाटीनें आपलें अंगीकृत कार्य सारखा कसें करीत राहिला, मोंगल बादशहा व आदिलशहा यांच्या सारख्या प्रबळ सत्ताधाऱ्यांशीं, प्रसंगीं झगडून, त्यानें असामान्य असें राजकीय वैभव आपणांस कसें प्राप्त करून घेतलें, वगैरे अनेक बाबतींची योग्य कल्पना होते. शहाजीचें चरित्र वाचून त्याचें मनन केल्यावर तो शिवाजीच्या खालोखाल असा एक अलौकिक मुत्सद्दि व वीर पुरुष निर्माण होऊन गेला, असें स्पष्टपणें निदर्शनास येतें; आणि त्यामुळेंच महाराष्ट्र देशाच्या राजकीय इतिहासांत शहाजीराजे यांस छत्रपति शिवाजी याच्या खालोखाल श्रेष्ठ स्थान निःसंशय प्राप्त झालेलें आहे, हें पूर्णपणें उघड होतें.

# परिशिष्ठ पहिलें.

## तंजावरच्या राजघराण्याची

### त्रोटक माहिती.

" शिवाजीनें जवांमर्दीनें नवें राज्य मेळविलें आहे. तुह्मी आमची दौलत संपादिली आहे. त्यांत विठोजी राजे आमचे काका, यांचे कुटुंबांचें, व शरीफजी राजे आमचे भाऊ, यांचे वंशाचें, तुह्मी वडीलपणें चालवावें; आणि प्रजापालन करून राज्य करावें. वडील शिवाजी राजे यांनीं सर्वांचें संगोपन करून चालवावें, तरी त्यांनीं पृथ्वी आक्रमण करण्याचा इरादा धरिला, तेव्हां ईश्वर-कृपेनें त्यांचे मनोरथ पूर्ण झाले असतां, ( ते ) सर्वांचें संगोपन करावयास अधिकारीच आहेत करतील; कदाचित् त्याजवरी समय गुदरला तरी आह्मी पादशाहापासून इतल्ला तोडून दौलतीचा बचाव करून घेतला आहे. ही दौलत तुम्हां उभयतांचीं; परंतु दौलत रक्षावयाकरितां तुम्ही वडीलपणें सांभाळ करावा. मुख्यार्थ आमचे कुळीं आम्ही, आमचे कुटुंबांत शिवाजी राजे जेष्ठ; त्यांचें ठायीं तुम्ही; त्यास राजधर्म प्रवाहें तुम्ही वडीलपणें कुटुंबीयांचा सांभाळ करणें पराक्रमी शिवाजी राजांचे तुम्ही भाऊ, आमचे चिरंजीव, त्यांहून आवडते विशेष आहां; तरी सर्वांपासून चांगलें म्हणून घ्याल, पदरीं वडिलोपार्जित दोनचार माणसें आहेत, त्यांचें विचारें तुम्ही चालल्यास तुमचें कल्याण आहे."

शहाजीची, व्यंकोजीस आज्ञा.

तंजावरचें राज्य, हें—जरी शहाजीचा मुलगा व्यंकोजी यानें स्थापन केलें असलें तरी—वस्तुतः कर्नाटकांतील हें मराठ्यांचें राज्य, शहाजीराजे यानेंच स्थापन केलेलें असल्यामुळें, त्या राज्यासंबंधीं त्रोटक हकीकत शहाजीच्या चरित्रांत देणें आवश्यक असल्यानें ती या ठिकाणीं, परिशिष्टरूपानें दिली आहे.

या बाबतींत, कै० न्या० रानडेकृत " Rise of the Maratha Power " या ग्रंथाच्या बाराव्या प्रकरणांत "दक्षिण हिंदुस्थानांतील मराठे" या सदराखालीं, जी प्रास्ताविक माहिती दिली आहे, ती खालीलप्रमाणें आहे.

" हिंदुस्थानच्या दक्षिणेस तंजावर हें एक मराठा संस्थान असून तेथील राजघराणें हिंदुस्थानांतील इतर घराण्यापेक्षां फार पुरातन आहे; व सुमारें दोनशें वर्षेंपर्यंत—इ. सन १६७५ ते इ. सन १८५५ पर्यंत त्या घराण्याचा पश्चिम हिंदुस्थानांतील " मराठा साम्राज्या " च्या संस्थापकांशीं अगदीं निकटचा संबंध होता. असें असूनहि ग्रांटडफ किंवा एतद्देशीय मराठी बखरकार, यांपैकीं एकानेंहि या दक्षिणेकडील मराठा वसाहतीची विशेष हकीकत कोठेंच दिलेली आढळत नाहीं. या दूरच्या हतभागी संस्थानाची चमत्कारिक हकीकत वाचली म्हणजे, मराठा साम्राज्याची शक्ति, मराठी संस्थानांचा संघ होऊन जी एकी झाली, त्यांतच आहे, असें जें आमचें मत आहे, त्यास विशेष बळकटी येते. आपलें हित निराळें, आपली कर्तव्याची दिशा निराळी, अशा समजुतीनें जे या मराठा संघापासून अलग राहिले, त्यांचा, परकीय किंवा एतद्देशीय इतिहासकारांनींही, मराठ्यांच्या इतिहासांत कोठेंच उल्लेख केला नाहीं. अशा प्रकारें अलग राहण्याची ही प्रवृत्ति सृष्टिक्रमाविरुद्ध आहे. तिजपासून खेदकारक का होईना, पण बोधघेण्याजोगा आहे. " कावेरी " नदीच्या तीरांवरील " तंजावर " ही मराठ्यांची दूरची लष्करी वसाहत होती. या वसाहतीपासून तिकडे जो एक शाश्वत परिणाम घडून आला, त्याचें महत्त्व इ. सन १८८१ च्या खानेसुमारीवरून चांगलें लक्षांत येतें. या खानेसुमारींत मद्रास इलाख्यांत मराठे

लोकांची संख्या सुमारें २,३०,००० होती; यांत म्हैसूर, कोचीन व त्रावणकोर येथील मराठे लोकांची २०,००० ही संख्या मिळविली तर एकंदर बेरीज २,५०,००० पर्यंत होते. त्यांची वांटणी खालीं लिहिल्याप्रमाणें झाली होती, ती:—

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) गंजम | २०५ | ( १२ ) तंजावर | १४४२१ |
| ( २ ) विजगापट्टण | ३६४ | ( १३ ) त्रिचनापल्ली | १७६६ |
| ( ३ ) गोदावरी | ८३४ | ( १४ ) मदुरा | १९४३ |
| ( ४ ) कृष्णा | १४१४ | ( १५ ) तिनेवल्ली | ८३७ |
| ( ५ ) नेल्लूर | ८०७ | ( १६ ) सालेम | ७९०६ |
| ( ६ ) कड्डापा | ३९७३ | ( १७ ) कोईमतूर | २५५० |
| ( ७ ) कर्नूल | ४०८१ | ( १८ ) निलगिरी | ७३० |
| ( ८ ) बल्लारी | ४१६९ | ( १९ ) मलबार | ६१०७ |
| ( ९ ) चिंगलपट | १६३५ | ( २० ) दक्षिण कानडा | १४७३९० |
| ( १० ) उत्तर अर्कोट | ११६६२ | ( २१ ) मद्रास शहर | ४२३८ |
| ( ११ ) दक्षिण अर्कोट | १९५७ | ( २२ ) पदुकोट | ६६० |

" वरील कोष्टकावरून असें दिसतें कीं, मद्रास इलाख्यांत मराठे कायमचें ठाणें देऊन अमुक प्रांतांत राहिले नाहींत, असा एकहि प्रांत नाहीं. दक्षिण कानडा, मलबार, कोचीन, व त्रावणकोर या ठिकाणीं मराठ्यांची दीडलाख वस्ति आहे; पण ती वसाहत समुद्रकिनाऱ्याच्या बाजूकडून झाली आहे, व तिचा आणि इ० सन १६५० च्या सुमारास शहाजी व त्याचा मुलगा आणि शिवाजीचा सावत्रभाऊ व्यंकोजी यांच्या सैन्यानें जें राज्य स्थापन केलें, त्याचा कांहींहि संबंध नाहीं. शहाजी व शिवाजी यांच्याबरोबर दक्षिण हिंदुस्थानांत पुष्कळ मराठे आले होते; त्यामुळें त्यांचे वंशज तंजावर शहर व त्याच्या भोंवतालचा प्रदेश, उत्तर अर्कोट, सालेम व मद्रास शहर या ठिकाणीं पुष्कळ स्थाईक झालेले आहेत. त्रावणकोरच्या महाराजांनीं तंजावरला " मराठ्यांचें दक्षिणेकडील घर " असें मोठें छानदार नांव दिलें आहे. आणि तेथील राज्य, कोणी वारस नाहीं म्हणून खालसा होऊन जरी पन्नासांहून अधिक वर्षे झालीं, तरी तेथील राण्या त्या शहरांतच रहात असून त्यांना

ब्रिटिश सरकारकडून कांहीं नेमणूक आहे; व त्याशिवाय त्यांची खाजगी जिनगीहि बरीच आहे. तंजावरचे राज्य, इ० सन १६६६—इ० सन १६७५, पर्यंतच्या काळांत स्थापन झाले. त्यावेळीं या तंजावर प्रांतांत दक्षिण अर्काटचा कांहीं भाग, आणि त्रिचनापल्लांचा संपूर्ण प्रदेश यांचा समावेश होत होता. या लष्करी वसाहतवाल्यामध्यें ब्राह्मण व मराठे हे उभयतांहि होते; व उभयतांहि आपल्या देशापासून लांब असल्यामुळें, महाराष्ट्रांत त्यांच्या उपशाखा होऊन जे भेद झाले, ते तिकडे विसरले जाऊन सर्वजण "देशस्थ" या नांवानें परस्पराशीं बांधिले गेले."

"तंजावर येथें जेवढे राजे झाले, तेवढे सर्व विद्येचे मोठे पुरस्कर्ते होते. व त्यापैकीं कांहीं तर प्रसिद्ध कवी व पंडितहि होतें; व त्यांचे औदार्य तर थक्कच करून सोडण्यासारखें होतें. तंजावर येथें एक पुस्तकालय आहे. तेवढें पुस्तकालय हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही संस्थानांत नाहीं. तंजावर प्रांतांत त्या काळीं गायन वादन इत्यादि कलांचा उत्कर्ष होऊन त्या अगदीं पूर्णत्वास पावल्या होत्या; व त्यावेळीं दक्षिण हिंदुस्थानामध्यें अतीशय सुधारलेला व उच्चत्वास पावलेला असा प्रांत म्हणजे "तंजावर प्रांत" अशी त्याची कीर्ति होती; व ती तशी अजूनहि आहेच. तंजावरचें राज्य नष्ट झाल्यावर तेथील कलापंडित मंडळी त्रावणकोर येथें गेली; व त्यामुळेंच या बाबतींत त्रावणकोर हें सध्यां इतकें प्रसिद्ध आहे. कुंभकोण या नांवाच्या बड्या शहरांत प्रसिद्ध मराठा घराण्यांचा चांगलाच शिरकाव झालेला आहे; व त्याच घराण्यांतील सर टी. माधवराव, दिवाणबहादूर रघुनाथराव, वेंका स्वामीराव, गोपाळराव, इत्यादि थोर पुरुष आपआपल्या धंद्यांत मोठें यश संपादून कीर्तिमान् झाले आहेत; आणि कांहींचा तर राजकार्यधुरंधरत्व, विद्वत्ता, व परोपकारबुद्धि इत्यादि गुणांबद्दल हिंदुस्थानांत मोठाच लौकिक झालेला आहे. त्रावणकोर आणि म्हैसूर येथील हिंदु राज्यकर्त्यांनीं गेल्या व चालू शतकांतही ह्या मराठा मुत्सद्दयांस आश्रय देऊन त्यांच्या अंगच्या असामान्य गुणांचा पूर्ण विकास होण्याला चांगल्याच सवलती दिल्या आहेत. त्रावणकोर येथील दिवाण "इंग्लिश सुबराव" यानें केलेली कामागिरी सर्वांस माहीत आहेच; त्याच्यानंतर झालेल्या दिवाणांपैकीं सर टी. माधवराव यानें तर त्या राज्य

तील अव्यवस्था, व त्या राज्याचा कर्जबाजारीपणा नाहींसा करून, सर्वांनीं कित्ता घ्यावा, असें नमुनेदार तें संस्थान केलें; व दिवाण बहादूर रघुनाथ-रावाच्या वडीलांनीही म्हैसूर संस्थानांत अशीच कीर्ति संपादन केली. "

" उत्तर अर्काट या जिल्ह्यामध्यें " अरणी " ची एक छोटी जहागीर आहे. ती अजूनपर्यंत एका मराठा ब्राह्मण संस्थानिकाकडे चालत आहे. व ती या संस्थानिकाच्या पूर्वजांनीं दोनशेंहून अधिक वर्षांपूर्वी विजापूरकरांच्या पदरीं लढाईत कामगिरी बजाविली, म्हणून देणगीदाखल त्यांस मिळालेली आहे. त्या काळांत अर्काटच्या नबाबाच्या पदरीं दुसरेही मराठा ब्राह्मण असून तेही प्रसिद्धीस आले होते; व त्यांना " निजामशाही ब्राह्मण " असें म्हणत होते. तसेंच पदुकोटचें लहानसें मांडलीक संस्थान अजून सुस्थितींत असून तेथें मराठ्यांची बरीच वस्ती आहे. या संस्थानाची राज्यव्यवस्था अनेक ब्राह्मण दिवाणांनीं चालविली, व त्यापैकींचा एक अति प्रसिद्ध ब्राह्मण दिवाण, हा दक्षिण हिंदुस्थानांत आलेल्या मराठा वसाहतवाल्यांच्या कुटुंबांतीलच होता. कोचीन संस्थानांत पुष्कळ मराठे लोक आहेत. त्यापैकीं बरेच निरनिराळ्या जातीचें ब्राह्मण आहेत, व त्यांनीं व्यापार धंदा चालविला आहे. बल्लारी जिल्ह्यांत सोंदा [ सोंडूर ] या नांवाचें एक लहानसें मराठा संस्थान आहे; व दक्षिण हिंदुस्थानांतील मराठ्यांची सत्ता नाहींशी झाली, तरी तें संस्थान अजून हयात आहे. या संस्थानचा संस्थापक प्रसिद्ध संताजी घोरपडे याच्या वंशांतीलच होता. संताजींचा नातू मुराररराव घोरपडे यानें इ० सन १७५० च्या सुमारास कर्नाटकमधील लढायांत विशेष शौर्य दाखविलें व गुत्ती येथील छोटें संस्थान हैदरअल्लीच्या ताब्यांत जाईपर्यंत त्या संस्थानावर मुराररावानेंच राज्य केलें. औरंगझेबानें महाराष्ट्रावर स्वारी करून मराठ्यांना पेंचांत आणिलें, तेव्हां शिवाजीचा दुसरा मुलगा राजाराम हा जिंजी येथें-जिंजी हा शहाजींचा किल्ला असल्यानें—जाऊन राहिला. ह्याच किल्ल्यास सतराव्या शतकाच्या अखेरीस मोंगलांनीं वेढा दिला. याच किल्ल्यानें सतत सात वर्षेपर्यंत शत्रूशीं झुंजून मराठ्यांचें संरक्षण केलें, व त्यामुळेंच एवढ्या मुदतींत आपली स्थीरस्थावर करून मराठ्यांना मोंगलाशीं टक्कर देण्यास चांगलीच फुरसत मिळाली. "

" वर लिहिलेल्या त्रोटक हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, मुसलमानीं

सत्तेचा -हास झाल्यानंतर हिंदुस्थानांत जो धामधुमीचा काळ प्राप्त झाला त्याच वेळेस मूठभर–फार झाले तर एकलाख पर्यंत असतील–मराठ्यांनीं मद्रास इलाख्यांत जहागिरी मिळविल्या, आणि नवीन राज्यें स्थापन केलीं. इतकेंच नव्हे तर त्यांची इभ्रत अजून पूर्वीसारखीच कायम असून अद्यापि त्या इलाख्यांतील लोकसंख्येमध्यें हेच लोक काय ते प्रमुख आहेत. परंतु कांहींही असलें तरी त्यांच्या प्राबल्यास आतां ओहोटी लागली आहे, हें मात्र खास आहे; इतकें आपणांस कबूल करणें भाग आहे. म्हणूनच मराठामंडळांतील संयुक्त राज्यकर्त्यांपेक्षां, मराठे लोकांच्याच सद्दीच्या काळाचें वर्णन करण्याच्या बाण्यानें जो इतिहास लिहिला आहे, त्या इतिहासांत तंजावरच्या राज्याची हकीकत देणें अगत्याचें आहे. ”

तंजावर हें शहर मद्रास इलाख्यांत, एक जिल्ह्याचें ठिकाण असून, दक्षिण कर्नाटकांत त्याचा समावेश होतो. या जिल्ह्याच्या उत्तरेस त्रिचनापल्ली व दक्षिण अर्काट ( कडलोर ) हे कोलेरून ( हा कावेरी नदीचा फांटा आहे. ) नदीच्या पलीकडे असून, दक्षिणेस मदुरा जिल्ह्यांतील शिवगंगा जमिनदारी व तोंडमन राजाचा मुलूख, पूर्वेस व अग्नेयीस बंगालचा उपसागर, नैऋत्येस मदुरा जिल्हा, व पश्चिमेस मदुरा व त्रिचनापल्ली जिल्हा, व पदुकोट संस्थान हीं असून, तंजावर हें कावेरी व कोलेरून या नद्यांच्या दुआबांत, त्रिचनापल्लीपासून ३७ व मद्रासपासून २१७ मैलांवर आहे. तंजावर प्रांत राजकीय, धार्मिक व वाङ्मयविषयक बाबतींत अतीशय सुधारलेला, व उच्चत्वास पावलेला, अशी त्याची ख्याती असून ती आजतागायत कायम आहे; व त्याच्या सृष्टिसौंदर्यामुळें त्यास “ दाक्षिणेंतील नंदनवन ” ( The Eden of the South ) अशी संज्ञा असून, कावेरी व कोलेरून या दोन नद्यांमधील हा प्रदेश * मोठा संपन्न व सुपीक म्हणून त्याची प्रसिद्धी आहे.

---

* कावेरी नदी [लांबी ४७०मैल] ही कुर्ग प्रांतांत, [ सह्याद्री पर्वतात ] उगम पावून ती प्रथम पूर्व व नंतर दाक्षिण दिशेनें म्हैसूर संस्थानांतून, पूर्व व पश्चिम किनाऱ्यांच्या मध्यभागीं असलेल्या पर्वतावलींतून, वाहात जाऊन

शहाजी राजा इ० सन १६६४ मध्यें मृत्यु पावल्यानंतर तंजावरची जहागीर त्याचा मुलगा व्यंकोजी याच्याकडेस आली. शहाजीच्या काळांत, व पुढें व्यंकोजीच्या कारकीर्दीतही बंगळूर हेंच त्या उभयतांच्या राहण्याचें मुख्य ठिकाण, व मुख्य ठाणें असून, मराठा सैन्याची छावणीही त्याच ठिकाणीं असे. व्यंकोजीच्या कारकीर्दीत तंजावर व त्रिचनापल्ली येथील राज्यकर्त्यांमध्यें प्राणघातक युद्धकलह सुरू झाले. त्यांत तंजावरकर विजय राघव नाईक याचा पराभव होऊन, तो विजापूर दरबारच्या आश्रयास गेला; व आपणांस गादीवर बसविण्याविषयीं त्यानें त्या दरबारची मदत मागितली. तेव्हां आदिलशाही दरबारानें "तुम्ही तंजावरकर विजयराघव नायकास पुन्हा तंजावरच्या गादीवर स्थापन करावें;" असा व्यंकोजीस हुकूम दिला. तेव्हां व्यंकोजी हा आपणांबरोबर बारा हजार सैन्य घेऊन विजयराघव नायकासह तंजावर येथें गेला; व त्रिचनापल्लीकर नायकाचा पराभव करून, व त्यास तेथून हांकलून लावून, त्यानें विजयराघव नायकास, आदिल शाहाच्या हुकुमाप्रमाणें तंजावरच्या राजगादीवर स्थापन केलें.

तथापि व्यंकोजी तंजावर प्रांतांतून परत गेला, असें पाहतांच विजयराघव नायक व त्याचे भाऊबंद यांच्यामध्यें आपसांत पुन्हां गादीबद्दल तंटा सुरू झाला; व तेथील राजाचा मुख्य प्रधान व इतर दरबारी मुत्सद्दी, यांनीं त्रिमलवाडी येथें येऊन व्यंकोजी राजाची भेट घेतली; व त्यास "विजय-

---

फिरून पूर्वाभिमुखी होऊन म्हैसूर संस्थानांतून बाहेर पडते, व मद्रास इलाख्यांतून वहात जाऊन बंगालच्या उपसागरास मिळते. या नदीस मुखाजवळ अनेक फाटे फुटलेले आहेत. त्यांतील सर्वांत उत्तरेकडील फाट्यास कोलेरून असें म्हणतात. कावेरी नदी, म्हैसूर संस्थानांतून, मद्रास इलाख्यांत जातांना त्रिचनापल्लीजवळ, तिचे कावेरी व कोलेरून असे दोन भाग होऊन ती तंजावर प्रांतांतून पुढें जाऊन बंगालच्या उपसागरास मिळाली आहे. त्रिचनापल्ली नजीक तंजावरच्या राजांनीं प्राचीन काळीं धरण बांधून मोठा कालवा तयार केला आहे, तो "मेलूरचा कालवा" म्हणून प्रसिद्ध आहे, व या कालव्यामुळें तंजावर प्रांतास विशेष सुपीकता प्राप्त झाली आहे.

राघव नायकास राज्य चालविण्याची अक्कल नाहीं, पात्रता नाहीं, अथवा सामर्थ्यही नाहीं, सर्व राज्यामध्यें पूर्णपणें अव्यवस्था व अंदाधुंदी माजली असून सर्व प्रजा असंतुष्ट झाली आहे; तरी तुम्ही तंजावर प्रांत काबीज करून तेथील सर्व कारभार आपल्या हातीं घ्यावा; " अशी विनंती केली. त्याप्रमाणें व्यंकोजीनें आदिलशाही सैन्याच्या मदतीनें तंजावरवर हल्ला करून तें शहर आपल्या हस्तगत करून घेतलें. त्यावेळीं उडालेल्या चकमकींत विजयराघव व त्याचे भाऊबंद मारले गेले; व तंजावर व्यंकोजीच्या ताब्यांत येऊन ( इ० सन १६७४ मध्यें ) आदिलशाहानें व्यंकोजी राजास तंजावरची जहागीर वंश-परंपरा बक्षीस करून दिली; व नंतर इ. सन १६७५ मध्यें व्यंकोजीनें बंग-ळूर येथील ठाणें हालवून तंजावर ही आपल्या राहण्याची जागा, व राजधानी केली.

त्यानंतर एक वर्षानें—म्हणजे इ० सन १६७६ मध्यें—शिवाजीनें कर्नाटक प्रांतावर स्वारी केली. त्यावेळीं व्यंकोजी व शिवाजी यांच्यामध्यें घडलेल्या एकंदर व्यवहाराची हकीकत पुढें शिवाजीच्या चरित्रांत येणार असल्यानें, त्यासंबंधानें या ठिकाणीं अधिक उल्लेख केला नाहीं; तथापि थोडक्यांत म्हणजे शिवाजीपुढें व्यंकोजीचा निभाव न लागून हें तंजावरचें राज्य शिवाजीच्या हस्तगत झालें. व नंतर, " तंजावर व त्रिचनापल्ली येथील जहागिरीवर शिवा-जीचाच हक्क आहे; " असें विजापूर दरबारानेंही कबूल केलें. त्या व इतर कारणांमुळें व्यंकोजी उदास होऊन, व सर्व राज्यकारभार सोडून देऊन, त्यानें वैराग्यवृत्ति धारण केली. ही गोष्ट शिवाजीचा कर्नाटक प्रांतांतील मुख्य कार-भारी रघुनाथ नारायण हणमंते याच्या मार्फत शिवाजीस कळल्यावर त्यास अतिशय खेद झाला; व त्यानें व्यंकोजीस एक खरमरित पत्र लिहून त्यांत " तुझें कर्तव्य काय ! व तूं करतोस काय ? " अशा प्रकारें त्याची योग्य कानउघाडणी केली; व त्याचा योग्य तो परिणाम होऊन व्यंकोजीनें वैराग्य-वृत्तीचा त्याग केला; व शिवाजीनेंही व्यंकोजीचें समाधान व्हावें, म्हणून अत्यंत उदारपणानें वडिलार्जित उत्पन्नावरील आपला सर्व हक्क व्यंकोजीस दिला; व व्यंकोजी हा पुन्हां पूर्वीप्रमाणें तंजावरच्या राज्याचा उपभोग घेऊं लागला.

व्यंकोजी हा स्वभावानें विशेष मानी असून, आपल्या वैभवाचा त्यास अतीशय अभिमान वाटत असे. त्याच्या आंगीं शौर्य व साहस या गुणांचा अगदींच आभाव होता, असें दिसत नाहीं. उलट त्यानें तंजावर येथें नुसती राजगादीच संस्थापित केली, इतकेंच नाहीं तर त्रिचनापल्ली व मदुरा व रामनाद, वगैरे ठिकाणच्या नायक राज्यकर्त्यांनाही त्यानें आपल्या पराक्रमानें जागच्याजागीं दावून ठेविलें, आणि त्रिचनापल्लीकरांच्या मदतीस जाऊन त्यांच्याकडून सौंदल महाल मिळविला, यावरून तर तो पराक्रमी अथवा कर्तबगार राज्यकर्ता नव्हता, असें तर बिलकुलच म्हणतां येणार नाहीं. तथापि आपल्या राज्यांतील दूरचीं ठाणीं अथवा प्रदेश आपल्या ताब्यांत ठेवण्याइतकी त्याच्या पराक्रमाची अथवा कर्तबगारीची व्याप्ति नव्हती त्यामुळें म्हैसूरकडील दूरचा प्रदेश त्याच्या ताब्यांत राहणें अशक्य झालें, व त्यानें बंगळूर व बंगळूर प्रांत, फक्त तीन लक्ष रुपयांस म्हैसूरचा राज्यकर्ता चिक्कदेवराज यांस विकून टाकला ! शिवाय व्यंकोजीचा जन्म शहाजीप्रमाणेंच मुसलमान बादशाहीच्या सेवेंत गेल्यामुळें, त्याला स्वातंत्र्याची व स्वाभिमानाची केव्हांही अखेरपर्यंत जाणीव झाली नव्हती. इतकेंच नव्हें तर त्याचे सल्लागार व प्रधान मंत्री कित्येक मुसलमान असून त्यांच्या तंत्रानें तो नेहमीं वागत होता. अर्थात् शिवाजीच्या स्वराज्य-संस्थापनेंत तो त्यास मदतगार होईल, हें केव्हांही शक्य नव्हतें, हें उघड आहे.

व्यंकोजीस दोन बायका होत्या; त्यापैकीं वडील दिपाबाई ही इंगळ्यांची +कन्या. ही फार शहाणी व चतुर असून व्यंकोजीनें वैराग्यवृत्ति धारण

---

+ वऱ्हाडांत चिखली तालुक्यांतील अमडापूर परगण्यांत करवंड म्हणून एक गांव आहे. या करवंड वगैरे गावांचे देशमूख व मालक पाटील 'इंगळे' हे असून, जाधव, भोंसले व इतर प्रसिद्ध मराठा सरदार घराण्याशीं त्यांच्या सोयरिकी झालेल्या आहेत. तंजावरकर व्यंकोजी राजे याची बायको दिपाबाई ही इंगळ्यांची मुलगी. ते हेच इंगळे असें ते सांगतात. हें घराणें व्यंकोजीच्या वेळेपासून आजतागायत तंजावर येथें असून त्यांना " राजे प्रतापरुद्र मानेराव " असा किताब आहे. ( काळेकृत वऱ्हाडचा इतिहास पहा. )

केली, त्यावेळीं तिनेंच त्याचें समाधान केलें. रघुनाथपंत हणमंते यांस शरण जाऊन त्याच्या मार्फत शिवाजींचें समाधान करण्याची त्यास सल्ला दिली; व तिनें स्वतःही रघुनाथपंताची परोपरी विनवणी केली; व त्यानंतर रघुनाथ-पंतानें व्यंकोजी व शिवाजी या उभयतांमध्यें तह करून दिला.

शिवाजी हा आपल्या या भावजयीची योग्यता पूर्णपणें जाणून होता. रघुनाथपंताच्या लेखान्वयें, शिवाजीनें तहाची मान्यता दाखवून जो जबाब लिहिला, त्यांत सुद्धा त्यानें दिपाबाई संबंधीं मोठा आदरपूर्ण उल्लेख करून "आमची भावजय [ दिपाबाई ] शहाणी, पुढील होष्यमान [ भवितव्यता जाणून [ व्यंकोजीस ] विचारावरी आणिलें; " अशी तिची प्रसंशा केली आहे; व मुलखाच्या वांटणीच्या व बंदोबस्ताच्या कलमांत दिपाबाई संबंधीं मुद्दाम एक कलम घालून त्यांत पुढीलप्रमाणें स्पष्ट उल्लेख केला आहे तोः—

कलम १५; " परगणे बेंगरूळ आम्हीं सोडविलें; त्यास आसपास ठाणीं हासकोटें, व सिलेकोटें; ऐसे तीन महाल, दोन लाख वराईचें उत्पन्न आज आहे. जमेवर आल्यास पांच लाखांपर्यंत उत्पन्नास येतील. त्यास आम्ही आपले तर्फेनें चि० सौभाग्यवती दिपाबाईस चोळी बांगडीस दिल्हे आहेत. त्यास याचा विभाग तुमचे वंशांनीं ( म्हणजे मुलाच्या वंशानी ) करूं नये; मुलींनीं परंपरा आपले खाजगी खर्चास ठेवावे. त्याची चौकशी तुम्ही ( व्यंकोजीनें ) राखीत जावी. सौभाग्यवती ( दिपाबाई ) देतील, त्यांणीं खावेत."

यावरून दिपाबाईबद्दल शिवाजीस किती आदर वाटत होता, हें निदर्शनास येतें. व्यंकोजीस या दिपाबाईपासून तीन मुलगे झाले. त्यांचीं नांवें, शहाजी, सरफोजी व तुकोजी; व्यंकोजीची दुसरी बायको मोहित्यांची कन्या अणुबाई. तिला दोन मुली झाल्या. व्यंकोजीस ह्याशिवाय नऊ परिगृहीत स्त्रिया होत्या. त्यापैकीं कांहींच्या पोटीं चंद्रभान, सूर्यभान, मित्रभान, कलेभान, कीर्तिभान, विजयभान, व उदयभान असे सात पुत्र जन्मले.

व्यंकोजीराजाच्या ताब्यामध्यें तंजावरचा जो प्रांत होता, त्याचे पांच सुभे होते. त्यांचीं नांवें—[१] सुभा त्रिवेदी; [२] सुभा कुंभकोणम्; [३] सुभा मायावरम्; [४] सुभा मन्नारगुडी; व [५] सुभा पट्टकोटा आणि बलम-

# तंजावरचें राजघराणें

## वंक्षवृक्ष

### शहाजी राजे.

(१) व्यंकोजी ऊर्फ, एकोजी राजे.
इ॰ सन १६७५–१६८७;

(२) शहाजीराजे.
इ. स. १६८७-१७११;

(३) सरफोजीराजे.
इ. स. १७११-१७२८;

(४) तुकोजीराजे.
इ. स. १७२८-३५

(८) प्रतापसिंहराजे.
इ. स. १७४०–६३;

(७) सयाजीराजे.
इ. स. १७३८–३९;

(५) व्यंकोजी ऊर्फ एकोजी बाबासाहेब.
इ. स. १७३५–१७३६;
पत्नी सुजानबाई

(६) सुजानबाई.
इ. स. १७३६–१७३८;

(९) तुळसाजीराजे,
इ. स. १७६३–१७८७;

(१०) अमरसिंहराजे.
इ. स. १७८७–१७९८;

(११) सरफोजीराजे; (दत्तक)
इ. सन १७९८–१८३२;

(१२) शिवाजीराजे;
इ. सन १८३२–१८५५; निपुत्रिक, सबब औरस संततीच्या अभावीं संस्थान खालसा झालें.

पट्ट; या एकंदर सुभ्याची मिळून५७५३गांवें होतीं व वसूल३२०५०००० प्याडी कलम ( Paddy Cullums ) होता. " प्याडी कलम " म्हणजे तांदूळ मोजण्याचें एक विशिष्ट वजन आहे. एक कलम म्हणजे [ जुन्या पद्धतीनें ] अजमासें $\frac{3}{४}$ मण* वजनाचें माप आहे. [ पारसनीसकृत तंजावरचें राजघराणें हें पुस्तक पहा.] तंजावरचें मुख्य उत्पन्न तांदूळ हें असल्यामुळें तांदुळाच्या मापांतच राज्याचें उत्पन्न दिलेलें आहे; (Fulerton's "A Particular account of the Tanjore Country, and of its produce " या नांवाच्या टिपणाच्या आधारें ही माहिती दिली आहे ) त्यावरून पाहतां व्यंकोजीच्या कारकीर्दीत तंजावर प्रांताचें फक्त तांदुळाचें उत्पन्न २,४०,३७,५०० मण होतें, असें निदर्शनास येतें.

व्यंकोजीराजे हा मोठा धोरणी व व्यवहारचतुर होता, असें दिसतें. त्यानें आपल्या तिन्हीही औरस मुलांनीं आपल्या मागें आपसांत भांडूं नये, म्हणून आपल्या हयतींतच त्यांची निरनिराळी स्वतंत्र व्यवस्था करून ठेविली होती; ती अशी कीं, त्यानें आपला वडील मुलगा शहाजी यांस तंजावरचें राज्य दिलें होतें. दुसरा मुलगा सरफोजी यास कुंभकोनम् जवळील साकोली हा महाल दिला होता. व तिसरा मुलगा तुकोजी यास तंजावरच्या दक्षिणेस असलेला महादेवपट्टम् हा गांव दिला होता. व्यंकोजी हा इ० सन १६८७ मध्यें मृत्यू पावला. व त्याच्या मागून त्याचा वडील मुलगा शहाजी हा गादीवर आला.

शहाजीराजे याची कारकीर्द मराठ्यांच्या दृष्टीनें विशेष महत्वाची असून

---

* तांदुळाचें एक तंजावरी कलम माप म्हणजे सरासरी एक मण समजावयाचा, व प्याडीचें एक कलम माप म्हणजे अजमासें $\frac{3}{४}$ मण समजावयाचा. वर तांदुळाचें कलम असें न म्हणतां प्याडीचें कलम असें म्हटलें आहे; म्हणून एक कलम म्हणजे $\frac{3}{४}$ मण असें समजावयाचें; आणि अगदीं बरोबर माप म्हणजे, एक कलम प्याडी म्हणजे ६३$\frac{४४१}{१७८}$ पौंड (वजनी) असें समजावयाचें आहे.

ह्याच अवधींत मराठ्यांची जिंजी+ येथील राजकारणें घडून आलीं आहेत. शहाजी गादीवर आला, त्याच्या अदल्याच वर्षी, ( इ० सन १६८६ मध्यें ) औरंगझेबानें विजापुरचें राज्य बुडविलें. व शहाजी गादीवर आला त्याच वर्षी [ इ० सन १६८७ मध्यें ] त्यानें गोवळकोंडें येथील राज्य बुडविलें. व आपला सरदार कासीमखान यांस तिकडे पाठवून सर्व कर्नाटक व दक्षिण हिंदुस्थान त्यानें आपल्या स्वामित्वाखालीं आणण्याचा मोठ्या जोरानें प्रयत्न आरंभिला.

त्यानंतर इ० सन १६९० मध्यें, औरंगजेबानें छत्रपति संभाजी याचा वध केला. त्यावेळीं, त्याची साध्वी, स्वार्थत्यागी व आत्मयज्ञपूर्ण अलौकिक स्त्री येसूबाई, व बालयुवराज शिवाजी ऊर्फ शाहूराजे ही उभयतां रायगड येथील किल्ल्यावर होतीं. मोंगलांनीं सतत दहा महिने हा किल्ला हस्तगत करून घेण्याची शिकस्त केली; परंतु किल्ला त्यांच्या हातीं आला नाहीं. अखेरीस मोंगल सरदार ईतिकदखान यानें किल्ल्यांत फितूरी करण्याचा यत्न चालविला. त्यावेळीं सूर्याजी पिसाळ या नांवाचा वाई येथील मराठा देशमूख रायगड किल्ल्याचा किल्लेदार होता. तो, वाईची देशमुखी औरंगझेबाकडून देवविण्याचें, खानाकडून वचन घेऊन, मोंगलास सामील झाला; व त्यानें किल्ल्याचे दरवाजे उघडून शत्रूस आंत घेतलें. त्यामुळें किल्ला मोंगलांच्या हस्तगत झाला [ इ० सन १६९० च्या अखेरीस ]. आणि येसूबाई व शाहू या उभयतांना खानानें कैद करून औरंगझेबाकडे नेलें. × संभाजीचा वध झाल्यावर, रायगड मोंगलांच्या ताब्यांत जाण्यापूर्वी मराठेशाहीच्या सर्व सरदार व मुत्सद्दी

---

+जिंजी ( Gingee ) हा खेडेगांव व किल्ला, दक्षिण अर्काट [कडलूर] जिल्ह्यांत, किस्तनागिरी ( Kistnagiri ) पासून समूद्रकिनाऱ्याकडे जी सडक जाते, त्या सडकेवर, त्रिवेंद्रमपासून अजमासें अठरा मैलांवर आहे.

×ही सर्व हकीकत पुढील इतिहासांत साद्यंतपणें येणार असल्यानें त्रोटकरीत्याच तिचा या ठिकाणीं उल्लेख केला आहे. रायगड किल्ला मोंगलांच्या हातीं आल्यावर इतिकदखान हा सूर्याजी पिसाळ यांस आपणांबरोबर औरंगझेबाकडे घेऊन गेला; व त्याची बादशाहाशीं भेट करविली. त्या वेळीं, बादशहानें " तूं

मंडळींनीं, मातोश्री एसूबाईसाहेब हिच्या आज्ञेनें व अनुमतीनें राजारामास कर्नाटकमधील पांडेचरीजवळील जिंजी येथील प्रसिद्ध व बळकट किल्ल्यावर पाठविलें व त्या ठिकाणीं राजारामानें मराठ्यांची गादी तात्पुरती ठेवून पांच वर्षेपर्यंत मोगल सैन्याशीं सारखी टक्कर दिली. या आणीबाणीच्या प्रसंगीं छत्रपती शिवाजीमहाराजांचा जांवई हरजीराजे महाडिक [ शिवाजीची मुलगी अंबिकाबाई ही हरजीराजे यांस दिली होती.] हा जिंजी येथील किल्लेदार असून पटाइत तरवारबहाद्दर व कसलेला मुत्सद्दी होता. त्यानें जिंजीच्या किल्ल्यावर मोठा कडेकोट बंदोबस्त ठेवून राजारामास अमोल्य साह्य केलें—मराठी राज्याची अमोल्य सेवा बजाविली——व त्यामुळेंच मराठ्यांना मोंगलाशीं सतत पांच वर्षें सारखें मोठ्या नेटानें व हिंमतीनें लढत राहतां आलें. या वेळीं तंजावरकर शहाजीराजे हा राजारामाचा चुलतभाऊ असल्यामुळें मोंगल सरदार झुल्पिकारखान यानें त्याच्यावर स्वारी करून त्रिचनापल्ली प्रांतांतील तंजावरच्या राज्याचा कांहीं भाग त्याच्याकडून हस्तगत करून घेऊन खंडणी-ही वसूल केली [ इ० सन १६९१ ]. व पुढें इ० सन १६९६ च्या

---

मुसलमानी धर्माचा स्वीकार कर; " असा त्यास अतिशय आग्रह केला. त्यास बळी पडून सूर्याजीनें मुसलमानी धर्म स्वीकारून वाईची देशमुखी त्यानें संपादन केली. तथापि त्याच्या कुटुंबांतील कांहीं माणसें हिंदुधर्मांतच राहिलीं. हल्लीं वाईजवळ ओझर्डें म्हणून एक गांव आहे. त्यागांवीं हिंदु व मुसलमान, अशीं दोन्हीही पिसाळ घराणीं अस्तित्वांत आहेत. सूर्याजीच्या ह्या देश-द्रोही व फितुरी वर्तनामुळें शाहूस सतत सतरा वर्षें मोंगलांच्या कैदेंत अडकून रहावें लागलें. तथापि शाहू पुढें सुटून आल्यानंतर त्यानें सूर्याजीच्या ह्या दुष्ट कृत्याचा पूर्ण सूड उगविला. भावी काळांत शाहू हा ताराबाईशीं युद्ध करीत करीत वाईजवळ आला. त्यावेळीं त्यानें या सूर्याजी पिसाळाच्या कुळां-तील लहान मुलें, व बायका याखेरीजकरून, सर्व पुरुषांची कत्तल करविली. व सूर्याजीस पकडून, त्याची नानाप्रकारें निर्भर्त्सना व हालहाल करून त्यास ठार मारविलें. अशा रीतीनें या दुष्ट, घातकी, फितुरी, व देशद्रोही मनुष्यास इहलोकींच त्याच्या कृतकर्मांचें यथायोग्य प्रायश्चित्त मिळालें.

सुमारास त्यानें पुन्हतंजावर येथें मोंगली सरदार पाठवून, शहाजीराजे याजकडून जिंजी येथील मराठयांना बिलकूल मदत मिळूं नये, असा प्रयत्न केला. थोडक्यांत म्हणजे ह्या बिकट प्रसंगीं शहाजीस आपलें राज्यरक्षण करण्याकरितां मोंगलाशीं तह करणें भाग पडलें, व मोठया कष्टानेंच तो व त्याचें राज्य मोंगलांच्या तडाक्यांतून या वेळीं वाचून जिवंत राहिलें.

तथापि तंजावरच्या राज्यावर पुन्हां लवकरच दुसरें भीतिदायक संकट उत्पन्न झालें. इ० सन १७१० मध्यें कर्नाटक प्रांताचा नबाब दाऊदखान हा गुजराथचा सुभेदार झाला; व मोंगल बादशहानें त्याच्या जागीं सादत उल्लाखान याची नेमणूक केली. त्याप्रमाणें तो कर्नाटक प्रांतीं येऊन अधिकारारूढ झाला; व त्या वेळेपासूनच, त्यानें आपली सत्ता वृद्धिंगत करण्याची व तंजावर व त्रिचनापल्ली हीं दोन्हीं संस्थानें आपल्या सत्तेखालीं आणण्याची खटपट आपल्या मृत्यूपर्यंत ( इ० सन १७३२ ) थोड्याफार प्रमाणांत सारखी सुरू ठेविली होती. तथापि त्यापासून तंजावरच्या राज्यास म्हणण्यासारखा उपसर्ग पोंचला नाहीं.

शहाजीराजांची कारकीर्द प्रजेच्या दृष्टीनें सुखावह झाली. व त्यानेंही व्यंकोजीप्रमाणेंच तंजावरचें राज्य उत्तम प्रकारें चालवून उत्तम लौकिक मिळविला. इतकेंच नाहीं तर, तंजावर प्रांतावर मोंगलांच्या स्वाऱ्या झाल्या, तरी सुद्धां मोठ्या दक्षतेनें वागून, त्यानें आपली सांपत्तिक स्थिति व राज्याचा वसूल व्यंकोजीच्या कारकीर्दीइतकाच कायम ठेविला. शिवाय तो मोठा गुणज्ञ व रसिक असून कवींचाहि आश्रयदाता होता. शहजीच्या पत्नीचें नांव चिमाबाई हें असून त्यास अनेक परिगृहित स्त्रिया होत्या; तथापि त्यास औरस पुत्रसंतती नव्हती. शहाजी राजा हा ता० २७ सप्टेंबर इ० सन १७११ रोजीं मृत्यू पावला; व त्यास औरस पुत्रसंतति नसल्यामुळें, त्याचा धाकटा भाऊ सरफोजी हा तंजावरचा राज्याचा अधिपति झाला.

सरफोजीराजे, हा शांतताप्रिय राज्यकर्ता असून त्यानें आपला दिवाण आनंदराव पेशवे व सेनापति खंडोजी विचित्रे या उभयतांच्या मदतीनें आपला कारभार शांततेनें चालविला; तथापि कर्नाटकाचा नबाब सादत उल्लाखान, हा

केव्हां तंजावर प्रांताला शह देईल, याचा नियम नव्हता; व त्याच्या उपसर्गांची भीति कायम होती.

सरफोजीराजे याच्या कारकीर्दींत एक अत्यंत महत्वाचें राजकीय स्थित्यंतर घडून आलें. तें म्हणजे "निजाम उल्मुल्क याच्या स्वतंत्र सत्तेचा प्रारंभ" हें होय.* या स्थित्यंतरामुळें अनेक निरनिराळे राजकीय परिणाम घडून आले; इतकेंच नाहीं तर, "निजाम" या व्यक्तीनें अठराव्या शतकांतील मराठ्यांचा, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानचा, भावी इतिहास बनविला. मराठ्यांच्या छातीवर निजामाची ही नवीन धोंड कायमची येऊन बसली. निजामउल्मुल्क यानें दक्षिणेंत स्वतंत्र राज्यस्थापना केल्यानंतर तो दिवसेंदिवस सारखा बलाढ्य

---

* चिनकिलीजखान ऊर्फ निजामउल्मुल्क (जन्म इ० सन १६७१ ता० ११ आगस्ट; मृत्यु इ० सन १७४८ ता० २१ मे) हा दक्षिणेंत स्वतंत्र राज्य स्थापना करण्याच्या वेळीं, मुबारीजखान या नांवाचा एक शूर मोंगल सरदार हैद्राबाद व कर्नाटक प्रांताचा कारभार पहात होता. त्यास बादशाहा महंमदशाहा, (कारकीर्द इ० सन १७१९ ते इ० सन १७४८) नें "निजाम हा शिरजोर होऊन स्वातंत्र्य धारण करीत आहे, तरी तुम्ही त्याजबरोबर युद्ध करून त्यास ठार मारून टाकावें, आणि हें कार्य सिद्धीस गेल्यास दक्षिणचा कारभार तुमच्याकडे देण्यांत आला आहे, असें समजावें." असें स्वदस्तूरचें पत्र पाठविलें. आणि अमानतखान सुभेदार व इब्राहीमखान, कंब्रजखान व अबदूलखान हे तीन सरदार त्यांच्याबरोबर देऊन त्यांना मुबारीजखानाच्या मदतीस पाठविले. आधींच मुबारीजखान व निजाम उल्मुल्क या उभयतांमध्यें वैर होतें; व यशस्वी झाल्यास दक्षिण प्रांताचा कारभार देण्याचें मुबारीजखानास बादशहानें अभिवचन दिलें होतें. त्यामुळें, तो दिल्लीहून आपल्या मदतीस आलेलें सैन्य व सरदार मंडळी यांना बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें निजामावर चाल करून गेला; व उभयतां सैन्याची, साखर खेडा ऊर्फ फत्तेखेर्डा, (किंवा फत्तेखर्डा; हा गांव वऱ्हडांत, बुलढाणा जिल्ह्यात मेहकर तालुक्यांत भोगावती नदीच्या कांठीं आहे.) येथें गांठ पडून मोठें निकराचें युद्ध होऊन त्यांत निजाम विजयी झाला. मुबारीजखान व त्याचे दोन मुलगे,

होत चालला. त्यामुळें तो कर्नाटक प्रांतावर केव्हां स्वारी करील याचा नियम नव्हता. म्हणजे सादतउल्लाखानाच्या ताब्यांतलि कर्नाक प्रांत निजामाच्या तडाक्याच्या भीतींत; आणि तंजावरचें राज्य, सादतउल्लाखान, व चिनकिलीचखान ( निजामउल्मुल्क ) या दोन बलिष्ठ शत्रूंच्या तडाक्यांत अस्तित्वांत होते. तथापि सरफोजीच्या कारकीर्दींत त्याच्या दक्षपणामुळें, या उभयतांपैकीं एकाही शत्रूकडून तंजावरच्या राज्यास उपसर्ग पोंचला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सरफोजी राजे यांस प्रापंचिक बाबतींत फारसा सौख्यलाभ झाला असेल असें दिसत नाहीं. उलट त्याच्या मनास अस्वस्थता उत्पन्न करणाऱ्या कांहीं विपरीत गोष्टी घडून आल्या, असें निदर्शनास येतें. सरफोजी यांस लग्नाच्या तीन बायका होत्या. त्यापैकीं पहिली घाटगे घराण्यांतील सुलक्षणाबाई ही

---

व दिल्लीहून आलेलें सरदार, अमानतखान, इब्राहीमखान अबदूलखान व कंब्रजखान वगैरे मंडळी समरभूमींत ठार झाली. निजामउल्मुल्क यानें कंब्रजखानाचें शीर कापून तें दिल्ली येथें बादशाहाकडे पाठवून त्यास "स्वामींच्या दैवयोगानें आम्ही हा बंडवाला मारिला;" असें कळविलें. नंतर निजाम उल्मुल्क हैद्राबाद येथें गेला (राजवाडे, खंड दुसरा, व शकावली पान ४९।५० पाहा). तेथें कंब्रजखानाचा मुलगा रख्वाजा आदब म्हणून होता, त्याच्याशीं सल्ला करून, निजामानें गोवळकोंडा, व इतर किल्ले घेतले.अशा प्रकारें सर्व दक्षिण भाग निजामाच्या स्वाधीन झाला. फत्तेखेर्डा येथें निजामास मिळालेला हा विजय (ता. २ आक्टोबर, इ० सन १७२४.) दक्षिणच्या इतिहासांत क्रांतिकारक असून, एकंदरींत इ० सन १७२४ हें वर्ष निजामशाहीच्या स्वातंत्र्यस्थापनेचें होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यानंतरच्या काळांत निजामाचे बहुतेक सर्व व्यवहार मराठ्यांशीं घडलेले आहेत; व त्याच भावी काळांत निजाम हा मराठ्यांचा एक जबरदस्त प्रतिस्पर्धी म्हणून दख्खनच्या राजकीय पटावर प्रमुखत्वानें पुढें आला आहे.

फत्तेखेर्डा येथें, मोंगल सरदार ुबारीजखान हा युद्धांत मृत्यु पावला. त्याची कबर लढाईच्या मैदानांत असून त्यास इनाम जमीन आहे.

होय. ही बाई स्वभावानें अतिशय गरीब व विनयशील होती. दुसरी स्त्री अपरूपबाई, हीही घाटगे घराण्यांतीलच असून ती मोठी महत्त्वाकांक्षी व सत्ता-प्रिय होती व तिसरी स्त्री राजसबाई. ही शिर्के घराण्यांतील असून ती स्वभावानें शांत, सालस व सद्गुणी होती. सरफोजीस लग्नाच्या ह्या तीन बायका होत्या. तरी त्यास पुत्रसंतति नव्हती. उलटपक्षीं सरफोजीचा धाकटा भाऊ तुकोजी यास चार औरस व एक परिगृहीत स्त्री पासून झालेला, असे पांच पुत्र होते. तुकोजीराजे यांस इतकी पुत्रसंतती, व आपणांस एकही पुत्रसंतान नाहीं, याबद्दल अपरूपबाईस त्याचा व त्याच्या कुटुंबांतील मंडळींचा नेहमीं मत्सर वाटूं लागला. बेबनाव होऊन घरांत नेहमीं कलह सुरू झाले. त्यामुळें, तुकोजी कंटाळून, आपल्या खर्चाकरितां स्वतंत्र मुलूख तोडून घेऊन, महादेवपट्टण येथें जाऊन राहिला. तथापि तेवढयानेंही अपरूप-बाईचें समाधान झालें नाहीं. तिनें दुष्ट स्त्रियांच्या नादीं लागून गादीला आपला वारस करण्यासाठीं खोटा पुत्र उत्पन्न करण्याचा कट केला व गरोदर राहिल्याचें ढोंग करून नऊ महिन्यानंतर एक कृत्रिम बालक निर्माण केलें. सरफोजीस या गोष्टीची गंधवार्ताही नव्हती. त्या या कृत्रिम बालकास, आपला खरा पुत्र समजून, त्यानें त्याच्या जन्माची द्वाही जिकडे तिकडे फिरवून मोठा पुत्रोत्सव केला. व बारशाच्या दिवशीं मोठ्या समारंभानें या मुलाचें "सवाई शहाजीराजे" असें नांव ठेविलें. राणी अपरूपबाई हिनें अशा रीतीनें तंजावरच्या राजगादीस खोटा वारस मोठ्या गुप्तपणानें व दक्षतेनें निर्माण केला. तथापि ही गोष्ट पुढें कांहीं दिवसांनीं उघडकीस आली! त्यामुळें सरफोजीस अतिशय दुःख व संताप उत्पन्न होऊन त्यानें त्या कृत्रिम पुत्राचा निकाल उडविला व पुढें लवकरच इ० सन १७२८ मध्यें तो दिवंगत झाला. त्या वेळीं त्याच्या तीन स्त्रियांपैकीं सुलक्षणाबाई, व राजस-बाई ह्या दोघी त्याच्याबरोबर सती गेल्या. सरफोजी राजे यांस औरस पुत्र-संतति नसल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ तुकोजी हा गादीवर आला.

तुकोजी राजे यांच्या कारकीर्दींत जीं राजकारणें किंवा ज्या लढाया वगैरे झाल्या, त्यासंबंधीची विशेष माहिती अद्यापि उपलब्ध नाहीं; तथापि उपलब्ध

हकीकतीवरून असें दिसतें कीं, सरफोजी व तुकोजी या उभयतां राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीत तंजावर येथील मराठ्यांनीं रामेश्वरच्या आसपासच्या सर्व प्रदेशभर आपली सत्ता बसविली; आणि तुकोजीच्या कारकीर्दीत, तंजावरकर मराठ्यांनीं, शिवगंगा व रामनाथ येथील जमीनदारांना इ० सन १७३०च्या सुमारास जिंकून आपल्या नियंत्रणाखालीं आणिलें. तुकोजीच्या कारकीर्दीतही तंजावरच्या राज्यास सादतउल्लाखान व निजामउल्मुल्क या उभयतांपासून उपद्रव पोंचण्याची भीति होती. आणि इंग्रज व फ्रेंच हे उभयता कर्नाटकांत आपला प्रवेश करण्यासाठीं योग्य संधि पहात होते; तथापि अशा बिकट परिस्थितीमध्येंही त्यानें आपलें राज्य सुरक्षित ठेविलें. इतक्यांतच मध्यंतरीं इ. सन १७३२ मध्यें कर्नाटकचा नबाब सादतउल्लाखान हा मृत्यु पावला; व त्याचा पुतण्या दोस्तअल्ली हा कर्नाटकचा नबाब बनला. त्या वेळीं कर्नाटकांत थोडी चळवळ उत्पन्न होऊन तिचा त्रास तंजावरच्या राज्यास पोंचतो कीं काय, अशी भीति उत्पन्न झाली होती; परंतु तुकोजीनें मोठ्या दक्षतेनें व बंदोबस्तानें राज्यकारभार चालवून आपलें संस्थान सुरक्षित ठेविलें.

तुकोजी राजे हा सरफोजीहून अधीक हुषार, राजकारणपटू, व विद्याभिलाषी असून त्यास संस्कृत, तामिळ, मराठी व फारशी या भाषा अवगत होत्या; व त्यामुळें दूरदूरचे विद्वान पंडित व फकीर लोक त्याच्या भेटीस येत असत. तुकोजीराजे हा इ० सन १७३५ मध्यें, देवगतीस पावला. त्यास अरणाबाई, रामकुंवरबाई, मोहिनाबाई, मैनाबाई व लक्ष्मीबाई अशा लग्नाच्या पांच स्त्रिया व अन्नपूर्णाबाई या नांवाची, कट्यारी बरोबर लग्न लाविलेली ( परिगृहीत ) सहावी स्त्री, मिळून एकंदर सहा स्त्रिया होत्या. त्यांपैकीं, लग्नाच्या स्त्रियांपासून त्यास बाबासाहेब, सयाजी, अण्णासाहेब व नानासाहेब, असे चार पुत्र झाले व सहावी स्त्री अन्नपूर्णाबाई हिच्यापासून प्रतापसिंह या नांवाचा एक पुत्र ( अथवा दासीपुत्र ) झाला. त्यांपैकीं सर्वांत वडील मुलगा बाबासाहेब हा व्यंकोजी [ ऊर्फ एकोजी ] हें नांव धारण करून तंजावरच्या गादीचा अधिपति झाला.

व्यंकोजी राजे हा अल्पायु निपजून त्यांची कारकीर्द अवघी एक वर्षांतच समाप्त झाली. हा राजा जात्याच संशयी वृत्तीचा होता, आणि त्यांतच

त्याच्या भावांनीं त्यास पदभ्रष्ट करण्याबद्दल कांहीं कारस्थानें केल्यामुळें,
त्याची संशयवृत्ति परमावधीस जाऊन तो जवळ जवळ वेडा झाला होता.
कोणाच्या हातांत कट्यार असली, किंवा कोणाच्या हातीं कांहीं शस्त्र असलें
तर त्यांस लागलीच संशय व भीति उत्पन्न होत असे. "कोणी बिदीस जाणार
येणार देखील, यांहीं देवाचा नामोच्चार केला, किंवा त्याचा ओंठ हालूं लागला,
अथवा एकीकडे कांहीं दोघे मिळून बोलूं लागले, किंवा कोणाच्या हातीं जप-
माळ पाहिली, तरी ती यांच्या ठायीं, आपल्यास वश करण्यास किंवा मार-
ण्यास मंत्रयंत्र करीत आहेत, म्हणून निश्चयें करून समजून" ( श्रीमद्भोसले-
वंश-चरित्र पृ० ७१ ) त्यांच्या पारिपत्यास तो उद्युक्त होत असे. व्यंको-
जीच्या अशा वागणुकीमुळें राज्याचा कारभार विस्कळीत झाला; व ही संधि
साधून कर्नाटक ( अर्काट ) चा नबाब दोस्त अली ऊर्फ दोस्त अलीखान
याचा सेनापति व जांवई चंदासाहेब, हा तंजावरवर चाल करून आला. त्या
वेळीं तंजावर येथील जुन्या, पराक्रमी व एकनिष्ठ सरदारांनीं मोठ्या शौर्यानें तेथील
किल्ल्याचें संरक्षण केलें. अखेरीस किल्ला आपल्या हातीं येत नाहीं, असें पाहून,
खंडणी घेण्यास राजी होऊन, व ती घेऊन तो त्रिचनापल्ली येथें परत गेला;+

---

+ चंदासाहेब याचें मूळचें नांव हुसेन दोस्तखान असून तो मोठा धाडसी
व महत्वाकांक्षी पुरुष होता. तो मोठा कुशाग्र बुद्धीचा, धूर्त, मधुरभाषणी
व सुस्वरूप असल्यामुळें अर्काटचा नबाब दोस्त अलीखान याची त्याच्यावर
अतिशय मर्जी बसली; व त्यानें त्यांस आपला घरजांवई करून वजीर व सेना-
पति केलें. अशा रीतीनें त्यास राजकीय महत्व प्राप्त झाल्यावर त्यानें दक्षिण
हिंदुस्थानांत अनेक घडामोडी व कारस्थानें करण्यास सुरवात केली. अर्का-
टच्या दरबारांत त्यानें आपलें उत्तम वजन बसविलें; व तंजावर आणि त्रिचनापल्ली
येथील हिंदू राज्यें नामशेष करण्याची तो खटपट करूं लागला. त्यापैकीं तंजा-
वरचें राज्य पादाक्रांत करण्याची त्याची खटपट यावेळीं, (इ० सन १७३६)
व पुढें प्रतापसिंहाच्या वेळीं ही ( इ० सन १७४० ) निष्फळ झाला;
तथापि त्रिचनापल्लीचें राज्य नामशेष करण्यांत तो यशस्वी झाला. त्रिचना-
पल्ली येथील शेवटचा राजा विजयरंग हा इ० सन १७३१ मध्यें मृत्यु
पावला, व त्याच्या गादीविषयीं राणी मीनाक्षी व दुसरा वारस वंगारू तिरमल

( इ० सन १७३६ ) न त्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो भ्रमिष्ट होऊन मृत्यू पावला. त्यास पुत्रसंतती नसून फक्त सुजानबाई या नांवाची एक स्त्री होती. ती शहाणी, चतुर, विशेष औदार्यशाली व सद्गुणी होती; त्यामुळें दरबारी मंडळींनीं तिला गादीवर बसवून तिच्या नांवाची द्वाही फिरविली. ती मोठी हुषार असून दरबारी मंडळींवरही तिचें चांगलें वजन बसलें; तथापि तीन वर्षांतच तिला शत्रू निर्माण होऊन तिच्यावर पदभ्रष्ट होण्याचा प्रसंग आला. इ० सन १७३८ मध्यें, 'सवाई शहाजी' या नांवाचा कोणी इसम, कोयाजी घाटगे या नांवाच्या एका सरदाराच्या साह्यानें तंजावरच्या गादीचा हक्क सांगण्याकरितां तोतया निर्माण झाला; आणि त्यानें तंजावर येथील किल्लेदार सय्यदखान यांस फितवून तंजावरची गादी बळकाविली. तंजावरच्या इतिहासांत हा तोतया ' काट राजा ' या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यानें इंग्रज व फ्रेंच लोकांस द्रव्य देऊन त्यांचें सैन्य आपल्या मदतीस बोलाविलें; व तंजावरच्या गादीचे आपण अस्सल वारस आहों असा सर्वांच्या मनांत भ्रम उत्पन्न केला; तथापि त्याचें ढोंग लवकरच बाहेर पडलें. हा काट राजा ' रूपी ' या नांवाच्या एका बटकीचा मुलगा असून, त्याचा तंजावरच्या राजघराण्याशीं व गादीशीं कोणत्याहि प्रकारें तिळमात्र संबंध नाहीं, अशी किल्लेदार सय्यदखान याची व मुख्य मुख्य सरदारांची खात्री झाली; त्यामुळें त्यांनीं

---

यांच्यामध्यें कलह उत्पन्न झाला. ही संधी साधून अर्काटकर नबाब दोस्त अल्लीखान यानें आपला मुलगा सफदरअल्ली, व जांवई चंदासाहेब या उभयतांना त्यांचा तंटा मिटविण्याच्या मिषानें त्रिचनापल्ली येथें पाठविलें. त्याप्रमाणें चंदासाहेबानें तेथें जाऊन मोठ्या युक्तीनें राणी मिनाक्षीअम्मा हिला अनुकूल करून घेतलें; व त्रिचनापल्लीचा किल्ला व फौज आपल्या ताब्यांत घेऊन तिला दग्यानें बंदिवासांत टाकिलें, व त्याच ठिकाणीं ती पुढें लवकरच कालाधीन झाली ! अशा प्रकारें इ० सन १७३६ मध्यें, तंजावरजवळील त्रिचनापल्लीचें प्राचीन हिंदु संस्थान चंदासाहेबाच्या ताब्यांत गेल्यामुळें, त्याचें नांव दक्षिण हिंदुस्थानामध्यें विशेष प्रसिद्धीस आलें, आणि तिकडील राजकारणांमध्येंहि त्याचें महत्व विशेषच वृद्धिंगत झालें.

या ढोंगी काट राजास तात्काल काट दिला, व तुकोजीचा दुसरा मुलगा सयाजी यांस गादीवर बसविलें; ( इ० सन १७३९ ). आणि त्यास नाममात्र राजा करून सर्व राज्यकारभार तंजावर येथील मुसलमान किल्लेदार सय्यदखान व त्याचा भाऊ सय्यद कासीम यांनीं आपल्या हातीं घेतला व लवकरच सय्यदखानानें त्यास पदभ्रष्ट करून सिधोजी या नांवाचा एक दुसराच इसम गादीवर बसविला. तेव्हां सयाजी हा तंजावर येथून पळून पांडेचरी नजीक चिदंबरं येथें गेला व तेथून त्यानें फ्रेंचांची मदत मागितली आणि आपणांस तंजावरच्या गादीवर पुन्हां स्थानापन्न केल्यास, "आपण पूर्व किनाऱ्यावरील कारीकल बंदर, त्याच्या नजीक असलेला करकनगढी नांवाचा मजबूत किल्ला व कांहीं गांवें तुम्हास देऊं" असें त्यानें फ्रेंचांना कबूल केलें. फ्रेंच सरदार डुमास यानें हें सयाजीचें म्हणणें मान्य करून फ्रेंच सैन्य व दोन जहाजें कारीकल बंदर ताब्यांत घेण्यास पाठविलीं. व याच फ्रेंच सैन्यानें तसेंच पुढें जाऊन सयाजीस तंजावरच्या गादीवर बसवावें, असा त्यास हुकूम दिला. इतक्यांत इकडे सय्यदखानाशींही सयाजीनें संधान बांधिलें होतें तें यशस्वी होऊन सय्यदखान त्यास वश झाला; व त्याच्या मदतीनें तो पुन्हां तंजावरच्या राज्याचा अधिपति झाला. फ्रेंच्यांना कारीकल बंदर देण्याचें त्यानें साफ नाकारिलें, त्यामुळें हातचा डाव गेलेला पाहून डुमास यास वाईट वाटलें. तथापि सयाजीशीं उघडपणें युद्ध करण्याचें त्यास धाडस झालें नाहीं; पण इकडे चंदासाहेबास फ्रेंचांस खूष करण्याची ही आयतीच संधी मिळाली. त्यानें आपण होऊन कारीकल जिंकून फ्रेंचांचे ताब्यांत देण्यासाठीं कारीकलवर आपलें सैन्य रवाना केलें. तेव्हां सयाजीनेंहि कारीकलच्या बचावासाठीं आपली फौज तिकडे रवाना केली. तिकडून फ्रेंचांचीहि फौज चालून आली व तिनें चंदासाहेबाच्या मदतीनें कारीकल जिंकलें. तेव्हां सयाजीचा नाइलाज होऊन तो आपल्या कराराप्रमाणें वागण्यास तयार झाला. पण इतक्यांतच तो पदभ्रष्ट होऊन तुकोजीचा दासीपुत्र प्रतापसिंह हा गादीवर आला व त्यानें सयाजीनें फ्रेंचांबरोबर चिदंबरं येथें केलेला करार पार पाडला. अशा रीतीनें कारीकल, करकनगढी व कांहीं गांवें मिळून सुमारें ३०-४० हजार रुपये उत्पन्नाचा तंजावरच्या राज्यांतील पूर्व किनाऱ्यावरील

प्रदेश फ्रेंचांस मिळाला, व चंदासाहेबानें अशा रीतीनें या वेळीं तंजावरच्या राज्यावर आपला सूड उगवून घेतला.

राजे सयाजी याच्या कारकीर्दीत तंजावरची राजसत्ता लष्करी लोकांच्या–आणि तीहि मुसलमान सत्ताधारी सय्यदखान व त्याचा भाऊ सय्यदकासीम यांच्या–हातीं गेल्यानंतर सर्व तंजावरच्या राज्यभर बेबंदशाही माजली. आणि गृहकलह, परस्पर मत्सर, द्वेषबुद्धि, सत्ताभिलाष इत्यादि राष्ट्रविनाशक दुर्गुणांचा प्रादुर्भाव होऊन तंजावरचें राज्य रसातळास जाणार कीं काय, अशी भीति वाटूं लागली. परंतु अशा संकटप्रचुर प्रसंगीं तंजावर येथील मल्हारजी गाडेराव, मानाजी जगताप व अनप्पा शेडगे प्रभृति मुख्य सरदारांनीं जनतेचा कल पाहून, तंजावरच्या गादीवर योग्य पुरुषाची योजना करण्याचा संकल्प केला. आणि तुकोजीच्या विद्यमान चिरंजीवांपैकीं प्रतापसिंह या नांवाचा जो दासीपुत्र होता, तोच राजपदास सर्व गुणांनीं युक्त आहे असें पाहून त्यास ( इ०सन १७३९ च्या अखेरीच्या सुमारास ) सिंहासनारूढ केलें. अशा प्रकारें, सर्व प्रजेच्या अनुमतीनें रूप, गुण, क्रिया, बुद्धि, या सर्व गुणांनीं युक्त असा दासीपुत्र गादीस योग्य अधिपति ठरविल्याचें हें तंजावरच्या इतिहासांतील उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे. व "प्रतापसिंहाची माय राजाच्या समजातीची झाली; करितां हा पुत्रच राज्यास योग्य म्हणून सर्वत्रांनीं निष्कर्ष करून, शके १६६१ सिद्धार्थीनाम संवत्सरे प्रतापसिंह राजास तख्तनशीन केलें." ( पारसनीकृत, तंजावरचें राजघराणें, हें पुस्तक पहा. ) हें तंजावरच्या शिलालेखांतील वाक्य विशेष महत्वाचें व मनन करण्यासारखें आहे.

राजे प्रतापसिंह याची कारकीर्द तंजावरच्या इतिहासांत अनेक दृष्टीनें अत्यंत महत्वाची आहे. तुकोजीचा दुसरा मुलगा सयाजी याच्या काळापासून तंजावरचीं राज्यसूत्रें लष्करी लोकांच्या हातांत गेलीं होतीं, तीं ह्या वेळेपर्यंत तशींच त्यांच्या हातीं होतीं. सय्यदखान व सय्यदकासीम हे या काळांत विशेष प्रबळ बनले होते. हे उभयतांही सय्यदबंधू महाकारस्थानी व सत्ताप्रिय असून त्यांच्याकडे राज्याची फौजदारी, तंजावरच्या कोटाची किल्लेदारी व राजाची चिटणीशी असे मोठमोठे अधिकार होते. सयाजीप्रमाणेंच प्रतापसिंहास नाम-

मात्र राजा म्हणून गादीवर ठेवून राज्याचा सर्व कारभार आपल्या हातीं ठेवावा, असा त्यांचा प्रयत्न होता; आणि प्रतापसिंह हा नुकताच गादीवर आल्यामुळें, त्याला राज्यकारभार चालविण्याचा अनुभव नसल्यानें, आपल्या इच्छेप्रमाणें राज्याचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं येतील, अशी त्यांना आशा होती. तथापि प्रतापसिंह हा जात्याच बुद्धिमान्, स्वाभिमानी आणि व्यवहार-चतुर असल्यामुळें, त्यानें या उभयतांही प्रबल मुसलमान सरदारांचा पूर्ण बंदोबस्त करण्याचा निश्चय केला. परंतु ही गोष्ट त्यांना समजल्यामुळें त्यांनीं अनेक कारस्थानें रचून प्रतापसिंहास पदभ्रष्ट करण्याचा उद्योग आरंभिला.

'श्रीमत् भोंसले–वंश–चरित' या शिलालेखामध्यें सय्यदखानाच्या प्रमत्त-पणाचें व दुराचाराचें जें वर्णन केलें आहे, त्यावरून 'तो दरबारी लोकांस फारच शिरजोर होऊन तंजावरच्या गादीवर काय संकट आणील, याचा नेम नव्हता. तंजावर येथील राजसत्ताही हिंदूंची असल्यामुळें, तेथें पूर्वापार व्यंकोजी महाराजापासून दानधर्म बहुत चालत आला होता. प्रतापसिंह राजे हे गादी-वर आल्यानंतर, त्यांनीं आपल्या पूर्वजांचा कित्ता गिरवून पूर्वा-पार चालत आलेले दानधर्म तसेच चालू ठेविले. सय्यदखान यास ही गोष्ट पसंत न पडून, तो हिंदु धर्मास विरोध करूं लागला; आणि हिंदु देवालयांत त्यानें अनाचार सुरू केले. त्यानें मोहना नांवाची एक देवालयांतील देवदासी भ्रष्ट करून तिला आपल्या घरीं नेऊन ठेविलें. त्यामुळें त्याच्याविषयीं हिंदु-धर्माभिमानी लोकांस तिरस्कार उत्पन्न झाला. प्रतापसिंह महाराजास हीं त्याचीं दुष्ट कृत्यें कळून चुकलीं; परंतु त्यांनीं तंजावर येथील त्याचें प्राबल्य लक्षांत घेऊन, त्याच्या कृत्यांकडे कांहीं दिवस कानाडोळा केला. अर्थात् सय्यदखानास त्यामुळें अधिकच उत्तेजन येऊन, तो तंजावरची सर्व राजसत्ता आपल्या मुठींत आणण्याचा अधीक प्रयत्न करूं लागला. तंजावरचें राज्य काबीज करण्याच्या खटपटींत असलेल्या प्रसिद्ध चंदासाहेबाकडे त्यानें गुप्त रीतीनें राजकारण सुरू केलें आणि त्याच्या मुलास आपली मुलगी द्यावी, व त्याच्या साह्यानें तंजावरचें राज्य हस्तगत करून तें आपण चालवावें, अशी मसलत योजिली. परंतु ही गोष्ट प्रतापसिंहास समजली व त्यानेंहि मोठ्या शहाणपणानें सय्यदखानाचें खूळ तंजावर मधून नाहींसें करण्याचा विचार

आरंभिला. त्यानें सय्यद खानाचा भाऊ सय्यदकासीम यास अनुकूल करून घेतलें, व त्याच्या मार्फत, सय्यदखानाचा व चंदासाहेबाचा झालेला गुप्त कट माहीत करून घेतला. इकडे सय्यद खानानें चंदासाहेबाच्या मुलास आपली मुलगी देण्याचें निश्चित करून प्रतापसिंहास लग्नाचें निमंत्रण दिलें, आणि असें सांगितलें कीं, " मी माझी बेटी चंदासाहेबाच्या मुलास अर्पण करण्याचा निश्चय केला आहे. चंदासाहेब बलवान् व प्रतापी पुरुष असल्यामुळें त्याच्याशीं संबंध केल्यानें तंजावरच्या गादीस बळ प्राप्त होईल. " प्रतापसिंहास सय्यद खानाचें सर्व कृत्रिम पूर्ण माहीत होतें; तथापि त्यानें तसें यत्किंचितूहि न दाखवितां वरकरणी ह्या शरीरसंबंधास आपली पसंती दर्शवून चंदासाहेबाची स्तुती केली व लग्नास लागेल तो खर्च देण्याचें मान्य केलें. तथापि लग्नमात्र तंजावरच्या किल्ल्यांत न करतां मध्यार्जुन ( हें ठिकाण तंजावर पासून २१ मैलांवर आहे. ) येथें करावें, अशी त्यास सूचना दिली. त्याप्रमाणें सय्यद खानानें चंदासाहेबाच्या मुलाबरोबर आपल्या मुलीचें लग्न मध्यार्जुन येथें मोठ्या थाटानें केलें; आणि चंदासाहेबाशीं सर्व राजकारणाचें खलबत करून तंजावरच्या किल्ल्यावर त्यानें गुप्त रीतीनें अमूक वेळीं हल्ला करावा असा संकेत ठरविला, परंतु या गुप्त कारस्थानाची बातमी सय्यद खानाचा भाऊ सय्यद कासीम यानें कागदपत्रानिशीं प्रतापसिंहास कळविली. त्याबरोबर वेळींच सावध होऊन, प्रतापसिंहानें आपले मुख्य सरदार मल्हारजी गाडेराव, अनप्पा शेळगे व मानाजीराव जगताप, यांच्या सल्ल्यानें सैन्याचा सर्व बंदोबस्त पक्का करून सय्यदखानास आपणाकडे राजवाड्यांत कांहीं राजकारणनिमित्त बोलाविलें व तेथेंच त्यास कैद करून आपल्या सरदार मंडळींच्या ताब्यांत दिलें व त्यांनीं त्यास लागलींच यमसदनीं पोंचविलें. अशा रीतीनें सय्यदखानाचा हा प्रबळ व प्रमत्त कांटा जगांतून कायमचा नष्ट करून टाकल्यावर मल्हारजी गाडेराव प्रभृति सरदारांना राज्याचे मुख्य अधिकार देऊन, त्यांच्या सल्ल्यानें राजे प्रतापसिंह यानें राज्यकारभार करण्यास सुरवात केली.

या काळांत, दक्षिण हिंदुस्थानांतील मराठ्यांची सत्ता पुष्कळच कमी होऊन, कर्नाटक प्रांतांत मुसलमानी राजसत्ता संस्थापित झाली. आणि निज़ाम उल्-

मुल्क व अर्काटकर सादत उल्लाखान यांचें विशेष प्राबल्य माजलें. अर्काटचा नबाब हा मराठ्यांना खंडणी देत असे तीही सादतउल्लाखान मृत्यु पावल्यानंतर म्हणजे इ० सन १७३२ पासून मराठ्यांना मिळेनाशी झाली. आणि इ० सन १७३६ मध्यें चंदासाहेबानें त्रिचनापल्ली एथील हिंदु राज्य खाऊन टाकल्यापासून तर त्याच्यापासून तंजावरच्या राज्यास धोका पोंचण्याची विशेषच भीति उत्पन्न झाली होती. चंदासाहेबही तंजावर खाण्याकरितां निरनिराळे मनसुबे व कारस्थानें चडवीत होता. इतक्यांत "आपला व्याही सय्यदखान याचा तंजावरकर प्रतापसिंहानें वध केला;" ही बातमी चंदासाहेबास समजली. त्याबरोबर तो खवळून एखाद्या जंगी तुफानाप्रमाणें तंजावरवर येऊन कोसळला व तंजावरच्या किल्ल्यास वेढा दिला. सतत दोन महिने वेढा सारखा सुरूं ठेविला, व मोठ्या अट्टाहासानें किल्ला हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न आरंभिला. तेव्हां या संकटांतून मुक्त होण्याकरितां, प्रतापसिंहानें सातारकर छत्रपति शाहू व पेशवे यांना ही हकीकत कळवून त्यांची मदत मागितली. त्याप्रमाणें शाहूनें मराठ्यांची जंगी फौज कर्नाटक प्रांतीं पाठविण्याचें ठरवून, नागपूरकर रघोजी भोंसले, अक्कलकोटकर फत्तेसिंह भोंसले, औंधकर श्रीपतराव प्रतिनिधि, वगैरे सरदारांना तिकडे पाठविले; आणि गुत्तीकर मुरारराव घोरपडे यांस तुंगभद्रेजवळील तीन तालुके त्यास देण्याचें मान्य करून आपल्या सैन्यानिशीं त्यांना मिळविण्याविषयीं कळविलें. त्याप्रमाणें हें सर्व सैन्य एकत्र होऊन इ० सन १७४०च्या एप्रिल महिन्यांत, मोठ्या जोरानें अर्काट प्रांतांत येऊन धडकलें.

इकडे अर्काटचा नबाब दोस्त अल्लीखान हाही मराठ्यांच्या सैन्याशीं सामना देण्यास पुढें सरसावला. आणि कडप्पा, ऊर्फ कड्डापा व अर्काट या दोन जिल्ह्यांच्या मध्यें, असलेल्या दमलचेरीच्या घाटांत, ती सुरक्षित जागा समजून, ४ हजार घोडेस्वार व ६ हजार पायदळ, आपला धाकटा मुलगा हुसेनअल्ली व इतर अनेक नामांकित सरदार, यांसह येऊन दाखल झाला. मराठ्यांचें सैन्य घाटाच्या पलीकडे होतें. मराठ्यांनीं नबाबाशीं सामदामाची बोलणीं प्रथम सुरूं केलीं. परंतु नबाबानें तीं मनावर न घेतां त्यांस उडवाउडवींचीं उत्तरें दिलीं, त्यामुळें मराठ्यांनीं आपले १० हजार घोडेस्वार एका जंगलांतून आडमार्गानें पुढें पाठवून नबाबाच्या सैन्यास वळसा घातला व

बाकी फौजेनें डोंगरावर चढून सर्व मान्यांच्या जागा हस्तगत करून घेतल्या. आणि नवाबाच्या सैन्याशीं समोर येऊन युद्ध सुरूं केलें (ता. ९ मे सन १७४०). हें युद्ध मोठेंच घनघोर झालें. उभयतांही पक्षांनीं बंदुका व तोफा उपयोगांत आणिल्या. मराठ्यांनीं मोठ्या चिकाटीनें युद्ध करून आपला शौर्यप्रभाव विशेष गाजविला. आणि नवाबाच्या सैन्याचा पूर्णपणें पराभव करून त्याची दाणादाण उडविली. या युद्धांत, नवाब दोस्त अल्लीखान, त्याचा धाकटा मुलगा हुसेन-अल्ली, व अनेक नामांकित सरदार रणांगणीं पतन पावले. अर्काटचा मुख्य दिवाण मीर आसद हा मराठ्यांच्या ताब्यांत आला, व मराठ्यांना या युद्धांत निर्विवाद विजय प्राप्त झाला.

नवाब दोस्त अल्लीखान याचा वडील मुलगा सफ्तरअल्ली हा आपल्या वडीलाच्या मदतीकरितां सैन्य घेऊन दमलचेरीकडे येण्यास निघाला होता; त्यास हें दमलचेरीच्या खिंडींतील युद्धाचें भयंकर वर्तमान समजतांच तो घाबरून स्वसंरक्षणासाठीं वेलोर येथें पळून जाऊन तेथील बळकट किल्ल्याच्या आश्रयास राहिला; व चंदासाहेब हा त्रिचनापल्लीहून ५ हजार घोडेस्वार व १० हजार पायदळ यांसह आपल्या सासऱ्याच्या मदतीस येत होता, तो-ही युद्धाचें हें हानिकारक वर्तमान कानीं पडतांच त्रिचनापल्ली येथें परत गेला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या दमलचेरीच्या युद्धांतील निर्णयात्मक विजयामुळें, मराठ्यांची कर्नाटकभर कीर्ति झाली, व याच विजयवार्तेनें त्यांचा कर्नाटक प्रांतांत सर्वत्र पूर्ण दरारा बसला.

अर्काटकर दोस्त अल्लीखान याच्या मृत्यूमुळें रिकाम्या झालेल्या अर्का-टच्या गादीचा खरा वारस त्याचा वडील मुलगा सफ्तर अल्लीखान हा होता. परंतु त्यास चंदासाहेब हा प्रतिस्पर्धी असून,–जरी बाह्यात्कारी तो, " आपण सफदर अल्लीखानाचे हितचिंतक आहों " असें दाखवीत होता तरी–परिस्थिति अनुकूल होतांच ( ? ) अर्काटची गादी आपण मिळवावी अशी त्याची इच्छा होती. तथापि सफदरअल्लीखान हा चंदासाहेबाचें सर्व कृत्रिम ओळखून अस-ल्यामुळें, त्यानें मराठ्याशीं, त्यांच्या इच्छेप्रमाणें खंडणी व प्रांत देण्याचें ठर-वून तह केला ( ता. १६ नोव्हेंबर इ० सन १७४० ); व या तहाअन्व-येंच, मराठ्यांच्या मार्फत चंदासाहेबाची त्रिचनापल्ली येथील सत्ता नष्ट कर-

ण्याचा प्रयत्न केला; आणि इकडे मराठ्यांनींही सफ्तरअल्लीखान व त्याचा दिवाण मीर आसद यांच्या सल्लयानें, योग्य संधी साधून त्रिचनापल्लीवर हल्ला करून तें शहर हस्तगत करून घेण्याचा निश्चय केला. इतक्यांत "पेशवा बाजीराव हा नर्मदा नदीजवळ रावेर ऊर्फ रावेरखेडी × येथें मृत्यु पावला," अशी बातमी, मराठ्यांचा या मोहिमेंतील मुख्य सरदार सेनासाहेब रघूजी भोसले यांस समजली. रघूजी हा बाजीरावाचा प्रतिस्पर्धी होता. बाबूजी नाईक बारामतीकराचा एक प्रबळ साह्यकारी दोस्त होता; व त्यालाच छत्रपति शाहूकडून पेशवाईची वस्त्रें देववावीं, असा रघूजीचा मानस होता. म्हणून तो शिवगंगा येथें मराठ्यांच्या सैन्याचा तळ ठेवून महाराष्ट्रांत सातारा येथें परत आला, व बाबूजी नाईकास पेशवाई पदावर स्थानापन्न करण्याकरितां त्यानें आपली शिकस्त केली. परंतु त्यांत त्यास यश न मिळतां शाहूनें बाजीरावाचा मुलगा बाळाजी नानासाहेब—बाजी-राव मृत्यू पावला, त्यावेळीं त्याच्याजवळ त्याचें कुटुंब काशीबाई व धाकटा मुलगा जनार्दनपंत हे असून बाळाजी कुलाबा येथें होता; तेथेंच त्यास बाजी-रावाच्या मृत्यूची बातमी समजल्यावर उत्तरक्रिया आटपून तो आपला काका

---

× बाजीराव हा उत्तर हिंदुस्थानांतून परत येत असतां आपल्या नवीन जहागिरींत रावेर येथें ता० २५ एप्रील इ० सन १७४० रोजीं, थोडे दिवस आजारी पडून एकाएकीं मृत्यु पावला.

रावेर उर्फ रावेरखेडी हा गांव होळकराच्या ताब्यांतील नेमाड ऊर्फ खरगोण जिल्ह्यांत, सनावद रेलवे स्टेशनजवळ, नर्मदा नदीपासून तीन मैलांवर असून तेथें बाजीरावाची छत्री आहे. या छत्रीस कसरावद, कानपूर आणि बेडिया या तीन परगण्यांचें उत्पन्न लावून दिलेलें होतें; तें पेशवाई बुडेपर्यंत चालू होते. परंतु पुढें पेशवाई बुडाली तेव्हां छत्रीच्या खर्चासाठीं तोडून दिलेला प्रदेश इंग्रजांच्या ताब्यांत गेला, व छत्रीचें हें उत्पन्न बंद झालें. रावेर हा अगदींच लहान गांव असून तेथें एक धर्मशाळा, व देशी दवाखाना आहे. बाजीरावाच्या छत्रीस होळकर दरबाराकडून दरसाल १२५ रुपयांची नेमणूक आहे.

चिमणाजी ऊर्फ चिमाजी आप्पासह ता० २५ मे इ० सन १७४० रोजीं पुणें येथें, व नंतर ता. १३ जून रोजीं सातारा येथें गेला;–यास, ता. २५ जून रोजीं, ( आषाढ शुद्ध १२ बुधवारीं सकाळीं दहा वाजतां ) सातारा मुक्कामीं पेशवाईचीं वस्त्रें अर्पण केलीं. अशा रीतीनें रघूजीचा मानस सिद्धीस न गेल्यामुळें, तो बाबूजीनाईक यास बरोबर घेऊन कर्नाटकांत आला. चंदासाहेबावरील स्वारीची कडेकोट तयारी केली; कर्नाटकांतील हिंदुराजे, पाळेगार मुरारराव घोरपडे गुत्तीकर, व तंजावरकराचें सैन्य, आपल्या मदतीस घेतलें; व या सर्व सैन्यासह त्रिचनापल्लीवर चाल करून जाऊन मराठ्यांनीं तेथील किल्ल्यास वेढा दिला. त्रिचनापल्लीचा किल्ला बळकट असल्यामुळें, तो चंदासाहेबानें कांहीं दिवस मोठ्या शौर्यानें लढविला. परंतु किल्ल्यांतील सामुग्री संपत आल्यामुळें मराठ्यांशीं टक्कर देणें त्याला अशक्य वाटूं लागलें. म्हणून त्यानें मराठ्याशीं किल्ला स्वाधीन करण्याबद्दल बोलणें सुरू केलें; व त्याच वेळीं आपला भाऊ बडासाहेब यास मदुरा येथून स्वसैन्यानिशीं आपल्या मदतीस बोलावून घेतलें. परंतु त्याच्या सैन्याचा मराठ्यांनीं मार्गांतच निकाल उडविल्यामुळें, चंदासाहेबाचा नाइलाज होऊन तो आपल्या वडील मुलासह मराठ्यांच्या स्वाधीन झाला ( ता० २६ मार्च इ. सन १७४१ ). तेव्हां मराठ्यांनीं त्रिचनापल्लीचा किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन चंदासाहेबाची व त्याच्या मुलाची सातारा येथें रवानगी करून दिली. त्या वेळेपासून इ. सन १७४८ पर्यंत तो व त्याचा मुलगा सातारा येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत होते. या वेळ्यांत मुरारराव घोरपडे यानें विशेष अंगमेहनत घेऊन चांगलेंच कर्तृत्व व शौर्य प्रकट केलें. म्हणून रघूजी भोंसले यानें त्यास त्रिचनापल्लीचा सुभेदार नेमून तेथील सर्व व्यवस्था त्याच्याकडे सोंपविली. तंजावरकर प्रतापसिंह यानें या त्रिचनापल्लीच्या स्वारीमध्यें मराठ्यांना पुष्कळच साह्य केलें. शिवाय फौजेच्या खर्चाबद्दल आठ लाख रुपये दिले. व शाहूस तीन लाख, त्याच्या राणीस दोन लाख, रघुजीभोसले व फत्तेसिंह भोंसले या उभयतांना दोन लाख, मिळून एकंदर इतर सात लाख रुपये नजर केले; म्हणजे एकंदर पंधरा लक्ष रुपये तंजावरकर प्रतापसिंहानें यावेळीं मराठ्यांना दिले. उलटपक्षीं चंदासाहेबासारखा बलिष्ठ व नाश करण्यास टपून बसलेला शत्रु कर्नाटक-

मधून तात्पुरता तरी नाहींसा झाल्यामुळें, पुढील आठ वर्षांत त्याच्याकडून होणाऱ्या त्रासापासून तंजावरचें राज्य मुक्त झालें.

तथापि त्यानंतर चारच वर्षांनीं तंजावरच्या राज्यावर पुन्हां दुसरें संकट ओढवलें. दख्खनचा राज्यकर्ता निजामउल्मुल्क हा कर्नाटक प्रांतात आपली राजसत्ता सारखी वृद्धिंगत करीत होता. त्यानें इ० सन १७४४ मध्यें त्रिचनापलीचा किल्ला मुरारराव घोरपडे याच्यापासून हस्तगत करून, तो अनवरुद्दीनखान याच्या ताब्यांत देऊन (इ० सन १७४४ एप्रील) त्यास अर्काटच्या नवाबगिरीवर (सफ्तरअलीचा मुलगा सय्यद महंमदखान याच्या तर्फे) नेमिलें, आणि कर्नाटक प्रांत आपल्या ताब्यांतील, व तेथील नबाब आपला अंकित आहे,* असें त्यानें सर्व लोकांस जाहीर केलें. त्याप्रमाणें

---

* कर्नाटकाचा नबाब सफ्तरअली याचा, इ. सन १७४२ मध्यें, मूर्तुजाअली यानें वेलोर येथें खून केला. व अर्काट येथें जाऊन त्यानें नबाबाचें पद धारण केलें. परंतु त्यानंतर अनेक पक्ष निर्माण होऊन त्यांपैकीं

## कर्नाटकाच्या नबाबाची वंशावळ

- नबाब खान सादतउल्ला, (इ. सन १७१०–३२)
  - दोस्तअल्ली (इ. सन १७३२–४०)
    - सफ्तरअल्लीखान १७४०–४२
      - सय्यद महंमद खान १७४२–४४
    - असनअल्ली
    - मुलगी, लग्न मूर्तिजाअल्लीशीं
    - मुलगी लग्न चंदा साहेबाशीं
  - बाकरअल्ली (वेलोरचा कारभारी)
    - मूर्तुजाअल्ली

अनवरुद्दिनखान हा कर्नाटकचा नवाब बनून तेथील राज्यकारभार चालवूं लागला.

नवाब अनवरुद्दीनखान हा कर्नाटकच्या नवाबगिरीवर स्थानापन्न झाला न झाला तोंच त्यानें तिकडे आपली सत्ता वृद्धिंगत करण्यास सुरवात केली. कर्नाटकमधील हिंदुराजे, संस्थानिक व पाळेगार, यांना आपल्या श्रेष्ठ सत्तेखालीं आणण्याचा त्यानें प्रयत्न आरंभिला, आणि तंजावरकर प्रतापसिंहकडे पेषकश अथवा खंडणी मागण्यास त्यानें सुरवात केली. परंतु प्रतापसिंह हा मोठा स्वाभिमानी राज्यकर्ता असून तो कर्नाटकच्या नवाबचा मांडलीक होण्यास अथवा त्यास खंडणी देण्यास तयार नव्हता. प्रतापसिंह हा आपणांस खंडणी देत नाहीं, असें पाहून अनवरुद्दीनखान यानें त्यास "खंडणी द्या, अथवा युद्धास तयार व्हा" असा निर्वाणीचा निरोप पाठविला. त्यावर प्रतापसिंहानें, खंडणी देण्याचें अमान्य करून, त्यास युद्धास पाचारण केलें. तेव्हां अनव-

---

एका पक्षानें मुरारराव घोरपडे व इंग्रज यांची मदतघेऊन मूर्तुजाअल्लीस पदभ्रष्ट केलें. आणि सफ्तर अल्ली याचा अल्पवयी मुलगा सय्यद महंमदखान याची नवाबी पदावर (इ. सन १७४२) स्थापना केली.

अनवरुद्दीन हा निजाम उल्मुल्क याच्या पदरीं एक सरदार असून त्याचा बाप औरंगजेबाजवळ कुराण पढविण्याचें काम करीत असे. त्याच्याच वशिल्यानें अनवरुद्दीनखान यांस प्रथम पांचशेंची मनसब मिळाली. पुढें तो निजाम उल्मुल्काच्या वडिलाजवळ गुजराथेंत होता. तेथून निजामापाशीं येऊन त्यानें त्याच्या हातांखालीं अनेक ठिकाणीं कारभार केला. निजामानें कर्नाटकवर स्वारी केली, तेव्हां त्यास गोवळकोंड्याच्या बंदोबस्तास ठेविला होता; व पुढें कर्नाटकाचा बंदोबस्त ठेवण्यास हाच योग्य आहे, व हा आपल्या भरंवशाचा, शूर व अनुभवी आहे, असें जाणून निजामानें त्यास, सफ्तरअल्ली याचा अज्ञान मुलगा सय्यद महंमदखान याच्या तर्फे अर्काटच्या नवाबगिरीवर नेमिलें. व पुढें लवकरच एका लग्नप्रसंगांत, सय्यद महंमदखान याचा खून झाल्यानंतर, निजाम उल्मुल्क यानें, अनवरुद्दीन यांस कर्नाटकच्या नवाबगिरीवर कायम केलें.

रुद्दीनखानानें आपला मुलगा माफूजखान यांस, त्याच्याबरोबर सैन्य-सामुग्री देऊन, तंजावरावर पाठविलें. त्याप्रमाणें तो लागलीच तंजावरावर चाल करून आला. इकडे प्रतापसिंह यानेंही युद्धाची सिद्धता करून ठेविली होतीच. त्यामुळें तोही स्वसैन्यासह माफूजखानाशीं युद्ध करण्यास पुढें आला; व या उभय सैन्यामध्यें, तंजावरच्या किल्ल्याच्या उत्तरेस एक कोसावर, मोठेंच हातघाईचें युद्ध झालें [ इ० सन १७४४ जून ]. त्यांत प्रतापसिंह विजयी झाला, व पराभूत झालेला माजूफखान त्रिचनापल्ली येथें परत गेला. या पराजयाची वार्ता अनवरुद्दीन यांस समजतांच त्यानें आपल्या सैन्याची पुन्हां मोठीच जारीची तयारी केली. कालाहस्ती* व व्यंकटगिरी+ येथील

---

* कालाहस्ती ( Kalahasti ) हें जमिनदारी गांव उत्तर अर्काट जिल्ह्यांत असून येथील जमिनदारी गांवें उत्तर अर्काट व नेल्लोर जिल्ह्यांत पसरलेलीं आहेत. कालाहस्ती ही कर्नाटक प्रांतांतील सर्वांत मोठ्या जमिनदारी इस्टेटी-पैकीं एक असून, या जमिनदारीचीं, उत्तर अर्काट जिल्ह्यामध्यें ६१२ व नेल्लोर जिल्ह्यामध्यें १९० गांवें, मिळून एकंदर ८०२ गांवें आहेत; व तिचें क्षेत्रफळ उत्तर अर्काट जिल्ह्यामध्यें ७३६ मैल व नेल्लोर जिल्ह्यामध्यें, ४१५ मैल, मिळून एकंदर ११५१ मैल आहे. ही जमिनदारी इंग्रज सरकारास दोन लाख रुपये खंडणी ( Peshkash पेषकश ) देत असते. कालाहस्ती हें तेथील जमिनदाराचें राहण्याचें मुख्य ठिकाण, व जमीनदारीचें मुख्य ठाणें असून, तें सुवर्णमुखी नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर, तिरुपाटी स्टेशनपासून बावीस मैलांवर आहे. व कालाहस्ती हें रेल्वे-स्टेशन असून तें गांवापासून अजमासें एक मैलावर आहे. येथें शंकरपार्वतीचें एक प्रसिद्ध व भव्य देवालय असून शिवरात्रीस तेथें मोठी यात्रा भरते, व दहा दिवस मोठाच उत्सव होतो. व या देवालयामुळेंच कर्नाटकांत, या गांवाला विशेष महत्व प्राप्त झालेलें आहे. कालाहस्ती व व्यंकटगिरी यामध्यें १५ मैलांचें अंतर आहे.

\+ व्यंकटगिरी, हीही कालाहस्तीप्रमाणेंच एक मोठी जमीनदारी असून ती उत्तर अर्काट जिल्ह्यांत, कालाहस्तीपासून १५ मैलांवर आहे, व तें एक रेल्वे-स्टेशनही आहे. येथें ब्रह्मदेवाचें एक देवालय असून तेथें दरवर्षी जून अथवा जुलई महिन्यांत मोठा उत्सव होत असतो.

जमीनदारांस आपल्या पक्षांत ओढून घेऊन, त्यांचें सैन्य मदतीस बोलावून घेतलें, आणि मोठ्या भारी सैन्यासह त्यानें स्वतः इ० सन १७४५ मध्यें पुन्हां तंजावरावर स्वारी केली. तेव्हां तंजावरच्या सैन्याचे अधिपती गोविंदराव शेडगे, व मानाजीराव जगताप, हे तीन हजार निवडक स्वार व कांहीं तोफा आपणाबरोबर घेऊन नवाबाच्या सैन्याबरोबर सामना देण्यास पुढें आले; व तंजावरच्या ईशान्येस तीन कोसावर, पशुपति गुडी, म्हणून एक गांव आहे, तेथें उभयतां सैन्यामध्यें मोठेंच निकराचें युद्ध झालें. त्यांत उभय पक्षांचें अतिशय नुकसान झालें. तथापि या युद्धामध्यें तंजावरच्या राजास यश आलें, किंवा अनवरुद्दीनखानास यश आलें, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं.‡ तथापि प्रतापसिंहानें, अनवरुद्दीनखानास सात लक्ष रुपये खंडणी देण्याबद्दल, त्या वेळीं एक दस्तऐवज लिहून दिला, व कांहीं रोकड रक्कमही दिली, असें इंग्रजी कागदपत्रावरून दिसून येतें.

---

‡ या बाबतींत "श्रीमत् भोसले-वंश-चरित्र" या शिलालेखांत व खुद्द अनवरुद्दीनखानाच्या लेखांत, अगदींच परस्परविरुद्ध अशी हकीकत दिली आहे; ती अशी कीं—

"श्रीमत् भोसले-वंश-चरित्र" या शिलालेखांत या युद्धाचें असें वर्णन केलें आहे कीं, "उभय सेनाही जमून प्रातःकाल समयीं युद्ध जाहल्यांत, तंजावरची फौज समग्र आंत शिरून त्यांच्या तोफखान्यासही मागें टाकून, अनवरुद्दीनखानाची फौज तमाम ढवळून जाऊन, तंजावरचे फौजेकडून बहुत फौज मारली गेली; बहुतजण नामांकित देखील, पुढें टिकवेनासे होऊन, पळून गेले. शेवटीं तंजावरचे फौजेच्या लोकांनीं अनवरुद्दीनखानाचा खास स्वारीचा हत्ती, भाल्यावर्चीच्या मारानें खिळून उभा करून, उड्या टाकून, हत्तीवरी चढून अंबारीच्या काढाढण्या कापूं लागले. तेव्हां अनवरुद्दीनखान सांपडला जाऊन, चार घटकांपावेतों आपल्या तोंडानें तंजावरचें फौजेचे लोकांस दुराई देऊन राहतें केलें. इतक्यांत किल्ला समीप जाहला. करितां महाराजास हें वर्तमान कळून, महाराजांनीं बादशाही सुभेदार (म्हणून) अनवरुद्दीनखानास सोडून येणें, म्हणून निरोप

त्यानंतर इ० सन १७४९ पर्यंत तंजावरच्या इतिहासांत विशेष महत्वाच्या गोष्टी घडल्या नाहींत. परंतु इ० सन १७४९ पासून तंजावर येथें पुन्हां राजकीय तंटे सुरू होऊन युद्धास प्रारंभ झाला. इ० सन १७३९ मध्यें सयाजी ऊर्फ शहाजी हा पदभ्रष्ट होऊन प्रतापसिंह गादीवर आला. त्यावेळेपासून दहा वर्षे होऊन गेलीं तरी सुद्धां त्याचे राज्यप्राप्तीचे प्रयत्न सुरू होते, व स्वतःच्या फायद्यासाठीं भावी काळांत आपलें स्वतःचेंच व राज्याचें पाहिजे तें नुकसान करण्यास तो सिद्ध झाला होता. कर्नाटक प्रांतांत इंग्रज-फ्रेंचाचे युद्धप्रसंग सुरू होऊन, कर्नाटकमधील पहिलें युद्ध, युरोपांतील ए-ला-शापेल येथील तहानें ( इ. सन १७४९ जानेवारी ) बंद झालें न झालें तोंच, "आपण इंग्रजांची मदत मिळवून त्यांच्या साह्यानें तंजावरची गादी मिळवावी" असा शहाजीनें बेत ठरविला; व प्रतापसिंहाचें फ्रेंच्याशीं सख्य असल्यामुळें त्यानें मद्रासकर ईस्ट इंडिया कंपनीकडे संधान बांधिलें. "आपणच तंजावरच्या गादीचे खरे वारस आहों, व आपला तेथील गादीवरील हक्क तंजावर येथील प्रमुख सरदारांनीं व लोकांनीं मान्य केला आहे." अशी मद्रास येथील गव्हर्नरास खोटी थाप दिली, व "आपणास मदत केल्यास मदतीबद्दल देवीकोटा शहर, त्याच्या आजूबाजूचा प्रदेश व युद्धाचा खर्च देऊं." असें त्यानें मद्रासकर इंग्रजांना अभिवचन दिलें; व इंग्रजांनींही त्यास

---

पाठविला, तदनंतर खानमजकुरांनीं महाराजांस वस्त्र पाठवून, महाराजांकडूनही आपण वस्त्र पत्र पावून समेट केला."

उलटपक्षीं याच दोन युद्धांची हकीकत अनवरुद्दीनखानानें ता० २३ जून इ० सन १७४४, व ता० २१ आक्टोबर इ० सन १७४५ या दिवशीं मद्रासच्या गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रांत अगदींच भिन्न दिली असून, त्यांमध्यें तंजावरच्या फौजेचा आपण पूर्णपणें पराभव करून मोठा विजय संपादन केला, अशी फुशारकी मारली आहे; (व्यंकार स्वामीरावकृत "Manual of the Tanjore District," हें पुस्तक पहा. ) अर्थात् वरील दोन्ही हकीकतींपैकीं कोणती खरी मानावी हें निश्चितपणें ठरवितां येत नाहीं.

मदत देण्याचें कबूल करून त्याप्रमाणें कॅप्टन कोप याच्या हाताखालीं ४३० युरोपियन व १०‧० एतद्देशीय सैन्य देऊन, त्याची शहाजीबरोबर तंजावरच्या स्वारीवर रवानगी केली (इ० सन १७४९ एप्रिल). ही बातमी प्रतापसिंहास कळल्यावर त्यानें मानाजी जगतापमार्फत मद्रासकर इंग्रजास खरी वस्तुस्थिति कळविली. वास्तविक इंग्रजांचा हेतु देवीकोटा+मिळविण्याचा असून त्यांना शहाजीची विशेष पर्वा नव्हती. त्यामुळें त्यांनीं प्रतापसिंहाचें म्हणणें बिलकूल विचारांत घेतलें नाहीं. इकडे कॅप्टन कोप हा आपल्या सैन्यासह तंजावरजवळ आला. तेव्हां प्रतापसिंहाची फौज त्याजबरोबर लढण्यास पुढें आली. परंतु तंजावरकराच्या सैन्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें पाहून कॅप्टन कोप देवीकोटाकडे परत गेला. परंतु तेथें त्यास इंग्रजी आरमार दिसलें नाहीं. म्हणून तो सेंट डेव्हीडच्या किल्ल्यावर परत निघून गेला. नंतर मद्रासकरांनीं देवीकोटा घेण्याकरितां मेजर लारेन्स याच्या हाताखालीं आणखी नवीन सैन्य देऊन त्याची समुद्रमार्गानें तिकडे रवानगी केली. तेव्हां तंजावरकरांनींही देवीकोट्याचें रक्षण करण्याकरितां तिकडे आपलें सैन्य रवाना केलें. व त्या ठिकाणीं उभयतांमध्यें युद्धप्रसंग सुरू झाले; व त्यांत इंग्रज सैन्याची सरशी झाली. इतक्यांत आपला कट्टा हाडवैरी चंदासाहेब हा मराठ्यांच्या कैदेंतून मुक्त होऊन—चंदासाहेबास प्रतिबंधांतून मुक्त करण्याबद्दल सात लाख रुपये दंड भरण्याची जामिनगिरी फ्रेंच सरदार डुप्ले यानें आपल्या अंगावर घेऊन तसे मराठा दरबारास कळविलें, व डुप्लेची जामिनगिरी मराठ्यांनीं कबूल करून व "मी तंजावरच्या राजास बिलकुल त्रास देणार नाहीं." असा खुद्द चंदासाहेबाजवळून करार करून घेऊन, त्यास बंधमुक्त करून त्याच्या बरोबर तीन हजार स्वार बंदोबस्तासाठीं देऊन त्यास इ० सन १६४८ च्या प्रारंभीं कर्नाटक प्रांतांत रवाना केलें.—तंजावरवर चाल करून येत आहे, असें प्रतापसिंहास समजलें. तेव्हां प्रतापसिंहानें मेजर लारेन्स

---

+ देवीकोटा हें शहर तंजावर जिल्ह्यांत कारोमांडल किनाऱ्यावरील ट्रँकिबारच्या उत्तरेस चोवीस मैलांवर, कोलेरून नदीच्या मुखाशीं असून तेथें मोडकळीस आलेला एक लहान किल्ला अस्तित्वांत आहे.

त्याच्याबरोबर तह केला; (ता॰ २५ जून इ॰ सन १७४९). इंग्रजांस देवीकोटा व त्याच्या आसपासचा ३१५०० रुपये उत्पन्नाचा मुलूख व लढाईच्या खर्चाबद्दल एक लक्ष रुपये दिले व शहाजीनें दरसाल चार हजारांची नेमणूक घेऊन इंग्रजांच्या ताब्यांत रहावें असें ठरलें. त्याप्रमाणें इंग्रजांनीं शहाजीस मद्रास येथील सेंट जार्जच्या किल्ल्यामध्यें प्रतिबंधांत ठेविलें. परंतु तेथून तो पुढें पळाला व कायमचा बेपत्ता झाला.

अशा रीतीनें इंग्रजांनीं शहाजीचा पक्ष सोडून, त्यासच उलट प्रतिबंधांत ठेविलें, इतकेंच नाहीं, तर चंदासाहेबानें तंजावरवर हल्ला केला असतां प्रतापसिंहास मदत करण्याचेंही त्यांनीं कबूल केलें; आणि अशा रीतीनें एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या मदतीस आपल्या फौजा देण्याचा प्रघात इंग्रजांनीं प्रथम सुरू केला. ह्यापूर्वी इंग्रजफ्रेंचांनीं एतद्देशिय राजेराजवाड्यांच्या मदतीस आपआपलीं सैन्यें दिलीं होतीं. परंतु इंग्रजफ्रेंचांचें उघड उघड युद्ध सुरू असल्यामुळें उभयतांचेंही तें करणें गैरशिस्त म्हणतां येत नव्हतें. पण युद्धसमाप्ती झाल्यावर इंग्रजांचें हें करणें गैर होतें. या बाबतींत लायल म्हणतो §"उलट-

---

§"......It must be admitted that the first who yielded to this temptation were the English, when they took up the cause of a Raja, who had been expelled by his brother from the Maratha Kingdom of Tanjore. But the expedition sent to reinstate him managed matters so badly that the Company were well content to withdraw it on payment of their war expenditure in addition to a small cession of land. This was not only a military failure but a political blunder; since the Tanjore intervention furnished Dupleix with an excellent precedent for taking part in the quarrels of the native rulers, precisely at a moment when he was meditating similar designs of a much more important and far-reaching character..." ( See, Lyall's "British Dominion in India." Page 90 )

पक्षीं ज्याअर्थी या दोन्ही कंपन्यांना ( इंग्रज व फ्रेंच कंपन्यांना ) आपाआपलीं सैन्यें एकमेकांविरुद्ध अजून उपयोगांत आणतां येणें शक्य नव्हतें, त्याअर्थी मोहिमेच्या मोठ्या फायद्याच्या आशेनें व्यापाराचे विशिष्ट हक्क अगर मुलूखही मिळविण्याच्या हेतूनें, आणि संधी साधल्यास आपल्या प्रतिस्पर्ध्याचें कांहींसें जबर नुकसान करण्याच्या इरद्यानें आपआपल्या फौजा, त्यांचा तनखा भागवून एतद्देशीय राजेरजवाड्यांनीं आपल्या नौकरीस ठेवाव्या, अशा अटी करण्यास ह्या दोन्हींही कंपन्यांना अनिवार मोह पडूं लागला; आणि हेंही कबूल केलें पाहिजे कीं, या मोहास जर पहिल्दानें कोणी बळी पडलें असेल, तर ती ही इंग्लिश कंपनीच होय. कारण त्याचवेळेस तंजावरच्या मराठा राजघराण्यांतील राज्यकर्त्याला त्याच्या भावानें राज्यावरून पदच्युत करून आपण तेथील राजगादी बळकाविली होती. व त्याच राजाचा पक्ष इंग्रजांनीं प्रथम घेतला होता. परंतु त्याला पुन्हां गादीवर बसविण्याकरितां जी मोहिम पाठविण्यांत आली होती, तिनें तें काम इतक्या अव्यवस्थित रीतीनें केलें कीं, लढाईच्या बाबतींत झालेला खर्च आणि जमीनीचा एक लहानसा तुकडा एवढ्यावरच इंग्लिश कंपनीला संतुष्ट होऊन आपली फौज परत आणाविणें भाग पडलें. हें फक्त लष्करी अपयशच नव्हें, तर राजकारणांतीलही ही एक घोडचूक होती. कारण ह्या तंजावर प्रकरणांतील इंग्रजांच्या मध्यस्थीनें डुप्ले याला एतद्देशीय राजेरजवाड्याच्या भांडणांत भाग घेण्याला एक उत्तम दाखदाच मिळाला, आणि तोही अशा वेळीं कीं, जेव्हां डुप्ले हा, अशाच प्रकारचें अत्यंत महत्वाचे आणि दूरदर्शी स्वरूपाचे डावपेंच शोधून काढण्यांत गर्क झाला होता, व दक्षिण हिंदुस्थानामध्यें राजतख्त मिळविण्याचा राजरोस प्रश्न तरवारीनें सोडविण्याकरितां जे पदाभिलाषी लोक तयार झालेले होते. त्यामध्यें मनगटाच्या जोरावर मध्यस्थी करून फ्रान्सचें वर्चस्व कायमचें प्रस्थापित करण्याचे बेत वाढीस लावण्याची त्याची ह्यावेळीं पूर्ण तयारी झालेली होती." थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे एतद्देशीय राज्यकर्त्यांच्या मदतीस आपल्या फौजा देण्याचा प्रघात इंग्रजांनीं जो प्रथम सुरू केला, तो या तंजावरच्या राज्यापासूनच सुरू केला होता, हें उघड होतें.

चंदासाहेब हा मराठ्यांच्या प्रतिबंधांतून मुक्त झाल्याबरोबर अनेक ठिकाणीं

युद्धें करीत व सैन्य जमवीत कर्नाटक प्रांतांत आला; फ्रेंच सरदार डुप्ले यांस भेटला, त्याच्याशीं एक तह केला; त्याची मदत मिळविली; निजामउल्मुल्क याचा नातू हितायत् मोहिद्दीनखान यांस " मुजफरजंग " असा किताब देऊन त्याच्या नांवानें " दक्षिणचा सुभेदार " अशी द्वाही फिरविली; आणि फ्रेंच व मुजफरजंग यांचें सैन्य, व आपण जमविलेलें मोठें सैन्य, यांसह अर्काटचा नबाब अनवरुद्दीनखान याच्यावर चाल केली. अंबूर + येथें उभय सैन्यामध्यें मोठें निकराचें युद्ध होऊन त्यांत अनवरुद्दीन मारला गेला. ( ता० ३ आगष्ट इ० सन १७४९ ) त्याचा एक मुलगा, माफूजखान हा चंदासाहेबाच्या हातीं सांपडला. दुसरा मुलगा अहंमदअली हा त्रिचनापल्ली येथें पळून गेला. या विजयप्राप्तीनंतर तो " अर्काटचा नबाब " बनला, व " तुम्ही एकदम जाऊन त्रिचनापल्ली काबीज करा. " असा डुप्ले यानें त्यास आग्रह केल्यामुळें, तो फ्रेंच सैन्य, व आपलें व मुजफरजंगाचें सैन्य बरोबर घेऊन तो तिकडे जाण्यास निघाला. त्यावेळीं या सैन्याच्या खर्चास डुप्ले यानें स्वतःच्या पदरचे एक लाख रुपये कर्ज दिलें व इतर मंडळींकडून दोन लाख देवविले. परंतु चंदासाहेबाच्या हातीं पडलेले हे तीन लाख रुपये त्यानें व मुफजरजंगानें मिळून भलतीकडेसच खर्च केले. आणि अर्ध्या रस्त्यावर आल्या-वर पैसा नाहीं, म्हणून त्रिचनापल्लीवर जाण्याचा आपला बेत सोडून देऊन तो तंजावरकडे वळला, व तेथील राजा प्रतापसिंह याच्यापासून पैसे उकळ-ण्याचा त्यानें निश्चय केला.

चंदासाहेब हा तंजावर येथें आल्याबरोबर त्यानें लागलीच " आमच्या सैन्याच्या खर्चाकरितां पैसे पाठवा " म्हणून प्रतापसिंहास कळविलें. अनवरु-

---

+ अंबूर ( अंबूरदुर्ग अथवा पेटांबूर ) हें गांव उत्तर अर्काट जिल्ह्यांत रेलवे-स्टेशन असून तें वेल्लोरपासून ३८ मैलांवर, बडामहाल या डोंगराच्या पूर्वेकडील फांट्यांतील कडापानाथम् या घाटाच्या पायथ्याशीं, पालार नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर आहे. येथील किल्ला मोठा अवघड व बळकट असून तो कर्नाटकमधील कडापानाथम् या घाटाच्या नाक्याचा व माऱ्याचा असल्यामुळें पूर्वकाळीं तो विशेष महत्त्वाचा गणला गेला होता.

द्दीनखानाबरोबरील युद्धामध्यें विजयी होऊन " कर्नाटकचा नबाब " बनल्याबरोबर, " मी तंजावरच्या राजास बिलकुल त्रास देणार नाहीं. " ह्या प्रतिबंधांतून मुक्त होतांना मराठ्यांबरोबर केलेला करार साफ विसरून जाऊन प्रतापसिंहानें खुषीनें पैसे न दिल्यास सक्तीनें ते वसूल करण्याचा चंदासाहेबानें मनसुबा केला, व पैसे तावडतोब पाठवा अशी प्रतापसिंहाकडे निकड लाविली. प्रतापसिंहानें निरनिराळया सबबी काढून, त्यास पैसे देण्याची टाळाटाळ सुरू केली. "अर्काटचा माजी नबाब अनवरुद्दीनखान याचा मुलगा महंमद अल्लीखान हाच अर्काटच्या गादीचा खरा वारस असून तो माझा स्नेही आहे, त्यामुळें त्याच्या शत्रूस मी कोणत्याही प्रकारें मदत करूं इच्छीत नाहीं. " असें चंदासाहेब यांस कळविलें. इंग्रज, नासीरजंग व महंमद अल्लीखान यांच्याकडे निरोपावर निरोप पाठवून मदत मागितली; इंग्रजांनीं महंमद अल्लीखान यांस थोडीशी मदत पाठविली होती, त्यांतील वीस लोक त्यांनीं तंजावर येथे रवाना केले. इकडे, त्रिचनापल्ली हस्तगत करून घेण्याचें काम चंदासाहेबानें दिरंगाईवर टाकलें, हें पाहून डुप्ले याच्या अंगाचा तिळपापड झाला. तंजावरच्या नादीं लागून चंदासाहेब सर्वच घालवितो कीं काय अशी भ्रांति व शंका त्यास उत्पन्न झाली. त्यानें, चंदासाहेबाबरोबर असलेल्या सैन्याचा सरदार ड्यूकिन यांस " तुम्ही तावडतोब तंजावरकराला जरबाची तंबी देऊन, पैसा वसूल करावा; व लागलीच त्रिचनापल्लीवर चाल करून निघून जावें; " असा हुकूम पाठविला. त्याप्रमाणें ड्यूकिन यानें तावडतोब तंजावरच्या किल्ल्यावर हल्ला करून तो काबीज केला. त्याबरोबर प्रतापसिंह जेरीस येऊन चंदासाहेबास सत्तर लाख रुपये, आणि फ्रेंच सैन्यास दोन लाख रुपये इनाम, व फ्रेंच सरकारास ८१ गांवें देण्यास तो कबूल झाला. परंतु हे पैसे देण्यासही तो दिवसगत लावूं लागला. तेव्हां चंदासाहेबानें प्रतापसिंहाकडून छपन्न लक्ष रुपयांचा कागद लिहून घेतला ( हा कागद चंदासाहेबानें फ्रेंचांच्या हवालीं केला. व याच दस्तऐवजाच्या आधारानें पुढें इ० सन १७५८ मध्यें, हें छपन्न लाख रुपये वसूल करण्याकरतां फ्रेंच सरदार काउंट लाली यानें तंजावर प्रांतावर स्वारी केली ) व बाकीच्या रकमेबद्दल सोनें नाणें व जडजवाहीर देण्याचें बोलणें लाविलें. इतक्यांत नासीरजंग मोठ्या सैन्यानिशीं

तंजावरच्या कुमकेस आल्याची बातमी आली, तेव्हां चंदासाहेब पांडेचरी येथें पळून गेला (इ० सन १७५९). याप्रमाणें तंजावरवरील हें अरिष्ट कांहीं काळ तरी दूर झालें.

त्यानंतर नासीरजंग, महंमदअल्ली, व इंग्रज हा एक पक्ष आणि मुजफरजंग, चंदासाहेब व फ्रेंच हा एक पक्ष, असे दोन पक्ष उघडपणें पुढें येऊन कर्नाटकमधील दुसरें युद्ध सुरू झालें. त्यांत तंजावरकर प्रतापसिंहानें पहिला पक्ष स्वीकारून, आपला सेनापति मानाजीराव ( माणकोजी ऊर्फ माणकजी ) यांस, त्याच्या बरोबर तीन हजार स्वार, व दोन हजार पायदळ असें निवडक सैन्य देऊन महंमद अल्लीच्या मदतीस पाठविलें, व या तंजावरच्या शूर सेनापतीनें व सैन्यानें, अनेक ठिकाणीं चंदासाहेब व फ्रेंच यांच्याशीं निकराचे सामने नेऊन त्यांना अगदीं जेरीस आणून मोठेंच नांव गाजविलें. फ्रेंच सरदार लॉ व चंदासाहेब हे कावेरी नदींतील श्रीरंगम् या बेटांत तळ देऊन राहिले होते. तेथें ते उभयतांही शत्रूकडून कोंडले गेल्यामुळें त्यांचा नाइलाज होऊन ते शत्रूंच्या स्वाधीन झाले. यावेळीं इंग्रज व फ्रेंचांचें युद्ध सुरू नसल्यामुळें, फ्रेंचांना कैद करून ठेवणें इंग्रजांस शक्य नव्हतें. पण चंदासाहेबांवर मात्र कठीण प्रसंग गुजरला. त्याचा पूर्ण नाश होण्याची वेळ आली. महंमदअल्लीच्या हातांत सांपडला तर त्याला मृत्यूशिवाय दुसरी गतिच नाहीं, असा दुर्धर प्रसंग प्राप्त झाला. तेव्हां चंदासाहेबाचा बचाव करण्याची फ्रेंच सरदार लॉ यांस अतिशय विवंचना लागली. त्यानें तंजावरकर प्रतापसिंहाचा सेनापति मानाजीराव यांस पैसे भरून चंदासाहेबास बाहेर काढून सुरक्षितपणें पोंचवावें, असा बेत ठरविला व त्याप्रमाणें व्यवस्था केली. मानाजीरावानें ठरलेली रक्कम घेतली. व चंदासाहेबाचा जीव बचावण्याची शपथ घेतली. तेव्हां चंदासाहेब पालखींत बसून माणकोजीच्या छावणींत आला व त्यास लागलीच बेड्या ठोकून कैदी करण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं इंग्रज सेनापति मेजर लॉरेन्ससह चार प्रमुख मंडळी एकत्र जमली, व " चंदासाहेबांचें पुढें काय करावयाचें ? " याविषयीं वाटाघाट झाली. मेजर लॉरेन्स त्यास आपल्या ताब्यांत घेण्यास तयार झाला, पण दुसऱ्या दिवशीं त्यानें कानावर हात ठेवून आपलें अंग या प्रकरणांतून काढून घेतलें. तेव्हां त्याच दिवशीं

( ता० ३ जून इ० सन १७५२ ) मानाजीरावानें त्याचा वध करून त्याचें डोकें महंमदअल्लीकडे नजर पाठविलें. व अशा दुःखद रीतीनें चंदासाहेबाचा अंत होऊन कर्नाटकच्या राजकीय रंगभूमीवरील एक अत्यंत महत्त्वाचा अंक समाप्त झाला.

चंदासाहेबाबरोबर चाललेल्या युद्धांत, महंमदअल्ली हा विजयी झाल्यानंतर या युद्धांमध्यें प्रतापसिंहानें आपणांस साह्य केलें म्हणून बक्षिसादाखल त्यानें तंजावरची दहा वर्षांची खंडणी माफ केली आणि कोइलाडी व यलंगाड्ड हे दोन तालुके त्यानें प्रतापसिंहास जहागीर दिलें. त्रिचनापल्ली येथील युद्धामध्यें म्हैसूरकर नंदराज दलवाई, गुत्तीकर मुरारराव घोरपडे व इंग्रज यांनीं महंमदअल्लीस उत्तम मदत करून समरांगणावर चांगली कामगिरी बजाविली होती, त्यामुळें, त्यांपैकीं दलवाई व घोरपडे यांनीं एकत्र होऊन त्रिचनापल्ली व श्रीरंगम् आपल्या ताब्यांत द्यावें, म्हणून महंमदअल्लीकडे मागणी केली. परंतु महंमदअल्ली यानें त्यांच्या मागणीची टाळाटाळ केल्यामुळें, ते उभयतांही त्रिचनापल्लीच्या पश्चिमेस तळ देऊन तेथें राहिले. व गुप्तरीतीनें फ्रेंचांशीं कारस्थानें करून महंमदअल्ली व त्याचे साह्यकारी तंजावरकर यांच्याशीं युद्ध कारण्याचा व त्रिचनापल्ली हस्तगत करून घेण्याचा त्यांनीं मनसुबा केला. तथापि तंजावरकर प्रतापसिंह वळल्यास त्याला फोडून एकट्या महंमदअल्लीसच पहिल्यानें झोडावा, अशा इच्छेनें त्यांनीं प्रयत्न आरंभिला. प्रतापसिंहास अनुकूल करून घेण्यासाठीं धाकदपटशा व लांचलुचपत हे दोन्हींही प्रयोग त्याच्यावर केले. "तुझा सेनापति मानाजीराव यानें आमचा दोस्त चंदासाहेब याचा वध केला आहे, त्याचा सूड उगविल्याशिवाय आम्ही राहणार नाहीं, व तुम्हीं आमच्या शत्रूस ( महंमदअल्लीस ) यापुढें जर मदत केलीत, तर तुमचा मुलूख उध्वस्त केल्याशिवाय आम्ही सोडणार नाहीं." असा निर्वाणीचा निरोप त्यास पाठविला. त्यामुळें प्रतापसिंह अगदीं घाबरून गेला. शिवाय प्रतापसिंहाचा दिवाण सखोजी नाईक व सेनापति मानाजीराव यांचें वांकडें होतें. या गोष्टीचा फायदा घेऊन त्यांनीं सखोजीस अंतस्थ रीतीनें लांच देऊन आपल्या बाजूस अनुकूल करून घेतलें, व त्याच्या मार्फत प्रतापसिंहाचें मन वळवून मानाजीरावास सरखेल पदावरून दूर करविलें. थोडक्यांत म्हणजे तंजावरचा दिवाण

सखोजी यांस फितूर करून, व मानाजीरावासारखा शूर, पराक्रमी एकनिष्ठ, व जीवावर उदार होऊन शत्रूपुढें सामान्यास दंड ठोकून उभा राहणारा व चिकाटीनें शत्रूचा प्रतिकार करणारा सेनापति अधिकारच्युत करून, दलवाई व घोरपडे या उभयतांनी तंजावर हस्तगत करून घेण्याचा आपला मार्ग सुलभ करून ठेविला.

इकडे प्रतापसिंहास या संकटांतून कसें मुक्त व्हावें, व आपलें संस्थान कसें सुरक्षित ठेवावें, ही मोठीच काळजी उत्पन्न झाली. फ्रेंचांशीं वाटाघाट करून त्यांच्याबरोबर आत्मसंरक्षणासाठीं तह करण्याची त्यानें खटपट केली. परंतु त्रिचनापल्ली येथें फ्रेंचांचाच पराजय झाल्यामुळें, तो नाद त्यास सोडावा लागला. प्रतापसिंहानें पेशवा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब, यांच्याकडे मदतीची याचना केली. पण पेशव्यांकडून मदत न आल्यानें ती आशाही त्यास सोडावी लागली आणि तोंडावर उभ्या असलेल्या शत्रूशीं सामना देण्याला, आपल्याच्यानेंच होईल तितकी सर्व तजवीज करणें त्याला भाग झालें. इतक्यात "मुरारराव घोरपडे गुत्तीकराचे बाराशें घोडेस्वार तंजावर प्रांतांत शिरून त्यांनीं गांवोगांव मोठाच धुमाकूळ उडविला आहे" अशी बातमी प्रतापसिंहास समजली. तेव्हां त्याला आपला शूर व अधिकारभ्रष्ट केलेला सेनापति मानाजीराव याची आठवण झाली. मानाजीराव हा मोठा पराक्रमी सेनानायक, शूर योद्धा, व अनेक वेळां परशत्रूशीं युद्ध करून कीर्ति मिळविलेला रणविद्याविशारद, व अनुभवी सेनानी असून, मुराररावाच्या सैन्याबरोबर सामना देण्याला तोच कायतो एकटा समर्थ आहे, हें प्रताप-सिंहास पूर्णपणें माहीत असल्यानें त्यानें मानाजीराव जगताप यांस पुन्हा सरखेलपदाचा अधिकार देऊन त्याची मुराररावाच्या सैन्यावर रवानगी केली. त्याप्रमाणें मानाजीराव हा निवडक तीन हजार घोडेस्वार आपणांबरोबर घेऊन, मुराररावावर मोठ्या धडाडीनें चाल करून गेला व त्याच्याशीं सामना देऊन त्यांत त्याचा पूर्णपणें पराभव करून त्यानें त्यास तंजावर प्रांतांतून हांकलून लाविलें. अशाप्रकारें मोठा विजय संपादन करून (इ० सन १७५४ मानाजी हा परत राजधानींत येऊन प्रतापसिंहास भेटला. पण त्याच्या ह्या उत्कृष्ट व असामान्य कामगिरीचा मोबदला त्याला प्रतापसिंहाकडून योग्य-

प्रकारें मिळाला तर नाहींच, पण उलट त्याच्या शौर्याची व पराक्रमाची कीर्ति या वेळीं विशेषच वृद्धिंगत झाल्यामुळें प्रतापसिंहाचा दिवाण, जो मानाजीरावाचा शत्रू सखूजी नाईक याची मत्सरबुद्धि प्रदीप्त झाली आणि त्यानें प्रतापसिंहाचें मन कलुषित करून, मानाजीरावास पुन्हां अधिकारावरून दूर करविलें.

तथापि मानाजीराव अधिकारच्युत झाला नाहीं तोंच तंजावरच्या राज्यावर पुन्हां फ्रेंचांची धाड येऊन पडली. फ्रेंच सेनापति मॉनशियर मेर्सीन हा आपल्या बरोबरीच्या तीन हजार पायदळ, व दोन हजार घोडेस्वार, यांसह तंजावरच्या प्रांतांत शिरला ( इ० सन १७५४, मे० ) व कोविहलाडी ऊर्फ कोईलाडी हें गांव हस्तगत करून घेऊन त्यानें तेथें फार लूटमार केली. इतकेंच नाहीं, तर तंजावर प्रांताच्या सुपीकतेचें मुख्य साधन जें मेलूरच्या प्रसिद्ध कालव्याचें धरण, तेंही उध्वस्त करून त्यानें तिकडे मोठाच अनर्थ मांडला. तेव्हां प्रतापसिंहानें मल्हारजी गाडेराव या आपल्या नातेवाईक सरदाराच्या हाताखालीं पंधराशें स्वार देऊन त्याची फ्रेंचांवर रवानगी केली. इतक्यांत गुत्तीकर मुराररराव यानें, तंजावरवर हल्ला करण्यास ही उत्तम संधि आहे असें पाहून, आपणाबरोबर तीन हजार घोडेस्वार घेऊन तंजावरवर चाल करून आला. तंजावरच्या सैन्याची धूळधाण उडविली व तंजावर शहर लुटून फस्त केलें. अशीं एकाच वेळीं दोन संकटें ओढवल्यामुळें प्रतापसिंह गोंधळून गेला; व त्यानें मदत पाठविण्याविषयीं मद्रासकर इंग्रजांकडे निकडीची मागणी केली. तेव्हां इंग्रज सेनापति मेजर लॉरेन्स यानें कॅप्टन कॅलियड यांस प्रतापसिंहाकडे भेटीस पाठविलें. व हें संकट टाळण्याकरितां कोणते उपाय योजावेत, तें सांगून पाठविलें. त्याप्रमाणें कॅप्टन कॅलियड व प्रतापसिंह यांची भेट होऊन तह झाला. व इंग्रजांनीं तंजावरकरास मदत पाठविली. तंजावरचा दिवाण व सेनापति मानाजीरावाचा शत्रु सखूजी नाईक हा फ्रेंचास अनुकूल असून इंग्रजांस प्रतिकूळ होता. त्यामुळें त्यास तंजावरच्या राज्यांतून हद्दपार केल्याशिवाय प्रतापसिंहाशीं आपलें खरें सख्यत्व होणार नाहीं, असें इंग्रजांस वाटत होतें. म्हणून त्यांनीं प्रतापसिंहामार्फत सखूजी नाइकाला सहकुटुंब तंजावरच्या राज्यांतून हद्दपार करविलें आणि मानाजीराव यांस प्रतापसिंहानें पुन्हा कामावर घेऊन त्याची दिवाण व सेनापति या दोन्ही अधिकारांवर स्थापना

केली. त्यानंतर तंजावर येथें अनेक राजकारणें घडून आलीं, आणि शेवटीं अर्काटचा नवाब महंमदअली यानें मध्यस्थी पडून, प्रतापसिंहाकडून मुरारराव घोरपडे यांस तीन लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल करून, त्याचें सैन्य तंजावर प्रांतांतून परत फिरविलें. या वेळीं या तीन लक्षांपैकीं पन्नास हजार रुपये प्रतापसिंहानें मुराररावास रोख दिले; व मुराररावाची धाड तंजावर प्रांतांतून परत गेली. त्यानंतर प्रतापसिंहास जो थोडासा शांततेचा लाभ झाला, त्या अवधींत त्यानें फ्रेंच्यांनीं उध्वस्त करून टाकलेलें मेलूरच्या कालव्याचें धरण, आपलें, व कांहीं इंग्रजी सैन्य त्या ठिकाणीं त्याच्या संरक्षणाकरितां नेहमीं खडा ठेवून, दुरुस्त केलें; व तंजावर राज्याच्या सुपीकतेचें हें फ्रेंच्यांनीं नष्ट करून टाकिलेलें मुख्य साधन त्यानें पुन्हां पूर्वीप्रमाणें सुस्थितींत आणून ठेविलें.

त्या नंतर इ० सन १७५८ पर्यंत तंजावरच्या राज्यास कांहींशी स्वस्थता लाभली. परंतु याच वर्षीं फ्रेंच सरदार काउंट लाली यानें तंजावरवर स्वारी केली. तंजावरचा राजा प्रतापसिंह हा इंग्रजांच्या पक्षाचा, त्यामुळें फ्रेंचांची त्याच्यावर पहिल्यापासूनच करडी नजर होती. शिवाय मद्रासवर स्वारी करण्याला या वेळीं फ्रेंचाजवळ पैसाही नव्हता. त्यामुळें तंजावरवर स्वारी करून पैसे काढण्याची मसलत लाली यांस कौन्सिलनें दिली; आणि इ० सन १७४९ मध्यें प्रतापसिंहानें चंदासाहेबास जो छपन्न लक्ष रुपयांचा कागद लिहून दिला त्या आधारानें ही रक्कम वसूल करण्याची फ्रेंचांनीं युक्ती योजिली. लाली यांस कौन्सिलची ही मसलत फारसी आवडली नाहीं. तथापि नाइलाजामुळें ती त्यास कबूल करणें प्राप्त झालें. त्याप्रमाणें लाली हा कारिकल* बंदरांत उतरून रस्त्यानें देवळें, व नागूर,+ किव्हालूर,÷ वगैरे गांवें लुटींत, व तंजावरच्या

---

* कारिकल, हें बंदर कारोमांडल किनाऱ्यावर, तंजावर जिल्ह्यांतील नागापट्टम् या शहरापासून १२ व ट्रॅंकिबारपासून ६ मैलांवर आहे.

+ नागूर हें नागापट्टम्‌च्या उत्तरेस तीन मैलांवर वेलारनदीच्या मुखाशीं एक गांव व बंदर आहे.

÷ किव्हालूर हें नागपट्टम् पासून सात मैलांवर असून तें हल्लीं एक रेलवे-स्टेशन आहे.

प्रजेस अतीशय उपद्रव देत, ता. ८ जुलई (इ० सन १७५८) रोजीं, तंजावर येथें येऊन दाखल झाला. त्याबरोबर प्रतापसिंहास दहशत बसून तो लालीस पांच लाख रुपये देण्यास तयार झाला. पण लालीच्या उतावळेपणानें सर्व फसलें. त्यास थोडासा विजय प्राप्त झाल्याबरोबर "राजास त्याच्या सर्व माणसांसह कैद करून सेंट लुई येथें घेऊन जाऊं" अशी लालीनें प्रतापसिंहास निष्ठुरपणाची धमकी दिली. त्याबरोबर राजा प्रतापसिंह चिडून गेला; जिवावर उदार झाला; "काय होईल तें होवो;" अशा निर्धारानें त्यानें फ्रेंचाशीं सामना देण्याचा निश्चय केला; फ्रेंच सैन्याशीं निकराचें युद्ध सुरू केलें. पुढें तंजावरवर फ्रेंच तोफा डागणार, तोफांच्या जोराच्या येलगारांत तंजावर शहर हस्तगत करण्याचा प्रयत्न करणार तोंच, इंग्रजांचें सैन्य, प्रतापसिंहाच्या मदतीकरितां तंजावर येथें येऊन दाखल झालें; व कांहीं इंग्रजी आरमार कारीकल व पांडेचरी घेण्याकरितां तिकडे गेलें आहे, अशी लाली यांस बातमी समजली. तेव्हां त्यास कसाबसा जीव बचावून तंजावर सोडून, कारीकल—पांडेचरीकडे जाणें भाग पडलें. तंजावरच्या ह्या वेढ्यामध्यें, व युद्धप्रसंगीं तंजावरकर सेनापति व दिवाण मानाजीराव यानें उत्कृष्ट कामगिरी केली, व आपल्या पराक्रमानें फ्रेंच सरदार लाली यांस आश्चर्यचगित करून टाकिलें. इतकेंच नाहीं तर लाली हा तंजावर येथून परत जाण्यास निघाल्यानंतर, मार्गांत तंजावरकराच्या सैन्यानें लालीस इतका त्रास दिला कीं, तो स्वतःच जिवंत तंजावरकरांच्या हातांत सांपडण्याचा कठिण प्रसंग त्याच्यावर गुदरण्याची वेळ आली होती; पण मोठ्या शर्थीनें ती टळून तो बचावला. तथापि तीन मोठाल्या तोफा, त्यांत खिळे ठोकून त्या निरोपयोगी करून, त्यास रस्त्यांत टाकून द्याव्या लागल्या; व मोठ्या शिकस्तीनें तो कसा तरी पांडेचरी येथें परत गेला, व तंजावरवरील हें फ्रेंचाचें अरिष्ट अशा प्रकारें दूर झालें.

त्यानंतर इ० सन १७६१ मध्यें कर्नाटकमधील फ्रेंच सत्ता पूर्ण कमजोर होऊन ती बहुतेक लयास गेल्यासारखी झाली; आणि इंग्रज व त्यांचा दोस्त महंमदअल्ली हे सर्वसत्ताधारी व प्रबळ झाले; व ते उभयतांही तंजावरच्या राजास आपला अंकित करून घेण्याची इच्छा करूं लागले. शिवाय याच वेळीं नबाब महंमदअल्ली हा कर्नाटकमधील युद्धामुळें इंग्रजांचा देणेदार होऊन कर्जाच्या

पेंचांत सांपडला होता. त्यामुळें तंजावरच्या धनसंपन्न राज्यकर्त्याकडून द्रव्य मिळविण्याचा त्यानें संकल्प केला, आणि जुन्या खंडणीची बाकी काढून ती वसूल करण्याच्या इराद्यानें तंजावरावर स्वारी करण्याचा त्यानें घाट घातला. तेव्हां हें प्रकरण मद्रासकर इंग्रजाकडे गेलें; व त्या वेळचा मद्रासचा गव्हर्नर मि. जार्ज पीगॉट हा मध्यस्थ होऊन त्यानें महंमदअल्ली व प्रतापसिंह यांच्यामधील खंडणीबाबतचा तंटा मिटविण्याचें कार्य आपल्या अंगावर घेतलें. आपल्या कौन्सिलचा, मि. डुप्रे या नांवाचा एक सभासद त्यानें मुद्दाम तंजावर येथें पाठवून या बाबतींत चौकशी करविली; आणि कर्नाटकच्या युद्धांत तंजावरच्या राजानें इंग्रजास व महंमदअल्लीस बरेंच साहाय्य केलें असल्यामुळें, सर्वांचा सलोखा होऊन देशांत शांतता नांदावी, या हेतूनें त्यानें एक दोस्तीचा तह करण्याचें ठरविलें; व इंग्रजांच्या मध्यस्थीनें त्या उभयतांमध्यें, ता० १२ आक्टोबर इ० सन १७६२ रोजीं एक दोस्तीचा तह झाला. त्यामध्यें, " तंजावरच्या राजानें जुन्या खंडणीबद्दलची बाकी, बावीस लक्ष रुपये, हीं दोन वर्षांत हप्तेबंदीनें नबाबास द्यावी व पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें, पेषकसीबद्दल दोन लक्ष व नजराण्याबद्दल दोन लक्ष मिळून चार लक्ष रुपये दरसाल देत जावें " असें ठरलें; व त्याबद्दलची हमी इंग्रजांनीं घेतली. परंतु ह्या अटी अर्थातुर झालेल्या नबाबास पसंत पडल्या नाहींत. त्यामुळें त्याचा असंतोष कायम राहून हें खंडणीचें भांडण तसेंच धुमसत राहिलें व या नंतर लवकरच त्याचे परिणाम विशेष विकोपास गेले.

प्रतापसिंह हा त्यानंतर फार दिवस जगला नाहीं. प्रतापसिंहानें एकंदर तेवीस वर्षें राज्य केलें. परंतु बहुतेक सर्व कारकीर्द अस्वस्थतेची व धामधुमीची झाली. या तेवीस वर्षांत त्याला अनेक प्रकारें अतिशय त्रास झाला. निरनिराळीं संकटें ओढवलीं. नानाप्रकारच्या विवंचना कराव्या लागल्या व आपला प्राण, आपली इज्जत व आपलें राज्य जगविण्याकरितां त्याला अनेक प्रकारें अश्रांत परिश्रम घ्यावे लागले. त्यानें सतत तेवीस वर्षें राज्य केलें, पण खरें राज्यसुख त्याला निदान तेवीस दिवस तरी मिळालें असेल, असें त्याच्या कारकीर्दींतील संकटपरंपरेवरून म्हणवत नाहीं. असा हा तंजावरचा

कर्तबगार व करारी, पण तितकाच नेहमींचा दुर्दैवी राज्यकर्ता राजे प्रतापसिंह हा इ० सन १७६३ च्या दिजंबर महिन्यांत दैवगतीस पावला. राजे प्रतापसिंह हा मोठा दयाळू, औदार्यशाली व धर्मनिष्ठ असून, त्यानें धामधुमीच्या काळाशीं टक्कर देत राहूनही उत्तम प्रकारें प्रजापालन करून मोठी कीर्ति मिळविली. कुंभकोणम्* व चिदंबरम्+ येथील देवालयाचा जीर्णोद्धार केला व कुंभकोणम्, तिवेलूर, मदुरा, रामेश्वर आणि त्रिणोमाली येथें मोठमोठे राजवाडे बांधिले. राजा प्रतापसिंह यांस पांच स्त्रिया होत्या. त्यापैकीं त्याची तिसरी स्त्री यमुनाबाई व पांचवी स्त्री सखवारबाई ह्या त्याच्याबरोबर सती गेल्या. प्रतापसिंहास तुळाजी ऊर्फ तुळजाराजे व अमरसिंह असे दोन पुत्र होते. त्यापैकीं तुळाजी हा त्याच्यामागून तंजावरच्या गादीचा अधिपती झाला.

राजे तुळाजी याची कारकीर्द अजमासें चोवीस वर्षांची ( इ. सन १७८७ पर्यंतची ) आहे. पण हा राज्यकर्ता तर प्रतापसिंहाहूनही दुर्दैवी होता, असें निदर्शनास येत आहे. ह्या दुर्दैवी राज्यकर्त्याच्या कारकीर्दींतही अर्काटचा नबाब महंमदअल्ली, मद्रासकर इंग्रज, आणि म्हैसूरचा हैदरअल्ली इत्यादि सत्ताभिलाषी व स्वार्थपटु मंडळींनीं तंजावरच्या राज्यावर दृष्टी ठेवून तें हस्तगत करण्यासाठीं अनेक प्रयत्न केले. त्यामुळें, तुळाजीची सर्व कारकीर्द या शिरजोर व बलिष्ठ लोकांच्या राजकारस्थानांचा प्रतिकार करण्यांत, व त्यांच्यापासून आपला बचाव करण्यांतच,त्यास खर्ची घालावी लागली.

प्रतापसिंह मृत्यू पावला, व तुळाजी हा नुकताच गादीवर आला, असें पाहून तंजावरकराचा मुख्य शत्रु जो महंमदअल्ली त्यानें जुनें खंडणीचें भांडण पुन्हा उकरून काढिलें. प्रसिद्ध मेलूरच्या कालव्याचें धरण हें जरी तंजावरच्या राजाच्या मालकीचें होतें, तरी तें नबाबाच्या राज्याच्या हद्दींत होतें. त्यामुळें

---

*कुंभकोणम् हें तंजावर जिल्ह्यांत, तंजावर पासून २४ मैलांवर असून तें एक रेलवे स्टेशन व तहशिलीचें ठिकाण आहे.

+चिदंबरम् हें दक्षिण अर्काट जिल्ह्यांत कडलूरच्या दाक्षिणेस २५ मैलांवर असून, तें एक रेलवे-स्टेशन, व तालुक्याचें ठिकाण आहे.

"या धरणावर आपलेंच स्वामित्व आहे." असा हक्क सांगून, त्यानें तंजावरच्या राजास त्याची दुरस्ती करूं दिली नाहीं. त्यामुळें वादाचें कारण उत्पन्न होऊन परस्परांमध्यें हर्शामर्श सुरूं झाला, आणि नबाबानें हा कालवा बंद करून तंजावर संस्थानाच्या सुपीकतेच्या मुख्य साधनावर गदा आणण्याचा प्रयत्न केला. तेव्हां तुळाजीनें घाबरून मद्रासकर इंग्रजांची मदत मागितली. मद्रासकरांनीं मि. जेम्स बोर्शियर या नांवाचा आपला एक कौन्सिलर चौकशीसाठीं तिकडे पाठविला. व त्यानें योग्य चौकशी करून "हें धरण तंजावरच्या राजाच्याच मालकीचें आहे." असा मद्रास सरकारास रिपोर्ट केला. तेव्हां मद्रासचा गव्हर्नर ऑ. रॉबर्ट पॉर्क यानें, नबाबाची कानउघाडणी करून तंजावरच्या राजास कालव्याची दुरस्ती करण्याबद्दल परवानगी दिली. (इ. सन १७६४ ). त्यामुळें तर अर्काटकर नबाब अधीकच चिडून गेला, व तंजावरचें राज्य नामशेष करण्याच्या निरनिराळ्या मसलती योजण्यास त्यानें प्रारंभ केला.

इतक्यांत म्हैसूरचा हैदरअल्ली हा अतिशय प्रबळ होऊन त्यानें कर्नाटकांत एकसारखी धुमश्चक्री चालविली. इंग्रज व त्यांचा दोस्त कर्नाटकचा नबाब महंमद अल्लीखान यांना पादाक्रांत करून कर्नाटकांत आपला अंमल बसवावा या महत्वाकांक्षेनें त्यानें त्रिचनापल्ली व तंजावर प्रांतापर्यंत स्वाऱ्या करून महंमदअल्लीच्या मनांत अतिशय दशहत उत्पन्न केली; आणि तंजावरच्या राज्यावरही, ही हैदरअल्लीची धाड केव्हां येऊन कोसळेल याचा नियम नसल्यामुळें महंमदअल्लीप्रमाणेंच तुळाजी राजाही अतिशय घाबरून गेला. अशा स्थितींत म्हैसूरकर हैदरअल्लीची स्वारी खरोखरीच तंजावरवर येऊन धडकली. व ज्या अरिष्टाला तुळाजी भीत होता, तेंच अरिष्ट अगदीं खरोखरीच त्याच्यासमोर येऊन उभें राहिलें. त्यानें पेशव्यांची मदत गुप्तपणानें मागितली, पण ती त्यास मिळाली नाहीं. "इकडे आड, तिकडे विहीर" अशी त्याची संकटप्रद स्थिती झाली. कातरीच्या दोन तीक्ष्ण धारेच्या पात्यांत सांपडल्याप्रमाणें त्यास झालें. हैदरअल्ली हा इंग्रज व महंमदअल्ली यांचा कट्टा शत्रू असल्यामुळें, आणि तंजावरकर हे इंग्रज व महंमदअल्ली यांचे स्नेही असल्यामुळें, हैदरअल्लीस खंडणी दिल्यास, इंग्रज व महंमदअल्ली यांचा आपणांवर रोष होईल, व त्याचें

अत्यंत अनिष्ट परिणाम आपणास भोगावे लागतील, अशी तुळाजीस इकडे भीति होती; आणि हैदरअल्ली आपल्या कसलेल्या सैन्यानिशीं आपणासमोर उभा आहे, त्याच्याशी सामना देण्यास आपण अगदींच असमर्थ आहों, आपले स्नेही इंग्रज व महंमदअल्ली हे दूर आहेत, हैदरअल्ली प्रत्यक्ष समोर उभा आहे, आणि त्यास खंडणी देऊन वाटेस लावला नाहीं, तर तो खंडणी तर सक्तीनें वसूल करीलच, पण खुद्द तंजावर शहराची व राज्यांतील प्रदेशाची खात्रीनें पूर्ण धूळधाण उडवील, अशी तुळाजीस तिकडे भीति होती. अशा संकटप्रद स्थितींत दुर्बल व परस्वाधीन तुळाजीस, हैदरअल्लीला खंडणी देण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. त्यामुळें त्यानें हैदरअल्लीस चार लाख रुपये रोख, व पांच हत्ती नजर देऊन वाटेस लाविले. परंतु यामुळेंच महंमदअल्ली तुळाजीवर अतीशय रागावला. तंजावरवर स्वारी करण्याला त्याला ही योग्य संधि व सबब मिळाली; आणि त्यानें तंजावरवर चाल करून जाण्याला इंग्रजांची मदत मागितली. मद्रासच्या गव्हर्नरनें महंमदअल्लीच्या ह्या राजकारस्थानास प्रथम पाठबळ दिलें नाहीं. परंतु इंग्रज व महंमदअल्ली यांच्यामध्यें बराच पत्रव्यवहार झाल्यानंतर, महंमदअल्लीच्या इच्छेप्रमाणें तंजावरवर उभयतांनीं मिळून स्वारी करावी, असें ठरलें. तथापि तंजावरकराशीं एकदम युद्ध सुरू न करितां महंमदअल्लीचा मुलगा उमदत-उल्-उमराव यांस सर्व अधिकार देऊन तुळाजी राजे यांजकडे बोलणें करण्याकरितां पाठविण्यांत आलें; व त्यानें तुळाजीपुढें कांहीं अटी मांडिल्या. पण त्या तुळाजीनें अमान्य केल्या. तेव्हां मद्रासकरांनीं नबाबाच्या सैन्यास मदत म्हणून, जनरल स्मिथ याच्याबरोबर बरेंच सैन्य देऊन त्याची तंजावर प्रांतावर, रवानगी केली. त्याप्रमाणें तिकडे जातांना, तंजावरकरांच्या ताब्यांत असलेला, मार्गांतील बलमचा किल्ला हस्तगत करून घेऊन, ( इ० सन १७७१; सप्तेंबर महिन्यांत ) तंजावर येथें येऊन त्यानें तेथील किल्ल्यास वेढा दिला, व उभय पक्षांमध्यें मोठेंच हातघाईचें युद्ध झालें. तंजावरच्या सैन्यानेंही या युद्धांत आपलें चांगलेंच शौर्य व्यक्त केलें. परंतु तंजावरकराचा पक्ष मूळचाच कमजोर व असाहाय्य असल्यामुळें, तंजावरचा किल्ला शत्रूपक्षाच्या हस्तगत होणाच्या अगदीं बेतांत आला; व आतां किल्ला हस्तगत होणार तोंच तंजावरच्या राजानें नबाबाचा

मुलगा उमदत-उल्-उमराव याच्याकडे तहाचें बोलणें लाविलें, व तें नबाबाच्या मुलानें मान्य करून, तुळाजीशीं तह केला. त्यांत, तुळाजीनें नाइलाजानें ज्या अटी मान्य केल्या, त्या खालीं लिहिल्याप्रमाणें:—

(१) तंजावरच्या राजानें, पेषकशीबद्दल नबाबास दोन वर्षांची बाकी आठ लाख रुपये, आणि लढाईच्या खर्चाबद्दल साडेबत्तीस लाख रुपये, मिळून साडेचाळीस लाख रुपये रोख द्यावें.

(२) तंजावरच्या राजानें, नबाबास मदत लागेल त्या त्या वेळीं स्वतःच्या खर्चानें आपलें सैन्य त्याच्या मदतीस पाठवीत जावें.

(३) तंजावरच्या राजानें, मरवरच्या राजाकडून हनुमंत गडी या नांवाचा जो प्रांत घेतला आहे, तो त्यास परत द्यावा.

(४) तंजावरच्या राजानें, अरणीची जहागीर व त्रिचनापल्ली प्रांतांतील कांहीं गांवें यांजवरील आपला हक्क सोडावा.

(५) तंजावरच्या राजानें, लढाईच्या खर्चाबद्दल द्यावयाचा ठरलेला साडेबत्तीस लाख रुपयांचा भरणा रोख केला नाहीं, तर त्यानें मायावरम् हा सुभा+ व कुंभकोणम् या सुभ्यांतील कांहीं प्रदेश, या रकमेच्या फेडीसाठीं नबाबाच्या स्वाधीन करावा.

(६) तंजावरचा राजा व अर्काटचा नबाब या उभयतांनीं परस्परांचे शत्रु व परस्परांचे मित्र ते परस्परांनीं शत्रु व मित्र समजावें.

(७) अर्काटच्या नबाबानें, बलम्चा किल्ला, येलंगाड्ड व कोइलाडी, हीं ठिकाणें तंजावरच्या राजास परत द्यावीं.

वरील तहांत,—नबाबानें आपला फायदा करून घेण्यासाठीं इंग्रजांची मदत घेतली असूनही, व इंग्रजांमुळेंच नबाब विजयी होऊन त्याला हें संपत्ति-

---

+ मायावरम् हें शहर तंजावर जिल्ह्यांत तालुक्याचें ठिकाण, व रेलवे स्टेशन असून तें कावेरीनदीच्या कांठीं कुंभकोणम्पासून १९ मैलांवर आहे. व कुंभकोणम् हें तंजावरपासून २४ मैलांवर आहे. म्हणजे मायावरम् हें शहर तंजावरपासून अजमासें ४३ मैलांवर आहे.

चें घबाड मिळालें असूनही–इंग्रजांचा कोठेंही उल्लेख न करितां नबाबानें त्यांना अगदींच वगळून टाकिलें; आणि इ० सन १७६२ च्या तहाअन्वयें कर्नाटककर नबाब व तंजावरकर राजे यांच्यामधील, " इंग्रज हे मध्यस्थ " असें ठरलें होतें. परंतु ह्या इ० सन १७७१ च्या तहानें, नबाबानें, इंग्रजांस न कळवितां परभारेंच ही इंग्रजांची मध्यस्थी काढून टाकून तंजावरच्या राजाला पूर्णपणें आपल्या अंकित करून घेतलें. शिवाय, नबाबाच्या मुलानें गुप्त रीतीनें स्वतःसाठीं व स्वतःच्या भावासाठीं ७ लाख रुपयांचा नजराणा वेगळा ठरवून घेतला, आणि ७७ हजार रुपये पेषकशीच्या बाकीवरील व्याज घेण्याचें ठरविलें; म्हणजे तंजावरकर तुळाजीराजे यांच्याकडून एकंदर ४८ लक्ष, २७ हजार रुपये घेण्याचा ठराव करून त्यांपैकीं ३ लाख रुपये रोख घेतले. नबाबाची ही स्वार्थपरायणता पुढें उघडकीस येऊन जरी तिचे परिणाम त्याला भावी काळांत भोगावे लागले, तरी तीच नबाबाची स्वार्थ-परायणता वर्तमानकाळांतच तुळाजी राजास अतिशय भोंवली. राजानें मराठ्यांचें साह्य मिळविण्याकरितां त्यांच्याशीं पत्रव्यवहार केला, ही गोष्ट इंग्रजांना आवडली नाहीं. त्यामुळें इंग्रजांना राजाचा अतिशय राग आला. राजानें महंमदअल्लीची तुंबडी भरण्यासाठीं, व लढाईच्या खर्चाची तोंडमिळ-वणी करण्यासाठीं,आपल्या ताब्यांतील नागोर बंदर व इतर कांहीं प्रांत डच लोकां-जवळ गहाण ठेवून कर्ज घेतलें, ही गोष्ट इंग्रजांना पसंत पडली नाहीं. त्यामुळें त्यांच्या रागांत भर पडली व अशा स्थितींत तंजावरचें संस्थान कायम ठेविलें तर त्यापासून कदाचित परक्या युरोपियन राष्ट्रांस त्या राज्यांत प्रवेश करण्यास संधि मिळून एखाद्या वेळीं अनिष्ट परिणाम घडून येईल, अशी त्यांना भीति वाटली; आणि इंग्रजांच्या वर्चस्वाखालीं आलेल्या कोणत्याही एतद्देशीय राज्य-कर्त्यानें, "इंग्रजांशिवाय, अथवा इंग्रजांच्या परवानगीशिवाय इतर कोणत्याही युरोपियन राष्ट्राशीं, कोणत्याही प्रकारचा बिलकुल संबंध ठेवूं नये." हें जें हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या राजनीतीचें आद्यतत्त्व, त्याच तत्त्वाविरुद्ध तुळाजी-राजे वागला, डच लोकांशीं व्यवहार केला, हा त्याचा अक्षम्य अपराध आहे, असें त्यांना वाटलें. तंजावरकराबरोबरील इंग्रजांचा संबंध "मध्यस्थ" या नात्याचा होता; आणि "तंजावरचें राज्य तेथील राजाकडे चालावें" अशा-

बद्दल इंग्रजांनीं हमी घेतलेली होती; परंतु "तंजावरच्या राजानें इंग्रजांशिवाय अथवा इंग्रजांच्या परवानगीशिवाय इतर कोणत्याही युरोपियन राष्ट्राशीं कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा सांपत्तिक संबंध ठेवूं नये" असा इंग्रजांबरोबर त्याचा तह झालेला नव्हता अथवा इंग्रजांनींही त्यास या अटीनें बांधून घेतलेलें नव्हतें. त्यामुळें, "तंजावरकरांनीं हच लोकांशीं व्यवहार केला." या सबबीवर इंग्रजांना तुळाजीराजाचें पारिपत्य करतां येणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांनीं "तंजावरच्या राजाकडे खंडणीची मागील बाकी तुंबली" हें निमित्त काढून तंजावरवर सैन्य पाठवून, तंजावरचें राज्य हस्तगत करावें, असें ठरविलें; व त्याप्रमाणें इंग्रज व महंमदअल्ली या उभयतांनीं मिळून तंजावरवर स्वारी केली. त्यांच्याशीं युद्ध करण्यास तुळाजी राजा अजमासें २० हजार सैन्य घेऊन पुढें आला. इंग्रज जनरल मि. स्मिथ यानें तंजावरच्या किल्ल्यावर मारा चालविला. तुळाजीराजानें मोठ्या धैर्यानें किल्ल्याचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ होऊन जनरल स्मिथ यानें तंजावरचा किल्ला हस्तगत करून घेतला, व त्यावर लागलीच इंग्रजांचें निशाण फडकूं लागलें ( ता. १७ सप्टेंबर, इ. सन १७७३ ). तुळाजीराजा व त्याचें कुटुंब इंग्रजांच्या हातीं सांपडलें. जनरल स्मिथ यानें त्यांना लागलीच अटक करून कैदेंत ठेविलें. तंजावरचा प्रांत अर्काटचा नबाब महंमदअल्ली याच्या स्वाधीन केला; व अशा रीतीनें अर्काटकर महंमदअल्ली व मद्रासकर इंग्रज ह्यांची मनीषा तृप्त होऊन, तंजावर संस्थान कांहीं दिवस लुप्तप्राय झालें.

तंजावरच्या या हतभागी राज्यासंबंधीं, व तेथील दुर्दैवी राज्यकर्त्यांसंबंधीं त्या काळांतील दुःखद हकीकत अगदीं थोडक्यांत वर्णन करावयाची म्हणजे ती अशी आहे कीं, तंजावरचा राजा हा इंग्रज व महंमदअल्ली यांच्या पक्षाचा असल्यामुळें, मुरारराव घोरपडे, फ्रेंच व चंदासाहेब यांनीं तंजावरच्या राज्याचें अतीशय नुकसान केलें; आणि "तंजावरच्या* राजांनीं इंग्लिशांची

---

*"Notwithstanding all these sacrifices made by the Tanjore Rajas in helping the cause of the English, the Nabab Mahomed Ali cherished a grudge against Tanjore, which was noted for its riches, and the interposition of the English alone succeeded in 1762 in establishing an

बाजू घेतल्यामुळें जरी त्यांनीं आपलें अशा प्रकारें इतकें नुकसान जरून घेतलें, तरी त्यास आलेला शह अजूनपर्यंत तसाच कायम राहिला. तंजावर येथें विपुल संपत्ति आहे, अशी ख्याती असल्यामुळें, नबाब महंमदअल्ली यानें तंजावरवर सारखी नजर ठेविली होती व तो कांहीं तरी निमित्त काढून तंजावरच्या राजाबरोबर तंटा उपस्थित करीत होता. शेवटीं इ० सन १७६२ मध्यें, इंग्लिशांच्या मध्यस्थीनें हा तंटा मिटला. त्यांत, तंजावरचा राजा, हा नबाबाचा मांडलीक आहे, त्यानें नबाबास चार लक्ष रुपये (दरसाल) खंडणी देत जावी व त्याबद्दल इंग्रजांनीं जामीन राहावें, असें ठरलें. त्या-

---

understanding by which the Raja became a tributary of the Nabab, with an English guarantee, and agreed to pay four lakhs as tribute. Later on, in 1771 the Nabab secured the help of the Madras Government in attacking Tulsaji, the son of Pratapsing, and Tulsaji had to sue for peace which involved him and his State in heavy money liabilities, and curtailed still more the resources of the Tanjore State. In this second treaty the interests of the Raja of Tanjore were completely sacrificed to the greed of Mahomed Ali, and his English creditors, who dictated the policy of the Madras Government. The guarantee of 1762, by which the English had undertaken to be responsible for the autonomy of Tanjore, was thrown to the winds. In 1773, further acts of spoilation were renewed by the Nabab with the help of his English allies, and the Raja was taken prisoner, his city was captured and the territory was annexed by the Nabab to his own kingdom. All these acts of spoilation and breach of faith had been undertaken by the Madras Government on their own responsibility, and in the interests of the Fnglish creditors of the Nabab."

"Rise of the Maratha Power"
Page 250–251.

नंतर इ० सन १७७१ मध्यें नबाबानें मद्रासकर इंग्रजांची मदत घेऊन प्रतापसिंहाचा मुलगा तुळसाजी याजवर हल्ला केला. तुळसाजीस तह करणें भाग पडलें. या तहानें तुळसाजीला व त्याच्या संस्थानालाही अत्यंत कर्ज होऊन, तंजावर संस्थानाच्या उत्पन्नाच्या पुष्कळ बाबीही कमी झाल्या. ह्या दुसऱ्या तहांत तंजावरच्या राजाचे सर्व हितसंबंध, महंमदअल्ली व त्याचे इंग्लिश सावकार, यांच्या लोभास बळी द्यावे लागले; हे सावकार सांगतील त्याप्रमाणें मद्राससरकार चालत असे. इंग्लिशांनीं दिलेलीं वचनें पाळलींच पाहिजेत, असा निर्बंध राहिला नाहीं. "तंजावरचें राज्य तेथील राजाकडे चालावें." अशाबद्दल इंग्लिशांनीं इ० सन १७६२ मध्यें जी हमी घेतली होती, तीस त्यांनीं धाब्यावर बसविलें. त्यानंतर, इ० सन १७७३ मध्यें महंमदअल्लीनें इंग्लिशांची मदत घेऊन पुन्हा लुटालूट करण्यास प्रारंभ केला. राजास कैद केलें, त्याचें शहर (तंजावर) हस्तगत करून घेतलें व तंजावरचा सर्व प्रांत नबाबानें खालसा करून तो आपल्या राज्यास जोडिला. "हे लुग्गालुटीचे व विश्वासघाताचे सर्व प्रकार मद्राससरकारनें आपल्या जबाबदारीवर, व महंमदअल्लीच्या इंग्लिश सावकारांच्या फायद्यासाठीं सुरू केले होते;" इंग्लंडमधील "कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स" यांना ह्या गोष्टीची मुळींच बातमी नव्हती; परंतु त्यांना जेव्हां वरील अन्यायाची हकीगत समजली तेव्हां त्यांनीं ह्या वर्तणुकीबद्दल मद्राससरकारचा मोठ्या जोरानें निषेध केला. अर्काटचा नबाब व तंजावरचा राजा यांच्यामधील भांडणांत फाजील मन घालून ती गोष्ट इतक्या विकोपास नेली, याबद्दल त्यांनीं मद्राससरकारची चांगलीच कानउघाडणी केली. मद्रासचा गव्हर्नर व मद्रास कौन्सिलचा प्रेसिडेंट मि. विंच याजवर अप्रयोजकपणाचें व अन्यायाचें कृत्य केल्याचा दोष ठेवून त्यास कामावरून दूर करून परत बोलावून घेतलें. लॉर्ड पिगट यांस मद्रासचा गव्हर्नर व तेथील कौन्सिलचा प्रेसिडेंट नेमून त्याची इकडे रवानगी केली. तंजावरच्या राजास बंधमुक्त करून त्यास पुन्हा गादीवर बसवावें, असा ठराव केला व तसा मद्राससरकारास त्यांनीं हुकूम पाठविला. त्याप्रमाणें लार्ड पिगट यानें तुळाजी राजे यांस ता० ११ एप्रिल इ० सन १७७६ रोजीं मोठ्या समारंभानें पुन्हा तंजावरच्या गादीवर बसाविलें व

त्याच्याशीं एक तह केला.* या तहांत, "तंजावरचा किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत राहावा, त्याच्या संरक्षणाकरितां इंग्रजी सैन्य तंजावर येथें कायमचें राहावें, त्या सैन्याच्या खर्चासाठीं, तंजावरच्या राजानें दरसाल १४ लक्ष रुपये इंग्रजांस देत जावें, व त्याशिवाय पूर्वीप्रमाणेंच, अर्काटकर नबाबास दरसाल ४ लक्ष रुपये खंडणी देत जावी" असें ठरलें. अशा रीतीनें या तंजावरच्या राज्याचा पुनर्जन्म होऊन, तें पुढें कांहीं काळ जिवंत राहिलें.

तंजावरचा राज्यकर्ता तुळाजी हा पदभ्रष्ट होऊन त्यास इंग्रजांनीं कैद केलें (ता० १७ सप्टेंबर, इ० सन १७७३), त्या दिवसापासून त्यास इंग्रजांनीं पुन्हा गादीवर बसविलें. त्या वेळेपर्यंत (ता० ११ एप्रिल इ० सन १७७६), तंजावरचा प्रांत महंमदअल्लीच्या ताब्यांत होता. त्या सरासरी तीन वर्षांच्या अवधींत त्यानें तंजावरच्या प्रजेवर अतिशय जबरदस्ती व जुलूम करून तिला पिळून काढिलें व त्या संपन्न प्रांताची त्यानें इतकी धुळधाण करून टाकिली कीं, त्या हतभागी संस्थानाचें पूर्वीचें वैभव त्यास अल्पांशानेंही प्राप्त होण्यास दहा वर्षें लागलीं. परंतु तंजावरचें राज्य पुन्हा जिवंत होऊन, तंजावरच्या गादीवर तुळाजीची पुन्हा स्थापना होऊन कांहींशीं स्थिरस्थावर होते न होते—आणि युद्धें व नबाबाचा स्वार्थी व पिळून काढणारा अंमल, या मुळें विपन्नावस्थेंत आलेली तंजावरची दुर्दैवी प्रजा नुकतीच कोठें आतां थोडीशी सांवरून, ती सुखानें नांदू लागते न लागते—तोंच म्हैसूरचा हैदरअल्ली नाईक व इंग्रज यांच्यामध्यें, युद्ध सुरू

---

* या प्रसंगाची सविस्तर हकीकत, कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स यांच्या हुकमावरून प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांत नमूद केलेली असून, ती फार मनोरंजक व महत्वाची आहे; परंतु स्थलाभावामुळें, व या परिशिष्टांत तंजावरच्या राज्याची माहिती त्रोटक द्यावयाची असल्यामुळें, तिचा या ठिकाणीं, अधिक समावेश केला नाहीं; ह्या तंजावर प्रकरणांतील उपरीनिर्दिष्ट सर्व कागदपत्र "Rou's Restoration of the King of Tanjore" ह्या ग्रंथांत नमूद आहेत. ज्यांस ते वाचण्याची इच्छा असेल, त्यांनीं तो ग्रंथ पाहावा.

झालें आणि इ० सन १७८० च्या जुलई महिन्यांत हैदरअली हा आपल्या ८० हजार सैन्यासह म्हैसूरच्या डोंगरांतून निघून कर्नाटकाच्या सपाट, सुपीक व संपन्न प्रदेशावर एखाद्या जंगी तुफानाप्रमाणें येऊन कोसळला. आणि तंजावरकर हे इंग्रजांचे स्नेही, त्यामुळें हैदरअलीचे शत्रु असल्यानें, त्यानें तंजावरच्या राज्यांत आपलें थोडेंसें सैन्य ठेवून मोठाच धुमाकूळ उडविला व त्याच्या घोडेस्वारांच्या सैन्यानें थेट मद्रासच्या सिमेपर्यंत कर्नाटक प्रांत उध्वस्त करून टाकिला. ही हकीकत ब्रिटिश हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल वारन् हेस्टिंग्ट्स यास कळल्यावर त्यानें सर आयर कूट, याजबरोबर सैन्य देऊन त्यास कलकत्ता येथून तावडतोब हैदरअलीवर रवाना केलें व कलकत्तेकराच्या हुकुमाप्रमाणें कूट यानें हैदरअलीस पोर्टोनोव्हो येथें गांठून त्याचा पूर्ण पराजय केला; तेव्हां हैदरचें सैन्य तंजावर येथून निघून गेलें. त्यानंतर लवकरच [ इ० सन १७८२ मध्यें हैदरअली मृत्यु पावला व त्या वेळेपासून तंजावर संस्थान म्हैसूरकर वगैरे शत्रूंच्या त्रासापासून मुक्त झालें.

तुळाजी राजे हे इ. सन १७८७ मध्यें मृत्यु पावले. त्यांस मोहनाबाई, राजसबाई व राजकुंवरबाई अशा तीन बायका होत्या; त्यांपैकीं पहिली मोहनाबाई ही इ. सन १७७६ मध्यें मृत्यु पावली व दुसऱ्या दोघींस पुत्रसंतान झालें नाहीं, सबब तुळाजीनें सुलक्षणाबाई व मोहनाबाई, अशा दोन नवीन बायका केल्या. त्यांपैकीं मोहनाबाईपासून त्यास एक मुलगा झाला, परंतु तो सहा वर्षांचा होऊन मृत्यु पावला. अशा प्रकारें, तुळाजीराजे यांस पुत्र होऊनही शेवटीं पुत्रसंतति नसल्यानें, त्यानें एक मुलगा दत्तक घेतला होता. तुळाजी मृत्यु पावला, त्या वेळीं तंजावर संस्थानची स्थिति खालावलेली होती व अनेक संकटपरंपरा अनुभवीत अकरा वर्षें राज्य करून तुळाजी मृत्यु पावला होता. "तंजावर-बालकाचा महाराष्ट्र-मातेपासून वियोग झालेला होताच. इंग्रज व हैदरअली यांच्या कचाट्यांत तंजावर सांपडलेलें होतेंच; त्याला मराठ्यांच्या स्वाऱ्यांपासून, अथवा त्यांनीं हैदरवर मिळविलेल्या विजयापासून कांहींच मदत झाली नव्हती. ह्या वीस वर्षांत त्याची भयंकर दुर्दशा उडाली व टिपू लढाईंत पडल्यानंतर दक्षिण हिंदुस्थानांत जरी शांतता झाली, तरी तंजावरची कुदशा कधींही संपलीच नव्हती; आणि बुडत्याचा पाय खोलांत

म्हणतात त्याप्रमाणें तंजावरच्या राज्यांत, ( राज्यप्राप्तीकरितां ) आपआपसांत कलहही चाललेच होतें." तुळाजीच्या मृत्यूनंतर त्याचा सावत्र भाऊ अमरसिंह उर्फ अमरासिंग हा गादीवर आला, तरीसुद्धां हे कलह तसेच पुढें चालू राहिले होते. याचा परिणाम स्वाभाविकरित्याच तंजावरच्या संस्थानावर अत्यंत अनिष्ट असाच झाला आणि आधींच खालावलेल्या त्या संस्थानाची विशेषच विपन्नावस्था झाली.

तुळाजी राजे इ. सन १७८७ मध्यें मृत्यु पावले. त्यापूर्वी त्यानें भोंसल्यांचे मूळ पुरुष मालोजी राजे, यांचा बंधु विठोजीराजे याच्या वंशांतील, सुभानजीचा नातू व शहाजीचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव सरफोजी असें ठेवून, त्यास तंजावरच्या गादीचा वारस केलें. तंजावर येथील ब्रिटिश रेसिडेंट मि. मॅक्लोड व तेथील डॅनिश मिशनरी मि. स्वार्त्झ यांच्या संमतीनें तुळाजीनें हें दत्तविधान करून, त्यास आपल्यामागें तंजावरच्या गादीचा अधिपति करावे, अशी मि. मॅक्लोड याच्यामार्फत व्यवस्था केली. रे. स्वार्त्झ यानें त्या मुलाचें ( या वेळीं तो नऊ वर्षांचा होता. ) पालग्रहण करावें, असें ठरविलें व त्यानंतर तुळाजी राजे यानें इहलोकीची जीवनयात्रा समाप्त केली.

तुळाजीराजे मृत्यु पावल्याचें वर्तमान अमरसिंह यांस समजतांच तो तावडतोब तंजावर येथे आला. तुळाजीराजे याची उत्तरक्रिया केली; सरफोजीस आपल्या ताब्यांत घेतलें, आणि लागलीच मद्रास येथील गव्हर्नर सर आर्चिबाल्ड कॅम्बेल याच्याशीं पत्रव्यवहार करून, "तंजावरच्या गादीचे आपणच खरे वारस आहोंत, आणि सरफोजांचें दत्तविधान अशास्त्र आहे." असें सिद्ध करून देतों, असें त्यास कळविलें. तेव्हां या बाबतीची चौकशी करण्याकरितां कॅम्बेल हा स्वतः तंजावर येथें गेला, चौकशी केली. कांहीं विद्वान् पंडितांच्या साक्षी घेतल्या. सरफोजीचा तंजावरच्या गादीवर हक्क नाहीं, असें ठरविलें. अमरसिंह यांस तंजावरच्या गादीचा वारस ठरवून, त्यास तंजावरच्या गादीवर बसविण्याचा ठराव केला, आणि ता. १० एप्रिल इ. सन १७८७ रोजीं इंग्रजांनीं त्याच्याबरोबर तह करून त्यास तंजावरच्या राज्यावर बसविलें. हा तह फार महत्त्वाचा असून त्या योगानें, तंजावरचें राज्य बहुतेक ईस्ट

इंडिया कंपनीच्या ताब्यांत आलें. या तहांतील मुख्य कलमें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

(१) तंजावरकर व इंग्रज या उभयतांनीं परस्परांचे शत्रु व मित्र यांना शत्रु व मित्र समजावें.

(२) तंजावरच्या राजानें दरसाल चार लक्ष होन, (Star Pagodas) म्हणजे चवदा लक्ष रुपये, तंजावरच्या संरक्षणार्थ ठेविलेल्या इंग्रजी सैन्याच्या खर्चासाठीं किस्तबंदीनें देत जावे.

(३) सदरहू चार लाख होनांचा रक्कम, तंजावरचा वार्षिक वसूल दहा लाख होन [ पस्तीस लक्ष रुपये ] होईल, असें सरासरीचें प्रमाण घेऊन ठरविली आहे. तथापि वसुलाचें प्रमाण अधिक वाढलें तर त्या मानानें ही खर्चाची रक्कम अधिक देत जावी.

(४) चार लाख होनांची ठरलेली हप्तेबंदीची रक्कम देण्यांत, तंजावरच्या राजाकडून कसूर झाली तर कंपनीनें तंजावर प्रांतांत प्रवेश करून आपल्या अधिकारानें ही रक्कम वसूल करून घ्यावी.

(५) अशा प्रसंगीं तंजावरच्या राजाचे अधिकारी व अंमलदार लोक हे कंपनीच्या इच्छेप्रमाणें वागून कंपनीचा वसूल सुरळीत करून देतीलच; परंतु त्यांत जर त्यांनीं हयगय केली, तर कंपनीनें त्यांना कामावरून बडतर्फ करून, त्यांच्या जागीं दुसरे लोक नेमावे.

(६) कलम ४ व ५ प्रमाणें हप्तेबंदीच्या वसुलासाठीं ज्या ज्या वेळीं, तंजावरच्या राज्यांत कंपनीस आपला अधिकार चालविण्याची गरज पडेल, त्या त्या वेळीं, तो अधिकार चालवितांना तंजावरच्या राजाच्या राज्यव्यवस्थेंत किंवा राजकीय मानमरातबांत ढवळाढवळ केली जाणार नाहीं.

(७) कर्नाटक प्रांतामध्यें, किंवा तंजावर संस्थानांत किंवा कारोमांडल किनाऱ्यावर युद्ध सुरू झालें तर त्याबद्दलची सर्व जबाबदारी कंपनीवर राहील, व युद्ध चालू असेंपर्यंत कर्नाटकांतील वसुलाचा $\frac{४}{५}$ भाग कंपनी प्रतिवर्षी लष्करी खर्चाकडे देईल; व त्याप्रमाणेंच तंजावरच्या राजानेंही आपल्या राज्याच्या वसुलाचा $\frac{४}{५}$ भाग प्रतिवर्षी कंपनीस देत जावा.

(८) तंजावरच्या राजाकडे कर्नाटकच्या नवाबाच्या पेषकशीबद्दलची

मागील बाकी, इ० सन १७७६ पासून इ०सन १७८७ पर्यंत १२५७१४२ होन ( ४३९९९९७ रुपये ) निघत आहे; त्याप्रमाणें ब्रिटिश प्रजेच्या देण्याची बाकी चार लाख रुपये निघत आहे; त्याबद्दल दरसाल तीन लाख होन ( १०५०००० रुपये ) नवाब व सावकार यांना देण्यांत येतील व त्याबद्दलची सर्व जबाबदारी कंपनी आपणांकडे घेईल.

राजे अमरसिंह हा इंग्रजावरोबर उपरीनिर्दिष्ट तह करून, तंजावरच्या गादीवर स्थापन झाला; परंतु या तहामुळें, आपलें स्वातंत्र्य, आपली सत्ता, व सांपत्तिक सुस्थिति बहुतेक संपुष्टांत आली, ह्या गोष्टींची त्याला लवकरच जाणीव झाली आणि त्यानें पेशव्यांकडे आपले वकील व मुत्सद्दी पाठवून, पेशव्यांमार्फत इंग्रजांकडे मध्यस्थी करून इ० सन १७८७ च्या या तहानें तंजावर संस्थानावर बसलेल्या जबर खंडणीचा व इतर कडक अटींचा निर्बंध कमी व्हावा, म्हणून प्रयत्न केला; इतक्यांत, याच वर्षी ( इ० सन १७८७ ) इंग्रजांचा शत्रु असलेला म्हैसूरकर टिपू सुलतान यानें कान्स्टांटि-नोपल येथील सुलतानाकडे आपला एक वकील पाठविला; त्याचें तेथील सुलतानानें मोठ्या भपक्याचें आगतस्वागत केलें. याच वर्षी फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यामधील संबंधांची उघड उघड ओढाताण चालली होती. याच समयास पारीस येथें तेथील राज्यकर्ता सोळावा लुई यानेंही टिपूच्या वकिलाचें सन्मानपूर्वक आदरातिथ्य केलें व त्यानंतर लवकरच हिंदुस्थानांत टिपू व इंग्रज यांच्यामध्यें युद्ध सुरू झालें. तेव्हां कर्नाटक प्रांतावर, व विशे-षतः इंग्रजांचा आश्रित दोस्त तंजावरकर अमरसिंह याच्यावर मोहीम करून ( इ० सन १७९०-९१ ) त्यास पुष्कळ उपद्रव दिला; इंग्रजांनीं इ० सन १७८७ च्या तहाअन्वयें तंजावरच्या राजाचें परशत्रूपासून संरक्षण कर-ण्याची हमी घेतलेली होती; त्याप्रमाणें त्यांनीं तंजावरच्या राज्यावरील टिपूच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; पण त्याबरोबरच, त्या मुदतींत तंजावरच्या राज्याचा वसूलही त्यांनीं आयत्या मुखत्यारीनें करून घेतला. ही गोष्ट अमरसिंहास न आवडून त्याबद्दलही त्यानें पेशव्यांकडे पत्र-व्यवहार केला; शिवाय कलकत्तेकरांकडेही त्यानें मोठा मुद्देसूद पत्रव्यवहार करून, आपल्या म्हणण्याचें समर्थन सयुक्तिक रीतीनें केलें. थोडक्यांत म्हणजे

इ० सन १७८७ च्या तहांतील जबर खंडणी व इतर कडक अटी कमी करून घेण्याचा अमरसिंहानें भगीरथ प्रयत्न केला व अखेरीस नाना फडणीस, महादजी शिंदे, वगैरे मुत्सद्द्यांकडून शिफारशी व खटपटी करवून त्यानें इ० सन १७८७ चा तह अखेर रद्द करविला आणि ता. ११ जून इ० सन १७९२ रोजीं, इंग्रजांनीं अमरसिंहाबरोबर नवीन तह केला. या तहांत मद्रासचा गव्हर्नर सर चार्ल्स ओकले, यानें, " इ० सन १७८७ च्या तहाप्रमाणें खंडणीचा, व इतर पैसा देण्याची तंजावर संस्थानास ऐपत नसून, त्या संस्थानावर लादलेल्या मागण्या फारच जबर आहेत; " असें कबूल केलें. आणि " सबब या नवीन तहाप्रमाणें खंडणीच्या रकमेंत फेरफार करावा " असें ठरविलें. तो फेरफार खालीं लिहिल्या प्रमाणें:—

[१] पहिलीं तीन वर्षेंपर्यंत, शांततेच्या काळांतील खंडणी, " साडे तीन लक्ष होन" ( १२,२५,००० रुपये ) प्रमाणें तंजावरच्या राजानें इंग्रजांस द्यावी.

[२] पेषकशीच्या मागील बाकीबद्दल पन्नास हजार होन, [१७५००० रुपये] द्यावेत, आणि खाजगी खर्चाबद्दल साठ हजार होन [२,१०,००० रुपये] द्यावेत; म्हणजे पूर्वीच्या तहाप्रमाणें जेथें २४,५०,२१२ रुपये ही देण्याची रक्कम ठरली होती. तेथें या तहाअन्वयें यापुढें १६,००,००० रुपये दरसाल तंजावरच्या राजानें इंग्रजांस द्यावे.

[३] पहिलीं तीन वर्षें संपल्यावर त्यानंतर चालू पेषकशीबद्दल, तंजावरच्या राजानें इंग्रजांस, १,१४,२८५ होन (३९,९९७-८-०) इंग्रजांस अधिक द्यावेत.

[४] तंजावरच्या राजाकडून खंडणीचा हप्ता वेळेवर दिला गेला नाहीं, तर कंपनीनें तंजावर संस्थानाच्या चार सुभ्यांची व्यवस्था आपल्या हातीं घेऊन खंडणीचा हप्ता वसूल करून घ्यावा.

[५] माजी तुळजाराजे यांच्या विधवा राण्यांकरितां तीन हजार होन [साडे दहा हजार रुपये] व त्याचा दत्तकपुत्र सरफोजी, याच्या खर्चासाठीं अकरा हजार होन [ अडतीस हजार पांचशें रुपये ] दरसाल कंपनीस देत जावें.

वरील तहानंतर, राजे अमरसिंह यानें, या तहांतही भासणाऱ्या अडचणी-

संबंधीं पुन्हा कलकत्तेकरांशीं पत्रव्यवहार केला व कलकत्तेकरांस लिहिलेल्या पत्राची नक्कल नाना फडणवीस यांजकडे पाठवून, त्यांच्यामार्फत महादजी शिंदे यांच्याकडे संधान लाविलें, व कलकत्तेकराकडून आणखी कांहीं सवलती मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु अमरसिंहाच्या या प्रयत्नास यश न येतां, इ० सन १७९२ चाच तह कायम राहिला.

अमरसिंह गादीवर आला त्या वेळीं तुळाजीराजे याचा दत्तक मुलगा सरफोजी हा नऊ वर्षांचा होता व त्यास मद्राससरकारानें अमरसिंहराजे यांच्या संरक्षणाखालीं ठेविलें होतें; परंतु त्यानें, तुळाजीराजे यांच्या राण्या व सरफोजी यांना चांगल्या प्रकारें वागविलें नाहीं, त्यामुळें तंजावरच्या राजघराण्यांत पुन्हा गृहकलह सुरू झाला. तुळाजीराजे यांनीं, कालवश होण्यापूर्वीं, आपला अज्ञान दत्तक मुलगा सरफोजी याचा हात मि. स्वार्झ याच्या हातांत देऊन त्यास या मुलाचें पालन करण्यास सांगितलें होतें, आणि त्या मृत राजाच्या शेवटच्या इच्छेस मान देऊन मि. स्वार्झ यानें ती जबाबदारी आपल्या शिरावर घेतली होती. मि. स्वार्झ व सरफोजी यांचा संबंध प्रेमळ गुरुशिष्य या नात्याचा होता. मि. स्वार्झ हा एक मोठा सन्मान्य मिशनरी असून, त्याची दानत, त्याची विद्वता, त्याची परोपकारबुद्धि आणि त्याची सत्यप्रियता वगैरे त्याच्या प्रशंसनीय गुणांमुळें त्याचें वजन व योग्यता त्या वेळीं कंपनीसरकारांत व एतद्देशीय लोकांत विशेषच वृद्धिंगत झालेली होती. माजी तुळाजीराजे यांची त्याच्या ठिकाणीं अतिशय पूज्यभक्ति होती. त्यानें मि. स्वार्झ यांस राहण्याकरितां आपला एक बाग दिलेला होता. सरफोजीवर त्याचें पुत्राप्रमाणें प्रेम होतें व सरफोजीसही त्यांचाच पूर्ण आधार असून मि. स्वार्झबद्दल त्याच्या मनांत अतिशय पूज्यबुद्धि वसत होती. अर्थात् तुळाजीच्या मृत्यूनंतर सरफोजीच्या सुखदुःखाची, नफा नुकसानीची, कल्याणअकल्याणाची सर्व जबाबदारी मि. स्वार्झ यांच्यावरच येऊन पडली होती. त्यामुळें, त्यानें इ. सन १७९३ मध्यें " सरफोजीस व त्याच्या मातोश्रीस अमरसिंहराजे चांगल्या प्रकारें वागवीत नाहींत." अशी मद्राससरकारांकडे तक्रार केली; तेव्हां त्यांनीं त्या उभयतांना मद्रास येथें नेऊन ठेविलें. व तेथें रे. जेरिक, या नांवाच्या एका पाद्री गृह-

स्थाची, सरफोजीस शिक्षण देण्यासाठीं, योजना केली. नंतर मद्रास येथूनच सरफोजीच्या आईनें मि. स्वार्त्झ याच्या मदतीनें व पाठबळानें, " तंजावरच्या गादीवर आपला मुलगा सरफोजी याचाच हक्क आहे." अशी कलकत्तेकर गव्हर्नर जनरल लॉर्ड कार्नवालीस यांस यादी पाठविली. आणि मि. स्वार्त्झ यानें स्वतः या बाबतींत पुढाकार घेऊन, अतिशय खटपट केली त्यानें राजे अमरसिंह याच्या वर्तनांतील व राज्यकारभारांतील सर्व दोषांचें आविष्करण करून; तो गादीस नालायक आहे, असें मद्रासचा गव्हर्नर सर चार्लस् ओकले याच्या पूर्णपणें निदर्शनास आणून दिलें. त्यानें, "सरफोजीचें दत्तविधान सशास्त्र झालेलें आहे,अमरसिंह यानें तंजावर येथील पंडितांस लांच देऊन त्यांच्या-कडून विरुद्ध अभिप्राय लिहून घेतला व त्या वेळचा [इ. सन १७८७] मद्रास येथील गव्हर्नर सर आर्चिबाल्ड कँबेल याचा गैरसमज केला." असा पुरावा गोळा केला, आणि लॉर्ड कार्नवालीस याच्याशीं या बाबतींत पत्रव्यवहार करून, " या प्रकरणाची योग्य चौकशी करावी व सरफोजीस तंजावरच्या गादीचा मालक ठरवून त्यास राज्यारूढ करावें " अशी विनंति केली. याच वेळीं, अमरसिंह याजकडील, इंग्रजांस द्यावयाची खंडणीची बाकी थकली व त्याच्या राज्यकारभारामध्येंही पुष्कळच अव्यवस्था होऊन तो बोभाटा मद्रास सरकारच्या कानावर गेला व त्यामुळें अमरसिंहाविषयीं त्यांचा प्रतिकूळ ग्रह झाला. इकडे मि. स्वार्त्झ यानें कलकत्ता सरकाराकडे केलेल्या पत्रव्यवहाराचा त्या सरकारावर उत्तम परिणाम होऊन त्यानें या बाबतींत ताबडतोब चौकशी सुरू केली. सरफोजीच्या दत्तविधानाच्या शास्त्रार्थाबद्दल काशींतील व बंगालमधील विद्वान् पंडितांचे अभिप्राय मागवून आपली शहा-निशा करून घेतली. त्या काळांतील बंगालमधील सुप्रसिद्ध संस्कृतज्ञ व विद्वान् इंग्रज पंडित सर विल्यम जोन्स याची मदत घेऊन, या बाबतींतील सर्व शास्त्रार्थांचें इंग्रजींत भाषांतर करविलें व या प्रकरणाचा यथायोग्य विचार करून ता. ३० डिसेंबर इ० सन १७९६ रोजीं, कलकत्तेकरांनीं आपला स्वतंत्र ठराव प्रसिद्ध केला. त्यांत हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल सर जॉन शोअर यानें, " सरफोजीचें दत्तविधान सशास्त्र आहे व राजे अमरसिंह हा तंजावरच्या गादीस नालायक आहे " असें आपलें मत दिलें व हें प्रकरण

मद्राससरकाराकडे परत पाठविलें. मद्रासचा गव्हर्नर लॉर्ड होबर्ट यानें वरिष्ठ सरकारच्या म्हणण्याला पुष्टि दिली व हें प्रकरण कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स यांच्या मंजुरीसाठीं विलायतेस पाठविलें. त्यांनीं इ० सन १७९८ मध्यें या वादग्रत व महत्त्वाच्या प्रकरणाचा सरफोजीच्या तर्फेनें निकाल केला; आणि "अमरसिंह राजे यांस तंजावरच्या गादीवरून दूर करावें व त्याच्या जागीं सरफोजीची स्थापना करावी," असा मद्रासकरांना हुकूम दिला; त्याप्रमाणें मद्राससरकारानें राजे अमरसिंह यांस पदच्युत करून–तंजावरपासून २९ मैलांवर असलेल्या—मध्यार्जुन येथें नेऊन ठेविलें व तंजावर येथें कोणताही दंगाधोपा न होऊं देतां तेथील गादीवर सरफोजीची स्थापना केली.

पदभ्रम राजे अमरसिंह यांस मध्यार्जुन येथें दरसाल पंचाहत्तर हजार रुपयांची नेमणूक करून दिलेली होती; तिचा उपभोग घेत राहिला व त्या ठिकाणीं तो इ० सन १८०२ मध्यें मृत्यु पावला.+ राजे अमरसिंह यांच्या योग्यतेसंबंधीं निश्चित असें कांहींच म्हणतां येत नाहीं. तंजावर व मध्यार्जुन येथील त्यांच्या लौकिकावरून तो मोठा दयाळु, आणि उदार राज्यकर्ता होता, असें निदर्शनास येतें. "इंग्रजी इतिहासकारांनीं अमरसिंह याची आपल्या पुतण्याशीं जी वागणूक असल्याचें लिहिलें आहे. ती तो सौम्य, दयाळू व उदार राज्यकर्ता होता, असा जो त्याचा स्थानिक लौकिक आहे, त्याला अगदींच विरुद्ध अशी आहे. तथापि तो कमकुवत मनाचा होता. तो आपल्या प्रेमांतील मंडळींच्या सांगण्याप्रमाणें वागत होता, त्यामुळें तो नकळत कौटुंबिक द्वेषभावाला बहुतेक कारणीभूत झाला असावा. शिवाय त्या तरुण राजपुत्राच्या [सरफोजीच्या] फायद्याकरितां जो पक्ष निर्माण झाला होता. त्या पक्षाची अपकारकारक व बदसल्लयाची वागणूक यामुळें, त्याचा आपल्या

---

+ पदभ्रष्ट राज्यकर्ता अमरसिंह, यास प्रतापसिंह या नांवाचा एक मुलगा होता, तो इ. सन १८४९ मध्यें मृत्यु पावला. त्यास औरस पुत्रसंतति नव्हती; म्हणून त्यानें व्यंकोजी या नांवाचा एक मुलगा दत्तक घेतला होता. त्यास ब्रिटिश सरकाराकडून दरमहा एक हजार रुपये नेमणूक मिळत असे. तो इ. सन १८८३ पर्यंत विद्यमान होता.

पुतण्याविषयींचा प्रेमभाव नष्ट होणें अशक्य नव्हतें; अमरसिंहाचें आपल्या पुतण्यासंबंधींच्या वागणुकीचें खरें कारण व मनांतील हेतु कांहींही असो; परंतु त्याची आपल्या पुतण्यासंबंधींची असलेली वागणूक, अतिशय संशय उत्पन्न करणारी होती याबद्दल फारशी शंका आहे, असें दिसत नाहीं आणि असेंही म्हणतात कीं मि. स्वार्ट्झ याला तर असेंही वाटत होतें कीं, "सरफोजीच्या जिवाला अपाय होईल" (The Manual of Tanjore District; Page 8/9 ). थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अमरसिंहाची सरफोजीशीं असलेली वागणूक संशय उत्पन्न करणारी होती, असें दिसतें. तथापि इ. सन १७८७ च्या तहानें तंजावर प्रांतावर बसलेल्या जबर खंडणीचा व इतर कडक अटींचा निर्बंध कमी व्हावा, म्हणून त्यानें जे सतत भगीरथ प्रयत्न केले व इ. सन १७९२ मध्यें नवीन तह घडवून आणिला; त्यावरून त्याची चिकाटी, उद्योगप्रियता, स्वाभिमान व खटपटी स्वभाव, हीं व्यक्त होतात; व तो निदान अगदींच नालायक राज्यकर्ता नसावा, असें अनुमान करण्यास जागा मिळते.

राजे सरफोजी याची तंजावरच्या गादीवर इ. सन १७९८ मध्यें, स्थापना झाली; त्या वेळीं "मी तंजावरच्या गादीवर स्थापन झाल्यावर इ. सन १७९२ च्या तहांतील सर्व कलमें पूर्णपणें पाळीन व उभयपक्षांच्या हितासाठीं इंग्रजांस कांहीं नवीन व्यवस्था करणें झाल्यास त्यास मी मान्यता देईन;" असें कबूल करून घेतलें होतें. त्याप्रमाणें सरफोजी गादीवर बसल्यानंतर—राजे अमरसिंह यांच्या कारकीर्दींत, "तंजावरच्या राज्यव्यवस्थेंत अतिशय अंदाधुंदी व घोंटाळे आहेत" असा बोभाटा त्याच्या प्रतिपक्षीयांनीं, व विशेषतः मि. स्वार्ट्झ यानें केल्यामुळें—तंजावरच्या राज्यव्यवस्थेची चौकशी करण्याकरितां इंग्रजांनीं एक कमिशन नेमिलें व त्या कमिशननें या बाबतींत इत्यंभूत चौकशी करून, व त्यांत तंजावरच्या मुलकी राज्यव्यवस्थेची भरपूर माहिती देऊन मद्राससरकारकडे एक विस्तृत यादी सादर केली (ता. ३१ जानेवारी, इ० सन १७९९). या वेळीं प्रसिद्ध लॉर्ड वेलस्ली या गव्हर्नर जनरलची कारकीर्द सुरू होती आणि "प्रत्येक एतद्देशीय राज्यावर ब्रिटिश-सरकारच्या हुकमी श्रेष्ठत्वाचा शह द्यावा, त्या श्रेष्ठ सत्तेशीं हातांखालील सत्ता,

या नात्याच्या संबंधानें, सक्ती अगर सख्यत्वानें त्यांना बांधून घ्यावें आणि अशा प्रकारें ( इंग्रजांच्या ) साम्राज्यसत्तेच्या मध्यस्थीच्या, अथवा नियंत्रणाच्या अधिकाराला न जुमानणाऱ्या कोणत्याही भावी प्रयत्नाला जागा न ठेवून, त्या सत्तेच्या ताब्यांतील प्रदेशाचा कायमचा सुरक्षितपणा स्थापन करावा, आणि सर्व हिंदुस्थानामध्यें सक्तीनें शांतता प्रस्थापित करावी, असा त्याचा उघड उघड उद्देश होता, *त्यामुळें म्हैसूरकर टिपू सुलतान मारला गेल्यावर ( इ० सन १७९९ मे ) मार्किस ऑफ् वेलस्ली यानें म्हैसूरच्या राज्याची व्यवस्था केली, तेव्हां त्यानें सरफोजीचें मन वळवून, त्याच्याबरोबर एक पंधरा कलमांचा तह करून [ ता. २५ आक्टोबर इ० सन १७९९ रोजीं ] त्याच्याकडून तंजावर संस्थानचा सर्व कारभार आपल्याकडे काढून घेतला. या तहानें संस्थान हें पूर्णपणें ब्रिटिश अमलाखालीं गेलें. या तहानें तंजावरकर सरफोजी राजे यानें फक्त साडेतीन लाख रुपये दरसाल नेमणूक, व राज्याच्या वसुलाचा पांचवा हिस्सा घेऊन तंजावरच्या किल्ल्यांत स्वस्थ राहावें, आणि ब्रिटिशसरकारानें तंजावर प्रांताचें संरक्षण करून त्यांनीं सरफोजीच्या नांवानें राज्यकारभार चालवावा व त्याचा मानमतराब न इभ्रत कमी व होऊं देतां आहे तशीच व्यवस्था कायम ठेवावी, असें ठरलें, आणि याच तहानें, इ० सन १७९९ मध्येंच वास्तविकरीत्या तंजावरचें मराठी राज्य खालसा झाल्यासारखें झालें व याच वेळीं तंजावरच्या राज्याचा शत्रु जो कर्नाटकचा

---

*"The avowed object of Lord Wellesley had been to enforce peace throughout India, and to provide for the permanent security of the British possessions by imposing upon every Native State authoritative superiority of the British Government, binding them down forcibly or through friendly engagements to subordinate relations with a paramount power, and effectively forstalling any future attempts to challenge our exercise of arbitration or control."

"British Dominion in India"
Page 269.

नबाब त्याचें व सुरतचें राज्यही खालसा झालें. म्हैसूरचें [ मुसलमानी ] राज्य नष्ट होण्यानें दोन महत्त्वाच्या गोष्टींनीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याची प्रगति झाली. त्यांपैकीं पहिली ही कीं, त्यामुळें दक्षिण हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या प्रदेशाला सतत तीस वर्षेंपर्यंत ज्या त्यांच्या कट्या दुष्मनाच्या स्थितीमुळें धोका असे,त्या दुष्मनाचा काटा आतां पार उखडून टाकण्यांत आला;आणि दुसरी ही कीं, हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाच्या खालील भागाजवळील समुद्रकिनारा त्यांच्या पूर्ण आधिपत्याखालीं येऊन, त्यामुळें फ्रेंचांकडून होणाऱ्या उपद्रवाची भीति पुष्कळच प्रमाणानें नाहींशी झाली. शिवाय, "कर्नाटकच्या नवाबीवर कोणाची हुकमत ?" या प्रश्नाच्या स्वरूपाच्या ज्या सत्तेबद्दल डुप्ले व क्लाईव्ह यांच्या वेळीं फ्रेंच व इंग्लिश यांच्यामध्यें कडाक्याचें युद्धकलह झाले होते, ती कर्नाटकची नवाबी सत्ताही त्यामुळेंच वास्तविकरीत्या नाहींशी झाली. कर्नाटकच्या नवाबीवरील हुकमतीसंबंधाच्या ह्या चाललेल्या युद्धकलहांत इंग्लिश लोक विजयी झाल्यानंतर, त्यावेळेपासून संरक्षित दोस्त सरकार व मांडलीक राज्यकर्ता या स्थितींतून येथील नबाबाचें रूपांतर होत होत तो निव्वळ नामधारी सत्तेचें बाहुलें, या स्थितींत येऊन पोंचलेला होता. कंपनी सरकारकडून त्याचें संरक्षण होत असे. परंतु त्याबद्दल कुमकेदाखल मिळालेल्या तैनाती फौजेचा खर्च पुरा पाडण्यांत त्याच्या बहुतेक सर्व उत्पन्नावर टांच बसली होती. आणि तो अशा कष्टदायक स्थितींत आलेला असल्यामुळें, त्यानें स्वाभाविक रीत्याच आपल्या सावकाराचा शत्रू असलेल्या म्हैसूरच्या सुलतानाबरोबर गुप्तरीतीनें पत्रव्यवहार सुरू ठेविलेला होता. म्हैसूर हस्तगत झाल्यावर इंग्लिशांना त्याचीं पत्रें सांपडलीं. त्यामुळें लार्ड वेलस्ली याला, बाह्य राजकीय कारस्थान आणि अंतस्थ अव्यवस्थित राज्यकारभार, या जोड मुद्द्यावर कर्नाटक सर्वस्वी इंग्लिशांच्या राज्यकारभाराखालीं आणण्याला आपणाला न्यायदृष्ट्या पाहतां पूर्ण अधिकार पोंचतो, असें आढळून आलें. शिवाय, दुहाती विभागलेली सत्ता, ही पद्धत देशाला अत्यंत अनिष्टकारक आहे, असें त्याचें म्हणणें असून याच निर्विवाद कारणाकरितां त्यानें तंजावर आणि सुरत

येथील राज्येंही कर्नाटकप्रमाणेंच खालसा केलीं.* थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तंजावर राज्याचा इतिहास वस्तुतः याच ठिकाणीं समाप्त झाला.

---

* The dissolution of Mysore set forward the British Dominion by two important steps. It finally removed an inveterate enemy, whose position had for thirty years endangered our possessions in South India; it also gave us complete command over the Sea-coast of the lower peninsula, and thus greatly diminished any risk of molestation by the French. It led, moreover, directly to the virtual extinction of that power for the control of which the English and French had fought so sharply in the days of Dupleix and Clive, the Nawabship of Carnatic. From the time when that contest had been decided in favour of the English, the Nawab had decended gradually through the stages of a protected ally, and a subordinate ruler, to the situation of a prince with nominal authority, and with a revenue heavily mortgaged for the payment of the subsidy that was the price of his protection by the Company. In this unhappy condition he naturally kept up a secret correspondence with the Mysore Sultan, his creditor's enemy, and when Mysore was taken his letters were discovered. Thereupon Lord Wellesley found himself amply justified, upon the double ground of political intrigue and internal mis-government, in bringing the Carnatic wholly under British administration. The system of divided authority was, he observed, a serious calamity to the country, and for the same incontestable reason he annexed Tanjore and Surat."

British Dominion in India
Page 245-246.

अशा रितीनें तंजावर प्रांताचा सर्व कारभार कंपनी सरकारच्या हातीं गेल्यानंतर सरफोजीनें आपलें सर्व आयुष्य विद्याव्यासंग, विद्याप्रसार, विद्वत्समागम, लोककल्याण, व लोकपरामर्ष, यांत घालविलें. तंजावर येथें मोठमोठे विद्वान् पंडित जमवून व त्यांना उत्तेजन देऊन, त्यांच्याकडून कित्येक संस्कृत ग्रंथ, काव्यें व नाटकें तयार करविलीं. तंजावर येथील बृहदीश्वराच्या देवालयामध्यें, प्राचीन चोल राजांनीं लिहिलेल्या शिलालेखाप्रमाणें त्यानें आपल्या राजघराण्याचा संपूर्ण इतिहास मराठी शिलालेखामध्यें कोरून तयार करविला. तंजावरच्या राजवाड्यांत एक सरस्वतीमंदिर निर्माण करून तेथें अनेक विषयावरील प्राचीन ग्रंथ, ताम्रपत्रें, ताडपत्रें, भूर्जपत्रें, वगैरे वस्तूंचा संग्रह केला. हा ग्रंथसंग्रह मोठा अमूल्य व अपूर्व असून त्याच्या तोडीचा ग्रंथसंग्रह हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही संस्थानांत नाहीं. हा ग्रंथसंग्रह पाहून पाश्चात्य विद्वान् थक्क झाले. इतकेंच नाहींतर डॉ० बर्नेलसारख्या जर्मन पंडितांना त्या ग्रंथांच्या नामावली तयार करण्याला वर्षेंच्या वर्षें खर्च करावीं लागलीं; यावरून हा ग्रंथसंग्रह अपूर्व असाच आहे, हें उघड आहे.

सरफोजी राजे यांस शिल्पशास्त्र व संगितशास्त्र यांचीही पुष्कळ अभिरुचि होती; व त्यानें आपल्या राजवाड्यांत अनेक प्रख्यात शिल्पकारांनीं तयार केलेले पुतळे, व कलाकौशल्याच्या वस्तू, यांचाही मोठा वर्णनीय संग्रह केला होता. त्यास इंग्रजी भाषा, इतिहास, भूगोल, गणित वगैरे विषयांचें उत्तम ज्ञान होतें, व वैद्यशास्त्र, व ज्योतिषशास्त्र, वगैरे विषयांची त्याला अभिरुची असून, त्यावरील ग्रंथ त्यानें आपल्या संग्रहीं ठेविले होते. व त्यांचें योग्य प्रकारें परिशीलनही केलें होतें. तो मोठा रसिक, विद्याप्रिय, बहुश्रुत, गुणग्राहक, उदार, धार्मिक प्रवृत्तीचा व दानशूर असा श्रेष्ठ योग्यतेचा राजपुरुष होता, अन्य धर्मीय लोकांस सम दृष्टीनें वागवून, त्यांना नेहमीं मदत करीत असे. तंजावर येथील मिशनरी लोकांच्या अनेक धर्मसंस्थांना, त्याच्या कडून उत्तम प्रकारची मदत मिळत होती; व त्यानें त्यांच्याकरितां स्वतंत्र अनाथगृहें स्थापन केलीं होतीं. या बाबतींत रे. मि. कोलहॉफ यानें असें लिहिलें आहे कीं, "माजी रेव्हरंड मि. स्वार्त्झ याच्याविषयीं सरफोजीच्या

मनांत विशेष आदरभाव वसत होता, त्यामुळें त्यानें ज्या ठिकाणीं बहुतेक वस्ती ख्रिश्चन लोकांचीच आहे, अशा नर्जाकच्या कुनांडिगुडी या खेडेगांवांत पन्नास मुलांचें शिक्षण आणि पालनपोषण करण्याकरितां त्यानें एक धर्मादाय संस्था स्थापन केली आहे; शिवाय या उदार संस्थेत तीस गरीब ख्रिश्चन लोकांचें पालनपोषण करून त्यांना कपडालत्ता पुरविण्यांत येत आहे, आणि तंजावरच्या किल्ल्याजवळील धर्मशाळा अथवा सराई ( Choultry) मध्यें, मिशन मधीलच पन्नास गरीब, पांगळे,आंधळे, आणि इतर दानधर्म करण्यास योग्य, अशा लोकांचें सर्वस्वी त्याच्याच उदार आश्रयामुळें, पालनपोषण होत आहे. त्याप्रमाणेंच त्यानें आपल्या मुलकी व लष्करी नौकरांना, त्यांच्या अधिकाऱ्यांनीं, रविवार व इतर सणांच्या दिवशीं, प्रार्थनेला हजर राहण्याकरितां, रजा देत जावी, व अशा वेळीं, त्यांना नौकरीच्या सर्व कामांतून मोकळें करीत जावें असे हुकूम दिले आहेत. " थोडक्यांत म्हणजे, त्यानें हिंदु, मुसलमान व ख्रिश्चन वगैरे सर्व जातीस समबुद्धीनें वागवून त्यांच्या करीतां अनेक पाठशाळा, व विद्यालयें स्थापन केलीं होतीं. जशा रीतीनें शिक्षणप्रसारार्थ व लोकहितार्थ सरफोजी राजे यानें अनेक प्रयत्न केल्यामुळें,— आणि त्याचा अपूर्व ग्रंथसंग्रह, व त्याचें बहुविधविषयांचें उत्कृष्ट ज्ञान यामुळें—त्याची कीर्ति दूरवर पसरून मोठमोठे नामांकित एतद्देशीय व पाश्चात्य विद्वान् लोक त्याच्या भेटीसाठीं तंजावर येथें जात असत; बिशप हेबर वगैरे पाश्चात्य विद्वानांनीं सरफोजी राजाच्या भेटीचीं आपआपल्या चरित्र ग्रंथांत मोठीं मनोवेधक व उत्कृष्ट वर्णनें दिलेलीं आहेत, व तीं वाचून कोणाच्याही मनांत सरफोजी राजाविषयीं आदरबुद्धि उत्पन्न होईल, हें उघड आहे.

सरफोजी राजे हा मोठ्या धार्मिक प्रवृत्तीचा राजपुरुष असून त्यानें अनेक तीर्थयात्रा व धार्मिक कृत्यें केलीं. तो स्वतः आपलीं सर्व धर्मकृत्यें वेदोक्त रीतीनें करीत असे. त्यानें काशीयात्रा व गयावर्जन केलें, व तंजावर येथें परत आल्यावर, काशीकर क्षेत्रस्थ ब्राम्हणांनीं शास्त्रार्थ सांगितल्याप्रमाणें रुप्याचें ब्रम्हांड खर्पर करून, त्यांत बसून, शास्त्रसंस्कार करून घेऊन, ब्राम्हणाची कन्या द्रव्य देऊन घेतली, आणि ती कन्या एका विद्वान ब्राम्हणास आपण स्वतः कन्यादान करून अर्पण केली. तंजावर तेथील बृहदीश्वराचे देवालयास

अनेक देणग्या दिल्या. गणपति, सुब्रह्मण्य इत्यादि देवालयें बांधिलीं. अनेक जुन्या देवालयांचा जीर्णोध्दार केला. अनेक अन्नछत्रें घालून, तेथें विद्यार्थि व गरीब लोक यांना पात्रता पाहून अन्नदान देण्याची तजवीज केली, आणि आपली प्रिय राणी मुक्तांबाबाईसाहेब हिच्या नांवानें एक अन्नछत्र स्थापन केलें. त्यास "मुक्तांबापुरम् छत्रम्" असें नांव असून, तें तंजावरपासून चौदा मैलांवर, आजतागायत चालू आहे.

सरफोजी राजे यांस ब्रिटिश सरकाराकडून "हिज हायनेस" (His Highness) हा किताब, व एकवीस तोफांच्या सलामीचा मान मिळालेला होता. शिवाय त्याची विद्वत्ता, संशोधनबुद्धि, ग्रंथसंग्रह वगैरेंबद्दलची कीर्ति इंग्लंडमध्यें होऊन, लंडन येथील "रॉयल एशियाटिक सोसायटी"नें त्यास आपल्या संस्थेचा "माननीय सभासद" ["ऑनररी मेंबर"] नेमिलें. [इ. सन १८२८] आणि या बहुमानाची सनद, व ॲडमिरल लॉर्ड नेल्सन याचा एक पुतळा, ह्या दोन वस्तु त्यास तंजावर येथील ब्रिटिश रेसिडेंटमार्फत नजर पाठविल्या. त्यांचा सरफोजीनें अत्यंत आदरपूर्वक स्वीकार केला व त्या सोसायटीच्या अध्यक्षास मोठ्या गौरवाचें पत्र पाठवून त्यांचा अतिशय आभारपूर्वक स्वीकार केल्याचें कळविलें आहे. त्यांस पाठविलेल्या इंग्रजी पत्रांत "आपल्या संस्थेनें माझा हा जो सन्मान केला, त्याला मी पात्र आहें, असें मला वाटत नाहीं." असा प्रस्ताव करून, त्यांत "या संस्थेच्या प्रयत्नानें युरोपियन व एशियाटिक यांच्यामधील परिचय अधिक वृद्धिंगत होईल आणि या संस्थेच्या सुप्रसिद्ध व सुशिक्षित संस्थापकांनीं ज्या हेतूनें ही संस्था स्थापन केली, त्या हेतूप्रमाणें, इतरही अनेक लाभ व फायदे होतील, असा मला भरंवसा वाटतो" असा शेवटीं उल्लेख केला आहे. शिवाय पत्रामध्येंच त्यानें आपले कांहीं महत्वाचें व मननीय विचार ग्रथित केले आहेत. तो म्हणतो:—"मीं मोफत शाळा स्थापन करून, आणि माझ्या अटोक्यांत असलेल्या इतर सर्व साधनांनीं माझ्या लोकांमध्यें उपयुक्त शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करण्यांत आणि ज्या कला व जीं शास्त्रें, यामुळें त्याचा ऐहिक फायदा होईल, अथवा नीतिमत्ता सुधारेल, असें मला वाटलें, ते सर्व प्रयत्न करण्यांत, मी आजपर्यंत नेहमींच अतिशय आनंद मानीत आलों

आहे, ही गोष्ट खरी आहे; परंतु मीं हा जो अल्पसा प्रयत्न केला आहे, त्यापासून आतांपर्यंत अतिशय फायदा होऊन गेलेला आहे, असें म्हणणें मात्र चुकीचें होईल. कोणत्याही जनसमाजाचें शील व वागणूक हीं आवश्यतःच, कांहीं प्रमाणांत परिस्थितीप्रमाणेंच बदलत जातात; आणि जरी त्या परिस्थितीचा परिणाम खात्रीनें होतो, तरी तो होण्यास कमीअधिक कालावधी लागतो. हिंदुस्थान देशाच्या हल्लींच्या परिस्थितींत, निव्वळ ज्ञानार्जन करणें, निरुपयोगी असल्यामुळें आपला चरितार्थ उत्तम प्रकारें चालेल, अशी आशा ज्यामध्यें नाहीं, अशा एखाद्या विवक्षित उद्योगाकडे, किंवा विषयाकडे, लक्ष देतां येणें अथवा त्यांत शहाणपण मिळवितां येणें, कोणाची कांहींही आवड असली तरी फारच थोड्या लोकांना तें शक्य आहे. परंतु ब्रिटिश राष्ट्राला, यापूर्वींच, अनुभवानें पूर्णपणें कळून चुकलें असेल कीं त्यांच्या आशियांतील प्रजेला आपलें स्वतःचें हित स्वाभाविकरित्याच स्पष्टपणें कळतें; व तें साधण्यांत ते सावध व चिकाटीनें काम करणारे असतात, म्हणून त्यांनीं (ब्रिटिश लोकांनीं ) त्या आपल्या प्रजेमध्यें ज्यामुळें त्यांना मानाची व फायद्याची नौकरी मिळू शकेल त्यांची चालू ऐहिक स्थिति अधिक सुधारेल आणि त्यांचे विचार प्रगल्भ होतील अशा प्रकारच्या बुद्धिमत्तेची जोपासना मोठ्या खुबीनें केली पाहिजे आणि भावी पुष्कळ काळपर्यंत, हे दोन्हीही हेतू बरोबरच आपणांपुढें अवश्यमेव ठेवून त्यांना चाललें पाहिजे. परंतु आपल्या प्रजेच्या सुखाची व भरभराटीची काळजी असलेलें असें उदार आणि सुधारलेलें ब्रिटिशसरकार हे त्या प्रजेच्या स्तुत्य महत्वाकांक्षा आणि माननीय प्रयत्न यांना उत्तेजन देणाऱ्या गोष्टींमध्यें मागें राहणार नाहीं असें माझें ठाम मत आहे आणि लोकांची नैतिक व राजकीय सुधारणा, उपयुक्त बुद्धिवैभवाची आणि सद्गुणांची वृद्धी व त्यांची वाङ्मयविषयक, शास्त्रीय, व कलाविषयक प्रगति यांना ( ब्रिटिशसरकाराकडून ) ज्या प्रमाणांत उत्तेजन मिळेल, व त्यांचें भवितव्य परमेश्वरानें ज्यांच्या हातीं दिलें आहे ते राज्यकर्ते ( ब्रिटिश सरकार ) त्यांच्यावर ज्या प्रमाणांत विश्वास टाकतील त्या प्रमाणांत होईल, असें आढळून येईल अशी मला आशा आहे. ” सरफोजी राजे यानें हे आपले विचार इ० सन १८२८ मध्यें म्हणजे ९६ वर्षांपूर्वीं दिग्दर्शित

केलेले आहेत त्यावरून त्याला हिंदुस्थानच्या तत्कालीन राजकीय परिस्थितीचें किती व्यापक ज्ञान झालें होतें याची योग्य कल्पना करतां येते व त्यानें त्या पत्रांत दिग्दर्शित केलेल्या अनेक मननीय व महत्त्वाच्या गोष्टींवरून त्याची असामान्य योग्यता व दूरदर्शित्व हीं स्पष्टपणें निदर्शनास येतात.

राजे सरफोजी हा तंजावरच्या गादीवर आला ( इ० सन १७९८ ), त्या वेळीं तो एकवीस वर्षांचा होता. त्याचें बालपणांतील आयुष्य रे. स्वार्झ व जेरिक वगैरे विद्वान् युरोपियन लोकांच्या सहवासांत गेल्यामुळें, त्यांच्या सहवासानें, त्याच्या मनावर पाश्चात्य विद्येचा उत्तम संस्कार झाला होता; व मि. स्वार्झ यानें त्याची स्वतःच्या मुलाप्रमाणें काळजी घेऊन त्यास शिक्षण दिल्यामुळें इंग्रजी भाषा, इंग्रजी कविता व इतर अनेक विषय त्यास उत्तम प्रकारें अवगत झाले होते. त्याच्या ठिकाणीं सुशीलता, विचारसंपन्नता, विद्याभिरुची, वाङ्मयप्रियता, वगैरे अनेक अलौकिक सद्गुण उत्पन्न होऊन, तंजावर प्रांतांतील लोकांस त्यांच्याविषयीं आतिशय आदर व प्रेमभाव वाटत होता. मि. स्वार्झ व सरफोजी राजे यांच्यामधील स्नेहभाव व वात्सल्यप्रेम खरोखरीच कल्पनातीत असें होतें. सरफोजीस तो आपला धर्मपुत्र मानीत होता व सरफोजी त्याला आपला धर्मपिता समजत होता व मि. स्वार्झविषयीं त्याच्याठायीं कल्पनातित प्रेम, भक्ति व पूज्यबुद्धि वसत होती व मि. स्वार्झनेंही त्याच्या कल्याणाकरतां, व त्याला तंजावरच्या गादीचा अधिपति करण्याकरितां अविश्रांत परिश्रम घेतले होते. आपण तंजावरच्या गादीवर स्थापन झाल्याचें मि. स्वार्झ यानें पहावें, अशी सरफोजीची इच्छा असणें स्वाभाविक होतें आणि ज्या दुर्दैवी व पोरक्या राजपुत्रास आपण आपला धर्मपुत्र मानून त्यास राज्यारूढ करण्याकरतां अत्यंत परिश्रम घेतले, त्या सरफोजीचा राज्यारोहणसमारंभ आपण स्वनेत्रांनीं अवलोकन करावा, अशी मि. स्वार्झ याची ही इच्छा असणें स्वाभाविक होतें. परंतु विधिघटना अगदींच निराळी होती. सरफोजी हा तंजावर येथें सिंहासनारूढ होण्याच्या आधींच मि. स्वार्झ याच्या इहलोकांच्या जीवनयात्रेचा शेवट झाला. सरफोजीनें मि. स्वार्झ याच्या मृत्युपूर्वीं त्याची भेट घेतली आणि त्याच्या अंत्यविधीस शेवटपर्यंत हजर राहिला. " मि. स्वार्झ यांचे, ता. १४ फेब्रुवारी रोजीं दुपारनंतर

अजमासें पांच वाजतां, माजी तुळाजी महाराज यानें त्याला दिलेल्या बागेंत त्याच्या घराजवळ असलेल्या किल्ल्याबाहेरील त्यानेंच बांधिलेल्या लहानशा प्रार्थनामंदिरामध्यें दफन करण्यांत आलें. हा अंत्ययात्रेचा देखावा अतीशय गंभीर व हृदयद्रावक होता. मि. स्वार्ज्ञ याचें कलेवर पुन्हां एकदां स्वनेत्रांनीं शेवटचें अवलोकन करावें, अशी सरफोजी राजे यानें आपली इच्छा दर्शविल्यावरून स्मशानयात्रेस ठरलेल्या वेळेहून थोडासा अधिक उशीर झाला. मि. स्वार्ज्ञ ह्या आपल्या उत्तम स्नेह्याच्या वियोगानें सरफोजीस जें दुःख झालें, तें अंतःकरणाला अतीशयच हालवून सोडणारें होतें. त्यानें मि. स्वार्ज्ञ याच्या शवावर सारखा अश्रुलोट केला, आणि त्यावर एक भरजरीची चादर घातली." सरफोजी राजे यानें तंजावर येथें मि. स्वार्ज्ञ याचें एक स्मारक बांधलें असून तेथें त्याच्या मृत्यूचा देखावा दाखविणारा एक संगमरवरी पुतळा उभारिला आहे. त्यांत सरफोजी हा, आपल्या या पूज्य व माननीय गुरूचा शेंवटचा उपदेश ग्रहण करीत आहे, असें चित्र काढलेलें आहे. सरफोजी राजे हे स्वतः उत्तम इंग्रजी कविता करीत असून त्यानेंच स्वतः त्याखालीं एक इंग्रजी कविता लिहून, मि. स्वार्ज्ञ याच्याठायीं वसत असलेल्या अनेक असाधारण व अलौकिक सद्गुणांचें त्यांत वर्णन केलेलें आहे.* थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तुळाजी राजे, हा तंजावरचा मराठा राज्यकर्ता व रे. स्वार्ज्ञ हा डेनिश मिशनरी. जात निराळी, धर्म

* तें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें:—

"Firm wast thou, humble and wise,
Honest, pure, free from disguise,
Father of orphans, the widow's support,
Comfort in sorrow of every sort,
To the benighted, dispenser of light,
Doing and pointing to, that which is right,
Blessing to princes, to people, to me,
May I, my father, be worthy of thee!
Wisheth and prayeth thy Sarafojee"

निराळा, देश निराळा, रंग निराळा; पण असें असून सुद्धा तुळाजी राजे हा आपल्या मृत्युसमयीं, आपला मुलगा सरफोजी याचा हात, मि. स्वार्ट्झ याच्या हातांत देऊन त्याचें पालग्रहण करण्यास सांगतो. आणि मि. स्वार्ट्झ हा तुळाजी राजाच्या शेवटच्या इच्छेस मान देऊन सरफोजीचें आपल्या मुलाप्रमाणें पालग्रहण करून, त्याला सिंहासनारूढ करण्याची पराकाष्ठा करतो, व त्याच्याच प्रयत्नामुळें, त्याच्या मृत्युनंतर का होईना, सरफोजी हा तंजावर येथील सिंहासनावर आरूढ होतो, ही गोष्ट कल्पनासृष्टींतील कादंबरीस साजण्यासारखी असून, ती सत्यसृष्टींत, तंजावरच्या इतिहासांत खरोखरीच घडलेली आहे. तेथील इतिहासांत हा एक चिरस्मरणीय व वर्णनीय असाच विषय होऊन बसला आहे. व हा योगायोग मोठाच अपूर्व व अपवादकारक असाच घडून आला असल्यामुळें, तो अत्यंत महत्वाचा व लक्षांत ठेवण्यासारखाच आहे हें उघड आहे.

थोडक्यांत म्हणजे सरफोजीराजे हा एक मोठाच विद्यासंपन्न, लोकप्रिय, रसिक, कीर्तिशाली, परिस्थिती ओळखून वागणारा, व प्राप्तस्थितींत समाधान मानून राहणारा, असा एक अलौकिक पुरुष तंजावरच्या राजघराण्यांत निर्माण झाला. त्याच्या संबंधानें सुप्रसिद्ध बिशप हेबर यानें जें वर्णन केलें आहे, त्यांत तो म्हणतोः–" मी गेल्या चार दिवसांपासून तंजावरचा हिंदु राजा सरफोजी याच्या सहवासांत काळ घालवीत आहे. तो फोरक्रॉय लाव्हीशियर, लीनोअस, आणि बफन यांचे आधार, आपल्या बोलण्यांत

---

अर्थः—तूं दृढनिश्चयी होतास; नम्र, आणि शहाणा, प्रामाणिक, शुद्ध आणि निष्कपटी होतास. पोरक्या मुलांना बापाप्रमाणें, व विधवा स्त्रियांचा आश्रयदाता होतास. तूं कोणत्याही दुःखाच्या वेळीं शांतवन करणारा आणि आडमार्गानें गेलेल्यांना पुन्हा सुमार्गावर आणणारा होतास. तूं जें योग्य असेल तेंच करणारा व जें बरोबर असेल तेंच दुसऱ्यास सांगणारा आणि राज्यकर्ते, प्रजाजन व मी, यांचें कल्याण चिंतणारा होतास. हे माझ्या धर्मपित्या, मी तुला साजेन ( मी तुझा धर्मपुत्र शोभेन ) असें व्हावें, अशी मी इच्छा करतों, व हा तुझा सरफोजी तशी ( ईश्वराची ) प्रार्थना करतो.

वक्तृत्वपूर्ण रीतीनें देतो. लॉर्ड बायरन यानें, शेक्सपीयरच्या नाट्यविषयक बाबतींत मनोल्हासकारक रीतीनें जें मत प्रदर्शित केलें आहे, त्याहूनही अधीक बिनचूक रीतीनें शेक्सपीयरच्या कवित्वगुणाबद्दल सरफोजीनें आपलें मत बनविलें आहे. व शेनस्टोनच्या थडग्यावर रशियन यानें जो कवितावद्ध मृत्युलेख लिहिला आहे, त्यापेक्षां अतीश्रेष्ठ दरजाची इंग्रजी कविता सरफोजी यानें मि० स्वार्ट्झ याच्या पुतळ्याखाली लिहिलेली आहे. त्याप्रमाणेंच तो खरा उत्तम अश्वपारखी, आणि वाघावर न घाबरतां धीटपणानें अचुक प्राणघातक नेम मारणारा आहे; त्यामुळें, आसपासचे इंग्रज अधिकारी त्याला अतीशय मान देत असतात. खरी गोष्ट ही कीं, सरफोजीराजे हा एक अलौकिक पुरुष आहे. प्रसिद्ध वृद्ध मिशनरी मि० स्वार्ट्झ यांच्याकडून त्याला त्याच्या पूर्ववयांत शिक्षण मिळालेलें आहे; आणि पुष्कळ प्रतिकूळ परिस्थितींमध्येंही त्यानें आपली इंग्रजी वाङ्मयाची गोडी कायम ठेविली आहे, व आपलें इंग्रजी वाङ्मयविषयक ज्ञान वृद्धिंगत केलें आहे; तरीसुद्धां पूर्वकालीन मराठा जे त्यांच्या वंशजाला साजेल, असे अंगमेहनतीचे व्यायाम, व शिपाईबाण्याला शोभेल, अशी मोकळेपणाची वागणूक ह्या गोष्टींकडे त्यानें आपलें कधींही दुर्लक्ष केलें नाहीं, व केवळ यामुळेंच, त्याला हल्लींच्या परिस्थितींत, लोकांच्या मनाच्या बनलेल्या समजुतींना न दुखवितां, आपली लोकप्रियता तशीच कायम ठेवतां आली आहे. जर तो हैदरअल्लीच्या वेळीं असता तर ( इंग्लिशांचा, ) तो एक बलिष्ठ शत्रु किंवा मित्र, झाला असता; कारण त्याच्या आसपास असणाऱ्या सर्व लोकांच्या सांगण्यावरून तो मितव्ययी, धाडसी, लोकप्रीय व दुसऱ्यावर आपली छाप पाडून त्याचा विश्वास व प्रेम संपादन करणारा, असा आहे. या वेळीं, इंग्लिश सरदाराइतकीही त्याची सत्ता नाहीं; तरीसुद्धां त्याची मान नेहमीं ताठ असते; व तो समाधानी आहे, असें दिसतें. त्याच्या वाचनालयांत बोनापार्टची तसबीर टांगून ठेविलेली आहे; व तेथें जवळच लॉर्ड हेस्टिंग्स याचीही पूर्ण पोषाखांत असलेली तसबीर असून, तिनें नेपोलियनची तसबीर इतकी लोपून गेली आहे कीं तो कोणालाही अपाय करूं शकणार नाहीं. ”

" महाराजा सरफोजी याच्या स्वरूपाचें पूर्ण वर्णन करावयाचें म्हणजे, तो शरीरानें मजबूत, अतीशय देखणा, व मध्यम वयाचा असून एखाद्या सुंदर बहिरीससाण्याप्रमाणें त्याचे डोळे व नाक आहे. त्याच्या मिशा फार झुपकेदार व करड्या आहेत. बहुधा नेहमीं त्याचा पोषाख भपकेदार असतो. पण दागिने घालण्याची बायकी हौस त्यांत नसते; आणि तो नेहमीं नमुनेदार व मनाला आनंद होणाऱ्या, फ्रेंच जनरल ऑफिसरप्रमाणें दिसतो, आणि बोलतो. यापेक्षां त्याची तुलना करण्याला दुसरा अधीक योग्य मनुष्य माझ्या लक्षांत येत नाहीं. " आणि वरील विवेचनावरूनच सरफोजीराजे हा केवढा अलौकिक राजपुरुष होता, याची सहज कल्पना होण्यासारखी असल्यानें त्या बाबतींत अधीक विवेचन करण्याचें कांहींच कारण राहात नाहीं.

सरफोजी राजा हा इ. सन १८२८ मध्यें मृत्यु पावला. त्यास मुक्तंबाबाई व अहिल्याबाई, अशा दोन धर्मपत्न्या होत्या. त्यापैकीं मुक्तंबाबाई ही अकालीं मृत्यु पावली. दुसरी धर्मपत्नी अहिल्याबाई हिचे पोटीं, त्यास तीन कन्या व एक पुत्र झाला. पुत्राचें नांव शिवाजी हें असून, तो सरफोजीच्या मृत्यूनंतर ता. १७ मार्च इ. सन १८३२ रोजीं तंजावरच्या नामधारी गादीवर आधिष्ठित झाला.

सरफोजी राजे हा मोठा विद्वान व विद्याविलासी राजपुरुष असूनही, शिवाजीराजे यांस विद्येचा विशेष व्यासंग व अभिरुची लागली नाहीं. सरफोजी राजे यांनीं त्यांस, त्यांच्या लहानपणापासून उत्तम शिक्षण देण्याचा अतिशय प्रयत्न केला. अखेर त्यांस पुष्कळ प्रतिबंधांतही ठेविलें, पण त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. तथापि तो मोठ्या मोकळ्या मनाचा, सुस्वभावी, व उदार असुन अतिशय खर्चिक होता. आणि तोही इतका कीं, त्यामुळें त्याची दक्षिण हिंदुस्थानांत अतीशय प्रसिद्धि होऊन, त्यास "दानशूर कर्ण" असें नामाभिधान प्राप्त झालें होतें.

तंजावरचा राज्यकर्ता सरफोजी, याच्याबरोबर इ. सन १७९९ मध्यें इंग्रजांनीं जो तह केला, त्याअन्वयें तंजावर संस्थानची सर्व राजसत्ता ब्रिटिश सरकारच्या हातांत गेली. त्यामुळें सरफोजी राजे व शिवाजी राजे या उभयतांनांही, स्वतःच्या खाजगी दौलतीशिवाय, दुसरे राज्याधिकार कांहींच

राहिले नव्हतें. तथापि अशा स्थितींतही सरफोजी राजे यानीं विद्यादेवीची आराधना करून, विद्यादान देऊन, विद्वज्जनसमागम करून, व लोककल्याण साधीत राहून अतिशय लौकिक मिळविला. प्राप्त परिस्थितींत आपल्या आयुष्याचें इतिकर्तव्य उत्तम प्रकारें बजावून व जगांत आपली सत्कीर्ति कायम ठेऊन दैवगतीस पावला. परंतु शिवाजी राजे यांस विद्येची अभिरुचि नसल्यानें त्याचे सर्व आयुष्य नष्ट ऐश्वर्याच्या अवशिष्ट राजवैभवाचा उपभोग घेण्यांत, व ऐषआराम करण्यांत खर्च झालें. शिवाजी राजे यांस, ब्रिटिश सरकाराकडून, नेमणूक व तंजावर राज्याच्या वसुलाचा पांचवा हिस्सा मिळून दरसाल १०,८०,९९२ रुपये मिळत असत. अर्थात् शिवाजी राजे यांस सुखोपभोग व ऐषआराम, यांना लागणारी सांपत्तिक अनुकूलता प्राप्त झालेली असल्यामुळें, त्यांनीं आपल्या आयुष्याचा सर्व काळ चैनींत व विलासांत घालविला. तो ता. २९ आक्टोबर इ० सन १८५५ रोजीं मृत्यु पावला. त्यास औरस पुत्रसंतती नव्हती. त्या वेळीं प्रसिद्ध लॉर्ड डलहौसी हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल (कारकीर्द इ० सन १८४८-१८५६;) होता. त्यानें इ० सन १८४९ मध्यें एक जाहिरनामा काढून त्या अन्वयें पंजाब प्रांत खालसा करून ब्रिटिश साम्राज्यास जोडला होता. खालील ब्रम्हदेश ब्रिटिश साम्राज्यसत्तेखालीं आणला होता. सातारा येथील शेवटचा राज्यकर्ता, आणि राजे प्रत्तापसिंह [ पदभ्रष्ट ता. ५ सप्टेंबर इ० सन १८३९; मृत्यु काशी येथें प्रतिबंधांत ता. १४ आक्टोबर इ० सन १८४७; दुपार नंतर तीन वाजतां ] याचा धाकटा भाऊ शहाजी ऊर्फ अप्पासाहेब (मृत्यू ता. ५ एप्रील इ० सन १८४८) हा मृत्यू पावल्यावर, त्यास औरस पुत्र संतती नसल्यामुळें, लॉर्ड डलहौसी यानें दत्तक घेण्यास मंजुरी देण्याचें नाकारलें; आणि " त्यानें असें तत्व आंखून टाकलें होतें कीं, 'औरस वारसदाराच्या अभावामुळें, जीं मांडलीक संस्थानें, ब्रिटिश सार्वभौम सरकारास स्पष्ट आणि निःसंशय रीतीनें मिळालेलीं आहेत, त्या संस्थानाचा ताबा घेण्यास कर्तव्य आणि राजनीति, ह्या दोन्हींही गोष्टींचा विचार करतां, उलटपक्षीं कांहीं कारण नसेल तर तें सरकार बांधलें गेलेलें आहे.' या तत्वाप्रमाणें इ० सन १८४८ मध्यें

सातारचें राज्य खालसा करण्यांत आलें. झांशी संस्थानाचाही इ० सन १८५३ मध्यें तसाच निकाल लावण्यांत आला आणि इ० सन १८५४ मध्यें नागपूर खालसा करण्याची वेळ आली तेव्हां लॉर्ड डलहौसी यानें मोठ्या कळकळीनें असें प्रसिद्ध केलें कीं, " ब्रिटिश सत्तेखालीं तेथील प्रजाजनास कायमचें आणण्यानें त्यांची भरभराट व सुखवृद्धि यांत भर पडेल, अशी माझी खात्री झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही फायद्याकडे लक्ष देऊन मला ही योजना अमलांत आणण्याची प्रवृत्ति होणार नाही. " हिंदुस्थानांतील कोणतेंही संस्थान ब्रिटिश सार्वभौम सत्तेची मंजुरी आणि बहाली मिळाल्याशिवाय दत्तक वारशाकडे जाऊं शकत नाहीं, ही दीर्घकालीन वहिवाट व परंपरा असून, यावर उभारलेल्या राजकीय धोरणाच्या सर्वमान्य तत्त्वाबद्दल कोणालाही तिळमात्रसुद्धां संशय नव्हता आणि दत्तक वारसाच्या हातीं संस्थान जाऊं नये. असें खुद्द डलहौसी याचेंसुद्धां म्हणणें नव्हतें; परंतु जीं संस्थानें ब्रिटिश सरकारानेंच वस्तुतः उत्पन्न केलीं आहेत, अगर ज्या संस्थानांचा पूर्वस्थितीवरून ब्रिटिश सरकाराशीं मांडलीक अगर आश्रित संस्थानें म्हणून संबंध आहे त्या संस्थानांना ' राजकीय धोरण ' याच मुद्द्यावर दत्तकाची मंजुरी देणें नाकारण्याचा आपणाला हक्क आहे, असें त्याचें म्हणणें असून, त्यानें तो विशेष अधिकार तशा रीतीनें बजाविलाही होता. त्यामुळें त्यानें दत्तक घेण्याला रुकार देण्याचें नाकारलें, तर तें संस्थान खालसा होऊन ब्रिटिश साम्राज्यांत सामील केलें जात असे. शिवाय राजकीय सुमृत्यूच्या ह्या प्रकाराहून एतद्देशीय राजघराण्याच्या प्रजेला दुसरी कोणतीही गोष्ट अधिक दुर्दैवाची वाटणें शक्य नाहीं असें त्यास वाटत असे*" BritishDominion in India पान ३२८–३२९

* " तथापि लॉर्ड डलहौसीनंतर, लॉर्ड कॅनिंग ह्या गव्हर्नर जनरलच्या कारकीर्दीत, औरस संततीच्या अभावीं, आपआपला धर्म, जात, अगर घराणें यांतील निर्बंध अगर चालीरीति यांना अनुसरून, जोंपर्यंत एतद्देशीय राज्यकर्ते, ब्रिटिश सरकारच्या सार्वभौम सत्तेशीं राजनिष्ठपणें वागत आहेत आणि त्यांच्याशीं केलेले करारमदार इमानेइतबारें पाळीत आहेत, तोंपर्यंत त्यांना दत्तक घेण्याचा हक्क असल्याचें, ब्रिटिश सरकाराकडून, कायदेशीररीत्या

पहा) थोडक्यांत सांगायचें म्हणजे लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दीत, पंजाब व खालील ब्रह्मदेश हे युद्धांमुळें, आणि सातारा, झांशी व नागपूर हीं संस्थानें औरस पुत्रसंततीच्या अभावीं खालसा होऊन—इ० सन १८५४ पर्यंत हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्यांत सामील झालीं व त्यानंतर इ० सन १८५६ मध्यें ता० ७ फेब्रुवारी रोजीं "असह्य अव्यवस्थित राज्यकारभार" या मुद्दयावर औधचा वजीर वाजिद अलीशाहा, यास पदभ्रष्ट करून, लॉर्ड डलहौसी यानें तें औधचें राज्य ब्रिटिश साम्राज्यांत सामील केलें व तो महिना संपण्याच्या पूर्वीच, त्यानें गव्हर्नर जनरल या नात्याचीं अधिकारसूत्रें लार्ड क्यानिंग याच्या हवालीं करून तो इंग्लंडांत परत गेला. म्हणजे इ० सन १८४८ मध्यें लॉर्ड डलहौसी याची गव्हर्नर जनरल या नात्याची कारकीर्द हिंदुस्तानांत सुरू झाल्यानंतर इ० सन १८४९ पासून निरनिराळ्या मुद्दयांवर व कारणांनीं, एतद्देशीय राज्यें खालसा करून तीं ब्रिटिश साम्राज्यांत सामील करीत राहाण्याचें जें राजकीय धोरण त्यानें अमलांत आणिलें होतें, तें इ० सन १८५६ च्या फेब्रुवारी महिन्यांत तो आपलीं अधिकारसूत्रें क्यानिंग याच्या हवालीं करून इंग्लंडमध्यें परत गेला, तोंपर्यंत सारखें चालूच ठेविलें होतें. अर्थात् ज्या ठिकाणीं नागपूर व औधसारखीं बडीं बडीं संस्थानें इ० सन १८५४ व इ० सन १८५६ मध्यें खालसा झालीं, त्या ठिकाणीं तंजावरसारखें छोटें संस्थान "औरस संततीच्या अभावीं" मधील इ० सन १८५५ या वर्षांत, जिवंत राहणें शक्यच नव्हतें. शिवाय इ० सन १७९९ मध्यें [ता० २५ आक्टोबर] तंजावरकर सरफोजी राजे व इंग्रज यांच्यामध्यें झालेल्या तहाअन्वयें तंजावर संस्थानचीं सर्व राजसूत्रें व सर्व राजसत्ता पूर्वीच इंग्रजांच्या हातांत गेली होती; आणि तंजावरचा राज्यकारभार "तेथील राज्यकर्त्यांच्या नांवानें" इंग्रज चालवीत असल्यानें, तंजावरकर हे इ० सन १८५५पर्यंत नामधारी राज्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. इ० सन

---

मान्य करण्यांत आलें असून, त्यामुळें लॉर्ड डलहौसी याचें हें एतद्देशीय राज्यें खालसा करण्याचें तत्त्व, व्यवहारदृष्ट्या पूर्णपणें रद्द करण्यात आलें, ह्या गोष्टीचाही या ठिकाणीं उल्लेख करणें अस्थानीं होणार नाहीं." (Page 329)

१७९९मध्यें, तंजावरकर व इंग्रज यांच्यामध्यें तह होऊन तंजावरची राजसत्ता पूर्वीच कंपनीसरकारच्या हातांत गेलेली होती. परंतु तसा तह न होतां व तशी राजसत्ता इंग्रजांच्या हातीं न जातां जरी ती इ० सन १८५५ पर्यंत तंजावरकरांच्याच हातीं राहिली असती तरीसुद्धां औरस संततीच्या अभावीं, डलहौसीच्या कारकीर्दीत तें संस्थान–जेथें नागपूरसारखें वडें राज्यही जिवंत राहिलें नाहीं, तेथें हें तंजावरचें छोटें संस्थान–जिवंत राहणें शक्यच नव्हतें, हें उघड आहे. परंतु तंजावरची राजसत्ता तर आधींच इंग्रजांच्या हातीं गेलेली होती. त्यामुळें लॉर्ड डलहौसी यानें तंजावरचें राज्य खालसा केलें, असें म्हणण्यापेक्षां, पूर्वींच इ० सन १७९९ मध्यें खालसा केलेल्या तंजावर राज्याच्या राज्यकर्त्यांचा तेथील गादीवरील नामधारी हक्क त्यानें इ० सन १८५५मध्यें औरस संततीच्या अभावीं, काढून टाकून, तें राज्य राजरोसपणें त्यानें ब्रिटिश साम्राज्यांत सामील केल्याचें जाहीर, केलें असेंच म्हणणें अधीक संयुक्तिक होईल, हें उघड आहे.

शिवाजीराजे इ० सन १८५५मध्यें ( ता० २९ आक्टोबर ) तंजावर येथें मृत्यु पावला. त्यांस सयदंबाबाई, पद्मांबाबाई, व कामाक्षी अंबाबाई अशा तीन स्त्रिया होत्या. त्यांपैकीं त्याच्या पहिल्या दोन्ही स्त्रिया त्याच्या हयातींतच मृत्यु पावल्या. तिसरी कामाक्षी अंबाबाई ही इ० सन १८९२ पर्यंत हयात होती. शिवाजी राजे यांस सयदंबाबाईपासून फक्त दोन कन्या झाल्या. पुत्रसंतती झाली नाहीं. म्हणून त्यानें आणखी सतरा लग्नें केलीं तरी सुद्धां अखेरीस औरस संतती झाली नाहींच. त्यांपैकीं अकरा राण्या व सर्वांत वडील राणी कामाक्षी अंबाबाईसाहेब ह्या शिवाजी राजाच्या मागें पुष्कळ वर्षें जिवंत होत्या. शिवाजी राजे मृत्यू पावल्यावर त्याच्या राण्यांस नेमणूका होऊन त्यांना राजवाड्यांत राहण्याची परवानगी मिळाली. परंतु त्यांची खाजगी मालमत्तासुद्धां त्यांच्याकडून काढून घेण्यांत आली. परंतु कामाक्षीअंबा व इतर राण्यांनीं तंजावरचें राज्य परत मिळविण्याबद्दल पुष्कळ खटपट केली व ईस्ट इंडिया कंपनीबरोबर आपली खाजगी मिळकत परत मिळविण्याबद्दल पुष्कळ वर्षें त्यांनीं कज्जा चालविला. त्यांची राज्य परत मिळविण्याची

खटपट तर निष्फळ झालीच परंतु अखेरीस तंजावरच्या राजघराण्याची खासगी दौलत तंजावरच्या राण्यांकडे ठेवावी, असें कोर्ट ऑफ् डायरेक्टर यांनीं ठरविल्यामुळें, ही त्यांची खाजगी मालमिळकत त्यांना एकदांची परत मिळाली. राणी कामाक्षीबाई ही फार उदार व धार्मिक होती. तंजावर येथील बृहदीश्वराचें देवस्थान, इतर दुसरीं देवस्थानें व धर्मादाय यांची व्यवस्था तंजावरच्या राजवाड्यांतून होत आली होती, ती तिनें आपल्या हयातींत मोठी नमुनेदार व उत्कृष्ट ठेविली होती. ती इ० सन १८९२ मध्यें व शिवाजी राजे याच्या पाश्चात् त्याच्या विद्यमान राण्यांपैकीं शेवटची राणी जिजांबाबाईसाहेब ही इ०सन १९१२ मध्यें; [ता. ३ मे रोजीं] मृत्यु पावली. शिवाजीराजे यांस औरस पुत्रसंतती नसून फक्त दोन कन्या होत्या. त्या दोन्हींही कोल्हापूर येथील जुन्या मराठी घराण्यापैकीं श्रीमंत सखाराम रावसाहेब मोहिते हंबीरराव यांस दिल्या होत्या. त्यापैकीं पहिली कन्या लग्न झाल्यावर अल्पवयांतच कालवश झाल्यामुळें दुसरीही कन्या सखाराम रावसाहेब यांसच दिली होती. तिचें नांव विजय मोहना मुक्तांबाबाई साहेब हें असून तिला इंग्रज सरकाराकडून दरमहा तीन हजार रुपये पेनशन, व "प्रिन्सेस ऑफ् तंजावर" असा किताब होता; व लॉर्ड नार्थब्रुक याच्या कारकीर्दींत (कारकीर्द इ. सन १८७२।१८७६.) त्यावेळचा मद्रास येथील गव्हर्नर लॉर्ड होबर्ट याच्या शिफारशीवरून, तिला तेरा तोफांची सलामी देण्यांत आली होती. शिवाजीराजे याच्या या मुलीचा पुत्रवंश, व बहिणीचा वंश सांप्रत तंजावर येथें आहे. ब्रिटिशसरकारानें इ. सन १८५५ मध्यें तंजावर येथील सर्व राण्या व राजघराण्यांतील आप्तसंबंधी लोक यांना ज्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें नेमणुका करून दिल्या होत्या, व इ. सन १८६० मध्यें ५४२८२० रुपयांची तैनात तंजावरच्या राजवाड्याकडे खर्चीं पडत होती तथापि राजघराण्यांतील पुष्कळ लोक आतांपर्यंत कालवश झाल्यानें आजतागायत ही रक्कम पुष्कळच कमी कमी होत आलेली आहे. तंजावरची राजकन्या विजयमोहना मुक्तांबाबाईसाहेब हिला एक कन्या होती. ती बडोदें संस्थानचे सध्याचे अधिपति श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेर

बहादूर+ यांस दिली होती;* तिचें नांव लक्ष्मीबाईसाहेब, [पहिल्या चिमणाबाईसाहेब] हें असून ती अल्पवयांतच एक पुत्र होऊन मृत्यु पावली. याच मुलाचें नांव फत्तेसिंह हें होतें. युवराज फत्तेसिंहराव हा इ. सन. १९०८मध्यें बडोदें येथें मृत्यू पावला. त्यास प्रतापसिंह या नांवाचा एक मुलगा व दोन कन्या आहेत; व हाच तंजावर येथील राजघराण्याचा आज मितीस शिल्लक राहिलेला कन्येचा वंश आहे. तंजावरच्या राण्यांनीं आपल्या खाजगी दौलतीकरितां शिवाजीराजे व प्रतापसिंहराजे हे दोन मुलगे दत्तक घेतले होते, व त्यांना इंग्रजसरकारकडून नेमणुका मिळत होत्या. शिवाय तंजावरच्या राजघराण्याकडे खाजगी मोकाशाचीं १९० गांवें व जमिनी वगैरे

---

\+ मराठेशाहींत खालीलप्रमाणें किताब होते, तेः—

१ शिंदे–आलिजाबहादूर.
२ होळकर–सुभेदारसाहेब.
३ गायकवाड–सेनाखासखेल समशेर बहादूर.
४ भोंसले–सेनासाहेब सुभा.
५ आंग्रे–वजारतमाहा सरखेल.
६ नारो शंकर–राजे बहादूर.
७ कंपनी–इंग्रजबहादूर.
८ टिपू–सुलतान बहादूर.
९ सुरापूरकर नाईक–बहिरीबहादूर.
१० घोरपडे–सेनाधुरंधर.
११ वाडीकर सांवत–राजे सांवत बहादूर
१२ विंचूरकर—उमदेतुल्मुल्क बहादूर

हैद्राबादकर निजाम याचा किताब " मुज्फर उल् मुमालिक निजामउल्मुल्क नीरफर खंदे अलीखान बहादूर फत्तेजंग " हा असून मराठशाहींतील पत्रव्यवहारांत त्याचा उल्लेख " हैद्राबादकर " व " भागानगरवाले " असा केलेला आढळतो.

* लग्न ता. ६ माहे जानेवारी इ. सन १८८० रोजीं बडोदें येथें नजरपागेंत झालें.

१ फत्तेसिंहाचा जन्म ता. ३ आगष्ट इ. सन १८८३

२ तंजावरकर चिमणाबाई महाराणी हिचा मृत्यु क्षयरोगानें ता. ७ मे १८८५ सालीं झाला. त्यावेळीं तिचें वय २१ वर्षांचें होतें.

मिळून बरेंच उत्पन्न असून, तंजावरचें मराठा राज्य नष्ट झालें तरी " तंजावरचें राजघराणें " हें नांव आजतागायत दक्षिण हिंदुस्थानांत अस्तित्वांत आहे.

तंजावरच्या दुर्दैवी संस्थानाची—मराठ्यांच्या थेट दक्षिणेकडील छोटे-खानी लष्करी वसाहतींची–शोचनीय हकीकत थोडक्यांत वर लिहिल्याप्रमाणें आहे. "इकडे मराठा संघानें मोंगलांच्या फौजेंशीं लढून आपली इभ्रत कायम राखिली, व वीस वर्षें झगडून गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविलें, तर तिकडे या वसाहतवाल्यांनीं मराठा संघांत सामील होण्याचें नाकारून, आपलें आपण रक्षण करण्याच्या भानगडींत, कर्नाटकमधील लढायांच्या फेऱ्यांत मात्र आपणांस पाडून घेतलें. त्यानंतर इ० सन १७६२ पासून प्रमुख स्वतंत्र संस्थानांतून तंजावरचें नांव रद्द झालें. या तंजावर संस्थानानें महाराष्ट्र-मातेशीं आपला असलेला संबंध जर तोडला नसता तर, इ० सन १७६२–१७९२ पर्यंत मराठ्यांनीं ज्या ज्या स्वाऱ्या केल्या, व ज्या स्वाऱ्यांत त्यांना नेहमीं यशच मिळत गेलें, व ज्यांत हैदर व टिपू यांना जबर खंडणी व पुष्कळ मुलूख देणें भाग पडून नंतर कांहींसा या स्वाऱ्यांचा जोर कमी झाला, त्या स्वाऱ्यांत या संस्थानाचें मोठें नांव झालें असतें, यांत कांहींही संशय नाहीं. त्याचप्रमाणें, वरील कारणामुळेंच, म्हणजे त्या संस्थानानें मराठा संघा-पासून अलग राहून, आपली आपण सोय पाहिली, या कारणामुळेंच गुत्ती संस्थानाचीही दुर्दशा झाली. ह्या छोटेखानी वसाहतींच्या हकीकतींपासून जो धडा शिकावयाचा आहे, तो हाच आहे. आणि मराठा साम्राज्य जुटीनें असलें तर प्रबळ, पण जर का जूट फुटली, तर आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याच्या कामीं कुचकामाचें; मराठा साम्राज्याची शक्ति व त्याचें दौर्बल्य, यांची कल्पना ही याच धड्यापासून उत्तम प्रकारें होत आहे." ( Rise of the Maratha Power; Page 253-255 ) आणि हतभागी अशा या तंजावरच्या राज्याच्या उच्छेदाचा इतिहास वाचल्यावर, त्याबद्दल कोणालाही अत्यंत खेद वाटल्याशिवाय राहणार नाहीं, हें उघड आहे.

**समाप्त.**

E
114